मराठी संशोधनमंडळपुरस्कृत ग्रंथमाला

ग्रंथ पहिला

आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांति

: लेखक :

डॉ. कृष्णाजी भिकाजी कुळकर्णी,
एम्. ए., बी. टी., पीएच्. डी.

—

प्रा. अनंत काकबा प्रियोळकर
डायरेक्टर, मराठी संशोधनमंडळ
(मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय)

यांच्या पुरस्कारासह

१९५६

मूल्य १५ रुपये

प्रकाशक

डॉ. कृ. भि. कुळकर्णी

७ एफ्, शारदाश्रम,

भवानी शंकर रोड,

मुंबई, २८

दे::e

कुलकर्णी (कृ.भी.)

<०५२.

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

: मुद्रक :

श्री. नारायण दत्तात्रय रेगे,

मोहन प्रिंटरी, प्रायव्हेट लि.,

माझगांव, मुंबई नं. १०

श्री नवरंग वाचन मंदिर
स्थापना: १९५८
१९१ प्रकार
पुणे २.

मातृचरणीं अर्पण

२७०५२

अनुक्रमणिका

पुरस्कार	१*–	३*
प्राक्कथन	४*	
प्रकरण १ प्रास्ताविक	१–	१०
प्र० २ महाराष्ट्राबाहेरील मराठी ज्ञानदानाचे प्रयत्न ...	११–	१६
प्र० ३ महाराष्ट्र आणि एल्फिन्स्टन	१७–	२२
प्र० ४ मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी ...	२३–	५१
प्र० ५ कँडीयुग	५२–	६०
प्र० ६ शालेय पुस्तकें तयार करणाऱ्या इतर संस्था ...	६१–	७३
प्र० ७ मराठी भाषेचीं व्याकरणें	७४–	११४
प्र० ८ कोशवाङ्मय	११५–	१३६
प्र० ९ कथावाङ्मय	१३७–	१८५
प्र० १० मराठी क्रमिक पुस्तकें	१८६–	२१८
प्र० ११ गणितविषयक शालेय पुस्तकें	२१९–	२३८
प्र० १२ शास्त्रीय विषय	२३९–	२७१
प्र० १३ इतिहास	२७२–	३०१
प्र० १४ भूगोल खगोल	३०२–	३१८
प्र० १५ ख्रिस्ती शालेय वाङ्मय	३१९–	३३९
प्र० १६ व्याकरणविषयक वादविवाद	३४०–	३९९
परिशिष्ट पहिलें	१–	६
परिशिष्ट दुसरें	७–	१६
परिशिष्ट तिसरें	१७–	३९
आधारग्रंथ	४०–	५५
दर्शिका	५६–	७३
शुद्धिपत्र	७४–	७७

पुरस्कार

डॉ. कृष्णाजी भिकाजी कुळकर्णी यांनीं पीएच्. डी. च्या पदवीकरितां म्हणून लिहिलेला प्रस्तुत प्रबंध संशोधनमंडळाचा पुरस्कृत ग्रंथ म्हणून प्रसिद्ध होत आहे, हें पाहून मला अत्यंत संतोष होतो.

कांहीं वर्षांपूर्वी पीएच्. डी. ची पदवी संपादन करण्याकरितां परदेशांत जावें लागे. अलीकडे आपल्या विद्यापीठांमध्येंच ती मिळविण्याची सोय झाल्यापासून दरवर्षी पुष्कळ संशोधनात्मक प्रबंध लिहिले जातात व त्यांपैकीं बरेच मान्यही होतात; परंतु यांपैकीं फारच थोड्या प्रबंधांना प्रसिद्धीचा लाभ मिळतो. आपल्या जनकांच्या नांवाला डॉक्टर ही उपाधि चिकटविण्यापलीकडे इतरांना त्यांचा कोणताही फायदा होत नाहीं. बी. ए., एम्. ए. किंवा इतर खालच्या परीक्षांच्या उत्तरपत्रिकांप्रमाणें त्यांना अखंड रद्दीच्या स्वरूपांत पडून राहावें लागतें, ही खेदाची गोष्ट आहे. शंभर वर्षांपूर्वी उच्च परीक्षांचीं उत्कृष्ट मानलेलीं निवडक उत्तरें सरकारी शिक्षणखात्याच्या वार्षिक रिपोर्टांत प्रसिद्ध होत. त्याप्रमाणें अलीकडची शालान्तपरीक्षा किंवा बी. ए., एम्. ए. सारख्या इतर परीक्षा यांमध्यें पहिला क्रमांक पटकावणाऱ्या किंवा सर्वांत जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका प्रसिद्ध करण्याची व्यवस्था झाल्यास इतर विद्यार्थ्यांना त्या मार्गदर्शक होतील. इतकेंच नव्हे तर आर्थिक दृष्ट्याही असें प्रसिद्धीकरण खालच्या परीक्षांच्या बाबतींत तरी नुकसानीचें ठरणार नाहीं, असें वाटतें.

पीएच्. डी. चे मान्य झालेले सर्वच प्रबंध छापून प्रसिद्ध करण्यासारखे असतात कीं काय, हें सांगवत नाहीं. पण त्यांपैकीं जे छापण्यालायक वाटतील ते प्रकाशित करणें विद्यापीठाचें किंवा ज्या संस्थांत ते तयार झाले असतील त्यांचें कर्तव्य आहे. डॉ. कुळकर्णी यांचा प्रस्तुत प्रबंध छापून प्रसिद्ध करावा अशी परीक्षकांची शिफारस होती. असें असतांही मराठी संशोधनमंडळाला कितीही तीव्र इच्छा असली तरी आजच्या परिस्थितींत ही आर्थिक जबाबदारी पत्करणें शक्य नव्हतें. अशा परिस्थितींत 'मोहन प्रिन्टरी'चे श्री. रेगे यांनीं केवळ एका उदयोन्मुख संशोधकाला मदत करावी म्हणून निरपेक्षबुद्धीनें ग्रंथ छापण्याचें मनावर घेतलें, याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत.

प्रस्तुत प्रबंधाचें मूळ नांव 'एकोणिसाव्या शतकांतील मराठी शालेय वाङ्मय व त्याचा आजच्या मराठी भाषेच्या घटनेवर झालेला परिणाम' असें होतें; परंतु हातांत कथलाचे वाळे असले तरी चालतील, पण नांव सोनूबाई पाहिजे, अशा आजच्या जमान्यांत या प्रबंधाचें 'शालेय' असें साधेंसुधें नांव पाहून कांहीं लोकांनीं नाकें मुरडलीं हें मला माहीत आहे. अशा लोकांना बिचकून डॉ. कुळकर्णी यांनीं आपल्या पुस्तकाला प्रस्तुत नवें नांव दिलें, असेंच कांहीं म्हणवत नाहीं. या ग्रंथांत

मुख्यतः शालेय ग्रंथांचा परामर्ष घेतलेला आहे. इतर ग्रंथांचा केवळ शुद्धलेखनापुरता क्वचित् निर्देश आहे. तेव्हां मराठी वाङ्मयाच्या नाटक, कादंबरी, निबंध वगैरे इतर शाखांचाही पुढील भाग लिहून विचार करावा व एकोणिसाव्या शतकांतील मराठी भाषा व वाङ्मय यांच्या उत्क्रांतीचें संपूर्ण दर्शन वाचकांना घडवावें, असा त्यांचा हेतु दिसतो. हा तर्क खरा असल्यास त्यांच्याकडून आणखीही संशोधनात्मक ग्रंथांची अपेक्षा करतां येण्यासारखी आहे.

एकाद्या विषयाची पदवी मिळविणें म्हणजे स्वतंत्रपणें त्या विषयाचा अभ्यास करण्याची पात्रता संपादणें आहे; परंतु अशाप्रकारें पदवी ही पुढील अभ्यासाची पूर्वतयारी असें न समजतां पुष्कळ विद्यार्थी तो त्याचा शेवट असें समजतात व परीक्षेंत एकदां यश मिळाल्यावर आपलीं अभ्यासाचीं सर्व पुस्तकें–कोशदेखील–जुन्या पुस्तकांच्या दुकानांत विकून टाकतात, असें ऐकतों. मराठी संशोधनमंडळाचें यश त्याच्या किती विद्यार्थ्यांनीं पीएच्. डी. पदवी मिळविली यावर अवलंबून नसून त्यांपैकीं किती विद्यार्थी पुढें आपलें संशोधन चालू ठेवितात यावरून ठरवावयाचें आहे, असें आम्हीं समजतों.

पीएच्. डी. च्या पदवीकरितां लिहिलेले कांहीं प्रबंध, सुईच्या अग्रावर किती देवदूत नाचले अशासारख्या मध्ययुगीन युरोपांतील वादांप्रमाणें व्यवहारांत निरुपयोगी असतात. डॉ. कुळकर्ण्यांचा हा प्रबंध तशा प्रकारचा नाहीं. सध्यां मराठी शुद्धलेखन-सुधारणेसारखा महत्त्वाचा प्रश्न लोकांपुढें आहे; अशा वेळीं प्रस्तुत प्रबंधाचा फार उपयोग होण्यासारखा आहे. मराठी गद्यभाषेला व लेखनपद्धतीला आजचें निश्चित स्वरूप कसें प्राप्त झालें याचा साधार इतिहास या प्रबंधांत वाचावयास सांपडेल. खेदाची गोष्ट ही कीं, छपाईचा खर्च टाळण्याकरितां त्यांना मूळ प्रबंधांतील तपशील बराच गाळावा लागला.

जुन्या काळीं मराठी शुद्धलेखनपद्धति निश्चित नव्हती. प्रत्येक लेखक मनमानेल तसें लिहीत असे. आपल्याचकडे अशी परिस्थिति होती असें नव्हे, तर युरोपांतही तशी होती. चॉसर किंवा शेक्स्पियर यांचे मूळाबरहुकूम छापलेले ग्रंथ व आजचे मुद्रित इंग्रजी ग्रंथ यांची लेखनपद्धति ताडून पाहिल्यास ही गोष्ट कळून येण्यासारखी आहे. संक्रमणावस्थेच्या स्थितींत असा प्रकार असणें स्वाभाविक आहे; परंतु एकदां लेखनपद्धति निश्चित झाल्यावर तिच्यामध्यें वारंवार बदल करीत राहाणें म्हणजे अनवस्थेला निमंत्रण देणें आहे. अलीकडे जो तो आपणास वाटेल तसें लिहीत सुटत आहे. कांहीं लेखक आपली लेखनपद्धति उच्चारानुसारी असावी असें म्हणतात, तर कांहीं व्युत्पत्तीप्रमाणें ती निश्चित करावी, असेंही प्रतिपादितात. उच्चार व व्युत्पत्ति यांची एकवाक्यता होणें कधींच शक्य नसल्यामुळें येणें-

करून मराठींत शुद्धलेखनाचें अराजक माजण्याची फार भीति आहे. ऑक्स्फर्ड डिक्शनरीमध्यें Orthography (शुद्धलेखनपद्धति) या शब्दाचा "Correct spelling; spelling according to accepted usage, the way in which words are conventionally written," असा अर्थ देऊन "when we use the word orthography we do not mean a mode of spelling which is true to the pronunciation but one which is conventionally correct", अशीही पुस्ती जोडिली आहे. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकामध्येंही "spelling which is correct according to accepted use", असा orthography या शब्दाचा अर्थ दिलेला आढळेल. यावरून शुद्ध लेखनपद्धतीमध्यें कोणत्या गोष्टीला महत्त्व द्यावयाचें असतें तें सहज कळून येण्यासारखें आहे. उच्चारानुसार लिहावयाचें म्हणजे प्रत्येक माणसाचीच नव्हे तर एकाच माणसाची दांत येण्यापूर्वीची, आल्यानंतरची व ते पडल्यानंतरची लेखनपद्धति निराळी ठरेल! व्युत्पत्ति ही तर सदाच वादग्रस्त असते.

विद्वानांमध्यें शुद्धलेखनासंबंधीं सध्यां जो वाद चालला आहे त्याचा परिणाम असा होत चालला आहे कीं, अलीकडे शुद्धलेखन असें कांहीं मुळीं राहिलेंच नाहीं असें विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका ज्यांना तपासण्याचा प्रसंग असेल ते सांगूं शकतील. अनुस्वार, मात्रा नसलीं म्हणजे नवें शुद्धलेखन व असलीं म्हणजे जुनें शुद्धलेखन. हे जुनेनवे सर्व प्रकार त्यांच्या एकाच वाक्यांत पाहावयास सांपडतात! 'शुद्ध कसें लिहावें व शुद्ध कसें बोलावें' हें व्याकरण शिकल्यानें समजतें असें दादोबा सांगतात. पूर्वी दादोबांचें एका आण्याचें केवळ एक लघुव्याकरण शिकून विद्यार्थी जितकी मराठी भाषा शुद्ध लिहीत तितकी दर वर्गाला नवें व्याकरण व शेवटीं दामले यांचें भलें मोठें शास्त्रीय मराठी व्याकरण शिकूनही विद्यार्थी आज लिहीत नाहींत, अशी तक्रार आहे. पुनः पुनः शुद्धलेखनाचे नवे नियम बनविण्यापेक्षां जुने नियमच सक्त अमलांत कसे येतील हें पाहाणें म्हणजेच आज शुद्धलेखनपद्धतींत खरी सुधारणा करणें आहे. आजच्या निश्चित शुद्धलेखनपद्धतीमागें शंभर सवाशें वर्षांचा केवढा इतिहास आहे, हें प्रस्तुत ग्रंथ वाचल्यास कळून येईल.

महाराष्ट्रांतील विद्याव्यासंगी गृहस्थ, शिक्षणसंस्था व ग्रंथालयें या पुस्तकाला आपला उदार आश्रय देऊन लेखकाच्या परिश्रमाचें चीज करतील, अशी मला आशा आहे.

मुंबई,
१८-९-५६.

अ. का. प्रियोळकर
डायरेक्टर, मराठी संशोधनमंडळ.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

वर्ग.....क्रमांक.....

प्राक्कथन

बोर्डी येथें सू. पे. ह. विद्यालयामध्यें शिक्षक म्हणून काम करीत असतांना तेथील सरकारी प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजचे प्राचार्य कै. माधवराव सबनीस यांनीं संशोधनमंडळातर्फे संशोधनार्थ दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीसाठीं मी अर्ज करावा अशी सूचना केली. शिष्यवृत्ति मिळाल्यामुळें प्रा. प्रियोळकर यांच्या पितृतुल्य मार्गदर्शनाखालीं मी पीएच्. डी. पदवीसाठीं प्रबंध लिहिला व त्याला मुंबई विश्वविद्यालयाची मान्यता मिळाली. हा प्रबंध छापला जावा अशी स्वाभाविकच इच्छा होती. 'मोहन प्रिंटरी'चे चालक श्री. ना. द. रेगे यांच्या कृपेमुळें ती पुरी होऊं शकली. त्याचप्रमाणें माझे आप्त श्री. रमाकांत देसाई यांनींहि या कामीं सक्रिय सहानुभूति दाखविली. या सर्वांचा मी आभारी आहें.

मुद्रितें तपासण्याचा मला सराव नसल्यामुळें या पुस्तकांत कांहीं दोष राहून गेले आहेत याची मला जाणीव आहे. उदाहरणार्थ पृ. २७३ पासून पृ. ३१८ पर्यंत पुस्तकाचें नांव व प्रकरणाचें नांव यांची अदलाबदल झाली आहे. ठळक मुद्रणदोषांची यादी शेवटीं जोडिली आहे. मुद्रित प्रत तपासतांना माझे मित्र प्रा. यशवंतराव केळकर यांनीं केलेल्या मदतीचा उल्लेख करणें जरूर आहे. मेजर कँडी यांच्या शोधक नजरेनें पाहूं गेल्यास आणखीहि दोष सांपडण्याची सहज शक्यता आहे.

प्रबंध तयार करतांना अनेक व्यक्ति व संस्था यांचा उपयोग मीं करून घेतला. प्रस्तुत प्रबंधाची उभारणी प्रामुख्यानें मुंबई व पुणें येथील सरकारी दप्तरखान्यांतील कागदपत्रांवर केली आहे. या दप्तरखान्यांचा उपयोग करण्याच्या बाबतींत सवलती दिल्याबद्दल तेथील अधिकारीवर्गाचा मी आभारी आहे. शेंदीडशें वर्षांपूर्वीचें जरूर तें मुद्रित व अमुद्रित वाङ्मय अभ्यासण्यासाठीं मला अनेक ठिकाणीं हिंडावें लागलें. या कामीं मुंबईतील अनेक प्राथमिक शाळांच्या ग्रंथसंग्रहालयांची पाहाणी करण्याची परवानगी मुंबई नगरपालिकेच्या शिक्षणाधिकाऱ्यांनीं मला दिली. तसेंच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई येथील सरकारी मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई विद्यापीठाचें ग्रंथालय, नेटिव्ह जनरल लायब्ररी, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, पुणें येथील महाराष्ट्र ग्रंथालय, फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयांतील मंडलिक ग्रंथसंग्रह, श्री. शं. ग. दाते यांचा खासगी ग्रंथसंग्रह, अहमदनगर येथील अमेरिकन मराठी मिशन ग्रंथसंग्रहालय, इत्यादि ठिकाणीं आवश्यक तें साहित्य मला मिळूं शकलें. या सर्व संस्थांचा व व्यक्तींचा मी आभारी आहें.

मुंबई विद्यापीठानें प्रबंध छपाईसाठीं पांचशें रुपये दिले. त्याबद्दल मी कृतज्ञ आहें.

प्रस्तुत पुस्तक म्हणजे माझ्या प्रबंधांतील महत्त्वाचा भाग होय. या पुस्तकाला दिलेल्या नांवाबद्दल मतभेद होण्याची शक्यता आहे याची मला जाणीव आहे.

शेवटीं माझे मार्गदर्शक प्रा. अ. का. प्रियोळकर आणि या पुस्तकाचे मुद्रक श्री. रेगे यांचा मी केव्हांही अनृणी होऊं शकत नाहीं या जाणिवेनें हें प्राक्कथन पुरें करतों.

शारदाश्रम, मुंबई, २८
अविधवा नवमी, १९५६

कृ. भि. कुळकर्णी

प्रकरण पहिलें

प्रास्ताविक

पूर्वजांच्या इतिहासाची आस्था आपल्याकडे अद्यापपर्यंत कां नव्हती याची कारणमीमांसा करतांना विश्वनाथ काशीनाथ राजवाडे लिहितात, 'युनिव्हर्सिटी स्थापन होण्यापूर्वी दादोबा पांडुरंगादि जी मंडळी झाली त्यांचा काल शालोपयोगी लहानमोठीं पुस्तकें रचण्यांत गेला.[१]' इतिहासाचार्यांची ही समजूत कांहीं अंशीं खरी आहे. महाराष्ट्रांत स्वराज्य नष्ट होऊन इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाल्यावर, ती दृढमूल करण्यासाठीं लोकशिक्षण हाच एक मार्ग असल्याचें माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनप्रभृति तत्कालीन राज्यकर्त्यांना वाटलें व या दिशेनें त्यांचे प्रयत्न सुरू झाले. या प्रयत्नांमधूनच एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत बरेंच शालोपयोगी वाङ्मय निर्माण झालें. या वाङ्मयनिर्मितींत परभाषीयांबरोबर एतद्देशीय विद्वानांनींसुद्धां भाग घेतला. इंग्रजी राज्यकर्त्यांबरोबर त्यांची भाषा व त्यांचें वाङ्मय महाराष्ट्रांत आलें व परकी वाङ्मयाची मराठी भाषिकांना ओळख व्हावी म्हणून त्यांतील शालोपयोगी भाग भाषांतरित केला गेला. हें भाषांतरित वाङ्मय शिक्षणक्रमांत समाविष्ट झाल्यामुळें त्याला साहजिकच महत्त्व प्राप्त झालें व तें समृद्ध करण्याकडे तत्कालीन एतद्देशीय विद्वानांचें लक्ष वेधलें. सार्वत्रिक शिक्षणप्रसारार्थ निर्माण होणारें हें वाङ्मय आपली राजकीय सत्ता संपुष्टांत आणण्यास कारणीभूत होणार आहे, याची कल्पना तत्कालीन राजकर्त्यांना होती. ले. ब्रिग्ज नामक एक लष्करी अधिकारी माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या भेटीस गेला असतां, त्याच्या तंबूच्या एका कोपऱ्यांत नवीनच छापलेल्या मराठी पुस्तकांचा ढीग ब्रिग्जला दिसला. या प्रसंगाचें वर्णन करतांना ब्रिग्ज म्हणतो,

"On my observing in the corner of his tent one day a pile of printed Mahratta books, I asked him what they were meant for? 'To educate the natives,' said he; 'but it is our high road back to Europe'. 'Then' I replied, 'I wonder, you, as Governor of Bombay, have set it on foot.' He answered, "We are bound, under all circumstances, to do our duty to them.[२]"

---

१ विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, १७५० पासून १७६१ पर्यंत.** १८९८. प्रस्तावना, पृ० १.

२ *Journal of East India Association, Report for* 1867-68. p. 103.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.
वर्ग.....क्रमांक.....

कोणत्याहि दोन भाषांचा जेव्हां संबंध येतो, तेव्हां एकमेकीचे गुण एकमेकीस लागतात. विशेषतः इंग्रजी व मराठी सारख्या भिन्न भाषांची गांठ पडल्यावर हा चमत्कार नजरेंत भरण्यासारखा असतो. तथापि परक्या भाषेपेक्षां देशभाषेवर होणारा परिणाम जास्त उठून दिसतो. E. Windisch नामक तज्ज्ञानें या बाबतींत काढलेल्या निष्कर्षाला जेस्पर्सन या भाषाशास्त्रज्ञानें फार महत्त्व दिलें आहे. तो निष्कर्ष असा:—

"It is not the foreign language a nation learns that turns into a mixed language, but its own native language becomes mixed under the influence of a foreign language.[३]"

युरोपियन व मराठी भाषा

इंग्रजी भाषेच्या संसर्गानें पालटलेल्या मराठी भाषेची स्थिति इंग्रजी अमदानीच्या अगोदर कशी होती, हें जाणून घेतल्याशिवाय मराठी भाषेवर झालेल्या इंग्रजी भाषेच्या परिणामाची कल्पना पूर्णपणें येणार नाहीं. मराठी भाषेच्या पूर्वास्थितीबद्दल अनेकांनीं आपापलीं मतें व्यक्त केलेलीं आढळतात. विशेषतः पेशवाईच्या अंतकालीं महाराष्ट्रांत वावरणाऱ्या कांहीं इंग्रज अधिकाऱ्यांनीं, त्यावेळीं वापरांत असलेलीं हस्तलिखितें व त्यांची भाषा यांबद्दल वेळोवेळीं व्यक्त केलेले विचार समजून घेणें आवश्यक आहे. उत्तर कोंकणचा कोणी एक कलेक्टर तत्कालीन मराठी भाषा व वाङ्मय यांबद्दल तारीख २ डिसेंबर, १८२३ रोजीं लिहितो,

"I conceive it is too generally known to be doubted, that though many of the literary works of the Hindoos contain sublime philosophy both natural and moral yet I believe it is not less certain that in the generality of works now extant these truths are drawn either in such a mystical garb as to render their meaning obscure in the highest degree, or else are couched in such figuratively fantastic and obscure language as entirely to render unavailing the doctrine intended, or rather perhaps not intended, to be taught to the world, and at all events to make it anything rather than desirable that such works in their uncalled state should become the basis of education.[४]"

पेशवाईच्या अंतकालीं प्रचारांत असलेलें मराठी वाङ्मय नवीन स्थापन होणाऱ्या शाळांमधून कितपत उपयोगी पडेल हें ठरविण्याची वेळ जेव्हां आली, तेव्हां

३ Otto Jesperson. *Language*. 1947. p. 208.

४ *G. D. Vol. 63*. 1824. pp. 6-8.

वरील मत व्यक्त केलें गेलें. तत्कालीन हस्तलिखित पुस्तकांबद्दल माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टननेंहि असेंच मत व्यक्त केलें. तारीख १० मार्च, १८२४ रोजीं तो लिहितो,

"It is of comparatively little use that people are taught to read if their studies are to be confined to legends of Hindoo Gods and it seems at first sight to be extremely easy at a trifling expense to supplement the few inaccurate and expensive manuscripts which are in the hands of the natives by an abundance of simple and rational publications through the means of the press.[५]"

वरील उताऱ्यावरून असें दिसतें कीं, याकाळीं लोकांच्या हातीं जीं हस्तलिखित पुस्तकें होतीं तीं नवीन स्थापन होणाऱ्या शाळांमधून वापरण्यास अयोग्य असल्याचें एल्फिन्स्टन सारख्यांना वाटत होतें. अशाच प्रकारचे विचार, शिक्षणप्रसारार्थ इ. स. १८२२ मध्यें स्थापन झालेल्या 'मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तकमंडळी' या संस्थेनें व्यक्त केले. तत्कालीन प्रचलित मराठी वाङ्मय व भाषा यांबद्दल मंडळीचें मत असें होतें :—

"The society have long ago been convinced that their earlier attention should be directed to the preparation and publication of books both for the elementary and for the more advanced stages of education among the natives. In the vernacular dialects of the two provinces subject to this presidency, they can discover scarcely any work calculated to promote instruction. The Maratha and Gujrathee languages have always been restricted to the purposes of conversation and business and have never been applied to the cultivation and extension of literature even in its humblest forms. The Committee, therefore, must depend on the exertions of European gentlemen, in order to point out to such intelligent natives as may lend their assistance, the proper mode of reducing these languages to fixed rules and principles and of employing them successfully in the translation of such works from English as may be approved of by the Directors.[६]"

---

५ *G. D. Vol. 63.* 1824. p. 46.

६ *Ibid.* pp. 99–100.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

मराठी भाषेबद्दलच्या वरील कल्पना अपुऱ्या माहितीवर आधारलेल्या होत्या असें म्हणणें भाग आहे. माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन, वॅन्स केनेडी, जेम्स मोल्स्वर्थ इत्यादि परभाषिकांना मराठी भाषा व तिचा शेंकडों वर्षांचा इतिहास, यांचें असावें तितकें ज्ञान नव्हतें असें दिसतें. नाहींतर मराठी ही केवळ बोली भाषा आहे, तिच्यांत विशेष वाङ्मय नाहीं, ही भाषा केवळ व्यापारी व शेतकरी यांचीच आहे, असें ठरीव मत व्यक्त केलें गेलें नसतें. या लोकांना महानुभावी वाङ्मय अगर मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदासादिकांच्या वाङ्मयाची असावी तितकी कल्पना नव्हती, असें म्हणावें लागतें. वॅन्स केनेडीची मराठी भाषेबद्दलची कल्पना अशी होती :—

"It must be observed that the Maratha is merely a spoken language and that it has never been cultivated or refined by authors either in prose or verse. Its formation took place amongst a people solely engaged in agriculture, and all terms relating to science, law, and religion were adopted from another language, and as the vernacular tongue was not employed in composition, it will be obvious that under such circumstances a language could never become copious.[७]"

प्रसिद्ध कोशकार जेम्स मोल्स्वर्थ मराठी भाषेसंबंधीं लिहितो,

"(It is) a language less regular and less definite than the English and ... being only a spoken language, inconceivably less apprehensible and less susceptible of rigid interpretation.[८]"

त्याचप्रमाणें, मोल्स्वर्थच्या कोशावर सरकारी समितीनें—या समितींत वॅन्स केनेडी रॉबर्ट मनी व पोप हे सभासद होते—जो अभिप्राय दिला त्यांत असें म्हटलें आहे :—

"Cap. Molesworth has himself correctly observed that *this language is altogether oral or appears as written only in epistles, a few poetical pieces and about a dozen insignificant histories.*[९]"

मागील पृष्ठांत प्रमाणाबाहेर इंग्रजी अवतरणें दिलेलीं आढळतील, त्याचें कारण एवढेंच कीं मराठी भाषा व तींतील गद्यपद्य वाङ्मय यांबद्दल, इंग्रजी अमदानीच्या सुरुवातीला परकीयांच्या काय कल्पना होत्या, हें वाचकांना कळावें. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला मराठी गद्य रचनेला सहेतुक आरंभ झाला हें खरें आहे; परंतु

७ Vans Kennedy, *Dictionary of the Maratha Language*. 1824. Preface, p. 4.

८ *G. D. Vol. 171.* 1828. p. 245.

९ *G. D. Vol. 237.* 1831. p. 67.

तत्पूर्वी मराठीमध्यें गद्य मुळींच लिहिलें गेलें नाहीं ही समजूत चुकीची आहे. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे म्हणतात, "महाराष्ट्र प्रथम बोलूं कशांत लागलें? तर गद्यांत आणि हें खरेंच आहे. नित्याचा व्यवहार गद्यांतच झाला पाहिजे. असा सिद्धांत कित्येक लोक काढतात कीं महाराष्ट्रें प्रथम पद्यांत विचारप्रदर्शन करतात परंतु तें मराठीसंबंधानें खरें नाहीं.[१०]"

मराठी गद्याची पूर्वपीठिका

मराठी गद्य वाङ्मयाचा इतिहास पाहावयाचा झाला तर मराठी गद्याचें पहिलें दर्शन ठिकठिकाणीं उपलब्ध झालेल्या शिलालेखांमध्यें होतें. या गद्याला जरी वाङ्मयीन मूल्य कमी असलें तरी मराठी गद्याची मूळपीठिका या दृष्टीनें त्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. प्राचीन गद्य वाङ्मय म्हणून यादवकालीन गद्याला फार मानाचें स्थान द्यावें लागतें. महानुभावी वाङ्मयांतील पुष्कळ ग्रंथ गद्यमय आढळतात. हे सर्व ग्रंथ सांकेतिक लिपीमध्यें लिहिलेले असल्यामुळें पंथीयेतर लोकांस त्यांची ओळख कालपरवांपर्यंत होऊं शकली नाहीं. त्याचा एक फायदा असा झाला कीं तें शतकानुशतकें मूळ स्थितींत राहूं शकलें. साधारणपणें प्राचीन ग्रंथांचें मूळ स्वरूप पाहावयास मिळणें कठीण पडतें, कारण मुळावरून नक्कल करतांना लेखकाच्या हातून कळत नकळत चुका होतात. महानुभावी वाङ्मय या दोषापासून बरेंच दूर राहूं शकलें. तसेंच जें कांहीं लिहावयाचें तें सर्वांना समजावें व आपल्या पंथाचा प्रसार व्हावा या हेतूनें हें वाङ्मय निर्माण झाल्यामुळें तें साध्या व सोप्या भाषेंत लिहिलें गेलें. संकेताचीं कुलुपें उघडून अलीकडे हें वाङ्मय सर्वांस उपलब्ध झाल्यामुळें तत्कालीन लोकभाषेची कल्पना येऊं शकते.

यानंतरच्या कालांतील मराठी गद्य वाङ्मयाचा कालानुक्रमानें विचार करावयाचा झाल्यास 'पंचतंत्रा' सारख्या कांहीं कथा, फादर स्टीफन्स यानें आपल्या 'खिस्तपुराणा'ला जोडलेली गद्य प्रस्तावना, एक दोन एकनाथी भारुडें एवढेंच गद्य वाङ्मय मिळूं शकतें. मराठेशाहींतील गद्यासंबंधी बोलावयाचें तर पुढील काळांत गद्यांत लिहिलेल्या सनदा, निवाडापत्रें, करीणे, कैफियती, खासगी पत्रव्यवहार, बातमीदारांचीं पत्रें पुष्कळ आढळतात. व्यवहार वाढला त्याबरोबर गद्यलेखनहि वाढीस लागलें. बखर वाङ्मय हें मराठी गद्याचें उज्ज्वल स्वरूप होय. कारकुनी बाण्याच्या लोकांनीं यांतील पुष्कळशा बखरी लिहिलेल्या असल्यामुळें त्यांची भाषा व्याकरणरहित व फारशीशब्दमिश्रित आढळली तर त्यांत आश्चर्य नाहीं. बखर वाङ्मयाचें वाङ्मयीन आणि ऐतिहासिक महत्त्व कितीही असलें तरी, व्याकरणशुद्धतेच्या दृष्टीनें पाहिल्यास त्यांत पुष्कळ दोष आढळतात. त्यांतील वाक्यें

---

१० **भारत-इतिहास-संशोधक-मंडळ**, षाण्मासिक वृत्त. शके १८३४ (आश्विन-फाल्गुन). पृ. १३१.

कित्येकदां इतकीं लांब आणि असंबद्ध असतात कीं, त्यांत कार्यकारणभाव असलेला दिसत नाहीं.

आंग्लपूर्वकालांतील गद्याचा नमुना पाहावयाचा झाल्यास, नाना फडणविसांनीं सवाई माधवरावासाठीं चिटणिसांकडील बाळाजी गणेश या कारकुनाकडून इ. स. १७८२ मध्यें लिहवून घेतलेली 'पेशव्यांची बखर' किंवा व्यवहारोपयोगी व अनुभवजन्य हितोपदेश करणारी, इ. स. १७८९ मध्यें रचलेली 'नारायण शिक्षा' यांसारखे ग्रंथ चाळावे लागतील. विशेषतः 'नारायण शिक्षे' सारखा ग्रंथ समोर ठेवून पुढील काळांत मुंबईच्या हैंदशाळा शाळापुस्तक मंडळीनें नीतिपर शालेय पुस्तकें तयार केलीं असणें शक्य आहे. अठराव्या शतकाच्या शेवटीं मराठी गद्याचें स्वरूप पाहातां एक गोष्ट नमूद करावी लागते ती ही कीं, यावेळीं बहुतेक लेखन मोडी लिपींत केलें जाई, त्यामुळें शब्द तोडून लिहिण्याची पद्धति नव्हती. तसेंच विरामचिन्हांचा उपयोग केला जात नसे. कांहीं ठिकाणीं वाक्याची सुरुवात तृतीयान्त कर्त्यानें होऊन, तें वाक्य कर्तरि प्रयोगीं लिहिलें जाई. याशिवाय वाक्यांत कांहीं शब्द अध्याहृत ठेविलेले, तर कांहीं शब्द वाक्यांत मध्येंच कोठेंतरी घातलेले असत. लेखनपद्धति निश्चित ठरलेली नसल्यामुळें एकच शब्द अनेक पद्धतींनीं लिहिला जाई. मोडी लिपीमुळें ह्रस्वदीर्घांकडे लेखकांचें दुर्लक्ष होणें स्वाभाविक होतें. एकंदरींत भाषेला जो रेखीवपणा व जी व्याकरणशुद्धता आवश्यक असते ती या काळांत तितकीशी नव्हती असें म्हणावें लागतें.

आंग्लपूर्वकालीन गद्याचे कांहीं नमुने

आंग्लपूर्वकालांतील गद्याचा नमुना म्हणून एका अप्रकाशित पोथींतील कांहीं भाग मुद्दाम खालीं दिला आहे. शिवराम अकोलसामवासीकृत 'अष्टावक्र' नामक गद्यटीकेंतील हा भाग आहे. या टीकेचा लेखनकाल इ. स. १७७१ असा आहे.

"अरे कुबुद्धि म्हणजे मूढबुद्धि ऐसे पुरुष जे ते निर्मळ आणि द्वैतवर्जित ऐसा आत्मा जो त्यातें चिंतित आहेत ॥ परंतु जाणत नाहिंत म्हणजे साक्षात्कार नाहिं ॥ अहो कां ॥ अरे मोह म्हणजे अज्ञान आहे म्हणून जाणत नाहिंत ॥ अहो मोह कैसा आहे ऐसें म्हणसील जर तर आईक ॥ अरे निर्मळत्त्व जें त्यास कल्पितात्मसापेक्षत्त्व आहे आणि अद्वय जें त्यास कल्पितद्वैतसापेक्षत्त्व आहे आणि आत्मत्त्व जें त्यास कल्पितात्मसापेक्षत्त्व आहे म्हणून सापेक्षरूपाचिंतनें करूण मोह दूर होत नाहिं म्हणून त्यांस मोह आहे ऐसें जाण ॥ अरे जे शुद्धअद्वयात्मचिंतन करित आहेत ते आत्म्यातें जाणत नाहिंत म्हणूनच ते मूढबुद्धिपुरूष जे ते यावज्जीव-पर्यंत परमसंतोषरहित राहत आहेत ॥ अहो कां ॥ अरे संतोष जो तो ज्ञानेंकरूणच लभ्य होय म्हणून संतोषशून्य ऐसे राहत आहेत ऐसें जाण ॥ ४३ ॥ अरे याच अर्थातें स्पष्ट करूण दाखवितों आईक ॥ [११]"

११ शिवराम, **अष्टावक्र गद्यटीका.** (मराठी संशोधनमंडळसंग्रह, मुंबई. नं. २०.)

एका अप्रकाशित बाडांतील महेश्वरभट्ट (इ. स. १७१८–१८१६) यांच्या 'वाक्य-सुधा' नामक प्रकरणांतील एक उतारा तत्कालीन गद्याचा नमुना म्हणून पाहा :—

"श्रीमंत भारतीतीर्थ नामक गुरुवर्य जे ते लोकोद्धारासाठीं वाक्यसुधानामक प्रकरणातें करिते जालेत तेथ ग्रंथनिर्विघ्नतेसाठीं कूटस्थरूपपरमात्मास्वरूपानुस्मरणलक्षण-मंगलातें आचरते होत्साते सच्चिदानंदस्वरुपावस्छानलक्षणमोक्ष जो तो महावाक्यविचार-जन्यसाक्षात्कारावांचूनि न घडे वाक्यार्थ साक्षात्कारही पदार्थ परिशोधनावांचून न घडे यास्तंव श्रीभाष्यकारांहीं शारीरक भाष्याचे ठायीं प्रतिपादिला जो अर्थ त्यातें हृदयीं धरून त्वंपदार्थपरिशोधनातें आरंभिताहेत – – – चक्षुनें जे गृहण करिजेलें तें रूप सर्वहि दृश्य म्हणावें त्याचे ग्रहण करितें जें चक्षु तें रूपाचें द्रष्टें होय येवंच तें चक्षुहि मनास दृश्य होय मनचक्षुचें द्रष्टें होय मनाच्या वृत्ति ज्या इछासंकल्पादीक त्याही दृश्य होत त्यांचा द्रष्टा साक्षी म्हणजे शरीरत्रयविलक्षण प्रत्यगात्मा जो त्यातें संक्षेपें दर्शवून प्रथम चरणी उक्त जो अर्थ त्यातें या द्वितीयश्लोकीं विस्तारितो.[१२]"

यानंतर निरंजन माधवाच्या (अठरावें शतक) 'वाक्यसुधाटीका' नामक पोथीमधील खालील उतारा पाहा :—

"एकरूप जे लोचन ॥ त्याचे भेद अनेक पाहिले आहेत ते कोणते ॥ माझे नेत्र अंध मंद स्वछ असे लोचनाचे नाना धर्म मनास दिसतात म्हणुन दृश्य जाले मन याचे दृष्टे जाले याप्रकारें श्रोत्रेंद्रियादिकाचा ठांई आध्यमांद्यपटुत्व मनास गोचर होतें ॥ यास्तव मन याचे दृष्टे जाणावे श्रोत्रिंद्रिय विषयशब्द तो दों प्रकारिचा ॥ वर्णात्मकध्वन्यात्मक म्हणुन त्वगेंद्रियस्पर्श तो शीत उष्ण अनुष्णाशीत मृदु कठिण इत्याद्यनेक आहेत ॥ जिव्हाविषयरस तो सा प्रकारिचा ॥ मधुराम्ललवणकटुका षायातिक्त ॥ घ्राणविषयगंध दों प्रकारिचा ॥ सुगंध दुर्गंध ॥ या विषयांसहित सकळे इंद्रियाचे मन दृष्टें जाले ॥ ३ ॥ आतां मनाचे भेद सांगतो ॥ – – – काम म्हणजे स्त्रीपरिग्रहसंभोगाद्याभिलाश संकल्प म्हणिजे प्रत्युपस्छित विषयाचे ठांयि विकल्प नश्रुक्लनिलादिभेदेकरून ॥ विचीकिछा म्हणिजे संशयात्मक ज्ञान श्रद्धा आस्तिक्यबुद्धि ॥ अश्रध्दातद्विपरितबुद्धि म्हणिजे अविश्वासधृतिर्धारणा देहाद्यवसादनउत्तंभन म्हणजे शरिराचे उठणे बसणे ॥ अधृतितद्विरूध्दआलस्यादि ॥ – – – भीति म्हणजे भय ॥ हे सर्वहि मनच ॥ याचे अनंत भेद आहेत ॥[१३]"

वर दिलेल्या उताऱ्यांतील विषय बाजूला ठेवून आंग्लपूर्व गद्याचे नमुने म्हणून भाषेच्या दृष्टीनें त्यांचा विचार केला तर असें दिसेल कीं, व्याकरणामुळें येणारी

१२ **श्री. प्रियोळकर यांच्या संग्रहांतील एक हस्तलिखित बाड.** पृ. २३०.

१३ निरंजन माधव, **वाक्यसुधाटीका.** (मराठी संशोधनमंडळसंग्रह, मुंबई. नं. १४)

नियमबद्धता त्यांत कमी आहे. कोणतेंहि मनोगत व्यक्त करतांना, तें ज्या भाषेंत करावयाचें त्या भाषेला व्याकरणाचें नियमन असणें आवश्यक असतें. आंग्लपूर्वकालांत या नियमनाकडे विशेष लक्ष दिलें गेल्याचें दिसत नाहीं. ह्रस्व दीर्घ अगर अनुस्वार यांचा विचार, विरामचिन्हें, लेखनशुद्धि किंवा वाक्यरचना इत्यादि बाबतींतील नियम पाळले गेले असें म्हणतां येत नाहीं. महाराष्ट्रांत इंग्रजी राजवट सुरू होण्याच्या काळीं जीं हस्तलिखितें इतस्ततः विखुरलेलीं होतीं, त्यांतील बरींचशीं इंग्लंडमध्यें पाठविलीं गेलीं. अशा हस्तालिखितांची जी सूचि तयार झालेली आहे, तीवरून या हस्तलिखित पुस्तकांची कल्पना येऊं शकते. या पुस्तकांतील कांहींच्या microfilms मुद्दाम मराठी संशोधनमंडळातर्फे मागविल्या होत्या. त्यांतील एकदोन पुस्तकांचा कांहीं भाग खालीं देत आहे. 'किताब गाईच्या देवीची उत्पत्ती व गुण त्याचा तपसील' नामक एक पुस्तक इ. स. १८१२ मध्यें लिहिलें गेलें. या पुस्तकांमधील खालील उतारा पाहाः—

"इंग्रजाकडील माहान माहान सरदार याचे मनात आले जे मुंबईत गाईच्या देवी येऊन पोंहचल्या आणि पुण्यामधीं वस्ती फार व देवीचे उपद्रवेंकरून मनुष्यें बहुत हैराण होतात याजकरितां तिकडे हा उपाय पाठवावा म्हणून इंग्रेजी वैद्यांस सरदार यानीं आज्ञा केली नंतर वैद्यानी येका ब्राह्मणास हा अभ्यास करवून व त्याचे बरोबर देवी काढले मूल देऊन पुण्यास रवाना करून दिल्हा सन् १८०२ माहे आगटोबर इंग्रेजी मराष्ट्र शके १७२४.

"कलम २४ मग त्या ब्राह्मणाने थोड्याश्या मुलांस देवी काढल्या परंतु लसीचे संरक्षण केलें नाहीं दोन तीन वेळां लस आणविली परंतु ही सांभाळावयास कोण्ही इंग्रेजी वैद्य नव्हते या करता लस हमेशा उडत गेली कलम २५ यानंतर कोरस साहेबानी ममईहून गाईची लस आणिली सन १८०६ माहे सपटेंबर इंग्रजी मराष्ट्र शके १७२८ नंतर कार्नेल क्लोज साहेब याचे आज्ञेवरून संगमावर दर आठा दिवसा आदीतवारी मुलास देवी काढुं लागले यावर शहेरांतील ब्राह्मणांची व आवंतर जातीचीं मुलें एऊन दर आठवडा देवी काढवून जाऊं लागली कलम २६ नंतर हें वर्तमान श्रीमंत माहाराज बाबासाहेब यानी ही गोष्ट ऐकोन कर्णेल क्लोस साहेब यास विचारले की गाईच्या देवीचा चमत्कार ऐकिला आहे तर खूद आमचे स्त्रीस देवी काढबावयाच्या आहेत याचे कैसें काय तें सांगावें मग कार्नेल साहेबानी माहाराजांची खातरजमा केली मग बाइसाहेबास कर्णेल साहेबांचे हुनूर आणून देवी कोरस साहेबानी काढिल्या चंद्र २२ माहे डिसेंबर सन इंग्रेजी मराष्ट्र शके १७२८—कलम २७ बाइसाहेबांचे दंडावर उत्तम प्रकारच्या फुगल्या श्रम झाले नाहीत नंतर कोरस साहेबाला माहाराजानी फार नावाजले कलम २८ नंतर त्या दिवसापासून शहरांत

व भोंवरगावी कोरस साहेब देवी काढुं लागले त्याची सुमारी १७०५६ ब्राह्मण व शूद्र वगैरे मीळोन माहे एप्रिल चंद्र १४ सन १८१२ इंग्रेजी. [१४]"

इंग्रजी राजवट महाराष्ट्रांत सुरू होऊन पांचसात वर्षें झालीं होतीं. इ. स. १८२२ मध्यें मुंबईला हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी स्थापन होऊन एतद्देशीय शास्त्रीपंडितांच्या मदतीनें इंग्रज अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं शालेय पुस्तकें तयार होत होतीं. अशावेळीं इ. स. १८२५ मध्यें शाहूनगर ऊर्फ सातारा येथें 'शेवक बोधनी' नामक एक लहानसें पुस्तक रचलें गेलें. त्या पुस्तकांतील खालील उतारा पाहावा :—

"श्रीमत्नृपाळकाप्रती नमन असो की ज्याचे सतेनें कितेक बुदीमान नीर्माण जाले आणि त्याणी विचक्षणा करून जी जी सारे नीवडुन ग्रंथ केले त्याअन्वये जे वागतात ते बहुधा संकटी पडत नाहींत त्यातही शेवक जनानी प्रभुसनीध कसे वागावे ते वीषईच्या गोष्टीचा सार थोडक्यांत नीवडुन या लहान पोथीची योजना करावी असे माधवराव मुनसी नि॥ सरकार श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपती याणे मनात आणोन या ग्रंथाचे नाव शेवक बोधीनी असें ठेवीले असे जे कोणी या पोथीत लिहील्या अन्वये वर्तणुक करतील ते राज्यासनीध सुखरूप वागतीलसे वाटते असो प्रार्थना हीच की कोठे काही अशुध असल्या शुद्ध करावे.

ग्रंथ आरंभ

"जे काली अतरत बादशाहाचा पुत्र उमर पादशाहा हा सार्वभौम याचे भेटीस चालिला तेव्हा तीर्थरूपाने अतीश्नेह करून त्यास बोध केला की हे प्रीय पुत्रा हली सार्वभौम याचे दर्शनास जावयाकरीता उदीत आहेस त्या गोष्टीचा मजला बहुत संतोष वाटतो कारण जे जगदीश ज्याजवर कृपाळु होंऊन ज्याचे कल्याण करीतो त्याजला राजदर्शन अगर सत्कर्म करावयाची बुधी देतो परंतु जे जाण्यास इछीतात त्यास इतक्या गोष्टी अनकुळ असाव्या म्हणजे येक वीद्या १ दुसरी धुर्तता २ तीसरी प्रीयवगतृत्व चवथे सोजन्य पाचवे अनेक प्रकर्ण अवगत साहावे धीटपणा व शौर्य अैसीयासी हे साहाही गुण तुजमध्ये आहे त्यापक्षी तू तेथे गेलास तरी सार्वभौमाचा परम प्रीय होशील. [१५]"

आंग्लपूर्व मराठी गद्याची कल्पना येण्यास वर दिलेले उतारे पुरेसे आहेत. त्यावरून इंग्रजी अमलाच्या सुरुवातीच्या मराठी गद्याचें स्वरूप समजून येतें.

---

१४ J. F. Blumhardt and S. D. Kanhere, *Catalogue of the Marathi Manuscripts in the India Office Library. 1950. Mss. No. 20.*

१५ Ibid. Mss. No. 1.

पुर्णे नगर वाचन मंदिर, पुर्णे २.
वर्ग.....क्रमांक.....

दादोबा पांडुरंग म्हणतात त्याप्रमाणें, "आज पावेतों, जिला नियमांत आणण्या विषयीं कोणीं प्रयत्न केलाच नाहीं म्हणोन अत्यंत विस्खलित झालेली, व व्याकरणरूप फणीनें जिला, कोणीं विंचरलेंच नाहीं, म्हणोन जींत अनेक ग्रंथि जमून फारच गुंतलेली अशी जी ही मराठी भाषा," तिला नियमबद्ध करण्याचे सहेतुक प्रयत्न इंग्रजी राजवटींत झाले. शालेय पुस्तकांचा या कामीं फार उपयोग झाला. इंग्रजी अमदानींत मराठी गद्याला रेखीवपणा कसा आला तें सांगतांना विष्णुशास्त्री चिपळूणकर लिहितात,

"या देशभाषा सुधारणेच्या पंथाला लागल्या, ही गोष्ट इंग्रजी अमदानींतच घडली हें सर्वांस महशूर आहेच. यापूर्वी त्यांस आळा म्हणून कोणताही नव्हता. रान झाडाप्रमाणें किंवा गिरिनदीप्रमाणें त्यांची स्वैरगति अकुंठित होती. पुढें इंग्रजी भाषेंत जशी आमची मंडळी पारंगत झाली, तशा त्यांच्या ठायीं स्वभावतांच अनुकरणाची प्रवृत्ति जागृत होऊन, गद्यात्मक ग्रंथरचनेचा प्रकार सुरू झाला. गद्य हें पद्यापेक्षां भाषानियमन होण्यास विशेष अनुकूल होय. यास्तव आमच्या भाषेस छत्रे, जांभेकर चिपळूणकर, ओक वगैरे ग्रंथकारांनीं हातीं धरतांच तिला बरीच ठाकठिकी आली व व्यवस्थितपणा प्राप्त झाला. हा फेरफार किती हितावह झाला, हें ज्यास पाहणें असेल त्यानें हल्लींच्या ग्रंथाचें एकादें पान आणि जुन्या बखरींचा एकादा बंद हीं परस्परांशीं ताडून पाहावीं, म्हणजे तेव्हांच खात्री होईल.[१६]"

विष्णुशास्त्र्यांच्या म्हणण्याप्रमाणें आंग्लपूर्व मराठी गद्याचे कांहीं नमुने आपण पाहिले. यानंतर एकोणिसाव्या शतकांत मराठी गद्याचें स्वरूप कां व कसें पालटलें याचा विचार करावयाचा आहे. त्यासाठीं प्रथम महाराष्ट्राबाहेर—बंगालमध्यें—डॉ. कॅरे या मिशनऱ्यानें मराठी भाषेच्या क्षेत्रांत काय कामगिरी केली तें पाहावें लागेल. तसेंच महाराष्ट्रांत सार्वत्रिक शिक्षणप्रसाराची कल्पना कशी उदयास आली, त्यामुळें शालेय पुस्तकें कशीं तयार झालीं व त्यांच्याद्वारा मराठी गद्याचें स्वरूप कसें नियमबद्ध झालें हें पुढील प्रकरणांत जाणून घ्यावयाचें आहे.

---

१६ खंडेराव भिकाजी बेलसरे, **चिपळूणकर लेखसंग्रह, भाग २.** पृष्ठ ११८.

प्रकरण दुसरें

महाराष्ट्राबाहेरील मराठी ज्ञानदानाचे प्रयत्न

फोर्ट विल्यम कॉलेज

कोणताहि देश जिंकल्यावर तेथें शांतता प्रस्थापित करणें व राज्यकारभाराची नवीन घडी बसविणें हें जेत्यांना आवश्यक असतें, हा हेतु समोर ठेवून इ. स. १८०० मध्यें कलकत्त्याला फोर्ट विल्यम कॉलेजची स्थापना झाली. ईस्ट इंडिया कंपनीनें आपलें व्यापारी जाळें हिंदुस्थानमध्यें पसरल्यानंतर कांहीं काळानें राजकीय दृष्ट्या विचार करावयास तिनें सुरुवात केली. कंपनीचीं कामें करण्यासाठीं इंग्लंडमधून भराभर पुष्कळ लोक रायटर्स (Writers) म्हणून हिंदुस्थानमध्यें येऊं लागले. त्यांत सोळा सतरा वर्षांचीं मुलेंसुद्धां असत. इकडे भरपूर पैसा मिळतो या आशेनें त्या मुलांचे बाईबाप त्यांच्या शिक्षणाची पर्वा न करितां व्यापाराला आवश्यक तेवढें शिक्षण देऊन त्यांना हिंदुस्थानमध्यें पाठवीत असत. येथें आल्यावर इकडील वातावरण त्यांना अगदीं नवीन असे. त्यामुळें राज्यकारभाराला हीं मुलें अगदींच निरुपयोगी असत. ही परिस्थिति विचारांत घेऊन हिंदुस्थानचा तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली यानें कलकत्ता येथें फोर्ट विल्यम कॉलेजची स्थापना केली.

तारीख ४ मे, १८०० हा कॉलेजचा स्थापनादिन होता. हाच दिवस निवडण्यामागें एक महत्त्वपूर्ण राजकीय घटना होती. म्हैसूर संस्थान इंग्रजांच्या ताब्यांत येऊन या दिवशीं एक वर्ष झालें होतें. श्रीरंगपट्टमचा वेढा तारीख ४ मे, १७९९ रोजीं यशस्वी झाला होता. या विजयाची स्मृति म्हणून हा दिवस वरील कॉलेजची मुहूर्तमेढ रोवण्यासाठीं मुक्रर केला गेला. ह्या कॉलेजमध्यें शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला दरमहा तीनशें रुपये भत्ता दिला जात असे. या ठिकाणीं त्याला तीन वर्षें विद्यार्थी म्हणून राहावें लागे. त्यानंतर त्याची नेमणूक होईल तेथें तो जाई. या कॉलेजच्या वातावरणांत विद्यार्थी तीन वर्षें राहिल्यावर, राज्यकारभाराला आवश्यक ते सर्व गुण त्यांच्या अंगीं उतरतील, येथील देशभाषांशीं त्यांची ओळख होईल, शिवाय एतद्देशीय लोकांचे आचारविचार, चालीरीति, वाङ्मय, कायदे इत्यादि बाबींची त्यांना थोडीबहुत माहिती होईल, थोडक्यांत हे विद्यार्थी 'The Pride of their country and the Pillars of their empire' असे होतील या हेतूनें वरील कॉलेज स्थापन झालें. कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाच्या बक्षिससमारंभप्रसंगीं ता. २० सेप्टेंबर, १८०४ रोजीं लॉर्ड वेलस्ली म्हणतो,

"The intention of the statutes is not only to provide instruction in the Oriental languages and in the several branches of study immediately connected with the performance of official functions, but to prescribe habits of regularity and good order. My principal purpose in founding this institution was to secure the junior servants of the company from all undue influence in the discharge of their official functions, and to introduce them into the public service in perfect freedom and independence, exempt from every restraint, excepting the high and sacred obligations of their civil, moral and religious duty.[१]"

वर उल्लेखिलेल्या विशिष्ट हेतूमुळेंच कॉलेजमधील विद्यार्थ्यांना कडक शिस्तींत राहावें लागत असे. वारंवार सूचना देऊन सुद्धां शिस्तभंग केल्याबद्दल विद्यार्थ्यांना कॉलेजमधून काढून टाकलें जाई. अशा शिस्तबद्ध वातावरणांत तयार झालेल्या सनदी नोकरांच्या हातीं राज्यकारभार गेल्यामुळें इंग्रजी सत्ता येथें दृढमूल होण्यास बरीच मदत झाली. सर्व सनदी नोकरांना हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत राज्यकारभार करण्यासाठीं जावें लागेल, यासाठीं येथील देशभाषा त्यांना समजणें आवश्यक असल्याचें जाणून फोर्ट विल्यम कॉलेजच्या अभ्यासक्रमांत फारशी, अरबी, संस्कृत, बंगाली, मराठी, कानडी, तेलगु इत्यादि भाषांना स्थान प्राप्त झालें होतें. प्रत्येक कॉलेजला ग्रंथालयाची गरज असते; टिपू सुलतानाचा पाडाव केल्यानंतर त्याचा जो ग्रंथसंग्रह इंग्रजांच्या हातीं आला, तोच या कॉलेजच्या ग्रंथालयासाठीं द्यावा असें ठरलें. कारण त्यांत देशभाषांमध्यें लिहिलेलीं अनेक हस्तलिखित पुस्तकें होतीं.[२] या संग्रहाची छापील यादी कलकत्त्याच्या सेंट्रल लायब्ररीमध्यें उपलब्ध आहे.

इतकी सर्व व्यवस्था झाल्यावर कॉलेजच्या कामाला प्रारंभ झाला. परंतु ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारी दृष्टीला तें पटलें नाहीं. म्हणूनच कॉलेज ताबडतोब बंद करण्याबद्दल तारीख २७ जानेवारी, १८०२ रोजीं हुकुम सुटला. लॉर्ड वेलस्लीनें पुन्हां एकदां जोराचा प्रयत्न करून कंपनीला पटवून दिलें कीं, कंपनीच्या हिताच्या दृष्टीनेंच कॉलेज बंद करणें चुकीचें होईल. कॉलेज स्थापन करण्याचा मुख्य उद्देश 'The good government of a great empire' हा असल्यामुळें, तें बंद करणें म्हणजे आपलें आपणच नुकसान करून घेण्यासारखें होईल. 'The College must stand or the empire

---

१ *The College of Fort William in Bengal.* 1805. p. 137.
२ Ibid. p. 40.

must fall.' या शब्दांत वेलस्लीनें ईस्ट इंडिया कंपनीला कॉलेजचें महत्त्व पटवून दिलें. कॉलेजसाठीं दरवर्षी चार लाख रुपये खर्च करणें कंपनीला कठीण वाटत होतें परंतु लॉर्ड वेलस्लीनें कंपनीला समजावून दिलें कीं, यापेक्षांहि हजारपटीनें खर्च झाला तरी त्यामुळें होणारा नैतिक आणि राजकीय फायदा अतुलनीय आहे. कॉलेज बंद करण्यामध्यें आणखी एक चूक होत असल्याचें लॉर्ड वेलस्लीला वाटत होतें. आशिया खंडाच्या वेगवेगळ्या भागांतून कांहीं विद्वान लोक उपयुक्त पुस्तकें लिहिण्यासाठीं, आणिलेले होते. त्यांनीं पुस्तकें लिहिण्याचें काम सुरू केलें होतें. कॉलेज एकदम बंद केलें तर त्यांच्यावर मोठा अन्याय केल्यासारखें होईल, असें त्याचें मत होतें.

हेलिबेरी कॉलेज

लॉर्ड वेलस्लीनें इतके प्रयत्न केले तरीसुद्धां, कलकत्ता येथील फोर्ट विल्यम कॉलेज बंद करून, इंग्लंडमध्यें एक Oriental college काढण्याचें ठरवून त्यासाठीं कंपनीनें पन्नास हजार पौंड मंजूर केले; आणि तारीख १२ मे, १८०६ रोजीं त्या कॉलेजच्या इमारतीचा पाया घातला गेला. हेलिबेरी कॉलेज या नांवानें हें कॉलेज ओळखिलें जात असे. फोर्ट विल्यम कॉलेजप्रमाणेंच, या कॉलेजमध्यें संस्कृत, फारशी, उर्दू, बंगाली इत्यादि भाषा शिकविल्या जात असत. या कॉलेजमधील विद्यार्थ्यांना खासगीरीत्या मराठी भाषेची तांत्रिक माहिती प्रो. ईस्टवुइक हे देत असत.[३] फोर्ट विल्यम कॉलेजमध्यें देशभाषांचा अभ्यास चांगला होत असे. तथापि हेलिबेरी कॉलेजचें महत्त्व किती होतें तें सर जॉर्ज बार्लो यानें तारीख २ मार्च १८०७ रोजीं फोर्ट विल्यम कॉलेजच्या वार्षिक समारंभाच्या प्रसंगीं काढलेल्या खालील उद्‌गारांवरून स्पष्ट होतें. तो म्हणतो,

"The purpose of that institution is, to afford to gentlemen destined for the civil service of the company an early opportunity of acquiring those branches of knowledge which the service requires, and which are more easily attainable in England than in this country, and of becoming initiated in the elements of those studies for the attainment of perfection in which the College of Fort William is exclusively calculated.[४]"

इंग्लंडमध्यें कॉलेज उघडून कलकत्त्याचें फोर्ट विल्यम कॉलेज बंद करण्याचा हुकूम सोडण्याचें कंपनीला कांहींच कारण नव्हतें. फोर्ट विल्यम कॉलेजचें महत्त्व कंपनीला पटविण्याचा प्रयत्न करूनसुद्धां जेव्हां लॉर्ड वेलस्लीला

३ *Bombay Quarterly Review, Vol. 1.* 1855. p. 141.
४ *Asiatic Annual Register, Vol. 9.* 1809. p. 63.

यश येईना, तेव्हां त्यानें तारीख ३१ डिसेंबर, १८०३ पासून फोर्ट विल्यम कॉलेज बंद करण्याचें ठरविलें. सुदैवानें तें बंद होण्याच्या अगोदर कंपनीला सुबुद्धि सुचली व तिनें बंदीहुकुम मागें घेतला; आणि पुढील काळांत कलकत्त्याचें हें फोर्ट विल्यम कॉलेज पाश्चात्त्य संस्कृतीची पाणपोई ठरलें. तारीख २४ जानेवारी १८५४ रोजीं हें कॉलेज बंद झालें. यानंतर चार वर्षांनीं इंग्लंडमधील हेलिबेरी कॉलेज सुद्धां तारीख ३१ जानेवारी १८५८ रोजी बंद झालें.

विल्यम कॅरे

कलकत्ता येथील फोर्ट विल्यम कॉलेज व इंग्लंडमधील हेलिबेरी कॉलेज या दोन कॉलेजांची माहिती येथें देण्याचें कारण इतकेंच कीं त्यांच्या स्थापनेमुळें देशभाषांच्या अभ्यासाला मदत झाली. कंपनीच्या सनदी नोकरांना देशभाषांची चांगली ओळख असणें कां आवश्यक होतें त्याचें कारण राज्यकर्त्यांच्या शब्दांत सांगावयाचें झालें तर तें असें:—

"When we contemplate our situation in this country, when we reflect that we are governing a population of many millions, to whom our language is unknown, whose religion, habits, manners, usages and prejudices wholly differ from our own, no argument would seem requisite to prove, that the diffusion of the benefits and blessings of a British administration among these our subjects, must essentially depend on the degree in which the power of communication with the natives of India is possessed by the public officers employed in the various branches of this great and complicated government.[५]"

अशाप्रकारें कंपनीच्या सनदी नोकरांकडून देशभाषांचा पद्धतशीर अभ्यास करवून घेण्याच्या हेतूनें फोर्ट विल्यम कॉलेजमध्यें, बंगाली, मराठी आणि संस्कृत या तीनहि भाषा उत्तम प्रकारें जाणणाऱ्या विल्यम कॅरे [६] नामक मिशनऱ्याची प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. प्रथम इ. स. १८०१ मध्यें, फक्त बंगाली भाषा व पुढें संस्कृत आणि मराठी या भाषा शिकविण्यासाठीं त्याला दरमहा एक हजार रुपयांवर नेमण्यांत आलें.[७] युरोपियन लोकांना स्वतंत्ररीत्या एतद्देशीय भाषांचा

५ *Asiatic Journal, Vol. 1. From January to June.* 1816. p. 170.

६ John Marshman, *The Life and Times of Carey, Marshman and Ward.* London. 1859. (विशेष माहितीसाठीं पाहा.)

७ *Asiatic Journal, Second Series, Vol. 21, September. December.* 1836. p. 276.

अभ्यास करणें कठीण वाटल्यामुळें, त्यावेळीं येथील मौलवी, मुनशी अगर पंडित यांची मदत घेतली जात असे. मराठी भाषातज्ज्ञ म्हणून फोर्ट विल्यम कॉलेजमध्यें तीन पंडित नेमलेले होते. त्यांपैकीं वैजनाथ शर्मा हा एक होय. रंगनाथ नामक एका मराठी जाणणाऱ्या दुसऱ्या मुनशीचा उल्लेख आढळतो; त्यांत 'Rung-nath formerly chief moonshee in the Mahratta language to the Honourable East India Company at Calcutta', एवढीच माहिती दिलेली आहे[८]. वैजनाथ याच्या मदतीनें 'मराठी भाषेचें व्याकरण' (१८०५), 'मराठी भाषेचा कोश' (१८१०), 'सिंहासन बत्तिशी' (१८१४), 'हितोपदेश' (१८१५) इत्यादि पुस्तकें तयार झालीं. या पुस्तकांचा विशेष म्हणजे व्याकरणाखेरीज सर्व पुस्तकें मोडी लिपींत छापलेलीं आहेत. फक्त व्याकरणाचें पुस्तक, मोडी टाईप तयार नसल्यामुळें देवनागरी लिपींत प्रथम इ. स. १८०५ मध्यें मुद्रित केलेलें आहे. पुढें दुसरी आवृत्ति इ. स. १८०८ मध्यें मोडी लिपीमध्यें छापण्यांत आली.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला पेशव्यांचा अंमल संपुष्टांत येण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत होतीं. महाराष्ट्र लवकरच आपल्या ताब्यांत येईल याची पूर्ण कल्पना इंग्रज राज्यकर्त्यांना असल्यामुळें कीं काय फोर्ट विल्यम कॉलेजमध्यें मराठी भाषा जाणणारे कांहीं सनदी नोकर तयार करण्यांत येत होते. विल्यम कॅरे इ. स. १७९३ मध्यें प्रथम धर्मप्रसारक म्हणून इकडे आला तेव्हां त्याला तत्कालीन सरकारी अधिकाऱ्यांनीं कलकत्त्याला थारा दिला नाहीं; त्यामुळें नदीच्या काठीं अरण्यांत त्याला झोंपडी बांधून राहावें लागलें, निळीची लागवड करण्याचा उद्योग करावा लागला, हिमालयांत राहाणाऱ्या बुद्ध भिक्षूंचा आसरा घ्यावा लागला व शेवटीं श्रीरामपुरच्या डॅनिश मिशनमध्यें तो स्थायिक झाला. त्याच कॅरेला कांहीं वर्षांनंतर फोर्ट विल्यम कॉलेजमध्यें मानाचें स्थान प्राप्त झालें. डॉ. कॅरेनें रचलेल्या मराठी भाषेचें व्याकरण (१८०५) या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत तो म्हणतो कीं हें पुस्तक रचण्यापूर्वी मराठी भाषेचें पोर्तुगीज भाषेंत लिहिलेलें एक व्याकरण होतें, पण त्याची प्रत न मिळाल्यामुळें आपण स्वतंत्ररीत्या या व्याकरणाची रचना केली आहे[९]. कॅरेनें ज्या व्याकरणाचा उल्लेख केला आहे तें इ. स. १६४० मधील फादर स्टिफन्स याचें देशी मराठीचें व्याकरण (Arte de Lingua Canarim) अगर इ. स. १७७८ मधील रोममध्यें छापलेलें मुंबई कडील मराठीचें व्याकरण (Grammatica Marastta) या दोहोंपैकीं एक असावें. मराठी भाषेच्या व्याकरणाप्रमाणें त्यानें मराठी भाषेचा शब्दकोशहि इ. स. १८१० मध्यें रचला.

---

८ *Asiatic Journal, New Series, Vol. 6.* 1831. pp. 105–106.

९ William Carey, *A Grammar of the Mahratta Language.* 1805. p. 6.

कोणतीहि नवीन भाषा शिकण्यासाठीं त्या भाषेचें व्याकरण व शब्दकोश हीं दोन पुस्तकें आवश्यक असतात हें जाणूनच कॅरे यानें हाताखालच्या पंडितांच्या मदतीनें तीं तयार केलीं. दीडशें वर्षांनंतर आज तीं पुस्तकें फारच अपुरीं वाटतील, परंतु त्यावेळीं त्यांचें फार महत्त्व होतें.

दुसरीं कॉलेजें

राजकीय हेतु समोर ठेवून ज्याप्रमाणें कलकत्त्याला फोर्ट विल्यम कॉलेजची स्थापना झाली, त्याचप्रमाणें मद्रास येथेंहि असेंच एक कॉलेज स्थापन झालें होतें. मद्रासच्या कॉलेजमध्येंहि मराठी भाषेचा अभ्यास होत होता. या कॉलेजच्या १८१८ मध्यें घेतलेल्या वार्षिक परीक्षेंत मराठी भाषेच्या चांचणींत उत्तीर्ण झालेल्या कांहीं सनदी नोकरांचीं नांवें आढळतात.[१०] मुंबईला मात्र अशा तऱ्हेचें कॉलेज सुरू झाल्याचें दिसत नाहीं. अर्थात एल्फिन्स्टननें असें कॉलेज निघावें म्हणून प्रयत्न केला होता. कॉलेज मुंबईला काढण्याबद्दल एका सेवानिवृत्त सनदी नोकराचें तारीख ५ ऑक्टोबर, १८१८ रोजीं लिहिलेलें एक पत्र आढळतें.[११].

कलकत्ता आणि मद्रास येथील कॉलेजें सनदी नोकरांसाठीं होतीं; परंतु इ. स. १७८१ मध्यें वॉरन हेस्टिंग्जनें कलकत्ता मदरसा नामक एक शाळा केवळ मुसलमान लोकांसाठीं स्थापन केली होती. तेथें फारशी भाषेंत असलेल्या कायद्यांच्या ग्रंथांचा अभ्यास होत असे. या संस्थेचा सर्व खर्च पहिलीं दोन वर्षें वॉरन हेस्टिंग्जनें स्वतः केला. त्याचप्रमाणें इ. स. १७९२ मध्यें जोनाथन डंकन यानें बनारसला केवळ हिंदूंसाठीं एक कॉलेज स्थापन केलें व तेथें संस्कृत भाषेंतील हिंदु कायद्यांचा अभ्यास सुरू झाला. हिंदुस्थानांत इंग्रजी अंमल सुरू झाल्याबरोबर येथें चालू असलेले मुसलमान व हिंदु धर्मग्रंथांतील कायदे लागू करण्याच्या विचारानें, या कायद्यांची माहिती असलेले एतद्देशीय लोक तयार करून, राज्यकारभार हांकण्याच्या कामीं त्यांचा उपयोग करून घ्यावा, म्हणून हीं दोन्ही कॉलेजें सुरू झालीं. हा राजकीय स्वार्थी हेतु बाजूला ठेविला तर, फारसी व संस्कृत या भाषांमधील जुन्या वाङ्मयाच्या पद्धतशीर अभ्यासाला यामुळें उत्तेजन मिळालें. या दोन्ही कॉलेजांचा हेतु विद्यादानापेक्षां न्यायदान हा होता. थोडक्यांत सांगावयाचें तर वर उल्लेखिलेल्या सर्व शिक्षणसंस्थांमुळें जुन्या व चालू भाषांच्या अभ्यासाला एकप्रकारें चालना मिळाली व त्यामुळें देशभाषांमधून ग्रंथनिर्मिति होऊं लागली.

---

१० *Asiatic Journal, Vol. 7,-From January to June.* 1819. p.640.

११ *Asiatic Journal, Vol. 6, From January to December.* 1818. p. 455.

प्रकरण तिसरें

महाराष्ट्र आणि एल्फिन्स्टन

पेशवाईतील सार्वत्रिक शिक्षण

गेल्या प्रकरणांत वर्णन केलेले मराठी ग्रंथनिर्मितीचे सर्व प्रयत्न महाराष्ट्राबाहेर सुरू झाले. पेशवाई बुडेपर्यंत महाराष्ट्रांत मराठी भाषेच्या पद्धतशीर अभ्यासाच्या बाबतींत अनास्था दिसून येते. ठिकठिकाणच्या पाठशाळांत ब्राह्मण मुलें संस्कृत भाषेचा अभ्यास करीत असत; पण सर्वसाधारणपणें जनतेमध्यें मराठी भाषेचा अभ्यास असा केला जात नव्हता. जनतेला शिक्षण देण्यासाठीं जागजागीं शाळा उघडणें ही सरकारी जबाबदारी आहे, ही कल्पनाच पेशवाईच्या काळीं नव्हती असें दिसतें. म्हणूनच सरकारी शिक्षणखातें नव्हतें. सार्वजनिक शिक्षणदानाची व सार्वत्रिक शिक्षणप्रसाराची कल्पना पेशवाईमध्यें कां नव्हती तें समजत नाहीं. व्यवहारापुरतें लिहिणेंवाचणें व हिशेबठिशेब या गोष्टी चालत असत. अशा मुलांच्या वाचनांत कांहीं हस्तलिखित बखरी व पोथ्या यांचा उपयोग होत असे. तथापि छापण्याची कला समोर असूनसुद्धां तिचा उपयोग ज्ञानप्रसारार्थ झाला नाहीं. नाना फडणवीस यांच्या प्रेरणेनें सुरू झालेलें व मिरजेचे गंगाधरराव पटवर्धन यांनीं पुरें केलेलें भगवद्गीतेचें ठोकळाछाप मुद्रण (१८०५) एवढा एकच अपवाद नमूद करण्यासारखा आहे.

धूर्त व उदार एल्फिन्स्टन

पेशवाई बुडाल्यावर महाराष्ट्रांत नव्या इंग्रजी मनूची सुरुवात झाली. स्वराज्य नष्ट करून परधर्मी राज्य स्थापण्याचें काम फार कठीण असतें. परकीय लोकांच्या हातीं राज्य गेलें कीं प्रजेचीं मनें अगोदरच दुखावलेलीं असतात. तशांत त्यांच्या रीतिभाती, भाषा व धर्म या संबंधानें परकी लोक अज्ञानी असल्यामुळें उत्तरोत्तर प्रजेचा असंतोष वाढत जातो. अशा प्रसंगीं राज्यकर्त्यांच्या अंगीं मुत्सद्देगिरी आणि अलौकिक चातुर्य असावें लागतें. असे कांहीं चतुर राज्यकर्ते पेशवाईच्या अंतकाळीं महाराष्ट्रांत होते. त्यांपैकीं माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा एक होय. तो धूर्त, धोरणी पण उदारमतवादी होता. परकीय राज्यकर्त्यांचा प्रतिनिधि म्हणून आज तो आपणांस दूरचा वाटणें साहाजिक आहे; परंतु त्यानें त्यावेळीं हरएक प्रकारें महाराष्ट्राचें मन जिंकून घेतलें होतें यांत शंका नाहीं. मुंबईप्रांताचा गव्हर्नर होण्याच्या अगोदर दक्षिणेचा कमिशनर असतांनाच, महाराष्ट्र इंग्रजांच्या ताब्यांत आल्याबरोबर, त्यानें सर्व प्रांताची पाहणी करून एक निवेदन तयार केलें. त्यांत महाराष्ट्राची भौगोलिक पाहणी, मराठ्यांचा इतिहास, येथील सारापद्धति, उत्पन्नाचे प्रकार,

एतद्देशीय अधिकारी, येथें घडणाऱ्या गुन्ह्यांचे वेगवेगळे प्रकार व त्यांचा बंदोबस्त इत्यादि बाबींचें वर्णन त्यानें केलें आहे. तत्कालीन वातावरणाचा त्याच्या मनावर जो ठसा उमटला त्याचें चित्र त्यानें या निवेदनांत रेखाटलेलें आढळतें.[1] विशेषतः येथील लोकांचा नैतिक अधःपात त्याच्या लक्षांत आला. लोकांची नैतिक पातळी उंचावण्यासाठीं शिक्षणप्रसारद्वारा प्रयत्न करणें आपलें आद्यकर्तव्य आहे, असें त्याला वाटलें.

ही कर्तव्याची जाणीव लोककल्याणाच्या केवळ निर्भेळ हेतूनें जन्माला आली होती असें नव्हे. त्यामागें राजकीय दूरदृष्टि होती. जिंकलेल्या प्रदेशांत शांतता प्रस्थापित केल्याविना राज्यकारभार सुरळीत चालणें अशक्य होईल याची त्याला कल्पना होती. तसेंच राज्यकर्त्यांच्या लोकांशीं वागण्याच्या पद्धतींत फरक पडला पाहिजे आणि लोकांच्या मनांत राज्यकर्त्यांविषयीं आपलेपणा निर्माण झाला पाहिजे असें त्याला वाटे. राज्यकारभारांत एतद्देशीय लोकांची मदत घेणें आवश्यक आहे, लोकांच्या हातांत कधीं ना कधीं तरी सत्ता द्यावीच लागेल आणि त्यासाठीं त्यांना आवश्यक तें शिक्षण दिलें पाहिजे असेंहि त्याला वाटलें. या सर्व गोष्टी केल्या नाहींत तर ज्वालामुखीप्रमाणें, लोकांच्या मनांतील असंतोषाचा स्फोट होऊन ते आपल्यावर उलटतील व आपणाला येथून जावें लागेल, अशी त्याची खात्री होती. तारीख २७ ऑक्टोबर १८२२ रोजीं, मद्रासप्रांताचा तत्कालीन गव्हर्नर सर टॉमस मन्रो याला लिहिलेल्या एका पत्रांत एल्फिन्स्टननें हे सर्व विचार व्यक्त केले आहेत. तो लिहितो,

"The system of government and of education which we have already established must sometime or other work such a change on the people of this country, that it will be impossible to confine them to subordinate employments, and if we have not previously opened vents for their ambition and ability, we may expect an explosion which will overturn our government.[2]"

कोणत्याहि देशांत राज्यक्रांति झाल्यावर नवीन येणाऱ्या राज्यकर्त्यांचे आचार-विचार, भाषा इत्यादींचा जित राष्ट्रावर नेहमींच परिणाम होतो. हा नियम हिंदुस्थानाला लागू करावयास मुळींच हरकत नाहीं. विशेषतः नवीन राज्यकर्त्यांपैकीं कांहीं लोक जर उदारमतवादी असतील तर त्यांच्या विचारांचा परिणाम जित राष्ट्रावर लवकर दिसून येतो. एल्फिन्स्टन हा अशाच उदारमतवाद्यांपैकीं एक होता. किंबहुना यावेळीं कॅनिंग, ग्रे, रसेल इत्यादि प्रागतिक व उदार व्यक्तींच्या हातीं इंग्लंडचें

१ *Official Writings of M. S. Elphinstone.* 1884. p. 333.

२ T. E. Colebrooke, *Life of M. S. Elphinstone.* 1884. p. 143.

राजकारण होतें व त्याचें प्रतिबिंब हिंदुस्थानांतील एल्फिन्स्टन, मन्रो, बेंटिंग, हेस्टिंग्जप्रभृति मुत्सद्यांवर पडलें होतें असें म्हणतां येईल. या उदार धोरणाला अनुसरूनच एल्फिन्स्टनचें शिक्षणविषयक धोरण होतें व त्याचा परिणाम शालेय पुस्तकांच्या निर्मितीमध्यें झाला.

एल्फिन्स्टन प्रमाणेंच लॉर्ड हेस्टिंग्ज हाहि उदारमतवादी होता. इ. स. १८१७ मध्यें कलकत्त्याच्या फोर्ट विल्यम कॉलेजच्या सतराव्या वार्षिक समारंभाच्या प्रसंगीं लॉर्ड हेस्टिंग्ज म्हणतो,

"It would be treason against British sentiment to imagine, that it ever could be the principle of this government to perpetuate ignorance in order to ensure paltry and dishonest advantages over the blindness of the multitude. As to general tranquillity all experience assures us that it is only where the mass of society is uninstructed that extensive convulsions have arisen from insignificant causes.[३]"

ईस्ट इंडिया कंपनी

वास्तविक इंग्रज लोक प्रथम व्यापाराच्या हेतूनें इकडे आले. तथापि व्यापाराचें बस्तान ठीक बसल्यावर साहजिकच त्यांना राजकीय दृष्टि आली. हिंदुस्थानाशीं केवळ व्यापार करण्यासाठीं स्थापन झालेल्या ईस्ट इंडिया कंपनीनें पुष्कळ वर्षें इतर बाबतींत लक्ष दिलें नाहीं; पण हिंदुस्थानांतील बऱ्याचशा भागावर राजकीय वर्चस्व प्रस्थापित केल्यावर इंग्लंडमधील तत्कालीन उदारमतवादित्वाचा परिणाम होऊन इ. स. १८१३ मध्यें कंपनीनें ठरविलें कीं हिंदुस्थानामधील वाङ्मयाचा अभ्यास व्हावा व भौतिक शास्त्रांची माहिती हिंदवासियांना व्हावी. यासाठीं दरसाल एक लक्ष रुपये खर्च केले जावे. कंपनीच्या या ठरावांतील संबंधित भाग असा आहे :-

"A sum of not less than one lac of rupees in each year shall be set apart and applied to the revival and improvement of literature and the encouragement of the learned natives of India and for the introduction and promotion of knowledge of the sciences among the inhabitants of the British territories in India.[४]"

या ठरावामागें परोपकाराचा उदात्त हेतु होता असें नव्हे, तर येथील लोकांचा भोळेपणा, आपापसांतील भांडणतंटे, धार्मिक वेडगळ समजुती या गोष्टींचा फायदा

३ *Asiatic Journal, Vol. 5, from January to June.* 1818. p. 175
४ *The Selections from Educational Records, Vol. I.* p. 22.

घेऊन मिळविलेलें साम्राज्य टिकवावयाचें असेल तर, त्या नाहींशा केल्या पाहिजेत; कारण अज्ञानी जनतेवर त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन हुकमत चालविणें प्रथम सोपें वाटलें तरी पुढें तें कठीण जाईल या गोष्टीची कंपनीला जाणीव होती. म्हणूनच एतद्देशियांना शिक्षण देण्याची आवश्यकता कंपनीला पटली.

एल्फिन्स्टननें मुंबईचा गव्हर्नर म्हणून सत्तेचा स्वीकार केल्यानंतर, प्रांतांतील सर्व कलेक्टरांकडून त्यांना आढळणाऱ्या परिस्थितीबद्दलचीं निवेदनें त्यानें मागविलीं. त्याप्रमाणें हातीं आलेल्या निवेदनांवरून तर त्याची खात्री पटली कीं, ज्ञानप्रसाराच्या कार्याला शक्यतोंवर लवकर सुरुवात केली पाहिजे. सर्वत्र शांतता प्रस्थापित करण्यासाठीं केवळ कायदा उपयोगी पडणार नाहीं याची त्याला जाणीव होती. परक्यांच्या ताब्यांत आपण गेलों ही भावना पुष्कळ लोकांच्या मनांत होती. विशेषतः वरच्या वर्गांतील लोकांत तर ती होतीच होती. अशावेळीं त्यांना न दुखवितां आपला कार्यभाग साधणें हें एल्फिन्स्टनचें मुख्य धोरण होतें. लोकांना खुष करण्यासाठीं त्यांच्या धार्मिक बाबतींत मुळींच हात घालावयाचा नाहीं, कारण कायद्यापेक्षांहि धार्मिक बंधनें त्यांना जास्त महत्त्वाचीं वाटतात ही गोष्ट एल्फिन्स्टन पूर्णपणें जाणून होता. या बाबतींत तो म्हणतो,

" It would be better to call the prejudices of the Hindoos to our aid in reforming them, and to control their vices by the ties of religion, which are stronger than those of law. By maintaining and purifying their present tenets, at the same time that we enlighten their understanding, we shall bring them nearer to that standard of perfection at which we concur in desiring that they should arrive. [५]"

एल्फिन्स्टनच्या या कल्पनेप्रमाणें सार्वत्रिक शिक्षणप्रसारासाठीं त्यावेळीं तयार झालेल्या शालेय पुस्तकांमागें वरील धार्मिक धोरण स्पष्ट दिसून येतें.

दक्षिणा

पेशवाईत ब्राह्मणांना दक्षिणा वाटण्याची पद्धति वर्षानुवर्षें चालत आली होती. विद्योत्तेजनार्थ विद्वान ब्राह्मणांना दक्षिणा देणें रास्तच होतें.[६] पण हा नियम कडक रीतीनें पाळला गेला नाहीं. पेशवाईच्या शेवटच्या काळांत, जमणाऱ्या हजारों ब्राह्मणांना त्यांच्या विद्वत्तेचा, अभ्यासाचा विचार न करतां दक्षिणा दिली

५ *Official Writings of M. S. Elphinstone.* 1884. pp. 334–335.

६ दक्षिणा म्हणून किती पैसा खर्च केला जात असे, त्याची विशेष माहिती **'पेशवेदप्तरांतून निवडलेले कागद,'** पु. २२ पृ० २२, ९५ आणि पु० ४३, पृ० ७१–७६ वर मिळेल.

जाई. एल्फिन्स्टनसारख्या व्यक्तीला लाखों रुपयांचा हा खर्च अगदीं अनाठायीं होत असल्याची जाणीव होत होती; परंतु दाक्षिणादानाची पद्धति एकदम बंद केली तर लोकांचा रोष पत्करावा लागेल हें जाणून दानाची रक्कम त्यानें एक लाख रुपयांवर आणिली. या एक लाखांतूनच संस्कृत भाषेच्या पद्धतशीर अभ्यासाला चालना मिळावी म्हणून पुण्याला 'हिंदु कॉलेज'ची स्थापना झाली.

हिंदु कॉलेज–पुणें पाठशाळा

'हिंदु कॉलेज'च्या स्थापनेला त्यावेळचा दक्षिणेचा चीफ कमिशनर चॅपलिन् हा कारणीभूत होता. तारीख ६ ऑक्टोबर १८२१ रोजीं दसऱ्याच्या सुमुहूर्तावर या कॉलेजची स्थापना झाली. सुरुवातीला कॉलेजमध्यें शंभर विद्यार्थी होते व प्रत्येकाला दरमहा पांच रुपये शिष्यवृत्ति दिली जाई. धर्म, न्याय, ज्योतिष, व्याकरण इत्यादि दहा शाखांचा अभ्यास संस्कृतमधून होत असे.[७] कॉलेजच्या ग्रंथालयासाठीं कलकत्त्याहून कांहीं पुस्तकें मिळविण्याचें ठरलें होतें.[८]

या कॉलेजच्या उपयुक्ततेबद्दल पुढील काळांत सरकारी गोटांत वारंवार चर्चा होत असे. तें बंद करून टाकावें असेंच पुष्कळ आधिकाऱ्यांचें मत होतें; कारण या कॉलेजमध्यें चालणाऱ्या अभ्यासामुळें लोकांच्या जुन्या धार्मिक वेडगळ समजुती दृढमूल होतात असें त्यांना वाटे. लोकांमध्यें नवीन शास्त्रीय दृष्टिकोन आणण्यास हें कॉलेज मुळींच उपयोगी पडणारें नसल्यामुळें तें बंद करण्याचा प्रयत्न जरी क्लेअर, ग्रँट वगैरे मुंबईच्या गव्हर्नरांनीं केला तरी एल्फिन्स्टनचा या कॉलेजच्या स्थापनेमागील हेतु निश्चित होता. एल्फिन्स्टन या कॉलेजबद्दल लिहितो,

" At no time, however, could I wish that purely Hindoo part of the course should be totally abandoned. It would surely be a preposterous way of adding to the intellectual treasures of a nation by the destruction of its indigenous literature, and I cannot but think that the future attainments of the natives will be increased in extent as well as in variety by being as it were engrafted on their own previous knowledge and imbued with their own original and peculiar character.[९]"

---

७ विशेष माहिती, '**पेशवेदप्तरांतून निवडलेले कागद**,' पु० ४२, पृ० ४०–४१, ४४–४७, ४९–५१ वर मिळेल.

८ *Asiatic Journal, Vol. 13, from January to June.* 1822. p. 473

९ *G. D. Vol. 63.* 1824. pp. 77–78.

अशाप्रकारें एकदां स्थापन झालेली संस्था बंद करणें इष्ट नव्हे हा विचार प्रबळ झाला; परंतु असलेल्या संस्थेंत आवश्यक ते फेरबदल करावे, उदाहरणार्थ पाठशाळेला इंग्रजीचा वर्ग जोडावा, मराठीचा वर्ग चालवावा, भाषांतरकार तयार करण्याचें काम सुरू करावें, या सर्व कल्पना एकामागाहून एक अमलांत आल्या. पुणें पाठशाळेमध्येंच इंग्रजीचा वर्ग उघडण्यामागें मेजर कॅंडीची कल्पना अशी होती:–

"In a word, knowledge must be drawn from the stores of the English language, the vernaculars must be employed as the media of communicating it, and Sanscrit must be largely used to improve the vernaculars and make them suitable for the purpose.[१०]"

अशा पद्धतीनें इंग्रजी, मराठी व संस्कृत या तीनहि भाषांचा अभ्यास पाठशाळेंत व्हावा ही मुख्य कल्पना होती. इ.स. १८५१ मध्यें पुणें कॉलेज व पुणें इंग्रजी शाळा एकत्र करण्याचें ठरत असतांना सरकारी वर्तुळांत बराच पत्रव्यवहार झाला. ही जोडसंस्था निर्माण झाल्यास अनेक गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित होणार होते. या संस्थेची नवीन घटना करण्यासाठीं मुद्दाम बनारस हिंदु कॉलेजच्या घटनेची प्रत मागविण्यांत आली व सर्वानुमतें नवीन घटना तयार झाली. यावेळीं झालेल्या पत्रव्यवहारांत भाषाविषयक मुद्दा महत्त्वाचा होता. या मुद्यावर मेजर कॅंडीचे विचार दूरदर्शी होते. या बाबतींत त्याचें म्हणणें असें होतें:–

"I do not advocate the encouragement by the Board, of the study of Sanscrit Literature by itself, but I do strongly advocate the encouragement of the study of it in combination with the study of English Literature and Science and with the study of the vernaculars, for I strongly feel that thus studied it ought to be highly rated. Unless a Hindoo be a good Sanscrit scholar, as well as acquainted with English Literature and Science, we cannot, I think, reasonably hope that he will gain extensive influence as a Reformer and Enlightener of Hindoos. I speak here only of the influence of literature and science as agents of enlightenment and civilization. I make no reference to the influence of religious instruction as this is not within the province of the Board.[११]"

मेजर कॅंडीच्या या कल्पनेमुळेंच पुणें कॉलेजमध्यें भाषांतरकार तयार होऊं लागले व मराठी भाषेच्या शालेय वाङ्मयांत प्रामुख्यानें भर पडत गेली.

---

१० *G. D. Vol. 30*/655. 1842. p. 132.

११ *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1850. p. 7.

प्रकरण चौथें

मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी आणि शालेय पुस्तकांच्या निर्मितीची सुरुवात

हैंदशाळेच्या स्थापनेआधीं

पुणें कॉलेज स्थापन करून केवळ ब्राह्मणवर्गालाच शिक्षण द्यावें असें संकुचित धोरण एल्फिन्स्टननें ठेविलें नव्हतें, हें गेल्या प्रकरणांत आपण पाहिलें. समाजांतील सर्वसाधारण लोकांना सुद्धां शिक्षण मिळावें अशी त्याची व्यापक दृष्टि होती. हा शिक्षणप्रसाराचा विचार त्याच्या मनांत असतांना विद्यादानाचे जे बिनसरकारी प्रयत्न त्याच्यासमोर मुंबईत चालू होते, तिकडे त्याचें लक्ष गेलें. 'The Society for Promoting the Education of the Poor within the Government of Bombay' या नांवाची एक संस्था आर्चबिशप बार्नेस याच्या खटपटीनें ता. २९ जानेवारी, १८१५ मध्यें मुंबईला स्थापन झाली होती. तसें पाहिलें तर या पूर्वीच इ. स. १७१५ मध्यें रे. कॉब् नामक एका खिस्ती धर्मोपदेशकानें चर्च ऑफ इंग्लंडच्या वतीनें मुंबईत एक अनाथ विद्यार्थीगृह चालू केलें होतें. 'सेंट टॉमस् कॅथिड्राल' बांधण्यासाठीं जो पैसा गोळा झाला होता त्यांतून व इतर सार्वजनिक मदतीवर हें विद्यार्थीगृह चालत असे. या संस्थेचा संपूर्ण इतिहास उपलब्ध नाहीं; तथापि बार्नेस यांनीं इ. स. १८१५ मध्यें नवीन संस्था सुरू केली त्यावेळीं वरील अनाथविद्यार्थीगृहामध्यें फक्त दहा मुलें असून सरकारकडून मासिक तीनशें रुपये मदत मिळत असल्याचा उल्लेख सरकारी दप्तरांत सांपडतो[१]. बार्नेस यांच्या नवीन संस्थेंतच या जुन्या विद्यार्थीगृहाचा समावेश करण्यांत आला. सुरुवातीला या जोडसंस्थेला दरमहा तीनशें रुपयांचीच सरकारी मदत मिळत असे; पुढें इ. स. १८१८ मध्यें कोर्ट ऑफ् डायरेक्टर्सनीं आणखी एकशें चाळीस रुपये मंजुर केले.

अशाप्रकारें इ. स. १८१५ मध्यें मुंबईत सुरू झालेल्या या संस्थेच्या स्थापनेमागें शुद्ध धार्मिक हेतु होता; संस्थेच्या उद्देशपत्रकांत त्याचा असा उल्लेख केलेला आढळतो :—

"The children shall be taught Reading, Writing, Arithmetic and such other useful branches of education as may hereafter appear necessary, and particularly they shall be instructed in the principles of the Protestant religion according to the Church of England, and in conformity with the system practised by Dr. Bell[२]."

---

१ *D. P. I. Government, Vol. 5.* 1856. p. 84.

२ *The Tenth Annual Report of the Society for Promoting the Education of the Poor within the Government of Bombay.* 1825. p. 26.

या संस्थेतर्फे मुलांच्या राहण्याची, जेवणाखाण्याची, कपड्यालत्त्याची व्यवस्था होत असे. बेवारशी व गरीब अशा त्रेचाळीस मुलांची सोय पहिल्यावर्षी करण्यांत आली होती. युरोपियन शिपायांच्या एतद्देशीय स्त्रियांपासून झालेल्या मुलांना व इतर गरीब मुलांना फुकट शिक्षण देण्यासाठीं जरी ही संस्था सुरू झाली होती तरी अन्य मुलांनासुद्धां येथें शिक्षण देण्याची सोय होती. त्यांच्या बाबतींत धार्मिक हेतु आड येण्याचें कारण नव्हतें. ही संस्था केव्हां बंद पडली तें समजत नाहीं. तथापि उपलब्ध होणाऱ्या या संस्थेच्या अहवालांवरून इ. स. १८३८ मध्यें या संस्थेंत दोनशें सदतीस मुलें शिक्षण घेत होतीं.[३]

मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी

एल्फिन्स्टननें विद्याप्रसाराचा हा धागा उचलून, मुंबईमधील कांहीं प्रमुख नागरिकांच्या मदतीनें इ. स. १८२० मध्यें वरील संस्थेचीच एक शाखा सुरू करण्याचें ठरविलें. केवळ पोरक्या मुलांनाच शिक्षण न देतां सर्वसाधारणपणें शिक्षण घेण्याची तयारी असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला तें घेतां यावें, या स्तुत्य हेतूनें त्यानें या प्रयोगाला हात घातला. कांहीं दिवस पूर्वतयारींत गेल्यावर, तारीख २१ ऑगस्ट १८२२ रोजीं 'बॉम्बे नेटिव्ह स्कूलबुक अँड स्कूल सोसायटी' या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली गेली. या संस्थेलाच 'मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी' असेंहि संबोधिलें जाई. तिला सरकारी मदत मिळवून देण्याच्या बाबतींत एल्फिन्स्टननेंच पुढाकार घेतला. तोच या संस्थेचा पहिला अध्यक्ष होता. येथील लोकांमध्यें ज्ञानप्रसार करण्यासाठीं म्हणून काढलेल्या या संस्थेंत एतद्देशीय लोकांचीहि मदत घेणें आवश्यक होतें. म्हणून तिच्या वतीनें एतद्देशीयांची एक सभा होऊन तींत शिक्षणविषयक प्रश्नांची चर्चा झाली व याच सभेंत, वरील संस्थेचे उद्देश लोकांना समजावून सांगण्यासाठीं एक समिति नेमण्यांत आली. या समितींत रघुनाथ कृष्ण जोशी व सदाशिव काशीनाथ छत्रे यांची सभासद म्हणून व व्यंकोबा सदाशिव नाईक यांची नेटिव्ह सेक्रेटरी म्हणून नेमणूक झाली[४]. व्यंकोबा नाईकांबद्दल या संस्थेच्या पहिल्या वार्षिक अहवालांत उल्लेख आला आहे तो असा :—

"———a meeting was convened of the principal native inhabitants of Bombay, which was numerously attended. Those deputed twelve of the most eminent and respectable of their body, together with a native secretary, selected for his superior

---

३ *The Twenty Fourth Annual Report of the Society for Promoting the Education of the Poor within the Government of Bombay.* 1838. p. 46.

४ *Asiatic Journal, Vol. 11.* 1821. p. 520.

character and acquirements (Vencoka Sadasheo Naik) to be associated with the European Directors for concerting in union with them the best plans for their future proceedings.[५]"

वरील परिच्छेदांत उल्लेखिलेले व्यंकोबा नाईक हे एक उपेक्षित मानकरी आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. सदाशिव काशीनाथ छत्रे हे हैंदशाळा शाळापुस्तक मंडळीचे पहिले एतद्देशीय सेक्रेटरी होते अशी कल्पना आहे परंतु त्यांच्यापूर्वी व्यंकोबा नाईक हे शाखारुपांत असलेल्या या शिक्षण संस्थेचे पहिले एतद्देशीय सेक्रेटरी होते. व्यंकोबा नाईक यांनीं त्या वेळीं कांहीं शालेय पुस्तकें रचिलीं असावीं, असें वाटतें; कारण टॉमस् बेस्ट् जर्विस तारीख ३ फेब्रुवारी १८४७ रोजीं लिहिलेल्या एका पत्रांत म्हणतो,

"In regard to Aesop's Fables, translated by the lamented and estimable Venkoba Sadashiva Naik, there is great room for improvement. In undertaking to publish such a work for general diffusion, with good illustrations, it would be most desirable to reconsider the translation and have it better done.[६]"

जॉर्ज व टॉमस या जर्विस बंधूंचा प्रथमपासूनच महाराष्ट्रांतील शिक्षणप्रसाराशीं निकटचा संबंध होता. विशेषत: जॉर्ज रिस्टो जर्विस हा, डॉ. टेलर या पहिल्या युरोपियन सेक्रेटरीनंतर इ. स. १८२३ पासून १८२९ पर्यंत मुंबईच्या हैंदशाळा शाळापुस्तक मंडळीचा सेक्रेटरी होता. वरील संस्थेच्या स्थापनेनंतर व्यंकोबा नाईक लगेच कांहीं दिवसांनीं वारल्यामुळें त्यांनीं तयार केलेलीं इसापनीतीसारखीं कांहीं शालेय पुस्तकें तशींच राहिलीं असावीं. त्यांच्या मृत्यूनंतर पंचवीस तीस वर्षांनीं टॉमस जर्विसला त्यांच्या 'इसापनीति' या भाषांतरित पुस्तकाचें स्मरण झालें हें विशेष होय. कदाचित् व्यंकोबांच्या मृत्यूमुळें हें भाषांतर अपुरें राहिलें व सेक्रेटरी म्हणून त्यांच्या जागीं आलेल्या सदाशिव काशीनाथ छत्रे यांनीं तें पुरें केलें कीं काय अशी एक शंका येते. तें कसेंहि असो, पण व्यंकोबा नाईक यांची वरील शिक्षणसंस्थेच्या प्रारंभकाळची कामगिरी उल्लेखनीय आहे.

व्यंकोबा नाईक यांच्याप्रमाणेंच मुल्ला फिरोझ, महमद इब्राइम मखबा, जगन्नाथ शंकरशेट, धाकजी दादाजी इत्यादि वजनदार एतद्देशीयांचाहि वा शिक्षण-संस्थेशीं संबंध आला. मराठी भाषेबरोबरच गुजराती व उर्दू–जिला पूर्वी हिंदुस्थानी

---

५ *The First Report of the Bombay Native School-book and School Society.* 1824. p. 5.

६ W. P. Jervis, *Thomas Best Jervis, A Centenary Tribute.* 1898. p. 193.

म्हटलें जाई—या भाषांचाहि अभ्यास व्हावा अशी एल्फिन्स्टनची इच्छा असल्यामुळें, या संस्थेच्या चालकमंडळींत, या भाषांची आस्था असलेले लोक त्यानें निवडले होते. सुरुवातीला तेरा युरोपियन, चार हिंदु, चार पार्शी व चार मुसलमान एवढी मंडळी या संस्थेंत होती. या संस्थेसाठीं प्रथमतः ज्यांनीं आर्थिक मदत केली त्या वर्गणीदारांची यादी संस्थेच्या वार्षिक अहवालांत दिलेली आढळते. ७

'बॉंबे नेटिव्ह स्कूलबुक अँन्ड स्कूल सोसायटी'—याच संस्थेला इ. स. १८२७ मध्यें 'बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' असें नांव देण्यांत आलें—या संस्थेचें महत्त्वाचें कार्य म्हणजे लोकांच्या मातृभाषेंतून त्यांना पाश्चात्य ज्ञानाचा परिचय करून द्यावा व त्यांची नैतिक पातळी बर आणावी हा होता. हें काम फार कठीण होतें. ओसाड जमिनीची लागवड करण्याच्या अगोदर ती साफसूफ करणें महत्त्वाचें असतें. शिक्षणप्रसाराचेंहि काम यावेळीं तसेंच होतें. येणाऱ्या अडचणींना तोंड देणें भाग होतें.

शिक्षणप्रसारकार्यांतील अडचणी

पहिली अडचण योग्य शालेय पुस्तकांचा अभाव ही होती. अशीं पुस्तकें तयार करणें व तीं शिकविणारे योग्य शिक्षक तयार करणें हीं दोन्ही कामें एकाच वेळीं होणें आवश्यक होतें. वरील दोन्ही साधनें तयार झाल्यावरसुद्धां शिक्षण प्रसाराचा मार्ग यावेळीं सुलभ नव्हता. छापील पुस्तकांबद्दल सर्वसाधारण लोकांच्या मनांत बसलेली अढी दूर करण्याचें कार्य शालेय पुस्तकें तयार करून छापण्याइतकेंच कठीण होतें. ख्रिस्ती धर्मप्रसारकांमुळें छापील पुस्तकांबद्दल लोकांना आपुलकी वाटत नव्हती. ही परिस्थिति येथेंच होती असें नव्हे; तर बंगालमध्येंहि हीच अडचण होती.

"The introduction of printed books into schools at first caused some alarm; the natives apprehended it was some plan for ensnaring their children and destroying their caste! ८"

वरील शब्दांत ॲडॅम यानें बंगालमधील परिस्थितीचें चित्र रेखाटलें आहे. बंगालमध्यें शिक्षणप्रसार करण्यासाठीं स्थापन झालेल्या 'कलकत्ता स्कूल सोसायटी-' चाहि अनुभव असाच होता. त्या सोसायटीच्या चौथ्या वार्षिक अहवालामध्यें तो खालील शब्दांत नमूद केलेला आहे:-

"I have great satisfaction in saying that our countrymen are convinced of the advantage derived by their children from

---

७ *Report of the Bombay Native Education Society.* 1827. pp. 66--76.

८ William Adam, *Report on the State of Education in Bengal*, 1835 & 1838. p. 472.

our Society, and that the indigenous schoolmasters and the parents of boys, who were first alarmed and refused to receive our school-books, are now anxious to come under the control of the Society, and that, at the commencement of the institution, I persuaded sixteen or seventeen *gooroos* only to use our reading books.[९] "

बंगालचा आदर्श समोर ठेवून मुंबईच्या शिक्षणसंस्थेनें आपलें काम सुरू केल्यामुळें तेथील अडचणीप्रमाणेंच मुंबईकरांनाहि या अडचणींचा विचार करावा लागला.

छापील पुस्तकांच्या प्रसारकार्यातील दुसरी मोठी अडचण ही होती कीं, पुस्तकें छापण्यासाठीं जी शाई वापरली जाई, तींत चरबीचा उपयोग केला जातो असें समजल्यामुळें लोकांना हा भ्रष्टाकार वाटत असे व त्यामुळें छापील पुस्तकांना स्पर्श करण्यास ते धजत नसत. 'दिग्दर्शन' मधील खालील उताऱ्यावरून याची स्पष्ट कल्पना येईल :–

"या छापाच्या शाईत चर्बी पडत असती, यामुळें छापलेलें पुस्तक अपवित्र अशी लोकांची समजूत आहे, म्हणोन याविषयीं कांहीं लिहिलें पाहिजे. वर जिनसाच्या यादी लिहिल्या आहेत त्यांत तूप अथवा चर्बी असें आहे, परंतु हें दिग्दर्शन[१०] ज्या छापखान्यांत छापतात, तेथें चर्बीच्या ठिकाणीं तुपाचा उपयोग करितात, व तेणेंकरून काम चर्बीप्रमाणेंच होतें, परंतु तुपामध्यें चर्बी-प्रमाणें तेज नाहीं. म्हणोन मेहेनत ज्यास्त पडती.[११] "

---

९ *Asiatic Journal, Vol. 22.* 1826. p. 73.

१० **दिग्दर्शन**:–मे, १८४० मध्यें हें मासिक सुरू झालें. या मासिकाशीं बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, प्रो. ऑर्लेबार, कॅ. फ्रेंच इत्यादिकांचा संबंध होता.(*D. P. I. Government,* 1842. p. 423.) लोकाश्रय भरपूर न मिळाल्या-मुळें मासिकाचे अंक वक्तशीर निघत नसत. 'दिग्दर्शन' मासिकाचें पु. ४, अंक १ ते ४, जानेवारी ते एप्रिल, १८४४ व 'दिग्दर्शन' न्यू सीरीज, पु. १, अंक १ व २, जून, जुलै, १८४५, या अंकांचें एकत्रित बिल सरकारी दप्तरखान्यांत आढळतें-(*D. P. I. Board of Education, Miscellaneous,* 1847. p. 94) त्यावरून एप्रिल, १८४४ पासून जून, १८४५, पर्यंत हें मासिक बंद राहून पुन्हां सुरू झालें असें दिसतें. वर उल्लेखिलेल्या बिलाच्या शेवटीं संपादक व संचालक म्हणून गोविंद विठ्ठल यांची सही आहे. त्याअर्थी 'दिग्दर्शन' चे संपादक भाऊ महाजन हे होते, असें म्हणावयास हरकत नाहीं.

११ **दिग्दर्शन, पु. १. १८४०. पृ. २१३.**

तसेंच 'प्रभाकर' च्या [१२] ता. १८ सप्टेंबर १८४२ च्या अंकांत दादोबा पांडुरंग यांनीं या विषयावर लिहिलेलें एक पत्र महत्त्वाचें आहे. "१८३० चा सालीं शिक्षामंडळीचा शिला छापखाना पुण्यास जार्विस साहेबांहीं नेला त्याकाळीं तेथें तो छापखाना असतां शिक्षामंडळीचे पंडितांहीं भागवत छापण्याचा निश्चय ठरावून तें कार्य त्यांहीं सिद्धीस नेलें," याबद्दल समाधान व्यक्त करून दादोबा पुढें लिहितात,

"कां कीं लिहिलेल्या पुस्तकांत दोष फार असतात, व अशा सदोष पुस्तकांचाच प्रचार फार चालला आहे, त्यास तो मोडून सर्व भरतखंडांत नाहीं तर नाहीं, परंतु महाराष्ट्र व गुजराथ या देशांत तरी सर्वत्र एक अप्रतीम पुस्तकांचाच प्रचार असावा असें उद्देशून महाराष्ट्र पंडितांहीं (यांत बाळशास्त्री घगवे, बापुशास्त्री शुक्ल इत्यादि होते) इतर हिंदुलोकांचा छापलेल्या पुस्तकांविषयीं कांहीं अमंगल पदार्थ छापण्याचा शाईत पडतो या निमित्तानें जो अनादर आहे त्याचा हा त्यांहीं ब्राह्मण होत्साते उदारपणानें त्याग करून या छापलेल्या पुस्तकांची प्रवृत्ति घातली असावी. [१३]"

छापण्याच्या शाईत कांहीं अपवित्र पदार्थ असतात या समजुतीमुळें 'रावसाहेब मंडलीक ज्या पोथ्या सोवळ्यांनीं वाचीत त्या हस्तलिखित असत, [१४]' असा उल्लेख रावसाहेब मंडलिक यांच्या चरित्रांत आढळतो. छापील पुस्तकांबद्दलच्या या जनमतासंबंधीं 'मुंबईचें वर्णन' या पुस्तकांत माडगांवकर लिहितात, 'आमचे कित्येक भोळे व नैष्टिक ब्राह्मण छापलेल्या कागदांस स्पर्श करण्यास भीत असत, आणि अद्याप (इ. स. १८६३ मध्यें) मुबईत व बाहेरगांवीं छापील कागदास शिवत नाहींत, व छापलेलें पुस्तक वाचीत नाहींत असे पुष्कळ सांपडतील.[१५]'

---

१२ **प्रभाकर**:—तारीख २४ ऑक्टोबर १८४१ रोजीं हें साप्ताहिक सुरू झालें. त्याचें संपादकत्व भाऊ महाजनांकडे दिलें जातें. प्रत्यक्ष साप्ताहिकावर मात्र त्यांचें नांव आढळत नाहीं. हें साप्ताहिक किती काळपर्यंत चाललें तें समजत नाहीं; परंतु इ. स. १८५२ पर्यंत तरी तें चालत असावें असें वाटतें. कारण 'दि बॉंबे टाइम्स अँड जर्नल ऑफ् कॉमर्स' या इंग्रजी दैनिकाच्या तारीख ६ ऑक्टोबर १८५२ च्या अंकांत 'प्रभाकर' मधील एक पत्र दिलेलें आढळतें. 'प्रभाकर'मधून मराठी भाषेबद्दलच्या मेजर कँडी यांच्या आग्रही धोरणावर बरेंच कडक असें टीकात्मक लिखाण प्रसिद्ध होत असे.

१३ **प्रभाकर**, पु. २. १८४२. पृ. ३७८.

१४ गणेश रामकृष्ण हवालदार, **रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें चरित्र भाग १.** १९२७. पृ. २७७.

१५ गोविंद नारायण माडगांवकर, **मुंबईचें वर्णन.** १८६३. पृ. २४८.

छापील पुस्तकांबद्दलच्या वर उल्लेखिलेल्या चुकीच्या कल्पना नाहींशा करण्याच्या दृष्टीनें एल्फिन्स्टननें आपलें धोरण ठरविलें होतें. तारीख १० मार्च १८२४ रोजीं लिहिलेल्या एका शिक्षणविषयक टांचणांत तो म्हणतो,

"In four years we have only accomplished the publication of the two native books and they also are translations from the Sanscrit undertaken more with a view to bring printed books into use than on account of any instruction they are themselves calculated to afford.[१६] "

अडचणींतून मार्ग कसा काढला ?

छापील पुस्तकांचा प्रसार लोकांमध्यें व्हावा या हेतूनें प्रथम प्रथम तीं मोफत वाटलीं जात असत. छापलेलीं पुस्तकें लोकांनीं हातांत धरून पाहिलीं तरी पुष्कळ काम होईल या हेतूनें तीं वाटलीं जात. या विषयींचा उल्लेख असा आहे :—

"The great object of Government having been to introduce the usage of printed books among the natives, many copies were distributed gratis to persons of learning and influence in various parts,--- the books were everywhere well-received and a great eagerness shown to procure copies and thus the prejudice which had at first existed against printed books, on account of missionary publications was entirely removed.[१७] "

छापील पुस्तकांबद्दल लोकांना आत्मीयता वाटावी म्हणून दुसऱ्या एका मार्गाचा अवलंब त्यावेळीं करण्यांत आला. पुस्तकें विकून जो पैसा मिळेल त्याचा कांहीं भाग पुस्तक विक्रेत्याला द्यावयाचा असें ठरविलें गेलें; कारण पुस्तकें विकून मिळणाऱ्या पैशांपेक्षां छापील पुस्तकांचा प्रसार होणें ही बाब जास्त महत्त्वाची होती. सुरुवातीलाच तारीख १३ ऑगस्ट १८२२ रोजीं याबद्दलचा सरकारी हुकुमहि निघाला.[१८]

अशा प्रकारें छापील पुस्तकांबद्दल लोकांच्या असलेल्या विचित्र कल्पना व दुराग्रह लक्षांत घेऊनच पुस्तकें छापण्याच्या कामीं सरकारला व शाळापुस्तक मंडळीला हात घालावा लागला. त्यासाठीं शाळेंत वापरलीं जाणारीं पुस्तकें कशा प्रकारचीं

---

१६ *G. D. Vol. 63.* 1824. p. 46.
१७ *G. D. Vol. 149.* 1827. p. 100.
१८ *G. D. Vol. 10* 1821. p. 691.

असावीं याबद्दलची पुष्कळ चर्चा व पत्रव्यवहार झाले. पहिल्या प्रथम छापलेल्या पुस्तकांच्या यादींत 'लिपिधारा', 'अंकलिपि' 'बोधवचन', 'पंचोपाख्यान' व 'विदुरनीति' अशीं पांच पुस्तकें तारीख १३ सप्टेंबर १८२३ पर्यंत छापून तयार झालीं.[१९] 'मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी'च्या पहिल्या वार्षिक अहवालामध्यें, 'पंचोपाख्यान, 'विदुरनीति', 'सिंहासन बत्तिशी' व 'वेताळ पंचविशी' या पुस्तकांची नोंद करतांना 'printed or prepared in the Persian Secretary's office by order of the Government available for the purpose of the Society' असा शेरा मारलेला आढळतो.[२०] याच अहवालामध्यें, नवीन स्थापन होणाऱ्या शाळा, सुधारलेल्या पद्धतीवर कशा चालवाव्या याची माहिती देणारें एक पुस्तक– 'शालापद्धति' तयार होत असल्याचा उल्लेख आहे.[२१] रामचंद्रशास्त्री जान्हवेकर यांच्या मदतीनें मोल्सवर्थ यांनीं तयार केलेल्या या पुस्तकाचें गुजराती भाषांतर 'निशाळनी पद्धति' इ. स. १८२४ मध्यें प्रसिद्ध झालें.

सरकारनें तयार केलेल्या या पुस्तकांवरून असें दिसतें कीं शाळांत वापरण्यासाठीं रचलेलीं हीं पुस्तकें गोष्टींचीं व नीतिविषयक अशीं होतीं. 'पंचोपाख्यान' हें संस्कृतमधील हितोपदेशाचें रूपांतर व 'विदुरनीति' हा महाभारतांतील एक भाग. एका दगडानें दोन पक्षी मारण्याच्या धोरणाचा अवलंब सरकारनें यावेळीं केला. छापील पुस्तकांचा संबंध महाभारतासारख्या लोकप्रिय ग्रंथाशीं आणल्यामुळें लोकांना तीं जवळचीं वाटणें साहाज़िक होतें. शिवाय नीतिपाठ देण्याच्या सरकारी धोरणाशीं जुळणारीं अशीं तीं पुस्तकें होतीं. या दोन पुस्तकांबद्दल झालेला पत्रव्यवहार सरकारी दप्तरांत पहावयास सांपडतो.[२२] या पुस्तकांचा स्वीकार लोकांनीं मोकळ्या मनानें करावा म्हणून सरकारनें त्यांची वाटणी कशी केली, तेंहि सरकारी पत्रव्यवहारावरून समजतें.[२३] त्यावरून असें दिसतें कीं एक एक हजार प्रतींपैकीं पंचोपाख्यानाच्या ९४ व विदुरनीतिच्या ६४ प्रती फक्त विकल्या गेल्या. बाकीच्या, ठिकठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे फुकट वाटण्यासाठीं पाठविल्या गेल्या. प्रत्यक्ष विकलेल्या प्रतींची किंमतसुद्धां एतद्देशीयांसाठीं वेगळी व युरोपियन लोकांसाठीं वेगळी होती. या दोन पुस्तकांची, तारीख ४ ऑक्टोबर

---

१९ *G. D, Vol. 63.* 1824. p. 114.

२० *The First Report of the Bombay Native School-book and School Society.* 1824. p. 32.

२१ Ibid. p. 25.

२२ *G. D. Vol. 10.* 1821. pp. 683–691.

२३ *G. D. Vol.* 149. 1827. pp. 103–104.

१८२३ च्या 'कुरीअर' वर्तमानपत्रांत दिलेली खालील जाहिरात पाहून सरकारी धोरणाची कल्पना येते.

"वीकावयाकरितां बहुतेक बुकें माराष्ट्र ग्रंथार्ची पंचोपाख्यान व विदुरनीतीचीं आहेत याची कींमत रुपये ८ इंग्रेज साहेब लोकांस व गांवचे लोकांस रुपये ३ आणि वीदुरनीति साहेब लोकांस रुपये ६ व गांवचे लोकांस रुपये २ प्रमाणें हर कोणास पाहीजे असल्यास कौरीयर हाफिसांत येऊन पांडुरंग दळवी हेड-परभु याजवळ मीळेल तारीख ३ ऑक्टोबर सन १८२३."

एल्फिन्स्टनचे शालेय पुस्तकांविषयीं विचार

शिक्षणप्रसाराचा प्रारंभ म्हणून पुराणांतील गोष्टी लोकांना वाचावयास दिल्या. तरी तेवढ्यानें आपला उद्देश सफळ होणार नाहीं याची एल्फिन्स्टनला कल्पना होती. अद्यापपर्यंत लोकांच्या हातीं असलेलीं हस्तलिखितें जाऊन त्यांऐवजीं उपयुक्त ज्ञान-प्रसार करणारीं अशीं छापील पुस्तकें लोकांच्या हातीं जावीं अशी त्याची इच्छा होती. देशभाषांचे कोश, व्याकरणें, तसेंच गणित, ज्योतिष, सिद्धपदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, शारीरशास्त्र, भूगोल, इतिहास इत्यादि विषयांवर देशभाषांमधून लहान लहान पुस्तकें तयार व्हावीं अशी त्याची कल्पना होती. नीतिविषयक पुस्तकांचा फैलाव जितका होईल तितका थोडाच असें त्याला वाटत असे; कारण बालविवाह, बालहत्या, लग्नसमारंभाच्या वेळीं केला जाणार अतोनात खर्च, सतीची चाल, बळी देण्याची पद्धति या सर्वांचे दुष्परिणाम लोकांच्या मनावर ठसवावयाचे आणि त्याच्या जोडीला पाश्चात्य शास्त्रीय विषयांची माहिती लोकांना करून द्यावयाची असा त्याचा दुहेरी हेतु होता. अशीं उपयुक्त पुस्तकें रचणारी मंडळी भाडोत्री असून भागणार नाहीं, तर ज्यांना खरोखरीच लोककल्याणाची कळकळ आहे अशा लोकांकडूनच ही पुस्तकें लिहवून घ्यावीं अशी त्याची सूचना होती. त्यासाठीं लेखकांना कांहींतरी आमिष दाखवावें लागेल म्हणून बक्षिसांची पद्धति असावी असेंहि त्यानें सुचविलें. थोडक्यांत ज्ञानप्रसाराच्या उपयुक्ततेबद्दल तो लिहितो,

"If there be a wish to contribute to the abolition of the horrors of self-immolation and of infanticide and ultimately to the destruction of superstition in India, it is scarcely necessary now to prove that the only means of success lie in the diffusion of knowledge.[२४]"

हीं सर्व पुस्तकें तयार करतांना एकच नियम कडक रीतीनें पाळण्याबर एल्फिन्स्टनचा कटाक्ष होता. लोकांच्या धार्मिक भावनांना मुळींच धक्का लागतां

२४. *G. D, Vol. 63*, 1824, p. 61.

कामा नये असा निर्बंध त्यानें लिहिलेल्या शिक्षणविषयक टांचणांत घातलेला होता. शाळापुस्तक मंडळीच्या घटनेंतहि एक कलम होतें तें असें:—

"It shall form no part of the design of the Society to furnish religious books—— a restriction however, very far from being meant to preclude the supply of moral tracts, or books of moral tendency, which without interfering with the religious sentiments of any person may be calculated to enlarge the understanding and improve the character.[२५]"

एल्फिन्स्टन व देशी छापखाने.

देशभाषांमधून शालेय पुस्तकें तयार करण्याचा प्रश्न चार्चिला जात असतांना दुसऱ्या एका महत्त्वाच्या बाबतींत एल्फिन्स्टननें विशेष लक्ष घातलें. लोकशिक्षणाचें दुसरें मुख्य साधन छापखाना हें होय. अद्यापपर्यंत बहुतेक सरकारी काम 'कौरीयर' छापखान्यांत होत असे. पण यानंतर शाळापुस्तक मंडळीचा स्वतंत्र छापखाना असावा व खासगी छापखान्यांना सुद्धां वाव मिळावा असें त्याचें मत होतें. छापखान्याबद्दल एल्फिन्स्टननें त्यावेळीं व्यक्त केलेलीं मतें आज सव्वाशें वर्षांनंतर सुद्धां विचार करण्यासारखीं आहेत. पुस्तकें लिहवून घेऊन तीं छापण्याचें काम सरकारी देखरेखीखालीं व्हावें कीं कांहीं लोकांना परदेशांतून खिळे आणवून देऊन त्यांच्यांकडून तीं छापवून घ्यावीं या मुद्यावर सरकारी वर्तुळांत बरीच चर्चा झाली. एल्फिन्स्टननें आपलें मत स्पष्टपणें मांडलें. एतद्देशीय लोकांना राज्यकारभारांत भाग घ्यावयास तयार करण्याच्या कामीं छापखाना हें मोठेंच साधन आहे, त्यामुळें आपली सत्ता कमी होईल म्हणून घाबरण्याचें मुळींच कारण नाहीं, असें त्याचें म्हणणें होतें. तो लिहितो,

"The dangers of the press, however, are remote and speculative, the advantages even to ourselves are immediate and practical. At all events, as we have assumed the Government of the natives, it is our duty to assist in their improvement, and we should be no more justified in withholding the art of printing than in adopting any other mode of degrading the minds of the natives with a view to maintain our own ascendency.[२६]"

---

२५ *The Seventh Report of the Bombay Native Education Society*, 1832. p. 51.

२६ *G. D. vol. 63*, 1824. p. 226.

एल्फिन्स्टन व मिशनरी छापखाना

छापखान्याबद्दलचे असेच उदार व व्यापक विचार दुसऱ्या एका प्रसंगीं एल्फिन्स्टननें व्यक्त केले होते. सुरत येथें एक छापखाना सुरू करण्याची परवानगी मिशनरी मंडळींनीं मागितल्यावेळीं लिहिलेल्या एका टांचणांत तो म्हणतो कीं, मिशनऱ्यांच्यामुळें शिक्षणप्रसाराच्या सरकारी धोरणांत जरी अडथळे आले तरी त्यांना छापखाने काढावयास हरकत नसावी; कारण छापखान्यांमुळें लोकांना स्वत्त्वाची जाणीव होईल व परकीयांचें राजकीय जूं झुगारून द्यावयास ते तयार होतील. शिवाय लोकांच्या धार्मिक खुळ्या समजुती नष्ट होण्यास छापखानेच उपयोगी पडतील. यासाठीं इकडे जितके छापखाने निघतील तेवढे थोडेच. या बाबतींत एल्फिन्स्टन लिहितो,

"That the press may, in a long succession of ages, cause the natives to throw off our yoke is possible and even probable, but it will in the first place destroy the superstitions and the prejudices of the natives and remove the pressing dangers created by the entire and marked separation between them and their conquerors and this effect is certain while the other is problamatical. The establishment of printing presses therefore...is highly desirable". [२७]

एल्फिन्स्टननें मुंबई प्रांताचीं राज्यसूत्रें हातीं घेतल्यावर लोकशिक्षणाचा सर्वांगीण विचार किती केला होता याची कल्पना वरील उताऱ्यावरून कळून येते.

मुंबईची शाळा–पुस्तक मंडळी व कलकत्ता स्कूल–बुक सोसायटी.

व्यापकदृष्टि एल्फिन्स्टनच्या प्रेरणेनें व सक्रिय सहानुभूतीनें स्थापन झालेल्या शाळापुस्तक मंडळीनेंहि लोकशिक्षणप्रसाराचा विचार करण्यासाठीं एक खास समिति नेमिली. या समितीनें येथील परिस्थिति, शिक्षणप्रसारामागील उद्देश, ज्ञानदानासाठीं उपयोगांत आणावयाचीं पुस्तकें या सर्व गोष्टींचा विचार करून, एक निवेदन लिहिलें व तें मंडळीकडे सादर केलें. अभ्यासक्रम तयार केल्यावर त्या अनुरोधानें शालेय पुस्तकें रचतांना एक महत्त्वाचें तत्त्व समोर ठेवणें आवश्यक असल्याचें या खास समितीला वाटलें. उपयुक्त ज्ञानाचा फैलाव व तद्द्वारा लोकांची नैतिक उन्नति या दोन गोष्टी शालेय पुस्तकें तयार करतांना ध्यानांत ठेविल्या पाहिजेत असें समितीचें मत होतें. या धोरणानुसार, अंकलिपि, व्याकरणाची

२७ *G. D. Vol. 2.* 1821-23. p. 410.

चालचलाऊ माहिती देणारें छोटेंसें पुस्तक, भाषेंतील महत्त्वाच्या तीनचार हजार शब्दांचा लहानसा कोश, कांहीं बोधकथा, नीतिदर्शक वाक्यावळी, व्यावहारिक गणित, हिंदुस्थानचा इतिहास व भूगोल, खगोलाची शास्त्रीय माहिती, पदार्थविज्ञान इत्यादि विषयांवर लहान लहान शालेय पुस्तकें तयार करण्याबद्दल समितीनें सूचना केल्या.[२८]

या सूचना 'कलकत्ता स्कूलबुक सोसायटी' चा आदर्श समोर ठेवून केलेल्या दिसतात. ज्याप्रमाणें मुंबईमध्यें सार्वत्रिक शिक्षणप्रसारकार्याला सरकारनें हात घालण्याच्या अगोदरच मिशनरी मंडळीनीं शाळा उघडल्या होत्या, त्याप्रमाणें कलकत्त्यालासुद्धां इ. स. १८१४ मध्यें रॉबर्ट मे नांवाच्या मिशनऱ्यानें मातृभाषेंतून लोकांना शिक्षण द्यावयास सुरुवात केली होती. याच वळणावर इ. स. १८१८ मध्यें लेडी हेस्टिंग्ज हिच्या उत्साहानें 'कलकत्ता स्कूलबुक सोसायटी' सुरू झाली.[२९] प्रथम शालेय पुस्तकें तयार करण्याचेंच काम या संस्थेनें ठरविलें होतें, परंतु लगेच एका वर्षानंतर पुस्तक निर्मितीबरोबर शाळाहि आवश्यक असल्याचें ध्यानांत येऊन इ. स. १८१९ मध्यें 'कलकत्ता स्कूल सोसायटी' सुरू झाली. हा अनुभव जमेला धरूनच कीं काय मुंबईला प्रारंभापासूनच 'बॉंबे नेटिव्ह स्कूलबुक अँण्ड स्कूल सोसायटी' अशी जोडसंस्था उदयाला आली असावी. 'कलकत्ता स्कूलबुक सोसायटी'च्या पहिल्या वार्षिक अहवालांत संस्थेनें कोणतीं पुस्तकें छापलीं व श्रीरामपूरच्या मिशनकडून कोणतीं मागविलीं त्यांची यादी दिली आहे. त्या यादींत गणित, लिपिधारा, बंगाली भाषेंतील प्राथमिक धडे, अंकलिपि, गोल्डस्मिथकृत इंग्लंडच्या इतिहासाचें बंगाली भाषांतर, फर्ग्युसनच्या ज्योतिषविषयक पुस्तकाचें भाषांतर, हितोपदेश, गोलाध्याय इत्यादि पुस्तकांचीं नांवें दिलीं आहेत.[३०]

वरील पुस्तकांच्या यादीवरून असें म्हणावयास हरकत नाहीं कीं मुंबईच्या शाळापुस्तक मंडळीनें बहुतेक तशाच पद्धतीचीं पुस्तकें तयार करण्याचें ठरविलें. शाळापुस्तक मंडळीनें नेमिलेल्या खास समितीनें तर कलकत्त्याच्या पुस्तक मंडळीकडून मागविलेल्या पुस्तकांची यादीच दिली आहे.[३१] ती यादी पाहिली कीं वरील विधानाला पुष्टी मिळते. त्या यादींतील 'Pleasing Tales' या पुस्तकावरून सदाशिव काशीनाथ छत्रे यांनीं भाषांतरित केलेलें 'बोधकथा' हें पुस्तक, 'Dialogues on Geography, Astronomy etc.' या पुस्तकाचें 'भूगोळ

---

२८ *G. D. Vol. 63.* 1824. pp. 111–112.

२९ *Report of The Board of Education, No. 5.* 1845. p. 9.

३० *First Report of The Calcutta School-Book Society for 1817–18.* p. 2.

३१ *G. D. Vol. 63,* 1824. p. 113.

आणि खगोलविषयक संवाद' हें पुस्तक, इत्यादि पुस्तकें पाहिलीं कीं, शालेय पुस्तकें तयार करण्यांत मुंबईच्या शाळापुस्तक मंडळीनें कलकत्त्याच्या शाळापुस्तक मंडळीकडे धांव घेतल्याचें स्पष्ट दिसतें. या बाबतींत आणखी एक पुरावा देतां येईल. मुंबईच्या शाळापुस्तक मंडळीच्या एका सभेंत, कलकत्त्याला तयार झालेलीं कांहीं शालेय पुस्तकें, सभासदांना दाखविण्यांत आलीं व त्यांनीं त्या पुस्तकांबद्दल समाधान व्यक्त केलें.[३२] कलकत्त्याहून आणलेलीं पुस्तकें सभेंत दाखविण्याचा उद्देश हाच दिसतो कीं अशाच प्रकारचीं शालेय पुस्तकें मुंबईच्या शाळापुस्तक मंडळीनें तयार करावीं.

सुरुवातीलाच नव्हे, तर पुढील काळांत सुद्धां शालेय पुस्तकांच्या बाबतींत मुंबईचें लक्ष कलकत्त्याकडे वारंवार होतें असें दिसतें. तारीख ७ जानेवारी, १८३६ रोजीं लिहिलेल्या पुस्तकविषयक टांचणामध्यें मुंबईचा तत्कालीन गव्हर्नर रॉबर्ट ग्रँट म्हणतो कीं, शिक्षणप्रसार करण्यासाठीं शाळापुस्तकमंडळीनें दहापंधरा वर्षें प्रयत्न करून सुद्धां लहान व बोधपर अशीं पुस्तकें मराठी भाषेंत फारच थोडीं आहेत. इंग्रजींत ज्याप्रमाणें मिस् एज्वर्थ यांचीं नीतिपर लहानलहान पुस्तकें आहेत, तशा पद्धतीचीं पुस्तकें मराठींत होणें आवश्यक आहे. यासाठीं कलकत्त्याच्या शाळापुस्तक मंडळीनें तयार केलेल्या शालेय पुस्तकांपैकीं कांहीं मागवून त्यांचीं भाषांतरें मराठीमध्यें करावीं.[३३]

अशीच सूचना दुसऱ्या एका शिक्षणतज्ज्ञानें पुढें आणिली होती. मेजर कॅंडी शाळातपासनीस असतांना, शाळांत शालेय पुस्तकांची कमतरता पाहून त्यांनीं असें सुचविलें होतें कीं, बंगाली भाषेंतील पुस्तकांची मदत घेऊन मराठीमध्यें शालेय पुस्तकें तयार व्हावीं. ते म्हणतात कीं, इंग्रजीमधील पुस्तकांचीं मराठींत भाषांतरें करण्यापेक्षां बंगाली भाषेंतील पुस्तकांचा उपयोग केला तर भाषांतरें करतांना श्रम कमी पडतील व पुस्तकांतील वातावरणसुद्धां एतद्देशीय राहूं शकेल.[३४]

यावरून शालेय पुस्तकें तयार करण्याच्या बाबतींत बंगाली भाषेची मदत मराठी भाषेनें पुष्कळ वर्षेंपर्यंत घेतल्याचें दिसून येतें. विषयांतर करावयाचें झालें तर 'दर्पण', 'दिग्दर्शन', 'प्रभाकर', 'चंद्रिका' इत्यादि नियतकालिकांच्या बाबतींत सुद्धां महाराष्ट्रानें बंगालचाच आदर्श समोर ठेविलेला दिसतो असें म्हणावयास हरकत नाहीं. थोडक्यांत, बालशिक्षण व प्रौढशिक्षण या दोन्ही बाबतींत बंगाली भाषेनेंच मराठीला मार्गदर्शन केलें असें म्हटलें तर तें अवास्तव होणार नाहीं. बंगालीचा आदर्श ठेवून

---

३२ *Asiatic Journal, Vol. 11*, 1821. p. 520.

३३ *G. D. Vol.* $\frac{10}{342}$ 1836. pp. 271–273.

३४ *G. D. Vol* $\frac{28}{455}$ 1838. p. 152.

जशी मराठीमध्यें, तशीच मराठीचा आदर्श ठेवून किंवा भाषांतर रूपानें गुजराती व कानडी शालेय पुस्तकें होऊं लागलीं.

शालेय पुस्तकें तयार करण्यासाठीं मुंबईच्या शाळापुस्तक मंडळीनें नेमिलेल्या खास समितीनें ज्या सूचना केल्या त्या मंडळीनें मान्य केल्या. सरकारतर्फेंहि तारीख २२ जानेवारी, १८२५ रोजीं असा ठराव झाला कीं, पुस्तक मंडळीनें आवश्यक तीं शालेय पुस्तकें तयार करवून छापावीं; छपाई व इतर खर्च सरकार करील. मात्र एकाद्या पुस्तकासाठीं पांच हजार रुपयांपेक्षां जास्त खर्च येणार असेल तर त्याबद्दल मंडळीनें सरकारला आगाऊ कळवावें. [३५]

शाळापुस्तक मंडळीचें 'प्रासिद्धि पत्र'

सरकारी परवानगी मिळाल्याबरोबर शाळापुस्तक मंडळीनें पुस्तकनिर्मितीला झपाट्यानें सुरवात केली. प्रथम ८ एप्रिल, १८२५ रोजीं एक पत्रक प्रसिद्ध झालें. इंग्रजी, मराठी व गुजराथी अशा तीन भाषेंत तें छापलेलें आहे. त्या प्रसिद्धिपत्रकांत कोश, व्याकरण, याशिवाय गणित, शिल्पकला, ज्योतिष, सिद्धपदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, शारीर वैद्यक, देशवृत्तांत, राजनीति, इत्यादि सर्व विषयांवरील इंग्रजी पुस्तकांची यादी देऊन त्या पुस्तकांवरून अगर स्वतंत्ररीत्या मराठी भाषेंत शालेय पुस्तकें तयार व्हावीं अशी सूचना दिलेली होती. स्वतंत्र अगर भाषांतरित पुस्तकें रचणाऱ्याला, शंभर ते पांच हजार रुपयांपर्यंत, पुस्तकांची योग्यता आणि उपयुक्तता पाहून बक्षिसें देण्याचें आमीष दाखविलेलें होतें. त्याप्रमाणें सरकारनें हजारों रुपये खर्च केले. इ. स. १८२५ पासून १८३१ पर्यंत शालेय पुस्तकें रचणारांना बक्षिसें म्हणून सरकारनें किती खर्च केला त्याचा तपशील सरकारी दप्तरांत दिलेला आढळतो तो असा :

		रु.
१८२५	पूर्णांक, अपूर्णांक, कर्तव्यभूमिति } लोगॉरिथम }	जॉर्ज जर्विस, ३०००
१८२६	इसापनीति—सदाशिव काशीनाथ छत्रे,	२०००
	आदिकरण भूमिति }	३०००
	बीजगणित }	३०००
	भूमितीचें आदिकरण (गुजराती)	१०००
१८२९	बाळमित्र —सदाशिव काशीनाथ छत्रे,	१०००
	शारंगधर या संस्कृत वैद्यक पुस्तकाचें भाषांतर	१५००
१८३०	मराठ्यांची बखर	५०००
	विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष	३०००
१८३१	सारसंग्रह	२००[३६]

३५ *G. D. Vol. 237*, 1831. p. 78.

३६ *Ibid.* p. 81.

इ. स. १८२६ ते १८३० पर्यंत शालेय पुस्तकें रचून तीं छापण्यासाठीं २,०१,९२३ रुपये खर्च झाल्याचें सरकारी दप्तरांत नमूद आहे.[३७] या रकमेंतील केवळ बक्षिसांसाठीं वाटलेली वरील यादींतील रक्कम पाहिली कीं शालेय पुस्तकांच्या बाबतींत यावेळीं सरकारी धोरण किती उदार होतें त्याची कल्पना येते; तसेंच कांहीं हुशार व बुद्धिमान लोकांना शालेय पुस्तकें तयार करण्याच्या कामीं कसा उत्साह आला होता तेंहि कळून येतें.

बक्षिसें देण्याच्या बाबतींत सरकारी गोटांत एकमत नव्हतें असें दिसतें. सरकारनें मुक्त हस्तानें बक्षिसें देण्याचें धोरण ठेविलें तर तें पुढें फार जड जाईल असें कांहीं अधिकाऱ्यांचें मत होतें. त्यावर उदार एल्फिन्स्टननें उत्तर दिलें कीं बक्षिसें फार वाटल्यानें तोटा होईल ही समजूत चुकीची आहे. उलट जेवढ्या प्रमाणांत शालेय पुस्तकें तयार करण्यासाठीं बक्षिसादाखल खर्च होईल, तेवढ्या प्रमाणांत लोकांची चौकस बुद्धि जागृत होऊन इंग्रजी वाङ्मयाचा अभ्यास जास्त होईल.[३८]

बक्षिसांच्या लालुचीनें आवश्यक तीं शालेय पुस्तकें रचण्यासाठीं पुष्कळ लोक अहमहमिकेनें पुढें येतील याची शाळापुस्तक मंडळीला कल्पना असल्यामुळें तिनें एक गोष्ट स्पष्ट केली होती ती अशीः– 'परस्पर इरेस पडून एक ग्रंथ अनेकांनीं आरंभावा हें या मंडळीस बरें आहे परंतु जो ग्रंथ करून या मंडळीस सहाय व्हावयास इच्छील त्याचा पैका श्रम व वेळ व्यर्थ न जावा यासाठीं प्रथम त्याणें ग्रंथाचें नांव व कोणत्ये भाषेंत करणार तें व किती दिवसांनीं समाप्त होईल या नेमाचा लेख सकत्रीस पाठवावा.....परीक्षा होऊन जाचा उत्तम ठरेल त्यास बक्षीस मिळेल.'[३९] या सूचनेबरोबरच कोणकोणत्या ग्रंथांचीं भाषांतरें करावयाचीं त्यांचीहि यादी प्रसिद्धि-पत्रांत दिलेली होती.

शालेय पुस्तकें नवीनच तयार होत असल्यामुळें त्यांतील विषय व पद्धति यांबरोबर त्यांची भाषा कशी असावी हा सुद्धां एक महत्त्वाचा प्रश्न होता. सार्वत्रिक शिक्षणप्रसारार्थ हीं पुस्तकें उपयोगांत आणावयाचीं असल्यामुळें, 'जी देशभाषा सर्व लोक समजतात ती ग्रंथास द्यावी. प्रौढ भाषेचे शब्द घालून दाटून अवघड करूं नये. आणि जर त्या भाषेंत हावेत तसे शब्द मिळत नाहींत तर ते त्यांच्या मूळ भाषेंतून घ्यावे. ते असे कीं मराठी व गुजराथी यांस संस्कृतांतून .....'[४०] इत्यादि भाषाविषयक सूचना

---

३७ *G. D. Vol. 237*, 1831. p. 147.

३८ *G. D. Vol. 63*, 1824 pp. 221–222.

३९ ग्रंथांचीं भाषांतरें किंवा नवीन ग्रंथ करणारांस बक्षिसाविषयींचें प्रसिद्धि पत्र, १८२५. पृ. ४.

४० तत्रैव. पृ. ५.

शाळापुस्तक मंडळीकडून होतकरू लेखकांस देण्यांत आल्या होत्या. या सूचना मुद्दाम देण्याचें कारण असें दिसतें कीं, हीं शालेय पुस्तकें तयार करण्यासाठीं पुढें येणारे बहुतेक लोक संस्कृतज्ञ शास्त्री होते व त्यांनीं पुस्तकांत वापरलेली भाषा सामान्य जनतेस कळणें कठीण होतें.

शालेय पुस्तकें व सरकारी आश्रय

अशाप्रकारें शाळापुस्तक मंडळीनें शालेय पुस्तकें निर्माण करण्याला झपाट्यानें सुरुवात केली. याच वेगानें जर पुढें सुद्धां देशभाषांमध्यें पुस्तकें तयार करण्याचें काम असेंच चाललें असतें तर आज परिस्थिती फार वेगळी दिसली असती. शिक्षण-प्रसाराच्या या प्रयत्नांत पुस्तक मंडळीनें शालेय पुस्तकांचा कारखानाच जणुं सुरू केला. यासाठीं सरकारनें पुस्तक मंडळीला चार शिळा प्रेस व आवश्यक तें इतर साहित्य, तसेंच कलकत्ता व इंग्लंडहून देशी अक्षरांचे खिळे आणवून दिले. हें औदार्य पुढें टिकलें नाहीं. शालेय पुस्तकें तयार करवून तीं छापण्यामध्यें कल्पनातीत खर्च येतो असें दिसल्यावर इ. स. १८३२ मध्यें सरकारनें पुस्तक मंडळीला दर वर्षीं फक्त वीस हजार रुपये द्यावयाचें ठरविलें. यावेळीं पुस्तक मंडळीचा तत्कालीन चिटणीस रॉबर्ट कॉटन मनी [४१] यांनें सरकारकडे मंडळीच्या अडचणी मांडल्या. सरकारच्या या कपातीमुळें, मंडळीनें छापण्यासाठीं हातीं घेतलेलीं पुस्तकें तशींच अर्धवट सोडून द्यावीं लागतील, असें त्यानें सरकारला कळविलें. सरकारकडून उलट उत्तर मिळालें कीं, प्रारंभीं शालेय पुस्तकांच्या निर्मितीसाठीं अमर्याद पैसा सरकारनें पुस्तक मंडळीला दिला. त्याचा अर्थ असा नव्हे कीं मंडळीनें नेहमींच सरकारी आश्रयावर पूर्णपणें विसंबून राहावें. यावर मनीनें पुन्हां एकदां मंडळीचा दृष्टिकोण सरकारपुढें मांडला. तो लिहितोः—

" A list of books translated is sent, which the Society wishes to lay before the Right Honorable the Governor in Council; of their value and eventual use in expelling from the

---

४१ रॉबर्ट कॉटन मनीः—(-१८३५)

इ. स. १८२३ मध्यें हिंदुस्थानांत आगमन. १८३० मध्यें मुंबई सरकारचा ॲक्टिंग पर्शियन् सेक्रेटरी. १८३० ते १८३२ पर्यंत बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन् सोसायटीचा युरोपियन् सेक्रेटरी. पुढें बेळगांव व सोलापूर येथें असिस्टंट कलेक्टर तारीख २१ जानेवारी, १८३५ रोजीं सोलापूर येथें जंगली तापानें मृत्यू. *Oriental Christian Spectator* या मासिकाचा प्रवर्तक. रॉबर्ट मनी हायस्कूल हें त्याचें स्मारक. विशेष माहितीसाठीं पहा : *Memoirs of Mrs. Margaret Wilson*, 1858 आणि *Oriental Christian Spectator*. 1835.

minds of the Native population of this side of India many absurd fancies regarding History, Geography, Astronomy and Science in general, none can doubt, and the higher tone of moral feeling which such extended views must give the Native character when no longer allowed to dwell on the singular contracted principles of a confined intellect, will richly repay the British Government for any pecuniary sacrifices, made in attempting so desirable an object."[४२]

वरील युक्तिवादाचा सरकारवर कांहींच परिणाम झाला नाहीं. तत्पूर्वी शालेय पुस्तकें निर्माण करण्याचें काम किती झपाट्यानें होत होतें याची कल्पना पुढें दिलेल्या, इ. स. १८२५-२६ सालच्या पुस्तकमडळीच्या तिसऱ्या वार्षिक अहवालांतील पुस्तकांच्या यादीवरून येण्यासारखी आहे. तारीख १३ सेप्टेंबर, १८२३ पर्यंत फक्त पांच शालेय पुस्तकें छापून तयार झालीं होतीं, तर १८२६ मध्यें खालील पुस्तकें तयार झालीं :-

मागील वर्षांत छापलेलीं मराठी पुस्तकें :

(१) बोधवचन, आ. २.
(२) पूर्णोक, आ. २.
(३) बालगोष्टी.
(४) अपूर्णोक.
(५) लिपिधारा, आ. २.
(६) कर्तव्य भूमिति.
(७) लाग्रतंमे.
(८) बोधकथा.

अहवाल तयार झाल्यावेळीं छापखान्यांत असलेलीं मराठीं पुस्तकें :

(९) इसापनीति.
(१०) आदिकरण भूमिति.

छापण्यासाठीं तयार असलेलीं हस्तालिखित मराठी पुस्तकें :

(११) बीजगणित.
(१२) त्रिकोणमिति.
(१३) क्षेत्रफळ घनफळ.

---

४२ *Seventh Report of the Bombay Native Education Society*, 1832. p. 36.

तयार करावयास सांगितलेली मराठीं पुस्तकें.

(१४) व्याकरण.
(१५) व्याकरणावरील प्रश्नोतरें.
(१६) कोश.
(१७) मराठी-इंग्रजी व्याकरण.
(१८) मॉरिसन्च्या 'बुक कीपींग' चें भाषांतर.
(१९) 'ब्यूटीज् ऑफ् हिस्टरी'चें भाषांतर.
(२०) मार्सेट्स्च्या 'कॉन्व्हरसेशन्स ऑन् नॅचरल फिलॉसॉफी'चें भाषांतर.
(२१) मराठी-इंग्रजी वाक्यावळी.
(२२) बाळमित्र.[४३]

वरील यादी पाहिल्यावर दोन वर्षांच्या अवधींत पुस्तकमंडळीनें सर्व विषयांवरील शालेय पुस्तकें तयार करण्याचा केवढा मोठा उद्योग केला त्याची कल्पना येते. कांहीं पुस्तकांच्या तर एक सोडून दोन आवृत्ति निघाल्या. यावरून ज्ञानप्रसार व त्यासाठीं उपयुक्त अशा शालेय पुस्तकांची निर्मिति या गोष्टी परस्परांवर किती अवलंबून होत्या तें दिसतें.

शालेय पुस्तकें आणि डब्ल्यू. वॉथेन.

शाळा पुस्तक मंडळीतर्फे शालेय पुस्तकें तयार होत असतांना तत्कालीन अधिकाऱ्यांनीं वेळोवेळीं महत्त्वाच्या सूचना केलेल्या आढळतात. इ. स. १८३६ पर्यंत शालेय पुस्तकांच्या बाबतींत अशी व्यवस्था होती की, कोणत्याहि गांवीं नवीन शाळा सुरू झाल्यावर जिल्हाधिकाऱ्याकडे पुस्तकांसाठीं मागणी केली जात असे. त्यानें पुस्तकांची यादी पुस्तकमंडळीकडे पाठवावयाची व मंडळीनें यादीबरहुकूम सर्व पुस्तकें धाडून द्यावयाचीं; या पद्धतीमुळें सरकारचा तोटा होत असे, कारण त्या सर्व पुस्तकांचा खर्च सरकार देई व पुस्तकें पाठवितांना तारतम्य बाळगिलें जात नसे, विशेषतः खेडेंगांवांतील मुलांना त्यांतील कांहीं पुस्तकें थोड्क्या अवधींत वाचून संपविण्यासारखीं नव्हतीं. खेडेंगांवांतील शाळेंत जाणारीं सर्वच मुलें दोन तीन वर्षांपेक्षां जास्त काळ शाळेंत रहात नसत. त्यामुळें 'मराठ्यांची बखर' 'शिक्षामाला' अशासारखीं मोठीं पुस्तकें त्या शाळांतील मुलांच्या दृष्टीनें तितकीशीं उपयुक्त नव्हतीं. हे सर्व विचार मुंबई सरकारचा मुख्य सेक्रेटरी डब्ल्यू. एच्. वॉथेन यानें तारीख ४ जुलै १८३६ रोजीं व्यक्त केले.[४४]

---

४३ *Third Report of the Bombay Native School-book and School Society*, 1826. pp. 11-12.

४४ *G. D. Vol.* $\frac{10}{342}$. 1836. pp.148-151.

खर्चाच्या मुद्याशिवाय दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा असा होता कीं, पुस्तक मंडळीनें तयार केलेल्या बहुतेक शालेय पुस्तकांची भाषा संस्कृतप्रचुर असल्यामुळें लहान मुलांना ती समजणें कठीण, असें त्याला वाटे. शिक्षण प्रसारकार्याला सुरुवात झाली तेव्हां पुस्तक मंडळीशिवाय खासगीरीत्या शालेय पुस्तकें तयार होत नव्हतीं; पण अलीकडे स्वतंत्रपणें अशीं पुस्तकें तयार होत असून तीं पुस्तकमंडळीच्या पुस्तकांपेक्षां जास्त सोपीं, स्वस्त व उपयुक्त असल्यामुळें तींसुद्धां शाळांमधून वापरलीं जावीं असें मत वॉथेननें मांडलें.

वॉथेनची आणखी एक सूचना अशी होती कीं, पुस्तकमंडळीच्या व खासगी रीत्या तयार झालेल्या शालेय पुस्तकांखेरीज मिशनऱ्यांनीं केवळ शालेय म्हणून हा काळपावेतों केलेलीं कांहीं पुस्तकें महत्त्वाचीं असून तीं शाळांमधून वापरलीं जावीं. मात्र लोकांच्या धार्मिक भावनांना धक्का न बसेल याची खबरदारी घेतली जावी. मिशनऱ्यांनीं तयार केलेल्या शालेय पुस्तकांबद्दल लिहितांना तो म्हणतो,

"One great advantage which these tracts will have over those of the Society, is, their cheapness, others, their being in a more portable shape, and being composed in as simple, and easy style, which even the lower classes, such as the Ryuts etc. will understand." [४५]

लोकशिक्षणाकडे इतक्या कळकळीनें पहाणाऱ्या या सरकारी अधिकाऱ्यानें शालेय पुस्तकांबद्दलचे आपले विचार मांडतांना नमूद करून ठेविलेल्या एका गोष्टीचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. त्याच्याच सूचनेवरून तयार झालेलीं बाळशास्त्री जांभेकर यांचें 'नीतिकथा', बिष्णुशास्त्री बापट यांचें 'नीतिदर्पण' व आणखी कांहीं शालेय पुस्तकें त्यानें स्वखर्चानें छापून घेतलीं होतीं. हें औदार्य आपण कां दाखविलें त्याबद्दल लिहितांना तो म्हणतो,

"I beg to state that the books which I have persuaded my friends to compile, and which have been printed at my cost.....are presented by me to Government, for the use of the schools, without any desire or wish for remuneration – my sole object, being the pleasing recollection of having done something at least, however imperfect, towards the instilling on the minds of the rising generation of this great country, the principles of true knowledge and morality." [४६]

---

४५ *G. D. Vol.* $\frac{10}{342}$. 1836. p. 149.

४६ *Ibid.* p. 151.

एल्फिन्स्टन अगर वॉथेन यांच्यासारख्या कांहीं उदार युरोपियन अधिकाऱ्यांमुळेंच एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत सार्वत्रिक ज्ञानप्रसार व त्याला आवश्यक तीं शालेय पुस्तकें मोठ्या प्रमाणांत निर्माण होऊं शकलीं असें म्हटल्यास तें वावगें होणार नाहीं.

शालेय पुस्तकें व जेम्स फॅरिश

शालेय पुस्तकांच्या बाबतींत वर उल्लेखिलेल्या वॉथेन नामक अधिकाऱ्याप्रमाणेंच जेम्स फॅरिश नामक दुसऱ्या एका सरकारी अधिकाऱ्यानें आपले विचार मांडले होते.[४७] सदाशिव काशीनाथ छत्रे यांचा 'बाळमित्र' अगर विष्णुशास्त्री बापट यांचें 'नीतिदर्पण' अशा प्रकारचीं आणखी कांहीं लहान लहान नीतिपाठ देणारीं पुस्तकें, मुलांचें वय व कुवत ध्यानीं घेऊन तयार होणें त्याच्या दृष्टीनें आवश्यक होतें. अशा पुस्तकांसाठीं उपयोगी पडणाऱ्या विषयांची एक यादीहि त्यानें तयार केली. विशेषतः खेडेगांवांतील विद्यार्थ्यांसाठीं, बटाटे, आरारूट, ऊंस, कापूस इत्यादि विषयांवर मनोरंजक संवाद, तसेंच शाळेंत जाण्यापासून फायदे, नवीन नाण्यांचा उपयोग, बालविवाहापासून तोटे, लग्नसमारंभांत होणारा अस्थानी खर्च, कर्ज काढण्याची वाईट सवय इत्यादि विषयांवर शालेय पुस्तकें तयार होण्याची त्याला आवश्यकता वाटली. अशीं पुस्तकें पुणें कॉलेजचे तत्कालीन प्रिन्सिपल मेजर कॅंडी हेच तयार करूं शकतील अशीहि आशा त्यानें व्यक्त केली. पुढील काळांत मेजर कॅंडी यांनीं शालेय पुस्तकांच्या क्षेत्रांत काय कामगिरी केली तिचा उल्लेख योग्य ठिकाणीं होईलच. जेम्स फॅरिश यांनें केवळ सूचनाच पुढें केल्या असें नव्हे, तर आपल्या कल्पनेप्रमाणें 'यात्रेकऱ्याचा वृत्तांत' व 'जागती जोत' नामक दोन शालेय पुस्तकें त्यानें लगेच लिहवून घेतलीं.[४८]

जॉर्ज जार्विस व गणिताचीं पुस्तकें.

अशाप्रकारें मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी तत्कालीन सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रोत्साहनानें शालेय पुस्तकें निर्माण करीत होती. या मंडळीनें केवळ मनोरंजक व नीतिपाठ देणारीं अशींच शालेय पुस्तकें तयार केलीं असें नव्हे. शिक्षणप्रसाराचें व ज्ञानदानाचें कंकण प्रथमतः जेव्हां एल्फिन्स्टननें हातीं बांधलें तेव्हांच लोकांना कोणत्या प्रकारचें शिक्षण द्यावयाचें व त्यासाठीं कोणकोणत्या विषयांवर शालेय पुस्तकें रचावयाचीं हें त्यानें ठरविलें होतें. पाश्चात्य शास्त्रीय ज्ञानाचा

---

४७ *G. D. Vol.* $\frac{28}{455.}$ 1838. pp. 138-143.

४८ *Ibid.* p. 199.

परिचय लोकांना देशभाषांमधून करून देणें हाहि त्याचा उद्देश होता. पुस्तक मंडळीनें आपल्या प्रसिद्धिपत्रकांत इंग्रजी मधील शास्त्रीय विषयांवरील पुस्तकांची दिलेली यादी पाहिली कीं हें स्पष्ट होतें. इ. स. १८२५ मध्यें कॅप्टन् जॉर्ज जर्विस याच्या देखरेखी खालीं मुंबईला 'A Seminary for the Instruction of Natives in Engineering' या नांवाची जी संस्था स्थापन झाली होती, तिच्यामुळें गणित विषयावरील पुस्तकें निर्माण होण्यास फार मदत झाली. या संस्थेच्या कार्यक्षेत्राबद्दल पुस्तकमंडळीच्या दुसऱ्या वार्षिक अहवालांत पुढील मजकूर आढळतो.

"The objects of this institution are to prepare a body of men to act under the officers of Government superintending surveys and buildings and to provide for a more general diffusion of mathematical and physical knowledge, as well as practical mechanics, among the native subjects of this presidency, in their own vernacular dialects." ४९

या शाळेंतील विद्यार्थ्यांना गणितासारखा विषय पाश्चात्य पद्धतीवर पण मातृभाषांमधून शिकविण्यासाठीं या विषयावर शालेय पुस्तकें तयार करणें आवश्यक होतें. या शाळेंत गणित, चित्रकला, surveying आणि practical mechanics इतके विषय शिकविले जात. पुस्तक समोर असल्याशिवाय विद्यार्थ्याला शास्त्रीय विषयाचें ज्ञान होणें कठीण पडतें; म्हणूनच जॉर्ज जर्विसनें कांहीं गणितग्रंथ व कोष्टकें मातृभाषेंत तयार केलीं. प्रथम 'पूर्णांक' व 'अपूर्णांक' अशीं दोन लहान पुस्तकें इ. स. १८२५–२६ मध्यें तयार झालीं. याचवेळीं 'कर्तव्यभूमिति' हेंहि पुस्तक रचलें गेलें. लोगॅरिथम्चीं कोष्टकें पण छापली गेलीं. शाळापुस्तक मंडळीच्या चौथ्या वार्षिक अहवालावरून असें दिसतें कीं 'आदिकरण भूमिति' 'बीजगणित' 'त्रिकोणमिति' 'क्षेत्रफळ घनफळ' हीं गणितविषयावरील सर्व शालेय पुस्तकें इ. स. १८२७–२८ मध्यें तयार झालीं.५० गणिताचीं हीं पुस्तकें 'शिक्षामाला' या नांवानें इ. स. १८२८ मध्यें प्रसिद्ध झालीं. या पुस्तकांमुळेंच पाश्चात्य पद्धतीनुसार गणितविद्येचा अभ्यास देशभाषांच्या द्वारा सुरू झाला. जरी हीं

४९ *Second Report of Bombay Native school-book and School Society.* 1824–25. p. 12. (Foot note.)

५० *Fourth Report of the Bombay Native School-book and School Society.* 1827–28. p. 12.

पुस्तकें जॉर्ज जर्विस याच्या नांवाशीं निगडित असलीं, तरी तीं तयार करण्यांत जगन्नाथशास्त्री क्रमवंत, रामचंद्र भट अधलेकर इत्यादि शास्त्रीमंडळींचा हात होता हें नमूद केलें पाहिजे.

उपर्युल्लेखित शिल्पशाळा इ. स. १८३० मध्यें मुंबईहून पुणें येथें हालविण्यांत आली. इ स. १८२९ मध्यें या शाळेंत ७९ विद्यार्थी होते. त्यांना दरमहा पंधरा रुपये शिष्यवृत्ति मिळत असे. इ. स. १८२९ पर्यंत या शाळेतर्फे एकशें पंधरा विद्यार्थी तयार होऊन सरकारी नोकरींत घेतले गेले. इ. स. १८५० मध्यें रुरकी येथें स्थापन झालेल्या शिल्पमहाविद्यालयाशीं या शाळेची तुलना केली जाते. ही शाळा केव्हां बंद झाली तें समजत नाहीं. एवढ्या उपयुक्त संस्थेचा शेवट कसा झाला, याचें केलेलें खालील वर्णन हृदयस्पर्शी आहे :—

"———The books, instruments, drawing materials and scientific apparatus belonging to it, have long lain inch thick of dust in a room in the Sanscrit College, Poona, a disgrace to all concerned." [५१]

इ. स. १८४३ मध्यें एल्फिन्स्टन कॉलेजला जोडून प्रोफेसर पोल यांच्या देखरेखीखालीं एक एंजिनिअरिंग क्लास निघाला होता, पण दोन वर्षांनंतर तोहि बंद पडला. अशाप्रकारें जॉर्ज जर्विस यांच्या देखरेखीखालीं निघालेली शिल्पशाळा बंद पडली; पण त्या शाळेंतील मुलांसाठीं रचलेलीं गणितविषयक पुस्तकें सरसहा वापरांत आलीं.

डॉ. जॉन मॅक्लेनन आणि वैद्यक विषयावरील पुस्तकें

शिल्पशाळेमुळें जशीं गणित विषयक शालेय पुस्तकें तयार झालीं, तशीं इ. स १८२६ मध्यें मुंबईला सुरू झालेल्या वैद्य शाळेमुळें वैद्यकविषयावरील पुस्तकें रचलीं गेलीं. 'Native Medical School' या शाळेचा मुख्य डॉ. मॅक्लेनन् हा होता.[५२] प्रत्येक विद्यार्थ्याला दरमहा आठ रुपये शिष्यवृत्ति मिळत असे. पहिल्या वर्षी वीस विद्यार्थी शिकत होते. मातृभाषेंत लिहिलेल्या वैद्यक शास्त्रावरील ग्रंथांची वाण असल्यामुळें डॉ. मॅक्लेनन यानें या विषयावर इ. स. १८२८ मध्यें 'औषध कल्पनाविधि' हा ग्रंथ लिहिला. हा विषय शिकविण्यासाठीं लागणारीं साधनें लंडनहून मागविलीं गेलीं. पुढें याच पद्धतीवर इ. स. १८४५ मध्यें रॉबर्ट ग्रँट या मुंबईच्या गव्हर्नराच्या नांवानें ग्रँट मेडिकल कॉलेज सुरू झालें. शाळा पुस्तक मंडळीच्या

५१ *Affairs of India*, 1853 p. 36.

५२ *Asiatic Journal, vol. 22.* 1826. p. 84.

शालेय अभ्यासक्रमांत वैद्यक हा विषय नसल्यामुळें मंडळीनें या विषयावरील ग्रंथ तयार करण्याकडे लक्ष दिलें नाहीं, हें अगदीं साहजिक आहे. डॉ. मॅक्लेननें इ. स. १८५२ मध्यें 'शारीर' नामक दुसरा एक ग्रंथ लिहिला.

इतर शास्त्रीय विषयांवरील पुस्तकें

पदार्थ विज्ञान व रसायनशास्त्र हे विषय शालेय शिक्षणक्रमांत समाविष्ट झालेले असल्यामुळें त्या विषयांवरहि मराठीमध्यें ग्रंथ निर्माण झाले. विलियम् हेन्री बेल यानें नारायण शास्त्री जोशी चौलकर यांच्या मदतीनें लिहिलेला 'शिल्पविद्या या विषयाचे निबंध' हा इ. स. १८३५ मध्यें छापलेला ग्रंथ महत्त्वाचा होय. तथापि शास्त्रीय वाङ्मय परभाषेंतून मराठीमध्यें आणण्याचा यशस्वी प्रयत्न हरि केशवजी पाठारे यांनीं केला. त्यांच्या 'पदार्थविज्ञानशास्त्र विषयक संवाद' (१८३३) व 'रसायनशास्त्र विषयक संवाद' (१८३७) या दोन ग्रंथांनीं एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत, देशभाषेंमधून पाश्चात्य शास्त्रीय ज्ञानाची एतद्देशीयांना ओळख करून देण्याची अमोल कामगिरी केली. या सर्व शालेय पुस्तकांचा भाषेच्या दृष्टीनें यथासमय विचार केला जाईल.

मराठी भाषेचीं प्रारंभींचीं व्याकरणें व कोश

पाश्चात्य शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसाराबरोबर, तें ज्ञान ज्या देशभाषांमधून द्यावयाचें त्या भाषांचाहि व्याकरणशुद्ध अभ्यास व्हावा ही कल्पना उदयास आली. शाळापुस्तक मंडळीनें या क्षेत्रांत पाऊल टाकण्याच्या अगोदर युरोपीयन लोकांनीं धर्म व राजकारण हे दोन हेतु समोर ठेवून मराठी भाषेचीं व्याकरणें तयार केलीं होतीं. त्यांत फादर स्टीफन्स्, डॉ. कॅरे यांचीं व्याकरणें प्रमुख होत. या पुस्तकांची विशेष माहिती पुढें दिली जाईल. शाळापुस्तक मंडळीनें व्याकरणरचनेबद्दल केलेल्या प्रथम प्रयत्नांचा उल्लेख मंडळाच्या तिसऱ्या वार्षिक अहवालांत सांपडतो. इ. स. १८२५–२६ च्या या अहवालांत मराठी भाषेच्या व्याकरणावरील दोन पुस्तकें तयार होत असल्याचें लिहिलें आहेः—

'A Marathi Grammar for the use of the natives—This is compiled and nearly revised' व 'Questions and answers on Maratha Grammar—This is compiled but requires revision.' [५३]

---

५३ *Third Report of the Bombay Native School-book and School Society*, 1825-26. pp. 11-12.

पुस्तक मंडळीनें तयार करवून घेतलेल्या व्याकरणावरील पुस्तकांच्या रचनेंत जगन्नाथशास्त्री क्रमवंत, गंगाधरशास्त्री फडके, बाळशास्त्री घगवे, व रामचंद्रशास्त्री जन्हवेकर यांचा हात होता. या चार शास्त्र्यांपैकीं तिघांनीं मिळून तयार केलेल्या व्याकरणाच्या हस्तलिखित प्रतींवरून इ. स. १८३६ पर्यंत शाळांमधील मुलें मराठी भाषेच्या व्याकरणाचा अभ्यास करीत असत. इंडिया ऑफिस लायब्ररीमधील मराठी हस्तलिखित पुस्तकांच्या यादींत एका हस्तलिखित व्याकरण पुस्तकाची नोंद केलेली आढळते. [५४] हें 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' वर उल्लेखिलेल्या दोन पुस्तकांपैकीं पहिलें असावें; तसेंच दुसरें रामचंद्रशास्त्री जन्हवेकर यांनीं तयार केलेलें संवादात्मक व्याकरण असावें. वरील चार शास्त्र्यांपैकीं पहिल्या तिघांनीं मिळून रचलेल्या व्याकरणाच्या पुस्तकांत थोडाफार बदल करून गंगाधरशास्त्री फडके यांचें 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' इ. स. १८३६ मध्यें प्रसिद्ध झालें. याच वर्षी बाळशास्त्री जांभेकर यांचें 'बालव्याकरण' व दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचें 'मराठी भाषेचें व्याकरण' हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं. व्याकरणाप्रमाणेंच कोशरचनेचें कार्यसुद्धां या काळांत सुरू होऊन इ. स. १८२९ मध्यें पंडितमंडळानें रचलेला 'महाराष्ट्र भाषेचा कोश' इ. स. १८३१ मध्यें त्याची पुरवणी व त्याच वर्षी मोल्सवर्थचा मराठी-इंग्रजी कोश असे दोन महत्त्वाचे कोश तयार झाले.

इतिहास व भूगोलविषयक शालेय पुस्तकें

शाळापुस्तक मंडळीच्या स्थापनेनंतर, गणित, पदार्थविज्ञान, रसायन शास्त्र व्याकरण इत्यादि विषयांप्रमाणेंच इतिहास व भूगोल या विषयांवरील शालेय पुस्तकें तयार झालेलीं आढळतात. इतिहासावर नांव घेण्यासारखें एक पुस्तक विशेष प्रसिद्धि पावलें व तें म्हणजे ग्रँट डफ याच्या इंग्रजी ग्रंथावरून डेविड केपन यानीं भाषांतरित केलेली 'मराठ्यांची बखर' (१८३०), याखेरीज हरि केशवजी यांचा 'इंग्लंडाचा वृत्तांत' (१८३८). तसेंच 'इंग्लंड देशाची बखर' (१८३२), हीं दोन पुस्तकें त्यावेळीं शाळांमधून वाचलीं जात. इतिहासाबरोबर भूगोलखगोलाची माहिती मुलांना व्हावी व रूढ अशास्त्रीय कल्पना नाहींशा व्हाव्या म्हणून इ. स. १८३२ मध्यें मेनवेअरिंग व रामचंद्र शास्त्री यांचे 'भूगोल आणि खगोल इत्यादि विषयक संवाद' तयार झाले. या खेरीज नाना नारायण यांचें 'इंग्लंड देशाचें वर्णन' (१८३५) व बाळशास्त्री जांभेकर यांची 'भूगोल विद्या' (१८३६) हीं दोन पुस्तकें शाळांत अभ्यासिलीं जात. जगाची माहिती मुलांना व्हावी म्हणून प्रसिद्ध देशांचे नकाशे मुलांसमोर ठेवण्यासाठीं दादोबा पांडुरंग व नाना नारायण या दोघांनीं 'नकाशाचें पुस्तक' इ.स. १८३६ मध्यें तयार केलें.

---

५४ J. F. Blumhardt and S. D. Kanhere, *Catalogue of the Marathi Manuscripts in the India Office Library*, 1950. p. 11.

शालेय पुस्तकांची पुनर्रचना

अशाप्रकारें इ. स. १८४० पर्यंत जीं शालेय पुस्तकें तयार झालीं त्यामागें ठराविक पद्धति होती, असें दिसत नाहीं. शिक्षणप्रसार हेंच एक ध्येय त्यामागें होतें. अर्थात् एतद्देशीय लोकांच्या ज्या अशास्त्रीय समजुती होत्या त्या नाहींशा कराव्या लोकांची नैतिक पातळी वर आणावी व शक्य झालें तर कांहीं शिक्षित लोक राज्य-कारभारांत उपयोगी पडल्यास पहावे, एवढ्या गोष्टी नजरेसमोर ठेवून ज्ञानदानासाठीं उपयोगी अशीं गणित, भूगोल, इतिहास इत्यादि विषयांवर शालोपयोगी पुस्तकें तयार होत होतीं. सर्व शिक्षणक्रम इयत्तावार विभागून त्याप्रमाणें मुलांच्या बुद्धीला पेलतील अशीं पुस्तकें रचण्याकडे मुळींच लक्ष नव्हतें. या दृष्टीनें प्रथम प्रयत्न मेजर कॅंडी यांनीं केला, इ. स. १८३७ मध्यें दक्षिणेंतील मराठी शाळांचे तपासनीस म्हणून त्यांची नेमणूक झाल्यावर अभ्यासक्रमाची पद्धतशीर इयात्तावार विभागणी व्हावी, प्रत्येक विषयावर क्रमवार पाठ्यपुस्तकें तयार व्हावीं, तीं तयार होत असतांना त्यांची लेखनपद्धति, वाक्यरचना इत्यादि ठराविक असावी या कल्पनांचा उदय झाला शाळा-तपासणी झाल्यावर मे. कॅंडी यांनीं जे अनेक अहवाल लिहिले आहेत ते पाहिले कीं त्या प्रत्येक अहवालांत वरील गोष्टींना प्राधान्य दिलेलें आढळतें. खालचे वर्ग आणि वरचे वर्ग असे मुलांचे दोन भाग पाडलेले दिसतात. खालच्या इयत्तांत प्रथम धुळपाटीवर, बालबोध व मोडी या दोन्ही लिप्यांतून बाराखड्या शिकविल्यानंतर 'लघुहितोपदेश,' 'बालोपदेश,' 'जनावरांचें वर्णन,' 'नीतिकथा,' 'बोधवचनें' इत्यादि सोपीं पुस्तकें शिकविलीं जात व त्यानंतर 'इसापनीति,' 'बाळमित्र,' 'नीतिदर्पण,' 'इंग्लंडचा वृत्तांत,' 'इंग्लंड देशाचें वर्णन,' 'मराठ्यांची बखर,' इत्यादि मोठीं पुस्तकें वाचून घेतलीं जात. या शिवाय 'बालव्याकरण' आणि 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' हीं व्याकरण पुस्तकें अभ्यासिलीं जात. पैकीं पहिलें खालच्या वर्गांत तोंडपाठ करण्यास लावून दुसरें वरच्या वर्गांत शिकविलें जाई. मे. कॅंडी एका अहवालांत लिहितात कीं, बऱ्याच शाळांमधून भूगोलाच्या अभ्यासाला त्यांनींच सुरवात करून दिली. मेनवेअरिंग व रामचंद्रशास्त्री यांच्या 'भूगोल आणि खगोल इत्यादि विषयक संवाद' या पुस्तकाचा त्यांनींच सगळीकडे प्रसार केला.[५५]

मे. कॅंडी यांनीं शालेय पुस्तकांच्या निर्मितीबद्दल आपले विचार वेळोवेळीं व्यक्त केले, तसेच विचार इतर सरकारी अधिकाऱ्यांनीं मांडले. तारीख २४ नोव्हेंबर, इ. स. १८३९ रोजीं गव्हर्नर जनरल ऑक्लंडनें शिक्षणविषयक एक टांचण लिहिलें; इ. स १८४१ मध्यें सरकारनें बोर्ड ऑफ एज्युकेशनला पुन्हां एकदां त्याची आठवण

---

५५ *G. D. Vol, 530*, 1840. p. 196.

करून दिली. त्याप्रमाणें बोर्डानें प्रो. ऑर्लेबार, प्रो. बेल, मेजर कॅंडी, मि. इझ्डेल व बाळशास्त्री जांभेकर यांना पत्रें लिहून चालू असलेल्या शालेय पुस्तकांबद्दलचीं त्यांचीं मतें व आवश्यक ते बदल करण्याबद्दलच्या सूचना मागाविल्या. प्रत्येकानें आपापलीं मतें व सूचना बोर्डाकडे पाठवून दिल्या.[५६] यांची बारकाईनें पाहणी करणें पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

चालू शालेय पुस्तकांविषयीं तत्कालीन तज्ज्ञांचीं मतें

वर उल्लेखिलेल्या शिक्षणतज्ज्ञांपैकीं मेजर कॅंडी यांचें निवेदन महत्त्वाचें आहे. विषयवार चर्चा करून, त्यावेळीं शाळांमधून वापरलीं जाणारीं पुस्तकें जरी उपयुक्त असलीं, तरी त्यांत सुधारणेला पुष्कळ वाव आहे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें. गणिताच्या पुस्तकांबद्दल आपले विचार मांडतांना ते म्हणतात कीं चालू 'शिक्षामाला' हीं पुस्तकें योग्य असलीं तरी त्यांचे लहान लहान भाग पाडले तर जास्त चांगले होतील. त्यांच्या मतें व्याकरणावरील बाळशास्त्री व दादोबा यांचीं पुस्तकें ठीक होतीं. भूगोलासाठीं चालू पुस्तकांच्या जोडीला जगाचा भूगोल शिकविण्याला योग्य अशा एकाद्या पुस्तकाची उणीव त्यांना भासली. त्यासाठीं कलकत्ता शाळापुस्तकमंडळीची मदत घेण्याबद्दल त्यांनीं सुचविलें. इतिहासाच्या पुस्तकांमध्यें हिंदुस्थानच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचीं भर घालणें त्यांना आवश्यक वाटत होतें. यासाठीं मार्शमन यांच्या 'Survey of India' या इंग्रजी पुस्तकाचें भाषांतर योग्य ठरेल, असें त्यांना वाटलें. सामान्यज्ञानासाठीं चालू पुस्तकेंच असावीं, पण भाषेच्या दृष्टीनें फेरफार करून तीं सोपीं करावीं, अशी इच्छा त्यांनीं व्यक्त केली. भाषेंतील फेरफाराची सूचना बहुतेक पुस्तकांना लागू करावी, असें त्यांचें ठाम मत होतें. या अभिप्रायाचा परिणाम पुढील काळांत कसा झाला तें योग्य ठिकाणीं दाखविलें जाईल.

मेजर कॅंडीच्या वरील सर्व सूचना इझ्डेल यांना मान्य होत्या; पण हेन्री बेल यांचे 'शिल्पविद्या या विषयाचे निबंध' आणि हरि केशवजी यांचे 'रसायनशास्त्रविषयक संवाद' या दोन पुस्तकांबद्दल त्यांनीं कांहींच लिहूं नये याचें इझ्डेल यांना आश्चर्य वाटलें. वरच्या वर्गासाठीं हीं दोनहि पुस्तकें वापरावीं तसेंच खगोलशास्त्राचा जास्त अभ्यास व्हावा म्हणून या विषयावर संवादरूपानें एकादें पुस्तक लिहवून घेण्याची त्यांनीं सूचना केली.

---

५६ *G. D. Vol. 24A.* 1843. pp. 651–680.

बाळशास्त्री जांभेकर यांनीं शालेय पुस्तकांबद्दल केलेल्या सूचना वरील दोघां-पेक्षांहि जास्त विचाराई आहेत.[५७] ते म्हणतात कीं सर्व विषयांचें केवळ जुजबी ज्ञान द्यावयाचें असेल तर चालू शालेय पुस्तकें ठीक आहेत; पण अभ्यासक्रम जर व्यापक व सखोल करावयाचा असेल तर मात्र चालू पुस्तकांत बरीच भर घालावी लागेल. व्याकरणाबरोबरच छंदःशास्त्र व काव्यशास्त्र आणि शब्दसिद्धि हा भाग त्यांच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा होता. बाळशास्त्र्यांच्या या सूचनेमुळें 'शब्दसिद्धि निबंध' इ. स. १८४३ मध्यें प्रसिद्ध झाला असणें शक्य आहे. त्यांची दुसरी उपयुक्त सूचना जगाच्या इतिहासावर एकादें पुस्तक तयार करण्याची होती. इतरांनीं न केलेली अशी त्यांची आणखी एक सूचना होती, ती म्हणजे विद्यार्थ्यांना सरकारी कायद्यांची थोडीफार माहिती देण्यासाठीं एकादें पुस्तक तयार करवून घेणें ही होय. तत्कालीन शालेय पुस्तकांच्या भाषेबद्दल अभिप्राय देतांना ते लिहितात कीं सर्वसाधारणपणें ती ठीक आहे. विशेषतः 'इसापनीति', 'बाळमित्र', 'सिद्धपदार्थ-विषयक संवाद', 'रसायनशास्त्र विषयक संवाद' इत्यादि पुस्तकांची भाषा त्यांच्या दृष्टीनें साधी व सोपी होती. जर्विसच्या गणितविषयक पुस्तकांचीं भाषांतरें मात्र त्यांना पसंत पडलीं नाहींत.

अशाप्रकारें बोर्ड ऑफ् एज्युकेशननें इ. स. १८४१ मध्यें स्थापन केलेल्या शालेयपुस्तकसमितीनें आपलीं मतें बोर्डाला कळविलीं; पण त्यानंतर चार वर्षें कांहींच हालचाल झाली नाहीं. म्हणून पाठ्यपुस्तकांचा विचार करण्याचें काम इ. स. १८४५ मध्यें बोर्डानें बाळशास्त्र्यांकडे सोपविलें. दुर्दैवानें तारीख १७ मे, इ. स. १८४६ रोजीं बाळशास्त्री अकालीं निधन पावले. त्यांचें काम इ. स. १८४७ मध्यें मेजर कॅंडीकडे देण्यांत आलें.

माध्यमवाद

शिक्षणप्रसाराचें साधन म्हणून मराठी भाषेंत लिहिलेलीं पाठ्यपुस्तकें तयार व्हावयास सुरवात झाली, त्यावेळीं ज्ञानदानासाठीं माध्यम कोणतें असावें या गोष्टी-बद्दल वाद नव्हता. एल्फिन्स्टनचें सुरुवातीपासूनच धोरण असें होतें कीं, पाश्चात्य विशेषतः इंग्रजी भाषेंतील उपयुक्त शास्त्रीय ग्रंथांचीं देशभाषांमध्यें योग्य व्यक्तींकडून भाषांतरें करवून घ्यावयाचीं. त्यासाठीं विषय आणि भाषा यांचा विचार करून योग्य तीं बक्षिसें द्यावयाचीं. एल्फिन्स्टनचें हें उदार धोरण जर असेंच पुढें चालू राहिलें असतें तर आज परिस्थिति वेगळी दिसली असती; पण तसें व्हावयाचें नव्हतें. तसें

---

५७ *G. D. Vol.* $\frac{24A}{749A}$, 1843. pp. 661–680.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें १.

वर्ग.....क्रमांक.....

पाहिलें तर शिक्षणप्रसार करण्याच्या कल्पनेचा उदय झाला तेव्हांच माध्यमवादाच बीज पेरलें गेलें होतें. तत्कालीन एक सनदी नोकर वॉर्डन, हा प्रथमपासूनच इंग्रजी शिक्षण आणि इंग्रजी माध्यम या मताचा पुरस्कर्ता होता. पण कांहीं काळपर्यंत या बीजाला अंकुर फुटला नव्हता. वादाची खरी सुरुवात, टॉमस अर्स्किन पेरी इ. स. १८४२ मध्यें बोर्ड ऑफ एज्युकेशन या संस्थेचा अध्यक्ष झाल्यावर त्यानें केली. पेरी कट्टर इंग्रजीवाला होता. हा वाद त्याच्या कारकीर्दीत इतका विकोपाला गेला कीं, त्यानें इ. स. १८४८ मध्यें या मुद्यावर अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची धमकी दिली व शेवटीं इ. स. १८५२ मध्यें त्यागपत्र दिलें. त्याचें असें मत होतें कीं, मर्यादित साधनांनीं सर्वांना शिक्षण देणें सरकारच्या आवाक्याबाहेरचें असल्यामुळें कांहीं निवडक लोकांना इंग्रजीमधून पाश्चात्य ज्ञान द्यावें आणि त्यांनीं मातृभाषांच्या द्वारा त्या ज्ञानाचा सर्वत्र फैलाव करावा. पेरी हा बोर्ड ऑफ एज्युकेशनचा अध्यक्ष असल्यामुळें त्याच्या म्हणण्याला महत्त्व येणें साहजिकच होतें. इतर मंडळी कितीहि विरुद्ध असली तरी अधिकाराच्या जोरावर एकादी व्यक्ति आपल्या मताप्रमाणें वाटेल ती गोष्ट जोरदारपणानें पुढें रेटूं शकते. शालेय पुस्तकें इंग्रजीमधून देशी भाषांत भाषांतरित करण्याच्या बाबतींत पेरीविरुद्ध पुष्कळ वजनदार माणसें होतीं. त्यांत जॉर्ज जर्विस, जेम्स फॅरिश मेजर विल्किन्सन, जगन्नाथ शंकरशेट, महमद इब्राइम मखबा, फ्रामजी कावसजी वगैरे विचारवंत प्रमुख होते. : माध्यमवादाचा समग्र इतिहास बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या इ. स. १८४७-४८ च्या सातव्या अहवालामध्यें दिलेला आढळतो. विशेषतः जॉर्ज जर्विसनें आपलें म्हणणें वारंवार ठासून मांडलें. तारीख २४ फेब्रुवारी इ. स. १८४७ रोजीं लिहिलेल्या एका टांचणांत तो म्हणतो कीं भाषांतराच्या बाबतींत आपला जुना अनुभव फार आशादायी आहे. आपण शिल्पशाळेंतील मुलांसाठीं गणितावरील पुस्तकें मराठींत भाषांतरित केलीं आणि हें भाषांतराचें काम तसेंच जोरानें पुढें चालू ठेवणें आवश्यक आहे. या टांचणांत त्यानें मांडलेला विशेष मुद्दा म्हणजे भाषांतराचें काम पाश्चात्य लोकांच्या मदतीनेंच होणें शक्य आहे. त्याचे शब्द असे आहेत :—

"It is to European agency that we must look at present for translations." [५८]

ज्ञानप्रसारार्थ वापरावयाच्या माध्यमावर झालेली चर्चा विचारांत घेऊन सरकारनें देशी भाषांच्या बाजूनें आपला कौल दिला व त्यामुळें फिरून एकदां सरकारी पाठिंब्यानें उपयुक्त इंग्रजी ग्रंथांचीं मराठीमध्यें शालोपयोगी भाषांतरें होऊं लागलीं. सरकारी निर्णयांत असें म्हटलें आहेः—

---

५८ *Report of the Board of Education*, 1847-48. p. 57.

"With regard to providing translations of useful elementary works in the vernacular languages, the difficulty seems to His Honor in Council to be somewhat over-rated; for what was effected by the zeal and ability of Colonel Jervis and Dr. McLennan many years ago, may, he conceives, again be effected by men imbued with the same earnest desire to promote the improvement of the natives. The duty of supplying a sufficient number of works, of the kind required, devolves upon the Government who are prepared to consider the best means of providing translations, either under the superintendence of their own officers, or by offering premiums for good ones as proposed by Colonel Jervis." ५९

वरील सरकारी निर्णयामुळें, पाश्चात्य ज्ञानाचा देशीभाषांमधून प्रसार करण्याच्या हेतूनें इंग्रजी भाषेंतील उपयुक्त शालेय पुस्तकांचीं भाषांतरें करवून घेण्याची जी पद्धति एल्फिन्स्टननें सुरू केली होती व त्याबरहुकूम हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी काम करीत होती, त्याला पुन्हां एकदां चालना मिळाली व बोर्डानें त्याप्रमाणें या कामाला हात घातला. यासाठींच इ. स. १८४७ मध्यें मेजर कँडीची मराठी ट्रान्स्लेटर म्हणून खास नेमणूक झाली.

---

५९ *Report of the Board of Education*, 1847–48. p. 144.

द::९.
८०५२.

प्रकरण पांचवें

कँडी युग

मेजर कँडी

शिक्षणाच्या माध्यमवादाच्या वेळीं तारीख २६ ऑक्टोबर, इ. स. १८४९ रोजीं लिहिलेल्या एका टांचणामध्यें इंग्रजीचा कट्टा पुरस्कर्ता अर्स्किन पेरी म्हणतो,

"Vernacular education in this side of India does not possess a warmer friend than Majar Candy, and there is no one abler to carry out every feasible suggestion for their improvement. I believe Majar Candy is one of the best Mahratta scholars in this presidency; he writes it with great purity and all his energies are devoted to the task of diffusing the useful information of Europe through the tongue which he has studied so diligently."[1]

वरील मोजक्या शब्दांत ज्यांचें वर्णन केलें आहे, त्या मेजर कँडीच्या हातीं शालेय पुस्तकांच्या पुनर्रचनेचें महत्त्वाचें कार्य आलें. बोर्डानें त्यांच्या नेमणुकीबद्दल सरकारला विनंति केली व सरकारनें ती लगेच मान्य केली. याचवेळीं कँडी पुणें पाठशाळेचे मुख्याधिकारी होते. त्या जोडीला मराठी ट्रान्स्लेटर व रेफरी म्हणून त्यांची तारीख १८ ऑक्टोबर १८४७ रोजीं नेमणूक झाली. यावेळेपासून पुढील तीस वर्षें, मराठी शालेय पुस्तकें कशीं असावीं, त्यांतील विषयांची निवड कोणत्या धोरणानें करावी, त्यांची रचना कशी असावी, भाषेच्या दृष्टीनें त्यांत कोणकोणते फेरफार करावे, मराठी भाषेच्या लेखनपद्धतींत एकसूत्रीपणा आणण्यासाठीं ते फेरफार कसे अमलांत आणावे या सर्व गोष्टी कँडीच्या हातीं आल्या.

मेजर कँडी व जुनें नीतिपर वाङ्मय

मेजर कँडी यांनीं आपल्या कामाची सुरुवात निर्मितीपेक्षां नाशानेंच केली असें म्हणावयास हरकत नाहीं. पाठ्यपुस्तकांच्या पुनर्रचनेचें काम त्यांच्याकडे येण्यापूर्वी 'पंचोपाख्यान', 'विदुरनीति', 'सिंहासन बात्तिशी' यासारखीं पुस्तकें शाळांतून

---

१ *Report of the Board of Education*, 1847–48. p. 178.

वापरलीं जात असत. या पुस्तकांच्या इष्टतेबद्दल वारंवार चर्चा होत असे. शालेय पुस्तकें म्हणून तीं वापरण्याजोगीं नाहींत असा एक आरोप सतत केला जात असे. विशेषतः ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं यासारख्या पुस्तकांविरुद्ध टीकेची झोड उठविली होती. त्याचा परिणाम म्हणूनच कीं काय हीं व अशासारखीं शालेय पुस्तकें यापुढें वापरांतून काढून टाकण्याचें मेजर कँडीनीं ठरविलें. बोर्डानें शालेय पुस्तकांच्या बाबतींत त्यांना सर्वाधिकार दिले होते. बोर्डाच्या अहवालांत यासंबंधीं मजकूर सांपडतो तो असाः-

"We have called the attention of Major Candy to the subject, requesting him to examine very carefully each of our Mahratha publications, with the view of removing everything that may be found objectionable, previous to passing new editions through the press, and of striking off the list any work which may be found to contain either false morality or false science."[२]

यावरून असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, शालेय पुस्तकांच्या बाबतींत त्यांनीं निर्मितीपेक्षां नाशानें आपलें काम आरंभिलें. यापूर्वी दक्षिणेंतील शाळा तपासण्याचें काम करीत असतांना शालेय पुस्तकांविषयींच्या आपल्या कल्पना त्यांनीं निश्चित केलेल्याच होत्या. त्यांना अनुसरून ह्या नवीन कामाला त्यांनीं हात घातला.

ट्रान्स्लेशन एक्झिबिशनर्स

नाशाबरोबर निर्मितीचेंहि काम त्यांनीं सुरू केलें. जरी इयत्तावार अभ्यासक्रम अद्यापपावेतों निश्चित ठरलेले नव्हते तरी इतिहास, भूगोल, पदार्थविज्ञान, रसायन इत्यादि विषयांवर शालेय ठरतील अशीं, नवीन पद्धतीवर आणि सोप्या भाषेंत रचलेलीं पुस्तकें आवश्यक असल्याचें त्यांना दिसून आलें. त्या दृष्टीनें त्यांनीं केलेल्या कामाची कल्पना येण्यास बोर्ड ऑफ् एज्युकेशनचे व इ. स. १८५५ पासून डायरेक्टर ऑफ् पब्लिक् इन्स्ट्रक्शनचे वार्षिक अहवाल पाहिले पाहिजेत. उदाहरणादाखल इ. स. १८५०–५१ मध्यें त्यांनीं 'वाचनपाठमाला' या पुस्तकाची रचना केली, तसेंच 'विरामचिन्हांची परिभाषा', 'नीतिबोधकथा' भूगोलावर एक पुस्तक, एवढीं नवीन पुस्तकें लिहिलीं, 'इसापनीति', 'बालमित्र', 'हिंदुस्थानचा इतिहास' या पुस्तकांची भाषिक सुधारणा केली.[३] याशिवाय पुणें पाठशाळेमध्यें नवीनच सुरू झालेल्या भाषांतरकार तयार करण्याच्या वर्गाचें कामहि ते पहात असत. यामधूनच आपल्या हाताखालीं ट्रान्स्लेशन एक्झिबिशनर्स ठेवून त्यांच्याकरवीं उपयुक्त इंग्रजी

---

२ *Report of the Board of Education*, 1849. p. 43.

३ *Report of the Board of Education*, 1850–51. pp. 75–76.

पुस्तकांचीं भाषांतरें करवून घेण्याची कल्पना निघाली. भाषांतरकारांची निवड त्यांची परीक्षा घेऊन होत असे. वर्तमानपत्रांत खालीलप्रमाणें जाहिरात देऊन परीक्षार्थी भाषांतरकारांची परीक्षा घेतली जात असे.

"An examination of competitors for Translation Exibitioners will be held at the Poona College. . . . The qualifications required are a critical knowledge of English, a critical knowledge of Marathi, a competent acquaintance with Sanscrit and ability to translate grammatically and idiomatically from English into Marathi and from Marathi into English." ४

अशाप्रकारें पहिल्या परीक्षेंत पहिले आलेले कृष्णशास्त्री चिपळूणकर यांची निवड झाली.[५] व त्यांच्या जोडीला नारायणशास्त्री आपटे, महादेवशास्त्री पुराणिक व नरसिंहशास्त्री ओक यांची नेमणूक होऊन त्यांच्याकडे अनुक्रमें Chamber's History of Greece, Taylor's Ancient History, Sulivan's Geography आणि Murray's India या पुस्तकांचीं मराठींत भाषांतरें करण्याचें काम आलें. आपल्या हाताखालीं भाषांतरकार नेमून त्यांच्याकडून इंग्रजी भाषेंतील उपयुक्त पुस्तकांचीं भाषांतरें करवून घेण्याचें काम मेजर कँडी यांनीं सुरू करून मराठी भाषेंतील ग्रंथांत भर घालण्याचें श्रेय घेतलें. या भाषांतरित ग्रंथांची यादी दरवर्षींच्या शिक्षण खात्याच्या वार्षिक अहवालांत पहावयास मिळते.

कँडीचें भाषाविषयक धोरण

हीं सर्व पुस्तकें भाषेच्या दृष्टीनें मेजर कँडी यांच्या शोधक नजरेखालून जात असत; किंबहुना ते मराठी ट्रान्स्लेटर म्हणून अधिकारावर आल्यापासून जेवढीं म्हणून मराठी पुस्तकें छापलीं गेलीं त्यांतील बहुतेक त्यांनीं तपासलेलीं होतीं. मेजर कँडी यांनीं पाहिल्याशिवाय मराठी भाषेंत लिहिलेलें कोणतेंहि पुस्तक, मग तें शालेय असो अगर प्रौढ लोकांसाठीं लिहिलेलें असो, छापावयाचें नाहीं असा दंडकच होता असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यामुळें ते हयात असेपर्यंत छापलीं गेलेलीं मासिकें, नाटकें, कादंबऱ्या इत्यादिकांची भाषा त्यांच्या कल्पनेशीं जुळणारी असली तरच त्यांच्या कर्त्यांना सरकारी उत्तेजन व विद्याखात्याकडून आर्थिक मदत होत असे. मदतीच्या अपेक्षेनें त्यांच्याकडे तपासणीसाठीं आलेल्या अनेक पुस्तकांवर लिहिलेले त्यांचे टीकालेख— विशेषतः भाषिक दृष्ट्या केलेल्या फेरबदलांसह — सरकारी दप्तरांत पहावयास मिळतात. पुढें योग्य ठिकाणीं घेतलेले त्यांतील उतारे पाहिल्यावर मेजर कँडी यांच्या धोरणामुळें मराठी भाषेच्या घडणीवर पुढील काळांत कसा कसा बदल झाला याची कल्पना करतां येईल.

---

४ *D. P. I. Poona College, Vol.* 8. 1855. p. 135.

५ *Report of the Board of Education*, 1851–52. p. 45.

मेजर कँडीचे अनुयायी

सरकारी मदतीच्या अपेक्षेनें बहुतेक लेखक मेजर कँडी यांच्या म्हणण्याला मान तुकवून त्यांच्या सूचनेप्रमाणें आवश्यक ते फेरबदल करावयास तयार असत. स्वत्त्वाला जागून माझी मातृभाषा मराठी आहे, त्यामुळें मी लिहिलेल्या पुस्तकांत एकाद्या परभाषिकानें बदल करावा ही कल्पना असह्य वाटणारी भाऊ महाजनांसारखी बंडखोर व्यक्ति विरळाच! सर्वसाधारणपणें मेजर कँडी यांच्या भाषिक धोरणाला पाठिंबाच मिळत असे. मुलांच्यासाठींच अनेक पुस्तकें लिहिणारे मुलांचे मित्र 'बालबोध'कार विनायक कोंडदेव ओक यांनीं मेजर कँडीचें ऋण पूर्णपणें मान्य केलें आहे. ते 'ग्रंथ कर्तृत्व' नामक लेखांत लिहितातः—

"माझ्या लिहिण्याच्या पद्धतीविषयीं कोणी कांहीं म्हणोत. परंतु मी प्रांजलपणें आणि मोठ्या कृतज्ञभावानें कबूल करितों कीं, मला मराठी लिहिण्यास मेजर क्यांडी साहेबांनीं शिकविलें. वास्तविक पाहिलें असतां, त्यांचें प्रत्यक्ष दर्शन मला कधींच झालें नाहीं. परंतु, त्यांचे जे अभिप्रायलेख मला पाहण्यास शाळाखात्याच्या अधिकाऱ्यांनीं मजकडे पाठविले, त्यांवरून पुष्कळ चांगल्या चांगल्या सूचना मला मिळाल्या, आणि माझ्या चुका मला कळल्या.···मी एवढें खचीत सांगतों कीं, चांगल्या गुरूनें आपल्या आवडत्या विद्यार्थ्यास जसें आस्थेनें शिकवावें–त्याचा हात धरून त्यास सुमार्गास लावावें–त्याप्रमाणें मेजर क्यांडीसाहेबांनीं मला मराठी लिहिण्याच्या मार्गास लाविलें. हे त्यांचे उपकार मी यावज्जीव आठवीन." [६]

विनायक कोंडदेव ओक यांच्याचप्रमाणें मेजर कँडीचे उपकार यावज्जीव स्मरणारे त्यावेळचे बहुतेक लेखक होते. अर्थात भाऊ महाजनांव्यतिरिक्त दादोबा पांडुरंग, रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांच्यासारख्या कांहीं व्यक्ति मेजर कँडी यांच्याबरोबर भाषिक वाद खेळणाऱ्या होत्याच. या वादविवादांमधून मेजर कँडी यांचीं मराठी भाषेची लेखनपद्धति, वाक्यरचना इत्यादि बाबतींत काय मतें होतीं, तें स्पष्ट होत असल्यामुळें ते वादविवाद विस्तारपूर्वक योग्य ठिकाणीं दिले जातील.

क्रमिक वाचन पुस्तकांची कल्पना

अशा प्रकारें मेजर कँडी यांच्या कडक देखरेखीखालीं मराठी शालेय पुस्तकें तयार होत असतांना बोर्ड ऑफ् एज्युकेशनकडून त्यांना याबाबत सूचना मिळत होत्या. इ. स. १८५४–५५ सालच्या बोर्डाच्या अहवालावरून असें दिसतें कीं या वर्षी मराठी क्रमिक पुस्तकें तयार करण्याची कल्पना प्रथम जन्माला आली. हीं क्रमिक पुस्तकें कशाप्रकारें रचलीं जावीं याबद्दलचे विचार या अहवालांत पहावयास मिळतात.[७]

---

६ **विविधज्ञानविस्तार**, पु. ३६. १९०५. पृ. ४३.

७ *Report of the Board of Education*, 1854-55, pp. 11-12.

तत्कालीन शाळातपासनीसांच्या सल्ल्यावरून बोर्डानें असें ठरविलें कीं अनेक विषयांवर पुष्कळ पुस्तकें असण्याऐवजीं क्रमिक पुस्तकें रचून त्यांतच सर्व विषयांचे पाठ घालावे. इतिहास, भूगोल, पदार्थविज्ञान इत्यादि विषय क्रमिक पुस्तकांच्या द्वारा मुलांना शिकविले कीं शिक्षकांनाहि पुष्कळ पुस्तकें वाचून तयारी करावयास नको अशी बोर्डाची कल्पना होती. यापुढील काळांत मेजर कँडी यांच्या क्रमिक पुस्तकांना जें अढळस्थान प्राप्त झालें त्यांची सुरुवात बोर्डाच्या वरील सूचनेवरून झाली.

डायरेक्टर ऑफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन

इ. स. १८४० पासून पंधरा वर्षें काम केल्यावर बोर्ड आफ् एज्युकेशन ही निमसरकारी संस्था बंद होऊन, सरकारच्या शिक्षणविषयक नवीन खलित्याप्रमाणें, मुंबई प्रांताचें शिक्षणखातें एका व्यक्तीच्या हातीं देण्यांत आलें. इ. स. १८५५ पासून डायरेक्टर ऑफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन हे शिक्षणखात्याचे सर्वाधिकारी बनले. शिक्षण क्षेत्रांत प्रथम, मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी, नंतर बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुढें बोर्ड ऑफ् एज्युकेशन आणि आतां डायरेक्टर ऑफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन, अशाप्रकारें बदल झाला. इ. स. १८५५ पासून शिक्षणविषयक धोरणांत आणि त्याचबरोबर आवश्यक अशा शालेय पुस्तकांत बदल करणारी अधिकारी व्यक्ति म्हणून डी. पी. आय्. याला फार महत्त्व आलें. त्याच्या बऱ्यावाईट कल्पना शालेय पुस्तकांच्या रचनेंत, विषयांत, भाषाविषयक धोरणांत शिरूं लागल्या. शिक्षणखात्याचे यापुढील वार्षिक अहवाल पाहिल्यास याची सत्यता पटेल. डायरेक्टर म्हणून शिक्षणक्षेत्रांत नांव मागें ठेवून गेलेल्या व्यक्तींपैकीं इ. आय्. हॉवर्ड हे एक होत. ते इंग्रजी माध्यमाद्वारें एतद्देशीयांना पाश्चात्य शिक्षण द्यावें या मताचे कट्टे पुरस्कर्ते होते. तरीसुद्धां मराठी भाषेंतील शालेय पुस्तकांच्या बाबतींत बारकाईनें लक्ष घालून त्यांनीं तीं पद्धतशीर रीतीनें लिहवून घेण्याचें ठरविलें. अधिकारसूत्रें हातीं घेतल्यावर त्यांनीं मराठी शालेय पुस्तकें व त्यांची भाषा याबद्दलचे आपले विचार व्यक्त केले. ते लिहितात :—

"As yet it is apparently impossible to dispense with European superintendence in getting up vernacular treatises of general knowledge. There is no doubt the books are the worse in point of style from this circumstance. Natives complain that at the best they are stiff, and ungainly; and probably it must needs be so. A council of pundits may correct and retouch, but the original foreign air will never entirely disappear. And the very merits of the European

scholar,—his logical precision of thought, his taste for grammatical analysis, and love of symmetry,—become defects in as much as they tend to sweep away the racy anomalies which grow up in the structure of every language, and to a native ear constitute some of its greatest attractions."[८]

हॉवर्ड यांच्या मताप्रमाणें मराठी शालेय पुस्तकें तयार करण्याच्या कामीं एतद्देशीय लेखकांचा उपयोग करून घेणें आवश्यक होतें. मात्र एकाद्या युरोपियन अधिकाऱ्याची देखरेख या कामीं अपरिहार्य असल्याचें त्यांना वाटे. या त्यांच्या कल्पनेमुळेंच मेजर कँडीचा हात प्रत्येक पुस्तकावरून फिरत असे, आणि त्याचा परिणाम मराठी भाषेच्या घडणीवर झाला.

क्रमिक वाचन पुस्तकें

इ. स. १८५५ पर्यंत अनेक वेळां शालेय पुस्तकें तयार करवून घेण्यासाठीं समित्या नेमिल्या गेल्या; पण त्यांच्या हातून म्हणण्यासारखें काम झालें नाहीं. आतां मात्र हॉवर्ड यांनीं जोमानें हें काम सुरू केलें. पहिली गोष्ट शालेय पुस्तकांचा विचार करण्यासाठीं समिति नेमणें ही होय. त्याप्रमाणें डॉ. विल्सन्, मेजर कँडी, जॉन हार्कनेस, रे. ग्लासगो, रे. मरे मिचेल, रे. आय्ट्किन, कॅ. लेस्टर, टी. सी. होप, रा. सा. भास्कर दामोदर पाळंदे, विश्वनाथ नारायण मंडलिक, विनायक वासुदेव कीर्तिकर, गोविंद नारायण माडगांवकर यांची एक समिति नेमिली गेली. पुष्कळ वेळां समिति नेमण्याचें नाटकच केलें जातें, व प्रत्यक्ष काम करणारी व्यक्ति एकादी दुसरीच असते असा नेहमींचा अनुभव आहे. या वेळीं सुद्धां तसेंच झालें. हॉवर्ड यांच्या सूचनांप्रमाणें मेजर कँडी यांनीं इ. स. १८५७ मध्यें मराठी क्रमिक वाचन पुस्तकें तयार करावयास सुरवात केली. त्यांपैकीं पहिलीं दोन, रा. सा. भास्कर दामोदर यांच्या नांवें आहेत. कारण तेवढ्या अवधींत मेजर कँडी रजा घेऊन परदेशीं गेले होते. अर्थात ते आल्यावर भाषेच्या दृष्टीनें या दोन पुस्तकांवर त्यांचा हात फिरलाच.

क्रमिक वाचन पुस्तकें आपण कशीं तयार केलीं याचा समग्र इतिहास मेजर कँडी यांनीं दिलेला आहे.[९] ते म्हणतात त्याप्रमाणें त्यांनीं या कामाला इ. स. १८५७ मध्यें सुरवात केली व इ. स. १८६१ पर्यंत सहा पुस्तकें तयार झालीं. तीं तयार करतांना हॉवर्डनें त्यांना बऱ्याच सूचना दिल्या. यानंतर इ. स. १८६७ मध्यें पुन्हां एकदां या पुस्तकांवर हात फिरविण्याचा आदेश त्यावेळचे डी. पी. आय्. सर अलेक्झँडर ग्रँट

८ *Report of the Director of Public Instruction, Bombay.* 1857-58 pp. 42-43.

९ *Report of the Committee appointed to examine the Text-books in use in Indian Schools,* 1878. pp. 205-206.

यांनीं दिल्यामुळें मे. कँडी यांनीं पुन्हां तपासणी करून जुने धडे बदलून, कांहीं नवीन धडे घालून इ. स. १८६८ मध्यें तीं सर्व पुस्तकें नवीन स्वरूपांत छापलीं हे फेरबदल करीत असतां मेजर कँडी यांना शिक्षणाधिकारी व शाळा तपासनीस यांनीं सूचना दिल्या होत्या. त्याबद्दल ते लिहितात :--

"When the reports came in. they were read before and considered by Sir A. Grant, two native gentlemen of the Education Department and myself, who settled what weight was to be given to the opinions recorded." [१०]

इतरांच्या मतांना वेताबातानें महत्त्व द्यावयाचें या भूमिकेवरून ते काम करीत असावेत असें वाटतें. मेजर कँडी यांनीं क्रमिक वाचन पुस्तकें कशीं रचलीं, त्या बाबतींत त्यांचें भाषाविषयक धोरण कसें होतें, त्यांचा परिणाम मराठी भाषेच्या घडणीवर कसा झाला इत्यादि बाबींची चर्चा प्रत्यक्ष त्या पुस्तकांबद्दल लिहितांना केली जाईल.

शालेय पुस्तकांची सुधारणा

इ. स. १८७३ मध्यें पुन्हां एकदां हिंदुस्थान सरकारनें शालेय पुस्तकांमध्यें सुधारणा करण्यासाठीं एक समिति नेमिली. हिंदुस्थानांतील सर्व भाषांमध्यें चालू असलेल्या शालेय पुस्तकांत एकसूत्रीपणा असावा, तीं सर्व परस्परांशीं ताडून पाहून त्यांत योग्य ते फेरबदल घडवून आणावे, या हेतूनें ही सुधारणा समिति नेमिली गेली. ई. सी. बेली हे या समितीचे अध्यक्ष होते. कामाला सुरवात करतांना प्रांतोप्रांतीं त्या त्या भाषांसाठीं उपसमित्या नेमण्याचें ठरलें. मराठी भाषेंतील शालेय पुस्तकांच्या तपासणीसाठीं नेमलेल्या समितींत तत्कालीन डी. पी. आय्. चॅटफील्ड, रे. विल्सन्, मेजर कँडी व नारायण भाई दांडेकर ही मंडळी होती. मराठी भाषेंतील पुस्तकांसंबंधींचें कोणतेंहि काम असो, त्याठिकाणीं मेजर कँडी असलेच पाहिजेत, असा जणुं अलिखित नियमच होता. गेल्या पंचवीस वर्षांत, परशुरामपंत गोडबोले आणि इतर शास्त्रीमंडळी यांच्या मदतीनें मराठी भाषेंतील शालेय व इतर पुस्तकें, विषय व भाषा या दोन्ही दृष्टीनीं तपासून मराठी भाषेला व्याकरणाच्या नियमांत बसवून त्यायोगें भाषेला एकसूत्रीपणा आणण्याचा आटोकाट प्रयत्न मेजर कँडी यांनीं केला होता. या त्यांच्या कामगिरीमुळेंच त्यांची पुस्तकसमितीवर निवड करतांना, डी. पी. आय्. चॅटफील्ड त्यांच्याबद्दल म्हणतात,

"We have had scholars like Major Candy on whose works, I did not require the opinion of the Committees." [११]

---

[१०] *Report of the Committee appointed to examine the Text-books in use iu Indian Schools*, 1878. p. 206.

[११] Ibid. p. 31.

शालेय पुस्तकें व शिक्षणशास्त्र

मेजर कँडी यांच्या लेखणीमधून बाहेर पडलेलीं अगर त्यांच्या शोधक दृष्टीखालून गेलेलीं सर्व शालेय पुस्तकें निर्दोष असणारच अशा खात्रीनें चॅटफील्ड यांनीं आपलें मत दिलें खरें, पण याच पुस्तकांत, इ. स. १९०३ मध्यें सरकारनें नेमिलेल्या पुस्तकसमितीला पुष्कळ दोष आढळून आले. अद्यापपर्यंत उपयोगांत आलेल्या मेजर कँडी यांच्या क्रमिक वाचन पुस्तकांबद्दल या समितीनें आपलें मत देतांना असें नमूद केलें आहे :—

" They were the direct successors, if not the immediate descendants, of the scanty set of books on which the earliest framework of vernacular education was raised. Their compilation marked the triumph . . . of the vernacular ideal in primary instruction over that of the ' Anglicists' of whom the extremer section at least had cherished the hope of making English the universal language throughout India."[१२]

वरील शब्दांत मेजर कँडी यांच्या क्रमिक पुस्तकांवर आपलें मत देऊन समिति म्हणते कीं जातांयेतां नैतिक पाठ देण्याचें ध्येय समोर ठेविल्यामुळें या सर्व पुस्तकांत ओढाताण व कृत्रिमता आली आहे. थोडक्यांत हीं पुस्तकें म्हणजे ' Educational Scriptures ' होत, असें या समितीचें मत पडलें.

कँडीनिर्मित शालेय क्रमिक वाचन पुस्तकांबरोबर इतर विषयांवरील पुस्तकांचीहि तपासणी करून या समितीनें आपलीं मतें व्यक्त केलीं. गणिताशिवाय इतर सर्व विषयांच्या पुस्तकांत फक्त एक वर्ष पुरेल इतकाच मजकूर असावा, प्रत्येक विद्यार्थ्याला आपापल्या जिल्ह्याची माहिती असणें आवश्यक असल्यामुळें जिल्हावार भूगोलाचीं पुस्तकें तयार करवून घ्यावीं, इतिहासाच्या पुस्तकांत हिंदी विद्यार्थ्यांच्या पचनीं पडेल अशाप्रकारें हिंदी दृष्टि ठेवून इतिहासाचीं पाठ्यपुस्तकें असावीं, तसेंच प्रांताप्रांताचा इतिहास लिहिण्यापेक्षां कालखंडावर आधारलेलीं इतिहास विषयावर पुस्तकें लिहून घ्यावीं, इत्यादि सूचना या समितीनें दिल्या. त्याप्रमाणें पुढील शालेय पुस्तकें रचिलीं गेलीं. वरील समितीनें आणखी एक महत्त्वाची सूचना दिली होती कीं अद्यापपर्यंतचीं बहुतेक शालेय पुस्तकें शिक्षक नसलेल्या लोकांनीं

---

१२ *Vernacular Reading Books in the Bombay Presidency*, 1906, p.23.

लिहिलेलीं असल्यामुळें मुलांच्या अडचणींकडे त्यांचें दुर्लक्ष झालें होतें. जरी मेजर कॅंडी यांनीं भाषेच्या दृष्टीनें त्यांत एकसूत्रता आणिली होती तरी इतर बाबतींत तीं मुलांच्या आवाक्याबाहेरचीं होतीं. म्हणूनच यापुढें तीं शिक्षकांकडून तयार करवून घ्यावीं. याशिवाय एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं येथील शिक्षण क्षेत्रांत पाश्चात्य शिक्षण पद्धतीचें अनुकरण होत असल्यामुळें त्याला अनुसरून शालेय पाठ्यपुस्तकांच्या रचनेंत बदल होणें आवश्यक असल्याचें या समितीला वाटत होतें. उदाहरणार्थ, अद्यापपर्यंत मुलानें पुष्कळशा गोष्टी पाठ कराव्याच्या अशी पद्धति होती. त्यामुळें शालेय पुस्तकांत, विशेषतः व्याकरणावरील पुस्तकांत, सूत्रबद्ध व्याख्या दिलेल्या असत व त्या मुलांनीं न समजतांसुद्धां पाठ कराव्याच्या असा परिपाठ होता. यापुढें शिक्षण क्षेत्रांतील नवीन विचारांप्रमाणें हा पाठांतराचा मार्ग बदलण्यासाठीं, पूर्वीचीं प्रश्नोत्तर रूपानें लिहिलेलीं शालेय पुस्तकें काढून त्याऐवजीं विवरणात्मक पद्धतीनें तीं लिहावयाचीं असाहि एक निर्णय या समितीनें घेतला. या निर्णयानुसार यापुढील पुस्तकांत प्रश्नोत्तरपद्धतीला फांटा दिलेला आढळतो.

शालेय पुस्तकें व त्यांची भाषा

एकंदरींत शिक्षणक्षेत्रांत होणाऱ्या फेरबदलांनुसार शालेय पुस्तकांच्या रचनापद्धतींत व विषयवर्णनांत बदल होत गेले. हे बदल होत असतांना मेजर कॅंडी यांनीं घालून दिलेल्या व्याकरणविषयक नियमांचें उल्लंघन होत नाहीं एवढें मात्र पाहिलें जाई. शालेय पुस्तकांच्या द्वारा कांहीं भाषाविषयक बदल घडवून आणण्याच्या दृष्टीनें लेखनपद्धति उच्चारानुसारी करावी असे प्रयत्न एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं झाले. हे प्रयत्न करणाऱ्यांमध्यें पुस्तक समितीचे एक सदस्य काशीनाथ नारायण साने हे एक होते. त्यांनीं रामचंद्र परशुराम गोडबोले व शंकर रामचंद्र हातवळणे यांच्या साहाय्यानें केलेल्या सूचना 'मराठी भाषेची लेखन पद्धति' (इ. स. १९००) नामक पुस्तकांत पहावयास मिळतात.

महाराष्ट्रांत इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर गेल्या शतकांत ज्या शिक्षणविषयक घडामोडी झाल्या, त्यांवर शालेय पुस्तकें व त्यांची भाषिक कामगिरी अवलंबून असल्यामुळें, शालेय पुस्तकांचा इतिहास जाणून घेणें क्रमप्राप्त आहे. प्रत्यक्ष सरकारी प्रयत्नांखेरीज निमसरकारी व बिनसरकारी अशा कांही संस्थांमार्फतहि एकोणिसाव्या शतकांत शालेय वाङ्मयांत भर पडली आहे. अशा संस्थांचें कार्य पुढील प्रकरणांत वर्णिलें आहे.

———

प्रकरण सहावें

शालेय पुस्तकें निर्माण करणाऱ्या इतर संस्था

दक्षिणा प्राइझ् कमिटी

पेशवाईमध्यें ब्राह्मणांना दक्षिणा वाटण्याची प्रथा अनेक वर्षांपासून चालू होती. जोंपर्यंत हें दान सत्पात्रीं होत होतें तोंपर्यंत ठीक होतें; परंतु पेशवाईच्या शेवटच्या काळांत या चालीचा दुरुपयोग होऊं लागला. ज्या ब्राह्मणाला दक्षिणा द्यावयाची त्याचा अभ्यास, विद्याव्यासंग इकडे मुळींच लक्ष दिलें जात नव्हतें. सरकारी तिजोरींतून लाखों रुपयांचा अपव्यय होत होता. पेशवाईच्या अंतानंतर ही परिस्थिति बदलली. इंग्रजांच्या हातीं सत्ता आल्यावर, या पैशाचा सदुपयोग व्हावा म्हणून, चीफ् कमिशनर चॅपलीन याच्या शिफारशीवरून इ. स. १८२१ मध्यें पुण्याला एक पाठशाळा स्थापन झाली. या पाठशाळेमध्यें संस्कृत भाषेचा पद्धतशीर अभ्यास होऊं लागला. या पाठशाळेचा इतिहास मागें देण्यांत आलाच आहे. कांहीं वर्षांनंतर, केवळ संस्कृत भाषेच्या अभ्यासावर एवढा पैसा खर्च व्हावा हें इष्ट नव्हे या गोष्टीची जाणीव लोकहितवादीसारख्या दूरदृष्टि एतद्देशीय गृहस्थानें सरकारला करून दिली. त्यामुळें सरकारनें एक नवीनच मार्ग शोधून काढला. दक्षिणेच्या पैशांमधून परभाषेंतील, विशेषतः इंग्रजीमधील चांगल्या ग्रंथांचीं मराठी भाषांतरें करवून घ्यावयाचीं व चांगल्या भाषांतरकारांना योग्य बक्षिसें द्यावयाचीं, या कल्पनेनें इ. स. १८५१ मध्यें 'दक्षिणा प्रैझ कमिटी' स्थापन झाली. या संस्थेच्या निर्मितीमध्यें लोकहितवादी यांचा वाटा किती होता तें खालील उताऱ्यावरून दिसून येईलः—

"असा ठराव होण्यास कारण राव बहादूर गोपाळ हरी देशमुख यांची खटपट मुख्य होती. त्यानी यावेळीं मराठी व इंग्लिश वर्तमानपत्रांतून याविषयीं वारंवार लिहून लोकांचे व सरकारचे डोळे उघडले; व कित्येक सुधारलेल्या गृहस्थांच्या सह्या घेऊन सरकारास एक अर्जीही दिली. यामुळें पुण्यांतील ब्राह्मणानी त्यावर ग्रामण्य केलें, तथापि त्या गृहस्थानीं ह्या कामाचा पिच्छा सोडला नाहीं." [1]

---

(१) नारायण विष्णु जोशी, **पुणें शहरचें वर्णन**. १८६८. पृ. ८४.

या कमिटीच्या प्रोत्साहनानें मराठी भाषेंत पुष्कळ उपयुक्त ग्रंथांची भर पडली. कमिटीचें कामकाज पहिल्यानें फार उत्साहानें चाललें. पहिल्या पांच वर्षांच्या कामाचा जो आढावा सरकारी दप्तरांत पहावयास मिळतो तो असा आहेः—

	कमिटीकडे आलेलीं पुस्तकें.	कमिटीनें मान्य केलेलीं पुस्तकें.
१८५१	१७	११
१८५२	६६	२४
१८५३	४	३
१८५४	५	४
१८५५	७	४
	९९	४६ [२]

यावरून पहिल्या पांच वर्षांत कमिटीकडे ९९ पुस्तकें आलीं व त्यांतील ४६ पुस्तकांना तिनें मान्यता दिली, असें स्पष्ट होतें. पहिल्याच वर्षी उदयोन्मुख व यशस्वी भाषांतरकारांना समारंभपूर्वक बक्षिसें वांटलीं गेलीं. बक्षिसांची रक्कम शंभर ते दोनशें रुपयेपर्यंत होती. बक्षिसें मिळविलेल्या लेखकांचीं व त्यांच्या ग्रंथांचीं नांवें व बक्षिसाची रक्कम अशी होतीः—

१) संक्षेप इतिहास —हरी रघुनाथ गाडगीळ. २०० रु.
२) व्यवहार दर्पण—शंकर शास्त्री गोखले. १५० ,,
३) इराणाचा प्राचीन बादशाहा—विष्णु मोरेश्वर भिडे. १५० ,,
४) साक्रेटीसाचें चरित्र—कृष्णशास्त्री चिपळूणकर १५० ,,
५) सीझरचें चरित्र—भाऊशास्त्री पेटकर. १५० ,,
६) शब्दालंकार—कृष्णशास्त्री राजवाडे. १०० ,,
७) क्यपटन् कुकचें चरित्र—गणेश सदाशिव लेले. १०० ,,
८) त्रिकोणमिती—गंगाधर रामचंद्र टिळक १०० ,,
९) बेंजामीन फ्रांक्लीनाचा वृत्तांत—रामचंद्र गोविंद करंदीकर १०० ,,
१०) रेखागणित—रामकृष्ण विनायक मोडक. १०० ,,

या यादीवरून कमिटी दक्षिणेच्या पैशाचा कसा उपयोग करीत असे याची [३] कल्पना होते. उपयुक्त ग्रंथ प्रकाशनाच्या कामीं होणारा खर्च हें एक धर्मकार्य आहे असें लोकहितवादी सारख्यांना वाटत होतें. पत्रांक ९३ मध्यें ते लिहितात कीं, वेडा-वांकडा दानधर्म करणें हा खरा धर्म नव्हे. तरः—

२ *D. P. I. Government, Vol. 6.* 1856. p. 142.
३ **ज्ञानोदय,** १५ नोव्हेंबर, १८५१. पृ. ३४७.

"ग्रंथ छापणारे यांस पैसा द्यावा हें सर्वांपेक्षां उत्तम आहे. व या देशांत तर अति उत्कृष्ट हाच धर्म आहे. हें मूर्खांस शहाणें करण्याचें काम आहे. म्हणून हाच धर्म सर्वांहून श्रेष्ठ आहे." ४

या उदात्त हेतूनें प्रेरित होऊन जरी कमिटीनें आपल्या कार्याला प्रारंभ केला, तरी पहिल्या दोन वर्षांमध्यें दिसलेला उत्साह पुढें टिकला नाहीं. म्हणूनच कमिटीचे सदस्य गोपाळ हरी देशमुख यांनीं कमिटीला कामाची दिशा दाखविण्याच्या दृष्टीनें कांहीं महत्वाच्या सूचना दिल्या. ५ ग्रंथ-निर्मितीच्या या श्रेष्ठ कार्याकडे पुष्कळांचें लक्ष वेधलें होतें. कमिटीचें काम दिरंगाईनें चाललें असल्याबद्दल 'प्रभाकर' कर्त्यांनीं तिला दोष दिला. 'प्रभाकर' मध्यें यासंबंधीं आलेल्या मजकुराचा तर्जुमा 'बॉम्बे टाइम्स'मध्यें खालील शब्दांत दिलेला आढळतो—

"I understand that the business of the Dakshna Committee of correcting and examining the works newly prepared is carried on at a very slow pace. Out of the seventy works newly prepared, only one has just been examined and approved of, at this rate years and years will roll on before all the works will have undergone the required process. I therefore hope that, a Native possessed of good talents and of an impartial disposition may very soon be appointed." ६

वरील सूचनेमधील, परकी माणसापेक्षां एकाद्या एतद्देशीय मराठी भाषा तज्ज्ञाची नेमणूक करण्याबद्दलचा 'प्रभाकर' कर्त्यांचा रोख मेजर कँडी यांच्या विरुद्ध होता, हें स्पष्ट आहे; कारण मेजर कँडी यांचा या कमिटीच्या कार्याशीं जवळचा संबंध होता, इतकेंच नव्हे तर अनेक वर्षे ते दक्षिणा प्राइझ कमिटीचे अध्यक्षहि होते.

लोकहितवादी अगर भाऊ महाजन यांच्याप्रमाणें 'ज्ञानोदय' कारांनींसुद्धां कमिटीला तिच्या कामाबद्दल कांहीं सूचना दिल्या होत्या. ७

दक्षिणा प्राइझ् कमिटीच्या मार्फत तयार झालेल्या पुस्तकांत कांहीं शालेय पुस्तकें असल्यामुळें तिच्या कार्याचा आढावा घेणें आवश्यक आहे. नवीन भाषांतरित पुस्तकांचे सर्वाधिकार विकत घेऊन कमिटी तीं पुस्तकें छापीत असे. यामागील हेतु असा होता कीं मराठी भाषेंतींल या पुस्तकांची लेखनपद्धति, वाक्यरचना, व्याकरणशुद्ध भाषा यांबद्दल आपले विचार अमलांत आणतां यावेत. यासाठीं कमिटी नवोदित लेखकांना

---

४ गोपाळ हरी देशमुख, **निबंध संग्रह (प्रथमांश)**, १८६६. पृ. ४५४.

५ *D. P. I. Government, Vol.* 6. 1856. pp. 142–170.

६ *The Bombay Times and Journal of Commerce, Vol.* 3 Oct. 6, 1852. p. 1001.

७ **ज्ञानोदय**, १५ जुलई, १८५४ पृ. २२२.

मार्गदर्शन करीत असे. उदाहरणार्थः-

"Translations from English into Marathi, if literal are almost certain to be rejected. The idiom of Marathi is so exceedingly unlike that of English that adaptations are far more desirable than mere translations.

"Style must be carefully attended to . . . It must be thoroughly grammatical and idiomatical. The Committee hope to receive works written not only with purity but with elegance." [८]

कमिटीचे भाषाविषयक विचार अनिर्बंधपणें अमलांत येणें अशक्य होतें; मेजर कँडी यांच्या नजरेखालून हीं पुस्तकें जाणें आवश्यक होतें व त्यांचे विचार कमिटीच्या विचारांशीं नेहमींच जुळणें कठीण होतें. कांहीं काळ मेजर कँडी हे कमिटीचे अध्यक्ष होते व त्यांच्या जोडीला डॉ. हॉग, रे. मरे मिचेल इत्यादि परभाषी लोक कमिटीमध्यें होते. पुढें इ. स. १८६० मध्यें तर दक्षिणा प्राइझ कमिटीनें स्वतंत्ररीत्या काम न करतां सर्व व्यवहार डी. पी. आय. मार्फत चालावे असें ठरलें व लगेच कमिटीचें काम मेजर कँडीच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं सुरू झालें. इ. स. १८६२ मध्यें दक्षिणा प्राईझ् कमिटीच्या वतीनें मेजर कँडी व रे. मरे मिचेल या दोघांनीं कमिटीनें काय व कसें काम करावें त्याचें एक टांचण लिहिलें. त्यांत कमिटीनें शालेय पुस्तकें तयार करूं नयेत, सर्वसाधारण लोकांना उपयुक्त अशींच पुस्तकें तयार करावीं, विशेषतः इतिहास, चरित्र, प्रवास, काव्य, नाटक इत्यादि पुस्तकांसच कमिटीनें प्रोत्सनहि द्यावें अशा सूचना त्यांनीं कमिटीला दिल्या पुस्तकांच्या भाषेबद्दल ते लिहितात :—

"What can the Committee do to aid in the cultivation of the Marathi language? Although much has been done of late years, towards the fixing of the language, yet not a little remains still unaccomplished. There are unsettled questions as to the orthography, the dialectic variations, and the syntax of the language. Much remains to be done towards exhibiting the etymology of Marathi, its relation to Sancrit, to the Maharashtree of Vararuchi and to modern dialects such as Hindi, Guzarathi etc. On subjects of this kind it is desirable that the Committee should both give and invite contributions.

---

८ *D. P. I. Government, Vol 6.* 1856. p. 257.

It would be well to appoint corrosponding members both in and out of Poona who might aid in the discussions of such questions. The Committee might from time to time publish papers containing the results of their inquiries and discussions." [९]

मेजर कँडी व रे. मरे मिचेल यांनीं केलेल्या भाषाविषयक सूचना तत्कालीन डी. पी. आय. हॉवर्ड यांना मान्य झाल्या नाहींत. मे. कँडीनें मराठी भाषेला वळण लावण्याच्या प्रयत्नांत एतद्देशीयांना शक्यतों न दुखवितां आपलें काम साधलें; पण हावर्डनें आपल्या अधिकाराच्या जोरावर वरील सूचना फेंटाळून लावल्या. तो लिहितोः—

" I must discent from the suggestion that it is the duty of the Committee to extirpate differences of idiom and spelling by its authority or to attempt to fix the standard of the language. It seems to me premature to assume that we are in a position to stereotype the language, especially at a time when a multitude of new ideas is daily invading the native mind, suggesting the use of new words and new forms of expression.

" The only legitimate way of fixing a language (it seems to me) is to write a great and popular book which may become a permanent national possession, like the authorized version of the Bible in England." [१०]

हॉवर्डच्या या धोरणामुळें जेव्हां इ. स. १८६२–६३ सालचा आपल्या कामाचा अहवाल दक्षिणा प्राइझ कमिटीनें त्याच्याकडे पाठविला, तेव्हां त्यानें तो मान्य केला. पण एका मुद्यावर त्यानें आक्षेप घेतला. कमिटीनें मराठी भाषेच्या व्याकरणाबाबत अधिकारवाणीनें निर्णय देऊं नयेत असें त्यानें कमिटीला कळविलें. तो म्हणतोः—

" You are aware of my reluctance to allow the Committee to assume dictatorship over the growing vernacular language, but I should welcome the publication of occasional papers embodying the views, especially if unanimous, of the Committee, on points of Marathi scholarship. " [११]

कृष्णशास्त्री चिपळुणकर, नानाशास्त्री आपटे, भास्कर दामोदर पाळंदे, मोरोबा कान्होबा विजयकर यांच्यासारखे मराठी भाषातज्ज्ञ एतद्देशीय लोक दक्षिणा प्राइझ

---

९ *D. P. I. Duxina Fund. Vol. 15.* 1862–63. p. 113.

१० Ibid. pp. 116–117.

११ *Elphinstone School Paper, Vol 4,* August, 1863. p. 200.

कमिटींत असून सुद्धां डी. पी. आय. हॉवर्ड यानें कमिटीच्या सूचना अमान्य करणें म्हणजे आपल्या अधिकाराची प्रमाणाबाहेर जाणीव करून देण्यासारखें होतें; परंतु सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं. एतद्देशीय लोकांच्या हातीं मराठी भाषेची घडण तयार करण्याचें काम पूर्णपणें जाऊं नये म्हणूनच कीं काय इ. स. १८६४ मध्यें डॉ. हॉग, यानें, कमिटीचे सेक्रेटरी कृष्णशास्त्री चिपळुणकर यांच्याशीं न पटल्यामुळें, आपल्या सभासदत्त्वाचा राजिनामा दिला व याचवेळीं रे. मिचेल युरोपला गेला, तेव्हां मे. कॅंडी यांच्या सूचनेप्रमाणें कमिटीवर नवीन सभासद म्हणून रे. कॅसिडी व पुण्याच्या आर्मी स्कूलचा मुख्य जी. ए. जेकब असे दोन युरोपियन सभासद घेतले गेले.

अशाप्रकारें विद्याखात्यानें तयार केलेल्या व्याकरणाच्या चौकटींतच मराठी भाषा बसवून तिच्यांत एकसूत्रीपणा व सोपेपणा आणावयाचा हेतु हॉवर्ड याच्या मनांत असल्यामुळें दक्षिणा प्राइझ कमिटीच्या भाषाविषयक सूचना त्यानें स्वीकारल्या नाहींत. विशेषतः कमिटीशीं संबंध असलेल्या एतद्देशीयांपैकीं कांहीं शास्त्री होते व त्यांच्या हातीं मराठी भाषेचें भवितव्य देणें हॉवर्डला पसंत नसावें. या मुद्यावर तो लिहितोः—

"I believe that among almost all Brahmans there is a tendency to overlay and overwhelm the native Marathee twith the learned language, and that (in this connection), for one oriental Swift who knows the power of his mother-tongue, there are scores of oriental Johnsons who delight in a pedantic and stilted phraseology. This evil must be guarded against".१२

हॉवर्डच्या या विचारांचा परिणाम तत्कालीन शालेय पुस्तकांवर किती झाला याची चर्चा पुढें केली जाईल.

दक्षिणा प्राइझ कमिटीच्या इ. स. १८६६ च्या ठरावाप्रमाणें कमिटीमार्फत यापुढें शालोपयोगी मराठी पुस्तकें तयार करण्याचें काम बंद झालें. सर्वसाधारण सुबुद्ध वाचकांना उपयोगी होतील अशींच पुस्तकें छापण्याच्या या नवीन धोरणामुळें यानंतरच्या काळांत कमिटीनें शालेय पुस्तकांना प्रोत्साहन दिलें नाहीं. यावेळेपासूनां पुस्तकांसाठीं दरवर्षी फक्त बाराशें रुपये खर्च केले जात. कमिटीतर्फे छापल्या गेलेल्या पुस्तकांच्या याद्या प्रतिवर्षी प्रसिद्ध होणाऱ्या मुंबई प्रांताच्या शिक्षणविषयक अहवालांत पहावयास सांपडतात.

---

१२ *Report of the Director of Public Instruciion, Bombay* 1856-57 p. 474.

दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी

मराठी भाषेंत पुस्तकें तयार करून ज्ञानप्रसारकार्य करण्याच्या हेतूनें प्रेरित होऊन ही संस्था तारीख २२ मार्च, इ. स. १८४९ रोजीं मुंबईंत स्थापन झाली. ही संस्था स्थापन करण्यांत बडोद्याचे तत्कालीन रेसिडेंट, कर्नल टी. फ्रेंच व पेन्शन खात्याचें मुख्याधिकारी कॅप्टन हार्ट हे परकीय गृहस्थ प्रमुख होते. सुरुवातीला मंडळींमध्यें असलेल्या तेरा सभासदांपैकीं दहा जण युरोपियन होते. मुंबई सरकारचे चिटणीस विलोबी हे अध्यक्ष आणि हार्ट हे चिटणीस व खाजिनदार होते. 'तर्जमासंबंधी कमिटी' मध्यें मेजर कँडी, रे. स्टीव्हन्सन, डॉ. विल्सन इत्यादि परभाषी लोक होते. पहिल्या कांहीं महिन्यांत ९००० रुपये वर्गणी गोळा झाली व एक वर्षांत देणगी व वर्गणी मिळून सुमारें अकरा हजार रुपये जमले. देणगीदारांत गायकवाड व दाक्षिणेंतील कांहीं सरदार होते. या संस्थेची माहिती देतांना गोविंद नारायण माडगांवकर लिहितातः—

"(दाक्षिणी भाषेंत पुस्तकें करणारी मंडळी) या नांवाची एक सभा मुंबईंत १८४९ त स्थापित झाली. ही मोठी उपयोगी सभा उपस्थित करणारे मुख्य गृहस्थ कर्नल फ्रेंच (बडोद्याचे रेंसिडेंट) आणि कपतान हार्ट (पेन्शन खात्यावर मुक्तसर) हे दोघेही गृहस्थ एतद्देशीय लोकांवर फार प्रीति करीत. आमचे लोक सर्व गोष्टींत हुशार व्हावे अशी त्यांची निष्काम भक्ति होती. एतद्देशीय लोकांस ग्रंथ वाचायाचा जो तिरस्कार पडून गेला आहे तो दूर करायास त्यांच्या स्वभाषेंत अनेक विषयांवर मनोरंजक व ज्ञानोत्पादक असे ग्रंथ तयार करून द्यावे व अशा उपायांनीं त्यांमध्यें विद्येची अभिरुचि उत्पन्न झाली म्हणजे त्यांस इंग्रजी व दुसऱ्या विद्या संपादन करण्याचा व्यासंग लागेल असें त्यांचें म्हणणें होतें. हें लक्षांत आणून केवळ आम्हां-लोकांचेंच हित व्हावें म्हणून त्यांणीं पुष्कळ श्रम घेऊन ह्या कामास हात घातला. आणि संभावित लोकांस पत्रें पाठवून ह्या प्रकरणीं सभा भरली. हिचे सभासद गव्हर्नर देखील होते. तसेंच एतद्देशीय लोकांपैकीं मोठमोठाले गृहस्थ रामलाल, जगन्नाथ शंकरशेट, बंमनजी होरमस्जी वगैरे पुष्कळ गृहस्थ होते. समशेर बहादूर राजेसाहेब, गणपतराव गायकवाड हे सन १८४९ त येथें आले होते. त्यांणीं ह्या सभेस पांच हजार रुपये दिले. ह्या सभेचे अध्यक्ष नामदार विलबी साहेब कौन्सिलर हे होते. याप्रमाणें ह्या सभेचें स्तुत्य काम चालवायास मंडळीनें सुमारें २५००० रुपये जमाविले मग त्यांणीं तें द्रव्य व्याजास ठेवून त्या द्रव्याच्या व्याजापैकीं जें उत्पन्न होईल तें खर्चून दोन तीन कारभारी ठेविले आणि काम पडेल त्यावेळीं ऐन रकमेंतून द्रव्य काढून इंग्रजा भाषेंत जे चांगले ग्रंथ असतील त्यांचें सभासदांच्या अनुमतानें मराठी भाषेंत भषांतर करवून छापून तें ऐन किंमतीने लोकांस विकावें. आणि त्याजपासून जें द्रव्य

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें १.

सर्ग...

उत्पन्न होईल तें फिरून मुळच्या रकमेंत भरावें.'''याप्रमाणें त्यांनीं आजपर्यंत (१८६३ पर्यंत) दहावीस हजार रुपये खर्च करुन आठदहा ग्रंथ चांगले तयार करुन छापिले." [१३]

या मंडळीच्या पहिल्या समेंत (1) Elphinstone's History of India (2) The Pictorial Museum of Animated Nature in 27 parts, (3) Natural Phenomena with Pictorial Illustrations अशा तीन पुस्तकांचीं मराठींत भाषांतरें करावयाचें ठरलें; परंतु मंडळीला एका वर्षांत असा अनुभव आला कीं, इंग्रजी शिकलेले एतद्देशीय लोक पुष्कळ असूनसुद्धां मातृभाषेंत तर्जुमे करण्याला ते असमर्थ होते. एका वर्षांत झालेल्या कामाचा आढावा घेऊन पुढील काळासाठीं जो कार्यक्रम आंखला तो असा होता :—

"काळे लोकांच्या १८ व्या पलटणींतील कप्तान मॅकडोनल्ड साहेब यानीं बर्ड साहेबांनीं केलेला गुजराथेचा इतिहास त्याचा तर्जुमा बहुतेक संपविला आहे तो तयार झाल्यानंतर घेऊन कमेटी छापविणार आहे; तेच साहेब, कित्येक लोकप्रसिद्ध व जुन्या गुप्त लेखांवरून नाना फडणवीस यांचें चरित्र मराठी भाषेंत रचित आहेत. या कारभाऱ्याच्या अस्सल तसबिरीची नकल 'फ्रियर' साहेबांनीं मिळविली आहे. ती शिळाछापावर छापवून त्या ग्रंथास जोडिली असतां त्याचें मोल निखालस वाढेल.

"पश्चिम हिंदुस्थानांतील आबालवृद्धांस ज्यांची नांवें माहित आहेत अशा कीर्तिमान पुरुषांच्या (जन्मापासून हकीगती) हा ग्रंथ परंपरागत आलेल्या, व हल्लीं प्रसिद्धीत अशा आधारावरून रचावयाचा; या कीर्तिमान् मनुष्यांत खालीं लिहिलेल्या मनुष्यांची गणना असावी. शिवाजी, नाना फडनवीस, माहादजी शिंदे, अहिल्याबाई, येशवंतराव होळकर, बाळाजी बाजीराव इत्यादि.

"पश्चिम हिंदुस्थानांतिल मुख्य शहरांचीं इतिहासरूप वर्णनें; जसें पुणें, सातारा, बडोदें, कोल्हापूर इत्यादि.

"करनल् स्लीमनसाहेब, याच्या ग्रंथांतील ठक लोकांचा वृत्तांत, आणि त्यांच्या नाशार्थ सरकारनें जे जे उपाय योजले ते; व तसेंच, मुलें चोरून नेणें व तें बंद करण्याकरितां सरकारचे उपाय हीं दोन्हीं मिळोन तिसरा ग्रंथ.

"बरनीयर साहेबाची पर्यटण नामक जो ग्रंथ आहे त्याचा सारांश व हिंदुस्थानाविषयीं बखरी लिहिणारे नामें जो ग्रंथ त्यास सर एच. इलिअट साहेबांनीं लिहिलेली प्रस्तावना; हीं दोन मिळोन चवथा ग्रंथ. या ग्रंथावरून मुसलमान लोकांच्या. अमलांत हिंदुस्थानची कशी दशा होती याविषयीं सांप्रतचे लोकांस पुतें ज्ञान होईल.

---

१३ गोविंद नारायण माडगांवकर, **मुंबईचें वर्णन**. १८६३. पृ. २९१-२९२

"हिंदी उत्तम नाटकांतून घेतलेल्या स्तुतिपर गोष्टी ज्यांत भलते देवाचें वर्णन नाहीं। हा पांचवा ग्रंथ.

"इतिहास सौंदर्य नामक ग्रंथांतील कांहीं अंश व जलपर्यटणें व भूपर्यटणें या दोहोंतील कांहीं अंश मिळोन साहावा ग्रंथ." [१४]

अशा प्रकारें कामाची आंखणी करून दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या या मंडळीनें 'गुजराथचा इतिहास' (१८५०), 'नाना फडणवीस यांची बखर' (१८५२), 'देशव्यवहार व्यवस्था' (१८५४), 'शास्त्रीय ज्ञानदर्शन' (१८५६) इत्यादि पुस्तकें तयार करवून प्रसिद्ध केलीं. जरी हीं सर्व पुस्तकें शाळांच्या अभ्यासक्रमांत अंतर्भूत झालेलीं नव्हतीं तरी तीं विद्यार्थ्याच्या ज्ञानांत भर पाडणारीं होतीं. म्हणून ही मंडळी तिनें छापलेलीं पुस्तकें यांची नोंद करणें अगत्याचें वाटतें.

यावेळीं ग्रंथलेखनाचें काम मुख्यतः भाषांतर स्वरूपाचें होतें. भाषांतरकार मूळ ग्रंथावरून आपण केलेल्या भाषांतराची अथवा रचलेल्या नव्या मूळ ग्रंथाचीं दहा पानें नमुन्यादाखल मंडळीकडे पाठवीत असे व तिला जर तीं आवडलीं तर लेखनाचा उद्योग पुढें चालविण्याची शिफारस लेखकाला केली जाई. "ग्रंथाची भाषा संप्रदायाल धरून असावी, आंतील लेखानें वाचकाच्या मनाचें रंजन व्हावें, त्यास बोधप्राप्ति व्हावी, कांहीं व्यवहारज्ञान मिळावें; सारांश त्या पुस्तकास लोकांकडून मागणी यावी असें त्याचें अंतरंग सुंदर असावें," [१५] अशा अटी मंडळी घालीत असे.

या मंडळीच्याद्वारा भाषांतरित होणाऱ्या पुस्तकांच्या भाषेंत एकसूत्रीपणा असावा या हेतूनें मेजर कँडी यांना कांहीं नियम तयार करून देण्याबद्दल मंडळीनें विनंति केली. यावेळीं कॅ. हार्ट हे या मंडळीचे चिटणीस होते. इ. स. १८४७ मध्यें मे. कँडी यांची मुंबईच्या शिक्षामंडळीनें मराठी ट्रान्स्लेटर म्हणून नेमणूक केल्यावर प्रसिद्ध होणाऱ्या सर्व पुस्तकांची भाषिक तपासणी करण्याचें काम त्यांच्याकडे आलें होतें. शिवाय उपयुक्त इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें करण्याचें व करवून घेण्याचेंसुद्धां त्यांनीं अंगवार घेतलें होतें. यासाठीं आदर्श भाषांतर कसें असावें याबद्दलचे कांहीं नियम तयार करावयास शिक्षामंडळीनें त्यांस सांगितलें होतें. तेव्हां मुंबईची शिक्षामंडळी व दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी या दोनहि संस्थांसाठीं मेजर कँडी यांनीं भाषांतराचे नियम बनविले. इ. स. १८५० मध्यें मे. कँडी हेच खुद्द मंडळीचे सेक्रेटरी होते व हे नियम त्यांनीं रे. स्टीव्हेनसन व रे. विल्सन या मिशनरी मराठी

---

१४ **ज्ञानोदय,** १६ सेप्टेंबर, १८५०. पृ. ३३२.

१५ गणेश रामकृष्ण हवालदार, **रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक यांचें चरित्र, भाग १ ला.** १९२७. पृ. ३३०.

तज्ज्ञांना दाखवून त्यांच्या सल्ल्यानें निश्चित केले होते.[१६] हा सर्व इतिहास या ठिकाणीं देण्याचें कारण इतकेंच कीं जरी ही मंडळी बिनसरकारी होती, तरी तिनें प्रसिद्ध केलेल्या सर्व पुस्तकांवर भाषिक हुकमत सरकारी म्हणजेच मेजर कॅंडी यांची होती. मंडळीला उद्देशून आदर्श भाषांतर कसें असावें याबद्दल 'ज्ञानोदया' मध्येंहि यावेळीं बरीच चर्चा झालेली आढळते.[१७]

या मंडळीनें इंग्रजी पुस्तकांवरून मराठीमध्यें भाषांतरें तयार करण्याच्या कामाला सुरुवात धडाडीनें केली खरी, पण पहिल्या दोन तीन वर्षांनंतर इ. स. १८६० पर्यंत तिच्या हातून विशेष काम झालें नाहीं. पुन्हां इ. स. १८६० मध्यें फ्लिन नांवाच्या गृहस्थानें प्रयत्न केला. पुढील दोन वर्षांत दहाबारा पुस्तकें छापलीं गेलीं, परंतु पुस्तकांची निवड योग्य झाली नाहीं व लोकप्रिय विषयांवरील तीं पुस्तकें नसल्यामुळें त्यांचा खप होऊं शकला नाहीं. पैसे मात्र गुंतून राहिले. थोडक्यांत मंडळीचा दुसरा प्रयत्नहि तेवढासा यशस्वी झाला नाहीं. पुढें पुन्हां एकदां तारीख ९ जुलै, १८८४ रोजीं कांहीं मंडळी जमली व या संस्थेचा जीर्णोद्धार करण्याचें ठरलें या प्रयत्नांत न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, तत्कालीन डी. पी. आय. चॅट्फील्ड इत्यादि लोकांचा हात होता. यावेळीं मंडळीच्या हातीं रोख चार हजार रुपये व दर-साल पंधराशें रुपये व्याज मिळूं शकेल इतकी रक्कम होती. या पुनरुज्जीवनाच्या प्रसंगीं 'इंदुप्रकाश'कार म्हणतातः—

"The objects of the Society require a few words of explanation. It is undisputed that Marathi literature is at present very meagre, and that to enrich it, translation from foreign languages is the best and readiest resource. Translation has been the means of improvement of almost every modern European language. The history of the German language affords the most modern and the most striking illustration of the efficacy of translation as an instrument in language-making. What the French was to the Germans, so let English be to us. In the language of our rulers we have a literature as rich as any language in the world ever possessed, and to quote what professor Wordsworth wrote in 1870, 'cultivated minds can only be formed when they have studied a language brought to perfection.' If we

---

१६ *D.P. I. Board of Education, Poona Sanskrit College,* 1850. p. 163.

१७ **ज्ञानोदय**, १६ सेप्टेंबर, १८५०. पृ. ३३५.

would transplant the treasures of English literature to our mother-tongue, the effect will assuredly be magical. How far vernacular literature is capable of development under the present circumstances is a more difficult question to answer. But assuming the development to be desirable and possible translation is the surest and easiest mode of achieving that object." १८

उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर, भाषांतरित वाङ्मयनिर्मितीची लाट पसरली होती असें तत्कालीन वाङ्मयाचा अभ्यास करतांना दिसून येतें. वर उल्लेखिलेल्या दोन संस्थांखेरीज, तारीख १ सप्टेंबर, १८४८ रोजीं स्थापन झालेली 'उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा' ही तिसरी संस्था होय. मुंबईतील एल्फिन्स्टन विद्यालयांत ही सभा स्थापन झाली. याच वर्षी इंग्रजी विद्या संपादन केलेल्या कांहीं मुंबापुरस्थ एतद्देशीय तरुणांनीं 'स्टुडंट्स् लिटररी अँड सायंटिफिक् सोसायटी' या नांवाची एक संस्था सुरू केली होती; 'उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा' ही या संस्थेचीच एक शाखा होती. या सभेचे पहिले अध्यक्ष दादोबा पांडुरंग हे होते व चिटणीसाचें काम महादेवशास्त्री कोल्हटकर यांच्याकडे होतें. या सभेच्या वतीनें एलफिन्स्टन विद्यालयांत दरमहा दोन सभा होत असत व तेथें व्याख्यानें व निबंध वाचन हा कार्यक्रम असे. या मागील हेतु असा होता कीं, प्रत्येकाला स्वभाषेमध्यें शुद्ध रीतीनें लिहावयास यावें व स्वदेशामध्यें उपयुक्त ज्ञानाचा प्रसार व्हावा. या सभेंत झालेलीं व्याख्यानें अगर वाचलेले निबंध 'मराठी ज्ञानप्रसारक' नांवाच्या मासिकामधून प्रसिद्ध होत.

या मासिकाची उपयुक्तता मुंबईच्या शिक्षामंडळीला इतकी पटली कीं 'ज्ञानप्रसारका'च्या प्रथम पन्नास व नंतर एकशें चौविस प्रति घेऊन त्या निरनिराळ्या शाळांमधून पाठविल्या जात. 'ज्ञानप्रसारक' आणि सरकारी विद्याखातें यांचे संबंध जरी इतक्या सलोख्याचे होते, तरी त्या दोघांमध्यें मराठी भाषेच्या व्याकरणविषयक कांहीं प्रश्नांवर फडाक्याचा वादविवाद झाला व तो पुस्तकरूपानें इ. स. १८५८ मध्यें प्रसिद्ध झाला. या वादाविवादांतून प्रत्यक्ष निश्चितपणें कांहीं बाहेर पडलें नाहीं; तथापि मराठी भाषेच्या घटनेंत सरकारी विद्याखातें म्हणजेच मेजर कँडी यांचा किती प्रामुख्यानें हात होता तें दिसतें. तसेंच तत्कालीन मराठी लेखक, विशेषतः गोविंद नारायण माडगांवकर, दादोबा पांडुरंग तर्खडकर वगैरे मंडळीनीं मे. कँडी यांच्या

१८ **इंदुप्रकाश**, पु. २३. १४ जुलै, १८८४.

भाषाविषयक धोरणाला कसा कसून विरोध केला त्याची कल्पना येते. या वादाचा समग्र इतिहास व त्यांतून निघणारे मराठी भाषेच्या व्याकरणांतील कांहीं मुद्दे यांचा विचार पुढें केला जाईल. याठिकाणीं 'ज्ञान प्रसारका' बद्दल धोरण काय होतें तें समजण्यासाठीं मे. कँडी यांचें मत देणें जरूर आहे. 'ज्ञान प्रसारका' सारख्या शालोपयोगी मासिकांची भाषिक तपासणी करतांना मे. कँडी लिहितात :—

"I feel it my duty to report that judging from the specimens before me, I consider . . . The Dnyan Prasarak . . . to lie open to objection on the ground of bad style, violations of grammar and idiom, and solecisms of various kinds . . .

"It is with great reluctance that I express myself, for I apprehend that if my opinion be made known to the proprietors and conductors of these periodicals, I shall incur great odium and shall probably be assailed by numerous writers in the vernacular newspapers. This was my experience a few years back, when criticisms of mine offended the amour propre of some sciolists and would-be authors. (हा उल्लेख 'प्रभाकर' कर्ते भाऊ महाजन यांच्याबद्दल असावा.) But as I am required to report on these periodicals, a sense of duty compels me to make you cognizant at least of the state of the case." १९

'स्टुडंट्स् लिटररी अँड सायंटिफिक् सोसायटी'च्या 'उपयुक्त ज्ञानप्रसारक सभे' च्या वतीनें निघणाऱ्या 'ज्ञानप्रसारक' मासिकाच्या भाषिक व वाङ्मयीन हालचालींकडे मेजर कँडी यांची किती बारकाइनें नजर होती त्याची कल्पना वरील उताऱ्यावरून होण्यासारखी आहे. या सोसायटीतर्फे चालणाऱ्या मुलींच्या शाळांसाठीं सोसायटीनें 'ज्ञानबोधक' नांवाचीं मराठी क्रमिक पुस्तकेंहि तयार केलीं होतीं. त्यांतील पहिल्या पुस्तकावर ('ज्ञानोदय' कारांनीं त्याच्या सदोष रचनेवर) टीका केली. सोसायटीनें त्यांना दिलेल्या उत्तरांत म्हटलें आहे :—

"The object of the little book is to supply for Indian schools a series of short and easy sentences, written not merely for the purpose of exercising the tongue in pronunciation and reading, but also with a view to convey to the mind such pleasing, instructive, and above all definite ideas, as the child may without efforts retain." २०

---

१९ *D. P. I. Miscellaneous, Vol 32.* 1858, pp. 108–109.

२० *Students' Miscellany, Vol.* 1. April 1851. p. 16.

'मुलांस बोध करण्यासाठीं चार पुस्तकें क्रमे करून काढूं, आणि त्यांजबरोबर एक पांचवें पुस्तक शिक्षकांकरितां काढूं' असें अभिवचन 'ज्ञानबोधक' या क्रमिक वाचन मालेच्या पुस्तकांत सोसायटीनें दिलेलें आढळतें. परंतु प्रत्यक्षांत हीं सर्व पुस्तकें तयार झाल्याचें दिसत नाहीं.

शालेय पुस्तकें तयार करण्याच्या बाबतींत झालेल्या संघटित प्रयत्नांची कल्पना वर उल्लेखिलेल्या दक्षिणा प्राइझ कमिटी, दक्षिणी भाषेंत पुस्तकें करणारी मंडळी, उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा इत्यादि संस्थांनीं केलेल्या कार्यावरून होण्यासारखी आहे. याशिवाय वैयक्तिकरीत्याहि कांहीं प्रयत्न झालेले आढळतात; परंतु हीं पुस्तकें तपासण्याचें कांम मेजर कँडी यांच्याकडून होत असल्यामुळें त्यांत व सरकारी शालेय पुस्तकांत लेखनपद्धति, वाक्यरचना, प्रयोग वगैरे बाबतींत फारशी तफावत दिसत नाहीं.

एकंदरींत एकोणिसाव्या शतकांत शालेय पुस्तकांच्याद्वारा मराठी भाषेच्या घडणींत जे फेरफार झाले व भाषेला कांहींसा एकसूत्रीपणा आला तो जाणून घेण्यासाठीं शालेय पुस्तकांचा व शिक्षणविषयक घडामोडींचा इतिहास पहावा लागला. या पार्श्वभूमीवर शालेय पुस्तकें विषयवारीनें तपासून त्यांची भाषिक घडण समजावून घेणें सुलभ होईल.

८०९२

—:×:—

प्रकरण सातवें

मराठी भाषेचीं व्याकरणें

मराठी भाषेचीं मराठी भाषेंतील जुनीं व्याकरणें

महाराष्ट्रांत इंग्रजी अंमल सुरू होईपर्यंत मराठी भाषेच्या व्याकरणाचा सशास्त्र अभ्यास विशेष असा झाला नाहीं; आणि जो झाला तो, धर्मप्रसारार्थ कांहीं खिस्ती धर्मोपदेशकांच्या हातून झाला. त्यासाठीं मराठी भाषेचीं इंग्रजीमधून कांहीं व्याकरण पुस्तकें तयार झालीं. तसेंच परदेशस्थ सनदी नोकरांना एतद्देशीय भाषांचा अभ्यास करणें आवश्यक झाल्यामुळेंहि कांहीं व्याकरणग्रंथ लिहिले गेले. मराठी भाषेचा एक व्याकरणकार फादर स्टीफन्स याच्या मराठी बोलीच्या व्याकरणग्रंथाचा उल्लेख मागें आलाच आहे. त्याच्यापूर्वी एतद्देशीयां साठीं एतद्देशीयांकडून झालेले मराठी भाषेच्या व्याकरणग्रंथनिर्मितीचे प्रयत्न म्हणजे महानुभावांचें 'पंचवार्तिक' व समर्थशिष्य गिरिधर स्वामीकृत 'व्याकर्ण' हे होत. मराठी भाषेच्या व्याकरणरचनेच्या एका जुन्या प्रयत्नाची कल्पना यावी म्हणून गिरिधरस्वामीच्या 'व्याकर्णा' मधील कांहीं भाग येथें दिला आहे :—

अ ई उ ऋ ऌ समाना ऱ्हस्वदीर्घाल्पुताानि
प्रथमद्वितियमात्रा त्रैर्धकं व्यंजनानी
स्वरितसमउदात्तें उंचनिंचोनुदात्तें
ए ऐ ओ औ क्षरसंधी ऱ्हस्व नाहिंच त्यातें ॥ १२ ॥ [1]

यानंतर कालानुक्रमानें इंग्रजीमधून लिहिलेल्या मराठी भाषेच्या व्याकरणांचा प्रथम तपासणी करून, पुढें मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तकमंडळी-शिक्षामंडळी, सरकारी विद्याखातें यांच्यातर्फे शाळांतील मुलांसाठीं तयार झालेल्या मराठी भाषेच्या व्याकरणावरील पुस्तकांची ओळख या प्रकरणांत करून घ्यावयाचीहि आहे. मराठी भाषेचें व्याकरण रचण्याचे जे खासगी प्रयत्न झाले त्यांची दखल येथें घेणें आवश्यक आहे.

मराठीं भाषेचीं इंग्रजीमध्यें लिहिलेलीं व्याकरणें

डॉ. विल्यम कॅरे:-

मागील एका प्रकरणांत डॉ. कॅरे या फोर्ट विल्यम कॉलेजमधील मराठी भाषातज्ज्ञाचा उल्लेख आला आहे. कॉलेजमध्यें शिकणाऱ्या परदेशस्थ विद्यार्थ्यांसाठीं म्हणून त्यानें लिहिलेलें एक व्याकरण – 'A Grammar of the

---

१ **श्री समर्थ वाक्देवता मंदिर**, धुळें, येथील ७०६ क्रमांकाचें हस्तलिखित.

Mahratta Language'--या नांवानें इ. स. १८०५ मध्यें श्रीरामपूरला प्रसिद्ध झालें. ब्रिटिश साम्राज्याची वाढ होऊन नविनच जिंकलेल्या प्रदेशांत मराठी भाषिकांचा कांहीं भाग असल्यामुळें फोर्ट विल्यम कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणक्रमांत मराठीच्या अभ्यासाला स्थान मिळालें. कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठीं आपण हें व्याकरण लिहीत असल्याचें लेखकानें आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. हा ग्रंथ तयार करतांना आपणाला किती कठीण पडलें तें सांगतांना डॉ. कॅरे म्हणतो:—

"Everyone must be sensible of the difficulty of reducing to rules a language which has hitherto been almost wholly neglected. On this account it is hoped the public will put the best construction on any imperfections which may attend a first attempt. A grammar of this language was, indeed, written, many years ago, in the Portuguese tongue, but the writer of this, not having been able to procure a copy of it, could not derive any assistance from the labours of its author, and has therefore been obliged to strike out a plan of his own." २

डॉ. कॅरे याला 'विद्यानाथ' या पंडिताची मदत फार झाली. हें ऋण कॅरेनें खालील शब्दांत व्यक्त केलें आहे :—

"Very considerable assistance has been received from the observations of Vidyunath, the chief Mahratta pundit in the College of Fort William, whose zeal and ability are highly honorable to himself, and promise to be of great advantage to these students who may engage in the study of this language." ३

या व्याकरणाच्याद्वारें मराठी भाषिकांच्या चालीरीति, व्यापारउदीम इत्यादींची ओळख फोर्ट विल्यम कॉलेजमधील विद्यार्थ्यांना होवो, अशी सदिच्छा लेखकानें शेवटीं व्यक्त केली आहे. या पुस्तकांत मराठी भाषेचे जुजबी नियम दिलेले आहेत. लेखकानें मराठी भाषेंतील बारकाव्यांचा शोध लावलेला दिसत नाहीं. या पुस्तकाबद्दल

---

२ William Carey, *A Grammar of the Mahratta Language*, 1805. *Preface*, p. 6.

३ Ibid, *Preface*, p. 7.

मत प्रदर्शित करतांना मुंबईचे मुनशी महमद इब्राइम मखबा [४] आपल्या व्याकरण-ग्रंथांत लिहितातः—

..."The only grammar hitherto published is that of Dr. Carey, which is in every respect extremely defective and erroneous. It is disagreeable to be obliged to exprees such an opinion, but its justness will at once be apparent when itis recollected that Dr. Carey has shewn himself so little acquainted with the peculiar nature of this language as to publish a dictionary of it without marking the gender of the nouns or the quality of the verbs : although it is quite impossible without a knowledge of these circumstances, to decline a noun or conjugate a verb or to express even the most common phrase in Mahratta." [५]

महमद इब्राइम मखबा

वर उल्लेखिलेल्या मुनशी मखबा यांचें व्याकरण 'A Grammar of the Mahratha Language' (१८२५) या नांवानें ओळखलें जातें. ज्याप्रमाणें डॉ. कॅरे यानें फोर्ट विल्यम कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठीं मराठी भाषेचें व्याकरण रचिलें, त्याप्रमाणें मुंबई इलाख्यांतील परदेशस्थ सनदी नोकरांना व सैनिकांना मराठी भाषेचें ज्ञान होण्यासाठीं म्हणून मखबानें हें व्याकरण लिहिलें. तत्कलीन मराठी भाषातज्ञ ले. क. वॅन्स केनेडी याच्या नजरेखालून गेल्यावर हें पुस्तक छापिलें गेलें. विशेष गोष्ट म्हणजे यावेळीं 'मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी' शालेय पुस्तकें तयार करून छापण्याचें काम करीत असतांना देखील हें पुस्तक मखबानें स्वतःच्या जबाबदारीवर छापिलें व त्याच्या फक्त तीनशें प्रती काढिल्या. या पुस्तकाचा उपयोग मुंबईप्रमाणें मद्रासमधील सनदी नोकर करीत असल्यामुळें मद्रास सरकारनें या पुस्तकाच्या पन्नास प्रती पांचशें रुपयांस खुद्द मखबाकडून विकत घेतल्या. [६]

---

४ **मुनशी महमद इब्राइम मखबा** यांचा इ. स. १८२२ पासून १८५३ पर्यंत सतत ३१ वर्षें मुंबईच्या शिक्षण संस्थेशीं जवळचा संबंध होता. त्यांनीं मुसलमान जमातीसाठीं स्वखर्चानें पुष्कळ पुस्तकें छापून प्रसिद्ध केलीं. इ. स. १८५३ मध्यें शिक्षणक्षेत्रांतून ते निवृत्त होतांना झालेला पत्रव्यवहार सरकारी दप्तरांत पहावयास मिळतो. (*D. P I. Board of Education, Elphinstone Institute.* 1853 p.p. 29-34.)

५ Muhumud Ibraheem Mukbah Moonshee, *A Grammar of the Mahratha Language*, 1825 - *Preface*, p. 4.

६ *G. D- Vol.* 149. 1827. p. 169.

त्यावेळच्या पुष्कळ परदेशस्थ लोकांप्रमाणेंच मखबाचीहि अशी समजूत होती कीं, मराठी भाषा फक्त बोलण्याचालण्यांत व व्यवहारांत वापरली जाते. तिच्यांत वाङ्मय असें नाहीं. हें व्याकरण लिहितांना 'पंचोपाख्यान', 'वेताळ पंचविशी', 'विक्रम बात्तिशी,' 'शुकबहात्तरी' अशा सारखीं कांहीं कथापुस्तकें व कांहीं बखरी एवढेंच हस्तलिखित गद्यवाङ्मय त्याच्यासमोर होतें. अशा पुस्तकांचा उपयोग करून मराठी भाषेचे नियम बसविणें त्याला कठीण गेलें, असें तो म्हणतो. त्याला सरकार-मार्फत तयार झालेल्या 'पंचोपाख्यान' व 'विदुरनीति' या दोनच छापील पुस्तकांचा उपयोग करतां आला. तो लिहितो. :—

"Two works carefully revised have been already printed—the Panchopakyan and a section of the Mahabarat containing the conversations between Dritarashtra and Widur commonly called the Widur-Niti. (Morals of Widur) The latter work consisting almost entirely in short sentences does not of course convey a sufficient idea of the grammatical structure of Maratha, but the former will be found to exhibit a satisfactory specimen of correct composition in this language." ७

परकी लोकांसाठीं हें पुस्तक लिहिलेलें असल्यामुळें इंग्रजी व्याकरणरचना समोर ठेवून त्यांतील व्याकरणसंज्ञा आपण मराठींत वापरल्या असल्याचें त्यानें कबूल केलें आहे. इंग्रजी भाषेचें व्याकरण आदर्श म्हणून ठेविल्यामुळें मराठी भाषेचें व्याकरण रचतांना त्याला कांहीं गोष्टींची उणीव भासली. उदाहरणार्थ :—

"want of a relative pronoun, a subjunctive and potential mood and a passive voice ८

"There is no verb in Maratha which denotes ability or power ९

"Should or should have been implying advice, obligation or command cannot be expressed in Maratha" १०

तसेंच लेखकाच्या मतें मराठी भाषेंत सामासिक शब्द नाहींत. या बाबतींत डॉ. कॅरे याचें जें म्हणणें कीं, 'Compound words make a very considerable part of this language, and contribute much to its

---

७ Muhumud Ibraheem Mukbah Moonshee, *A Grammar of the Mahratha Language*, 1825, *Preface*, p. 4.
८ *Ibid*. p. 5.
९ Muhumud Ibraheem Mukbah Moonshee, *A Grammar of the Mahratha Language*, 1825. p. 46.
१० *Ibid*. p. 47.

elegance', तें मखबाला मान्य नाहीं. डॉ. कॅरे याचा संस्कृतभाषेचा अभ्यास असल्यामुळें त्याचें हें मत बनलें, असें मखबाचें म्हणणें आहे. [११]

एकंदरींत, जरी मखबानें इंग्रजी व्याकरणाच्या धर्तीवर हें पुस्तक रचलेलें आहे तरी, मराठी भाषेचे बारकावे याच्या नजरेंतून सुटले नाहींत. उदाहरणार्थ, 'मोठ्या किंवा मोठें घोड्याचा' यांत 'मोठ्या' हें रूप फक्त लेखनांत व 'मोठे' हें बोलण्यांत वापरतात, 'मारित्यें' अशासारख्या क्रियापदांतील यकार फक्त कोंकणांत आढळतो, इत्यादि.

रे. स्टीव्हन्सन

कॅरे व मखबा यांच्या व्याकरणग्रंथांव्यतिरिक्त तिसरें व्याकरणाचें पुस्तक म्हणजे रे० स्टीव्हेन्सन याचें The Principles of Murathee Grammar (१८३३) हें होय. या पुस्तकाला सरकारी आश्रय मिळून, त्याच्या शंभर प्रती सरकारतर्फे विकत घेण्यांत आल्या व त्याचें कारण, 'It is certainly the duty of the Government to give encouragement to such productions' [१२] असें दिलेलें आहे.

याच पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्यावेळीं मात्र लेखकानें सरकारी मदतीची मागणी केली तेव्हां सरकारकडून कळविण्यांत आलें कीं हें पुस्तक मराठी शिकणाऱ्या युरोपियन लोकांसाठीं असल्यामुळें व शाळांमधून वापरतां येण्यासारखें नसल्यामुळें त्याला सरकारी मदत मिळूं शकत नाहीं. [१३]

प्रथमावृत्तीच्या प्रस्तावनेंत रे. स्टीव्हेन्सननें आपल्या पुस्तकाची कुळकथा दिली आहे. हें व्याकरण रचण्यासाठीं त्याला आठ वर्षें श्रम करावे लागले. परशुरामपंत गोडबोले व दाजीशास्त्री शुक्ल यांनीं अनेक व्याकरणनियमांना लागणारीं उदाहरणें त्याला शोधून दिलीं. तसेंच चार दिशांचे चार ब्राह्मण बोलावून त्यांच्याकडून व्यंजनान्त स्त्रीलिंगी नामें त्यानें चालवून घेतलीं. कोशकार मोल्सवर्थ व रे. नेसबिट यांच्याशीं जातीनें कांहीं मुद्यांवर त्यानें चर्चा केली. या पुस्तकावर 'Orienta Christian Spectctor' मध्यें विस्तृत अभिप्राय दिलेला आहे. [१४]

रे. स्टीव्हेन्सन याचा मराठी भाषेच्या व्याकरणशास्त्रावरील अधिकार त्यावेळीं सर्वमान्य होता. खुद्द दादोबांनीं रे. स्टीव्हेन्सनशीं व्यक्तिशः व्याक-

---

११ Muhumud Ibraheem Mukbah Moonshee, *A Grammar of the Mahratha Language.* 1825. p. 63.

१२ *G. D. Vol.* 285, 1833. p. 240.

१३ *G. D. Vol.* 41/766. 1843. p. 127.

१४ *Oriental Christian Spectator, Vol.* 5. 1834. pp. 235-239.

रणाविषयक कांहीं वादग्रस्त मुद्यांवर चर्चा करून आपल्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं त्यांचा उपयोग करून घेतला होता.[१५] दादोबांप्रमाणें मे. कॅंडी सुद्धां रे. स्टीव्हेन्सनचा सल्ला घेत असत.[१६] रे. स्टीव्हेन्सनचीं मराठी भाषेच्या व्याकरणावरील मतें सरकारी विद्याखात्याला मान्य असल्यामुळें तीं पुष्कळांनीं उचललीं. उदाहरणार्थ एक व्याकरणकार म्हणतो :—

" I am deeply indebted in the composition of this book to Dr. stevenson's Marathi Grammar. The grammatical forms which he gives, have the sanction of the learned Shastris who assisted our two great lexicographers in the compilation of their Dictionaries, and have been, moreover adopted by The Government Educational Department." [१७]

रे. बर्जेस

इंग्रजीमध्यें लिहिलेल्या मराठी भाषेच्या व्याकरणामध्यें, हेल्बरी येथील ईस्ट इंडिया कॉलेजच्या उपयोगासाठीं लिहिलेलें जेम्स आर. बॅलेन्टाइन याचें " A Grammar of the Mahratta Language " (१८३९) व रे. बर्जेस याचें ' A Grammar of the Marathi Language (१८५४) हीं दोन महत्त्वाचीं आहेत. यापैकीं रे. बर्जेस याचें पुस्तक व रे. स्टीव्हन्सन याच्या पुस्तकाची तिसरी आवृत्ति एकाच वर्षी म्हणजे इ. स. १८५४ मध्यें प्रसिद्ध झाली. रे बर्जेस याचें पुस्तक कांहीं दिवस अगोदर प्रसिद्ध झालें. या गोष्टीची कल्पना नसल्यामुळें रे. स्टीव्हन्सननें आपल्या पुस्तकाची तिसरी आवृत्ति काढली. या दोन पुस्तकांत कांहीं मुद्यांवर मतभेद असल्यामुळें रे. स्टीव्हनसननें त्यांचा उहापोह आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत केलेला आढळतो. तो लिहितो:—

" And I should gladly have avoided all criticism on Mr. Burges's treatise, but that I might either be thought to make light of his labours or, appear to approve where we differ, of his deviations from the principles on which I have proceeded. I trust, then, Mr. Burges will excuse me if I point out some of the most material things I deem faulty in his work. Nor will the remarks I shall require to make be irrelevant to the

---

१५ *D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1848. p. 161.
१६ *Ibid.* p. 155.
१७ *The Students' Manual of Marathi Grammar.* 1868. Preface

object I have in view in the whole of this grammar—that of directing students to a correct and idiomatical style of writing and speaking Murathee." [१८]

रे. बर्जेस यानें आपल्या पुस्तकाला शिक्षामंडळीची मदत मिळावी म्हणून इ. स. १८४४ मध्यें विनंति केली होती. तें पुस्तक मे. कॅंडीकडे तपासण्यासाठीं आलें होतें. परंतु याचवेळीं बर्जेस युरोपला जाण्यास निघाल्यामुळें, तें न तपासतांच लेखकाला परत दिलें गेलें. त्यानंतर दहा वर्षांनीं इ. स. १८५४ मध्यें तें छापलें गेलें. या पुस्तकाची मराठी भाषातज्ज्ञाकडून तपासणी झाली नसल्यामुळें रे. स्टीव्हेन्सनला वर दर्शविल्याप्रमाणें कडक टीका करावी लागली असें वाटतें. या पुस्तकावर 'ज्ञानोदय' च्या १६ जानेवारी, १८५४ च्या अंकांत सविस्तर टीकालेख लिहिलेला आढळतो.

इतर व्याकरणकार

इंग्रजीमधून लिहिलेलें मराठी भाषेचें आणखी एक व्याकरण, एच. एस के. बेल्लर्स व लक्ष्मण वाय. अस्खेडकर यांचें "A Grammar of the Marathi Language" (१८६८) हें होय. ज्या रे. स्टीव्हेन्सनच्या मतांना दादोबा पांडुरंग अगर मे. कॅंडी हे मान देत असत, त्याच्याविषयीं या लेखकद्वयाचें काय मत होतें तें त्यांच्याच शब्दांत मांडणें इष्ट होईल. ते म्हणतात :—

"Dadoba Pandurang's and Krishna Shatri Godbole's Marathi Grammars, invaluable as they are, present insurmountable difficulties to any but very advanced scholars. Dr. Stevenson's Grammar is worse than useless. Its errors are too numerous to be dealt with here seriatim. Amongst the more striking may be mentioned wrong system of declensions, absurd rules and intricacies with regard to genders, numbers and cases, endless errors as to verbs and spelling." [१९] याच ठिकाणीं लेखकांनीं महादेव गोविंद रानडे यांच्या मार्गदर्शनाबद्दल आभार मानले आहेत.

वर दिलेल्या व्याकरणांशिवाय गणपत रघुनाथ नवलकर यांचें 'The Students' Marathi Grammar' (१८८०) आप्पाजी काशीनाथ खेर यांचें 'Higher Marathi Grammar' (१८९५) व रामचंद्र भिकाजी जोशी यांचें 'A

---

१८ James Stevenson, *The Principles of Marathi Grammar, Ed.* 3. 1854. Notice, p. 7.

१९ H. S. K. Bellairs and Laxman y. Askhedkar, *A Grammar of the Marathi Language.* 1868. Preface.

Comprehensive Marathi Grammar' हीं पुस्तकें उल्लेखनीय आहेत. जरी शाळांमधून या सर्व पुस्तकांचा वापर होत नसला, तरी मराठी भाषेच्या व्याकरणावर लिहिलेल्या पुस्तकांचा आढावा घेतांना या सर्व पुस्तकांची नोंद करणें आवश्यक वाटतें. इंग्रजीमध्यें लिहिलेलें व इंग्रजी शाळांतील मुलांना उपयोगी असें आणखी एक पुस्तक रचिलें गेलें, तें म्हणजे 'Hand-Book of The Marathi Grammar' (१८७२) हें होय. या पुस्तकांत दिलेले इ. स. १८५९ पासून इ. स. १८७१ पर्यंतचे मॅट्रिक परीक्षेचे मराठी व्याकरणावरील प्रश्न पाहिले कीं यावेळीं मराठी व्याकरणाचा अभ्यास इंग्रजी शाळांमधून किती कसून होत असे याची पूर्ण कल्पना येते. आज त्या प्रश्नांचा अर्थसुद्धां कळणें विद्यार्थ्यांना कठीण पडेल!

मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी व मराठी भाषेचें व्याकरण

शालेय पुस्तकें तयार करण्यासाठीं शाळापुस्तक मंडळीनें एक खास समिति नेमिली होती. तिनें १३ सप्टेंबर, १८२३ रोजीं सादर केलेल्या टांचणांत, मराठी भाषेचें शालोपयोगी व्याकरण आवश्यक असल्याची सूचना दिलेली होती.[२०] या सूचनेबरहुकूम शाळापुस्तक मंडळीचे सेक्रेटरी जॉर्ज जर्व्हिस यांनीं 'कारखान्यांत' चार पंडित ठेविले. ते म्हणजे जगन्नाथशास्त्री, रामचंद्रशास्त्री, गंगाधरशास्त्री आणि बाळशास्त्री हे होत. यांपैकीं रामचंद्रशास्त्री दुसऱ्या कामांत गुंतल्यामुळें तिघांनीं मराठी व्याकरण रचावें अशी शाळापुस्तक मंडळीची आज्ञा झाली. त्याप्रमाणें त्यांनीं 'संस्कृत व्याकरणाध्ययन बलें करून' मराठी भाषेचें व्याकरण एक वर्षांत तयार केलें. या पुस्तकावरून शाळापुस्तक मंडळीच्या शाळांतील मुलें दहाबारा वर्षेंपर्यंत मराठी भाषेच्या व्याकरणाचा अभ्यास करीत असत. हें पुस्तक छापलेलें नसल्यामुळें, त्याच्या हस्त लिखित प्रती वापरल्या जात. इंडिया ऑफिस लायब्ररीमधील मराठी हस्तलिखित पुस्तकांच्या यादींत एका हस्तलिखित व्याकरणाची नोंद केलेली आढळते.[२१] तें हस्तलिखित व्याकरण वर उल्लेखिलेल्या व्याकरणाच्या हस्तलिखित प्रतींपैकीं एक असावें असें स्पष्ट दिसतें. 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' हें त्या हस्तलिखिताचें नांव आहे.या हस्तलिखित व्याकरणाची microfilm इंग्लंडहून मराठी संशोधन मंडळानें आण-

---

२० *G. D. Vol.* 63. 1824. p. 111.

२१ *Catalogue of the Manuscripts in the India Office Library.* 1950. p.11.

विली आहे. अलीकडेच पुस्तकरूपानें तें मंडळातर्फे प्रसिद्ध झालें आहे या पुस्तकाची कल्पना येण्यासाठीं त्यांतील पहिलें प्रकरण खालीं दिलें आहे:—

"अविच्छिन्न परंपरागत बाळबोध लिपिशिक्षा लोकव्यवहार कांहीं कांहीं शास्त्रीय कल्पना आणि युक्ती यांतें अवलंबून सुख बोधार्थ महाराष्ट्र भाषेचें व्याकरण लिहितों.

प्रकरण १

"व्याकरण आणि त्याचे अवयव यांचा विचार

"व्याकरण म्हणजे अर्थानुसंधानानें शुद्ध आणि चांगलें बोलायाची विद्या होय. ती उत्तम रीतीनें समजांत आली असतां मग यथाशक्ति लिहिणें हें त्याचे मागें सहजच आहे.

"व्याकरणाचे दोन भाग आहेत. शब्दशुद्धि आणि वाक्ययोजना. शब्दशुद्धि म्हणजे शब्दाचे स्वरूपाचा शोध आणि शुद्धपणा. वाक्ययोजना म्हणजे शुद्ध शब्दांची अर्थाचे अनुसधानानें योजना.

"वाक्य म्हणजे भाषेचा भाग आहे. जांत क्रियापद असतें. शब्द म्हणजे वाक्याचा भाग आहे. जेणेंकरून कोणताही पदार्थ जाणिजे तो. अथवा निर्देशिजे तो. उदाहरण आंबा, खारीक, केळें, कृपा, इच्छा. या शब्दांनीं पदार्थांचें ज्ञान होतें. तसें हा तो या शब्दांनीं पदार्थ दर्शविला जातो.

"शब्दाचे अवयव एक किंवा अनेक अक्षरें असतात. अक्षरें म्हणजे जांत स्वर एक असतो. आणि उच्चारांत विराम होत नाहीं तें होय. उदाहरण कसें. या शब्दांत क आणि सें हीं दोन अक्षरें होत.

"आणि अक्षरांत एक किंवा अनेक वर्ण असतात. वर्ण म्हणजे अक्षराचा भाग आहे जाचा कधीही खंड होत नाहीं. उदाहरण अ, ई, उ. वर्णांचे वेगळाल्ये उच्चारणांची रीती त्या त्या वर्णांचीं वेगळालीं स्थानें आहेत. त्या आश्रयानें कळत्ये.

"अक्षरांतील वर्णांचें ज्ञान आणि तीं अक्षरें यथास्थित लिहिण्याचें ज्ञान त्यांचें आकृतींपासून कळतें. वर्णांचें ज्ञान आणि वणाचें स्थानांचें ज्ञान हीं दोन या संपूर्ण भाषेंत व्यापक होत. याजकरितां तीं या व्याकरणास अवश्य उपयोगी आहेत."

गंगाधरशास्त्री फडके

पंडितमंडळांतील तीन शास्त्र्यांनीं रचिलेल्या या व्याकरणावरून रामचंद्रशास्त्री जन्हवेकर यांनीं प्रश्नोत्तररूप व्याकरण रचिलें. हीं दोन्हीं पुस्तकें छापिलीं गेलीं नाहींत.

त्यामुळें सर्वंच मुलांच्या हातीं व्याकरणाचें पुस्तक असणें शक्य नव्हतें. ही अडचण दूर करण्याच्या हेतूनें गंगाधरशास्त्री फडके यांनीं 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' रचून तारीख १ जानेवारी, १८३३ रोजीं प्रसिद्ध केलें. हें व्याकरण तयार करतांना त्यांनीं जुन्या दोन्ही हस्तलिखित व्याकरणपुस्तकांचा उपयोग केला. तसेंच बाळशास्त्री जांभेकर यांचीहि थोडी बहुत मदत त्यांनीं घेतली. हा पूर्वेतिहास फडके यांनीं आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत दिला आहे. या पुस्तकासाठीं सरकारी मदतीची मागणी लेखकानें केली त्यावेळीं सरकारचा मुख्य सेक्रेटरी वॉथेन यानें दिलेलें उत्तर लक्षांत घेण्यासारखें आहे. तो लिहितोः—

"I have myself examined this grammar and think it will be very useful in the total absence of any work of the sort. It is however, much to be regretted that the compiler has fallen into the general fault of pundits in making it too dificult and introducing many Sanscrit technical terms. I have, however suggested the compilation of a smaller grammar fo children on a simpler plan and in the meantime this will be found generally useful, I would recommend Government to take 100 copies." २२

या सरकारी उत्तरावरून असें मानण्यास हरकत नाहीं कीं, दुसरें योग्य असें शालेय व्याकरण नसल्यामुळें गंगाधरशास्त्र्यांना सरकारी मदत मिळाली. याशिवाय वरील उत्तरांत मराठी भाषेबद्दल सरकारी दृष्टि कशी होती, हेंहि समजून येतें. शक्यतों साध्या, सोप्या भाषेचा उपयोग शालेय पुस्तकांतून व्हावा, असें सरकारी धोरण होतें. याचमार्गानें पुढील काळांत कँडीप्रभृतीनीं सर्व शालेय पुस्तकांची भाषा बनविण्याचा प्रयत्न केल्याचें दिसून येईल.

वरील पुस्तकाची 'मला न कळतां सन १८३८ सांत दुसरी आवृत्ति सर्कारनें छापिली,' अशी कुरकुर गंगाधरशास्त्र्यांनीं आपल्या पुस्तकाच्या इ. स. १८४९ मध्यें छापलेल्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत केली आहे. तिसऱ्या आवृत्तीच्या वेळीं लेखकानें लाघवार्थ गुरुशिष्यसंवाद काढून व्याकरणांत जे नवीन नवीन विषय आले ते

---

२२ *G. D. Vol.* 22/354. 1836. p. 50.

सर्व एकत्र केले, आणि महादेवशास्त्री कोल्हटकर, सखारामशास्त्री काळे, नारायणशास्त्री पुराणिक, भिकाजी शंकर शिंत्रे आणि विष्णु गंगाधर फडके या व्याकरणशास्त्रज्ञांशीं विचारविनिमय केला. याचवेळीं त्यांनीं सरकारी मदतीसाठीं तारीख ५ डिसेंबर १८४८ रोजीं विनंतीअर्ज केला व त्यांत आपल्या पुस्तकाची वाखाणणी करून, त्याकाळीं वापरांत असलेल्या बाळशास्त्री जांभेकर व दादोबा पांडुरंग यांच्या व्याकरणपुस्तकांपेक्षां आपलें पुस्तक कसें जास्त उपयुक्त आहे हें पटवून देण्याचा प्रयत्न केला. तपासणीसाठीं तें मे. कॅंडी यांच्याकडे आलें, तेव्हां त्यांनीं आपला अभिप्राय दिला. त्यांत त्यांनीं असें मत व्यक्त केलें कीं, एकाच वेळीं एकाच विषयावर तीन पुस्तकें शाळांत वापरलीं जाणें इष्ट नव्हे, या तीन पुस्तकांपैकीं शाळांत वापरण्यासारखें एकहि नाहीं, असें मे. कॅंडी यांना वाटलें. ते लिहितात :—

"I have carefully examined above 50 pages of the copy... and have also looked at it in the other parts. I have found good many errors in it, errors of construction, errors of omission and some barbarisms, so that I could not recommend its being printed in its present state. Still if there was no other grammar there is no doubt that a Pundit of the acknowledged abilities of Gangadhar Shastree could so correct and improve it as to make it very desirable to print it for the use of the schools." [२३]

मे. कॅंडी यांच्या म्हणण्याप्रमाणें लेखकानें आवश्यक ते बदल करून पुस्तक छापिलें व सरकारनें त्याच्या शंभर प्रती घेतल्या.

बाळशास्त्री जांभेकर

इ. स. १८३६ मध्यें गंगाधरशास्त्री फडके यांचें 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' प्रथम छापिलें गेलें, ही गोष्ट त्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर छापिलेल्या 'सन १८३६, जानेवारी तारीख १' या तारखेवरून स्पष्ट होते. याच वर्षी बाळशास्त्री जांभेकर यांचेंहि 'बाल

---

२३ *D. P. I. Board of Education, Elphinstone Institution.* 1849. p. 5.

व्याकरण' प्रसिद्ध झालें. या पुस्तकाची प्रथमावृति उपलब्ध नाहीं. बाळशास्त्र्यांचे एक चरित्रकार गणेश गंगाधर जांभेकर लिहितात,

"बाल व्याकरणहि बहुधा १८३१ च्या सुमारास प्रथमतः छापिलें जाणें शक्य आहे असा साधारण तर्क होतो; आणि निदानपक्षीं 'बाल व्याकरणा'ची पहिली आवृत्ति गंगाधरशास्त्री फडके यांचें 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' प्रथमतःच 'सन १८३६ जानेवारी तारीख १' रोजीं छापिलें जाण्यापूर्वी प्रसिद्ध झाली असली पाहिजे असें म्हणतां येतें." २४

परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. मुंबईच्या शिक्षामंडळीनें तारीख २८ जून, १८४१ रोजीं 'The Committee of public Instruction, Calcutta' च्या सेक्रेटरीला लिहिलेल्या एका पत्रांत मुंबईकडील मराठी शाळांत वापरल्या जाणाऱ्या पुस्तकांची एक यादी पाठविली होती. तींत "Bal Viakurn or Short Grammar of the Marathee Language, Original composition by Ball Gungadhar Shastree, 1st Edition, 1836, 1000 copies, pages 48, price As 3." २५ असा उल्लेख आढळतो. त्यावरून बाळशास्त्री जांभेकर यांचें 'बाल व्याकरण' इ. स. १८३६ मध्येंच प्रसिद्ध झालें हें स्पष्ट होतें.

बाळशास्त्री जांभेकर हे 'बाल व्याकरणा'चे कर्ते निर्विवादपणें असले तरी त्यांच्या या पुस्तकाबद्दल एक उल्लेख प्रचलित समजुतीस धक्का देणारा आहे. वॉथेन हा मुंबई सरकारचा मुख्य सेक्रेटरी असतांना त्यानें तत्कालीन शालेय पुस्तकांसंबंधीं ता. ४ जुलै, १८३६ रोजीं लिहिलेल्या एका टांचणांत या पुस्तकाबद्दल लिहिलें आहे तें असें:—

"A catechism of Marrathee Grammar compiled by Balshastree and myself on the plan of Pinnock's Catechism, Guy's Grammar etc. and calculated to imprint the first principles of grammar on the minds of the boys without entering into its intricacies as connected with Sanskrit." २६

---

२४ गणेश गंगाधर जांभेकर, **बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांचें जीवनवृत्त व लेखसंग्रह. खंड ३**, १९५०. पृ. ६२६.

२५ *D. P. I. Board of Education, Vol.* 12. 1842. (No paging)

२६ *G. D. Vol. 10 1836.* p. *150.*

उपर्युक्त 'बालव्याकरण' लहान मुलांच्या दृष्टीनें सोपें असल्यामुळ तें अनेक वर्षेंपर्यंत मराठी शाळांत वापरलें जात असे. फडके आणि जांभेकर यांच्या व्याकरणांची तुलना करतां जांभेकरांच्या बालव्याकरणाच्या पुष्कळ आवृत्ती निघाल्या. चौदावी आवृत्ति इ. स. १८६३ मध्यें निघालेली उपलब्ध आहे. त्यानंतर हें पुस्तक विद्या खात्यातर्फे छापलेलें दिसत नाहीं; त्याला कारण इ. स. १८६५ मध्यें दादोबांचें 'लघु-व्याकरण' तयार झालें, हें असावें. 'बाल व्याकरणा'ची तिसरी आवृत्ति इ. स. १८३८ मध्यें निघाली. तीवर 'बाल व्याकरण हा ग्रंथ शाळांत पढणाऱ्या लहान मुलांस परम प्रीतीनें नजर केला असे मुकाम मुंबई येथें सरकारी छापखान्यांत छापिलें आवृत्ति तिसरी शके १७६० इसवी सन १८३८' असें लिहिलें आहे. हें पुस्तक छापल्याचे सरकारी दप्तरांत जे उल्लेख सांपडतात, त्यांत इ. स. १८४३ मध्यें दोन हजारांची एक आवृत्ति पुणें कॉलेजच्या छापखान्यांत काढल्याचें नमूद आहे.[२७] तसेंच इ. स. १८६१ मध्यें पंधरा हजार प्रतींची एक आवृत्ति छापल्याचा उल्लेख आढळतो.[२८]

'बाल व्याकरण' हें संवादात्मक पुस्तक मुलांकडून पाठ करवून घेतलें जात असे. मे० कॅंडी शाळा तपासनीस असतांना तारीख २७ मे, १८४० रोजीं लिहिलेल्या एका अहवालांत लिहितातः--

"The books used are Bal Wyakurn and the Maratha Grammar by Dadoba Pandoorang. The former is committed to memory in all the Schools and the latter is studied by some of the senior boys in the more advanced schools."[२९]

मराठीमधून व्याकरणशास्त्र शिकण्याची आवश्यकता प्रतिपादितांना गंगाधर-शास्त्री फडके म्हणतात :—

"या भाषेचा अनुगम व या भाषेंतील विषय समजण्यानें संस्कृतादिकांत प्रवेश करावयाची ज्यांची इच्छा त्यांस फार उपयोगी पडेल...याकरितां महाराष्ट्रादि भाषांचीं व्याकरणें आहेत."[३०]

---

२७ *G. D. Vol. 28 1845.* p. 68.
934.

२८ *D. P. I. Book Depot, Vol. 18.* 1861–62. p. 554.

२९ *G, D. Vol. 530.* 1840. p. 195.

३० गंगाधरशास्त्री फडके, **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण**, आ. १. १८३६. प्रस्तावना, पृ. २–३.

संस्कृत भाषेचा अभ्यास करणें सुलभ व्हावें म्हणून व्याकरणग्रंथाची रचना केलेली असल्यामुळें त्याची मांडणी संस्कृत व्याकरणाच्या धर्तीवर आढळते. याउलट दादोबा पांडुरंग यांचें 'मराठी भाषेचें व्याकरण' वेगळ्या हेतूनें रचिलें गेलें. दादोबा लिहितात :- -

"आपण जी भाषा बोलतों तिचें शब्दज्ञान मुळीं झालें पाहिजे, म्हणजे पुढें याच्या आधारानें परभाषा त्वरित व शुद्ध रीतीनें ग्रहण करावयास येईल. यास्तव मुलांस स्वभाषेचें ज्ञान मुळीं झालें पाहिजे". [३१] तसेंच

"शेवटीं अलिकडे दोन तीन वर्षें झालीं व्याकरणाची आवड मुलांमध्यें फार वाढत चालली आहे व मोठा नाहीं तरी लहान तरी व्याकरणाचा ग्रंथ प्रसिद्ध व्हावा तोही होत नाहीं, व परभाषा शिकण्याकरितां त्याचा उपयोग फार, या सकल गोष्टींचा विचार मनांत येऊन ग्रंथास आरंभ केला." [३२]

दादोबा पांडुरंग

दादोबांचे वरील विचार पाहिले कीं त्यांच्या व्याकरणग्रंथरचनेच्या मागें परभाषेचा, विशेषतः इंग्रजी भाषेचा, अभ्यास करण्यास विद्यार्थ्यांस सुलभ व्हावें हाच हेतु स्पष्ट दिसतो. मात्र हें काम फार अवघड होतें; कारण,

"प्रथमतः जो कोणी व्याकरण ग्रंथ या भाषेंत करायास बसेल, त्यास मुळीं याचे नियम बांधायास कोणता ही आधार नाहीं; सर्व जें कांहीं तो करील तें नवें, व त्याची कल्पना तोच त्याचा आधार; दुसरें, या भाषेंत आंतून गोंधळ किती आहे तो अंमळ विचार केल्यावर लागलाच ध्यानांत येतो; त्या सर्वांचे पृथक् पृथक् नियम बांधणें हें काम बोलतांना मात्र सुलभ वाटतें. परंतु तें करायास गेल्यावर किती अवघड आहे याचा अनुभव यावयास कांहीं उशीर लागणार नाहीं; बरें यथाशक्ति इतक्या ही अडचणी सोसावयास एखादा सिद्ध झाला असतां, पुढें त्याच्या श्रमाचें फल प्राप्त

---

३१ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **मराठी भाषेचें व्याकरण**. आ. १. १८३६. प्रस्तावना.

३२ तत्रैव.

होईल कीं नाहीं याविषयीं त्यास मोठी भ्रांत. मराठी व्याकरणाची प्रसिद्धी आज दिनपर्यंत झाली नाहीं त्यास मुख्य अडचण ही शेवटचींच असावी." [३३]

दादोबांचा हा कयास पुढें खरा ठरला. त्यांनीं दोन वर्षें खपून मराठी भाषेचें व्याकरण तयार केलें. व तें शाळापुस्तक मंडळीकडे पाठविलें. हें हस्तलिखित व्याकरण संभाषण पद्धतीनें लिहिलेलें होतें. बाळशास्त्री जांभेकर यांनीं तें तपासून त्यावर लिहिलेला टीकालेख पुस्तकमंडळीकडे पाठवून दिला. हा टीकालेख सरकारी दप्तरांत पहावयास मिळतो. [३४] शाळास्पुतक मंडळीनें दादोबांना कळविलें कीं हें पुस्तक छापण्याची जबाबदारी मंडळी स्वीकारणार नाहीं. त्याबरोबरच असाहि निर्णय घेतला गेला कीं पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर शाळापुस्तक मंडळीच्या शाळांमधून तें उपयोगांत आणलें जावें. पुन्हां एकदां दादोबांनीं सरकारकडे दाद मागितली परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं.

शाळापुस्तक मंडळी व सरकार यांच्या निर्णयामुळें दादोबांनीं स्वखर्चानें आपलें पुस्तक छापिलें. काढलेल्या सातशें प्रतींपैकीं अडीचशें विकल्या गेल्या. उरलेल्या प्रती मंडळीनें घ्याव्या असा विनंतिअर्ज दादोबांनीं केल्यामुळें त्या मंडळीनें घेतल्या, परंतु प्रत्येक प्रतीला अडीच रुपय ऐवजीं दीड रुपया दादोबांना मिळाला. [३५]

इतक्या श्रमानें तयार केलेल्या दादोबांच्या व्याकरणावर मे. कॅंडी यांनीं तारीख १५ मार्च, १८३८ रोजीं लिहिलेला टीकालेख पाहणें आवश्यक आहे. मराठी भाषेचा आपला अभ्यास तेवढासा नाहीं अशी लीनता स्वीकारून त्यांनीं दादोबांच्या पुस्तकांतील दोष दाखवून दिले. दादोबांनीं वृत्तचर्चा मुळींच केलेली नाहीं. हा दोष दाखवून ते लिहितात :—

"The style though occasionally obscure is in general clear and good. The terms of Murathee grammar are necessarily borrowed from Sanscrit and must therefore be

---

३३ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **मराठी भाषेचें व्याकरण.** आ. १. १८३६. प्रस्तावना.

३४ *G. D. Vol.* 22/354 1836. p. 90.

३५ *G. D. Vol.* 540. 1840. pp. 146-147.

difficult to the unlearned reader; but the explanation of terms should always be given in plain and simple Murathee. The author has not sufficiently attended to this point. He has here and there used high Sanscrit words and compounds without necessity." [३६]

मे. कॅंडी यांचें वरील मत कोणालाहि पटण्यासारखें आहे. त्यांची करडी नजर बहुतेक शालेय पुस्तकांवरून फिरत असतांनासुद्धां दादोबांनीं संस्कृत-प्रचुर मराठीचा वापर कमी केला नाहीं. इ. स. १८५० मधील त्यांच्या व्याकरणाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेमधील खालील परिच्छेद पहावा :—

"मागल्या दहा पंधरा वर्षांपासून महाराष्ट्र भाषेंत गद्यात्मक ग्रंथ लिहिण्याचा प्रचार वाढूं लागला; तेव्हां पासून, मोठमोठालीं वाक्यें तर काय, परंतु त्यांतील प्रत्येक शब्द, व त्या शब्दांतील प्रत्येक वर्णरूप अवयवहि शुद्ध व नियमास अनुसरून असावा आणि तेणेंकरून सर्वांची लिहिण्याची पद्धति एकसारखी पडून सांप्रत जी लिहिण्यांत अव्यवस्था आढळते, ती दूर व्हावी, अशी इच्छा माझ्या मनांत उद्भवली होती; कारण, जशी भाषा, तशी तिची लेखनपद्धतिहि, तदंतर्गत गूढास्थित जे नियम त्यांचें उद्घाटन करून त्यांज वर बाहिरणें, हाच व्याकरणशास्त्राचा मुख्य उद्देश होय. आणि याच उद्देशानें गालवशौनककात्यायनशाकटायनादि जे प्रातिशाख्यादिवेदव्याकरणभाष्यकार, व त्यां नंतर पुढें यास्कपाणिन्यादि जे वैयाकरण झाले, व तदनंतर अर्वाचीन काळीं भट्टोजीदीक्षित, महीधरभट्ट, बोपदेव, आदिकरून जे व्याकरणग्रंथकार प्रसिद्ध झाले, त्या सर्वांनीं परिश्रम केले; ह्मणोनच संस्कृतभाषा इतक्या प्रगल्भ दशेस येऊन, विद्वज्जनचित्तचकोरास चंद्रीभूत होऊन वाल्मीकिव्यासशंकरश्रीहर्षकालिदासभवभूत्यादि जे प्राचीन आणि अर्वाचीन कवि त्यांच्या वाग्देवतेस इतकी रम्यस्थानार्ह झाली. नाहींतर, संस्कृत वाणी प्रमाणें जिचें काठिन्य, विस्तार, आणि जिच्या ठायीं, सहस्त्रशः सूक्ष्मानियमरूप तंतूचें गुंतलेलें जाल, अशा भाषेस मार्दवदशेस आणून, तिचें हे दुर्निवार जाल उकलून, त्या सूत्रांनीं विणून सिद्ध केलेला जो पट तो कविजनांचित्र-कारांच्या अनेक सुरसरंगभरितकल्पनांस लेखनार्ह झाला नसता. ह्मणोन या यशाचे जे अंशभाक् त्यांची परिगणना केली असतां, पतंजलिकात्यायनपाणिन्यादि जे शब्दशास्त्रनियंते यांसच आद्यस्थानापन्न केलें पाहिजे." [३७]

---

३६ *G. D. Vol. 540.* 1840. P 136.

३७ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.** आ. २. १८५०. प्रस्तावना.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.
दर्जा.....क्र. नं.....

दादोबांनीं जी संस्कृतप्रचुर मराठी भाषा या व्याकरणग्रंथांत वापरली आहे तिचा उद्देश कदाचित् असा असावा कीं, तत्कालीन संस्कृतज्ञ शास्त्री मराठी भाषेच्या व्याकरणाबद्दलचा जो अनादर व्यक्त करीत तो नाहींसा व्हावा. खुद्द दादोबांनीं प्राकृत भाषेस तुच्छ मानणाऱ्या शास्त्र्यांची हजेरी घेतलीच आहे; पण बाळशास्त्री जांभेकरांनीं दादोबांच्या व्याकरणावर जी विस्तृत टीका लिहिली आहे, तींत त्यांच्या व्याकरणाच्या पहिल्या आवृत्तीला जोडलेल्या प्रस्तावनेंत चर्चिलेल्या या मुद्याबद्दल लिहिलें आहेः—

" There is an excellent note here on the necessity of the study of grammar. This is absolutely necessary in the present state of the feelings of Natives on this subject, who in their veneration of the classical Sanscrit treat the Marathee Grammar as too trivial and puerile. " ३८

मराठी भाषेच्या व्याकरणग्रंथनिर्मितीच्या प्राथमिक अवस्थेंत पुराणमतवादी शास्त्रीमंडळीचा किती विरोध होता याची कल्पना वरील उताऱ्यावरून होण्यासारखी आहे.

दादोबांनीं व्याकरणाचे तीन भाग पाडले आहेत—वर्णविचार, भाषाविचार व वाक्यरचना. संस्कृतभाषेच्या व्याकरणरचनेंत असे विभाग कल्पिलेले नाहींत. त्यांनीं ही कल्पना इंग्रजी भाषेच्या व्याकरणावरून उचलली.

वर्णविचार या विभागांत, स्वर, व्यंजनें, जोडाक्षरें, स्थानविचार व संधिविचार याबाबींची चर्चा केलेली आहे. यांपैकीं च, ज, झ, या अक्षरांचे तालव्य व दंततालव्य असे दोन उच्चार होतात असें सांगून आपला निर्णय दिला कीं; " 'च, 'ज, 'झ, यांस य जोडला असतां च, ज, झ हे वर्ण लिहावें हें बरें दिसतें. ' त्याच्या भावानें ' लिहिणें त्यापेक्षां ' त्याचा भावानें ' लिहिणें हें शुद्ध आहे. " ३९

" ही बिंदु देण्याची रीति अलिकडेस निघाली आहे. आणखी यद्यपि, महाराष्ट्र लोकांस या चिन्हाची मोठी आवश्यकता आहे असें मला वाटत नाहीं, तथापि सामान्यतः सर्वांस या वर्णांचें उच्चारण, आणि कोठें कोठें अर्थग्रहण ही निःसंशय व्हावें, म्हणून हें चिन्ह लिहिणें मला कांहींसें आवश्यक वाटतें. परंतु हें जोडिते वेळेस सर्वांहीं अनुस्वारा प्रमाणें याजविषयीं फार सावध असावें. " ४०

---

३८ *G. D. Vol, 540.* 1840. P 139.

३९ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **मराठी भाषेचें व्याकरण**. आ.१.१८३६.पृ.१७९.

४० दादोबा पांडुरंग तर्खडकर, **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण**. आ. ३. १८५७. पृ. ७-८.

दादोबांचा हा नियम शाळापुस्तक मंडळीचे तत्कालीन पंडित वापरीत असत. एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत शाळापुस्तक मंडळीनें जीं शालेय पुस्तकें छापिलीं त्यांत च, ज आणि झ या वर्णांच्या तालव्य व दंततालव्य उच्चारांतील भिन्नता दर्शविण्यासाठीं बिंदूचा उपयोग केलेला आढळतो. वास्तविक मराठी ज्यांची मातृभाषा त्यांना या बिंदूचा उपयोग करण्याची मुळींच आवश्यकता नव्हती; परंतु यावेळीं मराठी भाषा शिकणाऱ्या परकीयांसाठीं हा नियम केला गेला असावा. मे० कॅंडी यांनीं हा नियम अनावश्यक असल्याचा आपला निर्णय दिला; [४१] त्याचबरोबर बाळशास्त्री जांभेकर लिहितात :—

"The dotting of च and ज to give them the Marathee sounds is sanctioned by The Native Education Society, and is perhaps the only plan that can be adopted so as to preserve the spirit of The Balbodh character, of having a distinct symbol for each sound. That the natives are not acquainted with it, or that the marks are liable to be misplaced can be no argument against it " [४२]

या रस्सीखेचींत शेवटीं मे. कॅंडी यशस्वी झाले. त्यांच्यामागें सत्ता होती. ते मराठी ट्रान्स्लेटर म्हणून अधिकारारूढ झाल्यावर त्यांनीं बिंदु वापरण्याची ही पद्धति काढून टाकिली. या प्रश्नावर लोकमान्य टिळकांनीं दिलेलें मत पाहाण्यासारखें आहे. ते लिहितात:—

"चकाराच्या उच्चाराचे हे दोन भेद एका चच्या पाठीमागें टिंब देऊन (जसें ·च) व दुसरा जशाचा तसाच काढून दाखवावेत, अशी युक्ति दादोबांच्या वेळीं निघाली होती, व मोल्स्वर्थच्या पूर्वी शिळेवर छापलेल्या शास्त्र्यांच्या मराठी कोशांत याच पद्धतीचा उपयोग केलेला आहे. पण हा खटाटोप पुढें कोणी चालविला नाहीं. मराठी ज्यांची जन्मभाषा आहे अशा लहान मुलांस हे उच्चार निरनिराळे आहेत असें सांगण्याची कधींच जरूर पडत नाहीं. साहेब लोकांसारखे परकीय लोक जेव्हां मराठी भाषा शिकतात तेव्हां त्यांच्या करतां या उच्चार भेदांची फोड करणें जरूर पडतें. पण मराठी शालोपयोगी पुस्तकें कांहीं साहेब लोकांकरितां लिहावयाचीं नाहींत हेंही त्याचबरोबर लक्षांत ठेविलें पाहिजे." [४३]

---

४१ *G. D. Vol,* 540. 1840. p. 136.

४२ *Ibid.* p. 140.

४३ **लोकमान्य टिळकांचे लेख, भाग ४. १९३०. पृ. ३९८–३९९.**

दादोबांनीं 'भाषाविचार' या विभागांत नामांचे प्रकार, लिंग, वचन, विभक्ति, सर्वनाम, विशेषण, क्रियापद इत्यादींचे नियम उदाहरणांसह दिले आहेत. 'भाषा-विचार' हा शब्दप्रयोग चुकीचा असून त्याऐवजीं 'शब्दविचार' हा शब्द वापरणें इष्ट असल्याचा निर्णय बाळशास्त्री जांभेकर व मे. कॅंडी या दोघानींहि दिला.

दादोबांनीं प्रथम शब्दांच्या फक्त पांच जाती केल्या होत्या. त्या म्हणजे नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद आणि अव्यय या होत; परंतु मे. कॅंडी यांना हे विभाग पसंत पडले नाहींत. त्यामुळेंच कीं काय इ.स. १८५० च्या दुसऱ्या आवृत्तीमध्यें दादोबांनीं आपला निर्णय बदलला. ते लिहितात:-

"या व्याकरणाच्या प्रथमावृत्तींत शब्दांच्या जाति पांच केल्या होत्या. परंतु त्यांत सविभाक्तिकादि मुख्य भेद दर्शविले नव्हते. हे भेद दर्शविल्यावर या आठ जाति पृथक कल्पिणें कांहीं अप्रशस्त नाहीं, असें माझ्या एका विद्वान् मित्राचें मत पडलें, व तें मला प्रशस्त दिसलें, यावरून या आठ जाति एथें दर्शविल्या आहेत." [४४] हा विद्वान् मित्र कोण हें समजणें कठीण आहे; परंतु मे० कॅंडी यांच्या म्हणण्याप्रमाणें बदल झाला असावा असें वाटतें.

शब्दांच्या प्रकाराप्रमाणें विभक्तींच्या संख्येबद्दलहि चर्चा करून दादोबांनीं विभक्तींची संख्या आठ ठरविली. 'या विभक्तीविषयीं या मराठी भाषेंत फार गोंधळ आहे, तो काढून टाकण्याच्या उद्देशानें, गंगाधरशास्त्री फडके यांनीं, साठीं, करितां, पासून, कडून, पेक्षां इत्यादि अव्ययें विभक्ति प्रत्यय म्हणून दिले होते, [४५] ते चुकीचे असल्याचें दादोबांनीं ठरविलें. [४६]

विभक्तीबद्दलचें विवरण करतांना दादोबांनीं आणखी एका विवाद्य मुद्यावर आपलें म्हणणें मांडलें. तो म्हणजे मी आणि तूं या सर्वनामांचीं तृतीयेचीं एकवचनी रूपें जीं म्यां आणि त्वां यांच्या उपयोगाबद्दल होय. ते म्हणतात:—

"म्यां, त्वां, असें देशस्थां मध्यें बोलण्याचा फार पाठ आहे, व्याकरण रितीनें पाहिलें असतां जसें तो या सर्वनामाचें त्याणें हें तृतीयेचें रूप होतें. तसीं मीं, तूं या सर्वनामांचीं हीं तृतीयेचीं निराळीं रूपें असावीं, व याप्रमाणें सर्वांचा बोलण्यांत आलें

---

४४ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.**
आ. २.१८५० पृ. २२.

४५ गंगाधरशास्त्री फडके, **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.**
आ. १.१८३६ पृ. १०-११.

४६ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **मराठी भाषेचें व्याकरण.**
आ. १. १८३६. पृ. ३९

असतां फार बरें आहे; परंतु मराठी भाषारूप वर्तुलाचा मध्यबिंदु जें पुणें, तेथें मीं तूं या सर्वनामांचीं तृतीयेचीं रूपें फिरत नाहींत, म्हणोन मी या व्याकरणांत त्याच रीतीस अनुसरून मी, तूं या तृतीयेचा रूपांस पहिली जागा दिली आहे." [४७]

दादोबांच्या या मताला मे० कँडी यांनीं कसून विरोध केला. त्यांचें म्हणणें त्यांच्याच शब्दांत देणें इष्ट आहे. ते लिहितात :—

" The author has, I think, committed a great blunder here. He states that म्यां and त्वां are very much used by the people of the Deccan as the 3 rd cases of मी and तूं, that they are grammatically correct and that it is desirable that all should use them, yet because मी and तूं are used at Poona as forms of the 3 rd case (in violation of grammatical analogy) he gives the preference to them. He might have mentioned these forms (with a mark of reprobation), but should have given the preference to the forms that are both more extensively used and are grammatically correct." [४८]

मे. कँडी यांच्या या मताविरुद्ध बाळशास्त्र्यांचाहि अभिप्राय होता. या रस्सी-खेंचींत शेवटीं मे. कँडी यांचाच विजय झाला. त्यांनीं तयार केलेल्या किंवा तपासलेल्या सर्व शालेय पुस्तकांत त्यांच्या म्हणण्याप्रमाणेंच 'म्यां' आणि 'त्वां' हीं रूपें वापरलीं गेलीं. काळाच्या ओघांत मात्र तीं गडप झालीं व आज 'मीं' आणि 'तूं' हींच दादोबांच्या मताप्रमाणें असलेलीं तृतीया विभक्तीचीं रूपें सरसकट लेखनांत वापरलीं जात आहेत.

दादोबांच्या व्याकरणावरील टीकेंत मे. कँडी यांनीं आणखी एका वादग्रस्त मुद्यावर आपला निर्णय दिला. दादोबांच्या मतें 'करत आहे,' 'करतो' इत्यादि रूपें शुद्ध होतीं, तर मे. कँडी यांना 'करीत आहे,' 'करितो' इत्यादि रूपें व्याकरणशुद्ध वाटलीं व तीं त्यांच्यामुळें शालेय पुस्तकांच्या द्वारा सर्वांच्या लेखनांत आलीं.

दादोबांच्या व्याकरणाबद्दल लिहीत असतांना मे. कँडी यांच्या टीकेचा उल्लेख वारंवार केलेला आढळेल. त्याचें कारण इतकेंच कीं दादोबासारख्या व्याकरणज्ञाचीं मतें मे. कँडी यांना पुष्कळ वेळां अमान्य होत व ते आपल्या म्हणण्याप्रमाणें आपलीं मतें शालेय पुस्तकांमधून वापरीत व त्यांचा फैलाव करीत, या गोष्टीची स्पष्ट कल्पना यावी.

---

४७ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **मराठी भाषेचें व्याकरण**, आ. १ १८३६. पृ. ७३–७४.

४८ *G. D. Vol.* 540. 1840. p. 137.

दादोबांनीं 'मराठी भाषेचें व्याकरण' रचतांना जे श्रम केले व 'शब्दाचे प्रकार, कर्ता, कर्म, काळ, प्रयोग, समास आदिकरून जे मराठी व्याकरणाचे उपयोगी विचार' लोकांसमोर मांडिले त्यांचें योग्य मूल्यमापन बाळशास्त्री जांभेकरांच्या शब्दांत करावयाचें तर :—

" . . . arranged under a few clear and brief rules, giving great deal of what is necessary for a student of Marathi . . . it must be recollected that Dadoba is the first who has ventured to analyse thee rules as the other Grammars that have been published are nearly silent on the subject." [४९]

खुद्द दादोबासुद्धां 'वाक्यरचना' या प्रकरणांत लिहितात, 'या पाठांत वाक्यामध्यें शब्दांची योजना कसकशी करावी, व कोणता शब्द कोणत्या शब्दाशीं संबंध ठेवतो, हा विचार केला आहे.... मराठी व्याकरणांत या रिती लिहिणें हा केवळ पहिला आणि नवा मार्ग आहे.' [५०] पहिल्या आवृत्तीच्या वेळीं अशा एकोणीस 'रिती' दिल्या होत्या, पण दुसऱ्या आवृत्तींत आणखी सातांची भर त्यांनीं घातली आहे. या नियमांतील कांहीं पुढील काळांत मराठी भाषेची वाक्यरचना स्थिरावण्याच्या कामीं उपयोगी पडले. म्हणूनच दादोबांच्या या कामगिरीचा बाळशास्त्री जांभेकरांनीं केलेला गौरव यथार्थ आहे असें म्हणावें लागतें.

दादोबांना आपल्या व्याकरणपुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्यावेळीं शाळापुस्तक मंडळी व सरकार यांच्याकडे अर्जविनंत्या कराव्या लागल्या होत्या; पण इ. स. १८४५ च्या डिसेंबरमध्यें शिक्षामंडळीनें दादोबांना विनंति केली कीं, 'तुमचें व्याकरण पुनः छापणें अवश्य आहे, त्यास तुमच्या मनांत त्यांत कांहीं-फेरफार करायाचा असल्यास तो करून तुम्ही दुसरी आवृत्ति तयार करावी.' पहिल्या आवृत्तीच्या वेळीं दादोबांना झालेला त्रास व दुसरी आवृत्ति तयार करण्याची शिक्षा मंडळीची विनंति पाहिल्यावर असें वाटतें कीं, त्यावेळीं इतर व्याकरणपुस्तकांपेक्षां दादोबांच्या पुस्तकाची आवश्यकता व उपयुक्तता शिक्षामंडळीला जास्त पटली होती. शिक्षामंडळीच्या सूचनेनुसार दादोबांनीं आपल्या व्याकरणग्रंथाची पुनर्रचना करून नवीनच पुस्तक तयार केलें. तें छापण्याच्या अगोदर बाळशास्त्री जांभेकर यांना तें

---

४९ *G. D. Vol.* 540. 1840. PP 144–145.

५० दादोबा पांडुरंग तर्खडकर, **मराठी भाषेचें व्याकरण**. आ. १. १८३६. पृ. १६३.

दाखविण्यांत आलें. बाळशास्त्र्यांनीं त्यावर एक टीकालेख लिहिला. दादोबांना त्यांचे मुद्दे न पटून ते खोडून टाकण्यासाठीं त्यांनीं उत्तरदाखल प्रतिटीकालेख लिहिला. त्यांत एक मुद्दा 'ज्याणें करून' 'त्याणें करून' इत्यादि शब्दप्रयोगांबद्दल होता. दादोबांच्या मतें 'जण करून' 'तेणें करून' हीं रूपें बरोबर होतीं. बाळशास्त्र्यांना उत्तर लिहितांना ते म्हणतातः—

"These forms, though partly consistent with the rules of grammar, are yet wholly devoid of the idiom of the language; No man in Maharastra can use ज्याणेंकरून and त्याणेंकरून, and as the main object of grammar is to follow and not to violate the long established usages of a language tho' they may be the exceptions to the general rules, I do not therefore think that the adoption of the yet – never – used forms ज्याणेंकरून etc. is warrantable." [५१]

याशिवाय आणखी कांहीं मुद्यांबाबत दादोबा व बाळशास्त्री यांच्यामध्यें मतभेद होते. च, छ, ज आणि झ या अक्षरांच्या तालव्य व दंततालव्य उच्चारांतील फरक दाखविण्यासाठीं त्या अक्षरांच्या मागें वापरावयाच्या बिंदूबद्दल लिहितांना बाळशास्त्री म्हणतात कीं या अक्षरांचे उच्चार संस्कृतमध्यें जसे करितात तसे तालव्य करावे असा एकादा नियम असावा. दंततालव्य उच्चार दाखविण्यासाठीं या अक्षरांच्या ओळीच्या डाव्या बाजूस जो बिंदु देण्याची पद्धति यावेळीं पडली होती तिची विशेष आवश्यकता बाळशास्त्र्यांना आतां वाटत नव्हती. तसेंच ज्या शब्दांच्या अंतीं दंततालव्य च, ज व झ हे वर्ण असतात, त्यांस विभक्तिप्रत्ययासह 'य' जोडावा, म्हणजेच त्याच्यास त्याच्यानें अशीं रूपें करावीं असें त्यांचें मत होतें; परंतु दादोबांना तें पसंत नव्हतें.

तसेंच 'ड' या अक्षराचा कित्येकदां 'र' सारखा होणारा उच्चार, 'त्याणें' 'ह्याणें' इत्यादींबद्दल 'त्यानें', 'ह्यानें' अशीं रूपें, 'येथें', 'द्वित्त', 'ह्मोटा' वगैरे शब्दांची चुकीची लेखनपद्धति इत्यादि बाबतींत दादोबा व बाळशास्त्री यांचें मताभिन्नत्व होतें. हा सर्व पत्रव्यवहार सरकारी दप्तरांत पहावयास सांपडतो. [५२] परिशिष्ट तीनमध्यें तो मुद्दाम दिला आहे.

---

५१ *D. P. I. Board of Education, Miscellaneous*, 1847. p. 10.

५२ *Ibid.* pp. 8–21.

पुणे नगर वाचन मंदिर, पुणे २.
वर्ग.....क्रमांक.....

दादोबा आणि बाळशास्त्री यांच्यामधील मतभेदांचा खरेखोटेपणा जाणून घेण्यासाठीं हा पत्रव्यवहार मेजर कॅंडी यांच्याकडे गेला. त्यांनीं रे. स्टीव्हेन्सन, रामचंद्रशास्त्री, परशुरामपंत गोडबोले वगैरे तज्ज्ञांचीं मतें घेऊन शेवटीं फार कडक शब्दांत आपलें मत व्यक्त केलें. पहिल्या आवृत्तीच्या वेळीं दाखवून दिलेल्या चुका दुरुस्त न करतां दादोबांनीं दुसरी आवृत्ति तयार केल्यामुळें कॅंडी चिडले व त्यांनीं दादोबांच्या लेखनपद्धतीवर खरमरीत टीका केली. ते आपल्या टीकालेखांत लिहितात:—

" ... Under the present circumstances, those who are endeavouring to direct and advance the progress of education and literature must feel that much responsibility rests upon them. If solecisms and barbarisms are now sanctioned and published by authority, they may obtain such a firm hold in the language as to vitiate it for ever. I trust that Mr. Dadoba Pandurang, for whom I feel unfeigned respect as one who has endeavoured to benefit his countrymen, will not be offended at the freedom with which I have expressed myself. My remarks are not directed against him personally, but against what I consider his solecisms. I invite him to unite his efforts with mine to banish barbarisms, and to inculcate correct views of composition." [५३]

मुलांच्या हातीं जीं पुस्तकें द्यावयाचीं तीं व्याकरणशुद्ध भाषेमध्यें लिहिलेलीं असणें आवश्यक आहे या धोरणानुसार मे. कॅंडी यांनीं दादोबांसारख्या व्याकरणकाराला सुद्धां दोष द्यावयास मागें पुढें पाहिलें नाहीं, ही गोष्ट वरील उताऱ्यावरून स्पष्ट होण्यासारखी आहे. कॅंडी यांच्या सूचनांप्रमाणें दादोबांनीं आवश्यक त्या सुधारणा करून 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' इ. स. १८५० मध्यें छापिलें.

इ. स. १८३६ पासून त्यांच्या व्याकरणाची दुसरी आवृत्ती तयार होईपर्यंतच्या मधल्या काळांत दादोबांनीं संस्कृत भाषेच्या व्याकरणाचा अभ्यास केला. त्यामुळें साहजिकच दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं या अभ्यासाचा त्यांना उपयोग करतां आला. या व्याकरणाच्या त्यांच्या हयातींत, इ. स. १८५७ मध्यें तिसरी, इ. स. १८६६ मध्यें चौथी, इ. स. १८६९ मध्यें पांचवी, इ. स. १८७२ मध्यें सहावी व इ. स. १८७९ मध्यें सातवी, अशा आवृत्त्या निघाल्या. दादोबांच्या व्याकरण पुस्तकाच्या व्यतिरिक्त

---

५३ *D. P. I. Board of Education*, 1848. p. 158.

दुसरा आदर्श व्याकरणग्रंथ नसल्यामुळें, इ. स. १८५६ मध्यें सरकारी विद्याखात्यानें दादोबांकडे त्यांच्या व्याकरणपुस्तकाचा मालकी हक्क विकत देण्याबद्दल विचारणा केली परंतु दादोबांनीं तो विकण्यास साफ नकार दिला; त्याचबरोबर विद्याखात्याला आवश्यक तेवढ्या प्रतींचा पुरवठा करण्याचें आश्वासन दिलें. याचवेळीं विद्याखात्यानें दादोबांना त्यांच्या पुस्तकांत कांहीं सुधारणा करण्याबद्दल सुचविलें; पण सुधारणांची आवश्यकता नसल्याचें त्यांनीं विद्याखात्याला कळविलें. त्यामुळेंच कीं काय, या पुस्तकाच्या सहा पर्यंतच्या आवृत्त्या दुसऱ्या आवृत्तीबरहुकुम छापल्या गेल्या. या पुस्तकाला शालेय शिक्षणमक्रांत मराठी भाषेच्या अभ्यासाच्या दृष्टीनें महत्त्वाचें स्थान असल्यामुळें तें विकत घेण्याचा विद्याखात्यानें पुन्हां पुन्हां प्रयत्न केलेला दिसतो. प्रत्येक खेपेला दादोबांनीं नकार दिल्यामुळें, कृष्णशास्त्री गोडबोले यांचें 'मराठी भाषेचें नवीन व्याकरण' विद्याखात्यानें विकत घ्यावें व दादोबांच्या व्याकरणाचें अभ्यासक्रमांतून उचाटण करून त्याऐवजीं तें वापरावें अशीहि एक सूचना पुढें आली. यावेळीं झालेल्या पत्रव्यवहारांत दादोबांच्या व्याकरणाचा मालकीहक्क विकत घेण्याबद्दलचा खालील उल्लेख महत्त्वाचा आहे. तो असा :—

"There is one circumstance in regard to Dadoba's grammar which requires mention. The copy-right of the work does not belong to Government and Mr. Dadoba is not willing to part with it for a less sum than ten thousand rupees. He will not improve his work so as to keep pace with the advance of education and will not let Government revise and improve it, by the exorbitant amount he asks for copy-right".[५४]

इ. स. १८७८ मध्यें सहावी आवृत्ति सुधारून सातवी आवृत्ति छापण्याची वेळ आली तेव्हां पुन्हां एकदां आपल्या पुस्तकांत पुष्कळ भर घालण्याची दादोबांची इच्छा होती; परंतु पुस्तकाची किंमत वाढेल व शालेय पुस्तकें शक्यतों कमी किंमतींत मुलांना द्यावीं असा विद्याखात्याचा कटाक्ष असल्यामुळें 'मागील सहावी आवृत्ति फार बारकाइनें शब्दशः तपासून, ठिकठिकाणीं शोध घालून नवनवे अगत्याचे नियम व अर्थाचीं प्रकाशनें व एकदोन नवीं प्रकरणें प्रविष्ठ करून पन्नास पृष्ठांनीं हा ग्रंथ वाढविला आहे,' असें दादोबा आपल्या व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत लिहितात.

---

५४ *D. P. I. Book Depot, Vol. XL*, 1873–74, (*No paging.*)

विद्याखात्याच्या नियमांचें पालन करून दादोबांनीं आपल्या व्याकरणग्रंथाची सातवी आवृत्ति इ. स. १८७९ मध्यें छापिली खरी. तथापि मातृभाषेबद्दलच्या तळमळीमुळें, तिच्यांतील पुष्कळसे बारकावे व खांचाखोंचा भाषाभिमानी अभ्यासकांसमोर आणाव्या या हेतूनें त्यांनीं ' मोठ्या महाराष्ट्र व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीची पूरणिका ' इ. स. १८८१ मध्यें सरकारी आश्रयानें छापिली. पूरणिकेला इंग्रजी व मराठी अशा दोन विद्वत्तापूर्ण प्रस्तावना त्यांनीं जोडलेल्या आहेत. त्यांत मराठी भाषेबद्दलची त्यांची तळमळ दिसून येते. मृत्युशय्येवर पडून पूरणिकेचीं मुद्रितें त्यांनीं तपासलीं. यावेळीं तेवीस वर्षांच्या त्यांच्या मुलाच्या निधनानें झालेलें दुःख बाजूला सारून त्यांनीं हें काम केलें. मराठी भाषेबद्दलचे त्यांचे विचार खालील उताऱ्यांत पहावयास मिळतात ते असेः—

"Now to lift that poor child up by my weak but sympathizing hands in order to bring it gently from that dark corner in which it is now hid, into the light of the hall, is the main object which has actuated me to toil in this new and untrodden field of researches into the grammatical and philological structure of the Marathi language, at the first and and last stage of my life, by descending—some may feel apt to think somewhat too deeply and tediously into the details and minutiae of its internal composition and organism. And, if I could but succeed in shewing in these my grammatical treatises almost to a demonstration to the present and future generation the vital force, ingenuity, and little niceties and shades of meaning, which the Marathi language exhibits in its internal structure, and which constitute its peculiar characteristic, in which, I make no hesitation here to assert that few languages in India, except perhaps Tamil and Teloogoo of the Southern group, can rival if not excel; begging also with due deference to add, that if I could but succeed in awakening the sympathy of our educational authorities in this presidency to give this language its proper and appropriate place in the calender of the Bombay University, and the curriculum of all the Government Vernacular Schools in this presidency, I should never cease to consider that all the labours and anxieties which I have undergone in the prosecution of the grammatical analysis of the Marathi

language,under the great hardships to which I have just alluded above, will be amply rewarded. [५५]

दादोबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या व्याकरणग्रंथाच्या, इ. स. १८८५ मध्यें आठवी, इ. स. १८८९ मध्यें नववी, इ. स. १८९४ मध्यें दहावी आणि इ. स. १८९९ मध्यें अकरावी अशा चार आवृत्त्या एकोणिसाव्या शतकाच्या शेवटापर्यंत निघाल्या. त्या काढतांना मूळ पुस्तकांत कांहीं ठिकाणीं सुधारणा करण्याबद्दलची चर्चा सरकारी गोटांत सुरू झाली; परंतु पुस्तकाचा मालकी हक्क दादोबांनीं विकलेला नसल्यामुळें त्यांच्या मुलांची परवानगी घेणें आवश्यक होतें. यावेळीं दादोबांच्या दोन मुलांनीं—बाबाजी आणि श्रीनिवास—सरकारला लिहिलें:—

"Our sincere hope is that the book is not made to suffer in its merits. We are compelled to say this because you will no doubt agree with us that the Marathi language has made no very appreciable advance and that the grammar is the fruit of a whole life of mental application, research, concentration and grasp of understanding and as such in our humble opinion, it is only a Dadoba who can correct Dadoba's Grammar." [५६]

गंगाधर रामचंद्र टिळक

दादोबा पांडुरंग यांचें वर उल्लेखिलेलें 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' शाळांमधील मुलांना सहज आकलन होण्यासारखें नव्हतें. याउलट बाळशास्त्री जांभेकर यांचें 'बालव्याकरण' फारच अपुरें होतें. त्यामुळें इ. स. १८५८ मध्यें, शाळेंतील मुलांना समजेल अशा एकाद्या व्याकरण पुस्तकाची गरज भागविण्याच्या दृष्टीनें गंगाधर रामचंद्र टिळक यांनीं एक छोटेसें व्याकरण तयार करून 'लघु व्याकरण' या नांवानें प्रसिद्ध केलें होतें. प्रथमावृत्तीवर लेखकाचें नांव नसून त्याऐवजीं 'सरळ रेघ आणि गोलीय त्रिकोणमितीचा कर्त्यानें केलें' असा नामनिर्देश आहे. अशाप्रकारच्या पुस्तकाची आवश्यकता यावेळीं फार भासत असल्यामुळेंच कीं काय लगेच दुसऱ्या वर्षीं इ. स. १८५९ मध्यें या पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघाली 'ही पुनरावृत्ति मीं यथामति सुधारून मेहरबान मेजर कँडी साहेब मराठी ट्रान्सलेटर इजुकेशनल डिपार्टमेंट ह्यांजकडे तपासण्याकरितां पाठविली, ती त्यांनीं लोकोपकारार्थ राजमान्य राजश्री परशुराम पंत

---

५५ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **मोठ्या महाराष्ट्र व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीची पूरणिका**. १८८१. इंग्रजी प्रस्तावना पृ. ५–७.

५६ *D. P. I. Book Depot, Vol.* 59, 1894–95 (*No paging.*)

तात्या गोडबोले ह्यांच्या सहाय्यानें पुष्कळ श्रम घेऊन शोधिली; व कितीएक विषय अधिक घातले.' असें लिहून आपल्या पुस्तकाची आवश्यकता प्रतिपादण्यासाठीं लेखक म्हणतोः—

"व्याकरणाचा उपयोग मनुष्यमात्रास आहे. स्वभाषेचें व्याकरण शिकल्यापासून आपल्या भाषेंतील कोणताही विषय समजण्यास सोपें पडतें, व शुद्धाशुद्ध समजतें, इतकेंच नव्हे; तर कोणतीही परभाषा शिकणें फार सुलभ पडतें. याजकरितां स्वभाषेचा व्याकरणाचें ज्ञान करून घेणें, हें मनुष्यमात्रास उचित आहे.

"सांप्रत थोडक्यांत व्याकरणाचा मूलतत्त्वांचें ज्ञान होण्यासारिखें बालव्याकरणाचें पुस्तक आहे; परंतु तें शिकल्यानें ग्रंथावरून व्याकरण करण्याची शक्ति येत नाहीं याजकरितां गंगाधरशास्त्री, दादोबा यांचा व्याकरणांतील कांहीं विषय पहावे, तर ते मोठ्या प्रौढ गीर्वाण शब्दांनीं प्रचुर असून फारच लांब आहेत; यामुळें मुलांच्या बालबुद्धीस ग्रहण होत नाहींत, व स्मरणांतही रहात नाहींत; म्हणून ग्रंथावरून व्याकरण करितां येण्यासारिखें लहानसें व्याकरण असण्याची सर्वांची अपेक्षा पाहून, तदनुरूप हें पुस्तक केलें आहे." [५७] थोडक्यांत दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं ते लिहितात त्याप्रमाणेंः—

" भाषारव्य सिंधूतिल शब्दरत्नें
लोकोपकारास्तव फार यत्नें ॥
घेऊन गंगाधर बालकांशी,
देतो अशा सुंदर भूषणांशी ॥ १ ॥" [५८]

दादोबा अगर गंगाधरशास्त्री फडके यांच्या व्याकरण पुस्तकांत संस्कृत शब्द फार येतात व त्यामुळें मुलांना विषय समजणें कठीण पडतें असें जरी टिळक म्हणतात, तरी तोच दोष त्यांच्याहि 'लघु व्याकरणां' त दिसून येतो. मेजर कॅंडी यांनीं हें पुस्तक तपासून बरोबर तेथेंच बोट ठेविलें. हें पुस्तक तपासतांना आपण दादोबा पांडुरंग, गंगाधरशास्त्री फडके, रे. स्टीव्हेन्सन व रे. बर्जेस यांचीं व्याकरणपुस्तकें पाहिल्याचें सांगून मेजर कॅंडी म्हणतातः—

"On page 10, he says, जाति किंवा अधिकारवाचक जें नाम म्हणजे व्यक्तिनिष्ठधर्म अनेक व्यक्तींवर वर्ततो; and again, a little further on. जें नाम एकाच अधिकरणास धरून राहतें, म्हणजे व्यक्तिनिष्ठधर्म अन्य व्यक्तिबोधक

---

५७ गंगाधर रामचंद्र टिळक, **लघु व्याकरण**. आ. १. १८५८. प्रस्तावना पृ. १–२

५८ गंगाधर रामचंद्र टिळक, **लघु व्याकरण**. आ. २. १८५९. मुखपृष्ठ.

होत नाहीं. Here the clauses that म्हणजे are meant to be explanations of the clauses that precede it but the explanations are much more difficult than the clauses they are meant to explain; indeed none but Sanscrit scholars will understand them " ५९.

संस्कृत शब्दांचा अतिरेकी उपयोग या दोषाशिवाय पुस्तकाच्या भाषेविषयीं मेजर कँडी आपलें मत देतांना म्हणतातः—

" The author has here and there violated the rules of idiomatic composition. For instance, at page 10, he says जाति किंवा अधिकारवाचक, which is bad composition. The word वाचक cannot be made to apply to जाति as well as to अधिकार while किंवा is between the two nouns. He might have said जात्यधिकार-वाचक, but the way is जातिवाचक किंवा अधिकारवाचक जें नाम, etc ". ६०

टिळक यांच्या पुस्तकांतील हे दोष कँडी यानांच दिसले असें नव्हे तर अन्य-ठिकाणींसुद्धां या पुस्तकावर टीका झाली. उदाहरणार्थ 'पुणें पाठशाळापत्रक'कार म्हणतात :—

" हें व्याकरण करण्याचा उद्देश, बाल व्याकरण फारच लहान व त्यांत पारि-भाषिक शब्द पुष्कळ आणि गंगाधर शास्त्री व दादोबा ह्यांचीं व्याकरणें फार कठीण म्हणून सुलभ आणि चांगलें व्याकरण असावें याकरितां हें केलें आहे असें ग्रंथकर्ता प्रस्तावनेंत लिहितो, परंतु प्रस्तावना संपतांच विषयास आरंभ करण्यापूर्वी अथ सुबंत प्रारंभ : असें लिहिलें आहे. आतां ह्या वाक्यापासून संस्कृतभाषानभिज्ञ पंतोजी लोक व ज्यांस व्याकरण हा शब्द देखील शुद्ध उच्चारतां येत नाहीं अशीं सहासात वर्षांचीं मुलें काय समजतील बरें ? ह्यावरून मागच्या पृष्ठांत दर्शविलेला हेतु ग्रंथकर्ता इतक्यांतच विसरला असें दिसतें. असें होण्याचें कारण तारतम्य विचाराची कमताई हेंच असावें. कारण कित्येक विद्वान लोक एखादा ग्रंथ लिहूं लागले किंवा कोणास पाठ सांगूं लागले म्हणजे आपण कोणाकरितां लिहीत आहों अगर कोणास पाठ सांगत आहों व त्यांची योग्यता किती हें विसरतात आणि आपलीच विद्वत्ता दाखविण्याच्या बुद्धीनें विषय कठीण करतात." ६१

अशाप्रकारची कडक टीका होऊन सुद्धां या पुस्तकाच्या सहा वर्षांत सहा आवृत्त्या निघाल्या. सहावी आवृत्ति इ. स. १८६४ मध्यें बाहेर पडली. यावरून अशासारख्या व्याकरण पुस्तकाची किती आवश्यकता त्यावेळीं होती हें स्पष्ट दिसून

---

५९ *D. P. I. Miscellaneous, Vol. 27.* 1858. p. 260.
६० *Ibid.* p. 262.
६१ **पुणें पाठशाळापत्रक**. पु. १ अं. ७. १८६१. पृ. १६५.

येतें. खुद्द दादोबांनीं आपलें 'लघु व्याकरण' इ. स. १८६५ मध्यें प्रसिद्ध केल्यावर टिळकांचें 'लघु व्याकरण' मुलांच्या अभ्यासक्रमांतून काढून टाकलें गेलें. मध्य-भागांतील एज्युकेशनल इन्स्पेक्टर कप्तान टी. वॉडिंग्टन यांनीं आपल्या भागांतील शाळांतून असा हुकूम काढला कीं, "गंगाधर रामचंद्र टिळक यांचें लघु व्याकरण मध्यभागांतील सर्व शाळांत तारीख १ जानेवारी १८६६ पासून शिकविणेचें बंद केलें आहे. गंगाधर रामचंद्र यांचे लघुव्याकरणाचे ठिकाणीं दादोबा पांडुरंग यांनीं केलेलें व्याकरण शिकविण्याचा ठराव केला आहे." [६२]

दादोबांचें 'लघु व्याकरण'

दादोबांच्या नांवाची व त्यांच्या व्याकरण पुस्तकाची मोहिनी त्यावेळीं सरकारी विद्याखात्यावर किती पडली होती याची स्पष्ट कल्पना वरील हुकुमावरून होते दादोबांचें मोठें व्याकरण सर्वसाधारणपणें मुलांना आकलन होण्यास फार कठीण पडत असे; तथापि बाळशास्त्री जांभेकर यांचें 'बालव्याकरण' लहान मुलांच्या दृष्टीनें बरें. असल्यामुळें त्याच्यावर निर्वाह केला जाई. इ. स. १८६१ मध्यें विद्याखात्यातर्फे बाळशास्त्र्यांच्या 'बालव्याकरणा'ची पंधरा हजारांची एक आवृत्ति छापल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. त्यावरून असें म्हणावयास हरकत नाहीं कीं शाळांमधून लहान मुलांसाठीं हा काळपर्यंत 'बाल व्याकरण' अभ्यासिलें जात असे. 'बाल व्याकरण' त्या मानानें अगदींच जुजबी असल्यामुळें व त्याची रचना होऊन सुमारें तीस वर्षें होऊन गेलेलीं असल्यामुळें तें अपुरें असणें साहजिक होतें. म्हणूनच कीं काय विद्याखात्यानें दादोबांना त्यांच्या मोठ्या व्याकरणाचा संक्षेप करून एक छोटें व्याकरण तयार करावयास सांगितलें. दादोबा 'लघुव्याकरणा'च्या इ. स. १८६५ च्या प्रथमावृत्तीच्या प्रस्तावनेंत म्हणतात :—

"पहिल्या शिकणारांस व लहान मुलांस माझ्या मोठ्या व्याकरणाची समजूत पाडण्यास शिक्षकास फार कठीण पडतें म्हणोन पुष्कळ दिवसापासून बोभाट चालला होता. याकरतां त्याच व्याकरणाचा संक्षेप केला असतां तो बोभाट राहणार नाहीं, असा विचार करून विद्याखात्यांतलि अधिकाऱ्यांनीं मलाच तें काम करावयास सांगितलें; त्यावरून संतोषानें हें पुढील संक्षिप्त व्याकरण म्यां रचिलें आहे आणि त्याचें नांव लघु व्याकरण असें ठेविलें आहे." [६३]

---

६२ **मराठी शाळापत्रक**. पु ५. अं. ७. १८६५. मलपृष्ठ.

६३ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **लघु व्याकरण**. आ. १. १८६५. प्रस्तावना.

रावजी सदाशिवशास्त्री गोडबोले

दादोबांच्या हयातींत म्हणजे इ. स. १८८२ पर्यंत त्यांच्या 'लघु व्याकरणा'च्या बारा आवृत्त्या निघाल्या; परंतु इ. स. १८८५ च्या सुमारास कै. दादोबा पांडुरंग यांच्या 'लघु व्याकरणा' ची पुनरावृत्ति काढण्याची वेळ आली, तेव्हां तत्कालीन स्थितीला अनुसरून त्यांत विषयासंबंधानें पुष्कळ फेरफार करणें आवश्यक असल्याचें त्यावेळचे डी. पी. आय. चॅटफील्ड यास वाटल्यामुळें त्यानें माजी मराठी ट्रान्स्लेटर व दक्षिणा प्राइझ कमिटीचे सेक्रेटरी रावजी सदाशिव शास्त्री गोडबोले यांस नवीन व्याकरण करावयास सांगितलें. त्याप्रमाणें इ. स. १८८७ मध्यें त्यांनीं एक छोटें व्याकरण तयार केलें व तें 'मराठी भाषेचें मध्यम व्याकरण' म्हणून इ. स. १८९७ मध्ये लेखकाच्या मृत्यूनंतर सहा वर्षांनीं प्रसिद्ध झालें. 'मराठी भाषेची संक्रमणास्थिति अद्यापि चालू आहे व पुढें बराच काळपर्यंत ती चालू रहाणार. अशा स्थितींत कोणतेंही व्याकरण अपुरें व सदोष राहणारच. तथापि थोडक्यांत पद्धतवार व शास्त्रोक्त विवेचन ज्यांत केलें आहे अशा मराठी भाषेच्या व्याकरणाची उणीव प्रत्येकास भासत आहे. ही उणीव अंशतः तरी भरून निघावी असा ह्या व्याकरणाचा उद्देश आहे' [६४] रामचंद्र भिकाजी जोशी यांनीं 'कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे मराठी व्याकरणावरील निबंध' (१८९३) संपादित केले आहेत. त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत ते लिहितातः—

"दादोबांच्या मरणानंतर शाळांत चालण्यासाठीं लहान व्याकरण नवीन तयार करावें असें डायरेक्टर साहेबांच्या मनांत येऊन त्यांनीं तसें व्याकरण तयार करण्यासाठीं एक कमेटी नेमली होती असें आमच्या ऐकिवांत आहे. या कमेटींत तीन चार गृहस्थ असून ते चांगले अनुभविक विद्वान असे होते. परंतु व्याकरणासारख्या वादग्रस्त विषयावर ग्रंथ लिहिण्याचें काम कधीं तरी कमेटी नेमून होईल काय? अर्थात् त्या कमेटींतल्या गृहस्थांचीं मतें एकाचीं एकास न जुळतां वादविवाद उत्पन्न होऊन व्याकरण करण्याचें काम तसेंच पडलें. वास्तविक म्हटलें तर हें काम एकाच गृहस्थावर संपविणें रास्त होतें." [६५]

रा. जोशी यांचें वरील विधान व रावजी शास्त्री गोडबोले यांच्या व्याकरणाची वरील कुळकथा हीं परस्परविरोधी दिसतात. एवढें खरें कीं, कालमानाप्रमाणें दादोबांच्या व्याकरणांत फेरबदल करण्याची आवश्यकता विद्याखात्यास त्यावेळीं भासत होती.

---

६४ रावजी सदाशिवशास्त्री गोडबोले, **मराठी भाषेचें मध्यम व्याकरण.** आ. १. १८९७. प्रस्तावना.

६५ रामचंद्र भिकाजी जोशी, **कै. कृष्णशास्त्री चिपळुणकरकृत मराठी व्याकरणावरील निबंध.** १८९३ प्रस्तावना, पृ. ७. तळटीप.

दक्षिणा प्राइझ कमिटी व मराठी भाषेचें व्याकरण

मराठी भाषेचें आदर्श व्याकरण तयार करण्याचा असाच एक प्रयत्न इ. स. १८६३ मध्यें दाक्षिणा प्राइझ कमिटीच्या वतीनें झाला होता. त्यासाठीं कमिटीनें एक जाहिरात दिली होती ती अशीः—

"मराठी व्याकरणावर उत्तम प्रतीचा ग्रंथ कोणी तयार केल्यास दक्षिणा प्राइझ कमिटी त्या ग्रंथकर्त्यास उत्कृष्ट प्रतीचें बक्षीस देण्यास सिद्ध आहे. हा ग्रंथ मराठी भाषेंत असावा व त्यांतील विषय प्रतिपादन करण्याची शैली युरोपियन अर्वाचीन व्याकरणासारखी असावी. म्हणजे ग्रंथकर्त्यानें एकदोन उदाहरणांवरून एकादा व्यापक नियम कल्पून त्यावरून इतर सर्व उदाहरणांची उपपत्ति करावयास लागूं नये; तर जीं वास्तविक उदाहरणें असतील त्यांवरून नियम बांधावे. तसेंच भाषा कसकशी बदलत गेली याच धोरणानें ग्रंथकारानें शब्दसिद्धीचे व वाक्यरचनेचे नियम बांधून त्यांचें निरूपण करतांना मूळच्या संस्कृत भाषेंतून प्राकृत भाषा, जिला बालभाषा म्हणतात, तिच्याद्वारें व जुन्या मराठी भाषेच्या (ज्ञानेश्वरींतल्या वगैरे भाषेच्या) द्वारें हल्लींची महाराष्ट्र भाषा कशी निपजली हें संभवेल व शोभेल असें दाखवावें. तसेंच हल्लींच्या मराठींत फारशी व अरबी शब्द मिसळले आहेत, त्यांचेंही प्रकृतिप्रत्ययरूपानें विवेचन त्या ग्रंथांत बरेंच असावें. त्याप्रमाणेंच जुन्या मराठी कवींच्या ग्रंथांतील शब्दाची व शब्दरचनेची उपपत्ति होईल, असे नियम या ग्रंथांत असावे. या ग्रंथांतील सिद्धांत एकदेशी नसतां होतील तितके व्यापक असावे. ज्याचा ग्रंथ उत्तम होईल त्यास प्रथम पांचशें रुपये द. प्रै. कमिटी देईल व त्या ग्रंथाच्या विक्रीच्या पैशांतून आणखी पांचशें रुपये त्यास मिळतील. याप्रमाणें एकंदर एक हजार रुपये ग्रंथकर्त्यास मिळतील."[६६] या जाहिरातीखालीं कृष्णशास्त्री चिपळुणकर नि. द. प्रै. क. अशी सही आहे.

वरील जाहिरातीबरहुकूम कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं पुस्तक लिहावयाचें ठरविलें; पण ज्या हॉवर्डसाहेबामुळें त्यांना तें लिहावेसें वाटलें तो सेवानिवृत्त झाल्यामुळें आणि दक्षिणा प्राइझ कमिटीच्या अंतर्व्यवस्थेमध्यें कांहीं प्रतिकुल फेरफार झाल्यामुळें लिहावयास घेतलेलें पुस्तक कमिटीतर्फे न छापतां आपण स्वतःच छापावें असें कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं ठरविलें व त्यावेळचे डी. पी. आय. ग्रँट यांनीं या पुस्तकाला मान्यता दिल्यामुळें दाक्षिणा प्राइझ कमिटीकडे मदतीची याचना करण्याची पाळी कृष्णशास्त्र्यांवर आली नाहीं.[६७] त्यांचें हें 'मराठी भाषेचें नवीन व्याकरण' इ. स. १८६७ मध्यें

---

६६ **पुणें पाठशाळापत्रक.** पु. ३. अं. ६. १८६३ पृ.

६७ *D. P. I. Book Depot- Vol.* XL. 1873–74. (No Paging)

छापिलें गेलें. पुन्हां इ. स. १८७४ मध्यें तें छापण्याच्या वेळीं, विद्याखात्याच्या वतीनें तें छापिलें जावें अशी एक सूचना पुढें आली; परंतु या पुस्तकाचा मालकी हक्क विकत घेण्यापूर्वी वापरांत असलेलें दादोबांचें पुस्तक सरकारमान्य पुस्तकांच्या यादींतून काढून टाकावें असाहि एक सूर या सूचनेंत होता. या सूचनेचा विचार करून मेजर कँडी यांनीं आपलें मत दिलें तें असें :--

"Though I think highly of the work, I do not recommend that it should be made the grammar. Let each grammar stand on its own merits. This grammar is well able to hold its own place.

"There are some difficult points in Marathi grammar respecting which grammarians differ. All will not approve of Mr. Godbole's way of solving them.

"I think that Mr. Godbole has given a little more than is necessary of disquisition on Sanskrit grammar, but of course he thinks it necessary and he may be right." [६८]

वरील उताऱ्यांतील विचारांवरून मेजर कँडी यांची सर्वांना सांभाळून घेण्याची वृत्ति व ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणें जो तो काम करतो व त्यापैकीं योग्य असेल तेंच काळाच्या ओघांत टिकून राहील ही भूमिका दिसते. दादोबासारख्यांच्या व्याकरण ग्रंथाचें सरकारमान्य पुस्तकांच्या यादींतून उच्चाटण करण्याचा धोका पत्करण्यास मेजर कँडी-सुद्धां तयार होईनात. यावरून दादोबांचे मराठी भाषेच्या व्याकरणाबद्दलचे विचार किती महत्त्वाचे होते याची कल्पना येते. कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं आपल्या व्याकरणाच्या मालकीहक्काबद्दल विद्याखात्याजवळ पंधराशें रुपये मागितले व ते त्यांना मिळाले. अशाप्रकारें इ. स. १८७४ मध्यें 'मराठी भाषेचें व्याकरण' या पुस्तकाची 'शोधलेली व वाढवलेली' दुसरी आवृत्ति निघाली. या पुस्तकाचें वैशिष्ट्य हें कीं त्यांत संस्कृत व प्राकृत भाषांशीं मराठीचा निकट संबंध, प्राकृत भाषेचें संक्षिप्त व्याकरण व संस्कृतप्राकृत शब्दकोश या पुस्तकाला जोडलेले आहेत.

प्रथमावृत्तींत फक्त 'शब्दविचार' महत्त्वाचा मानून त्यावर चर्चा केलेली होती. परंतु द्वितीयावृत्तींत 'वाक्यविचार' व 'पद्यविचार' नवीन आणि उपयुक्त पद्धतीवर रचून जोडलेले आहेत. विशेषतः 'वाक्यविचारा'बद्दल कृष्णशास्त्री गोडबोले लिहितातः-

---

६८ *D. P. I. Book Depot, Vol.* X L. 1873-74. (No. paging)

"कितीएक म्हणतात कीं वाक्यविचार मराठींत परकीय आहे, आणि तो तिच्या व्याकरणांत आणूं लागल्यास, इंग्रजी व्याकरणांतील वाक्यविचाराचा उतारा आणि अनुकरण होईल. परंतु लेखनांत आलेल्या इंग्रजी वगैरे इतर भाषांप्रमाणेंच मराठी भाषेसही स्वरूपसिद्ध वाक्यनिर्बंध आहेत असें बहुत सबळ प्रमाणांनीं दाखवितां येईल. प्रस्तुत विषयाचे उपपादनांत विशेषावरून सामान्याचें अनुकरण करण्याची रीति योजली आहे. मराठी भाषेंतील प्रयोग आणि संप्रदाय ताडून पाहिल्यानें येणारीं सामान्य अनुमानें किंवा नियम प्रथम देऊन, उदाहरणांनीं आणि प्राचीन कवींच्या लेखांनीं त्यांचें स्पष्टीकरण केलें आहे." [६९]

या पुस्तकानें मराठी भाषेच्या व्याकरणशास्त्राकडे शोधकदृष्टीनें पहावयास शिकविलें; परंतु त्याचा प्रसार जेवढा व्हावयास पाहिजे होता तेवढा झाला नाहीं. या पुस्तकाची तिसरी आवृत्ति इ. स. १८९५ मध्यें निघाली. या पुस्तकाचा उपयोग शाळांपेक्षांहि ट्रेनिंग कॉलेजांमधून विशेष होत होता, कारण तेथूनच तयार होणाऱ्या शिक्षकांकरवीं व्याकरणाचा शास्त्रशुद्ध अभ्यास शाळांमधून व्हावयाचा असतो. मूळ उद्देशाप्रमाणें या पुस्तकांत मराठी भाषेचा संस्कृत भाषेशीं कसा संबंध आहे तें उत्तम रीतीनें दाखविलें आहे. एका अर्थीं या पुस्तकांत व्याकरणाचें मुख्य अंग म्हणजे ऐतिहासिक अंग, त्याचेंहि परिपूर्ण विवरण केलेलें आढळतें. तरीपण असलें पुस्तक प्रथम शिकणारांस तेवढेंसें उपयोगी पडत नाहीं.

रामचंद्र भिकाजी गुंजीकर

विद्यार्थ्यांस उपयोगी पडणारें असें मराठी भाषेचें व्याकरण रचणारे आणखी एक लेखक रामचंद्र भिकाजी गुंजीकर हे होत. मराठी भाषेच्या व्याकरणाबद्दलच्या त्यांच्या कांहीं निश्चित कल्पना होत्या व त्या पुस्तकरूपानें 'लहान मुलांकरितां सुबोध व्याकरण' या नांवानें इ. स. १८८० मध्यें प्रसिद्ध होण्यापूर्वी, त्यांनीं 'विविध-ज्ञानविस्तार'मधून व्यक्त केल्या होत्या. मराठी भाषेचें व्याकरण कसें असावें याबद्दलचे विचार मांडतांना ते लिहितात :--

"नवीन व्याकरण तयार करणारानें मुख्यत्त्वें भाषेच्या स्वरूपाकडे विशेष लक्ष देऊन जशी भाषा विद्वज्जनांच्या प्रचारांत आहे तशी दाखविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या पदरचे नियम काढून अमुक तऱ्हा चांगली व अमुक वाईट हें सांगण्याचा डौल घालूं नये व भाषेचा वास्तविक प्रकार अमूक आहे, परंतु तो **व्याकरण दृष्ट्या अशुद्ध** अशा प्रकारचे विचार तर त्यानें आपल्या मनांत तर कधींच आणूं

---

६९ कृष्णशास्त्री गोडबोले, **मराठी भाषेचें व्याकरण**. आ. २. १८७४. सूचना, पृ. ९.

नयेत शब्दाच्या अनेक रूपांविषयीं लिहितांना त्यानें मूळ संस्कृत, प्राचीन प्राकृत किंवा बालभाषा, यांच्या स्वरूपाकडे नीट लक्ष देऊन प्रकृत विषयाची योग्य व्यवस्था केली पाहिजे. शब्दांदिकांचीं लक्षणें निर्दोष केलीं पाहिजेत. या सर्व गोष्टींहून विशेष लक्ष देण्याची गोष्ट, सर्व ग्रंथ सरळ आणि सोप्या रीतीनें लिहिण्याचा होईल तितका प्रयत्न झाला पाहिजे ही होय. मराठी व्याकरणामध्यें संस्कृत संधीविषयीं जे नियम द्यावयाचे ते ग्रंथाच्या आरंभीं न देतां शेवटीं द्यावे हें बरें वाटतें. आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती अशी, कीं कोणतेंहि प्रकरण, किंवा कोणतेही पारिभाषिक शब्द घ्यावयाचे असतां, इष्ट विषयाचें प्रतिपादन करण्यास जितक्यांची गरज असेल तितकेच घ्यावे, अधिक घेऊं नयेत, या गोष्टीकडे लक्ष दिल्यानें शिकणाराला फारच मदत होईल, व उगाच तो घोटाळ्यांत पडणार नाहीं. " ७०

भाषेच्या संप्रदायाकडे लक्ष न देतां व्याकरणदृष्टया शुद्ध मानलेले तेवढेच प्रकार भाषेमध्यें ठेऊन बाकीचे काढून टाकण्याचे जे प्रयत्न मेजर कँडी यांच्याहस्तें शालेय पुस्तकांच्या द्वारा होत होते ते गुंजीकरांना मुळींच मान्य नसल्यामुळें त्यांविरुद्ध बंड पुकारण्याच्या मनःस्थितींत वरील विचार त्यांनीं व्यक्त केलेले दिसतात. याचवेळीं विस्तारकर्ते व मेजर कँडी यांच्यामध्यें भाषाविषयक व व्याकरणविषयक वाद चालू होता. या वादाची रूपरेखा पुढें दिली जाईल. हे बंडखोर विचार गुंजीकरांनीं मेजर कँडी यांच्या निधनानंतर इ. स. १८८० मध्यें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केले. तसें पाहिलें तर भाषाविषयक वाद रंगांत असतांनाच इ. स. १८६९ मध्यें गुंजीकरांनीं 'महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धि' या नांवाची एक पुस्तिका प्रसिद्ध करून मेजर कँडी यांनीं घालून दिलेल्या मराठी भाषेच्या व्यकरणविषयक नियमांविरुद्ध बंड पुकारलेंच होतें. 'लहान मुलांकरितां सुबोध व्याकरण' या गुंजीकरांच्या पुस्तकामध्यें तीच बंडखोर वृत्ति दिसून येते. गुंजीकर म्हणतात :—

"वाक्यांत कर्माचें किंवा क्रियेचें प्राधान्य असतांही कर्ता जर मध्यमपुरुषीं एकवचनीं असेल, तर क्रियापदापुढें 'स' हें प्रशस्तपणें लागतें. जसें–तूं काम केलेंस तूं घरीं जावेंस इ. अनेकवचनीं कर्ता असल्यास त हें अक्षर क्वचित् लागतें जसें तुम्ही त्याला धरिलेंत इ० " ७१

---

७० **विविधज्ञानविस्तार**. पु. ३, १८७०. पृ. ३.

७१ रामचंद्र भिकाजी गुंजीकर, **लहान मुलांकरितां सुबोध व्याकरण**. १८८६ पृ. ७२.

सप्रत्ययान्त क्रियापदाचा उपयोग लेखनप्रकारांत केला जाऊं नये याबद्दल मेजर कँडी यांनीं नियम करून तो कटाक्षानें सर्वांस पाळावयास लाविला. सर्व शालेय पुस्तकांमधून व अन्य लेखनांतून नवीन नियम वापरला जाई. यावरून विद्याखात्यानें मान्य केलेल्या मेजर कँडीप्रणित व्याकरणानियमाविरुद्ध असलेली गुंजीकरांची दृष्टि स्पष्ट होते. गुंजीकरांनीं विषयाची रचनाच नवीन धर्तीवर केलेली आढळते. ' लहान मुलांचें सुबोध व्याकरण ' पुस्तकाच्या प्रस्तावनेंत ते लिहितातः—

" विभक्तीचें आणि क्रियापदांचें जाल उकलून त्यांतील गुंतागुंत समूळ काढून टाकली आहे.....मराठी भाषेंत येणाऱ्या कित्येक प्रयोगांची नीट व्यवस्था लावतां येत नाहीं अशी जी हाकाटी होती, ती दूर करण्याचा होईल तितका प्रयत्न केला आहे.... द्वितीया आणि चतुर्थी यांतील काल्पनिक भेद सोडून देऊन त्यांचे वेगवेगळे प्रत्यय दिले आहेत. तसेंच कर्तरि, कर्माणि, भावी किंवा भावेप्रयोग या विलक्षण संज्ञा न योजतां, त्यांच्या स्थळीं कर्त्याचें, कर्माचें आणि क्रियेचें प्राधान्य इत्यादि संज्ञा दिल्या आहेत. ' आख्यात ' हा एक फार उपयोगी शब्द प्रचारांत आणला आहे. तसेंच उत्तम, मध्यम, अन्यपुरुष या प्राचीन रीतीला मिळत्या संज्ञा यांत योजिल्या आहेत. " ७२

गुंजीकरांच्या या नवीन कल्पनांकडे जरी ' इंदुप्रकाश ' कारासारख्यांनीं लक्ष दिलें ७३ तरी पाहिजे तितका पाठिंबा न मिळाल्यामुळें त्यांचे हे व्याकरणविषयक विचार मागें पडले.

कृष्णशास्त्री चिपळुणकर

मराठी भाषेच्या व्याकरणाचा सशास्त्र अभ्यास करणाऱ्यांपैकीं कृष्णशास्त्री चि पळुणकर हे एक होत. ' शालापत्रक ' द्वारा त्यांनीं आपले व्याकरणविषयक विचार व्यक्त केले. जरी शाळांमधील मुलांच्या दृष्टीनें या विचारांचा प्रत्यक्ष उपयोग झाला नाहीं, तरी ट्रेनिंग कॉलेजांमधून या निबंधाचा उपयोग केला जात असे.हे निबंध लिहिण्याची आवश्यकता आपणांस कां भासली तें त्यांनीं पहिल्या निबंधांत सांगितलें आहे. ७४

अन्य व्याकरण पुस्तकें

इ. स. १८६५ पर्यंत जीं शालेय व्याकरणें तयार झालीं होतीं त्यांतील गुणदोष विवेचन करणारे पंचवीस निबंध 'मराठी शाळापत्रका' मधून कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं लिहून पुढील व्याकरणकारांस मार्गदर्शन केलें. या निबंधांच्या आधारें रामचंद्र भिकाजी

---

७२ रामचंद्र भिकाजी गुंजीकर, **लहान मुलांचें सुबोध व्याकरण**. १८८६ प्रस्तावना.

७३ **इंदुप्रकाश**, पु. २५, १६ ऑगष्ट, १८८६.

७४ **मराठी शाळापत्रक**, पु. ५, अं. १. १८६५. पृ. १९.

जोशी यांनीं 'प्रौढबोध मराठी व्याकरण' व 'बालबोध मराठी व्याकरण' असे दोन ग्रंथ लिहिले. शाळेंतील मुलांपेक्षा प्रौढ विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें ते जास्त उपयुक्त आहेत. खास लहान मुलांना व्याकरणासारखा अवघड व शास्त्रीय विषय सहज समजावा या हेतूनें गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत मराठी व्याकरणावरील अनेक छोटीं पुस्तकें लिहिलीं गेलीं. वामनाजी गोविंद लिमये यांचें 'पद्यात्मक व्याकरण' (१८६१) भास्कर बापूजी आठल्ये यांचा 'व्याकरणसंबंधीं उपयुक्त संग्रह' (आ. २, १८७३) गोपाळ जिवाजी केळकर यांचें 'लघु व्याकरण' (१८७५), 'विद्यार्थ्यांचा व्याकरणमित्र म्हणजे व्याकरणाविषयीं निवडक सूचना,' (१८८३), वामन अनंत भिडे यांचें 'मराठी भाषेचें सुलभ व्याकरण,' (१८९१), हरि परशुराम वागळे यांचे 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरणसार' (आ. २, १८९६), रे. गणपतराव रघुनाथ नवलकर यांचें 'नवीन मराठी व्याकरण' (१८९६), 'मराठी भाषेचें लहानसें व्याकरण,' (१८९६) गोविंद गणेश जोशी यांची 'मराठी व्याकरण व्याख्यानमाला,' (१८९७) गणेश बल्लाळ कान्हेरे यांचें 'मराठी व्याकरणसार,' (१८९७) इत्यादि लहानमोठीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं. त्यांपैकीं बहुतेकांनीं दादोबा पांडुरंग अगर कृष्णशास्त्री गोडबोले यांच्या व्याकरण ग्रंथांचा उपयोग केलेला आढळतो.

मेजर कँडी व मराठी भाषेचें व्याकरण

व्याकरणदृष्ट्या शुद्ध असे प्रयोग व संप्रदाय मराठी भाषेमध्यें असावे, मराठी भाषा व्याकरणनियमांच्या चौकटींत बसवावी व ठराविक नियमांप्रमाणें सर्वांनी लिहावें यासाठीं जरी मेजर कँडी यांनीं शालेय पुस्तकांच्याद्वारा अनेक वर्षें प्रयत्न केले, तरी स्वतः मात्र मराठी भाषेचें आदर्श व्याकरण रचलें नाहीं. सरकारी विद्याखात्याचें असें एकादें व्याकरण पुस्तक असावें या दृष्टीनें, मेजर कँडी यांच्या गैरहजेरींत इ. स. १८५६ मध्यें हंगामी मराठी ट्रान्स्लेटर म्हणून काम करीत असतांना भास्कर दामोदर पांळंदे यांनीं परशुरामपंत गोडबोले यांच्याकडून एक आदर्श व्याकरण तयार करवून ते शाळांमधून वापरलें जावें अशी सूचना पुढें आणली होती; परंतु ती अमलांत आली नाहीं.[७५] त्याचप्रमाणें या बाबतींत इ. स. १८६१ मध्यें दक्षिणा प्राइझ कमिटीच्या बैठकींत भास्कर दामोदर, मोरोबा कान्होबा, डॉ. हॉग्, रे. मिचेल, कृष्णशास्त्री चिपळुणकर आणि मेजर कँडी यांनीं चर्चा केली होती व त्या चर्चेंत भास्कर दामोदरनीं अशी सूचना मांडली कीं स्वतः मेजर कँडीनीं मराठी भाषेच्या व्याकरणावरील पुस्तक लिहावें. त्यावेळीं मेजर कँडीनीं फार मार्मिक उत्तर दिलें. ते म्हणाले :—

"With regard to my own share in it, I shall be happy to give the very best assistance that is in my power; but the chief part of a Marathi Grammar in Marathi and for Mara-

७५ *D. P. I. Miscellaneous, Vol.* 15. 1856. p. 105.

thas should, I think, be borne by Marathas. In the preparation of a grammar of Marathi in English for Europeans, the chief part of course should devolve on myself; but the preparation of such a grammar does not belong to the Translation Department." [७६]

मराठी भाषेचें व्याकरण मराठीमधून व मराठी बोलणाऱ्या लोकांसाठीं, लिहावेंयास मराठी भाषिकांमधूनच लोक पुढें आले पाहिजेत या मेजर कँडी यांच्या उदार धोरणामुळें गेल्या शतकांत अनेक छोटेमोठे व्याकरणकार पुढें आले आणि 'Let each grammar stand on its own merits' या मेजर कँडी यांच्या तत्त्वाप्रमाणें पुष्कळांना मराठी भाषेचीं व्याकरणें लिहिणें शक्य झालें. अशाप्रकारें लिहिल्या गेलेल्या शालेय व प्रौढ व्याकरणग्रंथांचा परिचय या प्रकरणांत करून देण्यांत आला आहे.

मराठी भाषा व्युत्पत्तिशास्त्र

शाळांमधून मराठी भाषेचा सशास्त्र अभ्यास व्हावा म्हणून हैंदशाळा पुस्तक मंडळीनें प्रथमपासूनच कसे प्रयत्न केले व त्यांतून मराठी भाषेच्या व्याकरणावरील पुस्तकें कसकशीं तयार होत गेलीं तें पाहिल्यावर, व्युत्पत्तिशास्त्रावर तयार झालेलीं कांहीं शालेय पुस्तकें तपासणें आवश्यक आहे. अशा पुस्तकांत 'शब्दसिद्धिनिबंध' हें इ. स. १८४३ मध्यें निर्माण झोललें पाहिलें पुस्तक होय. विनायकशास्त्री दिवेकर यांनीं तारीख २५ फेब्रुवारी, १८४१ रोजीं सरकारी मदतीसाठीं जो अर्ज केला त्यांत या पुस्तकाची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादिली. [७७] मुंबईच्या शिक्षामंडळीला या पुस्तकाची आवश्यकता पटून मंडळीनें त्याच्या पांचशें प्रती विकत घेतल्या. मंडळीच्या सेक्रेटरीनें या पुस्तकाची वाखाणणी खालील शब्दांत केलेली आढळते:—

"I would invite the Board's attention to this work as being one likely to prove of great service in accustoming native youth to etymological principles, by drawing their attention to etymological facts in their own language, Such a work will also do much to improve the Maratha language by fixing the writing accurate etymological principles.

"Although the encouragement or promotion of Sanskrit be no part of the object of Government in respect to Native Education, at the same time, I consider it one of the fundamental principles to enrich the native languages, and make them the vehicle of conveying instruction to the mass of the

---

[७६] *D. P. I. Duxina Fund, Vol.* 22. 1861–62 P 431.
[७७] *G. D. Vol* 23/594. 1841. P. 336.

people on the learning of Europe— it is on this principle that the grammatical structure of the native languages has been introduced into all our native schools, it is therefore highly expedient, that the principles of derivation and the signification of the prefixes and affixes should be explained in order that the students of the native schools may possess some means of being acquainted with the principal roots or verbs in Sanskrit from which we have a large class of words derived in Mahratta, such is the tendency of this little work.

" Other advantages might be named such as enabling the native students to trace the analogy which so remarkably exists between these languages and those of Europe, an object of the highest importance to the interest of learning. Having made these remarks on the utility and tendency of this work I would only observe in regard to its execution that the author seems to be very accurate and fully able to do justice to the subject which he has undestaken to write upon."[७८]

अशा प्रकारें मराठी भाषेची मूळपीठिका समजण्यास व तिची लेखनपद्धति निश्चित करण्यास 'शब्दसिद्धिनिबंधा' चा उपयोग होईल अशी खात्री पटल्यावर शिक्षामंडळीनें या ग्रंथाच्या पांचशें प्रती विकत घेण्याचें ठरविलें. पण तत्पूर्वी मेजर कॅंडी यांचेंहि या ग्रंथाबद्दलचें मत शिक्षामंडळीनें अजमाविलें. मेजर कॅंडी यांनीं पुणें कॉलेजमधील शास्त्रीमंडळीचें मत घेऊनच आपला निर्णय दिला. ते म्हणतात:—

"I think that the treatise on the Etymology of the Murathee language is a work of considerable labour and research, and that it reflects credit on the compilers. It is calculated to be useful particularly to those who have some little acquaintance with Sanskrit." [७९]

सरकारी मदतीसाठीं केलेला अर्ज जरी विनायकशास्त्री दिवेकर यांच्या एकट्याच्या नांवावर आहे, तरी प्रत्यक्ष पुस्तकाच्या मुखपृष्ठावर 'विनायकशास्त्री दिवेकर आणि गोविंद विठ्ठल महाजन यांनीं बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांच्या सहाय्यानें केला आहे,' असें म्हटलें आहे. अशा प्रकारचें, मराठी शब्दांची व्युत्पत्ति सुचविणारें एकादें पुस्तक शालेय अभ्यासक्रमांत असावें अशी सूचना बाळशास्त्री

---

७८ *D. P. I. Board of Education, Circular Book.* 1841. pp 38–39.
७९ *D. P. I. Circular Book.* 1843. p. 259.

जांभेकरांनीं इ. स. १८४१ मध्यें शालेय पुस्तकांवर लिहिलेल्या एका टांचणांत अगोदरच प्रतिपादिली होती.[८०] या सूचनेप्रमाणें तयार होणाऱ्या 'शब्दासिद्धिनिबंधा'च्या निर्मितीमध्यें खुद्द बालशास्त्र्यांनीं मदत करावी हें स्वाभाविक आहे.

लेखकद्वयाच्या म्हणण्याप्रमाणें, "या कोशाचा उपयोग हा आहे कीं, याचा अभ्यास केला असतां महाराष्ट्र भाषेंत जे संस्कृतमूलक शब्द आहेत, त्याचा अवयवार्थ कळावा. आतां शब्दांची रूढि अवयवार्थांवर क्वचित् असती, बहुधा कांहीं विशेषार्थांवर असती, तो अर्थ व्यवहारांत प्रसिद्धच असतो, परंतु अशा ठिकाणींही फार करून अवयवांचा अर्थ आणि समुदायाचा अर्थ, यांचा कांहींतरी संबंध असतो, त्याचा विचार करणें हा भाषेच्या अभ्यासासंबंधीं एक मोठा उपयोगी व्यासंग आहे, आणि तो जाणणें हें भाषा पुरी आल्याचें एक मोठें लक्षण आहे. परंतु जसें व्याकरण पढल्यावांचून भाषेचा निर्वाह चालत असतां व्याकरण पढण्यांत उपयोग आहे, तसा शब्दाचा रूढार्थ जरी कळत असला, तरी त्याचा अवयवार्थ कळल्यावांचून व्युत्पत्ति पक्की होत नाहीं व तेणेंकरून संस्कृतादि भाषांच्या अभ्यासास उपयोग आहे."[८१]

वरील शब्दांत व्यक्त केल्याप्रमाणें संस्कृत भाषेंतील चारशें चौऱ्याऐंशीं धातु घेऊन त्यावरून शब्द कसकसे बनतात तें या पुस्तकांत दाखविलें आहे.

इ. स. १८५९ मध्यें या पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघाली. दुसऱ्या आवृत्तीच्या कांहीं प्रती विद्याखात्यानें विकत घ्याव्या म्हणून गोविंद विठ्ठल महाजन यांनीं खात्याकडे विनंति केली व त्याप्रमाणें एक हजार प्रती घेतल्या गेल्या.[८२] इ. स. १८६५ पर्यंत हें पुस्तक शाळांमध्यें आवश्यक नव्हतें, परंतु त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यानें तें वापरलेंच पाहिजे असें ठरलें व त्यामुळें त्या पुस्तकाचा मालकी हक्क विद्याखात्यानें विकत घेण्याचा प्रयत्न केला. विशेष गोष्ट म्हणजे जरी 'शब्दासिद्धिनिबंधा'च्या प्रथमावृत्तीवर विनायकशास्त्री दिवेकर यांचें नांव आहे, सरकारी मदतीची मागणी प्रथम त्यांनींच केली, तरी मालकी हक्क विकत घेण्याबद्दलचा पत्रव्यवहार गोविंद विठ्ठल

---

८० *G. D. Vol. 24 A* 1843. p. 678.
497A

८१ विनायकशास्त्री दिवेकर आणि गोविंद विठ्ठल महाजन, **शब्दसिद्धिनिबंध.** १८४३. प्रस्तावना.

८२ *D. P. I. Book Depot.* 22. Vol. 1859. p. 591.

महाजन यांच्या नांवें झाला. महाजनांनीं मालकी हक्काबदल पांचशें रुपये मागितले. [८३] त्यावर तत्कालीन डी. पी. आय. ग्रँट यांनीं तारीख २४ जुलै १८६६ रोजीं लिहिलें :—

"The curator is requested . . . to offer the following terms to Govind Vitthal Mahajan for the copy-right of Shabda Siddhi Nibandha. 1st. Rs. 250 to be paid immediately. 2nd All copies on hand to be bought at cost price. Rs. 250 more to be paid when the book has been revised and improved by Mr. Govind Mahajan according to the instructions to be given by the undersigned.

"Should these terms not be accepted, the book will be struck off the list of text-books and superseded bysome other work." [८४]

याप्रमाणें गोविंद विठ्ठल यांना कळविण्यांत आलें व पुन्हां दोनदां आठवणी दाखल लिहिण्यांत आलें, परंतु त्यांच्याकडून कांहींच उत्तर आलें नाहीं. त्यामुळें वरील पुस्तक शालेय अभ्यासक्रमांतून काढून टाकण्यांत आलें व त्याऐवजी जनार्दन हरी आठल्ये यांचें विनायकशास्त्री आगाशे यांच्या साहाय्यानें केलेलें 'शब्दासिद्धिनिबंध' हें पुस्तक वापरांत आलें.

मेजर कँडी यांच्या गैरहजिरींत महादेव गोविंद रानडे मराठी ट्रान्स्लेटर म्हणून काम करीत असतां आठल्ये यांचें हें पुस्तक त्यांच्या हातीं आलें. तारीख ३१ मार्च, १८६७ रोजीं त्यांनीं परशुरामपंत गोडबोले यांच्या मदतीनें लिहिलेलें या पुस्तकावरील परीक्षण सरकारी दप्तरांत पहावयास सांपडतें. [८५] रानडे व परशुरामपंत गोडबोले या दोघानांहि हें पुस्तक पसंत पडल्यामुळें लेखकाला दोनशें रुपये मालकीहक्काबद्दल देऊन विद्याखात्यानें तें विकत घेतलें. या पुस्तकाचा आशय गोविंद विठ्ठल महाजन यांच्या 'शब्दासिद्धि निबंधा' प्रमाणेंच आहे. आठल्ये म्हणतात त्याप्रमाणें 'उपसर्गयुक्त शब्द भाषेंत बहुत येतात. यास्तव प्रथम उपसर्ग लिहून, त्यांचे अर्थ आणि उदाहरणें लिहिलीं आहेत; तथापि कित्येक ठिकाणीं त्यांहूनहि भिन्न अर्थ होतात, ते रूढीवरून समजावे. सर्वच अर्थ लिहूं गेल्यास विस्तार फार होईल, अतएव येथें लिहिले नाहींत.' [८६]

---

८३ *D. P. I. Duxina Fund, Vol.* 25. 1867-68. p. 354.
८४ *Ibid.* p. 359.
८५ *D. P. I. Book Depot, Vol* 14. 1867–68. pp. 7–18.
८६ जनार्दन हरी आठल्ये, **शब्दसिद्धिनिबंध**, आ. २, १८६८. प्रस्तावना.

'शब्दासिद्धि निबंध' याच नांवाचें विनायक वासुदेव गोडबोले व भास्कर अनंतशास्त्री ताम्हनकर यांनीं इ. स. १८७८ मध्यें छापिलेलें आणखी एक पुस्तक पाहाण्यांत आलें. या पुस्तकाची रचना पूर्वीच्या दोन पुस्तकांप्रमाणेंच आहे. फक्त 'ज्या शब्दांचा व्यवहारांत उपयोग फार त्याचे मूळधातु ८३४ लिहून त्यांचे अर्थ व त्यावरून कोणत्या अर्थी कोणता प्रत्यय होऊन शब्द सिद्ध झाले ते सर्व रामाश्रमी कोशाच्या टीकाधारानें लिहिले आहेत.' [८७]

मराठी भाषेंतील शब्दांची व्युत्पत्ति समजावी व त्यामुळें भाषेच्या लेखनपद्धतींत एकसूत्रीपणा यावा या हेतूनें लिहिल्या गेलेल्या 'शब्दासिद्धिनिबंध' या एकाच नांवाच्या तीन पुस्तकांशिवाय, भाषेच्या अभ्यासाला मदत होण्याच्या दृष्टीनें विद्याखात्यानें शालेय अभ्यासक्रमांत अंतर्भूत केलेलें आणखी एक पुस्तक म्हणजे गोविंद शंकरशास्त्री बापटकृत 'व्युत्पत्तिप्रदीप' हें होय. लेखकानें या पुस्तकाची भूमिका समजावून सांगितली आहे. ती अशी:—

"भाषेंतलि व्युत्पत्ति जाणणें हें भाषा चांगली येण्यास आवश्यक आहे. इंग्रजींत तर शब्दव्युत्पत्ति हा एक व्याकरणाचाच भाग समजतात. मराठी-सारख्या प्राकृत भाषेंतील शब्दांची व्युत्पत्ति समजणें तर फारच आवश्यक आहे. कारण त्यापासून भाषेंत फेरफार कसे होतात तें कळतें. युरोपांत या व्युत्पत्तिशास्त्राचा इतका प्रसार झाला आहे कीं, त्यापासून इतिहास वगैरे विषयांसंबंधीं अनेक शोध लागेल आहेत. प्रस्तुत मराठी भाषेंतील शब्दांची व्युत्पत्ति जाणण्यास कांहीं साधन नाहीं, असें जाणून व कित्येक मित्रांच्या सूचनेवरून इंग्रजींत शब्दव्युत्पत्ति या विषयावर जीं पुस्तकें आहेत त्या नमुन्यावर हें लहानसें पुस्तक तयार केलें आहे. हल्लीं मराठी शाळांत शब्दसिद्धिनिबंध चालू आहे त्यांत बहुतकरून केवळ संस्कृत शब्दांची व्युत्पत्ति सांगितली आहे. व कित्येक ठिकाणीं ती व्युत्पत्तीही चमत्कारिक दिली आहे." [८८]

वरील परिच्छेदावरून 'शब्दसिद्धि निबंध' आणि 'व्युत्पत्ति प्रदीप' या पुस्तकां-तील फरक लक्षांत येण्यासारखा आहे. सदरहु पुस्तकांत संस्कृत धातूंपासून निर्माण झालेल्या शब्दांखेरीज, कांहीं आरबी व फारशी शब्दहि दिलेले आहेत. तसेंच संस्कृत झेंद, ग्रीक व लॅटिन भाषांतील कांहीं शब्दांमधील साधर्म्य दाखविलेलें आहे. या पुस्तकाचा हस्तलेख रावबहादुर माधवराव गोविंद रानडे यांस दाखविला व त्यांनीं तो कृपा करून पाहिला व कांहीं उपयुक्त महत्त्वाच्या सूचना केल्याचें व प्रो. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनींहि कांहीं सूचना केल्याचें लेखकानें पुस्तकाच्या प्रस्तावनेंत नमूद केलें आहे.

अशा प्रकारें मराठी भाषेचा पद्धतशीर अभ्यास व्हावा व तिला व्याकरणशुद्ध करून नियमांच्या चौकटींत बसवावी या हेतूनें एकोणिसाव्या शतकांत निर्माण झालेलीं व्याकरणें व भाषाविषयक अन्य पुस्तकें यांची पाहणी या प्रकरणांत केलेली आहे.

---

८७ विनायक वासुदेव गोडबोले आणि भास्कर अनंत ताम्हनकर, **शब्दसिद्धि-निबंध**. १८७८. प्रस्तावना.

८८ विनायक वासुदेव बापट, **व्युत्पत्तिप्रदीप**. आ. २, १८८६. प्रस्तावना.

प्रकरण आठवें

कोश वाङ्मय

डॉ. कॅरे

भिन्नभाषीय लोक एकत्र आले कीं एकमेकांशीं एकमेकांचें मनोगत व्यक्त करण्यास परस्परांना परस्परांच्या भाषा अवगत असणें आवश्यक असतें. इंग्रजांचा महाराष्ट्राशीं राजकीय संबंध आल्यावर अगदीं सुरवातीला जे इंग्रज अधिकारी महाराष्ट्रांत आले, त्यांत माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा एक होता. त्याच्या उदार व धूर्त धोरणामुळेंच जित महाराष्ट्राच्या देशभाषेच्या अभ्यासाला चालना मिळाली. त्यामुळेंच मराठी भाषेचें व्याकरण व कोश तयार होण्यास मदत झाली.

मराठी भाषेच्या कोशवाङ्मयाची सुरुवात महाराष्ट्राबाहेर झाली. श्रीरामपूरला ज्या ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं धर्मप्रसाराचें कार्य सुरू केलें त्यांतील डॉ. विल्यम कॅरे यानें इ. स. १८१० मध्यें मराठी भाषेचा पहिला कोश तयार केला. या कोशाच्या प्रस्तावनेंत त्यानें कोशरचनेचा हेतु स्पष्ट केला आहे. डॉ. कॅरे लिहितोः--

"It is also highly important as a medium through which alone Europeans can become acquainted with the manners and customs of the different Indian nations, and with a variety of circumstances known to the great body of the people, and in which they are immediately interested."[१]

हिंदुस्थानांत पुष्कळ भाषा प्रचलित आहेत. त्यांचा व संस्कृत भाषेचा अभ्यास करणें राज्यकर्त्यांना आवश्यक आहे, व त्यासाठींच या भाषांचीं व्याकरणें व कोश निर्माण झाले पाहिजेत असा डॉ. कॅरेचा आग्रह असे. मराठी भाषेचा कोश करतांना विद्यानाथ शर्मा या मराठी भाषापंडिताची मदत घेतल्याचें कॅरेनें आपल्या कोशाच्या प्रस्तावनेंत नमूद केलें आहे. तसेंच हा कोश तयार होण्यापूर्वी डॉ. ड्रमंड यांचीं मराठी आणि गुजराथी भाषेचीं व्याकरणें व शब्दसंग्रह तयार होता; पण तीं छापलेलीं नसल्यामुळें त्यांची मदत आपण घेऊं शकलों नाहीं असेंहि त्यानें कोशाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे.[२] डॉ. कॅरेचा हा कोश म्हणजे मराठी शब्दांची केवळ यादी आहे. साधारणपणें आठ हजार शब्द या कोशांत आले आहेत. मराठी शब्द मोडी लिपींत छापलेले आहेत हा या कोशाचा विशेष होय.

---

१ William Carey, *Dictionary of the Maharatta Language*. 1810. preface, p. 3.

२ *Ibid*. p. 6.

शालेय पुस्तकांचा आढावा घेतांना कॅरे, केनेडी अगर मोल्स्वर्थ यांनीं रचलेल्या कोशांची पहाणी करणें अनावश्यक असल्याचा आक्षेप घेतला जाईल; परंतु मराठी भाषेच्या वाढीला कारणीभूत झालेल्या या मराठी–इंग्रजी कोशांकडे दुर्लक्ष करणें चुकीचें ठरेल. म्हणूनच या कोशांबद्दल थोडीबहुत माहिती देणें इष्ट आहे.

कॅप्टन केपन

कालानुक्रमानें कॅरेच्या मराठी–इंग्रजी कोशानंतर व्हॅन्स् केनेडी याचा इ. स. १८२४ मध्यें छापलेला मराठी–इंग्रजी व इंग्रजी–मराठी कोश होय. परंतु त्याच्या अगोदर मराठी भाषेच्या कोशनिर्मितीचे कांहीं प्रयत्न झाले होते. त्यापैकीं एक प्रयत्न कॅप्टन केपन याचा होता. सरकारकडे मदतीसाठीं केलेल्या अर्जांत तो म्हणतो कीं राज्यकर्त्यांना लोकांची भाषा समजणें आवश्यक असतें आणि त्या दृष्टीनेंच आपण मराठी भाषेचा कोश तयार करीत आहें. त्यासाठीं लष्करी नोकरींतून रजा मिळाल्यास वेगवेगळ्या लोकांशीं संबंध आणून त्यांची भाषा समजून घेण्यास व शब्द गोळा करण्यास आपणास सुलभ पडेल असें त्याला वाटलें. या अर्जांत कोशाच्या स्वरूपाबद्दल केपन लिहितो:—

"I now beg to offer my services to the Government to complete a dictionary of the Mahrattas sufficiently copious for all purposes of utility and not so abstruse as Dr. Carey's."[३]

केपनच्या या तारीख १४ फेब्रुआरी, १८२२ च्या विनंतीला सरकारकडून उत्तर मिळालें कीं कॅ. हचिन्सनसारख्या [३अ] लोकांना कोशकार्याबद्दल जें साहाय्य दिलें जातें तेंच त्यालाहि मिळेल. साहाय्य म्हणजे कोश छापल्यानंतर त्याच्या कांहीं प्रती विकत घेणें हें होय. केपनचा कोश तयार झाल्याचें दिसत नाहीं.

दिवनायगम (Divanaigum)

केपनच्याहि अगोदर झालेला आणखी एक प्रयत्न दिवनायगम नांवाच्या एका गृहस्थाचा आहे. सरकारी मदतीसाठीं केलेल्या विनंतिअर्जांतं तो म्हणतो कीं आपण डॉ. जॉन्सनच्या इंग्रजी कोशाचें मराठीमध्यें भाषांतर करण्याचें कार्य इ. स. १८१३ पासून सुरू केलें असून कोशामध्यें सुमारें वीस हजार शब्द येतील. कोशाचें काम त्यानें मालवण शहरीं सुरू केलें होतें. या कोशाला मदत मिळावी अशी विनंति त्यानें मंगलोरहून तारीख ३ डिसेंबर, १८२१ रोजीं केली. त्याबरोबर कोशाचा कांहीं भागहि त्यानें सरकारकडे पाठविला होता. सरकारनें तो अभिप्रायार्थ बॅबिंग्टन, वॉथेन व केनेडी या तीन तज्ज्ञांकडे पाठवून दिला. त्यावरील अभिप्रायांत ते म्हणतात :—

---

१ *G. D. Vol.* 10.18 21. p. 707.

३ अ याचा उल्लेख पुढें पृ. १३० वर पहा.

"It appears to us that the selection of English words is extremely injudicious, as some of them are of rare occurance and some obsolete, the compiler has in consequence been obliged to translate many of them by phrases which are both inacurate and written in a style which would not be intelligible to the natives and even the words which are rendered into Mahratta by a single term, simple or compound, do not in many instances correspond correctly with the English on account of the very imperfect knowledge which the compiler seems to possess both of the English and Mahratta languages."[४]

साहाजिकच अशा सदोष कोशाचा स्वीकार सरकारनें केला नाहीं. मात्र जर लेखक तो कोश सरकारला विकत देत असेल तर तो घेण्याची सरकारनें तयारी दर्शविली. यांतील हेतु एवढाच कीं पुढील कोशप्रयत्न त्यामुळें सोपा व्हावा.

व्हॅन्स् केनेडी

वर नमूद केलेल्या दोन अपुऱ्या प्रयत्नांनंतर तयार झालेला कोश ले. क. व्हॅन्स् केनेडी याचा होय. या कोशाचे दोन भाग आहेत. एक मराठी-इंग्रजी व दुसरा इंग्रजी-मराठी. केनेडीनें हा जोडकोश तयार करून सरकारकडे पाठविल्यानंतर, इतकें उपयुक्त काम केल्याबद्दल सरकारनें त्याला धन्यवाद देऊन श्रमाचा मोबदला म्हणून पंधरा हजार रुपये बक्षिस दिले व कोशाच्या एक हजार प्रती छापविल्या.[५] नेहमींच्या पद्धतीनुसार पन्नास प्रती इंग्लंडला पाठविल्या गेल्या. कांहीं प्रती येथील सरकारी अधिकाऱ्यांना दिल्या व उरलेल्या, खर्च वसूल होईल अशा बेतानें दर प्रतीला अकरा रुपये प्रमाणें विकण्यासाठीं शाळापुस्तकमंडळीकडे देण्यांत आल्या. मुंबईला छापलेला पहिला कोश या दृष्टीनें या कोशाला महत्त्व आहे.

हा कोश तयार करतांना मराठी भाषेच्या तीन पद्धति असल्याची त्याची समजूत होती. पहिली तत्कालीन पुस्तकांतून वापरलेली व जींत संस्कृत शब्दांचा भरणा फार अशी; दुसरी सुशीक्षित एतद्देशीयांच्या बोलण्यांत असलेली कीं जींत संस्कृत शब्द कमी, पण अरबी, फारशी व हिंदी शब्दांचा उपयोग जास्त केला जाई अशी व तिसरी खालच्या वर्गांत प्रचलित असलेली अशी बोलीभाषा. या तीन प्रकारांपैकीं दुसऱ्या प्रकारच्या भाषेंतील शब्दांचा हा कोश आहे. हा कोश अमरकोशाच्या मराठी भाषांतरा-

---

४ *G. D. Vol*, 10. 1821. p. 689.
५ *G. D. Vol.* 50/55. 1823. p. 165.

वर आधारलेला आहे. त्याचप्रमाणें अर्स्किन, कॅप्टन कॉक इत्यादि कांहीं इंग्रज अधिकाऱ्यांनीं त्यांचा येथील लोकांशीं संबंध आल्यामुळें मराठी शब्दांचे जे संग्रह तयार केले-होते त्यांचाहि उपयोग केनेडीनें आपल्या कोशासाठीं केला. तसेंच डॉ. आय्न्स्टीचा (Ainstie) हिंदुस्थानी भाषेंतील औषधी कोश, डॉ. हंटरचा हिंदुस्थानी भाषेचा कोश, कोलब्रुकनें प्रकाशित केलेला अमरकोश व डॉ. विल्सनचा संस्कृत भाषेचा कोश यांचीहि मदत केनेडीनें घेतली. या कोशांत सुमारें आठ हजार शब्द आहेत. त्यांत येथील देवांचीं नांवें, कांहीं धार्मिक चालीरीतिदर्शक शब्दहि आले आहेत.

हा कोश अपुऱ्या माहितीवर कसा आधारलेला आहे, त्याचें एक उदाहरण तत्कालीन सरकारी कागदपत्रांत पहावयास मिळतें. परभु, प्रभु या शब्दाचा अर्थ केनेडीनें आपल्या कोशांत 'A name assumed by the men of the Shenwa caste, whose general occupation is that of clerks; they consider themselves to be Brahmins.'असा दिलेला आहे.[६] यावर त्याकाळच्या कांहीं शेणवी लोकांनीं आक्षेप घेतला. त्यांचें म्हणणें असें होतें कीं परभु ही एक जात असून त्यांचा पेशा कारकुनीचा आहे; पण आपण ते नव्हत. पंचगौडब्राम्हणांपैकीं आपण एक असून आम्हांला शहानवीस (Shaw-nuwees–Shenwee–Senoy) या नांवानें संबोधिलें जातें. आम्हीं केवळ कारकून नसून आमच्यापैकीं लोक अग्निहोत्री, वैदिक, पुराणिक, ज्योतिषि, मंत्री, दिवाण, सरदार असेहि आहेत. अशा आशयाचा अर्ज मुंबईच्या तेरा शेणव्यांनीं तारीख १० नोव्हेंबर, १८२४ रोजीं सरकारकडे केला व केनेडीच्या कोशांतील या चुकीची दुरुस्ती व्हावी अशी विनंती केली. या विनंतीला सरकारनें मान्यता दिली नाहीं.[७]

वर नमूद केलेले कोशनिर्मितीचे प्रयत्न बहुधा परकियांना मराठी भाषा शिकण्यास उपयोगी पडावे या हेतूनें केलेले होते. महाराष्ट्राचा राज्यकारभार हांकतांना मराठी लोकांची भाषा अवगत असली तर राज्यकारभाराचें काम सुरळीत चालेल या कल्पनेनें राज्यकर्त्यांना मराठी भाषेचा अभ्यास करावा लागे. हें अभ्यासाचें काम सोपें होण्यास मराठी भाषेच्या कोशाची आवश्यकता तत्कालीन सरकारी अधिकाऱ्यांना पटल्यामुळें कोशरचनेला सरकारी मदत मिळूं शकली. राज्यकर्त्यांच्या शिक्षणाबरोबरच लोकांना सुद्धां या कोशांच्या मदतीनें इंग्रजी भाषेचा अभ्यास करणें सुलभ व्हावें ही दृष्टि या सर्व कोशांच्या मागें होतीच. थोडक्यांत महाराष्ट्रांत इंग्रजी अमदानी सुरू झाल्यापासून राज्यकर्ते व लोक यांना परस्परांच्या भाषा समजण्यास कोशाची आवश्यकता भासूं लागली.

---

६ VANS KENNEDY, *Dictionary of the Maratha Language, Part 1.* 1824. p. 70.

७ *G. D. Vol.* 15/73. 1824. pp. 407–411.

मुंबईची शाळापुस्तकमंडळी व मराठी भाषेचा कोश

सार्वत्रिक विद्याप्रसारार्थ मराठी भाषेच्या व्याकरणाबरोबर मराठी भाषेच्या कोशाची आवश्यकता असल्यामुळें कोशरचनेचें काम खुद्द मुंबईच्या शाळापुस्तक मंडळीनें करण्याचें ठरविलें. शालेय पुस्तकें कोणकोणत्या विषयावर व कसकशीं तयार करावीं हें ठरविण्यासाठीं शाळापुस्तकमंडळीतर्फे जी खास समिति नेमिली गेली होती, तिनें कोशाची गरज प्रतिपादून त्याची रूपरेषा खालील शब्दांत दिली होती :-

" A vocabulary accurately defining the meaning of three or four thousand of their best words. It should include every word used to convey any idea in the works hereafter mentioned. " ८

समितीनें, इतिहास, गणित, भूगोल इत्यादि विषयांवर मराठी भाषेंत शालेय पुस्तकें तयार करण्याबद्दल जी सूचना शाळापुस्तक मंडळीला दिली होती त्याच वेळीं मराठी भाषेचा कोश व्हावा अशी इच्छा व्यक्त केली होती. या इच्छेनुसार शाळापुस्तक मंडळीच्या कांहीं पंडितांकडे हें कोशरचनेचें अवघड काम आलें. या पंडितांच्या श्रमाचें फळ म्हणजेच पंडितमंडळाचा ' महाराष्ट्र भाषेचा कोश ' होय.

पंडित मंडळाचा ' महाराष्ट्र भाषेचा कोश '

या पंडितमंडळांत जगन्नाथशास्त्री क्रमवंत, बाळशास्त्री घगवे, गंगाधरशास्त्री फडके, रामचंद्रशास्त्री जन्हवेकर, सखारामशास्त्री जोशी, दाजीशास्त्री शुक्ल व परशुरामपंत गोडबोले इतकी मंडळी होती. दोन भागांत हा कोश इ. स. १८२९ मध्यें प्रसिद्ध झाला आणि इ. स. १८३१ मध्यें या कोशाची पुरवणी बाहेर पडली. कोशाच्या प्रस्तावनेंत मराठी भाषेची व्याख्या, मराठी भाषेच्या कोशाची आवश्यकता, कोशांत उपयोगिलेल्या शब्दांची व्याप्ति इत्यादि मुद्यांची सविस्तर चर्चा केलेली आढळते.

' महाराष्ट्र भाषा म्हणजे महाराष्ट्रदेशीं राहणारे जे देशस्थ ब्राह्मणादिक लोक त्यांची बोलायाची प्राकृत भाषा, तिचा कोश म्हणजे त्या भाषेंत जे शब्द येतात त्यांचा कोश. कोश शब्दाचा सामान्यतः हा अर्थ आहे कीं, प्रसंगीं प्रयोगार्थ बाहेर काढायाचा जो अर्थसंघात त्याचे संग्रहांचें सांठवण, ' या शब्दांत मराठी भाषेची व्याख्या व कोश या शब्दाचा अर्थ देऊन 'वाग्व्यवहारकर्ता जो कोणी त्यास शब्दकोश पाहिजे म्हणून जा जा भाषेनें व्यवहार करायाचा त्या त्या भाषेचा कोशावर सर्वांचा आदर अवश्य असावा ' अशा कोशाची महति वर्णिली आहे. असा महत्त्वपूर्ण कोश

८ *G. D.* Vol 63. 1824. p. 111.

तयार करण्यास 'अद्यापि कोणी प्रवृत्त झाला नाहीं, हें मनांत आणून सर्व लोकांचे कल्याणार्थ' हा कोश तयार केल्याचें संपादक मंडळानें कोशाच्या प्रस्तावनेंत नमूद केलें आहे. एवढ्या मोठ्या कार्यांत अडचणीहि मोठ्या असावयाच्या. अडचणींचें वर्णन कोशकार खालील शब्दांत करतातः—

"या भाषेवर आजपर्यंत कोश व्याकरणादि व्यवस्थापक कांहींच झालें नाहीं, हा प्रथमच संस्कार आहे. हा ग्रंथ करण्याविषयीं बुद्धीस आधार मिळून लोकांचा वाग्व्यवहार तो तरी एकरूप आहे असें नाहीं. देशपरत्वें जातिपरत्वें किंबहुना व्यक्तिपरत्वेंही भिन्न भिन्न आहे अशा आधाराचे बलानें जी रचना करायाची ती निर्दोष आणि सर्वांस आनंदजनक अशी कशानें होणार परंतु जसा जितका लोकांचा व्यवहार आढळांत आला तितक्याचें बुद्धीनें आकलन करून यथामति हा ग्रंथ केला आहे." [९]

या अडचणींचें निराकरण कोणत्या मार्गांनीं केलें त्याबद्दल कोशकार लिहितातः—

"ही महाराष्ट्र भाषा म्हणजे देशभाषा होय आणि देशभाषांचे वर्तनाचा असा नियम आहे कीं स्वस्वेदशाचे मध्यभागीं शुद्ध स्वरूपानें असावें आणि उत्तरोत्तरपर्यंतभागीं-तत्तद्देशांतरस्थ भाषांचे मिश्रणानें संकीर्णरूपानें असावें. महाराष्ट्र देशाचा मध्यभाग म्हटला असतां प्रायः पुणें प्रांत होतो अतएव पुणें प्रांतीं जे शब्द प्रसिद्ध आहेत ते प्रायः सर्व महाराष्ट्रदेशभर प्रसिद्ध असें समजून ते शब्द प्रांताचे खुणेवांचून लिहिले आहेत." [१०]

या कोशांत 'राजकीय व्यवहाराचे अनुरोधानें' आलेले यवनी भाषेंतील शब्द, तसेंच कानडी, गुजराथी भाषेंतील शब्द, प्रौढ भाषेंत शोभण्यासारखे नसल्यामुळें कोशांत दाखल केलेले नाहींत. 'या भाषेस संस्कृत भाषेचा अनुरोध आहे म्हणून सांगितलें ती संस्कृत भाषा बोलणें त्या भाषेचे ग्रंथ पढणें हा प्रचार बहुतकरून ब्राह्मणांत आहे म्हणून ब्राह्मणाचे बोलण्यांत जे शब्द येतात आणि त्याचे मुखानें जसे उच्चार होतात त्यांस या भाषेंत प्राधान्य आहे.' कोशकार पंडितांनीं मराठीचा पुरस्कार केला; पण मराठी भाषा अद्यापि त्यांच्या अंगवळणीं पडली नव्हती. हे शास्त्रीपंडित जुलुमानें मराठी भाषेंत लिहीत. त्यामुळें त्यांची मराठी लिहिण्याची पद्धति संस्कृतानिष्ठ, म्हणूनच क्लिष्ट व बोजड अशी झाली. शब्दांचे अर्थ व्याख्यारूपानें पंडिती भाषेंत दिल्यामुळें मूळ शब्दापेक्षां दिलेले अर्थ समजण्यास कठीण झाले आहेत. उदाहरणादाखल खालील शब्द व त्यांचे अर्थ पहावे :—

---

९ पंडित मंडळ, **महाराष्ट्र भाषेचा कोश, भाग १.** १८२९. प्रस्तावना.

१० तत्रैव.

खडका—स्वसमीपागत मनुष्यादिकांचा जो तत्तत्पदार्थज्ञापक पादादि ध्वनी तो.

तयार — जा कार्याचा कर्तव्यांश उरला नाहीं म्हणून तत्साध्यकार्यीं उपयोगी पडावयास योग्य झालें असें जें कार्य तो; २, कोणी एक कार्यावर विनियुक्त करण्याविषयीं जा उपचारादिकांची पदार्थास अपेक्षा असत्ये ते सर्व उपचारादिक जाचे झाले आहेत तो मनुष्यादि पदार्थ; ३, जी गोष्ट करण्याविषयीं जाची अंतःकरणवृत्ति अनुकूल आहे तो त्याविषयीं.

संगतीं—एकाकी नुसता अशारूपें करून क्रियेचा ठायीं जो अन्वितपणा होत असतो तो न व्हावयास कारणीभूत जें कोणेकाचें सहितत्त्व त्यातें आश्रयून.

सहन — प्रतिकूलत्त्वें करून संबद्ध होणार जो दुःख, संकट, शीत, उष्ण, अन्यकृत अपराध, भार, इ. कांहीं एक अर्थ त्यांचे संबंधानें होणारी जी क्षोभभंगादि विक्रिया तिला आत्मप्रभावानें न होऊं देतां किं. झाली असतां न गणितां त्या अर्थाचें जें आत्मसंबंधांत धारण तें.

मोल्स्वर्थकृत मराठी–इंग्रजी कोश

जगन्नाथशास्त्री क्रमवंतादि पंडितांकडून ज्यानें वर उल्लेखिलेला 'महाराष्ट्र भाषेचा कोश' तयार करवून घेतला त्या जेम्स मोल्स्वर्थनें स्वतः एक मराठी–इंग्रजी कोश तयार केला. एका बाजूनें राजकीय हेतूनें व्हॅन्स केनेडीनें मराठी भाषेचा एक कोश तयार केला तर दुसरीकडून धार्मिक हेतूनें प्रेरित होऊन मोल्स्वर्थनें दुसरा कोश बनविला. मोल्स्वर्थ आपल्या कोशरचनेच्या हेतूबद्दल लिहितो :—

"It is the product of unremitted labour through six years. It was undertaken, not from a thirst after honor or emolument, but from a humble desire of promoting the propagation of the glorious Gospel; and it was continued, by the energy of this desire, through sickness and weakness and against troubles and difficulties, and grievous discouragement."[११]

अशाप्रकारें धर्मप्रसाराच्या उदात्त हेतूनें रचिलेला हा कोश मोल्स्वर्थनें मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर एलफिन्स्टन व मालकम यांना अर्पण केला. त्यानें दिलेलें कारण असें:–'in the hope of facilitating the acquisition of a most widely spoken language.' या कोशाबाबत मोल्स्वर्थनें सरकारशीं केलेला सर्व

---

११ James Molesworth, *Dictionary Murathee and English*. 1831. Preface, p. 18.

पत्रव्यवहार सरकारी दप्तरखान्यांत पहावयास मिळतो. त्यावरून कोशामागील त्याच्या धडपडीची व श्रमांची पूर्ण कल्पना येते. २१ जानेवारी, १८२४ रोजीं त्यानें प्रथम सरकारकडे विनंतिअर्ज केला व आपण मराठी भाषेचा कोश तयार करणार असल्याचें कळविलें; परंतु सरकारनें नुकताच केनेडीचा कोश छापल्यामुळें यावेळीं दुसरा कोश छापणें अशक्य आहे, कोशकर्त्यानें कोश छापावा. सरकार त्याबद्दल तीन हजार रुपये द्यायला तयार आहे असें मोल्स्वर्थला ७ फेब्रुआरी १८२४ रोजीं सरकारकडून कळविण्यांत आलें. [१२] सुरुवातीच्या या नकाराचें रूपांतर पुढें मोल्स्वर्थला कोशासाठीं झालेल्या खर्चाबद्दल दहाहजार रुपये व पांच हजारांचें बक्षिस देण्यांत झालें. [१३] हा कोश तयार करण्याच्या कामीं मोल्स्वर्थला आवश्यक त्या सवलती सरकारकडून मिळाल्या होत्या. त्यांचा फायदा घेऊन त्यानें अविश्रांत श्रम केले. तो. म्हणतोः—

"To the Murathee language is strictly applicable what Dr. Johnson observes respecting the English:— 'that it is copious without order and energetic without rules : that wherever the view is turned there is perplexity to be disentangled, and confusion to be regulated; that choice is to be made out of boundless variety without an established principle of selection; adulterations are to be detected without a settled test of purity, and modes of expression are to be rejected or received without the suffrages of any writers of classical reputation or acknowledged authority.' Our work then, was to reduce to order a boundless chaos;– to collect words from every book, from every writing, and from every tongue,–to admit or reject without fixed or generally satisfactory grounds for determination; to ascertain significations from the very mouths of the people,—and to seize phrases and forms of speech from passengers upon the road, or from boys playing or squabbling in the street." [१४]

अशाप्रकारें अनेक पद्धतीनीं त्यानें शब्द गोळा केले. त्याशिवाय यापूर्वी तयार झालेल्या अन्य कोशांचा उपयोग त्यानें केला. विशेषतः डॉ. विल्सनचा संस्कृत भाषेचा कोश, केनेडीचा मराठी-इंग्रजी कोश, एल्. रीड नांवाच्या एका सरकारी अधिकाऱ्यानें

---

१२ *G. D. Vol.* 15 1824. pp- 45–46.
73.

१३ *G. D. Vol.* 237. 1831. p. 86.

१४ James Molesworth. *Dictionary Murathee and English.* 1831. Preface, pp. 15–16.

तयार केलेली कोंकणी शब्दांची यादी, मे. साइक्स व रे. स्टीव्हन्सन यांनीं तयार केलेली वनस्पतिविषयक शब्दांची यादी यांचा उपयोग त्यानें केला. याखेरीज हचिन्सन नांवाच्या एका लष्करी अधिकाऱ्यानें गोळा केलेल्या सुमारें तीस हजार मराठी शब्दांची यादी कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडे पडून होती ती मिळविण्यासाठीं मोल्स्वर्थनें ५ जुलै १८२८ रोजीं सरकारकडे विनंति केली. त्याप्रमाणें ती यादी त्याच्या हातीं आली; परंतु छापखान्यांत कोशाचा पुष्कळसा भाग छापून झाल्यावर ती मिळाल्यामुळें तिचा उपयोग मोल्स्वर्थ करूं शकला नाहीं. आपल्या कोशाला पुरवणी जोडण्याचें त्याच्या मनांत होतें व त्यासाठीं त्यानें लोकांना जाहीर विनंति केली होती कीं ज्या कोणाला या कोशांत नसलेले शब्द आढळतील, अगर या कोशांत कांहीं उणीवा किंवा दोष. असतील, ते शाळापुस्तक मंडळीला कळवावे. विशेष म्हणजे मंडळीकडे या संबंधीं येणाऱ्या पत्रांना टपालहंशील माफ होतें. मोल्स्वर्थनें आपल्या कोशाची पुरवणी काढल्याचें दिसत नाहीं.

मोल्स्वर्थच्या या कोशांत, देवधर्मविषयक शब्द, पंडित मंडळानें आपल्या कोशांत स्थान न दिलेले सुमारें तीन हजार अरबी व फारशी शब्द आणि ज्या संस्कृत शब्दांचा इंग्रजीमधून मराठींत भाषांतर करण्यास उपयोग होऊं शकेल असे संस्कृत शब्द दिलेले आहेत. अशिष्ट शब्दांनासुद्धां या कोशांत स्थान मिळालें आहे या बाबतींत कोशकर्त्यानें आपली बाजू मांडली आहे. खालच्या वर्गांतील लोकांच्या तोंडीं अशिष्ट शब्द वारंवार येतात व ते अशिष्ट असल्याचें त्यांना वाटत नाहीं; स्त्रियांच्या व सुशिक्षितांच्याहि तोंडीं ते असल्यामुळें असे शब्द कोशांतून वगळणें शक्य नाहीं, अशी तरफदारी त्यानें केली आहे. एकंदरींत सुमारें चाळीस हजार शब्दांचा हा कोश आहे. एका शब्दाचे वेगवेगळ्या संदर्भांत जे अनेक अर्थ होतात त्यांचा सूक्ष्म रीतीनें कोशकारानें अभ्यास केलेला दिसतो. उदाहरणार्थ 'घर' या शब्दाचे त्रेचाळीस (पृ. ३००-३०१), 'तोंड' शब्दाचे छप्पन (पृ. ४७६–४७७), 'लागणें' या क्रियापदाचे चव्वेचाळीस (पृ. ९०२–९०३) वेगवेगळे अर्थ दिलेले आहेत.

कॅरे, केनेडी व मोल्स्वर्थ या तिघांच्या कोशांची तुलना करतां असें दिसतें कीं, कॅरेनें सुमारें आठ हजार, केनेडीनें सुमारें सोळाहजार व मोल्स्वर्थनें सुमारें चाळीस हजार शब्द आपापल्या कोशांत घातले आहेत. या तीनहि कोशांतले एक दोन शब्द घेऊन, तुलनेनें पाहिलें तर मोल्स्वर्थनें आपला कोश परिपूर्ण करण्याचा कसा प्रयत्न केला आहे तें स्पष्ट दिसतें. उदाहरणार्थ 'एरवीं' या शब्दाचे मोल्स्वर्थनें चार अर्थ दिले आहेत, केनेडीनें एकच अर्थ दिला आहे तर कॅरेच्या कोशांत हा शब्दच आढळत

नाहीं. 'अगदी-दीं' या शब्दाचे मोल्स्वर्थनें आठ, केनेडीनें दोन व कॅरेनें एकच अर्थ दिला आहे. मोल्स्वर्थनें पुष्कळ पंडितांची मदत घेऊन सहा वर्षें अविरत प्रयत्न करून आपला कोश बनाविला, म्हणून तो इतका व्यापक होऊं शकला.

या ठिकाणीं एका गोष्टीची फोड करणें आवश्यक आहे. ती म्हणजे पंडित-मंडळाच्या नांवें १८२९ मध्यें प्रसिद्ध झालेला 'महाराष्ट्र भाषेचा कोश' आणि १८३१ मध्यें प्रसिद्ध झालेला मोल्स्वर्थचा मराठी—इंग्रजी कोश या दोहोंतहि मोल्स्वर्थचा हात होता. आपल्या कोशाचें काम पूर्ण झाल्यावर मोल्स्वर्थनें गव्हर्नर क्लेअर याला ३१ मे, १८३१ रोजीं एक पत्र लिहिलें.[१५] त्या पत्रांत त्यानें स्पष्ट म्हटलें आहे कीं, आपला 'महाराष्ट्र भाषेचा कोश' शाळापुस्तक मंडळीच्या पंडितांच्या मदतीनें पुरा करून तो दोन वर्षांपूर्वीच शाळापुस्तक मंडळीकडे पाठविला आहे. मोल्स्वर्थच्या म्हणण्याचा अर्थ असा कीं, पंडितमंडळाच्या नांवावर १८२९ मध्यें प्रसिद्ध झालेला 'महाराष्ट्र भाषेचा कोश' आपणच मुख्यत्वें तयार केला; मात्र शाळापुस्तक मंडळीच्या पदरीं असलेल्या कांहीं पंडितांची मदत आपण घेतली. यावरून असें दिसतें कीं, पंडितमंडळानें तयार केलेला म्हणून ओळखला जाणारा मराठी-मराठी कोश व मोल्स्वर्थच्या नांवें प्रसिद्ध झालेला मराठी-इंग्रजी कोश हे दोनहि एकाच वेळीं तयार होत होते. मोल्स्वर्थच्या म्हणण्याप्रमाणें 'महाराष्ट्र भाषेचा कोश' चुकीनें पंडित मंडळाच्या नांवावर प्रसिद्ध झाला. याबाबत मोल्स्वर्थ लिहितोः—

"From the notice in the text which, being reprinted from the preface to the edition of 1831, has been before the public twenty and six years— it appears that the Title-page (prepared by the Secretary B. N. E. S.) to our Marathi kosh or Marathi Dictionary in the Marathi language erroneously says, "Compiled by pundits in the service of the Bombay Native Education Society." This kosh or dictionary was compiled, from the first to the last, in our own house, under the never-intermitted direction and management of of our own selves,and by three pundits of the B. N. E. S. in conjunction with our pundits. The two dictionaries were simultaneously compiled."[१६]

---

[१५] *G. D. Vol.* 237. 1831. pp. 55–56.

[१६] James Molesworth, *Dictionary Marathi and English, Ed. 2.* 1857. Preface, p. 21.

हे दोनहि कोश एका माणसाच्या देखरेखीखालीं, एकाच जागीं तयार होऊन सुद्धां पंडितमंडळाच्या कोशापेक्षां मोल्स्वर्थच्या कोशांत शब्दांचा भरणा जास्त कां असा प्रश्न उद्भवतो; परंतु या प्रश्नाला मोल्स्वर्थनेंच उत्तर दिलेलें आहे. कोश छापण्याचे खिळे उशीरा हातीं आल्यामुळें दोनहि कोश एकाच वेळीं तयार होऊनहि एक अगोदर छापला गेला व दुसरा छापायला दोन वर्षें उशीर झाला. या दोन वर्षांचा उपयोग दुसऱ्या कोशांत नवीन शब्दांची भर टाकण्यांत झाला. मोल्स्वर्थ म्हणतो :—

" We should here add, that the Murathee and English Dictionary, having been preserved from the press, by delay in the arrival of the types etc., much beyond the period, at which we delivered our Murathee Dictionary to the public, has enjoyed the advantage of further revision and correction, and has been enlarged, beyond that, by some thousand words."[१७]

अशाप्रकारें तयार झालेल्या मोल्स्वर्थच्या मराठी-इंग्रजी कोशाच्या प्रथमावृत्तीच्या वेळीं एक हजार सोळा प्रती निघाल्या व दर प्रतीला नव्वद रुपये किंमत ठरली.[१८] तथापि किंमत सर्वसाधारण ग्राहकाच्या आवाक्याबाहेर असल्यामुळें कोशाचा खप होईना, म्हणून किंमत हळुहळु पासष्ट, पन्नास, वीस रुपये अशी उतरत गेली. एवढेंहि करून पुष्कळ प्रती वाळवीनें खराब झाल्या. अशा खराब प्रती दर प्रतीला दहा रुपये प्रमाणें विकत घेण्याची तयारी हुसेनखान महमद नांवाच्या एका व्यापाऱ्यानें दर्शविली; पण सरकारनें ही विनंति मान्य केली नाहीं ![१९] 1042

इतक्या परिश्रमानें तयार झालेल्या या कोशाची तपासणी करण्यासाठीं सरकारनें केनेडी, पोप व मनी या तिघांची समिति नेमिली. केनेडी व पोप या दोघांनीं या कोशाबद्दल थोडासा विरुद्धच अभिप्राय दिला. ते म्हणतात :—

" It seems to us that in its present form, it can be of scarcely any practical utility to the learner and that as a philological work, the explanations are too diffuse and inacurate while at the same time the arrangement in general and the introduction of so many foreign words must prevent any just conclusion being formed from it with respect to the real genius and affinities of the Muratha language." [२०]

---

[१७] James Molesworth, *Dictionary Murathee and English.* 1831. Preface, p. 17.

[१८] *G. D. Vol. 237.* 1831. p. 80.

[१९] *G. D. Vol.* 41 1843. pp. 171 --175.

766.

[२०] *G. D. Vol. 237.* 1831. p. 70.

समितीचा तिसरा सभासद रॉबर्ट मनी यानें मात्र या कोशाची स्तुति केली. [२१] 'Oriental Christian Spectator' या खिस्ती मासिकानेंहि या कोशाची वाखाणणी केली. [२२]

पुष्कळांच्या स्तुतीला पात्र ठरलेल्या या कोशाची सुधारलेली आवृत्ति तयार करण्यासाठीं मोल्स्वर्थला मुद्दाम इंग्लंडहून बोलावण्यांत आलें व इ. स. १८५१ ते १८५७ पर्यंत कांहीं पंडितांच्या मदतीनें कोशसुधारणेचें काम त्यानें पुरें केलें. या कामाबद्दल त्याला व मदतनीस पंडितांना पंचेचाळीस हजार रुपये सरकारकडून मिळाले. [२३] त्यानें हें काम महाबळेश्वरीं केलें. "मोलस्वर्थ साहेबाच्या हातून असें मोठें काम ईश्वराच्या कृपेनें तयार झालें हें पाहून आम्हांस फार संतोष वाटतो. या कामावरून मोलस्वर्थ साहेबाची कीर्ति भरत खंडांत अक्षय राहील यांत संशय नाहीं." [२४] हें 'ज्ञानोदय' कारांचें म्हणणें खरें आहे.

मोल्स्वर्थच्या मराठी-इंग्रजी कोशाला दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं जोडलेला डॉ. विल्सन यांचा 'Notes on the Constituent Elements, the Diffusion and the Application of the Marathi Language,' नामक निबंध विचारप्रवर्तक आहे. त्यांत मराठी भाषा, तिची वाढ, तिचा अभ्यास करण्याची पद्धति यांवर विचार व्यक्त केलेले आहेत. या निबंधाचें मराठी भाषांतर करून त्याचा शालेय पुस्तकांत उपयोग करावा असें तत्कालीन डी. पी. आय. हॉवर्ड यानें मेजर कँडींना सुचविलें होतें. त्यावर कँडीचें असें मत पडलें कीं, भाषांतराचें काम आपण करण्यापेक्षां, तें भास्कर दामोदर पाळंदे अगर कृष्णशास्त्री चिपळुणकर यांनीं करावें. २२ फेब्रुआरी, १८५८ रोजीं लिहिलेल्या या पत्रांत मेजर कँडी म्हणतातः-

"A work prepared by either of them and revised by a competent European would, I think, be very valuable." [२५]

भास्कर दामोदर अगर कृष्णशास्त्री यांपैकीं कोणीहि हें भाषांतराचें काम केलें असतें तरी मेजर कँडीसारख्या लायक युरोपियन माणसाचा हात त्यावरून फिरलाच असता, परंतु हें भाषांतर तयार झालेलें दिसत नाहीं.

---

२१ *G. D. Vol.* 237. 1831. pp. 71-72.
२२ *Oriental Christian Spectator, Vol.* II 1831. pp. 289-293.
२३ *D. P. I. Book Depot, Vol.* 22. 1859. p. 130.
२४ **ज्ञानोदय,** १ सेप्टेंबर, १८५७. पृ. २६३.
२५ *D. P. I. Miscellaneous, Vol.* 26. 1858. p. 134.

जेम्स् टी. मोल्स्वर्थ

कोशकार जेम्स टी. मोल्स्वर्थ (१७९५–१८७२) 'मोरेश्वरशास्त्री' या नांवानें ओळखला जाई. ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करी खात्यांत १८१२ मध्यें कॅडेट म्हणून हिंदुस्थानांत आला. तत्कालीन नियमाप्रमाणें त्यानें १८१४ मध्यें मराठी व हिंदुस्थानी या दोन भाषांची परीक्षा दिली व नेटिव इन्फट्रीच्या नवव्या रेजिमेंटमधील दुसऱ्या बॅटॅलियनमध्यें भाषाभिज्ञ (Linguist) म्हणून त्याची नेमणूक झाली. १८१६ मध्यें लेप्टनंट, १८२४ मध्यें कॅप्टन या हुद्यांवर तो हळुहळु चढत गेला. आणि १८३७ मध्यें तो इंग्लंडांत सेवानिवृत्त झाला व १८७२ मध्यें खिस्तवासी झाला. [२६]

ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करी खात्यांत नोकरीवर असतांना सोलापुरास त्याची नेमणूक झाली. तेथें भाषांतराच्या कामीं उपयोग व्हावा म्हणून त्यानें टॉमस कॅंडीच्या मदतीनें पुष्कळ मराठी शब्द गोळा करून त्यांची एक यादी केली. इ. स. १८२३ मध्यें त्याची मुंबईस बदली झाल्यावर मुंबईचा तत्कालीन गव्हर्नर एल्फिन्स्टन याच्याकडे मराठीइंग्रजी व इंग्रजी-मराठी कोश तयार करण्याची त्यानें इच्छा व्यक्त केली व त्यासाठीं चालू कामांतून आपली मोकळीक व्हावी, अशी विनंति केली. याचवेळीं मुंबईला एल्फिन्स्टनच्या स्फूर्तीनें 'मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी' जन्माला आली होती; व तिच्यामार्फत मराठी भाषेमधून कोशव्याकरणादि ग्रंथ निर्माण व्हावे असे प्रयत्न चालू होते. मोल्स्वर्थनें इ. स. १८२४ मध्यें गुजराथेंतील खेडा जिल्ह्यांत नोकरीवर असतांना कोशाच्या कामाला सुरवात केली. एल्फिन्स्टनला कोशकार्याचें महत्त्व पटलें होतें; पण त्यानें एकदम मोल्स्वर्थची त्याच्या नोकरींतून मोकळीक केली नाहीं. पुढें इ. स. १८२६ मध्यें मोल्स्वर्थच्या विनंतीकरून टॉमस व जॉर्ज कॅंडी या बंधूंची लष्करी कामांतून मोकळीक होऊन ते मोल्स्वर्थच्या मदतीला आले. दुर्दैवानें वर्षभरांत त्या दोघांना पुन्हां कामावर रुजू व्हावें लागलें. तथापि कॅंडीबंधु व्यक्तिशः कोशकार्यांत मदत करीतच होते. अशाप्रकारें इ. स. १८३१ मध्यें मोल्स्वर्थचा मराठी-इंग्रजी कोश तयार झाला. [२७] मोल्स्वर्थच्या तदनंतरच्या आयुष्याबद्दल त्याचा मित्र रे. मिचेल म्हणतो :—

" Coming to believe that military service was inconsistant with his duty as a Christian, he had quitted the army, dropped his pay and military rank, and become plain Mr. Molesworth. He was tall, stately, aristocratic in bearing and

---

२६ ही माहिती श्री. पु. मं. लाड, I. C. S. यांच्याकडून मिळूं शकली.

२७ जॉन विल्सन, **वाक्यावळी**. आ. ४. १८६०. प्रस्तावना, पृ. १५–१६.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

वर्ग.....क्र.....

appearance; a keen observer, ...I never knew a man who studied the Scriptures more deeply, or could throw more light on the meaning of difficult passages." २८

कोशाव्यतिरिक्त 'शालापद्धति' (१८२४) 'पापपीडितांस शांति' (१८२८) 'ज्ञानमार्गाची सूचना' (१८४९) व 'God being compassionate, why does man suffer' (१८५०) हीं पुस्तकें त्याच्या नांवें जमा आहेत. यापैकीं 'पापपीडितांस शांति, हें एकोणिस पृष्ठांचें पुस्तक अहमदनगर येथील अमेरिकन मिशनच्या संग्रहीं पहावयास मिळतें. "मोल्स्वर्थसाहेब एतद्देशीय लोकांशीं फार प्रीतीनें व स्नेहानें वागत असत. त्यांच्या कोशाच्या कामांत साहाय्य करणारे जे शास्त्री त्यांजवळ होते त्यांस तर हे आपणांतीलच एक वृद्ध शास्त्रीबुवा आहेत, असें वाटत होतें...त्यापैकीं जर कोणी अद्याप जीवंत असते व त्यांस ह्यांच्या मरणाची खबर समजली असती तर ते क्षणभर सुतक धरून स्नान केल्याशिवाय राहिले नसते," या शब्दांत 'सत्यदीपिका'-कारांनीं मोल्स्वर्थच्या स्वभावाचें वर्णन केलें आहे. २९

मराठी-इंग्रजी कोश १८३१ मध्यें पुरा झाल्यावर मोल्स्वर्थनें इंग्रजी-मराठी कोशरचनेचें कार्य तांतडीनें हातीं घेतलें. यासाठीं त्यानें 'Todd's Edition of Johnson' हा इंग्रजी कोश घेऊन कामाला सुरुवात केली. १८३२ च्या शेवटीं मेजर कँडी इंग्लंडहून परत आल्यावर मोल्स्वर्थच्या मदतीला आले. १८३५ च्या मध्यापर्यंत दोघांनीं मिळून कोशाचें काम केलें; परंतु नंतर दोघेहि आजारी पडून काम बंद पडलें. पुढें आपण हें काम करूं शकूं या भावनेनें मोल्स्वर्थ कोशाच्या कागद-पत्रासह इंग्लंडला गेला. तथापि त्याच्या अपेक्षेप्रमाणें कोशाचें काम होऊं शकलें नाहीं. हा कोश पुरा व्हावा अशी सरकारची इच्छा असल्यामुळें मेजर कँडीला सरकारकडून यासंबंधीं विचारण्यांत आलें. काम फार कठीण आहे, जुना अनुभव कटु आहे, तरी सुद्धां कोश पुरा होणें आवश्यक आहे, असें कँडीला वाटून त्यांनीं १६ सेप्टेंबर १८४० रोजीं, हें काम अंगावर घेण्याची तयारी असल्याचें सरकारला कळविलें. ते लिहितातः—

"My former painful experience of the exhausting nature of the work makes me shrink from resuming it, but my sense of its great importance makes me long to see it finished, and renders me willing to do my best to finish it, should Government desire me, in the absence of some more able person to take it up." ३०

---

२८ M. Mitchell *In Western India.* 1899. pp. 262-263.
२९ ज्ञानोदय, १ ऑक्टोबर, १८७२. पृ. २९५.
३० *D. P. I. Board of Education.* 1840. p. 444.

कँडीकृत इंग्रजी–मराठी कोश

अशाप्रकारें मेजर कँडीनीं इंग्रजी–मराठी कोशाच्या कामाला १८४० मध्यें सुरुवात करून १८४७ मध्यें तें पूर्ण केलें. या कोशाला जोडलेल्या प्रस्तावनेंत त्यांनीं कोशकार्याचा थोडक्यांत इतिहास निवेदन करून, मराठी भाषेच्या शुद्धलेखनाबद्दलच्या कांहीं वादग्रस्त प्रश्नांची चर्चा केली आहे. कोशपूर्तीचा आनंद व्यक्त करून ते म्हणतात :–

" He gratefully acknowledges the goodness of God, who has enabled him to persevere in his toil, not withstanding many hindrances and much bodily weakness, and has permitted him to finish the work. He supplicates his blessing on it, that it may be instrumental in the diffusion of Truth, scientific, historical, moral and religious through the countries in which the Marathi language is spoken." [३१]

या कोशाला 'An Essay on the English and Marathi Languages' नामक निबंध जे. एस् . या सहीनें जोडलेला आहे. तो व्याकरणकार रे. स्टीव्हेनसन याचा आहे. स्टीव्हेनसन या निबंधाच्या शेवटीं म्हणतो कीं, त्यांतील बहुतेक मुद्दे त्याला मेजर कँडी यांनीं सुचविलेले होते. विशेषत: मराठी भाषेच्या वाक्यरचनेची चर्चा या निबंधांत केलेली आढळते.

वरील कोशाची दुसरी सुधारलेली आवृत्ति तयार करण्याचें काम कँडीकडेच आलें व त्याप्रमाणें १८७३ मध्यें या इंग्रजी–मराठी कोशाची दुसरी आवृत्ति निघाली. या कोशाबद्दल विशेष म्हणजे त्यासाठीं झालेल्या खर्चाची विभागणी सरकार व तत्कालीन संस्थानिक यांच्यामध्यें केली गेली. कोशाच्या छपाईचा खर्च सरकारनें द्यावयाचें ठरविलें. मे. कँडी यांना त्यांच्या श्रमाबद्दल द्यावयाचे बारा हजार रुपये विशाळगड, कोल्हापूर, इचलकरंजी, मुधोळ इत्यादि संस्थानिकांकडून जमविले गेले. [३२] कँडीनीं सुधारलेल्या आवृत्तींत त्यांनीं कांहीं इंग्रजी शब्द अधिक घातले आहेत व मोल्स्वर्थनें सुधारून छापलेल्या मराठी इंग्रजी कोशाचा उपयोग केलेला आहे. तसेंच मराठी भाषिकांना माहीत असण्याची गरज नाहीं या उद्देशानें प्रथमावृत्तींत गाळलेले कांहीं शब्द, उदाहरणार्थ इंग्रजी फळें, फुलें, आणि प्राणी इत्यादिवाचक शब्द, या आवृत्तींत घातले गेले आहेत. आपल्या सर्व श्रमांचें चीज झालें असें मेजर कँडीना वाटलें, कारण:–

---

३१ T. Candy, *Dictionary English and Marathi*. 1847. Preface, p. 7.

३२ *D. P. I. Book Depot, Vol.* 25. 1870–71. p. 49.

"The learned Boden Professor of Sanskrit at the University of Oxford in his preface to his English and Sanskrit Dictionary mentioned it in terms of great commendation." [३३]

बाबा पदमनजी

वर उल्लेखिलेले दोन कोश–मोल्स्वर्थचा मराठी-इंग्रजी कोश व कँडीचा इंग्रजी-मराठी कोश–पुढील काळांत इतर कोशकर्त्यांना मार्गदर्शक झाले. मोल्स्वर्थच्या कोशावरून बाबा पदमनजी यांनीं 'A Compendium of Molesworth's Marathi and English Dictionary' (१८६३) नांवाचा एक लहान कोश तयार केला. या कोशाबद्दल बाबा लिहितातः—

"आतां ज्या महाकोशाचा हा लघुकोश केला आहे त्याचें वर्णन करण्याची मला शक्ति नाहीं. सूर्य दाखवायास जसा दिवटीचा उजेड नको, तसा त्या प्रचंड ग्रंथाचा माहिमा प्रगट करायास एथें स्तुतिवाद करणें नलगे. ज्यांनीं लक्षपूर्वक अवलोकन केलें आहे त्यांस त्याच्या कर्त्याची विशाल बुद्धि, विचित्र विद्वत्ता, विस्तीर्ण शोध, दीर्घ प्रयत्न, अश्रान्तश्रम, व लोक कल्याणाची निष्काम वासना हीं पाहून मोठा अचंबा वाटतो. विशेष काय सांगावें, ह्या देशांत यावत् महाराष्ट्र व इंग्लिश भाषांचा लोक अभ्यास व उपयोग करतील तावत् त्यांस मोलस्वर्थ ह्या नामाभिधानाचें विस्मरण होणार नाहीं. अस्तु, अशा महा शब्दार्णवांत तीन वर्षें संचार करून त्यांतील पूर्ण साठ सहस्र शब्दांचें व त्यांच्या चतुर्गुणित अर्थांचें मंथन करून हें नवनीत काढिलें आहे, त्याच्या दोषांकडे लक्ष न देतां सुज्ञानीं गुणग्रहण करावें." [३४]

या कोशांत शेतपेात, उदीमव्यापार, वसूलवासलात, देवघेव इत्यादि व्यवहारोपयोगी विषयांचे शब्द बाबांनीं घेतले आहेत. बाबांची या कोशानिर्मितीमागें एकच इच्छा होती, ती ही :—

"या देशांतील महाराष्ट्र भाषा बोलणारी प्रजा व तिजवर राज्य करणारें इंग्लिश भाषा बोलणारें सरकार ह्यांमध्यें परस्पर सख्यत्त्वाची वृद्धि होण्यास, व ज्यांत अक्षय जीवनाचे शब्द आहेत असें जें पवित्रशास्त्र त्याचा ह्या देशांत प्रसार होण्यास

---

३३ T. Candy, *Dictionary English ond Marathi*, Ed. 2, 1873. Preface.

३४ Baba Padmanji, *A Compendium of Molesworth's Marathi and English Dictinary*. 1863. प्रस्तावना, पृ. १०.

हा लहानसा ग्रंथ कांहीं अंशीं कारणीभूत होवो." [३५] कोशासारखा ग्रंथ धार्मिक म्हणतां येणार नाहीं; म्हणूनच बाबांनीं पवित्रशास्त्रप्रसाराची सादेच्छा व्यक्त केली असतांहि सरकारनें त्यांच्या कोशाच्या पन्नास प्रती विकत घेतल्या व कोशकर्त्याच्या इच्छेला मान देऊन अडीचशें प्रती सरकारी पुस्तकखान्यांत विक्रीस ठेविल्या. [३६]

या कोशाला सरकारप्रमाणेंच दाक्षिणा प्राइझ कमिटीनेंहि मदतीचा हात पुढें केला होता. कोशकर्त्यानें कमिटीकडे कोशासाठीं पांचशें रुपयांची मागणी केली. मेजर कॅंडीनीं कमिटीचे अध्यक्ष या नात्यानें दोनशें चाळीस रुपये बक्षीस व दोनशें साठ रुपये कर्ज म्हणून बाबांना द्यावे असें ठरविलें; परंतु तत्कालीन डी. पी. आय. ला तें मान्य झालें नाहीं. त्याऐवजी एकदम चारशें रुपये बक्षिस म्हणूनच द्यावे असें ठरलें. [३७] इ. स. १८९० पर्यंत या कोशाच्या चार आवृत्त्या निघाल्या. यावरून या कोशाची उपयुक्तता दिसून येते.

बाबा पदमनजीनीं वरीलप्रमाणेंच इंग्रजी-मराठी कोशहि तयार केला; पण हा कोश कॅंडीच्या इंग्रजी-मराठी कोशाची छोटी आवृत्ति नसून, वेब्स्टर, रीड, हाइड क्लार्क, रिचर्डसन यांचे इंग्रजी कोश, कॅंडीचा इंग्रजी-मराठी कोश, तळेकर शास्त्री यांचा कोश, रीव्हज्चा कानडी कोश, फोबर्सचा हिंदुस्थानी इंग्रजी कोश, विल्यम्सचा इंग्रजी-संस्कृत कोश इत्यादि अनेक कोशांच्या साह्यानें तयार केला. या कोशाची पहिली आवृत्ति इ. स. १८६० मध्यें निघाली व १८९० पर्यंत त्याच्या-तीन आवृत्त्या झाल्या. या कोशाचें काम अनेक संकटांना तोंड देऊन एकट्यानें कसें केलें तें सांगतांना बाबा म्हणतात :—

"ग्रंथकर्त्यापासीं बहुत विद्या नाहीं. जें अल्पस्वल्प विद्याधन व बुद्धिधन त्यापासीं आहे त्याच्या भांडवलावर लोकहितार्थ हा व्यापार केला आहे. त्याला कोणी विद्वानांनीं ह्या कार्यांत सहायही केलें नाहीं. ग्रंथाच्या आरंभीं असें सहाय मिळावें म्हणून पैसा खर्चून वर्तमानपत्रांतून जाहिराती दिल्या होत्या, परंतु त्यांजकडे कोणी लक्ष दिलें नाहीं, त्यामुळें जें कांहीं करायाचें होतें तें एकट्यासच केवळ पुस्तकांच्या सहा-यानें व स्वतांच्या शोधानें करावें लागलें. तथापि ग्रंथकर्त्यानें आपल्याकडून होतील तितके श्रम व शोध करण्यांत कांहीं कसर केली नाहीं. कारण जें सर्व आपण करतों, तें हलकें असो, भारी असो, लहान असो, थोर असो, त्याचा जबाब ईश्वरास द्यावा लागेल.

---

३५ Baba Padmanji. *A. Compendium of Molesworth's Marathi and English Dictinary*. 1863. प्रस्तावना, पृ. ११.

३६ *D. P. I. Miscellaneous, Vol.* 19. 1863-64. p. 288.

३७ *D. P. I. Duxina Fand, Vol*, 15. 1862-63. pp. 51-54.

अशा मनोभावानें हा उद्योग केला आहे, तो ईश्वर सफळ करो." ३८

कोशाच्या कामीं रे० मरे मिचेल सारख्यानें केलेल्या आर्थिक मदतीचा सादर उल्लेख बाबांनीं आपल्या कैफियतींत केला आहे; परन्तु पुढील काळांत त्यांच्या दोनहि कोशांच्या सुधारणेचें व पुनर्मुद्रणाचें काम करणें त्यांना शारीरिक व आर्थिक दृष्ट्या अशक्य झालें. म्हणून १८९४ मध्यें त्यांनीं विद्याखात्याकडे आपल्या शारीरिक व मानसिक दुर्बलतेची कहाणी–डोळ्यांत मोतिबिंदु पडेल आहेत, स्मरणशक्ति क्षीण झाली आहे, बुद्धिमांद्य आलें आहे इ० कथन करून दोनहि कोश विद्याखात्यानें सहा हजार रुपयांस विकत घ्यावे व आपणांस मुक्त करावें, असा अर्ज केला. त्या अर्जांत ते आणखी म्हणतात :–

"My great desire is to see these two literary children of mine settled, as it were, in home like Government Educational Department, and to continue with more vigour to carry on their course of fruitful activity and usefulness for the generations to come." ३९ बाबांच्या या विनंतीचा उपयोग झाला कीं नाहीं तें समजत नाहीं.

श्रीकृष्ण रघुनाथशास्त्री तळेकर

बाबा पदमनजीचे वरील कोश तयार होण्याच्या अगोदर विद्याखात्यातर्फे इंग्रजी शाळांतील मुलांची अडचण दूर करण्यासाठीं एक छोटा शब्दकोश छापिला गेला होता. १८५८ मध्यें विद्याखात्याच्या प्रमुखानें मेजर कॅंडीकडे कलकत्त्याला छापलेला एक इंग्रजी–उर्दू कोश पाठवून दिला व त्या धर्तीवर एक इंग्रजी–मराठी कोश तयार करावयास सांगितलें. त्याप्रमाणें कॅंडीनीं श्रीकृष्ण रघुनाथशास्त्री तळेकर यांच्याकडून एक कोश तयार करवून घेतला व तो 'इंग्लिश आणि मराठी कोश' या नांवानें १८६१ मध्यें छापिला. या कोशांत तत्कालीन इंग्रजी शाळांमधून वापरल्या जाणाऱ्या सर्व इंग्रजी पुस्तकांतील शब्द येतील अशी खबरदारी कोशकर्त्यानें घेतली. त्यासाठीं कॅंडी, मोल्स्वर्थ, वेब्स्टर वगैरेंच्या कोशांचा उपयोग आपण कसा केला व त्यांचें वैशिष्ट्य काय, हें वर्णन करून तळेकर म्हणतातः–

---

३८ Baba Padmanji. *A Comprehensive Dictionary, English and Marathi*. 1870. प्रस्तावना, पृ. १०.

३९ *D. P. I. Book Depot, Vol.* 59. 1894-95. (No paging.)

"The compiler has endeavoured to avoid Sanscrit words as much as possible, as they are not understood by the majority of the people. He has also attempted to give the meanings generally by explanations in preference to mere equivalents, as these do not always convey the same idea which the English words do. Only suitable Marathi equivalents and simplest Sanscrit words are given." ४०

वरील उताऱ्यांत व्यक्त होणारी संस्कृत शब्द शक्यतों टाळण्याची प्रवृत्ति त्या काळाला अनुसरून होती, कारण डी. पी. आय. हावर्ड, मे० कँडी वगैरे विद्याखात्यांतील अधिकाऱ्यांचा या बाबतींत कटाक्ष होता.

इतर शालोपयोगी कोश

विद्याखात्यातर्फे ज्याप्रमाणें तळेकरांचा 'इंग्लिश आणि मराठी कोश' तयार झाला त्याप्रमाणें खासगीरीत्या भिकदेव वासुदेव आठले यांचा 'Marathi-English Dictionary' हा कोश १८७१ मध्यें प्रसिद्ध झाला. इंग्रजी शिकणाऱ्या मुलांच्या दृष्टीनें तो फार उपयुक्त ठरला. या कोशाचा उद्देश विद्यार्थ्यांमधून आदर्श भाषांतरकार-निर्माण व्हावे हा होता. आठले म्हणतातः—

"In stead of giving as Molesworth gives, a lengthy explanation in English of a Marathi word, I have attempted to furnish the student with a simple word as a synonym, an attempt which, if successful, is obviously calculated to be of greater assistance in translation." ४१

हा कोश अपुरा असल्याच्या सबबीवर मेजर कँडीनीं तो अमान्य ठरविला व त्यामुळें विद्याखात्याची मदत आठले यांना मिळूं शकली नाहीं. ४२

श्रीकृष्णशास्त्री तळेकरांच्या कोशांत इंग्रजी शाळांमधून वापरल्या जाणाऱ्या इंग्रजी पुस्तकांतील शब्दांखेरीज अन्य शब्दांचाहि भरणा होता; परंतु फक्त हावर्डचीं तीन इंग्रजी क्रमिक पुस्तकें व इंग्रजी कवितांचें पुस्तक यांतीलच शब्दांचा एक कोश विद्याखात्यातर्फे १८६४ मध्यें छापिला गेला. तो कोश म्हणजे विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांचा 'इंग्रेजी आणि मराठी कोश' होय. या कोशासाठीं कँडी, वेब्स्टर व

---

४० श्रीकृष्ण रघुनाथशास्त्री तळेकर, **इंग्लिश आणि मराठी कोश.** १८६१. प्रस्तावना, पृ. ६.

४१ भिकदेव वासुदेव आठले, **Marathi-English Dictionary.** 1871. Preface.

४२ *D, P. I. Government, Vol.* 1. 1871–72. pp.134-142.

रिचर्डसन यांच्या कोशांचा उपयोग केल्याचें कोशकर्त्यानें नमूद केलें आहे. तसेंच, "केवळ मराठी पर्यायशब्द दिल्यापासूनच इंग्रजी शब्दाचा अर्थ विद्यार्थ्याच्या मनांत स्पष्टपणें येणार नाहीं असें जेथें ग्रंथकर्त्यास वाटलें तेथें त्यानें व्याख्या दिल्या आहेत; व कोठें कोठें विशेष स्पष्टीकरण होण्याकरितां ते इंग्रजी शब्द, आंत असलेलीं वर लिहिलेल्या पुस्तकांतील वाक्यें त्यांच्या मराठी भाषांतरासहित दिलीं आहेत." [४३]

इंग्रजी क्रमिक पुस्तकांतिल शब्दांचा पंडित यांचा 'इंग्रेजी आणि मराठी कोश' ज्याप्रमाणें शुद्ध शालेय कोश म्हणून म्हणतां येईल, त्याचप्रमाणें विद्याखात्याच्या कँडीकृत मराठी सहा क्रमिक पुस्तकांतील कठीण शब्दांचा संपूर्ण शब्दार्थसंग्रह म्हणून शालोपयोगी असा एक कोश बाळकृष्ण मल्हार बीडकर यांनीं 'रत्नकोश' या नांवानें इ. स. १८६९ मध्यें तयार करून छापिला. या कोशाला श्रीकृष्णशास्त्री तळेकर यांचें उत्तेजन व मदत मिळाल्याचें कोशकर्त्यानें उघड केलें आहे. अशा छोट्या शालेय कोशाची आवश्यकता प्रतिपादण्यासाठीं बीडकर लिहितात :—

" शाळांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस उपयोगी पडावा, अशा रीतीचा मराठी क्रमिक सहा पुस्तकांतील संपूर्ण शब्दांचा हा कोश केला आहे. ह्यांत सहा पुस्तकांतील संपूर्ण शब्द निवडून, ते विल्हेवारीनें दिले आहेत. प्रथम शब्द, त्यापुढें व्याकरणांतील त्याची जाति, त्यापुढें तो कोणत्या भाषेंतून आला ती भाषा वगैरे आणि त्यापुढें अर्थ आणि पर्याय शब्द याप्रमाणें योजना केली आहे. जेथें बरोबर अर्थाचा पर्याय शब्द देतां आला नाहीं, तेथें करवेल तितकें सुबोध स्पष्टीकरण करून दिलें आहे." [४४]

मराठी क्रमिक पुस्तकांतील कठीण शब्दांचा कोश तयार करण्याचे प्रयत्न 'रत्नकोश' होण्याच्याहि अगोदर झाले होते. गोविंद विठ्ठल उर्फ भाऊ महाजन यांनीं असा एक कोश १८५९ मध्यें तयार करून, तो छापण्यासाठीं विद्याखात्याकडे त्यांनीं मदत मागितली होती; परंतु मेजर कँडीच्या प्रतिकूल टीकेमुळें आवश्यक ती आर्थिक मदत त्यांना मिळू शकली नाहीं. कँडीनीं आपल्या टीकालेखांत लिहिलें कीं क्रमिक पुस्तकांत विशेष कठीण शब्द नसल्यामुळें अशा कोशाची गरज नाहीं. शिवाय मोठा दोष कँडीना दिसला तो हा कीं कोशकर्त्यानें सोप्या शब्दांचे अर्थ कठिण शब्दांत दिलेले आहेत. उदाहरणार्थः—

---

४३ विष्णु परशुरामशास्त्री पंडित, **इंग्रेजी आणि मराठी कोश.** १८६४. प्रस्तावना, पृ. ७.

४४ बाळकृष्ण मल्हार बीडकर, **रत्नकोश.** १८६९. प्रस्तावना, पृ. २-३.

उपास या शब्दाऐवजीं उपवास, बरोबरी—साम्य, बहीण—भगिनी, बाकी—उर्वरितांश, बोडका— शिरोवेष्टणरहित, भुकेला— क्षुधित इत्यादि. तसेंच कांहीं शब्दांचे अर्थ चुकीचे दिलेले असल्याचें त्यांना आढळलें. उदाहरणार्थ;— पंडित म्हणजे वक्ता, भाची म्हणजे भाचाची बहीण, भाकर म्हणजे रोंट अगर पोळी, बोका म्हणजे मार्जार, महाराज म्हणजे सार्वभौम राजा इत्यादि. त्याचप्रमाणें भिडस्थ या शब्दाला पर्याय म्हणून दिलेला लज्जितखोर हा शब्द संस्कृत व पार्शियन या भाषांतील शब्दांचा बनाविलेला घेडगुजरी सामासिक शब्द दोषस्थळ म्हणून कँडीनीं दर्शविलें. अशाप्रकारें भाऊ महाजनांच्या कोशांतील दोष मेजर कँडीनीं दाखवून दिले. [४५] व सरकारी मदत मंजूर केली नाहीं. हा कोश छापला गेलेला दिसत नाहीं.

मेजर कँडीच्या कडक टीकेमुळें आणखी एक कोश अमान्य ठरविला गेला. कृष्णाजी कानिटकर व गोविंद फणसळकर यांनीं 'मराठी तिसऱ्या व चवथ्या पुस्तकांतिल शब्दसंग्रह' तयार करून तो मेजर कँडीकडे अभिप्रायार्थ पाठविला. कँडीनीं त्यावर २५ नोव्हेंबर १८७१ रोजीं लिहिलेल्या टीकेंत प्रथमत: 'शब्दसंग्रह' या शब्दाला हरकत घेऊन त्याऐवजीं 'शब्दांचा संग्रह' असा पर्याय सुचविला, कारण 'The word पुस्तकांतील is an adjective governing संग्रह.' यानंतर 'प्रसिद्ध' या शब्दाचा 'प्रख्यात' या शब्दानें अर्थ व्यक्त करतांना कोशकारानें सोप्या शब्दाबद्दल कठीण शब्द कां वापरावा, तसेंच एका ठिकाणीं 'प्रभा' म्हणजे 'प्रकाश' व दुसऱ्या ठिकाणीं 'प्रकाश' म्हणजे 'प्रभा' अशासारखे अर्थ देण्यांत काय फायदा. 'स्वादिष्ट' या शब्दाचा सुवासिक हा अर्थ बरोबर आहे काय, असे अनेक दोष मेजर कँडीनीं दाखवून दिले. त्यांना आढळलेला महत्त्वाचा दोष म्हणजे पुष्कळ अशुद्ध शब्द अतीशय, नामांकीत, बुद्धीभेद, पती, स्वामिभक्ती, दाधला, धन्याची भक्ती इत्यादि मेजर कँडीच्या अशा टीकेमुळें या कोशाला सरकारी मदत न मिळणें साहाजिक होतें. [४६]

मराठी भाषेंत तयार होणाऱ्या नवीन शालेय पुस्तकांविषयींचें सरकारी धोरण काय होतें याची कल्पना वर दिलेल्या कोशांवरील कँडीच्या टीकालेखांवरून हाऊं शकते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत जरी सरकारी मदतीशिवाय स्वतंत्ररीत्या मराठी भाषेंत ग्रंथनिर्मिति होत होती, तरीसुद्धां कँडीच्या भाषाविषयक कडक धोरणामुळें पुष्कळ प्रयत्न असफल झाले. वर उल्लेखिलेले दोन कोश उदाहरणादाखल दाखवितां

४५ *D. P. I. Book Depot, Vol.* 22. 1859. pp. 646–650.
४६ *D. P I. Government. Vol.* 1, 1871–72. pp. 825–826.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.
वर्ग.....क्रमांक.....

येतील. शालोपयोगी म्हणून ज्यांची गणना करतां येईल असे आणखी कांहीं लहान शब्दकोश आढळतात. उदाहरणार्थ, कृष्णाजी सदाशिव जोशी यांचा 'बालकोश' (१८७०), दिनकर भिकाजी जोशी यांचा 'लघुशब्दसंग्रह' (१८७१), भास्कर बल्लाळ आपटेकृत 'कवितादर्पण' (१८७२) इत्यादि. हे शब्दकोश निवळ टिपणी-वजा असल्यामुळें त्यांची नोंद करण्यासाठींच येथें उल्लेखिले आहेत.

नांव घेण्यासारखा असा आणखी एक शब्दकोश या काळांत तयार झाला. तो म्हणजे रघुनाथ भास्कर गोडबोले यांचा "हंसकोश" (१८६३) हा होय. प्रस्तावनेंत ते म्हणतात, हें पुस्तक म्हणजे महाराष्ट्र भाषेच्या कितीएक कवितांमधील कठिण शब्दांचा कोश. भांडारामध्यें, जसा अमोल व दुर्मिळ संग्रहार्ह वस्तूंचा संग्रह असतो, तसाच कवितां-मधील ज्या शब्दांचा अर्थावबोध झाल्या शिवाय त्या उत्तमप्रकारें लागत नाहींत, अतएव जे कवितांमधील इतर शब्दांहून संग्रहयोग्य, त्यांचा संग्रह यथामति ह्या कोशांत केला आहे."[४७] असे सुमारें सात हजार शब्द या कोशांत आले आहेत. कृष्णशास्त्री चिपळुणकरांच्या सूचनेवरून कोशकर्त्यानें दुर्बोध शब्दांस ग्रंथांतील ओव्या व संस्कृतादि संज्ञा लाविल्या आहेत. तसेंच कृष्णराय रामचंद्र यांनीं दिलेली कांहीं कवीबद्दलची माहितीहि या कोशास जोडलेली आढळते. हें सर्व काम गोडबोले यांनीं इ. स. १८५६ मध्यें सुरू करून इ. स. १८६३ मध्यें पुरें केलें.

एकोणिसाव्या शतकांतील शालेय वाङ्मयाचा अभ्यास करतांना कोशवाङ्मयाचा जो आढावा अद्यापपर्यंत घेतलेला आहे त्यांतील बरेचसे कोश जरी शालेय वाङ्मयांत पूर्णपणें अंतर्भूत करतां येण्यासारखे नसले, तरीसुद्धां मराठी भाषेच्या प्रगतीमध्यें महत्त्वाचें कार्य तत्कालीन कोशांनींहि केलें आहे. एवढ्याच हेतनें गेल्या शतकांतील मुख्य कोशांची पाहणी करणें आवश्यक वाटलें.

---

४७ रघुनाथ भास्कर गोडबोले **हंसकोश.** १८६३. प्रस्तावना.

प्रकरण नववें

कथा वाङ्मय

कथात्मक वाङ्मयाची सुरुवात

महाराष्ट्रांत इंग्रजी अमलाची सुरुवात झाल्यावर लोकशिक्षणप्रसाराचे प्रयत्न कसकसे झाले आणि विद्याप्रसार व शालेय पुस्तकांची निर्मिति यांचा परस्परांशीं किती निकट संबंध होता, तें मागील भागांत सविस्तर वर्णिलेलें आहे. या प्राथमिक अवस्थेंत शालेय वाङ्मयाव्यतिरिक्त दुसरें वाङ्मय निर्माण होणें अशक्य होतें. या काळांत परकीयांशीं महाराष्ट्राचा नुकताच संबंध आला होता. महाराष्ट्र समाजाचा यावेळीं जणुं पुनर्जन्म झाला होता असें म्हणावयास हरकत नाहीं. या नवजीवनाच्या बाल्यावस्थेंत प्रौढ सारस्वत निर्माण होणें कठीण होतें, त्यामुळें महाराष्ट्रांत इंग्रजी अमदानी सुरू झाल्यापासून विशेषतः एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत बालोपयोगी वाङ्मयोत्पत्तींत दिवस खर्च व्हावे यांत नवल नाहीं.

या बालोपयोगी वाङ्मयांत कथात्मक पुस्तकांना महत्त्वाचें स्थान मिळणें अपरिहार्य होतें. लोकशिक्षणासाठीं मनरंजनद्वारा विद्याप्रसार करणें हाच एकमेव मार्ग कोणत्याहि काळीं व कोठल्याहि स्थळीं उपयुक्त असतो. त्यामुळें वाङ्मयाच्या प्राथमिक अवस्थेंत कथावाङ्मयाचा भाग फार मोठा असतो. एकोणिसाव्या शतकांतील मराठी भाषेचा वाङ्मयेतिहास पाहिला तर हीच गोष्ट प्रत्ययाला येते. 2042

माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनच्या प्रेरणेनें १८२२ मध्यें जी 'मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी' स्थापन झाली, तिनें शिक्षणप्रसारार्थ महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं शाळा स्थापण्याचें व या शाळांतील मुलांना उपयुक्त अशीं शालेय पुस्तकें निर्माण करण्याचें काम जोमानें चालू केलें. मुलांना गोष्टींच्या मदतीनें नीतिपाठ देणें हा महत्त्वाचा उद्देश समोर ठेवून पुस्तकप्रकाशनाची आंखणी केली गेली. 'लिपिधारा,' 'अंकलिपि,' 'बोधवचन,' 'पंचोपाख्यान,' व 'विदुरनीति' अशीं पांच पुस्तकें १३ सेप्टेंबर, १८२३ पर्यंत छापून तयार झालीं.[1] त्यापैकीं पहिलीं दोन तर शालेय शिक्षणाच्या प्राथमिक अवस्थेंत उपयोगी पडणारीं अशींच होतीं.

बोधवचन

सद्वचनें लहानपणींच मुलांकडून पाठ करवून घेणें हा बालशिक्षणाचा एक आवश्यक भाग असतो, या कल्पनेनें प्रेरित होऊन 'बोधवचन' ही पुस्तिका मुलांच्या हातीं देण्यासाठीं छापिली गेली. या पुस्तिकेच्या पहिल्या दोन आवृत्तीच्या प्रती मिळूं शकत नाहींत; परंतु १८३१ च्या तिसऱ्या आवृत्तीवरून तिची कल्पना येते. पृष्ठाच्या डाव्या बाजूला बालबोध व उजव्या बाजूला मोडी अशा पद्धतीनें वचनें छापलेलीं

१ *G. D. Vol.* 63. 1824. p. 114.

आहेत. 'विद्यावंताची गरज सर्वांस लागत्ये' (पृ. २), 'जो मूल विद्याभ्यास करितो, त्यावर सर्व लोक प्रीति करितात (पृ. २) इत्यादि विद्येची थोरवी सांगणारीं वचनें, 'आई, बाप, गुरू, धणी, याणी काम सांगतांच करावें; त्यास बयाद सांगू नये' (पृ. ६) 'बायकांचे मंडळींत बसों नये' (पृ. १४) 'मिठाई मेवे खाण्याचा जिभेस' संवका लावूं नये' (पृ.३८), 'कोणाची चहाडी करूं नये' (पृ. १४), लोंचाचा वेव्हार ठेवूं नये' (पृ. ३८) इत्यादि व्यावहारिक नीतिनियम या छोट्या बहात्तरपृष्ठी पुस्तिकेच्या द्वारा मुलांना शिकविण्यासाठीं तिची प्रथमच योजना झाली. या वचनांबद्दल दादोबा पांडुरंग आपल्या आत्मचरित्रांत लिहितात :—

"त्या लहानशा पुस्तकांत लहान मुलांस नीतिपर लहान लहान वाक्यें लिहिलीं असत. त्याचा आरंभ असा होता. 'पहाटेस उठून ईश्वराचें स्मरण करावें.' 'पहाटेस उठून अभ्यास करावा म्हणजे विद्या लवकर येईल.' हीं वाक्यें शंभरा वर होतीं. तीं सारी तोंडपाठ करावीं लागत. कधीं कधीं तीं सारीं वाक्यें एका मागें एक आई बापां जवळ व जे कोणी आमचे नातलग, त्यांच्या भेटीस येत त्यांज पाशीं मी गडगडित तोंडपाठ करून दाखवित असें तेव्हां त्या सर्वांस मोठी खुशी होत असे, आणि आमच्या नव्या शाळेंतलें शिकणें फार चांगलें असें त्यांस वाटूं लागलें." [२]

या पुस्तिकेंतील कांहीं कल्पनांमुळें तत्कालीन ख्रिस्ती धर्मप्रसारकांचें पित्त खवळलें व त्यांनीं तीवर कडक टीका केली. [३] विशेषतः 'गलत्कुष्ठ्यास स्पर्श करायास भितोस तसा तूं दुसऱ्याचे धर्मास स्पर्श करायास भी. प्रतिष्ठित मनुष्यास दुसऱ्याचा धर्म घेण्याहून दुसरी मोठी बेअबरू नाहीं' [४] अशासारखीं वचनें त्यांना फार झोंबलीं. पुढील काळांत अशीं पुस्तकें अभ्यासक्रमांतून काढून टाकण्याची खटपट मिशनरी लोकांनीं पुष्कळ केली. 'मराठी बोधवचनें,' हें पुस्तक सदाशिव काशीनाथ छत्रे यांच्या नांवें जमा केलें जातें परंतु प्रत्यक्ष पुस्तकावर त्यांचें नांव आढळत नाहीं. 'पंचोपाख्यान' व 'विदुरनीति' हीं दोन शालेय पुस्तकें मात्र मुलांच्या मानानें कठीण वाटतात. असें असूनहि त्यांची निवड करण्यांत तत्कालीन अधिकाऱ्यांनीं दाखविलेलें चातुर्य स्तुत्य आहे. हीं दोन पुस्तकें छापण्यापूर्वी झालेला पत्रव्यवहार सरकारी दप्तरांत पहावयास मिळतो. [५] या पुस्तकांच्या छापलेल्या प्रत्येकीं एक हजार प्रतींची वाटणी कसकशी

---

२ अनंत काकबा प्रियोळकर, **रावसाहेब दादोबा पांडुरंग**. १९४७. पृ. ३१–३२.

३ *Oriental Christian Spectator. Vol.* 14. 1843. pp.300-313.

४ **मराठी बोधवचनें**, आ. ३. १८३१. पृ. ५८–६०.

५ *G. D- Vol.* 10. 1821. pp. 683-691.

झाली, ती विकतांना छपाईसाठीं झालेला खर्च वसूल करण्यापेक्षां, छापील पुस्तकांचा प्रसार हाच एकमेव उद्देश तत्कालीन अधिकाऱ्यांच्या समोर कां होता इत्यादि बाबींची चर्चा मागें केलेलीच आहे.

पंचोपाख्यान

'पंचोपाख्यान' हें संस्कृतमधील पंचतंत्राचें मराठी भाषांतर होय. अशा प्रकारचीं भाषांतरें करण्यासाठीं यावेळीं कांहीं पंडितांची निवड झाली होती. इंग्रजी अमदानींतील पहिला कथात्मक शालेय गद्यग्रंथ म्हणून याचें फार महत्त्व आहे. इ. स. १८२२ मधील 'पंचोपाख्याना'च्या प्रथमावृत्तीची सुरुवात व शेवट येथें मुद्दाम दिला आहे.

"मनुवाचस्पतिशुकपराशरव्यासचाणाक्यनृपशास्त्रकर्त्यांस साष्टांग नमस्कार करून पंचोपाख्यानांतील कांहीं कथा घेऊन लहान कथारूपग्रंथ मंदमतिलोकांसाठीं लिहितों आणी ग्रंथाच्या श्लोकांचा अर्थही लिहितों," अशी प्रतिज्ञा करून भाषांतरकार लिहितो :—

"सुजनाचें अधिष्ठान आणि विद्वज्जनाचें स्थान संपूर्णकलावंतांची खाण असें पैठणनाम नगर तेथें सकलगुणयुक्त सुदर्शननामा राजा होता तो आपले पुत्र शास्त्र न जाणते मूर्ख असे जाणून बहुत चिंतायुक्त होऊन चित्तांत विचार करिता जाहाला कीं पुत्र जे विद्यावंत व धार्मिक नाहींत ते असून फळ काय जशा म्हशी दूध देत नाहींत त्या पाळून फळ काय यास्तव एकच पुत्र वेदशास्त्रजाणता असेल तर त्यापासून सर्व कुटुंब सुख पावेल असा पुत्र नाहीं तर गर्भपात अथवा जन्मतांच मृत अथवा कन्या अथवा भार्या वंध्याच असेल ती बरि परंतु कुळांत अयोग्य पुत्र नसावा पूर्वजन्मार्जितपुण्येंकरून उभयलोकसुखकारक पुत्र प्राप्त होतो पापेंकरून कुळनाशक होतो तर आतां कुमार्गवर्ती माझे पुत्र यांचा नीतिशास्त्राचे उपदेशेंकरून कोण पुनर्जन्म करील असें राजा बोलिला तों विष्णुशर्मा ब्राह्मण सकलनीतिशास्त्रीं प्रवीण बृहस्पतितुल्य अकस्मात् उठून प्रतिज्ञा करिता जाहाला कीं राजा तुझे पुत्र साहामहिन्यात नीतिशास्त्र जाणते करीन तोंपर्यंत कालप्रतीक्षा करावी असें ब्राह्मणाचें वाक्य ऐकून राजा संतुष्ट होऊन त्याचा सन्मान करून पुत्र स्वाधीन करिता जाहाला मग तो ब्राह्मण पांच तंत्रें कल्पून कथारूप नीतिशास्त्र राजपुत्रांस सांगता जाहाला" [६]

'पंचोपाख्याना'चा शेवट खालील ओळींनीं केलेला आढळतो:—

"ही पांच तंत्रे मिळून पंचोपाख्यान सर्वजनास व्यवहार नीतीचें ज्ञान व्हावें आणि भाषण रीतीहि कळावी म्हणोन हा कथारुप ग्रंथ मुंबई नगरीं छापविला आहे मिती श्रावण शुद्ध ८ शुक्रवार शके १७४४ चित्रभानुनाम संवत्सरे" [७]

---

६ **पंचोपाख्यान**. १८२२. पृ. १–२.

७ तत्रैव. पृ. १५६.

वरील उताऱ्यांवरून तत्कालीन लेखनपद्धति, सामासिक शब्दांचा उपयोग, लांब वाक्यें, विरामचिन्हांचा मुळींच वापर नसणें इत्यादि गोष्टी लक्षांत येतात. याशिवाय 'भाषणरीतीहि कळावी म्हणोन' या ग्रंथाचा अभ्यास प्रत्येकानें करावा हाहि हेतु स्पष्ट होतो. संस्कृत भाषेंतील कथापुस्तकांप्रमाणें प्रथम ईशस्मरण करून नंतर कथेला आरंभ करण्याची पद्धति याठिकाणीं अवलंबिलेली आहे.त्याकाळीं छापील पुस्तकांना होणारा विरोध जुन्या पद्धतींचा अवलंब करून थोडासा कमी करतां आला तर पहावा या उद्देशानें हा मार्ग चोखाळलेला दिसतो.

'पंचोपाख्यान' व ख्रिस्ती टीकाकार

या पुस्तकाच्या किती आवृत्त्या निघाल्या तें कळावयास मार्ग नाहीं; परंतु १८३७ ची एक प्रत उपलब्ध आहे. भाषेच्या दृष्टीनें ती कांहींशी सुधारलेली आहे ख्रिस्ती धर्मप्रसारकांनीं या व अशा प्रकारच्या नीतिप्रधान सरकारी शालेय पुस्तकां-विरुद्ध टीकेची झोड उठविली होती. रे. जेम्स मिचेल धर्मप्रसारासाठीं पुण्याच्या आसपास फिरत असतां सरकारी शाळांमधून वापरांत असलेलीं जीं पुस्तकें त्याच्या दृष्टीस पडलीं त्यांबद्दल तो लिहितो :—

"I found, also, what I did not expect, that still the Panchopakhyan is used as a school-book. Copies of it have been very lately issued by the Society to this school, though I had understood that they had long ago disowned both it and the Vidurniti. This matter ought to be inquired into. It is a shame to the Society to exclude all Christian books, and to admit the like of this one, which is based upon, and refers to many points of Hinduism. A Christian Government certainly ought to have nothing to do with such a Society."[८]

ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं 'पंचोपाख्याना' बद्दल कडक धोरण स्वीकारल्यामुळें सरकारनें शिक्षामंडळीकडे विचारणा केली कीं खरोखरच हें पुस्तक शाळांमधून वापरणें अयोग्य आहे कीं काय व जर तें तसें असेल तर शिक्षामंडळीनें तें पुन्हां छापूं नये.[९] यावर १३ मे १८४० रोजीं शिक्षामंडळीनें दिलेलें उत्तर महत्त्वाचें आहे उत्तरांत असें म्हटलें आहे :—

"I am desired by the managing committee of the Society to state that so far from the Panchopakhyan's being considered an objectionable book by them, it is in constant use as one of the class-books of their native schools and was

८ *Oriental Christian Spectator. Vol. 7*, 1836. p. 17.

९ *G. D. Vol. 12/529*, 1840. p. 30.

favorably reported upon by the translation committee, prior to its publication by the Society. I am further directed to state that a Goozeratee edition of the work in question is now in the press." १०

पुन्हां एकदां सरकारनें या पुस्तकाबद्दल विचार करून असें ठरविलें कीं तें शालेय पुस्तक म्हणून मुलांच्या हातीं देण्याच्या योग्यतेचें नाहीं व तें ताबडतोब बंद करावें. ही शिफारस करतांना या पुस्तकाबद्दल जे आक्षेप घेतले गेले त्यांतील कांहीं असे होते :—

"The lesson which all these stories are meant to teach is that woman (the sex generally) is not to be trusted . . . Another objection to the book is that throughout it inculcates Hinduism. This is contrary to the Gov. principles of not introducing any books which teach the particular doctrines of any religion. On this ground the book must be obnoxious to Musalmans, Parsees, and Native Christians. . . . The last objection I shall name is that very many of the stories are silly and childish." ११

अशाप्रकारें सरकारकडून 'पंचोपाख्याना' बद्दल कडक असें टीकात्मक पत्र शिक्षामंडळीकडे गेल्यामुळें मंडळीनें २७ जानेवारी १८४१ रोजीं सरकारला कळविलें कीं हें पुस्तक शालोपयोगी नाहीं, परंतु शिलकींत असलेल्या ९०० प्रती खपल्या कीं, यापुढें त्याची पुनरावृत्ति काढली जाणार नाहीं. १२ या निर्णयानुसार हळुहळु हें पुस्तक वापरांतून कमी झालें. इतकें होऊनहि खिस्तीधर्मप्रसारकांचें समाधान झालेलें दिसत नाहीं. १८४३ मध्यें 'Philindus' या सहीचें या पुस्तकाबद्दल एक पत्र 'Oriental Christian Spectator' मध्यें आलेंच. १३ सरकारी वर्तुळांत इतकी चर्चा होऊन 'पंचोपाख्याना' सारख्या पुस्तकांना शालेय शिक्षणक्रमांत बंदी होऊन सुद्धां मराठी शाळांत हें पुस्तक शालेय अभ्यासक्रमांत असल्याचें आढळतें. रा. गोविंद बाबाजी जोशी नांवाचे एक गृहस्थ आपल्या रोजनिशींत लिहितात कीं त्यांनीं १८४६ मध्यें वसईची मराठी शाळा सोडली तेव्हां मोडी लिहिणें व वाचणें या शिवाय

---

१० *G. D. Vol. 12/529.* 1840. p. 32.

११ *D. P. I. Board of Education. Report, 1840.* (pp. between 264 & 265.)

१२ *G. D. Vol. 586.* 1841. P, 19.

१३ *Oriental Christian Spectator. Vol. 14.* 1843. P. 559.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

घर्गा.....क्रमांक.....

'त्रैराशिक, पंचराशिक, अपूर्णांक, भूगोल, व्याकरण तोंडपाठ करणें व दोन चार वाक्यांचें व्याकरण करतां आलें कीं ज्यास बी. ए. एम्. ए. म्हणतों तितकी त्याची योग्यता मानली जात असे' या शब्दांत तत्कालीन अभ्यासक्रमाबद्दल लिहून ते म्हणतात :—

"यावेळीं शाळेंत बुकें असत तीं :

"लघुहितोपदेश, सरकारी कायदे, लिपीधारा, रेशीम पिकविण्याचें बुक, महाराष्ट्र बखर, शाळापद्धती, बाळमित्र, नीतिकथा, संक्षेप बखर, मुलासाठीं लहान घडे, सारसंग्रह, कर्तव्य भुमिति, पंचोपाख्यान, उपयोगी ज्ञान, इसाबनीति, महाराष्ट्र भाशेचा कोस, बाल व्याकरण, भूगोल, पूर्णांक व अपूर्णांक." [१४]

सरकारी शिक्षणखात्यातर्फे एतद्देशीय भाषांमध्यें शाळांमधून जीं पुस्तकें वापरलीं जात त्यांतील मजकुराबद्दल ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं पुढें सुद्धां वर्षानुवर्षें सतत ओरड चालविली होती. विशेषतः जातीय, अन्यधर्माबद्दल व शृंगारिक भाग शालेय पुस्तकांतून समूळ काढून टाकण्याचा आग्रह धरून त्यांनीं त्यांत थोडेंबहुत यश मिळाविलें होतें. या बाबतींत पुष्कळ वर्षांनंतर इ. स. १८८५ मध्यें 'ख्रिस्ती धर्मोपदेशकांची कुरकूर' नामक एका लेखांत 'इंदुप्रकाश'कार लिहितात :—

"जगांतल्या सर्व भाषांस आणि सर्व लोकांस लागू असा एक साधारण नियम आढळतो कीं, लोकांची जी भाषा असते, तिशीं त्यांचा धर्म, त्यांच्या रीति भाती, त्यांच्या समजुती, त्यांचें ज्ञान, त्यांचें अज्ञान, आणि त्यांचें देवभोळेपण ह्यांचा इतका निकट आणि इतका दृढ संबंध जडलेला असतो कीं, तो तोडून टाकणें म्हणजे त्या दोघांच्याही अगदीं नाशास कारणीभूत होतें. ह्याचीं उदाहरणें पदोपदीं आढळतात. धर्म, जाती, समजुती, इत्यादि गोष्टी मोठमोठ्या काव्यांत पुष्कळ गोंवलेल्या असतात, हें तर सर्व कबूल करतीलच; परंतु साधारण बोलणें किंवा अगदीं लहान मुलींचीं गाणीं ह्यांत देखील त्यांचा संबंध इतका असतो कीं, तें बोलणें किंवा तीं गाणीं त्या भाषेच्या आणि त्या धर्माच्या चांगल्या बहुश्रुत माणसाच्या साह्याशिवाय परकीयांस कदापि कळावयाचीं नाहींत. 'निशाणी नांगर,' 'महादेवा पुढचे,' 'दसऱ्याचें सोनें,' 'शिमग्याचा मंत्र,' 'लंकेंत सोन्याच्या विटा' इत्यादिकांचा अर्थ, केवळ कोशांत शब्दार्थ पाहून परकीयांस कळेल काय? . . . सारांश, मराठी भाषेचा अभ्यास आणि आमचीं

---

१४ गोविंद बाबाजी जोशी, **गेल्या तीस वर्षांपूर्वीचे लोक व त्यांच्या समजुती अथवा माझे प्रवासाची हकिकत (रोजनिशी)**. १८९६. प्रस्तावना, पृ. ८.

कथापुराणें, रीतिभाती, ज्ञान, अज्ञान व समजुती ह्यांची ताटातूट कधींही करितां यावयाची नाहीं. ज्यांस मराठी भाषा चांगली शिकावयाची आहे त्यानें मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या धर्माचें, रीतिभातींचें, ज्ञानाचें, अज्ञानाचें, आणि समजुतींचें चांगलें ज्ञान करून घेतलें पाहिजे. ही गोष्ट अगदीं साधारण प्रतीच्या मनुष्यास देखील कळण्यासारखी असून, आणि मराठी भाषेस उत्तेजन द्यावयाचें, व ती उदयास आणावयाची, असा निश्चय राज्यकर्त्यांचा व सामान्य ज्ञानप्रसारक मंडळीचा असून, खिस्ती धर्मोपदेशकांसारख्या समजदार लोकांनीं असा भलताच आग्रह धरावा, आणि आमच्या सरकारी अमलदारांनीं त्याचा विचार करावयास लागावें, हें खरोखर सखेदाश्चर्यकारक आहे." [१५]

विदुरनीति

'पंचोपाख्यान' या पहिल्या कथात्मक शालेय तत्कालीन गद्य ग्रंथानंतर 'विदुरनीति' या पुस्तकाची निवड कां केली गेली, याचें कारण सरकारचा मुख्य सेक्रेटरी वॉथेन खालील शब्दांत देतोः—

"I have lately received from Poona a copy of Vidoor Neeti being a tract on morals, written in the Pracrit or provincial dialect, peculiar to Maharashtra or the Mahratta nation. This work is generally much esteemed by the natives of India being an extract from Udyogaparva of Mahabharat and a supposed speech of a sage called Vidoor to the Raja Dhrutarashtra, the blind father of the Kaoravas or the sons of Kuroo. This tract being short, useful and popular appears to me as the book most suitable to follow the publication of the Panchopakhyan." [१६]

वरील उताऱ्यावरून 'पंचोपाख्याना' नंतर 'विदुरनीति'चा क्रम कां लागला तें स्पष्ट होतें. छापील पुस्तकांबद्दलचा तत्कालीन लोकांच्या मनांतील संशय दूर करण्यासाठीं, या छापील पुस्तकाचा संबंध सर्वमान्य महाभारतासारख्या लोकप्रिय ग्रंथाशीं जोडला गेला असावा. हें पुस्तक १८२३ मध्यें 'मूळ संस्कृतावरून महाराष्ट्र भाषेंत गद्यरूप करून मुंबई नगरीं कुरियर छापखान्यांत' छापिलें गेलें. या पुस्तकाचा हेतु भाषांतरकाराच्या शब्दांत सांगावयाचा तर :—

"या प्रकारें महाबुद्धिमान परमसाधू पुण्यकीर्ती विदूर धृतराष्ट्रराजास राजधर्म राजनीति सांगता जाला ती भारतामध्यें उद्योगपर्वी तेहतीसापासून चाळीस अध्यायपर्यंत श्रीवेदव्यासाने संक्षेपें वर्णिली त्यांतील आशय घेऊन महाराष्ट्र भाषेंत

---

१५ इंदुप्रकाश, पु. २४, २ मार्च, १८८५.
१६ *G. D. Vol.* 10. 1821. p. 684.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

हा ग्रंथ केला आहे ही नीति नित्य वाचून किंवा ऐकून एक्ये एक्ये गोष्टीचा अनुभव जो घेईल त्याचे सर्व दोष जातील अनर्थ टळतील दुःख जाऊन सुखी होईल त्यास संकटें प्राप्त होणार नाहींत कामक्रोधलोभांची पीडा होणार नाहीं लोकांमध्यें मान्यता वाढेल लक्ष्मी प्राप्त होईल सदा सर्वकाळ चित्तवृत्ति स्वछ राहतील मृत्युपासून भय वाटणार नाहीं मग त्रैलोक्याचा स्वामी जो परमकृपाळु जो सर्व मनोरथांचा पूर्णकर्ता तो ईश्वर सखा होऊन अंतकाळीं त्यास आपल्ये निजधामास नेईल " [१७]

वरील उताऱ्यावरून या पुस्तकाचा शेवट एकाद्या पोथीप्रमाणें केल्याचें दिसेल. तत्कालीन पद्धतीला धरूनच असा शेवट केलेला आहे. पेशवाईच्या अंतकाळीं प्रचारांत असलेल्या भाषेची छाप या पुस्तकावर पडणें साहाजिक आहे.

सिंव्हासन बत्तीशी

क्रमानुसार १८२४ मध्यें छापलें गेलेलें शालेय कथापुस्तक म्हणजे 'सिंव्हासन बत्तीशी' हें होय. याच्या अगोदर १८१४ मध्यें श्रीरामपुरला मोडी लिपीमध्यें छापलेल्या याच नांवाच्या पुस्तकाबद्दल मागें लिहिलेंच आहे. भाषेच्या दृष्टीनें या दोन्ही पुस्तकांची तुलना करतां या पुस्तकाची भाषा जास्त शुद्ध असल्याचें दिसतें. या पुस्तकासंबंधीं झालेल्या सरकारी पत्रव्यवहाराप्रमाणें या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्यावेळीं एक हजार प्रती छापल्या गेल्या व 'पंचोपारख्यान' व 'विदुरनीति' प्रमाणेंच सदर पुस्तकाच्या कांहीं प्रती प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविण्यांत आल्या व उरलेल्या शाळापुस्तकमंडळीला दिल्या गेल्या. [१८] वरील पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीला जोडलेल्या शुद्धिपत्रांत येके दिवसी, येक, येक इत्यादि आजच्यादृष्टीनें अशुद्ध शब्दांबद्दल एके दिवसीं, एके, एक हे शुद्ध शब्द दिलेले आहेत. बहुतेक जुन्या मराठी ग्रंथांत अकाराऐवजीं यकार वापरला जात असे. परंतु यावेळेपासून उच्चारानुसार न लिहितां शब्दाच्या मूळपीठिकेकडे लक्ष देऊन लेखनपद्धति सुरू झाल्याचें आढळतें. भाषेच्या शुद्धतेकडे लक्ष पुरविण्याचें धोरण शालेय पुस्तकांच्या द्वारा अमलांत आणण्याची ही सुरुवात होती. 'सिंव्हासन बत्तीशी' मधील एक कथा मुद्दाम दिली आहे :—

कथा १०

" विक्रमराजाचा उपाध्याय शंकरशर्मा होता त्याचा पुत्र कमलाकर नामा होत तो सोळा वर्षांचा झाला तथापि कांहीं विद्याभ्यास करीना म्हणून त्याचा पिता म्हणाला

---

[१७] **विदुरनीति**. १८२३. पृ. ११०.
[१८] *G. D. Vol.* 101. 1825. p. 307.

अरे कमलाकरा तुं मोटा झालास अद्यापि विद्याभ्यास करीतनाहीस हें फार वाईट करितोस कां विद्ये वांचून पुरूषाचें जिणें व्यर्थ होय म्हटलें आहे

विद्याविधिविहीनेन किंकुलीनेनदेहिना
अकुलीनोपिविद्वान्यो देवतैरपिपूज्यते

अर्थ–विद्यारहित जो पुरुष तो मोठ्या कुळांतला असला तथापि त्यास कोणी पुसत नाहीं. नीच कुळांतही झालेला असोन विद्वान् आहे तर त्याची पूजा देवही करितात असा पित्याचा उपदेश ऐकून कमलाकरानें विचार केला कीं पित्यानें जी गोष्ट सांगीतली ती खरी आहे विक्रमराजा पंडितांस बहुत धन देऊन सन्मान करितो आणि मूर्खांशी भाषणही करीत नाहीं तस्मात् विद्येवांचून आपली प्रतिष्ठा होणार नाहीं तर आतां देशांतरीं जाऊन विद्याभ्यास करावा हें बरें मग तो काश्मीर देशास गेला तेथें विमलभट्ट उपाध्याय महाथोर विद्वान् होता त्याच्या घरीं जाऊन त्यास साष्टांग नमस्कार करून सर्व वर्तमान सांगता झाला तेव्हां उपाध्यायाने त्यास जवळ ठेऊन घेतला असतां त्याणें उपाध्यायाची सेवा केली तेणेकरून तो प्रसन्न होऊन त्यास सर्व विद्या सांगता झाला म्हटलें आहे

गुरूशुश्रूषयाविद्या पुष्कलेनधनेनवा
अथवा विद्ययाविद्या चतुर्थेनोपलभ्यते

अर्थ–गुरूच्या सेवेकरून अथवा पुष्कळ धन देऊन किंवा आपुली विद्या सांगून दुसऱ्याची विद्या घ्यावी या तीन उपायांवाचून चौथ्या प्रकारानें विद्या प्राप्त होत नाहीं नंतर तो कमलाकर बहुत विद्या शिकला आणि गुरूची आज्ञा घेऊन आपल्या गावांस येत असतां वाटेंत कांतीपुरीस राहिला तेथें नरमोहिनी नामें एक कलावंतीण फार सुंदर होती तिला पाहून त्यास काम विकार झाला तेव्हां तेथील लोकानीं सांगीतलें कीं हिच्या घरीं जो पुरुष जातो त्यास राक्षस मारितो तें ऐकून तो खिन्न होऊन अवंतीस आला आणि राजाचें दर्शन घेतलें राजानें विचारिलें कीं देशांतरिं कांहीं नवल पाहिलें असेल तर सांगावें तेव्हां कमलाकरानें नरमोहिनीचें वर्तमान सांगीतलें. विक्रमानें मनांत विचार केला कीं या ब्राह्मणाचें मन तीजकडे लागलें आहे म्हटलें आहे

" वेधाद्वेधाभ्रमंचक्रे कांतासुकनकेषुच
तासुतेष्वप्यनासक्तः साक्षाद्भर्गोनराकृतिः

अर्थ — ब्रह्मदेवानें मोह करणारे पदार्थ दोन उत्पन्न केले. एक स्त्रिया दुसरें धन यांस पाहून जो मनुष्य भुलत नाहीं तो केवळ महादेव जाणावा. मग विक्रमराजा त्या वेश्येचे गावीं गेला आणि रात्रौ राक्षसास मारून तीस सुखी केलें. दुसरे दिवसीं तिला कमलाकरासमोर उभी केली तिचीं सर्व भूषणें काढविलीं डोईचे केंश मोकळे सोडविले

तेव्हां तीचें सौंदर्य फार उणें दिसोंलागलें मग राजा भट्टजीस ह्मणतो ब्राह्मणा अशीला पाहून तूं काय ह्मणोन भुललास अरे हे स्तन मासाचे गोळे आहेत हें तिचें तोंड थुंकी-लाळ याणी भरलेलें असे आहे अशा दुर्गंध पदार्थाचा अंगीकार करणें तो संतती करितांच करावा असा राजानें विषयाचा उपहास केला तेणेंकरून भट्टजीचा मनांतील कामविकार शांत झाला नंतर राजाने एक सुंदर स्त्री मेळवून भट्टजीचें लग्न करून दिल्हें ही कथा सांगोन मदनमंजरी ह्मणते हे भोजराजा असा पराक्रम तुजमध्यें असेल तर या सिंहासनावर बैस तें ऐकोन तो माघारी गेला दुसरे दिवसीं सिंहासनाजवळ गेला तों श्रृंगारकलिकानामें अकरावी पुतळी बोलली भोजराजा विक्रमासारिखें ज्याचें दयालुत्व असेल त्याणेंच याजवर बसावें इतरांस अधिकार नाहीं त्याणें विचारिलें कीं विक्रमाचें तें कसें होतें सांग श्रृंगारकलिका सांगत्ये" [१९]

वरील कथेंतील कामवासना शृंगारादि कल्पना पाहिल्या कीं अशी पुस्तकें शालेय म्हणून त्याकाळीं विद्यार्थ्यांच्या हातीं जावीं हें विचित्र दिसतें. ख्रिस्तीधर्मोपदेशकांच्या टीकेंत हा मुद्दा प्रामुख्यानें पुढें केला जाई.

सदाशिव काशीनाथ छत्रे व बोधप्रधान शालेय कथावाङ्मय

मुलांच्या नीतिसुधारणेकडे तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांचें फार लक्ष होतें. शिक्षणक्रमांत धार्मिक शिक्षणाला मुळींच स्थान नसावें असा त्यांचा कटाक्ष होता. लोकांच्या धर्मभावना दुखावल्या जाऊं नयेत म्हणून धार्मिक शिक्षणाऐवजीं नीतिशिक्षणावर भर दिला जाई. ही दृष्टि असल्यामुळें शालेय पुस्तकांची सुरुवात बोधमय कथावाङ्मयानें झाली. शाळापुस्तक मंडळीच्या व्यवस्थापक मंडळांत वॉथेन, मोल्स्वर्थ, मॅकलेनन, केनेडी, जर्विस इत्यादि युरोपियन मंडळीबरोबर जे कांहीं एतद्देशीय लोक होते त्यांत सदाशिव काशीनाथ उर्फ बापू छत्रे हे एक होते. त्यांची इंग्रजी भाषेंतील प्रगति व मातृभाषेंतील प्राविण्य यामुळें शाळापुस्तक मंडळीचे एतद्देशीय 'सक्रतार' म्हणून त्यांची निवड झाली होती. ज्ञानप्रसारकार्यांत मातृभाषेचा उपयोग करणें व त्यासाठीं शक्यतों एतद्देशीयांची मदत घेणें त्याकाळीं सरकारी अधिकाऱ्यांना आवश्यक वाटत होतें. इ. स. १८२८ मध्यें शाळापुस्तक मंडळीच्या अध्यक्षपदावरून सर जॉन माल्कम म्हणतात :—

"If knowledge was to be imparted, there was only one mode of doing it and that was through the medium of their language and to effect this, it was indispensable to associ-

---

१९ सिंव्हासन बत्तीशी. १८२४. पृ. ३८–४२.

ate in the labour the principal Natives of the country where the attempt was made." २०

या कल्पनेमुळें सदाशिव काशीनाथ छत्रे यांच्यासारख्या मराठी भाषातज्ज्ञाची शाळापुस्तक मंडळीच्या सेक्रेटरीच्या जागीं नेमणूक झाली. आपल्या अधिकाराचा व भाषाज्ञानाचा उपयोग त्यांनीं किती योग्य रीतीनें केला हें जाणण्यास त्यांनीं लिहिलेल्या शालेय पुस्तकांची पाहणी करणें जरूर आहे.

बोधकथा

त्यांनीं रचलेल्या 'बोधवचना' ची चर्चा मागें झालीच आहे. शाळापुस्तक मंडळीच्या तिसऱ्या वार्षिक अहवालामध्यें या पुस्तकाची एक हजार प्रतींची दुसरी आवृत्ति निघाल्याचा उल्लेख आहे. २१ याच अहवालांत दिलेल्या त्यावर्षी तयार केलेल्या शालेय पुस्तकांच्या यादींत 'बोधकथा' या पुस्तकाचें नांव आहे. 'Pleasing Tales' नामक ताराचंददत्त यांच्या पुस्तकाचें हें भाषांतर होय. मनुष्यामध्यें असणाऱ्या दुर्गुणामुळें होणारे तोटे व सद्गुणांमुळें होणारे फायदे यांवर आधारलेल्या या कथा आहेत. या कथांत विद्याभ्यासापासून हित, विद्यामहानिधी, झटून काम करणें, आळस, दान, मत्सर, लोभ, वृथामनोरथ, बाळकास शिकवणें हा आईबापाचा धर्म होय, फुसलावणी, सुखाचें मूळ जिव्हानियमन, संगत, शिष्टपरीक्षा या नांवांनीं वरील विषयांवर गोष्टीरूपानें चर्चा केलेली आढळते. विद्येची महति कशी व्यक्त केली आहे. पहा :—

"धनासारखी विद्या जात नाहीं; उधळवत नाहीं; चोरवत नाहीं; विद्या सुमंत्र्यासारिखी आलेल्या अनर्थाचे परिहाराचा मार्ग दाखवित्ये. दुर्दैवानें कदाचित् एकादें संकट प्राप्त झालेंच तर चांगला बुद्धिवाद सांगत्ये. विद्या ही विद्वानाची संगातिण आणि जिवलग आहे. आंधारांत जशी दीपिका प्रकाश देत्ये, अशी विद्या मनुष्यास प्रकाश देत्ये." २२

मुलांप्रमाणेंच त्यांच्या आईंबापांनाहि 'बोधकथे' मध्यें उपदेश केलेला आहे. २३ या पुस्तकांतील खालील पद्यपंक्ति पहाव्या:—

---

२० *Fourth Report of the Bombay Native Education Society*, 1827. p. 6.

२१ *Third Report of the Bombay Native School-book and School Society*, 1825–26. pp. 11-12.

२२ सदाशिव काशीनाथ छत्रे, **बोधकथा**, आ. २. १८३१. पृ. २४.

२३ तत्रैव. पृ. ४६.

शिंप तुझा झाडाला, फळेल तें चांगलीं फळें जेविं.
शिकवीं तुझा मुलाला, होइल उत्तम गुणाढ्यतें तेविं
शिंपण्यावांचुनी झाड, शुष्क निष्फळ होतसे.
करील शिक्षे वांचूनि, मूल दुःख तुला तसें." २४

वर दिलेल्या उताऱ्यांत आढळणारीं 'दाखवित्ये,' 'देत्ये' सारखीं यकारयुक्त क्रियापदें कोकणी भाषापद्धतीनुसार असल्यामुळें मेजर कँडी यांच्या कारकीर्दीत त्यांतील यकार जाऊन दाखविती, देती अशीं झाल्याचें आढळतें. तसें पाहिलें तर लो. टिळकांच्या 'गीतारहस्यां' तहि यकारयुक्त रूपें आढळतात. कँडीनीं हा निर्णय बाळशास्त्री जांभेकर यांच्या मताप्रमाणें घेतलेला दिसतो, कारण या मुद्यावर लिहितांना बाळशास्त्री ह्मणतात :--

"Dadoba writes the third person singular in the feminine gender ती सोडते, ती होते etc. which I think is not consistent with the usage of the best speakers. Throughout the Deccan the form ती सोडती, ती होती are invariably used, and they are preferred by Molesworth and all our best speakers. The other form ती सोडते etc. is current in Bombay and in some part of the Cokan only; it is not used in Poona." २५

बाळशास्त्री अगर कँडी यांच्या मतापेक्षां दादोबांचेंच मत २६ या बाबतींत निर्णायक ठरलेलें दिसतें, व त्याप्रमाणें आजहि तें उपयोगांत आहे.

नीतिकथा

'बोधकथा' या पुस्तकाचा दुसरा भाग 'नीतिकथा' या नांवें प्रथम १८३१ मध्यें प्रसिद्ध झाला. मात्र तो बाळशास्त्री जांभेकर यांनीं तयार केला. प्रत्यक्ष त्या पुस्तकावर जरी कर्त्याचें नांव नसलें तरी बाळशास्त्र्यांच्या 'भूगोलशास्त्रः गणितभाग' (१८३६) या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर तें लिहिलेलें आढळतें.– "Mathematical Geography, By Ball Gungadhar Shastree, Honorary Native Secretary, to the Native Education Society– Author of the 'Little Grammar', 'Neeti Katha,' and Translator of Catechism on General knowledge' etc."

---

२४ सदाशिव काशिनाथ छत्रे, **बोधकथा**, आ. २. १८३१. पृ. ४६.

२५ *G. D. Vol.* 540. 1840. p. 144.

२६ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण**, आ. २. १८५०. पृ. १८०.

बाळशास्त्री या पुस्तकाबद्दल लिहितात :—

"हा ग्रंथ पूर्वी बंगाली भाषेंत होता त्याचा प्रथम भाग कांहीं वर्षांपूर्वी मुंबईंतील शिक्षामंडळाने छापिला त्यास बोधकथा असें नाम ठेविलें आहे. त्याचा दुसरा भाग सांप्रत महाराष्ट्र भाषेंत भाषांतर करून छापिला आहे. त्याचें नाम नीतिकथा असें ठेविलें आहे. या ग्रंथांत बंगालीपेक्षां कितीएक कथा अधीक लिहिल्या आहेत. या ग्रंथापासून मराठी शाळांवर पढणाऱ्या मुलांस नीतिज्ञान व्हावें अशी आमची इच्छा आहे ती परमेश्वराने या ग्रंथास आशीर्वाद देऊन लवकरच सिद्धीस न्यावी."[२७]

हें पुस्तक वॉथेन यानें बाळशास्त्र्यांस लिहिण्याबद्दल सुचविलें व तें तयार झाल्यावर त्यानें व त्याच्या पंडितानें तपासलें (revised) असा उल्लेख सरकारी दप्तरांत सांपडतो.[२८] या पुस्तकांतील कथांच्या सुरुवातीला मैत्री, सदाचरण, लोभ, आळस इत्यादि सद्गुणदुर्गुणांची तात्विक चर्चा करून नंतर त्या चर्चेला साजेशा गोष्टी जोडलेल्या आहेत. प्रत्येक गोष्टींत विद्येचें महत्त्व वर्णन करून प्रत्येकानें सदाचरणी व्हावें हाच मुद्दा वारंवार मांडला आहे. गोष्टीमधील नांवें जरी महाराष्ट्रीय वातावरणाला साजेशीं गोपाळ, गोविंद, राजाराम अशीं आहेत तरी 'राधानाथ' सारखें एकादें बंगाली धर्तीचें नांवहि त्यांत आढळतें.

नीतिबोधकथा

वर उल्लेखिलेलीं 'बोधकथा' व 'नीतिकथा' हीं दोनहि पुस्तकें एकत्र करून 'नीतिबोधकथा' या नांवानें तें प्रसिद्ध करावें अशी एक सूचना मेजर कँडीनीं २९ जानेवारी १८५० रोजीं शिक्षामंडळीला केली. या पत्रांत ते लिहितात :—

"Though professedly prepared for children, they contain high Sanskrit words which only the learned Pundits can understand and Aryas and Shloks of Prakrit poetry, which are enough to puzzle even grown up people not accustomed to this kind of composition, are prefixed and affixed to the stories. These would be better omitted."[२९]

या सूचनेला शिक्षामंडळीनें पाठिंबा दिला व १८५० मध्यें 'नीतिबोधकथा' या पुस्तकाची पहिली आवृत्ति निघाली. हें पुस्तक छापतांना केलेल्या फेरबदलाबद्दल मेजर कँडी म्हणतात:—

---

२७ **नीतिकथा**, आ. ३. १८३८. प्रस्तावना, पृ. ३.
२८ *G. D. Vol. 10/342.* 1836. p. 151.
२९ *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1850. p. 126.

"I have omitted five or six stories of the works which formed the basis of this book: some because they were puerile, and others because they were repetitions of other stories. I have also abridged some of the stories; and I have endeavoured to make all more level to the capacities of children than they were before." ३०

मुलांची ग्रहणशक्ति, त्यांचें वय, मनोरचना इत्यादि बाबींचा विचार न करतां फक्त नीतिपाठ व भाषाभ्यास या हेतूनींच जीं शालेय पुस्तकें प्रथमतः तयार झालीं. त्यांत योग्य ते फेरबदल करण्याचें काम मेजर कँडी यांनीं केलें. 'नीतिबोधकथां' च्या रचनेंत संस्कृत शब्दांचा कमींत कमी उपयोग करण्याचें त्यांचें धोरण पुढील काळांत सतत चालू राहिल्याचें आढळतें.

वेताळपंचविशी

'बोधकथा' खेरीज बापू छत्रे यांनीं लिहिलेल्या शालेपयोगी वाङ्मयांतील 'इसप नीतिकथा' (१८२८) 'बाळमित्र' भाग १ (१८२८) व 'वेताळपंचविशी' (१८३०) या तीन शालेय पुस्तकांना त्याकाळीं मानाचें स्थान होतें. 'वेताळपंचविशी' या पुस्तकाची पहिली आवृत्ति पहावयास मिळत नाहीं; पण त्या पुस्तकाच्या पुढील एका आवृत्तीवरून त्याची कल्पना येते.

"त्याची कथा अशी आहे कीं, दिल्लीमध्यें महंमद बादषहा राज्य करीत असतां जयसिंग सवाई नगरचा राजा होता त्यानें सुरत झणून कोणी एक कवि होता. त्यास सांगीतलें कीं, वेताळपंचविशी जी संस्कृत भाषेंत गुढ आहे; ती तुझी लोकहितार्थ व्रज भाषेंत करावी. ते समयीं त्या कवीनें त्याचे आज्ञेप्रमाणें ती व्रज भाषेंत केली: ती बंगाल्याचे गवरनर जनरल मार्कुईस वेलस्ली साहेब बाहादुर यांचे अमलांत डाक्टर जान गील साहेब याणीं ललुलाल कवी यांचे सहाय्यानें हिंदी भाषेंत केली; ती पुनः कपतान मोअट यांचे आज्ञेवरून तारीनीचरण मिश्र कवीनें बंगाल्याचे हिंदी पाठशाळेंत उपयोगास्तव शोधिली आणि छापिली. तोच ग्रंथ इसवी १८३० मध्यें सदाशिव काशिनाथ छत्र्ये यांणीं मुंबईमध्यें मराठी भाषेंत केला." ३१

विक्रम राजाला वेताळानें सांगितलेल्या या पंचवीस कथा आहेत, म्हणून त्यांस 'वेताळपंचविशी' असें नांव दिलें गेलें. सरकारी दप्तरांत या पुस्तकाचा उल्लेख सापडतो; पण त्यावरून कृष्णनाथ काशीनाथजी नामक गृहस्थानें तें रचलें असें दिसतें. ४ जून, १८२४ रोजीं मा. एल्फिन्स्टनला लिहिलेल्या एका पत्रांत हा गृहस्थ म्हणतोः-

---

३० *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1850. p, 134.

३१ **वेताळपंचविशी.** १८७२. प्रस्तावना.

"Not to trespass longer on your valuable moments, I proceed with all humility to state that I have began (begun) a translation of the 25 stories of Veytal from the Sanscrit and propose publishing them....That the style and correctness of the translation may be unexceptionable, I have solicited and obtained the cordial assistance of a European gentleman..."[३२]

या पत्रांत उल्लेखिलेली गमतीची बाब म्हणजे सदर पुस्तक भाषेच्या दृष्टीनें दोषरहित व्हावें म्हणून लेखक कुठल्यातरी युरोपियन माणसाची मदत घेतो. सरकारनें शंभर प्रती घेण्याचें आश्वासन लेखकास दिलें होतें, पण हें पुस्तक छापलें गेलें कीं नाहीं तें समजत नाहीं; परंतु महमद इब्राइम मखबा यांनीं आपल्या इ. स. १८२५ मध्यें छापलेल्या व्याकरणाच्या पुस्तकांत मराठी भाषेचा नमुना म्हणून 'वेताळपंचविशी' या पुस्तकांतील एक गोष्ट उतरून घेतली आहे.[३३] ती कृष्णनाथ काशिनाथजी यांच्या पुस्तकावरून घेतली कीं काय नकळे.

इसप नीतिकथा

मुलांना कथा वाचावयास व ऐकावयास आवडतात हें लक्षांत घेऊन बापू छत्रे यांनीं Croxall च्या Aesop's Fables या इंग्रजी ग्रंथाचें 'इसप नीतिकथा' नामक भाषांतर इ. स. १८२८ मध्यें प्रसिद्ध केलें. त्याबद्दल त्यांना सरकारकडून दोन हजार रुपयांचें बक्षिस मिळालें पुस्तकाच्या इ. स. १८४७ मध्यें निघालेल्या आवृत्तीवरून मेजर कँडी यांनीं इ.स. १८५१ मध्यें अनेक दुरुस्त्या करून त्याची नवी आवृत्ति तयार केली. केलेल्या दुरुस्त्यांबद्दल मेजर कँडी लिहितात:—

"I have struck out a few of the fables which are in the edition of 1847, as coming under the rules given for my guidance by the Board ..., I have modified a few more, I have amended tatparya or moral of several, and I have carefully corrected all with respect to idiom and grammar... Where Esop had given the names of ancient Greek Gods and Goddesses, the translator had substituted those of Hindoo Gods and Goddesses. As Esop knew nothing of the latter and the insertion of their names in fables ascribed to him is an absurdity, I have restored the ancient names."[३४]

---

३२ *G. D. Vol.* 15/73. 1824. pp. 119–120.

३३ Muhumud Ibhraheem Mukbah, *A Grammar of the Mahratha Language*, 1825. pp.74–82.

३४ *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1850. p. 140.

भाषाविषयक दुरुस्त्यांशिवाय आणखी तीस गोष्टी व 'इसापाचा वृत्तांत' हि कँडीनीं या नवीन आवृत्तीला जोडलेला आढळतो. कँडीनीं केलेल्या, 'व्याकरणाविषयीं, व शब्दांविषयीं व रचनेविषयीं' सुधारणांची कल्पना येण्यासाठीं ' इसप नीतिकथा' (१८२८) मधील एक कथा देऊन त्यांत कँडीनीं केलेल्या दुरुस्त्या कंसांत दाखविल्या आहेत.

लावी पक्षिण आणि तिचीं पिलीं

(लावी पक्षीण आणि तिचीं पिलें.)

"एक लावी पक्षिण (पक्षीण) शेतांत राहात (राहत) होती. तें शेत पिकलें असतां (तेव्हां) तीस काळजी पडली कीं, माझीं पिलीं (पिलें) पांख फुटोन (फुटून) चांगलीं उडायास लागायाचे अगोधर (लागायाच्या अगोदर), जर शेतकरी शेत कापायास आला, तर कसें होईल ? मग ती नित्य बाहेर चारा आणायास (आणावयास) जाई तेवेळीं (त्यावेळीं) पिल्यांस (पिलांस) सांगे कीं, माझे मागें कोण काय बोलेल तितकें सर्व मी घरीं आल्यें (आलें) म्हणजे मला सांगावें (सांगा). एके दिवशीं शेताचा धनी शेतावर येऊन आपल्ये (आपल्या) मुलास ह्मणतो, मुला, मला वाटतें कीं हें शेत आतां कापायास झालें (आलें); त्यास तूं उद्यां सकाळीं जा आणि आपले इष्टमित्र शेजारी यांस (ह्यांची) शेत कापणीस हात लावाया विशीं (विषयीं) प्रार्थ (प्रार्थना कर). असें तो शेतकरी मुलास बोलिला (बोलला) तें पिल्यांनीं (पिलांनीं) आई घरीं येतांच तीस सांगीतलें (सांगितलें); आणि तिचे भोवतीं (तिच्या भोंवतीं) किलकिल करून म्हणू (म्हणूं)लागलीं, आई, आतां तूं आम्हास (आम्हांस) लवकर येथून दुसरीकडे (दुसऱ्या ठिकाणीं) ने. आई म्हणाली मुलांनों (मुलांनो), स्वस्थ असा- कांकीं (कां तर) शेताचे धण्यानें (शेताच्या धन्यानें) शेत कापायाविषयींचा (कापण्याविषयींचा) भरंवसा शेजारी आणि इष्टामित्र यांवर (ह्यांवर) धरिला आहे, त्या (ह्या) वरून मीं (मी) पक्कें जाणत्यें (जाणतें) कीं उद्यां कापणीं (कापणी) होत नाहीं (होणार नाहीं). दुसऱ्ये (दुसऱ्या) दिवशीं लावी बाहेर जाऊं लागली, ते समयीं (त्या समयीं) तीणें (तिनें) मुलांस पूर्ववत् सांगून ठेविलें; त्या वरून तीं शेताचा धनी काय बोलतो तें ऐकायास (ऐकावयास) टपत बसलीं होती (होतीं); तो शेतावर येऊन बोलाविले (बोलाविलेले) होते त्यांची वाट पाहात बसला; परंतु कोणी आलें नाहीं (आले नाहींत), आणि ऊनही झालें तेव्हां तो लेकास (लेंकास) म्हणतो, अरे इष्टमित्र सेजारी (शेजारी) यांवर (ह्यांवर) विश्वास ठेवणें कांहीं कामाचें नव्हे; तर तूं आतां असें कर कीं आपल्ये (आपल्या) सोयऱ्यांस प्रार्थून त्यांस सांग कीं, मजकरितां तुह्मीं सुप्रभात (सकाळीं) अगत्य येऊन कापणीस साह्य व्हावें (मदत करावी). तें ऐकोन (ऐकून) पिलीं (पिलें) फार भ्याली, आणि आयी, (आई) येतांच त्यांणीं (त्यांनीं) तें वर्तमान तीस सांगीतलें (सांगितलें). तेव्हां ती ह्मणाली, मुलांहो (मुलांनो), इतकेंच जर आहे तर भिऊं

नका; कां कीं सोइऱ्याची (सोयऱ्यांची) तीडीक (तिडीक) धरून त्याचे (त्यांच्या) कामीं पडतील हें मिथ्या. परंतु उद्यां फिरून तो काय बोलेल तें चित्त देऊन ऐका, आणि मला सांगा. दुसरे (दुसऱ्या) दिवशीं शेताचा धनी घेऊन फार वेळ सोयरे येणार ह्मणून वाट पाहात बसला, परंतु ते आले नाहीं (नाहींत); तेव्हा (तेव्हां) तो मुलास ह्मणतो; कांहीं चिंता नाहीं, भिव्या, तूं उद्यां सकाळला (सकाळीं) दोन खराळ्या चांगल्या पाजळून (पाजवून) ठेव, आपली आपणच (आपणच आपली) कापणीं (कापणी) करूं. हें वर्तमान पिल्यांनीं (पिलांनीं) लावीस सांगतांच, ती ह्मणाली, मुलानों (मुलांनों), आतां येथें (एथें) राहून आपला परिणाम नाहीं; कां कीं, जो मनुष्य आपलें काम आपण स्वतां करायास (करावयास) निघाला, तो बहूत (बहुत) करून तें शेवटास नेईल. मग तिणें (तिनें) आपलीं पिलीं (पिलें) तेथून तत्क्षणी (तत्क्षणीं) काढून दुसरे ठायीं (दुसऱ्या ठिकाणीं) नेलीं. दुसऱ्ये (दुसऱ्या) दिवशीं, शेतकरी आणि त्याचा मूल (मुलगा) दोघे येउन त्यांणीं (त्यांनीं) शेताची कापणी केली.

तात्पर्य

"जें काम आपण स्वतः करायास शकतों (आपणास स्वतां करतां येतें), त्या विषयींचा भरंवसा सोयरीं अथवा इष्टमित्र, यावर (ह्यांवर) धरूं नये. जो पुरुष त्यांचा भरंवसा (भरंवसा) धरितो, त्याचे दोन तोटे होतात एक मुर्खा सारिखें त्याची वाट पाहात कुचंबून राहाणें (कुचंबत राहणें) दुसरा, त्याणीं (त्यांनीं) फसविलें ह्मणून महान् (मोठा) संताप पावणें. याकरितां (ह्याकरितां) जो आपल्ये कामाचा मुख्यत्वें करून आपणावर भरवसा ठेवितो (आपल्या कामाचा भरंवसा मुख्यत्वेंकरून आपणावर ठेवितो), त्याचें काम घडून येतें; आणि कदाचित् फसलेंच तर त्याला आपल्ये (आपल्या) मनाचें समाधान करतां (करितां) येतें, कीं मी (म्यां) आपल्ये (आपल्या) कडून उद्योग करण्यांत आळस केला नाहीं: कोणाचे भरवशावर राहिलें नाहीं: असें असतां झालें नाहीं, त्याचा शब्द मजकडे काय? (काम फसल्याचा शब्द मजकडे काय?)"[३५]

वरील कथेवरून मेजर कॅंडीनीं केलेल्या सुधारणांची कल्पना येते. 'फुटोन,' 'ऐकोन,' यांतील ओकार काढून 'फुटून,' 'ऐकून' अशीं उकारयुक्त रूपें, 'आपल्ये,' 'तिचे,' 'त्याचे' 'दुसरे,' 'तेवेळीं' यांतील एकाराऐवजीं 'आपल्या,' 'तिच्या,' 'त्याच्या,' 'दुसऱ्या,' 'त्यावेळीं' हीं याकारयुक्त रूपें, शिवाय, 'आयी,' 'तीडीक,' 'बहूत,' 'येथून' इत्यादि शब्द अशुद्ध ठरवून ते शुद्ध लिहिणें वगैरे सुधारणा नजरेंत भरण्यासारख्या आहेत. मेजर कॅंडी यांनीं घालून दिलेल्या पद्धतीप्रमाणें आजहि लिहिलें जातें.

---

३५ सदाशिव काशीनाथ छत्रे, **इसप नीतिकथा**. १८२८. पृ. ३०२–३०५.
" **इसपनीति कथा**. १८५१. पृ. ६०–६२.

बाळमित्र

बापू छत्रे यांचें नांव ज्या एका शालेय पुस्तकामुळें अजरामर राहील तें म्हणजे 'बाळमित्र' होय. आपली भूमिका व हेतु मांडतांना ते 'प्रस्तावन'मध्यें लिहितात :—

" हा ग्रंथ मुलांस पढविल्यानें त्यांस लहानपणापासून अनायासानें, बोलायाचा अभ्यास होईल; त्यांचा शब्दसंग्रह वाढेल; त्यांस अनेक व्यवहार, अनेक रीति, नीति समजतील; बुत्धी सदसद्विचारक्षम होईल; त्यांचें हृदय कोमल होईल. मातापितरांचा ठायीं त्यांचा प्रेमा वाढेल; बहिण भावंडांचा ठायीं त्यांची प्रीति वाढेल, ईश्वरीं भक्ति वाढेल; पुढें मोटमोठाल्या विद्या शिकायास सुगम होतील. सांप्रत त्यांचे हातीं जे ग्रंथ पडतात ते त्यांचें बुत्धींत भरायास अवघड आहेत. या ग्रंथापासून, जसा उपदेश मनांत भरेल, तसें अन्य ग्रंथापासून होणार नाहीं; ते समजुतीस खोल, अभिरुचीस रुक्ष, उपदेशास तीक्ष्ण, मुलांचे चित्तांत वाचण्याविशीं तसी प्रीति उत्पन्न करणार नाहींत. या ग्रंथीं तसें नाहीं. एथें त्यांची भाषा, त्यांचे खेळ, त्यांचे उद्योग, त्यांचीं अपेक्षितें, सांगीतल्यामुळें, त्यांस वाचतां वाचतां आवड उत्पन्न होऊन, इकडे त्यांस नकळत सहज चांगले गुण लागावे. ह्मणोन यास बाळमित्र नांव योग्य आहे." [३६] ज्या 'Children's Friend' या पुस्तकावरून 'बाळमित्र' भाषांतरित केला गेला त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंतहि हेच विचार आढळतात. पहा:—

Independent of the moral utility of this work, with respect to children, it is obvious, that there cannot be a more proper one to instruct them early in delivering their native language with ease and propriety. The greater part of those books which are first put into their hands, are either above their comprehension, or totally remote from their ideas and sentiments. All the objects on the contrary, here held up to their view, being of a nature sufficiently interesting to excite their curiosity, they will, of course, take pleasure in the easy study of a work, which may render them familiar to the innocent turn of thought and expression adapted to their age, and applied to describe their amusements, their pursuits, and their necessities. [३६ अ]

'बाळमित्रा'च्या प्रस्तावनेवरून बापू छत्रे यांचा शिक्षणविषयक सशास्त्र दृष्टि, बालमनाचा सखोल अभ्यास, मानसशास्त्रदृष्ट्या मुलांच्या आवडीनिवडी इत्यादि बाबींवर चांगला प्रकाश पडतो. मुलांसाठीं या गोष्टी भाषांतरित केलेल्या असल्यामुळें त्यांनीं त्यांची 'भाषाहि बालबोध योजिली आहे.' मूळ 'फराशिशी' अगर 'इंग्रजी' भाषेंतील पुस्तकांत, 'जो रस झाला आहे तो रस मराठी भाषेंत कसा होईल ? जा भाषेस आज दिवसपर्यंत व्याकर्ण, कोश, कोणी केलेच नाहींत; जींत विद्वान लोकांचें चित्त

---

३६ सदाशिव काशीनाथ छत्रे, **बाळमित्र, भाग १ ला.** १८२८. प्रस्तावन.

३६ अ M. Berquin. *The Children's Friend*. Year of Publication? Preface, p. vi.

रमलेंच नाहीं. जींत शब्दसंग्रह थोडा, जीची बोलायाची शैली प्रौढ नव्हे' अशा मराठी भाषेंत 'माझें भाषांतरहि यथामति आहे' अशी कबुली जरी बापू छत्रे यांनीं दिली तरी या पुस्तकाच्या भाषेबद्दल अनेकांनीं प्रशंसोद्गार काढलेले आहेत. प्रसिद्ध व्याकरणकार दादोबा पांडुरंग आत्मचरित्रांत बापू छत्रेबद्दल लिहितात :—

"या गृहस्थांनीं पूर्वी मी मराठी शाळेंत असतां Esop's Fables (इसप नीतिकथा) आणि Berquin's Children's Friend या ग्रंथाचें 'बालमित्र' या नांवाचें भाषांतर केलें होतें. व ते त्यांचे ग्रंथ पुष्कळ वर्षें पर्यंत सर्व मराठी शाळांत चालू होते हे दोन्ही ग्रंथ फार सुरस झाले होते. तीं भाषांतरें असें त्या वेळेस कोणास वाटत नसे. मराठींत सरस रीतीनें फकीकेंत लिहिणारे हेच पहिले. त्यांच्या मागून आह्मीं सर्व लिहिणारे झालों." ३७

व्याकरणदृष्ट्या हें पुस्तक 'The Students' Manual of Marathi Grammar'(१८६९) च्या व्याकरणकर्त्याला इतकें चांगलें वाटलें कीं आपल्या पुस्तकांत उदाहरणासाठीं 'बाळमित्रां'तील वाक्यें त्यानें घेतलीं. हा अज्ञात लेखक म्हणतो:—

"It is a production of singular beauty, and a store-house of idiomatic phraseology." ३८

तसेंच रे. स्टीव्हनसन यानें 'The Principles of Murathee Grammar' या आपल्या पुस्तकांत उदाहरणादाखल घेतलेलीं वाक्यें बापूंच्या 'इसप नीतिकथा' व 'बाळमित्र' या पुस्तकांतील असल्याचें त्यानें नमूद केलें आहे. ३९ यावरून बापू छत्रे मराठी भाषेचे आदर्श म्हणून तत्कालीन व्याकरणकारांसमोर होते असें स्पष्ट दिसतें.

मात्र मेजर कँडीसारख्याला या पुस्तकांत अनेक दोष दिसले. ते काढून टाकण्यासाठीं त्यांनीं शिक्षामंडळीकडे परवानगी मागितली. या पत्रासोबत शिक्षामंडळीकडे पाठवून दिलेली मूळ पुस्तकाची प्रस्तावना व पहिली गोष्ट आणि त्यांत केलेल्या दुरुत्या सरकारी दप्तरांत पहावयास मिळतात. ४० शिक्षामंडळानें परवानगी दिल्यावर इ. स. १८४९ मध्यें सुधारून छापलेल्या 'बाळमित्र' भाग १ च्या प्रस्तावनेंत कँडी म्हणतात :—

"पूर्वी सदाशिव काशीनाथ छत्रे ह्यांनीं हें भाषांतर केलें, हें फार चांगलें आहे. ह्यांत व्यावहारिक भाषेच्या रीतीनें जागोजाग रस आणलेले आहेत, परंतु त्यांच्या रचनेंत कोंकणी शब्द फार, व कोठें कोठें दुरान्वय, व कोठें कोठें विरामचिन्हांची अव्यवस्था, व कितीएक ठिकाणीं व्याकरणाचे दोष होते, ह्यामुळें ही आवृत्ति शोधिली." ४१

यानंतर पुन्हां एकदां १८५९ मध्यें 'बाळमित्र' भाग १ ची आणखी एक आवृत्ति निघाली. बापू छत्रे यांच्या मूळ 'बाळामित्रा'ची वाचकांना इतकी गोडी

---

३७ अनंत काकबा प्रियोळकर, **रावसाहेब दादोबा पांडुरंग**. १९४७. पृ. ६०.
३८ *The Students' Manual of Marathi Grammar*, Part II. 1869. p.iv.
३९ James Stevenson, *The Principles of Murathee Grammar, Ed.* 3.1854. Preface. p. 6.
४० *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1848. pp. 200-202.
४१ सदाशिव काशीनाथ छत्रे, **बाळमित्र, भाग १ ला**. आवृत्ति नवी. १८४९, सूचना.

लागली होती कीं ही आवृत्ति कँडीच्या सुधारलेल्या आवृत्तीवरून न छापतां मूळ पुस्तकावरून तयार केली गेली. ती तयार करणारे नारायण विश्वनाथशास्त्री लिहितात :—

"एतद्देशीय वाचणारे लोक हे बाळमित्र भाग १ याच्या 'तपासून शुद्ध केलेल्या' आवृत्तीपेक्षां जुन्या प्रती पसंत करितात, असें समजुतीस येऊन मेहरबान डारेक्टर आफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन् साहेब यांची परवानगी घेऊन मूळ ग्रंथांची दुसरी आवृत्ति काढिली आहे." [४२]

बापू छत्रे यांच्या 'बाळमित्रा'ची आणखी एक आवृत्ति छापावयाचें डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या मनांत होतें व त्याबद्दल ते वारंवार रावसाहेब मंडलिक यांच्याकडे बोलत असत असा उल्लेख रा. सा. मंडलिक यांच्या चरित्रांत आढळतो. [४३]

वरील उल्लेखांवरून मेजर कँडीच्या मराठी भाषाविषयक सुधारणा कांहीं लोकांना अमान्य असल्याचें स्पष्ट दिसतें. लोकांच्या मनावर एवढी पकड बसविणारा 'बाळमित्र' भाषांतरित करण्याबद्दल सरकारनें बापू छत्रेनां एक हजार रुपये बक्षिस दिले होते. [४४]

'बाळमित्र' भाग २ रा, गेसफोर्ड नामक इंग्रजानें १८३३ मध्यें तयार केला. तोसुद्धां पहिल्या भागाइतकाच सरस निघाला आहे. तो गेसफोर्डनें केला कीं एकाद्या शास्त्र्यानें त्यास तो लिहून दिला, असा संशय येणें साहजिक आहे. इ. स. १८५१ मध्यें मेजर कँडीनीं तो सुधारून छापिला. पुस्तक दुरुस्तीचें काम स्वतः सुरू करण्यापूर्वी, सुधारणेचें काम खुद्द गेसफोर्डनेंच करावें म्हणून त्याच्याकडे विचारणा झाली; परंतु आपणाला वेळ नाहीं असें त्यानें कळविल्यामुळें कँडीनीं तें काम स्वतःच केलें.[४५] यानंतरच्या 'बाळमित्र' भाग २ च्या आवृत्त्यांमध्यें भाषेच्या दृष्टीनें विशेष बदल झालेले आढळत नाहींत. ते न आढळण्याचें कारण, इ. स. १८९० मध्यें विनायक कोंडदेव ओक यांनीं काढलेल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत आढळतें. ते लिहितात :—

"ह्याचें मूळचें मराठी भाषांतर चांगलें होतेंच. आणखी त्यांत फारसा फेरबदल करावयाचा नाहीं असा करार आहे. तरी, त्यांत क्वचित् कोठें कमजास्त करून, सध्यांच्या भाषापरिपाटास मिळे अशी ही प्रत मीं शुद्ध केली आहे." [४६]

विद्याखात्यातर्फे घालून दिलेल्या व्याकरणविषयक नियमांच्या बाहेर न जाण्याचा 'करार' ओक यांनीं पाळला हें तत्कालीन परिस्थितीला धरूनच होतें. शिक्षामंडळी-

---

४२ सदाशिव काशीनाथ छत्रे, **बाळमित्र, भाग १ ला.** १८५९. सूचना.

४३ गणेश रामकृष्ण हवालदार, **रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें चरित्र, भाग १ ला.** १९२७. पृ. ९१-९२.

४४ *G. D. Vol 237.* 1831. p. 81.

४५ *D. P. I. Book Depot, Vol. 22.* 1859. p. 192.

४६ टी. गेस्फोर्ड, **बाळमित्र, भाग २ रा.** १८९०. प्रस्तावना.

साठीं अगर मेजर कॅंडी यांनीं घालून दिलेल्या भाषाविषयक नियमांची व लेखनपद्धतीची कल्पना येण्यासाठीं 'बाळमित्र' भाग १ च्या इ. स. १८२८ व इ. स. १८४९ मधील कांहीं शब्द व वाक्यें खालीं दिलीं आहेत:—

'बाळमित्र' भाग १ ला, (१८२८.)	'बाळमित्र' भाग १ ला, (१८४९.)
पृ. १ कोड पुरीवलें	पृ. १ कोड पुरविलें
,, पुसों लागली	,, पुसूं लागली
,, २ भें	,, २ भय
,, हिला मी बाळाची जतन करायाकरितां बोलाविली आहे व्हायाचे वेळीं	,, हिला मीं बाळाची जतन करायाकरितां बोलाविलें आहे व्हावयाचे वेळीं
,, ३ काहीं	,, ३ कांहीं
,, करशील	,, करिशील
,, ९ तीस काय वेदना होत्ये	,, ९ तीस काय वेदना होती
,, १२ वळखिणें	,, १२ ओळखणें
,, १३ एक अति दरिद्री संताजी नावाचा मोलकरी होता	,; १४ संताजी नावाचा एक अतिदरिद्री मोलकरी होता
,, १७ तो मला वाटतें कीं इतकें गुप्त ठेवणार नाहीं	,, १७ मला वाटतें कीं तो इतकें गुप्त ठेवणार नाहीं
,, १८ शिजविलें अन्न	,, १९ शिजविलेलें अन्न
,, २६ हें तूं फार चांगलें केलेंस	,, २७–२८ हें त्वां फार चांगलें केलें
,, २७ मी प्रार्थना करितों किं तुमचा सत्कार केला नाहीं, म्हणोन राग आणूं नका. मी आतां तुमचा सेवेंत येतों.	,, २८ मी प्रार्थना करितों कीं तुमचा सत्कार म्यां केला नाहीं म्हणून राग आणूं नका. मी आतां तुमचे सेवेस येतों.
,, ३० तूंच सगळी घेतलीस	,, ३१ तूंच सगळी घेतली
,; ३९ त्याणें त्याचा गोड गळा बिघडेल	,, ४० त्यानें त्याचा गोड गळा बिघडेल
,, ४८ तुम्ही तिला मान दिलात	,, ५० तुम्हीं तिला मान दिला
,, ५६ मशीं	,, ५८ मजशीं
,, ५७ तुशीं	,, ५९ तुजशीं
,, ५९ या विशीं	,, ६१ ह्याविषयीं

पृ. ५४ ईंश्वरें मला तुजमध्यें दुसरा लेंक दिला आहे	पृ. ५६ ईश्वरानें मला तूं हा एक दुसरा लेंक दिला आहे
,, ५५ त्याचा बा	,, ५७ त्याचा बाप
,, २१३ चाकरानें खोतास दिवाणखान्यांत आणिला	,, २१५ चाकरानें खोतास दिवाणखान्यांत आणिलें
,, २१४ तिणें त्याला खालीं वशिवलें	,, २१६ तिनें त्याला खालीं बसविलें
'बाळामित्र भाग २ रा, १८३३	**'बाळामित्र'** भाग २ रा, १८५१
,, २४३ सोसायास	,, २४३ सोसावयास
,, तूं माझा बाजारांत पायगोंवा करशील	,, तूं बाजारांत माझा पायगोंवा करिशील
,, यमास आईनें बरोबर घेतली	,, यमास आईनें बरोबर घेतलें
,, दृष्टि पडेना	,, दृष्टीस पडेना
,, रडत्ये	,, रडते
,, दिल्हें	,, दिलें
,, २४५ तिर्शी	,, २४५ तिजशीं

मेजर कँडी यांनीं 'बाळमित्रा'च्या दोन्ही भागांत केलेल्या वरील कांहीं दुरुस्त्या पाहिल्या कीं भाषेमधील कोंकणी वैशिष्ट्यें काढून टाकण्याबद्दलचा त्यांचा कटाक्ष स्पष्ट होतो. कोंकणांतील 'स'चा उच्चार व लेखन 'श' करण्याची पद्धति त्यांना पसंत नसल्यामुळें 'वशिवलें' सारखें क्रियापद 'बसविलें' असें बदललें. तसेंच, 'तूंच सगळी घेतलीस,' 'तूं त्याला मारलास,' 'हें तूं फार चांगलें केलेंस' इत्यादि वाक्यांतील कोंकणांत वापरलीं जाणारीं सकारयुक्त क्रियापदें काढून 'घेतली,' 'मारलें,' 'केलें' अशीं क्रियापदें वापरलीं. त्याचप्रमाणें 'पाहिलेंत,' 'दिलात' सारखीं तकारयुक्त क्रियापदें घालवून त्याऐवजीं 'पाहिलें,' 'दिला' अशीं क्रियापदें आणिलीं. याशिवाय 'त्याणें,' ज्याणें' इत्यादि शब्दांतील 'ण' काढून 'त्यानें,' 'ज्यानें' अशीं रूपें, 'पुसों लागलों,' 'म्हणोन' इत्यादि शब्दांतील ओकार काढून, 'पूसूं लागली,' 'म्हणून' अशीं रूपें, 'होत्ये,' 'येत्ये 'रडत्ये' इत्यादि क्रियापदांतील कोंकणी पद्धतीमुळें आलेला यकार काढून 'होती,' 'येती,' 'रडती' अशीं रूपें मशीं, तुशीं या सर्वनामांबद्दल मजशीं, तुजशीं हीं सर्वनामें, असे अनेक फेरबदल मेजर कँडीनीं केल्याचें दिसेल. व्याकरणशास्त्राच्या नियमांप्रमाणें वाक्याचा प्रयोग सशास्त्र करण्यासाठीं 'तूं त्याला मारलास,' 'यमास आईनें बरोबर घेतली' इत्यादि वाक्यांतील प्रयोग कर्मणि मानून त्याप्रमाणें क्रियापद बदलण्याचा जुना प्रघात मोडून, मेजर कँडीनीं या वाक्यांचा प्रयोग भावे मानून त्याप्रमाणें

'मारलें' 'घेतलें' अशीं भावे प्रयोगानुकूल क्रियापदें वापरांत आणल्याचेंहि वरील फेरबदलांवरून लक्षांत येण्यासारखें आहे. या बाबतींत एवढें म्हणतां येईल कीं जरी कांहीं फेरबदल तत्कालीन विद्वानांना अमान्य होते, तरीसुद्धां अधिकाराच्या जोरावर विद्याखात्यातर्फे मान्य झालेलीं शालेय पुस्तकें वर्षानुवर्षें मुलांनीं वापरलीं. तेणेंकरून मेजर कँडीनीं केलेले बहुतेक बदल अमलांत आले व आजमितीस ते वापरांत असलेले आढळतात.

सदाशिव काशीनाथ उर्फ बापू छत्रे

'बाळमित्रा' मुळें ज्यांना इंग्रजी अमदानींतील आद्य गद्यग्रंथकार असें म्हटलें जातें त्या सदाशिव काशीनाथ ऊर्फ बापू छत्रे यांचा जन्म शके १७१० मध्यें मुंबईस चाळकेश्वरीं झाला. 'मुंबईमध्यें मोठा अबरुदार विद्वान् असा पहिला हिंदु गृहस्थ व्यंकोबा नाईक. (यांचा उल्लेख मागें आलाच आहे.) त्याच्या वेळेस सरकारी शाळा नव्हत्या. घरींच अभ्यास करून हा मोठा विद्वान झाला. हा सरकारचा 'यंजिनियर' ह्मणजे शिल्पशास्त्रज्ञ होता. देशी लोकांकरितां शाळा स्थापण्याच्या खटपटींत हा प्रमुख. यानेंच सदाशिव काशीनाथ छत्रे वगैरेंना उत्तेजन देऊन त्यांजकडून इंग्रजीचा अभ्यास करविला.' [४७] बापूंनीं प्रथम कांहीं दिवस इंजिनिअरच्या ऑफिसमध्यें 'रैटर' म्हणून काम केलें. इ. स. १८२२ मध्यें स्थापन झालेल्या मुंबईच्या हैंदशाळा शाळा-पुस्तकमंडळीच्या नेटिव्ह सेक्रेटरीच्या जागेवर त्यांची नेमणूक इ. स. १८२३ मध्यें झाली. या जागेवर असतांना त्यांनीं मराठी भाषेंत शालोपयोगी अशीं जीं पुस्तकें लिहिलीं त्यामुळें आजपर्यंत त्यांचें नांव मराठी भाषेच्या इतिहासांत कायम राहिलें आहे. त्यांचीं 'बोधवचन,' 'बोधकथा,' 'इसपनीतिकथा,' 'वेताळपंचाविशी' व 'बाळमित्र' भाग १ हीं शालेय पुस्तकें प्रसिद्ध आहेत. वरील पुस्तकें म्हणजे शुद्ध, साध्या व सोप्या मराठी भाषेचे नमुने म्हणून आजहि पुढें करतां येण्यासारखे आहेत.

बॉंबे नेटिव एज्युकेशन सोसायटीच्या, तारीख १२ मे, १८३० रोजीं वाचलेल्या पांचव्या वार्षिक अहवालावरून असें दिसतें कीं त्यांनीं मंडळीच्या सेक्रेटरीच्या जागेचा राजिनामा दिला. वरील अहवालांतील उल्लेख असा आहे :—

"On the resignation too, of the Native Secretary, Sudasheo Kashinath, your Committee have thought it fit their duty to record their high opinion of his zeal and ability while

---

[४७] रामचंद भिकाजी गुंजीकर, **सरस्वती मंडळ**. १८८४. परिशिष्ट ४, पृ. ४७.

in that situation, affording most valuable and ready aid at all times to promote the objects of the Society, and having so conducted his duties, as to secure the esteem and favor of all to whom his employment allied him." [४८]

शिक्षणसंस्थेचा संबंध सुटल्यावर, दादोबा आपल्या आत्मचरित्रांत म्हणतात त्याप्रमाणें, 'त्यांच्या मनांत उपयोगी इंग्लिश ग्रंथांचीं मराठी भाषांतरें लोकोपकारार्थ करून आपल्या आयुष्याचा सद्व्यय करावा असें होतें. या करतां त्यांणीं एकांतवासासाठीं वाळुकेश्वरीं एक स्वतःची धर्मशाळा घेतली आणि तेथें एक छापखाना ठेवावा असाहि त्यांचा विचार होता.' त्यांच्या इच्छेप्रमाणें जर हें घडून येतें तर मराठी वाङ्मयांत मोलाची भर पडली असती; परंतु दुर्दैवानें थोडक्याच काळांत इ. स. १८३० मध्यें ते मरण पावले. ह्यांचें लेखनचातुर्य व मराठी भाषेंतील प्राविण्य यांविषयीं त्यांचे चरित्रकार बा. ना. देव लिहितातः—

"यावेळीं बापूसाहेबांची मराठी भाषेंतल्या प्रवीणतेविषयीं मोठी ख्याति होती. तेव्हां त्यांनीं (त्यावेळच्या विद्याखात्याचे मुख्य अधिकारी) हें भाषांतर करण्याकरतां योग्य पुरुषाची योजना केली यांत संशय नाहीं. मूळ विषय मनोरंजक असून बोधकारक आणि नीतिशिक्षाप्रचुर आहे; त्यांत भाषांतरकार पूर्ण रसिक, मार्मिक आणि उत्तम भाषावेत्ते; तेव्हां अशा स्थितींत या दोन पुस्तकांचीं (बाळमित्र व इसप नीतिकथा) रूपांतरें इतकीं सर्वोत्कृष्ट उतरलीं आहेत कीं, त्यांस प्रगट होऊन जवळ जवळ ७० वर्षें (इ. स. १९०० मध्यें) होत आलीं असतां...त्यांच्या तोडीचीं दुसरीं पुस्तकें फार क्वचित् दाखवितां येतील असें वाटतें. सुबोध, सरळ आणि सुरम्य अशा भाषापद्धतीबद्दल तर त्यांचें अग्रस्थान आजपर्यंत ढळलें आहे असें अद्याप कोणासही वाटत नाहीं. अशा भाषेचा हीं पुस्तकें नमुना होऊन बसलीं आहेत. उत्तम भाषेची गोष्ट निघाली कीं लोकांस त्यांची आठवण होते, व ते तिकडे बोट दाखवितात....या दोन ग्रंथांची रचना बापूसाहेबांनीं अर्वाचीन लेखन पद्धतीप्रमाणें प्रथम केली म्हणून त्यांस गद्यग्रंथांचे जनक म्हणतात." [४९]

उपदेशपर वाङ्मय

बापू छत्रे यांच्या 'बाळमित्रा'दि बोधप्रधान कथा वाङ्मयाप्रमाणेंच, शुद्ध नीतिपाठ देणारीं अशीं कांहीं पुस्तकें एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत तयार झालेलीं आढळतात. लहान लहान वाक्यांत नीतिनियम गुंफून ते मुलांकडून पाठ

---

४८ *Fifth Report of the Bombay Native Education Society*, 1828-29. p.10.

४९ **विविधज्ञानविस्तार**, पृ. ३१. १९००. पृ. ३१९–३२०.

करवून घेण्यासाठीं 'लघु हितोपदेश,' 'नवीन लघु हितोपदेश' इत्यादि शालेय पुस्तकें निर्माण झालीं. 'मराठी शाळांवर पढणाऱ्या सात आठ वर्षांचे मुलांस नीतिज्ञान व्हावें म्हणून,' तयार केलेल्या 'लघु हितोपदेश'मध्यें ८२ छोटीं छोटीं उपदेशपर वाक्यें आहेत. उदाहरणार्थ, 'तूं परमेश्वराचें भय धरीत जा आणि पाछायाचा आदरसत्कार करीत जा.' [५०] तसचें खिस्ती तत्त्वज्ञानाची छाप असलेलीं कांहीं वाक्यें आहेत. उदाहरणार्थ, 'तूं आपले शेजाऱ्यांवर आपणासारिखी प्रीती करीत जा,' [५१] 'पाण्यापासून शरीर मात्र स्वच्छ होतें परंतु आत्मा पवित्र होत नाहीं.' [५२]

'लघु हितोपदेश' सारख्या पुस्तकांचा बालमनावर कसा परिणाम होत असे हें बाबा पदमनजींनीं सांगितलेल्या आपल्या अनुभवावरून स्पष्ट होतें ते म्हणतातः—

"लघु हितोपदेश पुस्तकांतील बोध माझे मनांत चांगला ठसला. त्यांचा जसा मीं उपयोग करावा तसा बहुत वर्षे केला नाहीं, तरी त्यांतील कित्येक वाक्यें माझ्या स्मरणांतून कधीं गेलीं नाहींत. तीं अशीं होतीं : 'तूं पहांटेस आणि रात्रीस परमेश्वराच्या उपकारांचें स्मरण करीत जा' 'तूं परमेश्वराचें भय धरीत जा आणि राजाचा सत्कार करीत जा.' 'परमेश्वर दयाळू आणि सर्व पदार्थांचा दाता आहे. तोच सर्व जगाचा न्यायही करणार आहे, यास्तव जे लोक वाईट कर्म करितात त्यांस तो शिक्षा करील.' हें पुस्तक कोणी रचिलें होतें हें मला माहीत नाहीं, परंतु त्याचें नांव किंचित बदलून 'हितोपदेश' असें ठेवून कोणी सुज्ञ गृहस्थानें हल्लीं त्याची चौथी आवृत्ति छापिली आहे. असें पुस्तक सरकारी शाळेंत आतां शिकवीत नाहींत ही फार दुःखाची गोष्ट आहे." [५३]

बाबा पदमनजीनीं आत्मचरित्रपर असा 'अरुणोदय' इ. स. १८८८ मध्यें लिहिला. तत्पूर्वी 'हितोपदेश' (बोधवचन संग्रह) नांवाचें एक पुस्तक कृष्णराव सुंदरजी कीर्तिकर यांनीं प्रसिद्ध केलें होतें. त्या पुस्तकावर आवृत्ति ४, इ. स. १८८२ असें छापलेलें आढळतें. त्या अर्थी बाबा म्हणतात त्याप्रमाणें तें हेंच पुस्तक असावें. इ. स. १८३७ नंतर शाळांत वापरण्यासाठीं म्हणून मराठी क्रमिक पुस्तकें विद्याखात्यातर्फे तयार झाल्यामुळें त्यापूर्वी उपयोगांत असलेलीं नीतिप्रधान शालेय पुस्तकें बंद झालीं. या पुस्तकांची वेगळी गरज शालेय शिक्षणांत यापुढें भासेनाशी झाली म्हणून

---

५० **लघु हितोपदेश**, आ. २. १८३८. पृ. ३.
५१ तत्रैव. पृ. ५.
५२ तत्रैव. पृ. ७.
५३ बाबा पदमनजी, **अरुणोदय**. १८८८ पृ. १७–१८.

म्हणा अगर पुस्तकी नीतिपाठांचा फारसा उपयोग होत नाहीं या सत्याची जाणीव झाल्यामुळें म्हणा, बाबांच्या म्हणण्याप्रमाणें हीं सर्व पुस्तकें मुलांच्या वाचनामधून वगळलीं गेलीं.

'लघु हितोपदेशा'च्या धर्तीवर, परंतु थोडा फेरफार होऊन 'नवीन लघु हितोपदेश तयार झाला. पहिल्या पुस्तकांत स्वतंत्र वाक्यें होतीं. या पुस्तकांत विषयवारीनें वाक्यांचे गट पाडलेले आहेत. वेगवेगळ्या बत्तीस विषयांवर बोधप्रद वाक्यांचे गट आहेत. सदाचरण, उपकार, क्षमा, दया, मेहनत, संतोष, धैर्य, चाहाडी, मत्सर, गर्व, सत्काळक्षेप, शिवरें भाषण, इत्यादि विषयांवर उपदेशपर वाक्यें आहेत. 'बाळपणांत स्मृतीनें धरितां येतें आणि मोठेपणीं विद्येचा अनुभव होऊन समाधान होतें,' [५४] 'घरमेळी सौरस्यानें कज्जा तुटेल तों पर्यंत सरकारांत न्यावयाचा भरीस पडूं नये,' [५५] इत्यादि प्रकारांनीं मुलांना नीतिपाठ देण्यासाठीं 'नवीन लघु हितोपदेश' रचला गेला.

तत्कालीन सरकारी कायदेकानु व शालेय वाङ्मय

नीतिनियमांखेरीज, तत्कालीन नवीनच स्थापन झालेल्या परकी सरकारनें जे कायदेकानु केले होते, ते लोकहितार्थ आहेत हें पटवून देण्यासाठीं कांहीं पुस्तकें तयार करवून तीं शाळांमधून वापरलीं जात. 'लोकाचे दुःख जाऊन सुख होण्याविसिं संभाषण' हें त्यांतीलच एक होय. 'बैठकचावडी' नामक एक पुस्तक याकाळीं शाळांत वापरलें जाई. तें हेंच कीं काय समजत नाहीं. बैठकचावडीवर भाऊ देशपांडे, जीउबा देशमुख, धनजी शेट्या आणि एक 'वीचारवान्' इतके लोक बसून चर्चा करीत असतां, देशमुख देशपांडे नवीन सरकारनें आपल्या वतनइनामांवर बंधनें घातलीं म्हणून टीका करितात, धनजी शेट्या पूर्वीप्रमाणें फसवून आपणांस व्यापार करतां येत नाहीं म्हणून चरफडतो, आणि या सर्व असंतुष्ट लोकांना एक विचारवंत व्यक्ति इंग्रज सरकारनें केलेल्या गोष्टी–विशेषतः सडका बांधणें, मिठावर कर बसविणें–कशा योग्य आहेत तें पटवून देते. यासारख्या पुस्तकांवरून, त्याकाळीं सरकारसमोर कोणते प्रश्न होते व ते सोडविण्यासाठीं शालेय पुस्तकांचा किती चतुराईनें उपयोग केला गेला याची कल्पना येते. तत्कालीन शेतकरी समाजावर या पुस्तकांत लिहिलें आहेः–

"शेती करणारे वगैरे जे लोक ते हरणाचे बसले टोलीप्रमाणें आहेत हरणे राना-मध्यें बस्ते वेळेस जसीं तोंडें सभोवार करून टकटका पाहात असतात त्यासमयीं

---

[५४] **नवीन लघु हितोपदेश**, आ. २. १८३८. पृ. ५.
[५५] तत्रैव. पृ. २१.

जरी कोणी इश्वरभक्त हत्या न करणारा त्यांस दाणा घेऊन आला तरी त्यास न ओळखून आपले मनातील भयाने पळून जातात कदांचित त्यास दाणा घालावा या बुद्धीने जर तो मागून येऊं लागला तर तीं हरणें टिकून अधीक लांब जातात याप्रमाणें कारभार्याचे हातून रयत ठकली न जावी आणि गरीब रयतेची दाद लागावी म्हणोन सरकारानें साहेब लोकांस मराठी व हिंदुस्थानी भाषा शिकण्यास आज्ञा देऊन परगण्यांतून राहाण्याची आज्ञा होऊन गरीब लोकाची दाद लागून न्याय व्हावा ह्मणून सरकार बंदोबस्त करीत असतें तरी विद्या नाहीं यामुळें कायदा समजत नाहीं." ५६

चालू काळालासुद्धां वरील विचार कितीतरी उपयुक्त आहेत. या पुस्तकांत पूर्ण विरामाशिवाय अन्य विरामचिन्हांचा मुळींच उपयोग केलेला दिसत नाहीं. लेखन पद्धतीहि निश्चित केलेली नाहीं. तसेंच 'येढोळ' (पृ. ९), 'मापाड्या' (पृ. १८) 'लंगोट्या' (पृ. १८) इत्यादि जानपद शब्द, 'गांवढे गावांत गाढवी सवाशिनी (पृ. २१) सारख्या म्हणीहि या पुस्तकांत आढळतात.

केवळ म्हणींचीच पखरण करून लिहिलेलें दुसरें एक पुस्तक याकाळीं शाळांत, चापरलें जाई. तें म्हणजे 'आळशी आणि दिवाळखोर यांस उपदेश' हें होय लिलावाच्या जागीं जमलेले लोक गप्पा मारीत असतां त्यांतीलच एक म्हातारा लोकांना उपदेश करतो. तो उपदेश सुमारें सत्तर म्हणींमध्यें गोंवलेला आहे. आज त्यांतील पुष्कळशा म्हणी प्रचारांतून गेलेल्या दिसतात. तत्कालीन म्हणींची कल्पना येण्यासाठीं उद्योगाविषयीं म्हाताऱ्याच्या तोंडीं घातलेला खालील उपदेश पहावा: —

"उद्योग करावा; आणि जो योग्य तोच करावा; मग करितां करितां अभ्यास पडला म्हणजे तो गोड लागेल. आणि तोच थोडे वेळांत अधिक करितां येईल, म्हटलें आहे,

अवघें सोपें उद्योगानें, अवघें कठीण आळसानें
जो उशीरानें उठे, त्याचें काम शेष सांठे
हळू चाले वाट, गांठी दरिद्र पाठोपाठ

म्हणून—

आपण कामास लोटावें, कामानें आपल्यास लोटूं नये
लवकर निजे लवकर उठे, ज्ञानधनसुख त्या भेटे

म्हणून पुढें चांगला काळ केव्हां येईल असे मनोरथ करीत बसणें हा वेडेपणा. उद्योग केला असतां चालत्या काळासच चांगला करितां येईल, म्हटलें आहे,

---

५६ लोकांचे दुःख जाऊन सुख होण्याविसिं संभाषण. प्रकाशनकाल ? पृ. ३२-३३.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.
वर्ग.....क्रमांक.....

मनोरथांचा भरंवसा, उद्योगी न धरी सहसा.
ज्याचें मनोरथांवर वांचणें, त्याचें उपासांवर मरणें.
चाकरी करील, तो भाकरी खाईल.
कष्टावांचून फळ नाहीं.
जो झटे व्यापारीं, त्यास संपत्ति वरी.
जो करी धंदा, त्याचा मान लाभ बंदा. परंतु म्हटलें आहे, व्यापारधंदा करितां आले तर अभर करितात, नाहींतर गांव सोडून पळवितात.
उद्योगियास, कदा न घडती उपास.
उद्योग्याचे घरीं, क्षुधा प्रवेश न करी.
उद्योगाचें घर, सोडिती कोतवाल नाजर. कां कीं
उद्योग कर्ज वारितो, निरुद्योगी कर्ज वाढवितो.
ज्यास बापानें कांहीं ठेविलें नाहीं, किंवा ठेवा सांपडला नाहीं, त्यास उद्योग ही मोठी सिद्धी आहे.
ह्मटलें आहे, तूं आधीं उद्योग कर, मग सहाय होईल ईश्वर.
नांगर फिरीव म्हणजे तुला दाणे विकायास आणि खर्चायास सांपडतील.
नाहीं गेला आज, तंव करून टाक आजचें कामकाज, उद्यांच्या अडचणी कोण जाण
एक उद्यां म्हणे, तर सहज दिवस दुणे
उद्याचें आज, करावें काज.'' [५७]

याशिवाय, 'ज्याचें पोट शेतावर, त्यानें बसावें शेताचे मेरेवर' (पृ. ८) 'कराल आढ्यतेचा विचार, तेव्हा पहा पिशवीचाही सुमार' (पृ. १२) यासारख्या अनेक म्हणी या पुस्तकांत आढळतात. हा उपदेश एका विवेकी माणसानें ऐकल्यामुळें तो 'संपत्ति संतति, आरोग्य, चित्ताची स्वस्थता यातें पावून जन्मवर सुखी झाला.'

नीतिदर्पण

तत्कालीन सरकारी अधिकारी विद्याप्रसारार्थ आवश्यक तीं शालेय पुस्तकें तयार करवून घेण्याच्या कामीं फार तत्पर असत. अशा अधिकाऱ्यांपैकींच, रॉबर्ट ग्रँट हा एक होय. तो मुंबईचा गव्हर्नर असतांना कांहीं बोधप्रधान व कथात्मक अशीं शालेय पुस्तकें तयार झालेलीं होतीं; परंतु तेवढ्यांनीं त्याचें समाधान होईना. तारीख ७ जानेवारी इ. स. १८३६ रोजीं लिहिलेल्या एका निवेदनामध्यें तो म्हणतो कीं शिक्षणप्रसारार्थ, शाळापुस्तकमंडळीनें गेलीं दहा पंधरा वर्षें प्रयत्न करून सुद्धां बोधपर अशीं

---

[५७] **आळशी आणि दिवाळखोर यांस उपदेश.** आ. २. १८४०. पृ. ४-५

गोष्टींचीं पुस्तकें मराठी भाषेंत फारच थोडीं झालीं. इंग्रजींत ज्याप्रमाणें मिस् एज्वर्थ यांचें नीतिपर कथावाङ्मय आहे, त्याप्रमाणें मराठी भाषेमध्येंहि तें असणें आवश्यक आहे. [५८] रॉबर्ट ग्रँटच्या या सूचनेनुसार चीफ सेक्रेटरी वॉथेन यानें कांहीं पुस्तकें लिहवून घेतलीं. त्यांतील 'नीतिदर्पण' हें एक होय. प्रथम वॉथेननें तें इंग्रजींत तयार कले व त्याचें मराठी भाषांतर विष्णुशास्त्री बापट यांच्याकडून करवून घेतलें. या पुस्तकाचा पूर्वेतिहास सरकारी दप्तरांत पहावयास सांपडतो. [५९] 'नीतिदर्पण' वॉथेननें स्वखर्चानें छापून घेतलें. या पुस्तकाबद्दल रॉबर्ट ग्रँट लिहितो :—

" I hail the present work as calculated to impress the minds of the natives as may peruse it, with moral lessons of the greatest significance. I want words to express how far I place works of this nature, considered in regard to their practical utility, above whole libraries of purely physical science." [६०]

'नीतिदर्पणा' मागील हेतु काय आहे तें सांगतांना विष्णुशास्त्री बापट म्हणतातः—

" सांप्रत महाराष्ट्र देशांतील बहुतेक लोकांची मुलें फार करून अज्ञानी होतात, याचें कारण असें आहे कीं त्यांचीं मातापितरें लहानपणापासून त्यांस चांगली विद्या आणि नीती शिकवीत नाहीं, म्हणून तीं मुलें बाळपणापासूनच खोटें बोलणें, चोरी करणें, विश्वासघात करणें, आणि खोटी साक्ष देणें, इत्यादिक दुष्ट कर्में आचरण करूं लागतात, नंतर तीं मुलें जशीं जशीं मोठी होतात तसे तसे त्यांचे ते दुर्गुण वाढतात. तेणें करून त्यांचा परिणाम फार वाईट होतो. हा विचार सांप्रतचे उदार सर्कारानें मनांत आणून या देशांतील लोकांचे कल्याणास्तव जागोजागीं मराठी व इंग्रेजी आदिकरून सर्व विद्यांचा शाळा घातल्या आहेत, परंतु मराठी शाळांवर पढणाऱ्या मुलांस नीतिज्ञान व्हायाजोगे ग्रंथ फार थोडे आहेत असा अभिप्राय मनांत आणून त्यांस सांप्रतचे राज्यकारभारसंबंधीं व इतर व्यवहारसंबंधीं नीतिज्ञान होण्याकरितां हा ग्रंथ केला आहे. " [६१]

---

५८ *G. D. Vol. 10* 1836. p. 276.
342.

५९ *G. D. Vol. 44* 1837. pp. 33-39.
414.

६० *Ibid.* p. 33.

६१ विष्णुशास्त्री बापट, **नीतिदर्पण**, आ. २. १८३७. प्रस्तावना.

वरील भूमिकेवरून 'नीतिदर्पण' मधील कथा लिहिलेल्या असल्यामुळें, 'या ग्रंथांत सर्व लोकांचें मनास चमत्कार वाटायाजोग्या कथा नाहींत . . . परंतु यथामति दृष्टांतिक कथा लिहून ग्रंथाची समाप्ती केली आहे.' या कथांत 'बामणाची गोष्ट,' 'सोनाराची गोष्ट', 'पटेलाची गोष्ट' अशा जातवार व धंदेवार कथा लिहिलेल्या आहेत. या कथांमधून तत्कालीन समाजांतील मुख्य दोष वर्णिलेले आढळतात. उदाहरणार्थ महाराष्ट्रीय लोकांचा महत्त्वाचा दोष म्हणजे:—

" मारवाडी लोक व गुजर लोक जा दिवसापासून या देशांत येऊन राहिले त्या दिवसापासून हा देश फार दरिद्री झाला ही गोष्ट कोणाचे ध्यानांत येत नाहीं हें मोठें आश्चर्य आहे, कारण आजपर्यंत हजारो मारवाडी लोक व गुजर या मुलकांत येऊन श्रीमंत झाले, परंतु या देशांतील कोणी एक मनुष्य मारवाडांत जाऊन पैका मिळवून श्रीमंत झाला असें कधीं घडलें नाहीं, असें असतांही त्या लोकांची या मुलकांत वस्ती न व्हावी म्हणून आजपर्यंत कोणी एकाने यत्न केला नाहीं.' [६२]

'बालोपदेश कथा' हें विष्णुशास्त्री बापटांचें आणखी एक पुस्तक होय. "हा ग्रंथ पूर्वी इंग्रजी भाषेंत पंधरा विभाग कल्पून लिहिला होता; त्याचें संस्कृत भाषांतर बंगाल्यांतील शिक्षामंडळीचे पंडितानी करून प्रसिद्ध केलें होतें. त्याचें सांप्रत महाराष्ट्र भाषेंत भाषांतर विष्णुशास्त्री यांनी केलें आहे. आणि या ग्रंथांत प्राचीन इतिहासांतील पंधरा विभागांपेक्षां अधिक कथा लिहिल्या आहेत. तेणेंकरून या देशांतील गृहस्थांचे मुलांस चांगला मार्ग लागून लहानपणापासूनच सदाचरणाकडे लक्ष्य लागावें अशी आमची इच्छा आहे." [६३] या सदिच्छेनें प्रेरित होऊन 'बालोपदेश कथा' लिहिलेल्या आहेत. या पुस्तकाचे दोन भाग पाडलेले आहेत. पहिल्या भागांत केवळ उपदेशवजा मजकूर असून दुसऱ्या भागांत 'बाळकांस हितोपदेशाच्या गोष्टी' सांगितलेल्या आहेत. प्रत्येक गोष्टीच्या शेवटीं सारांश आहेच. उदाहरणार्थ 'जा मुलांचीं शरीरें मळीण, आणि मळकीं, व फाटकीं, वस्त्रें नेसलेले असतात त्यापेक्षां जांचीं शरीरें स्वच्छ आणि सफेत वस्त्रें नेसणारीं जीं मुलें त्यांस पाहिलें असतां सर्वांस संतोष उत्पन्न होतो आणि तीं मुलें शरीरानें बळकट, निरोगी, संतोषयुक्त, व सुखी, असतात असें तुम्ही समजावें." [६४] विद्येचें महत्त्व वर्णितांना म्हटलें आहे:—" जसें निर्विष सर्पास लोक तुच्छ मानितात तसेंच व्यर्थ काल घालविणारा जो विद्याहीन तो पृथ्वीवर निरर्थक भारभूत आहे आणि सूज्ञ पुरुषांत त्याचा मान राहात नाहीं, म्हणून तो सहजच मूर्ख लोकांचा सहवास करून त्यांचें दुर्मार्ग आचरण करूं लागतो यास्तव सर्व जन त्याचा त्याग करितात." [६५]

---

६२ विष्णुशास्त्री बापट, **नीतिदर्पण**, आ. २. १८३७. पृ. १०२–१०३.
६३ विष्णुशास्त्री बापट, **बालोपदेश कथा**, आ. २.१८३८. पृ. ३.
६४ तत्रैव. पृ. २२
६५ तत्रैव. पृ. ५३.

लोकां सांगे ब्रह्मज्ञान ?

'नीतिदर्पण' व 'बालोपदेश कथा' द्वारा मुलांना नीतिपाठ देणाऱ्या विष्णुशास्त्री बापटांना मात्र स्वतः अनीतीच्या आरोपाला बळी पडावें लागलें. विष्णुशास्त्री बापट यांची असिस्टंट पंडित म्हणून पुणें पाठशाळेंत इ. स. १८३७ मध्यें नेमणूक झाली. पाठशाळेचे तत्कालीन मुख्य राघवाचार्य मरण पावल्यामुळें त्याजागीं नोव्हेंबर १८३८ मध्यें विष्णुशास्त्री आले; परंतु त्यांच्या हातून घडलेल्या दुर्वर्तनामुळें त्यांना थोडक्याच दिवसांत काढून टाकण्यांत आलें. त्यानंतर कांहीं वर्षें हालांत दिवस काढून त्यानीं शिक्षामंडळीकडे विनंति अर्ज केला. त्या अर्जांत आपल्या गुन्ह्याची कबुली देतांना ते लिहितातः—

"While continuing to discharge the duties of this office with all zeal and faithfulness, I was charged with having retained in my own possession, for some months, the fractional difference of exchange between the Bombay and Chinchore rupee-in paying the Government gratuity to fourteen students of the College on the completion of their course-the said difference on the whole fourteen gratuities amounting to rupees 4-3-0 and for this temporary neglect, which I must admit, but which arose partly from my being during the greater portion of the time of its retention absent from Poona on a tour of inspection, I was dismissed." [६६]

या अर्जासोबत मेजर कॅंडी, वॉथेन, रे० विल्सन, इत्यादि लोकांचीं शिफारसपत्रेंहि विष्णुशास्त्र्यांनीं जोडलेलीं होतीं; परन्तु त्यांचा उपयोग झालेला दिसत नाहीं. क्षुल्लक अशा नैतिक गुन्ह्याकडे तत्कालीन सरकारी अधिकारी किती निष्ठुरपणें पाहात असत त्याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. या कडक नजरेंतून कृष्णशास्त्री चिपळुणकर, मेजर कॅंडीचे उजवे हात–परशुरामपंत तात्या गोडबोले हे सुद्धां सुटूं शकले नाहींत.

वाटसराची गोष्ट व जागती जोत

रॉबर्ट ग्रँट अगर वॉथेनप्रमाणेंच जेम्स् फॅरिश नामक एका सरकारी अधिकाऱ्यानें लिहवून घेतलेलीं 'वाटसराची गोष्ट' व 'जागती जोत' हीं दोन पुस्तकें तत्कालीन शाळांमधून वापरलीं जात. फॅरिशनें इ. स. १८३८ मध्यें पुस्तकविषयक एक निवेदन लिहिलें व त्यामुळें वरील दोन पुस्तकें तयार झालीं. याबाबत झालेला पत्रव्य-

६६ *D. P. I. Board of Education, Poona College.* 1845. pp. 599- 600.

वहार सरकारी दप्तरांत नमूद आहे. [६७] त्यांत पुस्तकांमधील विषयांची चर्चा करून म्हटलें आहेः 'The authors are natives who have written under European Superintendence.' राघो नारायण देवळे व रामचंद्र अमृत दुगल हे एतद्देशीय लेखक व रे० सी. पी. फरार हे युरोपियन मिशनरी मार्गदर्शक होत. सरकारी शाळांत ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं तयार केलेलीं पुस्तकें वापरावयाचीं नाहींत असें ठरवून सुद्धां, ज्या पुस्तकांत उघड उघड ख्रिस्तीधर्ममाहात्म्य वर्णिलेलें आहे, अशीं हीं दोन पुस्तकें शाळांत कांहीं काळ वापरलीं गेलीं.

'वाटसराची गोष्ट' या पुस्तकांत, कर्ज काढून लग्न केल्याचे दुष्परिणाम, सरकारनें जकात माफ केल्यामुळें झालेले फायदे, बंडखोर व लुटारू लोकांचा बंदोबस्त, देशी व विदेशी नांगरांतील फरक, देशी व विलायती गाड्यांतील फरक, कापसाची पैदास, रस्ते दुरुस्तीची आवश्यकता इत्यादि विषय कथारूपानें चर्चिलेले आहेत. विशेषतः शेतकरी जीवनांतील प्रश्नांचा उहापोह केलेला आढळतो. उदाहरणार्थ रानटी जनावरांच्या बंदोबस्ताबद्दल म्हटलें आहे :—

"तेव्हां सरकार वाघ मारणाऱ्यांस कांहीं बक्षीस देत नसे म्हणून कोणी झटून वाघांस मारीत नसे यामुळें वाघ फार जमून वाटा ठिक ठिकाणीं बंद करीत यास्तव वाटसरांस रात्रीं वाट चालतां कामास येत नव्हतें व नेहमी गुरां ढोरांस त्यांपासून इजा प्राप्त व्हावी...पण हालीं त्याप्रमाणें नाहीं कारण कंपिनीचें राज्य झाल्यापासून असा हुकूम झाला आहे कि जो कोणीं वाघ मारील त्याजला पन्नास रुपये व जो नडग मारील त्याजला पंधरा रुपये इनाम मिळेल." [६८]

सरकारचे गोडवे गाताना लेखकानें एका पात्राच्या तोंडीं खालील शब्द घातले आहेतः—

"मलाहि वाटतें कि सरकारनें जीं कामें केलीं तीं रयतेचे हिताकरितांच केलीं असतील कारण त्या कामांपासून सरकारचा कांहीं नफा दिसत नाहीं अणखीं मला एक मोठें आश्चर्य वाटतें कि या राज्यांत पेशवाई व मोगलाई प्रमाणें लढाया बंडें घामधुमी व जुलूम हीं अगदींच नाहींत एकसूत्री म्हणतात त्याप्रमाणें राज्य चाललें आहे." [६९]

---

६७ *G. D. Vol.* $\frac{28}{435}$ 1838. pp. 138-143. 199-200.

६८ राघो नारायण देवळे, **वाटसराची गोष्ट.** १८३८. पृ. २२.

६९ तत्रैव. पृ. ४१.

'जागती जोत' या पुस्तकांत सुद्धां 'शेतपोत रीतभात यांविषयीं संवाद' आहे. 'वाटसराची गोष्ट' व 'जागती जोत' या दोनहि पुस्तकांचा हेतु स्तुत्य होता. मुलांना विशेषतः शेतकरी मुलांना लिहिणें वाचणें आलेंच पाहिजे या गोष्टीवर भर दिलेला आहे. 'जागती जोत' मधील प्रभाकर मुंबईस 'पाद्रीचे मराठी शाळेंत' गेला व पुढें प्रभाकरपंत होऊन शेतकऱ्यास उपदेश करता झालाः—

"लिहिण्याचा उपयोग सर्वांस आहे प्रथम लिहिणें शिकून व्याकरणाचा अभ्यास केला तर भाषा शुद्ध बोलतां येते तूं कदांचित् म्हणशील किं सर्व काय व्याकर्णच शिकत असतात तर त्याचें उत्तर मी तुला असें देतो किं व्याकर्ण शिकल्या वांचून अगदी शुद्ध बोलतो असा कोणी नाहीं." ७०

ख्रिस्तीधर्मप्रसार व शालेय पुस्तकें.

अशाप्रकारें शिक्षणाची महति गाणाऱ्या वरील पुस्तकाचा सरकारी शाळांत उपयोग व्हावा ही गोष्ट ध्यानांत घेतां त्यांत खिस्तीधर्म माहात्म्याचें वर्णन असणें विसंगत दिसतें. "सर्वांनी आपलीं मुलें पाद्रीचे शाळांत घालावीं त्या शाळांत कांहीं दिवस अभ्यास केल्याने तेव्हांच मनोवृति पालटून खरें काय खोटें काय बरें काय वाईट काय शुद्धाचरण, दुराचरण, यांची समजूत मनाच्या ठायीं लवकरच बिंबती या शाळांत जर लोकांनी आपलीं मुलें शिकावयास घातलीं असतां मला अशी आशा आहे किं तीं दुराचरणें सोडून उत्तम रीतीने आचरण करून उत्तरोत्तर शुध्दीवर येऊन लवकरच सुपंथास लागतील." ७१ या शब्दांत एका बाजूनें 'पाद्रीचे शाळांत' प्रत्येक मुलानें जावें असा उपदेश करावयाचा व दुसऱ्या बाजूनें सरकारी शाळांतील मुलांनीं तो वाचावयाचा हें विचित्र वाटतें; परन्तु तसें वाटण्याचें कारण नाहीं. त्याकाळच्या बहुतेक सरकारी अंमलदारांच्या मनांत आपल्या धर्माचा अभिमान होता व उघडपणानें शक्य नसल्यास अप्रत्यक्षरीत्या खिस्तीधर्मप्रसाराला त्यांच्या हातून मदत होत होती. धार्मिक बाबतींत तटस्थता बाळगूं इच्छिणाऱ्या इंग्रज सरकारच्या तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांना, 'केवळ आपल्याकडेसच पाद्रीसाहेब आहेत असें नाहीं बहुदा चहुकडचे देशांत आहेत. दुसरें कारण या पाद्री लोकांमध्यें प्रीति व दया फार ते असें म्हणतात किं खऱ्या धर्माप्रमाणें आम्ही आचरण करून तरतों त्याच धर्माप्रमाणें सर्वांनीहि आचरण करून तारलें जावें आतां हा कळवळा केवढा पहा!' या शब्दांमुळें खिस्तीधर्मप्रसाराला मदत होत आहे याचें विस्मरण पडलें.

---

७० रामचंद्र अनंत दुगल, **जागती जोत**. १८३८. पृ. ४४.

७१ तत्रैव पृ. ५२.

यात्रेकऱ्याचा वृत्तांत

याच्याहिपेक्षां उघडपणानें खिस्तीधर्माचा प्रचार करणाऱ्या एका गोष्टीच्या पुस्तकाला सरकारी आश्रय मिळाला. सरकारी पुस्तकखान्यांत विक्रीसाठीं म्हणूनसुद्धां या पुस्तकाचा शिरकाव झाला. तें पुस्तक म्हणजे मिसेस् फरार हिचें 'यात्रेकऱ्याचा वृत्तांत' हें होय. राघोजी जाधवाला 'सिंहस्थाच्या सालीं' नाशिकची यात्रा करावयास लावून, लेखिकेनें प्रवाश्याला वाटेंत येणाऱ्या अडचणी, रोगराईमुळें त्याच्या मुलाचा व जांवयाचा मृत्यु, वाटेंत भेटलेले साहेब लोक, ऊंस व बटाटा यांच्या लागवडीची माहिती, साखर तयार करण्याची पद्धति, मेंढरें पाळण्याचा धंदा व लोंकर, विलायती नांगराची उपयुक्तता इत्यादिकांचीं वर्णनें केलीं आहेत. या पुस्तकांतील कांहीं माहिती खरोखरच उपयुक्त आहे; परंतु ठिकठिकाणीं हिंदु धर्माची नालस्ती व खिस्ती धर्माचा उदोउदो या पार्श्वभूमीवर ती माहिती दिली आहे.

उदाहरणार्थ,

"हिंदु लोकांचे धर्मांत वरचेवर खोटें बोलण्याची व दुसऱ्यास ठकविण्याची आज्ञा आहे. लग्नकार्यांत, अथवा ब्राह्मणाच्या हितास्तव, अथवा कित्येक प्रकारच्या संकटांत लबाडी बोलावी, असें त्यांचें शास्त्र आहे. त्यांजमध्यें जे अवतार असे म्हटलेले आहेत तेहि कृत्रिम, लबाडी करून सर्व वाईट कर्माविषयीं लोकांस कित्ते व गुरु झाले आहेत, असें त्यांच्या कथांवरून दिसतें." [७२]

यासारखे अनेक उतारे या पुस्तकामध्यें विखुरलेले आढळतात. हिंदुधर्मातील दोष उघड करतानांच खिस्ती धर्माचा श्रेष्ठपणा स्पष्ट शब्दांत मांडण्याची संधि लेखिकेनें घेतली आहे. ती म्हणते :—

"प्रिय वाचणाऱ्यानो असें झालें म्हणजे जन्माचें सार्थक झालें असें कल्पूं नका. पुढील आकाशसुख प्राप्त करून घ्यावें हें जन्माचें सार्थक आहे. त्यास जो उद्योग लागतो तो संसाराच्या योग्य उद्योगास कांहीं बाधक नाहीं. त्या सुखाला एक फार मोलवंत मोत्याची उपमा दिल्ही आहे, ज्या कोणाला तें मोतीं सांपडेल तो त्यांच्या बद्दल आपलें सर्व धन आनंदाने देईल, बरें त्या मोत्याचा शोध करावा असें जर कोणास वाटूं लागेल, तर मुंबईस पुण्यास नासिकास औरंगाबादेस अहमदनगरास व इतर ठिकाणीं जेथें खिस्तभक्त आहेत, तेथें त्यांजवळ या मोत्याचा शोध लागेल." [७३]

---

७२ मिसेस् फरार, **यात्रेकऱ्याचा वृत्तांत.** १८३८. पृ. १२०–१२१.
७३ तत्रैव. १८३८. पृ. १४५–४६.

या उतान्यांतील अलंकारिक भाषेचा बुरखा बाजूला काढला कीं त्याकाळीं शालेय कथावाङ्मयांतून खिस्ती धर्माचा प्रचार कसा होत होता याची कल्पना येते. हें पुस्तक सरकारी शाळांमधून चालू असल्यामुळें, त्याची नवीन आवृत्ति काढण्याची वेळ आली असतां भाषाविषयक तपासणीसाठीं तें मेजर कँडीकडे पाठविण्यांत आलें. तोपर्यंत हें पुस्तक आपण पाहिलें नसल्याचें त्यांनीं या पुस्तकावर लिहिलेल्या टीकालेखांत म्हटलें आहे. त्यांच्या हातीं तपासणीसाठीं तें आल्यावर त्यांना कल्पना आली कीं शिक्षामंडळीचा धार्मिक बाबतींत ढवळाढवळ न करण्याचा नियम या पुस्तकामुळें मोडला गेला आहे. तरीसुद्धां त्यांत बदल करण्याची अगर तें वापरांतून काढून टाकण्याची शिफारस साहेबमजकुर करीत नाहींत. याबाबतींत त्यांचा युक्तिवाद असा आहेः--

" As the book is a very sensible and well-written production, as it has been 10 years in circulation, and has never, that I have heard of, offended the feelings or prejudices of any one; as, on the contrary, it may be inferred from another edition being required that it is acceptable to the public; and as the withdrawal of it now may be objected to as evincing, under these circumstances, unnecessary sensitiveness, the Board will probably think it most expedient to make no alteration. The omission of the passages would interrupt the connection of the story, besides being a liberty which it would not be right to take without leave from the author." [७४]

यात्रिकक्रमण

'यात्रेकऱ्याचा वृत्तांत' या खिस्तीधर्मप्रसारक शालेय पुस्तकाप्रमाणेंच त्यावेळीं शाळांमध्यें वापरलें जाणारें दुसरें पुस्तक 'यात्रिकक्रमण' हें होय. 'हें स्वप्नाच्या रूपकाने कथिलें असे ज्यान् बनियान् याने मूळ ग्रंथ केला, त्याचें भाषांतर हरि केशवजी सोमवंशी क्षत्रि पाठारे यानी केलें.' 'Pilgrim's Progress' या इंग्रजी पुस्तकाचें हें भाषांतर इ. स. १८४१ मध्यें अमेरिकन मिशनतर्फे प्रसिद्ध झालें. या काळांत भाषांतरकार म्हणून हरि केशवजी आघाडीवर होते. जेम्स फॅरिश यांच्या सूचनेवरून भाषांतराचें हें काम त्यांनीं हातीं घेतलें. रूपकात्मक आणि खिस्ती धर्माची तात्त्विक चर्चा असलेला असा विषय असूनहि भाषांतर सुरस झालें आहे. उदाहरणार्थ पुस्तकाची सुरुवात पहाः—

---

७४ *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1848. p. 195.

"या जगदारण्यांतून जात असतां मी एक्या ठिकाणीं उतरलों, आणि तेथें एक गुहा होती त्या गुहेंत निजलों; ते समयीं मला स्वप्न पडलें, त्या स्वप्नांत पाहतों तों एक चिंध्या पांघरलेला मनुष्य आपल्या घराकडेस पाठ करून उभा आहे त्याच्या हातांत एक पुस्तक आहे, आणि पाठीवर मोठें ओझें आहे. मग तो तें पुस्तक उघडून वाचूं लागला, आणि वाचतां वाचतां रडून कापूं लागला; मग त्यास तो गौहिंवर सांवरेना असें होतांच मोठ्यानें ओरडून म्हणूं लागला कीं "अहाहा आतां मी काय करूं?"

"अशी त्या मनुष्यास अवस्था प्राप्त होऊन तो आपल्या घरीं गेला, आणि तें दुःख आपल्या स्त्रीस व मुलांस कळू नये म्हणून तें तसेंच जिरवून ठेवूं लागला; शेवटीं तें दुःख फार वाढून त्यास उगें राहवेना ते समयीं आपल्या स्त्रीस व मुलांस तें आपलें संकट सांगूं लागला: कीं "अगे जिवलग स्त्रीये, अरे माझ्या पोटच्या मुलांनो, मजवर जें दुःखाचें ओझें पडलें आहे तेणेकरून तर मी फार व्याकूळ झालों आहे. तशांत ह्या आपल्या नगरावर आकाशांतून अग्नि पडून हें जळून जाणार असें मला निश्चित वर्तमान लागलें आहे; त्यांत माझा व तुम्ही जीं माझीं जिवलगें तुमचा अगदी नाश होईल, परंतु जर एकादा आपल्यास मार्ग सांपडला तर मात्र आपलें रक्षण होईल." [७५]

भाषांतराचें काम हरि केशवजींनीं चोखपणानें केल्याबद्दल रे० नेसबिट यांनीं त्यांचा गौरव करतांना म्हटलें आहे:—

"I have had the satifaction of revising sentence by sentence, and often word by word the whole of a Marathi translation of the first and best part of the 'Pilgrim's Progress'. The translation was made by a native more than usually well-acquainted with English, and still more eminent for his proficiency in the knowledge and use of his own language." [७६]

शालोपयोगी नीतिग्रंथ

हरि केशवजी प्रथम हैंदशाळा शाळापुस्तक मंडळींत व नंतर शिक्षामंडळींत इ. स. १८३१ पासून इ. स. १८५१ पर्यंत सतत वीस वर्षें शालेयग्रंथप्रकाशन पोटमंडळाचे सभासद होते. त्या मुदतींत त्यांनीं रचलेल्या शालेय पुस्तकांत 'चेंबर्सकृत शालोपयोगी नीतिग्रंथ याचें महाराष्ट्र भाषांतर' हें सर्वमान्य पुस्तक भाषांतरित केलें. मुलांना समजण्यास सोपें व केवळ

---

७५ हरि केशवजी, **यात्रिकक्रमण**. १८४१. पृ. १.

७६ *Oriental Christian Spectator, Vol.* 13. 1842. p. 180.

नीतीची तात्त्विक चर्चा नसलेलें असें शालोपयोगी पुस्तक तयार करण्याच्या हेतूनें 'Chamber's Moral Class-book' ची निवड करून त्याचें भाषांतर करण्याचें काम हरि केशवजींकडे द्यावयाचें असा शिक्षामंडळीनें ठराव केला.[७७] भाषांतरकारानें अक्षरशः भाषांतर न करतां तारतम्यानें अनावश्यक भाग गाळण्याचें धोरण ठेविल्यामुळें मूळ पुस्तकांतील ख्रिस्तीधर्मविषयक कांहीं भाग व धर्मसंबंधीं गोष्टी भाषांतरांतून वगळलेल्या आढळतात. तसेंच मूळ पुस्तकांतील एका गोष्टीमधील जेम्स व रॉबर्ट हे खंडू आणि महादू तर दुसऱ्या गोष्टींत रॉबर्ट व फ्रँक हे राघू व विसू बनले. प्रादेशिक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीनें तें ठीकच झालें. हरि केशवजी यांच्याकडे भाषांतराचें काम देण्याचें ठरलें तेव्हां त्यांच्या भाषांतरचातुर्याबद्दल शिक्षामंडळीच्या सेक्रेटरीनें काढलेले गौरवोद्गार नमूद करण्यासारखे आहेत. ते लिहितात :—

"I would propose and entrust the translation to Hari Keshavji—whose name stands first on the list and who is already well known as a successful translator."[७८]

तत्कालीन भाषांतरकारांत हरि केशवजींचें नांव अग्रस्थानीं असल्यामुळें त्यांच्याकडे सोंपविलेलें हें भाषांतराचें काम उत्कृष्ट प्रकारें होणारच याची खात्री शिक्षामंडळीला असल्यामुळें, भाषांतर तयार झाल्यावर शिक्षामंडळीनें तें स्वखर्चानें इ. स. १८४६ मध्यें छापिलें. तत्पूर्वी तें तपासण्याचें काम बाळशास्त्री जांभेकरांनीं केलें होतें. तारीख १३ ऑक्टोबर, १८४५ रोजीं या पुस्तकावर लिहिलेल्या टीकालेखांत बाळशास्त्री म्हणतात :—

"This translation appears to me to have been made with ability and judgment. The sense of the original with the axception of poetical lessons and the Bible quotations is given as correectly as possible and in a pure and perspicuous language. I should doubt if any other Native of Bombay besides the author could have executed the work so satisfactorily; and I may add that such a close and fair translation of a work of this kind does not appear to have been as yet attempted with so much success. . . . I am so much impressed with the importance of having good models for translation which, developing the capabilities of the Marathee language, may be calculated to further the advancement of the English classes

७७ *G. D. Vol. 29* 1845. p. 63.
934.
७८ *D. P. I. Circular Book.* 1843. p. 279.

without being too dry and uninteresting for the vernacular readers, that, should my suggestions appear to the Board to possess any value, and should the author feel disposed to adopt them, I shall be happy to assist him by going over the remainder of his work in a similar manner." ७९

बाळशास्त्री जांभेकरांसारख्यांच्या चिकित्सक दृष्टीला हें भाषांतर पसंत पडलें हेंच त्याच्या उत्कृष्टतेचें गमक होय. इ. स. १८६१ पर्यंत या पुस्तकाच्या चार आवृत्त्या निघाल्या; तथापि महादेवशास्त्री पुराणिकांसारख्या एकाद्या शिक्षणतज्ज्ञाचें या पुस्तकाबद्दलच मत तेवढेसें अनुकूल झालें नाहीं. या पुस्तकाबद्दल ते म्हणतात :—

"Though very useful to those who learn English, it is not well-adapted for the tuition of those who learn pure Marathee on account of its style being unidiomatic, inelegant and in some places uninlelligible." ८०

व्यक्तीव्यक्तीप्रमाणें मतें बदलतात. पिंडे पिंडे मतिर्भिन्ना, एवढेंच या बाबतींत म्हणतां येईल.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धांतील इतर बोधपर वाङ्मय

अशाप्रकारें 'मुंबइची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी' तर्फे व खाजगीरीत्या एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत जें शालेय कथावाङ्मय निर्माण झालें त्याचा आढावा थोडक्यांत घेतला आहे. मराठी शाळांचे तपासनीस म्हणून काम करीत असतां मेजर कॅंडीनीं तारीख २७ मे, १८४० रोजीं लिहिलेल्या एका अहवालांत त्याकाळीं सरकारी शाळांमधून चालणाऱ्या पुस्तकांची एक यादी तयार केली होती. ८१ त्या यादीवरून खालील कथावाङ्मय त्यावेळीं शाळांत वाचलें जात असे असें म्हणावयास हरकत नाहीं.

'बालगोष्टी,' 'बाळामित्र,' 'बालोपदेशकथा,' 'बोधवचनें,' 'बोधकथा,' Book of Fables,' 'दुःख जाऊन सुख यावें,' 'इसपनीतिकथा,' 'जनावरांचें वर्णन,' 'लघुहितोपदेश,' 'मनोबोधकथा,' 'नीतिदर्पण,' 'नीतिकथा,' 'Notice about sugar,' 'पंचोपाख्यान,' 'वाटसराची गोष्ट,' 'विद्योपदेश,' ही यादी अपुरी वाटते, कारण दिलेल्या पुस्तकांशिवाय, 'जागती जोत,' 'नवीन

७९ *D. P. I. Board of Education. Miscellaneous.* 1845. p. 446.
८० *D. P. I. Board of Education.* 1854, p. 270.
८१ *G. D. Vol. 530.* 1840. p. 203.

'लघुहितोपदेश,' 'नीतिबोधकथा,' 'सदाचरणाच्या गोष्टी,' 'सिंहासन बत्तीशी,' 'विदुरनीति,' 'वेताळ पंचविशी,' 'यात्रेकऱ्याचा वृत्तांत' इत्यादि पुस्तकें तत्कालीन शाळांमध्यें अभ्यासिलीं जात असत. याशिवाय सरकारी पुस्तकखान्यांत 'अविरोध प्रकाश,' 'फुलें वेचणार मुलाची गोष्ट,' 'घोड्याची विद्या' हीं शालेय पुस्तकें विक्रीसाठीं ठेविलेलीं होतीं.

वरील पुस्तकांपैकीं, 'जनावरांचें वर्णन, 'मनोबोधकथा' विद्योपदेश,' 'दुःख जाऊन सुख यावें,' 'सदाचरणाच्या गोष्टी,' 'अविरोध प्रकाश,' 'घोड्याची विद्या' 'Notice about Sugar,' 'Book of Fables' हीं पुस्तकें पहावयास मिळत नाहींत. यापैकीं 'बालगोष्टी' टौनशेंड नामक व्यक्तीच्या नांवें शाळापुस्तक मंडळीच्या तिसऱ्या वार्षिक अहवालांत नमूद केलेलें आढळतें. [८२] टौनशेंडबद्दल विशेष माहिती मिळत नाहीं, परंतु देवनागरी लिपींत चांगल्याप्रकारें लिहूं शकणाऱ्या युरोपियन लोकांच्या यादींत त्याचें नांव आढळतें. [८३] पाहावयास न मिळालेलीं पुस्तकें शाळांमध्यें वापरलीं जात असत एवढें निश्चित. लहानपणीं शाळेंत वाचलेल्या पुस्तकांबद्दल लिहितांना बाबा पदमनजी लिहितात :—

"वरच्या वर्गांत कांहीं भूगोल, व्याकरण, गणित शिकवीत वाचनाकरितां बालगोष्टी, मनोबोधकथा, इसापनीति, लघुहितोपदेश, सिंहासनबत्तीशि, वेताळपंचवीशी, पंचोपाख्यान, ...बाळमित्र बैठकचावडी, जागती जोत इत्यादि होतीं." [८४]

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत शिक्षामंडळीतर्फे शालेय कथावाङ्मय निर्माण होण्याचें काम कमी झालें. परंतु जें वाङ्मय अद्यापपर्यंत शाळांमधून अभ्यासिलें जात होतें तें तपासून त्यांतील व्याकरणविषयक दोष अगर अयोग्य कल्पना काढून टाकण्याचें शिक्षामंडळीनें ठरविलें. या कामासाठीं मेजर कॅंडी यांची निवड होऊन ते तारीख १८ ऑक्टोबर, १८४७ रोजीं Marathee Translator and Referee म्हणून नेमिले गेले. त्यावेळीं शिक्षामंडळीनें कॅंडीनां दिलेली सूचना अशी होती :—

"You will be kind enough as a general rule to revise carefully every work that may hereafter be reprinted previous to putting a new editon of such work to the press, and that

---

८२ *Third Report of the Bombay Native School-Book and School Society*. 1825-26. pp. 11-12.

८३ *Asiatic Journal, Vol. 10*. 1820. p. 51.

८४ बाबा पदमनजी, **अरुणोदय**. १८८८. पृ. १७.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

you will further be kind enough to give in the Title page the name of the work both in English and Marathi with the addition of 'Revised and prepared for the Press by Major Candy " [८५]

मेजर कँडीकृत बोधपर शालेय वाङ्मय.

शिक्षामंडळीच्या वरील सूचनेप्रमाणें मेजर कँडीनीं आपल्या कामास सुरवात केली. 'इसप नीतिकथा,' 'बाळमित्र' इत्यादि पुस्तकांत यावेळीं केलेल्या व्याकरणविषयक फेरबदलांची चर्चा मागें आलीच आहे. भाषांतराच्याहि कामाला त्यांनीं याचवेळीं हात घातला. प्रथम 'Principles of Morality' या इझडेल यांच्या इंग्रजी पुस्तकाचा त्यांनीं 'नीतिज्ञानाची परिभाषा' (१८४८) या नांवें मराठी तर्जुमा केला. इंग्रजी पुस्तक इ. स. १८४० मध्यें लिहिलें गेलें होतें व त्यावेळेपासून तें इंग्रजी शाळांमधून पाठ्यपुस्तक म्हणून वापरलें जाई. मूळ इंग्रजी पुस्तकाचें वर्णन करतांना इझडेल लिहितोः—

"It has been considered by two or three gentlemen who have perused it to be calculated to exhibit the principles of morality, without having a tendency to impede the progress of truth on one hand or to interfere with religious prejudices on the other." [८६]

अशा पुस्तकाचें भाषांतर व्हावें या इच्छेनें मेजर कँडीनीं भाषांतराचें काम कुणा एका एतद्देशीयाकडे दिलें; तथापि तें भाषांतर त्यांना पसंत पडलें नाहीं व त्यांनीं तें स्वतःच पुन्हां भाषांतरित केलें. [८७] 'सारासार कर्तव्यकर्मांचा विचार,' 'परमेश्वरास लक्षून कर्तव्यकर्में' 'आपणास लक्षून कर्तव्यकर्में' व 'इतर मनुष्यांस लक्षून कर्तव्यकर्में' असे या पुस्तकाचे चार भाग करून त्या त्या विषयावर तात्त्विक चर्चा या पुस्तकांत केलेली आहे. अकस (पृ. २३), तसनस (पृ. ३१), अयब (पृ ३२.), खवंडाळी (पृ. ४८) इत्यादि आज अनोळखी वाटणारे कांहीं शब्द या पुस्तकांत आढळतात इ. स. १८५१ मध्यें या पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघाली.

---

८५ *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1850. p. 127.

८६ *D. P. I. Board of Education.* 1840. p. 448.

८७ *D, P. I. Cicular Book.* 1848. p. 157.

मेजर कँडी व भाषिक सुधारणा

शालेय वाङ्मय शिक्षामंडळीतर्फे तयार होण्याऐवजीं जेव्हां तें खाजगिरीत्या होऊं लागलें, तेव्हांपासून मेजर कँडी यांचें पुस्तक तपासणीचें काम जोरांत सुरू झालें. विद्याखात्याची मदत मिळावी म्हणून पुष्कळ लेखक विद्याखात्याकडे येत, आणि मेजर कँडी यांच्याकडून जर त्या पुस्तकांबद्दल चांगल्या अभिप्राय मिळाला, तर विद्याखातें लेखकांना मदत म्हणून त्यांच्या पुस्तकांच्या कांहीं प्रती विकत घेई. अशाप्रकारें थोडेंबहुत सरकारी साहाय्य मिळालेलीं पुस्तकें स्थूल वाचनासाठीं म्हणून मुलांना वाचावयास दिलीं जात. अशा पुस्तकांच्या याद्या, 'list of Marathi books suited for general reading' या शीर्षकाखालीं 'Bombay Educational Record' नामक शिक्षणविषयक मासिकांत दिल्या जात. हीं पुस्तकें जरी प्रत्यक्ष शालेय शिक्षणक्रमांत अंतर्भूत केलेलीं नव्हतीं तरी सुद्धां या पुस्तकांवर मेजर कँडीनीं लिहिलेले जे अनेक टीकालेख उपलब्ध झाले आहेत त्यांतील कांहीं या ठिकाणीं सहेतुक देण्याचें योजिलें आहे. त्या लेखांवरून मेजर कँडीनीं या सर्व पुस्तकांची किती कसून तपासणी केली होती व त्यांनीं सुचविलेल्या भाषाविषयक व व्याकरणविषयक दुरुस्त्यांमुळें मराठी भाषेच्या घटनेमध्यें कसा बदल घडून आला याची स्पष्ट कल्पना होईल.

सवयी आणि अभ्यास

विश्वनाथ नारायण मंडलिक यांच्या 'सवयी आणि अभ्यास' (१८५७) या पुस्तकावरील मेजर कँडीचा टीकालेख पहावा. हें पुस्तक शालेय अभ्यासक्रमांत अंतर्भूत केलेलें होतें. [८८] या पुस्तकांतील 'सवयी व अभ्यास' या दोन विषयांवरील निबंध लेखकानें प्रथम ज्ञानप्रसारक सभेंत वाचले होते. पुढें 'ही व्याख्यानरूप पत्रें प्रसिद्ध केल्यानें एतद्देशीय लोकांस अभ्यासादिकांचा चांगल्या सवयी लावून लोकशिक्षणास सहायभूत होतील, असें एतद्देशीय लोकसुधारणेचे कांहीं मित्रांस वाटून, त्याणी सांप्रत एवढेच भाग निराळे, अशा अपूर्ण स्थितींत छापण्याविषयीं ग्रंथकर्त्यास अति आग्रह केला,' [८९] म्हणून हे निबंध पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाले. 'अमेरिका खंडांतील डाक्टर जान टाड्ड याणी केलेल्या 'विद्यार्थिमार्गदर्शक' या ग्रंथाचा संक्षेपावरून कांहीं, आणि कांहीं अन्यस्थलीं संपादिलेले ज्ञानाचे सहायाने मराठीमध्यें 'स्वकल्याणाचा उपाय' ह्मणून एक ग्रंथ तयार होत आहे' त्यांतील कांहीं भाग ह्मणजेच हें पुस्तक होय. या पुस्तकाबद्दल मेजर कँडी ३१ डिसेंबर, १८५७ रोजीं लिहितातः—

---

८८ *Report of the Director of Public Instruction, Bombay.* 1858-59. p. 16.

८९ विश्वनाथ नारायण मंडलिक, **सवयी आणि अभ्यास.** १८५७. उपोद्घात.

"I wish very much that I could report favorably of the work **as a Marathi composition** and could say that the author had conveyed his good sentiments in idiomatic language and had made a book likely to be attractive, and therefore beneficial to native youths. But as I have been called to give my opinion of the work, I must state it candidly. I deeply regret that I am under necessity of reporting unfavorably of it **as a Marathi book.**

"The great faults of it are (1) that the idiom is English throughout; (2) that it abounds with high Sanskrit words which are unintelligible to the great majority of native readers which learned words are used where easy ones were available; and (3) that the author has not adopted his illustrations and examples to native ideas, so that his work possesses but little attraction." [९०]

सर्वसाधारणपणें दिसणारे दोष थोडक्यांत सांगून कॅंडी म्हणतात कीं, हा लेखक मराठीपेक्षां इंग्रजी जास्त चांगलें लिहूं शकतो. उदाहरण म्हणून पुस्तकाला जोडलेल्या इंग्रजी उपोद्घाताकडे कॅंडीनीं बोट दाखविलें आहे. या काळांतील बहुतेक विद्वान लोक मातृभाषेपेक्षां इंग्रजी भाषेंत जास्त हुशार असल्याचेंही या ठिकाणीं कॅंडीनीं म्हटलें आहे. नंतर या पुस्तकांतील बारीकसारीक अनेक दोष त्यांनीं दाखवून दिले आहेत. ते असेः—

"The very word which is the title of the first paper (सवय) is unidiomatically used. It is frequently used by itself and in the plural number, but this use is contrary to idiom. सवय means 'addictedness to' and its idiomatic use is in connection with another noun in the possessive case, as खेळण्याची सवय, दारू पिण्याची सवय etc., 'addictedness to play,' 'addictedness to drink' etc. It is not idiomatic to say आमच्या लोकांच्या सवयी बदलल्या पाहिजेत . . . तुमच्या सवयी चांगल्या नाहींत.

"Perhaps the most unidiomatic sentence in the book is ... जर एका मनुष्यास एक वस्त्राचें भांडार दाखविलें आणि सांगितलें कीं यांतून तुला पाहिजे तो पोषाख पसंत कर, तो तुला जन्मभर नेसावा लागेल. There are one or two minor faults in the above (such as पसंत कर being used for

९० *D. P. I. Miscellaneous, Vol.* 27. 1858. p. 67.

'select,' 'choose,' whereas it means 'approve') but there is one which perfectly astonishes me as coming from a Native, which is the phrase पोषाख नेसावा. I do not suppose that even the author ever used this phrase in speaking to any one, or ever heard it used. Natives have different words for different articles of dress, and the verb नेसणें is never used with पोषाख. If a European, who had not attended to the niceities of Marathi idiom, had used this phrase, it would have excited no surprise, but that a Brahman should write तुला पोषाख नेसावा लागेल excites great wonder. Another extraordinary sentence is . . . मनुष्य हा एक सवयींचा जुडगा आहे If this sentence were shown to 100 natives (educated, intelligent men, but ignorant of English) I do not think that half a dozen would make out what was meant. By turning it word for word into English, I see what is meant, viz. 'man is a bundle of habits'....Another pure Anglicism is one that occurs ...त्यांत सत्य पुष्कळ आहे. This is a verbatim translation of ' there is much truth in them,' but it is quite unidiomatical....

" जरी कर्ज फेडण्याविषयी नियामक असणें यांत मोठा सद्‌गुण नाहीं, तरी हेंहि कित्येकांत नसतें. This is unidiomatic and difficult for unlearned natives. Few will understand नियामक which indeed does not seem rightly used here. यांत सद्‌गुण नाहीं is not according to the idiom of Marathi, it should be हा सद्‌गुण नाहीं...

" एका ग्रंथांत म्या एक प्राकृत दृष्टांत पाहिला, तो जरी रूपानें दीन दिसतो तरी चातुर्यानें मोठा आहे etc. This is altogether unidiomatic. Native readers will laugh at a दृष्टांत being termed रूपानें दीन and चातुर्यानें मोठा !...

" मिस्तर ब्रूअर म्हणून एका धर्मोपदेशकाविषयीं etc. Here there is a great violation of grammar. उपदेशक ought to be in the same case with मिस्तर ब्रूअर, whereas the former is inflected, while the latter is in the nominative. The sentence should stand thus : मिस्तर ब्रूअर म्हणून एक धर्मोपदेशक होता त्याजविषयीं etc. This error occurs in one or two other places...

"I deeply regret that it has been my duty to point out blemishes instead of drawing your attention to beauties. If Rao Saheb Wishwanath Narayan wrote in an idiomatic, elegant and simple Marathi style, how much good he might do with his earnest exhortation to his countrymen! I would respectfully remark that his case shows how necessary it is that young men learning English should at the same time **study their own language** and should acquire power to write in it idiomatically." [९१]

या टीकालेखावरून असें दिसून येईल कीं मुलांच्या हातीं जागोरें कोणतेंहि पुस्तक, मग तें रावसाहेब मंडलिकसारख्यानें लिहिलेलें असलें तरी, व्याकरणदृष्ट्या शुद्ध असावें म्हणून मेजर कँडी कशी कडक टीका करीत व आवश्यक त्या सुधारणा सुचवीत.

रामचंद्र भिकाजी गुंजीकरांच्या लेखनपद्धतीवर कँडीची टीका

रामचंद्र भिकाजी गुंजीकर हे तत्कालीन मराठी भाषातज्ज्ञांपैकीं एक होते. मेजर कँडीसारख्या परक्या माणसानें मराठी भाषेच्या लेखनपद्धतींत सुधारणा करण्यास मराठी भाषिकांस भाग पाडावें, ही कल्पनाच गुंजीकरांना असह्य होई. मराठी भाषेंतील कांहीं व्याकरणविषयक मुद्यांवर त्यांनीं मेजर कँडीशीं आपल्या 'विविधज्ञानाविस्तार' मधून कसा वादविवाद केला तें पुढें येईलच. त्या गुंजीकरांच्या 'अभिज्ञान शाकुंतल' (१८७०) नामक नाटकावरील मेजर कँडीची तारीख १६ जून, १८७१ रोजीं लिहिलेली खालील टीका पहावी :—

"The translator calls his book अभिज्ञान शकुंतल नाटक, but the common name (and pundits say the correct name) is अभिज्ञान शाकुंतल नाटक. The translator in one or two places himself uses the name शाकुंतल नाटक.

"The translator's language is in general good, notwithstanding the frequent occurance of such sentences as 'तूं उत्कृष्ट गायन केलेंस', 'असें म्हटलेंत', 'तूं पाणी शिंपायाचें आहेस', 'तूं परत जावेंस', etc. in which prayogs are confused.

"The book is creditable to the translator and is worthy of being placed in libraries and is suitable to be given as a prize." [९२]

---

[९१] *D. P. I. Miscellaneous, Vol.* 27. 1858. pp. 68-72.
[९२] *D. P I. Government, Vol.* 1. 1871-72. p. 158.

शेंकडा पंधरा टक्के कमिशन देऊन वरील पुस्तकाच्या शंभर प्रती विद्यखात्यानें विकत घेतल्या. याच लेखकाच्या 'मोचनगड' (१८७१) नामक कांदबरीबद्दल तारीख ११ ऑक्टोबर, १८७१ रोजीं मेजर कँडी लिहितात :—

"As a literary production, the work is respectable. The author generally uses the common incorrect constructions; but he is not consistent. In one place, he says, 'हिला चोरून नेली', again 'हिला सभेंत ओढून नेली', yet in other places, he says. 'तिला खालीं बसविलें', in another 'तिला आणून ठेविलें. If the latter sentences are right (which is the case) the former is wrong.

"A few cases of wrong punctuation and of wrong-spelting."[९३] या पुस्तकाच्या पंचवीस प्रती विद्याखात्यातर्फे विकत घेतल्या गेल्या.

मेजर कँडी व परशुरामपंत गोडबोले

ज्यांची अशी समजूत असेल कीं, मेजर कँडी आपले पंडित परशुरामपंत गोडबाले यांच्याकडून कोणत्याहि पुस्तकांतील भाषाविषयक दोष प्रथम समजावून घेत व नंतर त्यावर परीक्षण लिहीत, त्यांचा तो गैरसमज तात्यांच्या पुस्तकांवर मेजर कँडीनीं लिहिलेलीं परीक्षणें पाहून दूर होण्यासारखा आहे. मालकीहक्काबद्दल चारशें रुपये देऊन विकत घेतलेल्या परशुरामपंत गोडबोले यांच्या 'मृच्छकटिक' (१८६२) नाटकावरील टीकालेखापैकीं कांहीं भाग असा आहे :—

"The word साम्यता is used to signify equality. The word is grammatically wrong. The proper word is समता or साम्य. Poetical liberty, I think, cannot justify a gross grammatical error. Again the word तुल्यता may be substituted for the wrong word with every advantage....परस्त्रीकडे पाहणें योग्य नाहीं would be better than परस्त्रीचें दर्शन घेणें योग्य नाहीं."[९४]

परशुरामपंत गोडबोले यांच्या 'कादंबरीसार' (१८७२) या पुस्तकाबद्दल कँडीनीं तारीख २२ नोव्हेंबर, १८७० रोजीं लिहिलें:—

"Mr. Parshuram Pant has used very high words, even when he could have used simple words, and he has given in his preface his reason for so doing; but I think it would have been better if in his use of high words he had been more sparing.

---

९३ *D. P. I. Government, Vol.* 1, 1871–72. p. 609.

९४ *D. P. I. Book Depot, Vol.* 18. 1861–62. p. 204.

"This book will show the Native public that there is no necessity for the common confusion of prayogs (or grammatical constructions) in composition."[९५]

आत्माराम विनायक पाटकर यांनीं शेक्स्पिअरच्या 'मर्चंट ऑफ् व्हेनिस्' चें मराठी रूपांतर 'स्त्रीन्यायचातुर्य' (१८७१) या नांवानें केलें आहे. त्या पुस्तकाची तपासणी करून मेजर कँडी तारीख १२ सेप्टेंबर, १८७१ रोजीं लिहितातः—

"There are a good many grammatical errors. Incorrect prayogs abound and Sanskrit words are generally spelt wrongly. पति is written पती, संपत्ति is written संपत्ती. There is one error that runs throughout the book. The word स्नेही is inflected into स्नेहा instead of into स्नेह्या. Now स्नेहा is the inflection of स्नेह, not of स्नेही."[९६]

विद्याखात्यानें वरील पुस्तकाच्या दोनशें प्रती विकत घेतल्या.

कृष्णशास्त्री चिपळुणकरांच्या 'अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' ना विद्याखात्यातर्फे खालील शब्दांत शाबासकी दिली गेली:—

"The book belonging to the present translation period which has obtained most marked success is Mr. Krishnashstri Chiplunkar's translation of the Arabian. Nights. This book, which is written in the best Marathi prose that has yet been produced, is eagerly read by all classes of the people. The character of the stories, and the picture of Eastern life which they contain, render it more easy of comprehension to the native community than any purely European fiction could be."[९७]

मेजर कँडीनीं एकादें पुस्तक नापसंत केल्यास

अशाप्रकारें मुलांच्या हातीं सामान्य वाचनासाठीं म्हणून द्यावयाचीं पुस्तकें विद्याखात्याच्या म्हणजेच पर्यायानें मेजर कँडी यांच्या पसंतीला उतरावीं लागत असत. मराठी भाषेला व्याकरणशुद्ध बनवून तिची लेखनपद्धति निश्चित करण्याची मेजर कँडीची धडपड वर दिलेल्या कांहीं टीकालेखांवरून स्पष्ट होते. त्यांना पसंत न पडलेल्या पुस्तकांची चीरफाड कशी होत असे त्याचे आणखी कांहीं नमुने खालीं दिले आहेत.

---

९५ *D. P. I. Book Depot, Vol.* 25. 1870–71. pp. 75–76.

९६ *D. P. I. Government. Vol. 1.* 1871–72. p. 510.

९७ *Report of The Director of Public Instruction, Bombay* 1865–66. p. 28.

विनायक शास्त्री नातु यांच्या 'भिल्लिणी' (१८६५) या नाटकावर तारीख ३० जून, १८६४ रोजीं कँडीनीं लिहिलेल्या टीकालेखाचा कांहीं भाग असा आहेः-

" देवाधिदेव is written देवाधीदेव, गणपति–गणपती, ध्यानस्थ – ध्यानस्त, तटस्थ – तटस्त, प्रावरण – प्रावर्ण, ऋषिवर्य – ऋषीवर्य, अंतःकरण – अंतःकर्ण, गृह – ग्रह, उदित – उदीत, धर्मनिष्ठ – धर्मनिट्ट etc.

" ते सारे फडशा होतील—The word फडशा is a noun, not an adjective. The correct construction is त्या साऱ्यांचा फडशा होईल....

" सरस्वती प्रसन्न होत्साता—The last word should be होत्साती.... Some examples of indelicate words and phrases used from the mouth of Parwati:

" रति सुखशयनीं अनुभव घ्यावा...
युवति सुरतीमान विमर्दन...
रतिसुखाकरितां परपुरुषाशीं...

वा, काय सांगावें या संसारांत विषयभोगासारखें सुखकर या देहास दुसरें कांहीं नाहीं.

"हे मत्सुरतानंद प्रियकरा शंकरा.....etc.

"I cannot say that I think this a desirable acquisition to Marathi literature." [१८]

मेजर कँडीनीं इतक्या कडक शब्दांत टीका केल्यावर विद्याखात्यातफें लेखकास मदत मिळणें शक्यच नव्हतें. अशीच टीका सूर्याजी सदाशिव महात्मे यांच्या 'युरोपाकाकूच्या शाळेंतील मारामारी' (१८७१) नामक पुस्तकावर केलेली आढळते. या पुस्तकाबद्दल ता. ३१ ऑगस्ट, १८७१ च्या टीका लेखांत मेजर कँडी लिहितातः—

"The translator often spells Sanskrit words wrongly and often makes use of ungrammatical prayogs. e. g. स्थिति is written स्थिती, प्राप्ति—प्राप्ती, शक्ति—शक्ती, युक्ति—युक्ती, बुद्धि—बुद्धी, सेनापति--सेनापती etc.

"of worng prayogs the following are examples...

"नेपोल्यन बादशहास प्रशियाच्या राज्यानें बंदिवान करून आपल्या राज्यांत पाठवून दिला. As बादशह is inflected (बादशहास), the prayog is Bhawi and therefore the verb should be neuter पाठवून दिलें, not पाठवून दिला. ...

---

[१८] *D. P. I. Miscellaneous, Vol. 22.* 1864-65. pp. 263-65.

त्याचा त्वां वाईट रीतीनें उपयोग केलास. This is a strange prayog. त्वां is in the instrumental case and therefore the verb should be केला, as a karmani prayog." ९९

हें पुस्तक विद्याखात्याच्या मदतीस अपात्र ठरलें. यानंतर नारायण केशव प्रभु यांच्या 'बखत्यारनामा' (१८५५) या कथासंग्रहाची भाषिक तपासणी करून कांहीं दोष दाखविले गेले ते असेः—

"यथामतीनें is a vulgar error. यथामति is sufficient...
वजीरकन्या This compound of Arabic and Sanscrit is unauthorized and inelegant.
त्या तरुण स्त्रियेचे मोह उत्पन्न करणारे असें जें सौंदर्य. In this sentence स्त्रियेचे and करणारे should be स्त्रियेचें and करणारें...
पाठऊन is wrong. the verb is not पाठणें but पाठवणें It should be पाठवून...
दोन तीन महिनें. The last word should be महिने.
थोडक्या वेळांमध्यें. The last word should be वेळेमध्यें.
वांचिव should be वांचीव. ..." १००

अशा पुस्तकास विद्याखात्याची मदत मिळणें अशक्य होतें, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

अशाप्रकारें शाळांमधून पुरवणी वाचनादाखल मुलांना देतां येण्यासारखीं अगर बक्षिसें म्हणून वाटतां येण्यासारखीं अनेक पुस्तकें तपासून त्यावर लिहिलेले पुष्कळ टीकालेख सरकारी दप्तरांत उपलब्ध आहेत. त्यांतील कांहीं याठिकाणीं दिले आहेत. ते देण्याचा हेतु एवढाच आहे कीं मुलांच्या हातीं पडणारीं पुस्तकें व्याकरणशुद्ध असावीं म्हणून विद्याखात्यानें केलेल्या प्रयत्नांची कल्पना वाचकाला यावी. या प्रयत्नांमुळें मराठी भाषेच्या लेखनपद्धतीला एकसूत्रीपणा आला. मेजर कँडीनीं सुचविलेल्या बहुतेक दुरुस्त्या आज प्रघातांत आलेल्या दिसतात. एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत जें शालेय कथावाङ्मय तयार झालें त्यांत मुलांना नीतिपाठ देण्याचाच प्रधान हेतु होता; परंतु उत्तरार्धांत त्याची भाषिक तपासणी झाली व 'Revised and prepared for the press by Major Candy' अशा शिक्क्यानिशीं त्यांतील बराचसा भाग मुलांच्या समोर आला. त्याचप्रमाणें जें नवीन वाङ्मय तयार झालें त्यावर प्रथमपासून

---

९९ *D. P. I. Government, Vol. 1.* 1871–72. p. 468.
१०० *D. P. I. Miscellaneous, Vol.* 19. 1855. pp. 330–332.

नियंत्रण ठेवून तें व्याकरणदृष्ट्या शुद्ध केलें गेलें. गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत तयार झालेल्या वाङ्मयांत नीतिपाठ देण्याचें धोरण विद्याखात्यानें सोडून दिलें असें नव्हे; तर प्रारंभीं मुलांना नीतिपाठ देण्याची गरज पुढें तितकीशी उरली नाहीं, अगर केवळ पुस्तकांतून नीतीचे धडे देण्याचा कांहीं उपयोग नाहीं असेंहि कांहीं विचारवंतांना वाटूं लागलें. डॉ. भांडारकर यांनीं झेविअर कॉलेजच्या वार्षिक समारंभाच्यावेळीं केलेल्या भाषणांत यासंबंधीं उद्गार काढले होते कीं,

"Man's morality depends upon the habits that he acquires, and his habits cannot be formed simply by reading moral lessons out of a text-book." १०४

डॉ. भांडारकर यांचें वरील मत पुष्कळ अंशीं खरें आहे.

---

१०४ *Bombay Eduactional Record. Vol. 30. January*, 1894.

प्रकरण दहावें

मराठी क्रमिक पुस्तकें

क्रमिक पुस्तक समिति

"What little boys want to learn in the way of composition is a habit of uniformity. As they must be habituated in their hand-writing to always make the same letter in the same way, so in their prose composition they must be accustomed to always use the same word in the same government."[1]

मराठी वाचन पुस्तकांबद्दलचे वरील विचार 'एल्फिन्स्टन स्कूल पेपर' नामक विद्याखात्यातर्फे चालणाऱ्या मासिकांत एका पत्रलेखकानें जरी व्यक्त केले आहेत, तरी मराठी क्रमिक पुस्तकें रचण्याच्या मागें रचनाकारांचा हे हाच हेतु होता. 'मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी' स्थापन झाल्यापासून मुलांच्या हातीं शाळांमधून जीं पुस्तकें दिलीं जात असत त्यांच्या रचनेमागें कांहीं पद्धति नव्हती. तसेंच त्यांच्या भाषे-संबंधीं कांहीं विशेष नियम घालून दिलेले नव्हते; परंतु इ. स. १८५६ मध्यें हॉवर्ड हा विद्याखात्याचा मुख्याधिकारी झाल्यावर त्यानें शालेय क्रमिक पुस्तकें तयार करण्यासाठीं एक समिति नेमिली. या समितीचा उल्लेख मागें आलेलाच आहे. तींत मेजर कॅंडी, डॉ. विल्सन, रे० ग्लासगो, जॉन हार्कनेस, रे० मिचेल, रे० आइटकीन, होप, बेकर, पीट, लेस्टर ही युरोपियन मंडळी व भास्कर दामोदर पाळंदे, गोविंद नारायण माडगांवकर, विनायक वासुदेव कीर्तिकर, विश्वनाथ नारायण मंडलिक व दादोबा पांडुरंग तर्खडकर हे एत-द्देशीय सभासद होते. या समितीनें मराठी क्रमिक पुस्तकें तयार करावयाचीं होतीं. जरी समिति नेमिली गेली, तरी प्रत्यक्ष काम करणारी एकादी दुसरीच व्यक्ति असते. या समितीचें काम कसें चालत असे त्याचा मजेशीर वृत्तांत समितीचे एक सभासद विश्वनाथ नारायण तारीख १० मार्च, १८५७ च्या आपल्या रोजनिशींत असा देतातः—

"क्लासबुक कमिटीची सभा डायरेक्टरच्या बंगल्यावर भरली होती. डॉक्टर वुइलसन, डॉक्टर हार्कनेस, मि. ग्लॅस्गो, मि. हॉवर्ड, रा. गोविंद नारायणजी, रा. भास्कर दामोदर व मी हजर होतों. पोकळ गप्पांचा सुकाळ होता. शहाणपणाचीं मतें प्रतिपादनार्थ निघालीं होतीं. परंतु हातांत लेखणी घेऊन दौतींत बुडविली तेव्हां कागदावर लिहीण्यासारखें फार नाहीं असें आढळलें." [2]

---

१ *Elphinstone School Paper. Vol* 3. 1862. p. 327.

२ गणेश रामकृष्ण हवालदार, **रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें चरित्र, भाग १ ला.** १९२७. पृ. ७१.

क्रमिक पुस्तकें तयार करण्यासाठीं समिति नेमिली गेली, पण मे. कँडी यांच्या हातूनच तें काम व्हावयाचें होतें. मे. कँडी मे, १८५६ ते सेप्टेंबर, १८५७ पर्यंत रजेवर युरोपला गेल्यामुळें पुस्तकांची सुरुवात करण्याचें काम भास्कर दामोदर पाळंदे यांच्याकडे आलें. कँडीच्या गैरहजेरींत पाळंदे यांची मराठी ट्रॅन्स्लेटर म्हणून नेमणूक झाल्यामुळें त्यांना हें काम सुरू करावें लागलें. कँडीच्या ऐवजीं त्यांची नेमणूक करतांना डी. पी. आय. हॉवर्ड त्यांच्याबद्दल म्हणतो :—

"I am very hopeful that Rao saheb Bhaskar Damodar will fill the office of translator with distinction and usefulness. His abilities, industry and attainments are unquestionable and I trust he may, in this way, establish claims to still higher promotion in the return of Major Candy, whose absence however is, I fear, likely to be protracted and the loss of whose aid and experience as a Translator at this time cannot but be very severely felt in many ways and will not be easily compensated." ३

लहान मुलांकरितां पहिलें पुस्तक

मेजर कँडीच्या गैरहजिरींत क्रमिक पुस्तकें तयार करण्याचें काम पाळंदे यांच्याकडे ओघानेंच आलें. तीं कशीं तयार करावयाचीं याबद्दल कँडींचा आराखडा तयार झालेलाच होता. त्यावरहुकूम पाळंदे यांनीं कामाला सुरुवात केली. 'लहान मुलांकरितां पहिलें पुस्तक' इ. स. १८५८ मध्यें दोन भागांत प्रसिद्ध झालें. हीं पुस्तकें तयार झाल्यावर प्रथम तपासणीसाठीं समितीचे सभासद गोविंद नारायण व दादोबा पांडुरंग यांच्याकडे आलीं. या दोघांनीं वरील पुस्तकांवर लिहिलेले टीकालेख सरकारी दप्तरखान्यांत उपलब्ध आहेत. ते पाहिल्यावर क्रमिक वाचन पुस्तकांबद्दल समितीच्या एतद्देशीय सभासदांची दृष्टि कशी होती याची कल्पना येते. गोविंद नारायण तारीख १५ मार्च, १५५८ रोजीं लिहिलेल्या आपल्या टीकालेखांत म्हणतातः—

"I am sorry, however, that I cannot approve of the high Sanskrit and foreign words, which are introduced in the Primer. In my opinion, the First Reading Book for children should contain neither difficult Sanskrit words nor foreign idioms, but plain simple current words and idiomatic sentences that a child of three or four years may comprehend and repeat

३ *D. P, I. Poona College. Vol. 18.* 1856. p. 319.

them without any mental effort. In the very second page of the Primer, immediately after the alphabet, a list of words is given in which several uncommon and foreign terms are introduced such as झष, इभ, पक्ष, ईश, यश, ऋण, तह, छळ, अज etc." ४

तसेंच एका ठिकाणीं 'लाल पाखरूं' असा शब्दप्रयोग केलेला आहे, त्यांतील 'लाल' शब्द फारशी असून मेजर कँडीना तो रुचणार नाहीं असें गोविंद नारायण यांचें मत पडलें. त्याच प्रमाणें 'सूर्याचें ऊन रोज आमच्या आंगण्यांत येतें,' या इंग्रजी धाटणीच्या वाक्यावर त्यांचा कटाक्ष होता. 'सूर्याचें ऊन' म्हणण्याऐवजीं 'ऊन' एवढाच शब्द पुरे आहे. 'रोज' हा शब्द फारशी असल्यामुळें त्याऐवजीं 'दिवस' असा शब्द वापरावा. गोविंद नारायण यांच्या या सर्व टीकेवरून असें दिसतें कीं फारशी शब्द अगर इंग्रजी धर्तीचे वाक्प्रयोग या पुस्तकांत नसावे असें त्यांना वाटे. विद्याखात्याचा प्रमुख हॉवर्ड यानें हीं पुस्तकें सभासदांकडे तपासणीसाठी पाठविलीं तेव्हां त्यानें कांहीं सूचना दिलेल्या होत्या. मराठी भाषेची लेखनपद्धति निश्चित व्हावी असें त्याचें मत होतें. या बाबतींत हॉवर्ड लिहितोः—

"I consider the establishment of the rules of orthography on some sound principle to be of first importance in a language which is intended to be the vehicle of communicating knowledge by means of books written in it to a community as the Marathi is in this country, the want of which leads every writer to choose his own orthography, as is the case observable at present with every Marathi writer." ५

मराठी भाषेला योग्य वळण लावून भाषेची लेखनपद्धति निश्चित व्हावी या दृष्टीनें हीं पुस्तकें रचण्याचें सरकारी धोरण हॉवर्डच्या वरील आदेशावरून स्पष्ट दिसतें. गोविंद नारायण यांच्या प्रमाणें दादोबा पांडुरंगानींहि 'लहान मुलांकरितां पहिलें पुस्तक' तपासून त्यांतील पुष्कळ दोष दाखविले. 'मूळाक्षरें' हा सामासिक शब्द न वापरतां 'मूळ अक्षरें' असे दोन शब्द लिहावे, 'इभ,' 'झष' यांसारखे संस्कृत शब्द टाळावे, 'ओरडते,' 'खेळते' अशा क्रियापदांऐवजी 'ओरडत्ये,' 'खेळत्ये' अशीं यकारयुक्त क्रियापदें वापरावीं, 'धरतो,' 'मारतो' बद्दल 'धरितो,' 'मारितो' असें लिहावें इत्यादि सूचना दादोबांनीं केल्या. या सर्वांपेक्षां विशेष महत्त्वाची सूचना

---

४ *D. P. I. Government. Vol.* 28. 1858. p. 10.

५ *Ibid.* p. 11.

म्हणजे 'वर,' 'खालीं' इत्यादि शब्दयोगी अव्ययें नामाला जोडून न लिहितां तीं सुटीं लिहावीं, उदाहरणार्थ 'झाडाखालीं,' 'घरावर' असें न लिहितां 'झाडा खालीं' 'घरा वर' असें लिहावें ही होती. [६]

बाळाजी पांडुरंग भालेराव यांची टीका तर फारच कडक होती. हॉवर्डला लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतातः—

"I should be wanting in candour if I did not enter my protest against the use of ह्य for य which infects the whole of this book.

"Allow me, sir, to take this opportunity to bring to your notice, in connection with the above, this practice of writing which Majar Candy has succeeded in introducing in all the books with which he had anything to do. That it has been mischievous cannot be doubted from the murmer that is unanimously raised by all the best judges of the language. It is not only contrary ro all respectable usage, but it is opposed to that principle of grammar which discards the use of words which are hard of utterance and harsh to the ear." [७]

वरीलपैकीं बहुतेक सूचना अमलांत आल्या नाहींत, कारण कँडीना त्या मान्य-नव्हत्या. ज्यावेळीं या सूचना कँडीच्या हातीं आल्या व या पुस्तकाची दुसरी आवृत्ति छापावयाची वेळ आली तेव्हां कँडीनीं डी. पी. आय. हॉवर्ड याला पत्र लिहून कळविलें कीं सभासदांनीं केलेल्या कांहीं सूचना आपणास मान्य नसूनहि आपण त्यांचा स्वीकार करूं; परंतु कांहीं मात्र आपणास मुळींच पसंत नाहींत. या बाबतींत कँडी लिहितात :—

"I do not suppose that it is your wish that I should adopt the suggestions of any member of the Class-Book Committee except I see them to be correct. I am very desirous to consider every suggestion in a spirit of candour, but I must finally be guided by my own convictions.

"I have looked over the observations of Messrs. Govind Narayan and Dadoba Pandurang, and am prepared to adopt a few of these suggestions; but from most of them I am compelled to dissent.

"Mr. Dadoba Pandurang has sent seven full scape pages of what he terms 'errata', in which he has thus stigmatized many perfectly current words and forms. I con-

[६] *D. P. I. Government. Vol.* 28. 1858. p. 12-13.
[७] *D. P. I. Miscellaneous. Vol.* 20. 1857. p. 157.

sider this proceedure to be reprehensible...I have thankfully adopted such of all the alterations proposed by Messrs. Govind Narayan and Dadoba Pandurang as seemed to me to be improvements; and to show my readiness to meet the wishes of others. I have adopted a few more of their alterations though I consider the original phrases or clauses to be idiomatic and right. But the great majority of the alterations they propose I feel compelled to reject." [८]

कँडींच्या या पत्रावरून असें म्हणावयास हरकत नाहीं कीं ते व दादोबा अगर गोविंद नारायण यांच्यामध्यें मराठी भाषेची लेखनपद्धति, वाक्प्रचार व वाक्यरचना या बाबतींत बरीच झटापट झाली; सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं, या नियमाप्रमाणें दादोबांच्या बहुतेक सूचना फेटाळल्या गेल्या. एकादी सूचना अमलांत आली. उदाहरणार्थ 'मुलांकरितां दुसरें पुस्तक' या पुस्तकाच्या इ. स. १८५८ च्या आवृत्तींतील 'करतात,' 'धरतात' इत्यादि क्रियापदें इ. स. १८६० च्या आवृत्तीमध्यें 'करितात,' 'धरितात,' अशीं इकारयुक्त झालीं. एकंदरींत कँडीना हीं पुस्तकें तयार करण्याच्या बाबतींत दुसऱ्या कोणी मार्गदर्शन केलेलें आवडलें नाहीं. डी. पी. आय. हॉवर्ड यानें चौथ्या पुस्तकांत प्रत्येक धड्याच्या सुरुवातीला त्या धड्यांत आलेल्या शब्दांचीं मूळ संस्कृत रूपें द्यावीं अशी सूचना कँडीना दिली होती. त्यावर कँडीनीं दिलेलें उत्तर नमूद करण्यासारखें आहे. ते म्हणतातः—

"You direct that the lessons of the fourth book should have Sanskrit roots (the most usually found) at the head of each. Though it is an acknowledgment of my dulness, I must confess that I am not quite sure that I have apprehended your meaning; and I beg the favor of a little further explication of your wishes. You do not of course mean that any of the words that are technically called 'Sanskrit roots' such as भू, क्रिअ, गम्ल् etc. should be placed at the head of the lessons, as they would only perplex the reader. Neither can you desire that radical forms of a word(as धातुवादिन् धातुवैरिन्, धातृ etc. the radical or uninflected forms of धातुवादी, धातुवैरी, धाता. etc.) should be given, for this would be equally perplexing and without benefit. Sanskrit words are largely introduced into Marathi without any change at all (for in many cases the radical form is taken as पुण्य, not पुण्यं सुख, not सुखं etc.) and when there is a change it is very slight. So that there is not the same call for giving

---

८ *D. P. I. Book Depot, Vol. 22.* 1859. pp. 176–177.

Sanskrit originals as Marathi representatives that there is for giving Latin and Greek originals of English representations." [९]

थोडक्यांत हीं पुस्तकें तयार करतांना इतरांच्या सूचना व मार्गदर्शन कँडीना मुळींच मान्य नव्हतें. एकाद्यानें मार्गदर्शन करावयाचें व आपण त्याप्रमाणें वागावयाचें ही कल्पनाच त्यांना पसंत नव्हती. मराठी भाषेचा अभ्यास आपण अनेक वर्षें केलेला असल्यामुळें, ती भाषा परकी असली तरीहि तींतील बारकावे आपणास अवगत आहेत या भूमिकेवरून ते वावरत असल्यामुळें हॉवर्ड सारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यानें केलेल्या सूचना ते अमलांत आणीत नसत. एकदां हॉवर्डनें असें सुचविलें कीं मराठी भाषेचें व्याकरण मुलांस शिकवावयाचें आहे ही गोष्ट ध्यानांत ठेवून धड्यांची रचना करावी. या बाबतींत आर्नोल्ड यानें तयार केलेल्या इंग्रजी वाचन पुस्तकांचा आदर्श कँडीनीं समोर ठेवावा. या सर्व सूचनांचा सारांश असा होता:—

"The main purpose of the reading books is to teach a boy the intelligent use of his own language and the matter must be subordinated to that end." [१०]

हॉवर्डनें घातलेल्या या बंधनांचें पालन कँडीसारख्या स्वतंत्र बुद्धीच्या माणसाकडून होणें अशक्य होतें. म्हणूनच त्यांनीं अशा सूचनांबद्दल आपली नापसंती खालील शब्दांत व्यक्त केली.

"I feel that it is a difficult thing for one person to make books on the plan and under the direction of another; and that success is more doubtful than when the plan and the execution belong to one and the same person. But I will do my best." [११]

मेजर कँडीनीं हीं वाचन पुस्तकें रचण्यांत खरोखरच आपल्या प्रयत्नांची पराकाष्टा केली. तसें पाहिलें तर अशीं पुस्तकें तयार करण्याची कल्पना त्यांच्या मनांत बरेच दिवस घोळत होती. इ. स. १८४७ मध्यें मराठी ट्रॅन्स्लेटर म्हणून त्यांची नेमणूक झाल्यापासून हीं पुस्तकें तयार करावयाचें त्यांच्या मनांत होतें; परंतु प्रत्यक्षांत ती कल्पना उतरण्यास दहा वर्षें लागलीं. कँडीचें नांव 'लहान मुलांकरितां पहिलें पुस्तक' सोडून बाकी क्रमिक पुस्तकांवर असलें तरी या पुस्तकांबद्दलचा सरकारी दप्तरखान्यांतील पत्रव्यवहार पाहिला कीं एक गोष्ट स्पष्ट होते. ती ही कीं अनेकांकडून धडे लिहून घेऊन, मेजर कँडीनीं ते व्याकरणदृष्ट्या तपासून पाहिले व नंतर क्रमशः ते कोणत्या पुस्तकांत घालावयाचे तें ठरविलें.

उदाहरणार्थ मुलांकरितां चौथें पुस्तक तयार करतांना चाळीस धडे स्वतः कँडीनीं लिहिलेले असून उरलेले अन्य लेखकांचे आहेत. [१२] तसेंच सरकारी दप्तरांत

---

९ *D. P. I. Government, Vol.* 28. 1858. pp. 27–28.
१० *D. P. I. Translation Department, Vol.* 22. 1857. pp. 77–78.
११ *D. P. I. Government, Vol.* 28. 1858. p. 30.
१२ *D. P. I. Government, Vol* 27. 1859. (*No paging.*)

दुसऱ्या एका ठिकाणीं [१३] तिसऱ्या व चौथ्या पुस्तकांसाठीं एकशें सत्तावीस धड्यांची यादी दिली असून तींत कँडीचे फक्त एकतीस धडे आणि बाकीचे परशुरामपंत गोडबोले, गोविंद नारायण माडगांवकर, हरि केशवजी, बाबा पदमनजी इत्यादिकांचे आहेत. इतरांनीं लिहिलेल्या धड्यांची तपासणी आपण कशी करतों त्याचा तपशील देऊन मे. कँडी लिहितात :—

"I admit no prose Pieces into the Marathi series without revision by myself. And my revision is not a cursory reading, but a careful examination of the piece with respect to matter and style, and a comparison of the translation with original, if the piece be a translation. My corrections in some of the pieces revised by me are numerous."[१४]

वाचन पुस्तकांमध्यें गद्याप्रमाणें पद्याचेहि कांहीं धडे असावे असें प्रथमच ठरलें होतें. पद्य निवडण्याचें काम प्रत्यक्ष कँडीनीं कधींच केलें नाहीं. काव्यरचनेची आपणांस आवड नाहीं, काव्यशास्त्राची आपणांस माहिती नाहीं हें त्यांना ठाऊक असल्यामुळें काव्याचा प्रश्न आला कीं तो सोडविण्याचें काम परशुरामपंत गोडबोले यांच्याकडे जाई. उदाहरणार्थ एकदां विनायक यशवंत बेरडे यांचा 'पद्यात्मक लघु-हितोपदेश' कँडीकडे अभिप्रायार्थ आला असतां त्यांनीं तो परशुरामपंतांकडून तपासून घेतला व ता. ९ ऑगस्ट, १८५८ रोजीं त्यांनीं लिहिलें :—

"As I am not at home in Marathi prosody, I requested Pandit Parashuram Pant Godbole to look over the work and commit his observations on it to paper. He has gone very carefully over the book and has both pointed out mistakes and suggested observations.

"I concur in his remarks, most of which I think eminently judicious. In one or two instances only, it struck me that they approached to hyper-criticism." [१५]

परशुरामपंतांच्या काव्यरचनेबद्दल कँडीना इतकी खात्री होती कीं, त्यांच्या-बद्दल ते म्हणतात:—

"The original matter furnished by my Pandit, Parashuram pant, I consider to be very valuable, especially his larger pieces and his poetry. He writes very idiomatic Marathi and his poetry is generally admired." [१६]

---

१३ *D. P. I. Government, Vol. 28. 1858.* pp. 31–36.
१४ *Report of the Director of Public Instruction, Bombay. Appendix J. 1859–60.* pp. 50–51.
१५ *D. P. I. Miscellaneous, Vol. 27. 1858.* p. 245.
१६ *D. P. I. Government, Vol. 28. 1858.* p. 26.

अशाप्रकारें, इ. स. १८५७ ते १८६१ या काळांत मराठी क्रमिक पुस्तकें रचलीं गेलीं. या त्यांच्या कामाबद्दल 'बालबोध' कार लिहितातः—

"ह्या कामाचीं सगळीं सूत्रें मेझर क्यांडी साहेबांनीं आपल्या हातीं ठेविलीं होतीं. इंग्रजी भाषेंतलीं अनेक प्रकारचीं क्रमिक पुस्तकें जमविलीं होतीं. त्यांतल्या धड्यांची निवड क्यांडी साहेबांनीं करावयाची. त्यांचीं मराठी भाषांतरें मंडळीनें करावयाचीं. तीं साद्यंत त्यांनीं तपासावयाचीं. त्यांतल्या भाषापद्धतीविषयीं आणि परिज्ञानाविषयीं शंकासमाधानें व्हावयाचीं आणि मग तीं छापावयाचीं. असा क्रम असे ...त्या मंडळीच्या सांगण्यांत येत असे कीं, हीं मराठी क्रमिक पुस्तकें इंग्रजींतल्या क्रमिक पुस्तकांच्या नमुन्यावर तयार व्हावीं, अशी त्या साहेबांची फार इच्छा असे. त्यांनीं कधीं एकही वाक्य चालढकलीवर नेलें नाहीं. शब्दशुद्धीवर आणि अर्थस्पष्टतेवर त्यांचा फार कटाक्ष असे." [१७]

मुंबई इलाख्यांतील सर्व मराठी शाळांमधून हीं क्रमिक पुस्तकें विद्याखात्यातर्फे नेमिलेलीं असल्यामुळें त्यांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. पहिल्या पुस्तकाची इ. स. १९०१ मध्यें एकोणिसावी, दुसऱ्या पुस्तकाची इ. स. १९०२ मध्यें अठरावी, तिसऱ्या पुस्तकाची इ. स. १९०३ मध्यें पंधरावी, चौथ्या पुस्तकाची इ. स. १९०४ मध्यें सोळावी, पांचव्या पुस्तकाची इ. स. १८९९ मध्यें पंधरावी, सहाव्या पुस्तकाची इ. स. १८९६ मध्यें नववी अशा आवृत्त्या साधारणपणें गेल्या शतकाच्या शेवटापर्यंत निघाल्या. या शतकांतसुद्धां कांहीं आवृत्त्या निघाल्या.

या पुस्तकांच्या तपासणीवरून त्यांत आढळणारीं तत्कालीन भाषिक वैशिष्ट्यें अजमावणें मनोरंजक होईल.

लहान मुलांकरितां पहिलें पुस्तक

पहिल्या पुस्तकांतील 'माझा बाप घरीं नाहीं,'(पृ. १९), 'माझा गडवा पितळाचा आहे,' (पृ. २२) 'दुसऱ्याची वस्त आपण कशी घ्यावी,' (पृ. २६) 'आमच्या आंगण्यांत नित्य ऊन येतें' (पृ. १९) इत्यादि कांहीं वाक्यें शब्दप्रयोगाच्या दृष्टीनें नजरेंत भरतात. प्रारंभींच्या वाचन पुस्तकांतील काव्याची कल्पना येण्यासाठीं पहिल्या पुस्तकांतील छोटासा अभंग पहाः—

"अंधेर तो गेला ॥ उजेड हा आला ॥
प्रातःकाळ झाला ॥ जागे व्हा हो ॥ १ ॥
मावळल्या तारा ॥ येतो गार वारा ॥
सुस्ती झोंप सारा ॥ जागे व्हा हो ॥ २ ॥

---

[१७] **बालबोध**, पु. ३०, १९११. पृ. २४४.

आनंद देण्याला ॥ सर्व हि विश्वाला ॥
सूर्योदय झाला ॥ पाहा या हो ॥ ३ ॥
स्मरून देवाला ॥ लागा उद्योगाला ॥
आळसाचा घाला ॥ संभाळा हो ॥ ४ ॥ " [१८]

किंवा ' लहान मुलांकरितां पहिलें पुस्तक भाग दुसरा ' मधील एक नमुना पहाः-

" प्रातःकाळीं थंड गारसा वारा झुळझुळ येतो ॥
सर्वांला तो हुशार करितो सुखशांतीही देतो ॥ १ ॥
जीव वनस्पति ह्यांस निरंतर तो आहे आधार ॥
सुखदाता जो देव दयाळू त्याचा हा उपकार ॥ २ ॥ " [१९]

अगर

थोर समर्थ दयाळू देवचि देतो प्रकाश सूर्याला ॥
रात्रीं आकाशाला भूषण जो होय त्याहि चंद्राला ॥ १ ॥
नित्य झळकतात अशा रमणीय सकल लहान तारांला ॥
देवानेंच कृपेनें रूप दिलें आणिलेंहि उदयाला ॥ २ ॥ " [२०]

खास लहान मुलांसाठीं तयार केलेल्या या निसर्गवर्णनपर व ईशस्तुतिपर छोट्या छोट्या कविता तत्कालीन शालेय काव्याची कल्पना येण्यासाठींच येथें मुद्दाम उतरून घेतल्या आहेत. काळाच्या उदरांत गडप झालेल्या या कवितांचें पुनर्दर्शन घडविण्यासाठीं त्या येथें दिल्या आहेत.

लहान मुलांकरितां दुसरें पुस्तक

मे. कँडीच्या देखरेखीखालीं तयार झालेलें ' लहान मुलांकरितां दुसरें पुस्तक ' प्रथम इ. स. १८५८ मध्यें छापिलें गेलें. त्यांत कँडीची ' शिक्षकांस सूचना ' आहे ती अशीः—

" शिक्षकानें मुलांच्या उच्चाराकडे व शुद्ध वाचण्याकडे फार लक्ष्य द्यावें. मुलांनीं वाचतांना घाई करूं नये, व अडखळत वाचूं नये, ह्याविषयीं शिक्षकानें जपावें.

मुलांनीं धडा वाचला म्हणजे त्यांतील शब्दांचा अर्थ मुलांस विचारावा, व ज्या शब्दांचा अर्थ मुलांस ठाऊक नसेल त्यांचा अर्थ त्यांस समजावून द्यावा.

किती एक धड्यांच्यावर नामें, सर्वनामें, विभक्ति लावून लिहिलीं आहेत, व किती एक क्रियापदांचीं रूपें तिन्ही काळचीं लिहिलीं आहेत. ह्याचा मुख्य हेतु असा कीं

---

१८ भास्कर दामोदर पाळंदे, **लहान मुलांकरितां पहिलें पुस्तक, भाग पहिला**, आ. २. १८६०. पृ. ३१.

१९ भास्कर दामोदर पाळंदे, **लहान मुलांकरितां पहिलें पुस्तक, भाग दुसरा**, आ. २. १८६०. पृ.३२.

२० तत्रैव. पृ. २६.

"व्याकरणांत जे पारिभाषिक शब्द नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, भूतकाळ वर्तमानकाळ, भविष्यकाळ, इत्यादि आहेत, त्यांचा उच्चार केल्यावांचून मुलांस व्याकरणाविषयासंबंधीं थोडी बहुत माहितगारी व्हावी; म्हणून ते वर लिहिलेले शब्द मुलांकडून पाठ करवून पारिभाषिक शब्द न उच्चारतां त्यां सारखीं दुसरीं रूपें शिक्षकानें मुलांकडून करवावीं." [२१]

ही सूचना पाहिल्यावर याकाळीं पुस्तकांतील विषयापेक्षां भाषेचा व्याकरणदृष्ट्या जास्तींत जास्त अभ्यास मुलांकडून व्हावा हाच हेतु या क्रमिक पुस्तकांच्या रचनेमागें असल्याचें स्पष्ट दिसतें.

आहो–अहो, आलिकडे–अलीकडे, शाकारतात–शाकारितात, कलई–कल्हई, अझून–अजून, शहाणे मुलग्यांचा–शहाण्या मुलग्यांचा, सस्तें–स्वस्त इत्यादि फरक इ. स. १८५८ ते १८६० या दोन वर्षांच्या अवधींत दुसऱ्या पुस्तकाच्या दोन आवृत्त्यांत झालेले आढळतात. यावरून वाचन पुस्तकांच्या भाषेबद्दल कँडी किती चिकित्साखोर होते व मुलांसमोर आदर्श भाषा ठेवण्याची ते किती धडपड करीत याची कल्पना करतां येते.

लहान मुलांकरितां तिसरें पुस्तक

'शाळांतील मुलांकरितां तिसरें पुस्तक' प्रथम इ. स. १८५९ मध्यें छापिलें गेलें. या पुस्तकाची जुन्यांत जुनी प्रत हातीं लागली ती इ. स. १८६३ मधील चौथ्या आवृत्तीची. 'महाराणी विक्तोरिया'ची भेट पहिल्याच धड्यांत होते. 'हीं राणीसाहेब मोठीं प्रीतिवंत व परोपकारी व सद्गुणी आहेत' [२२] या शब्दांत तिचें वर्णन केलेलें आढळतें. 'अगा भाऊ,' 'अगे मुली,' माझ्या बापा' इत्यादि संबोधनें पाहून गंमत वाटते. 'माझे भावास, हाय हाय, दृष्टीवांचून असणें ही मोठी दुःखाची गोष्ट आहे!' (पृ. १०) 'घोडा हा पशु माणसानें वर बसावयासाठीं देवानें उत्पन्न केला आहे.' (पृ. १५) 'डोळे पापण्याच्या योगानें मिटतात. पापण्या यांस वायूपासून व अतिशयित उजेडापासून राखतात.' (पृ. २०) 'कातडी शाबूत असली म्हणजे विष रक्ताला पोहोंचत नाहीं.' (पृ. ३२) 'तो त्या पापा पासून मागें सरला.' (पृ. ४७) इत्यादि इंग्रजी धाटणीचीं वाक्यें हि या पुस्तकांत आढळतात. वास्तविक इंग्रजी पद्धतीची वाक्यरचना आढळल्यास ती खड्याप्रमाणें उचलून टाकण्याची कँडीची पद्धति होती; तथापि ज्यांच्या मदतीनें हीं वाचन पुस्तकें बनविलीं

---

२१ मेजर कँडी, **लहान मुलांकरितां दुसरें पुस्तक,** आ. १. १८५८. पृ. ३.

२२ मेजर कँडी, **लहान मुलांकरितां तिसरें पुस्तक,** आ. ४. १८६३. पृ.१.

गेलीं त्या बहुतेक लेखकांनीं इंग्रजी भाषेचा अभ्यास केल्यामुळें कळत नकळत त्यांच्या हातून वर निवडून दाखविल्याप्रमाणें इंग्रजी वाक्यरचना मराठीमध्यें आली असावी.

वाचन पुस्तकांच्या नवीन आवृत्ति काढण्याच्या वेळेस त्यांत कांहीं कांहीं व्याकरण-विषयक अगर लेखनपद्धतीबाबत बदल केले जात, हें आपण पाहिलेंच आहे. हे बदल तत्कालीन शाळातपासनीसांचीं मतें विचारांत घेऊन केले जात. इ. स. १८७३ मध्यें वाचन पुस्तकांवरील एका टांचणांत त्यांतील गुणदोषांचें दिग्दर्शन करतांना जे दोष दाखविले गेले, ते सरकारी दप्तरांत पहावयास मिळतात. 'शाळांतील मुलांकरितां तिसरें पुस्तक' पाहून त्यांतील 'पैसा', 'व्यापार', 'अदलाबदल', इत्यादि धडे मुलांच्या आवाक्याबाहेरचे असल्यानें ते काढून टाकावे व त्याऐवजीं महाराष्ट्रांतील झाडांची माहिती असावी, तसेंच 'सर जमशेटजी जीजीभाई बारोनेत ह्यांचें संक्षिप्त चरित्र' नामक धड्याच्या शेवटीं 'ह्यांनीं जीं धर्मकृत्यें केलीं तीं सर्व जरी आम्हांस ठाऊक नाहींत, तरी जीं मोठीं असून सर्वांस ठाऊक आहेत तीं खालीं लिहिलीं आहेत', असें लिहून जमशेटजीनीं दिलेल्या देणग्या दोन पृष्ठें भरून दिल्या आहेत, तीं पृष्ठें काढून टाकावीं, अशा कांहीं सूचना केलेल्या आढळतात. भाषेच्या दृष्टीनें दाखविलेले दोष विचारार्ह आहेत. उदाहरणार्थ :—

"तो त्या पापापासून मागें सरला is not good Marathi; this idiom is borrowed from English. Instead of the above expression, it would be better to write त्यास तसें करण्यास धैर्य होईना or त्यास तें पाप करण्यास धीर झाला नाहीं ... आम्हाकडून वाईट गोष्ट झाली, here चूक झाली would be better." [२३]

क्रमिक पुस्तकांची भाषाविषयक तपासणी किती बारकाईनें होत असे याची कल्पना वरील उताऱ्यावरून होईल. पुढें इ. स. १८८७ मध्यें याच तिसऱ्या पुस्तकाची नवीन आवृत्ति काढतांना तत्कालीन शिक्षण समितीनें या पुस्तकावर आपली मतें व्यक्त केलीं. पुणें ट्रेनिंग कॉलेजचे तत्कालीन प्रिन्सिपल श्री. सोहनी यांनीं लिहिलेल्या अहवालांत छोटे छोटे बदल सुचविले आहेत. उदाहरणार्थ धडा २७, 'इंद्रियें' या नांवाऐवजीं 'ज्ञानेंद्रियें' हें नांव असावें; धडा ३२, 'कलमी आंबे' असें धड्याला नांव देऊन त्यांत कलमी आंब्याची कोठेंच माहिती नाहीं, ती द्यावी; धडा ३९ 'साखर' यांत साखरेचे चुणचुणी, कालपी, लीसा वगैरे जे प्रकार आहेत, त्यांची माहिती पुरवावी, याच धड्यांत साखरेचे दुबेटा, फुलगोटा, चिनी, भुरी, मगदुमी, गुळी इत्यादि प्रकार सांगितलेले आहेत, त्यांत मगदुमी हा प्रकार नसावा कारण तो

२३ *D. P. I. Government, Vol.* 23. 1873. (No paging)

आतां दिसत नाहीं; तसेंच 'वसई, राजापूर, पट्टण इत्यादि ठिकाणीं साखर करितात, पण ती फार चांगली नसते' हें एक चुकीचें विधान सुधारावें. कारण वसई व राजापूर येथें साखर तयार होत नाहीं; धडा ४०, 'कबूतर, ' यांत कबुतरांचा लढाईच्या काळांत संदेशवाहकासारखा उपयोग करितात या गोष्टीचा उल्लेख करावा इत्यादि सूचना दिलेल्या आढळतात. शिक्षण समितीचे एक सदस्य श्री. कुंटे म्हणतात :-

"I believe the principle on which such books are to be prepared, is not correctly seen. The readers–boys of 9 or 10 years of age—should be able to see and verify what they read, so that they may not get into the habit of reading and merely remembering. I have carefully looked into the book from this point of view and I find I have not been satisfied. What is taught is not seen in towns and large villages in Maharashtra".[२४]

नारायणभाई दांडेकर–शिक्षण समितीचे दुसरे सदस्य–सुचवितातः-

"I think the book requires revision. Some of the lessons are too simple for the book, some too difficult, some too short, some too long, and the statements in some of them have to be modified or corrected." [२५]

तसेंच वामन शिवराम आपटे मार्मिकपणें आपला अभिप्राय असा देतातः—

"It is no use revising a book now and another six months hence, making some additions and improvements that may then suggest themselves to the reviser. First settle what subjects each book of the series must include, and then distribute them over the five or six serial books so that they may all form parts of one well-defined whole." [२६]

मे. कँडीचा भाषाशुद्धीच्या बाबतींत कटाक्ष असतांना व वाचन पुस्तकांतील दोष वारंवार काढून टाकीत असतांना त्यांनीं तयार केलेल्या या पुस्तकाबद्दल श्री. मोडक लिहितात :—

---

२४ *D. P. I. Government, Vol. 29.* 1887. (No paging)

२५ Ibid.

२६ Ibid.

"I think this book requires a thorough revision. There are incorrect or obsolete idioms and provincialisms which must be corrected." २७

हीं सर्व मतें कँडीच्या मृत्यूनंतरचीं आहेत.

'शाळांतील मुलांकरितां तिसरें पुस्तक' नवीन नवीन आवृत्त्यांमधून जात असतांना त्याची तपासणी कोणत्या दृष्टिकोणांतून झाली, त्याची कल्पना येण्यासाठीं वेगवेगळ्या परीक्षकांचीं मतें वर दिलीं आहेत. या पुस्तकाच्या इ. स. १८६३ च्या चौथ्या आवृत्तींत आढळणारे 'भावली' (पृ. ४), 'लगीन' (पृ. ४), 'हैगईनें' (पृ. ८०), 'हात्यारें' (पृ. ५२) इत्यादि उच्चारानुसारी पद्धतीनें लिहिलेले शब्द पुढील आवृत्त्यांत शुद्ध केलेले आढळतात. हे बदल घडत असतांना पुस्तकांतील चित्रांकडे विशेष लक्ष पुरविलेलें दिसत नाहीं. उदाहरणार्थ, या पुस्तकाच्या इ. स. १८९४ च्या तेराव्या आवृत्तींत धडे २, २३, ४२, ४७, ४८, ६०, ६४, ६५ यांमधील चित्रांचे ठसे उलटे पडलेले आढळतात. तर चौथ्या धड्यांत झाडाचें वर्णन असून दिलेलें चित्र फांदीचें आहे, धडा ३४ मध्यें विल्यमसाहेबाची मडम लहान दिसते, धडा ३८ मध्यें काहिलींतील रस करण्यास दोन तीन वर्षांचा लहान मुलगा बसलेला आढळतो. वाचन पुस्तकांकडे बारकाईनें लक्ष पुरविलें जात असतांना त्यांतील चित्रांची हेळसांड होणें विचित्र दिसतें.

शाळांतील मुलांकरितां चौथें पुस्तक

'शाळांतील मुलांकरितां चौथें पुस्तक' प्रथम इ. स. १८५९ मध्यें तयार झालें. या पुस्तकाच्या उपलब्ध झालेल्या इ. स. १८६१ च्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रतीमधील 'एक्या स्थळापासून' (पृ. ६३), 'माझा मूल' (पृ. ६), 'देवाचा स्तव' (पृ. ७२), 'आपाप' (पृ. ९७), 'जाजती' (पृ. ११६), 'व्याधी जडतो' (पृ. ११४) इत्यादि शब्द व वाक्प्रयोग पुढील आवृत्त्यांतून बदललेले आढळतात. वाचन पुस्तकांतील भाषा रेखीव करण्याच्या भरांत तींत कृत्रिमता येणें साहजिक होतें. 'मनुष्याचें पुष्कळ दिवस वांचणें हें बहुतकरून त्याच्या खाण्यापिण्याच्या नेमस्तपणावर आहे' (पृ. १३३), 'आपण खोटें बोलण्याच्या दोषांत पडलों' (पृ. १), 'हृदयाचें उडणें, रक्ताचें वाहणें, भक्षिल्याचें पचणें, निरनिराळ्या रसांचें उत्पन्न होणें, अशीं शरीरांतील सर्व कामें खळ न पडतां व अव्यवस्था न होतां, यथा-स्थित चालतात!' (पृ. १६६), 'सरकारांतून मला धरणें येईल' (पृ. १७४)

---

२७ *D. P. I. Government, Vol. 29.* 1887. (No paging.)

इत्यादि वाक्यें इंग्रजी वळणाची आठवण करून देतात. वरील वाक्यें पुढील आवृत्त्यांत तशींच ठेविलेलीं आढळतात. वाचन पुस्तकांच्या नव्या नव्या आवृत्त्यांत पुष्कळ ठिकाणीं शाब्दिक बदल केलेले दिसतात.

शाळांतील मुलांकरितां पांचवें पुस्तक

'शाळांतील मुलांकरितां पांचवें पुस्तक' तपासतांना त्यांतील परशुरामपंत गोडबोले यांच्या काव्याची कल्पना येण्यासाठीं त्या पुस्तकांतील पंतांच्या काव्याचा एक नमुना उतरण्याचा मोह होतो. हें काव्य आजच्या काळाला धरून नसलें तरी तत्कालीन राजनिष्ठेचा नमुना म्हणून तें येथें दिलें आहे.

राणीविषयीं देवास प्रार्थना

" इंग्लंद देशांत, लंदन राजधानी ॥ तेथील सिंहासनीं विराजीत ॥१॥
तीच आहे आम्हां, समस्तांची राणी ॥ महत्त्वाची खाणी, विक्तोरिया ॥२॥
देवा त्वांच तिला, दिलें सिंहासन ॥ त्याचा अभिमान, तुला असो ॥३॥
देवराया तुझे, धरितों चरण ॥ राणीचें रक्षण, करीं सदा ॥४॥
माय-बाप तूंचि, आहेस सर्वांसी ॥ सांभाळीं राणीसी कृपादृष्टी ॥ ५ ॥
दीर्घ-काळ राहो, आमची ही राणी ॥ अम्हांला शिराणी, हेच आहे ॥ ६ ॥
माता सुखी तरी, बालकासी सुख ॥ नाहींतरी दुःख, सर्व काळ ॥ ७ ॥
आमच्या राणीचें, यश विस्तारावें ॥ विजयी करावें, तिला देवा ॥ ८ ॥
आम्हांवर तिचें, राज्य असो सदा ॥ तिच्या राज्य- पदा, ढळ नसो ९ ॥
पृथ्वीवरी तिचें, राज्य चिरकाल ॥ राहिल्या सकळ, सुख आम्हां ॥ १० ॥
लोक-सुखासाठीं, जे केले कायदे ॥ रक्षितां फायदे, होती आम्हां ॥ ११ ॥
तिनें ते आमचे, कायदे रक्षावे ॥ जना सुख द्यावें, हेंच मागों ॥ १२ ॥
आम्हीं सर्व-लोक, तिचीं गाऊं गाणीं ॥ ऐशी अमुची राणी, कीर्ती करो ॥ १३ ॥
देवा विश्व-भरा, विनवितों तुला ॥ आमुच्या राणीला, सांभाळावें ॥ १४ ॥
शत्रूच्या सेनेची, होवो दाणादाणी ॥ विक्तोरिया राणी, जय पावो ॥ १५ ॥
मोडवीं शत्रूचीं, सर्व कारस्थानें ॥ राणीचीं संस्थानें, सांभाळावीं ॥ १६ ॥
राणीच्या शत्रूचे, मनांतील बेत ॥ कधीं न जावोत, सिद्धीस ते ॥ १७ ॥
देवा आम्हां आहे, तुझाचि भरंवसा ॥ तुज-वरी आशा, ठेवितसों ॥ १८ ॥
हे प्रभो उशीर, लावूं नको क्षण ॥ करीं संरक्षण, आमचें तूं ॥ १९ ॥
सर्व-शक्ति तूंच, तूंच बा सर्व-ज्ञ ॥ तुज-पुढें अ-ज्ञ, आम्ही सर्व ॥ २० ॥
आहेस दयाळू, उदारांचा राणा ॥ करावी करुणा, आम्हांवरी ॥ २१ ॥

श्लोक

सौख्याची पूर्ण-खाणी, चिर-समय असो, आमची मुख्य राणी ॥
आम्हांला हे शिराणी, म्हणुनि निज-मुखें, लोक गाऊत गाणीं ॥
जीचीं सर्वत्र ठाणीं, सबळहि बघुनि, जोडिती शत्रु पाणी ॥
विक्तोरीया-निशाणी, धरुनि चहुंकडे, चालती शुद्र नांणीं ॥ १ ॥ [२८]

यासारख्या काव्याबरोबर ज्ञानेश्वर, तुकाराम, रघुनाथ पंडित, वामन, मोरोपंत इत्यादिकांचीं काव्यें व उत्तररामचरित, मृच्छकटिक इत्यादि संस्कृत नाटकांच्या मराठी भाषांतरांतील निवडक पदांना वाचन पुस्तकांत स्थान दिलेलें होतें. वाचन पुस्तकांतील या काव्यांविषयीं सिमियन बेंजामिन वॉकर नांवाच्या एका गृहस्थानें कडक टीका केली होती. १८८३ मध्यें 'एज्युकेशन कमिशन' हिंदुस्थानच्या शिक्षणाविषयक धोरणाचा विचार करीत असतांना त्यांच्यापर्यंत आपलें म्हणणें जावें म्हणून तारीख १८ फेब्रुआरी १८८३ रोजीं आर्यसमाजांत सदर गृहस्थानें सरकारी मराठी शाळांत वापरल्या जाणाऱ्या वाचन पुस्तकांतील कवितांवर टीकात्मक भाषण केलें. 'अनवाणी चालूं नये' असें कवितांमधून मुलांना सांगावयाचें व शिक्षकानें अनवाणी चालावयाचें, 'सर्व खेळ सोडून द्या' अशा अर्थाच्या कविता मुलांना शिकवावयाच्या हें इष्ट नाहीं असें त्यांचें म्हणणें होतें. तसेंच दैव, नशीब, देवभोळेपणा इत्यादि विचारांना विद्याखात्याच्या वाचन पुस्तकांत स्थान असूं नये असें त्यांना वाटे. त्यांचा रोख विशेषतः कामोद्दीपक, बुद्धिभ्रामक व विषयाची गोडी लावणाऱ्या अशा काव्यांवर होता. ते म्हणतात :—

"पुरुषाला स्त्री भोगाविषयीं किंवा स्त्रीला पुरुष भोगाविषयीं जी इच्छा होते तो काम, तो चेततो, आणि त्याच्या योगानें जिवाची तळमळ होते, चांदण्यांत बसल्यानें कामेच्छा विशेष होते वगैरे प्रकार आमच्या मुलांमुलींना शिकविण्याची कशाकरितां तसदी घेतात न कळे." [२९]

या टीकेकडे जरी विद्याखात्यानें लक्ष दिलें नाहीं तरी तत्कालीन वर्तमानपत्रांतून या विषयावर चर्चा झाली. 'नेटिव ओपिनियन'च्या २० व्या पुस्तकांत (१८८३) 'शिक्षा प्रकरण आणि विद्याखातें' नांवाची एक लेखमाला या विषयावर लिहिली गेली. 'इंदुप्रकाश'कार सुद्धां याबाबत लिहितात :—

"गद्याचा काय आणि पद्याचा काय, कांहीं मर्यादेनें अर्थ करणें आणि

---

२८ मेजर कॅंडी, **शाळांतील मुलांकरितां पांचवें पुस्तक**, आ. १. १८६०. पृ. २३८–२३९.

२९ सिमियन बेंजामिन वॉकर, **काव्यदोषविवेचन**. १८८३. पृ. ३१.

त्याप्रमाणें वागणें, हें सुज्ञपण आहे. आपण आपल्या मित्राच्या घरीं जातों आणि बोलण्याच्या प्रेमांत, ऐक्य प्रदर्शित करण्यासाठीं, 'हें घर आपलें आहे,' असें तो म्हणतो. तेवढ्यावरून त्याच्या सर्वस्वावर लागलीच आपण सत्ता चालवावी काय? 'अमृतं बालभाषणं,' हें ऐकिल्याबरोबर, त्या अमृताकरितां जर वाटी एकाद्यानें पुढें केली, तर तींत कोणीं काय घालावें? 'विठाबाई माउली' हें कानीं पडल्याबरोबर, त्या विठाबाईचें चोळी लुगडें मला दाखवा, असा जर कोणीं हट्ट धरिला, तर त्यास काय म्हणावें? म्हणावयाचें काय? ह्या मंडळीस कवितेचा उपभोग घेतां येत नाहीं, म्हणजे ती मंडळी अरसिक आहे असें म्हणावें." [३०] या शब्दांत सिमियन बेंजामिन सारख्या टीकाकाराला, उत्तर दिलें गेलें.

सहावें पुस्तक

वाचन पुस्तकांच्या मालेंतील शेवटचें, 'सहावें पुस्तक' प्रथम इ. स. १८६१ मध्यें छापिलें गेलें. मुलांच्या वाढत्या वयाबरोबर विषयांचें काठिण्य वाढलें. या पुस्तकाच्या प्रथमावृत्तींत अर्थशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, भूगर्भशास्त्र इत्यादि विषयांवरील धडे आहेत. उदाहरणार्थ एका अर्थशास्त्रावर, 'किंमतीविषयीं,' 'वेतनाविषयीं,' 'श्रीमंत आणि गरीब,' 'भांडवलाविषयीं,' 'सरकार देणें,' 'भाड्यानें देणें घेणें,' 'श्रमविभाग' असे सात धडे आहेत. [३१] शास्त्रीय विषयांवरील धड्यांमुळें हें पुस्तक मुलांच्या आवाक्याबाहेरचें होतें. प्रत्येक आवृत्तीच्या वेळीं नवीन नवीन धडे या पुस्तकांत घातले गेल्यामुळें तें फार कठीण होत गेलें. त्यावर 'इंदुप्रकाश' कारांनीं टीका केली व कांहीं सूचना केल्या त्या अशा :—

"त्यांत शास्त्रीय विषयांचे जे धडे आहेत, त्यांतल्या किती एकांकडे पाहिलें म्हणजे असें मनांत येतें कीं साहेबांच्या टोपीचें पागोटें बनविण्याकरितां तिजवर पुष्कळ बुक्या माराव्या आणि त्यांच्या योगानें धड टोपी ना धड पागोटें असें तिचें कांहीं विचित्र स्वरूप व्हावें, तशी अवस्था त्या शास्त्रीय विषयांची झाली आहे. म्हणजे त्यांचा अर्थ इंग्लिश जाणणारांस कळत नाहीं, आणि मराठी जाणणारांसही कळत नाहीं. असे जे प्रकार झाले आहेत ते काढून टाकावे आणि, ते धडे मुलांस सहज कळतील असे करावे. ते शास्त्रीय विषयांचे धडे अगदीं बरोबर भाषांतर करून, इंग्रजीवरून घेतले आहेत. म्हणून त्यांची अवस्था अशी झाली आहे." [३२]

---

३० **इंदुप्रकाश**, पु. २२, अं. २८. १८८३.

३१ मेजर कँडी, **सहावें पुस्तक**. १८६१. पृ. ११३–१६०.

३२ **इंदुप्रकाश**, पु. २५, अं. २७. १८८६.

अशाप्रकारें सहाव्या पुस्तकावर टीका झाल्यामुळें इ. स. १८९३ मध्यें छापिलेल्या आठव्या आवृत्तीच्या वेळीं त्यांत बदल झाले. "रा. रा. महादेव शिवराम गोळे पुर्णे एथील फर्ग्युसन कॉलेजचे शास्त्रीय विषयांचे अध्यापक यांनीं शास्त्रीय विषयक नवे धडे लिहून दिले आहेत त्यांचा या आवृत्तींत संग्रह केला आहे. कांहीं धडे जुन्या आवृत्तींतले तसेच ठेवले आहेत, व कांहींत सदर गोळे यांच्या विचारानें फेरफार केला आहे." असें असूनहि या सुधारुन छापिलेल्या सहाव्या पुस्तकावर 'शाळापत्रकांत' टीका झाली. [३३]

गुजराती क्रमिक पुस्तकें व त्यांची भाषा.

मेजर कँडीच्या हयातींत, वरील सर्व क्रमिक पुस्तकांत एक गोष्ट प्रामुख्यानें आढळून येते ती ही कीं त्यांत वारंवार जे बदल होत गेले ते विशेषतः मराठी भाषेच्या लेखनपद्धतीला निश्चिति यावी या हेतूनें केले गेले. गुजराती क्रमिक पुस्तकांच्या बाबतींत लेखनपद्धति यावी म्हणून केलेली व्यवस्था वेगळीच होती. मराठी क्रमिक पुस्तकें ज्याप्रमाणें कँडीच्या नांवाशीं निगडित आहेत, तशींच गुजराती क्रमिक पुस्तकें तयार करण्यांत डी. होप याचें नांव प्रामुख्यानें घेतलें जातें. गुजराती क्रमिक पुस्तकें रचतांना गुजराती भाषेच्या लेखनपद्धतीला ठराविकपणा आणण्यासाठीं आपण काय केलें तें सांगतांना होप लिहितोः—

"Because of the great uncertainty as to Gujarati orthography which had hitherto presenting a serious difficulty, an agreement regarding a number of the most disputed points was, after much discussion, drawn up and signed by all the members of the committee and some other individuals of note and the orthography of about 7000 of the chief words in the series, which were picked out for the purpose, was settled in accordance with it and the general sense of the committee. The agreement subsequently received the general approval of Dr. Glasgow, the Gujarati Translator and will, I trust, prove

---

३३ शाळापत्रक, पु. ४, अं. ११. १८९३. पृ. ३२८–३३२.

a step towards orthographical uniformity in future. Anything like a final settlement of the whole question can hardly be expected until a first class Gujarati Dictionary shall have been published."[३४]

या उताऱ्यांत सांगितल्याप्रमाणें गुजराती भाषेंतील सात हजार शब्दांची लेखन-पद्धति निश्चित करून गुजराती वाचन पुस्तकें रचलीं गेलीं. गुजराती बुक कमिटींत, त्यावेळीं भोगीलाल, प्राणवल्लभदास, मोहनलाल रणछोडदास व महिपतराम रूपराम हे गृहस्थ होते. मराठी भाषेचा कोश केव्हांच तयार झालेला असल्यामुळें, गुजराती वाचन पुस्तकें तयार करतांना चांगलासा गुजराती कोश नसल्यामुळें [३५] जी अडचण भासली, ती मराठी वाचन पुस्तकांच्या बाबतींत भासली नाहीं. मेजर कँडीनीं मराठी भाषेची लेखनपद्धति निश्चित करण्याच्या हेतूनें 'मराठी ट्रॅन्स्लेटर' या नात्यानें त्यांच्या हातीं तपासणीसाठीं येणारीं सर्व पुस्तकें कशीं सुधारलीं हें अनेक ठिकाणीं त्यांचे टीकालेख देऊन स्पष्ट केलेलेंच आहे. मेजर कँडीनंतर मात्र वाचन पुस्तकांच्य लेखनपद्धतीकडे तितकेसें बारकाईनें लक्ष पुरविलें गेलेंसें वाटत नाहीं.

मे. कँडीच्या मृत्यूनंतर बुक–कमिटीच्या सभासदांच्या इच्छेप्रमाणें बदल होऊं लागले. वास्तविक तत्कालीन कांहीं शिक्षणाधिकाऱ्यांना ही गोष्ट पसंत नव्हती. कर्कहॅम नामक एका अधिकाऱ्यानें डी. पी. आय. कडे याबाबत १२ डिसेंबर १८८८ रोजीं लिहिलें,

I would myself strongly deprecate revision by any committee. A text–book must be the work of one person and no mortal text–book will please every one. The attempts to produce text–books in England by joint authorship have failed." [३६]

---

३४ *D. P. I. Government, Vol 7.* 1859. pp. 45–46.

३५ पहिला गुजराती कोश इ. स. १८४६ मध्यें प्रसिद्ध झाला. त्या कोशाचें नांव Dictionary Goojrati and English–Mirza Mahomed Cauzim of Cambay, corrected and revised by Nowroziee Furdoonjee.

३६ *D. P. I. Government, Vol.* 38. 1888. (No paging.)

वरील अधिकाऱ्याची सूचना विचारार्ह आहे. मेजर कँडीच्या हातीं सर्व सूत्रें असल्यामुळें शालेय पुस्तकांच्या द्वारा मराठी भाषेच्या लेखनपद्धतीला निश्चित स्वरूप आलें. कँडीचे एक शिष्य विनायक कोंडदेव ओक. इ. स. १९११ मध्यें म्हणतात त्याप्रमाणें, 'आज तीस चाळीस वर्षें जी मराठी शब्दलेखनपद्धति सर्वत्र प्रचारांत आलेली आहे, ती सगळी मेजर कँडी ह्यांच्या क्रमिक पुस्तकांतली आहे.'

नवनीत

मराठी क्रमिक पुस्तकांत गद्याप्रमाणें कांहीं पद्यहि असे; तथापि पद्याचा अभ्यास विशेष व्हावा म्हणून प्राचीन काव्याकडे विद्याखात्याचें लक्ष गेलें. पुणें कॉलेजमधील मराठीचा वर्ग व शिक्षक तयार करण्याचा वर्ग, या दोन वर्गांतील प्रौढ विद्यार्थ्यांसाठीं एक काव्यसंग्रह तयार करण्याबद्दलची कल्पना प्रथमतः इ. स. १८५३ मध्यें कृष्णशास्त्री चिपळुणकर यांनीं मेजर कँडीनां दिली. या कल्पनेमुळें कँडीनीं परशुरामपंत गोडबाले यांना प्राचीन काव्यांमधील कांहीं नमुनेदार भाग शोधून त्यांचा एक संग्रह तयार करावयास सांगितलें. या संग्रहांत तुकारामरामदासादि कवींचीं काव्यें निवडावीं, छापील पुस्तक सुमारें तीनशें पृष्ठांचें व्हावें अशाहि सूचना तात्यांना कँडीकडून मिळाल्या.[३७] हा काव्यसंग्रह 'नवनीत' या नांवानें इ. स. १८५४ मध्यें प्रसिद्ध झाला. 'महाराष्ट्र भाषेंतील कवितांचे वेचे' रसिक जनांपुढें ठेवतांना तात्या म्हणतात :—

"भाषा सुधारण्यास व मनाची शक्ति वाढविण्यास कविता हें एक मोठें साधन आहे. सांप्रत सर्व विद्या शिकविण्याचे प्रयत्न चालले आहेत, त्यांत कविता शिकविण्याचें साधन कमी आहे तें अवश्य असलें पाहिजे असें बहुतांचें मत आहे. तोच उद्देश हें पुस्तक रचण्याचा आहे....ज्यांला मराठी भाषेचें ज्ञान चांगलें असावें अशी इच्छा असेल त्यांनीं प्राचीन व अर्वाचीन कवीचे प्राकृत ग्रंथ पुष्कळ वाचावे हें आवश्यक आहे. ज्याला ज्या भाषेचें पूर्णज्ञान असतें त्याला त्या भाषेच्या कवितांतील नाना प्रकारचे चमत्कार व रस पाहून किती आनंद वाटतो!... मराठी भाषेंत कविता ग्रंथ पुष्कळ व मोठाले आहेत, त्यांत छंद व चालीही अनेक प्रकारच्या आहेत. त्यांची गोडी लागून तिकडे तरुणांच्या मनाची प्रवृत्ति व्हावी ह्याकरितां मराठी भाषेंतल्या बहुतेक कवितांतील थोडथोडे वेंचे घेऊन हें एक लहानसें पुस्तक केलें आहे. हें मन

---

३७ *D. P. I. Board of Education, Poona College.* 1853. p. 461.

लावून वाचिलें असतां कवितांचे प्रकार व रीती व त्यांतील चमत्कार व रस हीं सर्व थोडक्यांत समजतील. ह्या लहान पुस्तकाचा अभ्यास चांगला झाला असतां मोठाले ग्रंथ पाहाण्यास मार्ग सुलभ होईल. किंबहुना कविता करण्याची शक्तिही प्राप्त होईल."[३८]

अशा या काव्यसंग्रहांत तात्यांनीं तुकाराम, नामदेव, जनाबाई, रामदास, मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत, रघुनाथपंडित, अमृतराव, देवनाथ व रामजोशी यांचीं काव्यें निवडिलीं असून शिवाय हिंदुस्तानी भाषेंतील कांहीं पदें व दोहरे, संस्कृत भाषेंतील कांहीं काव्यें, तसेंच आरत्याहि घेतलेल्या आहेत. काव्यसंग्रहाला कांहीं कवींचीं त्रोटक चरित्रेंहि जोडलेलीं आहेत.

ज्या 'नवनीता'च्या पुढील काळांत सतरा आवृत्त्या निघाल्या त्याबद्दल तात्यांना मालकी हक्क म्हणून फक्त दीडशें रुपये मिळाले.[३९] या काव्यसंग्रहाची उपयुक्तता ध्यानीं येतांच तात्यांनीं अशाच प्रकारचा आणखी एक संग्रह काढण्याचें ठरविलें व इ. स. १८६३ मध्यें तो 'नवनीत भाग २' या नांवानें प्रसिद्ध झाला. या भागाची आवश्यकता प्रतिपादितांना ते लिहितात:—

"नवनीत अथवा प्राकृत कवितांचे वेंचे ह्या नांवाचें एक पुस्तक पूर्वी केलें आहे. तें बहुतांस आवडतें, परंतु त्यांत ग्रंथसंग्रह बराच असून किंमत फार आहे ह्यामुळें तितकी किंमत खर्चून पुस्तक घेण्याचें ज्यांस सामर्थ्य नाहीं त्यांस तें न मिळाल्यामुळें त्यांचे मनोरथ अपूर्ण राहतात, असें पाहून त्याच मासल्याचें पण लहान असें हें नवें पुस्तक करून त्यास नवनीताचा दुसरा भाग म्हटलें आहे. ह्यांत जो संग्रह केला आहे तो पहिल्या पुस्तकांतला न घेतां थोडे थोडे निराळे वेंचे घेऊन केला आहे. ह्यांत त्या पुस्तकांतील कवींपैकीं बहुतेक कवींच्या कवितांचे वेंचे घेतले आहेत. व कांहीं दुसऱ्याही कवींचे आहेत."[४०] तसेंच 'नवनीता'चा तिसरा भाग तयार करण्याची आपली इच्छा त्यांनीं खालील शब्दांत व्यक्त केली आहे:—

"जरि याचा जन आदर करितिल घेतील हा पाहायास ॥
तरि उत्तेजन होइल मज तिसरा भाग तो करायास ॥"[४१]

तात्यांची ही इच्छा मात्र पुरी झालेली दिसत नाहीं.

---

३८ परशुराम बल्लाळ गोडबोले, **नवनीत**. १८५४. प्रस्तावना.
३९ *D. P. I. Book Depot, Vol. 20.* 1864–65. p. 585.
४० परशुराम बल्लाळ गोडबोले, **नवनीत, भाग २**. १८६३. प्रस्तावना.
४१ तत्रैव. पृ. १२६.

'नवनीता'मुळें प्राचीन कवींच्या काव्याचा अभ्यास होण्यास एकप्रकारें मदत झाली. प्रथमतः जरी पुणें कॉलेजमधील मराठीचा वर्ग व शिक्षक तयार करण्याचा वर्ग यांतील प्रौढ विद्यार्थ्यांसाठीं म्हणून हा काव्यसंग्रह 'कॅंडीच्या आज्ञेवरून' तात्यांनीं केला होता, [४२] तरी मराठी शाळांमधूनहि 'नवनीत' शालेय अभ्यासक्रमांत समाविष्ट झालें होतें. मुंबई इलाख्याच्या विद्याखात्याच्या इ. स. १८५९–६० च्या वार्षिक अहवालांत, मराठी शाळांमधून वापरल्या जाणाऱ्या पुस्तकांच्या यादींत 'नवनीता'चा अंतर्भाव केलेला आढळतो. [४३] शालेय अभ्यासक्रमांत 'नवनीता'ला स्थान मिळाल्यामुळें कीं काय, 'नवनीतां'च्या आवृत्त्या भराभर निघूं लागल्या. तात्यांच्या हयातींत इ. स. १८७३ पर्यंत त्याच्या आठ आवृत्त्या निघाल्या. त्यानंतर 'पहिल्या आवृत्तींतील कठिण वेंचे सर्व काढून त्या ठिकाणीं सुलभ वेंचे घालावे आणि सर्वांस समजण्यास सुलभ पडेल अशी ह्या पुस्तकाची नवी आवृत्ति काढावी, असें मेहरबान चात्फील्ड साहेब, विद्याखात्याचे दैरेक्तर, ह्यांनीं ठरवून तें काम मेहरबान मेजर क्यांदी साहेब, मराठी त्रान्सलेटर, ह्यांच्या सूचनेवरून' [४४] श्रीकृष्णशास्त्री तळेकर आणि रावजीशास्त्री गोडबोले यांच्याकडे आलें. नवी आवृत्ति तयार करतांना मे. कॅंडीच्या सूचनेवरून संपादकांनीं 'मुकुंदराज आणि ज्ञानेश्वर ह्यांच्या कवितांत सर्व वेदांत असल्यामुळें त्यांचा अर्थ समजण्यास कठीण पडतो, म्हणून त्यांची कविता ह्या आवृत्तींतून (इ. स. १८७८) अजीच काढून टाकली.' मेजर कॅंडीचा हा वेदांतमतविरोध हे कटपणाचा असल्याचें कांहीं तत्कालीन विद्वानांना वाटत होतें. उदाहरणार्थ विष्णुशास्त्री चिपळुणकर, यांनीं याबाबत कडक टीका केलेली आढळते. [४५] ही टीका जरी खरी असली, तरी मेजर कॅंडीनीं 'नवनीतां'त सुधारणा करतांना पुष्कळ इंग्रजी शाळांच्या मुख्याध्यापकांचीं मतें मागविलीं होतीं हेंहि लक्षांत घेण्यासारखें आहे. सरकारी दप्तरखान्यांत हा पत्रव्यवहार पहावयास मिळतो. [४६] इ. स. १८७८ व १८८२ च्या 'नवनीता'च्या आवृत्त्यांमध्यें जरी ज्ञानेश्वरांचें काव्य नसलें तरी पुन्हां इ. स. १८८६ च्या आवृत्तींत त्याला स्थान मिळालें. 'नवनीतां'तील कांहीं काव्यें काढून टाकण्याची

---

४२ *D. P. I. Board of Education*, Poona College. 1853. p. 276.

४३ *Report of the Director of Public Instruction, Bombay.* 1859–60. p. 37.

४४ परशुराम बल्लाळ गोडबोले, **नवनीत**, नवी आवृत्ति. १८७८. प्रस्तावना.

४५ खंडेराव भिकाजी बेलसरे, **चिपळूणकर लेखसंग्रह, भाग २.** १९०२. पृ. १७–१८.

४६ *D. P. I. Book Depot, Vol.* 31. 1875–76. pp. 503–526.

अगर नवीन घालण्याची बाब जरी बाजूला ठेविली, तरी त्यांतील भाषाविषयक फेरफार करतांना संपादक रावजीशास्त्री गोडबोले इ. स. १८८९ ची आवृत्ति तयार करतांना म्हणतातः—

"With regard to the use of capital letters, punctuation and other controversial matters, I have to state that on these points no definite decision can be formed that would be acceptable to all. But I may be permitted to say that in revising this book, I have followed the late Major Candy's system, which has also been followed by myself and my predecessors in revising the Departmental reading books, and which system is considered as the best by the Educational authorities." [४७]

अशाप्रकारें मराठी गद्याप्रमाणें पद्यामध्येंहि मेजर कँडीनीं घालून दिलेल्या नियमांनुसार भाषिक व्यवहार चालत असत. प्राचीन काव्याचा अभ्यास व्हावा म्हणून निर्माण झालेलें 'नवनीत,' गुजराती भाषेंत तसाच काव्यसंग्रह तयार होण्यास कारणीभूत झालें. डी. पी. आय. हॉवर्ड, दक्षिणा प्राइझ कमिटीला लिहिलेल्या एका पत्रांत म्हणतो :—

"The value of indigenous poetry is very great. The success of the Naonit led me to endeavour to bring out a similar Gujerati collection. After considerable difficulties which chiefly arose from what I must call short-sighted objections stated by the exclusive advocates of 'Useful Knowledge', I succeeded in inducing the Gujerat Vernacular Society to allow their secretary to compile for a handsome remuneration a book of the kind which I desired. It has now been published and is selling so rapidly that I hope shortly to recover all the rather heavy expenditure which is caused to my Department." [४८]

'नवनीता' सारख्या काव्यसंग्रहानें मराठी भाषिकांना प्राचीन काव्याची गोडी लाविली. याच श्रेय परशुरामपंत गोडबोले यांना द्यावें लागेल. तात्यानीं केलेल्या श्रमाचें फळ त्यांना देतांना विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, 'कनिष्ठ, मध्यम व उच्च शाळांतील अनुभव' नामक लेखांत म्हणतातः—

---

[४७] *D. P. I. Book Depot, Vol. 55.* 1889–90. (no paging.)

[४८] *D. P. I. Duxina Fund, Vol. 15.* 1862. p. 115.

"विष्णुशास्त्री चिपळोणकराच्या टीकात्मक निबंधांनीं इंग्रजीच्या ह्या खग्रासापासून माझा बचाव केला. काव्येतिहास संग्रहकारांच्या ऐतिहासिक पत्रांनीं स्वदेश म्हणून कांहीं आहे हें मला कळलें. व परशुरामपंत तात्या गोडबोले ह्यांनीं छापलेल्या काव्यांनीं महाराष्ट्रसारस्वतांचा मला अभिमान वाटूं लागला." ४९

परशुरामपंत बल्लाळ गोडबोले (१८००–१८७४)

'काव्यामृताचा नवनीत भेला' रसिक जनांस देऊन ज्यांनीं मराठी भाषेची अखंड सेवा केली ते परशुरामपंत तात्या वाईस जन्मले. त्यांचें बाळपणीचें शिक्षण जन्मस्थानींच झालें. त्यांचे वडील बंधु दाजीबा यांच्या सहवासानें तात्यांस महाराष्ट्र काव्याची गोडी लागली. पुढें प्रपंच निर्वाहार्थ ते पुण्यास आल्यावर कांहीं दिवसांनीं त्यांच्या मराठी भाषेच्या अभ्यासामुळें, शाळापुस्तक मंडळीच्या देखरेखीखालीं 'महाराष्ट्र भाषेचा कोश' रचणाऱ्या संपादक मंडळांत त्यांची निवड झाली. त्यांच्या नोकरी संबंधीं सरकारी दप्तरांत एक उलेख सांपडतोः तारीख २८ माहे फेब्रुआरी १८५६ रोजीं, दरमहा पन्नास रुपयां पेक्षां जास्त पगार मिळणाऱ्या शिक्षणखात्यांतील नोकरांना बढती देण्याच्या हेतूनें, अशा नोकरांची एक यादी मेजर कँडीनीं तयार केली. त्या यादीप्रमाणें यावेळीं तात्यांचें वय पंचावन्न पूर्ण असून त्यांची अद्यापपर्यंतची नोकरी एकवीस वर्षें आठ महिने झाली होती. त्यांच्या नोकरीचा तपशील तेथें असा दिला आहेः–

"Three years as a Pandit in the Native Education Society under Captain Jervis, two years as a karkun in the Collectorate of Poona, eight years and four months as Superintendant of the Poona College Press and eight years and four months, Pandit to the Principal of the Poona College." ५०

वरील तपशीलाप्रमाणें तात्यांचा शिक्षामंडळीशीं व शिक्षणक्षेत्रांत प्रथमपासूनच कसा जवळचा संबंध होता त्याची कल्पना येते. ज्याप्रमाणें एकोणिसाव्या शतकांतील–विशेषतः उत्तरार्धांत–शालेय पुस्तकें व त्यांची भाषा यांचा विचार करतांना मेजर कँडी यांची कामगिरी प्रामुख्यानें नजरेसमोर येते, त्याप्रमाणें मेजर

---

४९ विष्णु गोविंद विजापूरकर, **विश्वनाथ काशीनाथ राजवाडे; संकीर्ण लेखसंग्रह.** पृ. ४५.

५० *D. P. I. Government.* 1856. pp. 490-491.

कँडीचें नांव घेतल्याबरोबर तात्यांची आठवण होते. तात्या व कँडी यांचा संबंध कोणत्या ना कोणत्या नात्यानें तात्यांच्या मृत्यूपर्यंत होता. तात्या हे कँडीचे उजवे हात होते. पंडितमंडळातर्फे तयार झालेल्या कोशांत त्यांच्या श्रमांचा वाटा होता; तसाच मोल्स्वर्थच्या मराठी-इंग्रजी कोशरचनेतहि होता. त्याचप्रमाणें स्टीव्हनसन याच्या व्याकरणनिर्मितींत त्यांना तात्यांनीं मदत केली होती, इझडेल यानांहि ते मदत करीत असत. [५१]

परशुरामपंतांच्या ग्रंथकर्तृत्वाचा विचार करतांना त्यांच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या ग्रंथांची यादी देतां येते; परंतु कँडीनां ग्रंथरचनेंत आणि ग्रंथाच्या तपासणींत तात्यांनीं केलेल्या मदतीचें मोजमाप करणें फार कठीण आहे. उदाहरणादाखल कँडी व तात्या यांनीं एक वर्षांत शालेय पुस्तकांच्या बाबतींत किती काम केलें त्याची माहिती सरकारी दप्तरावरून खालीं दिली आहे. इ. स. १८६१-६२ मध्यें दोघांनीं केलेल्या कामाचा तपशील मे. कँडीनीं असा दिला आहे. :–

"My own personal work was as follows :—

A) My own personal Translation, revision or composition :-

(1) A revision of the Fifth Book, and carrying it thro' the Press.

(2) A revision of the Third Book, and carrying it thro' the Press.

(3) A revision and enlargement of the Sixth Book, and carrying it thro' the Press.

(4) Completion of a Descriptive Index for Johnsone's Map of Asia and carrying it thro' the Press.

(5) Preparation in part of part II of my Manual of Geography, Great Britian, Ireland, France, Holland Belgium, Germany, Spain, Portugal, and Denmark have been done.

(6) Carrying the lst. Part of the Manual of Geography, through the Press. About 80 pages are printed.

---

५१ *D. P. I. Board of Education, Institution.* 1842. p. 386.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

वर्ग.....क्रमांक.....

(B) Examination of report on the works of others. I have examined and reported on the following works:—

(1) A drama entitled 'Nal Natak.'

(2) 'An Abridged History of the Marathas in verse' by Mr. Wishwanath Mahadeo Gokhale.

(3) 'Help to Conversation in English and Marathi' by Mr. Waman Shastri Gadre.

(4) 'Mulanche khel.'

(5) 'An Abridged History of the Marathas in verse,' Further report.

(6) 'Brief History of Hidustan and England' by Messrs. Mahadeo wasudeo Barwe and Wishwanath Vishnu Gurjar. Submitted by Major Lester.

(7) A paper on the Improvement of the Modi Alphabet by Mr. Babaji Lakshman.

(8) Mr. Waman Shastri's Help to Conversation in English and Marathi Further Report.

The work done by my personal Pandit, Mr. Parsharam Pant Godbole was as follows :—

(1) Rendering aid to me in my various works stated above.

(2) Revision of Dr. Narayan Daji's work on chemistry.

(3) Revision of Gangadhar Ramchandra Tilak's Laghu Vyakaran for a new edition.

(4) Writing short explanatory notes for the poetry of the Fifth and Sixth Books.

(5) Giving an abstract of the contents of the Sarwa Sangraha.

(6) Correcting proof-sheets of the Mitakshara and Dayabhag.

(7) Correcting proof-sheets of Kero Pant's Arithmetic.

(8) Correcting proof-sheets of the Marathi First Book." [५२]

---

[५२] *D. P. I. Translation Department, Vol. 16.* 1863-64. p. 52.

इतका मोठा उतारा येथें देण्याचें कारण एवढेंच कीं तात्यांच्या कामाची कल्पना वाचकांना यावी. मेजर कॅंडी यांना तात्यांची किती मदत होत असे याचीहि कल्पना वरील उताऱ्यावरून येण्यासारखी आहे. म्हणूनच तात्यांबद्दल ज्या ज्या वेळीं कोठेंहि उल्लेख करण्याची संधि येत असे, त्या त्या वेळीं मेजर कॅंडी त्यांची स्तुति करीत असत. बोर्ड ऑफ् एज्युकेशनला लिहिलेल्या एका पत्रांत कॅंडी म्हणतात :–

"As the chief employment of my Pundit will be translation, I have been very desirous of securing a fit person for that work. I know no one better than Parshuram Pant Gurbole who has had a lot of experience..." ५३

मेजर कॅंडीच्या मराठीभाषाज्ञानाच्या कसोटीला जेथें बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, गोविंद नारायण, दादोबा पांडुरंग, विश्वनाथ नारायण मंडलिक यांच्यासारखी मंडळी उतरूं शकली नाहीं, तेथें तात्यांनीं वरील प्रकारचे गौरवाचे शब्द त्यांच्याकडून मिळविले हें आश्चर्यकारक तर खरेंच.

इतकें असूनहि मेजर कॅंडी यांना तात्यांच्या बाबतींत एक कटु कर्तव्य करावें लागलें. एकदां तात्यांच्या कांहीं गैरवर्तणुकीमुळें तात्यांना दंड भरावा लागला. तात्या सरकारी छापखान्याचे सुपरिंटेंडेंट असतांना छापखान्यांत कांहीं खासगी कागदपत्र त्यांनीं छापून घेतले, 'इसापनीति' या पुस्तकाच्या कांहीं प्रती छापील किंमतीपेक्षां जास्त पैसे घेऊन त्यांनीं विकल्या व जादा पैसे स्वतः घेतले, यासारखे कांहीं गुन्हे त्यांनीं केल्याचें कॅंडीच्या कानावर आलें. शिक्षामंडळीनें तर तात्यांना लगेच बडतर्फ केलें. परंतु कॅंडीच्या मध्यस्थीमुळें फक्त पन्नास रुपये दंड होऊन तात्या पुन्हां कामावर रुजू झाले. तात्यांची बाजू मांडतांना कॅंडी यांनीं त्यांच्याबद्दल जें लिहिलें आहे, त्यावरून त्यांना तात्यांची खरी किंमत कळली होती असें म्हणणें भाग आहे. कॅंडी लिहितात:–

"Parshooram Pant is a man of great respectability and character, and is well-suited for his situation. I therefore, feel reluctant to recommend his dismissal which, I think would be a punishment more severe than is necessary." ५४

पुन्हां एकदां तात्यांची बाजू मांडतांना कॅंडी म्हणतात:—

"I solicit the clemency of the Board on account of his previous excellent character and former services. He was

---

५३ *D. P. I. Poona College. Vol. 8.* 1855. p. 254.

५४ *D. P. I. Board of Education, Institution.* 1842. p. 381,

one of the pundits employed in the compilation of the Marathee Kosh, and the Marathee and English Dictionary. He assisted Dr. Stevenson in the preparation of his Marathee Grammar: and he was very useful to Mr. Eizdale; when the Government English School here was first established. He is so well-connected, and has been held in such good repute in society that the pain and disgrace of dismissal are greater to him than they would be to most others similarly situated." [५५]

यावेळीं झालेल्या पत्रव्यवहारांत तात्यांनीं शिक्षामंडळीकडे शिफारसपत्रांसह केलेला दयेचा अर्जहि सरकारी दप्तरांत पहावयास सांपडतो. तात्यांच्या जीवनांतील ही घटना या ठिकाणीं नमूद करण्याचें कारण इतकेंच कीं कँडीचें तात्यामुळें किती अडत होतें व त्यांची कँडी यांना किती गरज भासत असे याची कल्पना यावी.

ही घटना इ. स. १८४२ मध्यें घडली. तात्यांनीं इ. स. १८४७ पासून कँडीचे पंडित म्हणून काम केलें; हें काम करीत असतांनाच त्यांनीं 'वेणीसंहार' (१८५७), 'उत्तररामचरित्र' (१८५९), 'शाकुंतल' (१८६१), 'मृच्छकटिक' (१८६२), 'नागानंद' (१८६५) व 'पार्वतीपरिणय' (१८७२) हीं नाटकें संस्कृतमधून मराठींत आणलीं. तसेंच प्राचीन कवींच्या काव्यांचा संग्रह, 'नवनीत' दोन भागांत प्रसिद्ध केला. तसेंच 'वृत्तदर्पण' (१८६०) 'मराठ्यांच्या इतिहासावर लहान मुलांकरितां सोपी कविता' (१८६४), 'नामार्थदीपिका' (१८६५) 'कादंबरीसार–पूर्वार्ध' (१८७२) 'श्रीमच्छंकराचार्यकृत श्री पांडुरंग स्तोत्राची टीका (१८७५) 'पंचांग दर्शन' (१८६४) 'संक्षिप्त भूगोल वर्णन' (१८६५) पाठावलि–संस्कृत भाषेचें प्रथम पुस्तक (१८६५) हीं पुस्तकें त्यांच्या नांवें जमा आहेत. याशिवाय दुसरें संस्कृत पुस्तक त्यांनीं रचल्याचा उल्लेख सरकारी दप्तरांत सांपडतो, [५६] खगोलविषयक एक पुस्तक त्यांनीं इ. स. १८४५ मध्यें रचलें होतें पण शिक्षामंडळीनें तें नाकारलें, [५७] भास्कर दामोदर पाळंदे यांच्या सूचनेवरून खगोलाविषयीं संवाद (Catechism of Astronomy) लिहिले होते व विद्याखात्यानें त्यांना मान्यता दिली अशीहि एक नोंद सरकारी दप्तरांत आढळते. [५८]

---

[५५] *D. P. I. Board of Education, Institution.* 1842. p- 386.

[५६] *D. P. I. Poona College. Vol. 8.* 1855. p. 52.

[५७] *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1845. pp. 11-21.

[५८] *D. P. I. Miscellaneous. Vol.* 13. 1856. p. 66.

त्यांच्या या वाङ्मयसेवेबद्दल त्यांचे एक चरित्रकार म्हणतातः-

"ह्या सगळ्या ग्रंथांचें अवलोकन केलें म्हणजे तात्यांस महाराष्ट्र भाषा किती वश होती, गूढार्थ सुलभ करण्याचें त्यांचें सामर्थ्य केवढें होतें आणि काव्यरसपरिपाक यथास्थित उतरण्याची सामुग्री त्यांचे ठायीं किती होती, हें सहज ध्यानांत येतें. आणखी त्यांच्या अगदीं निकट मित्रांच्या सांगण्यावरून असें कळलें आहे कीं, तात्यांस कविता करण्यास फार वेळ लागत नसे. विषयाची योजना झाली कीं, त्यांच्या लेखणींतून कविता भुरूभुरू बाहेर पडत असत.

"तात्या मोठे रसिक आणि मर्मज्ञ होते. महाराष्ट्र कविता लावण्याच्या कामीं— आणि त्यांतही मोरोपंतांच्या आर्या लावण्यांत—तर त्यांचा हातखंडा असे. त्याविषयीं त्यांस नेहमीं मोठमोठ्यांचीं दूरदूरच्या ठिकाणाहून पत्रें येत. त्यांचीं समर्पक उत्तरें ते, तिळमात्रही आळस न करितां, जेव्हांचे तेव्हां मोठ्या आनंदानें देत. आणि महाराष्ट्रांत कवीचें माहात्म्य वाढत चाललेलें पाहून त्यांस मोठा संतोष होई. मोठ्या विद्वान् लोकांत सुद्धां त्यांची एवढी आख्या होती कीं, थोरले चिपळूणकर देखील अडलेली आर्या त्यांस विचारीत असत. मोरोपंतांविषयीं त्यांचे ठायीं अत्यंत पूज्यबुद्धि होती. मोरोपंतांच्या काव्यास कोणीं नांव ठेविलें कीं त्यांना अतिशयित राग येत असे. आणि खरोखरीच मोरोपंतांचें हृद्गत बरोबर समजणारा पुरुष महाराष्ट्रांत ह्यांच्यासारखा कोणी झाला नाहीं." [५९]

तात्यांची प्राचीन काव्याची मर्मज्ञता व नवीन काव्यरचनेंतील हुशारी पाहूनच मेजर कॅंडीनीं, तात्यांकडे वाचन पुस्तकांत योग्य ते कवितेचे धडे घालण्याचें काम दिलें होतें. अशाप्रकारें तात्यांनीं महाराष्ट्र भाषेची अखंड सेवा केली व 'शके १७९६ च्या गोकुळाष्टमीच्या दिवशीं दोन प्रहरीं, खोकल्याच्या आजारानें त्यांचें देहावसान झालें.'

ज्यांच्यामुळें परशुरामपंत गोडबोले यांना मराठी भाषेची सेवा करण्याचें भाग्य प्राप्त झालें त्या मेजर टॉमस कॅंडीचेंहि चरित्र येथें थोडक्यांत देणें आवश्यक आहे.

मेजर टॉमस कॅंडी (१८०४–१८७७)

टॉमस कॅंडीचा जन्म इंग्लंडांत तारीख १३ डिसेंबर, १८०४ रोजीं झाला व महाबळेश्वरीं तारीख २६ फेब्रुआरी, १८७७ रोजीं ते खिस्तवासी झाले. वयाच्या सोळाव्या वर्षीं इ. स. १८२० मध्यें लष्करी खात्यांतील एक अधिकारी म्हणून ते व त्यांचा जुळा भाऊ जॉर्ज कॅंडी हिंदुस्थानांत आले. तत्पूर्वी त्यांनीं बोर्थविक गिलख्राइस्ट (Borthwick Gilchrist) यांच्या हाताखालीं इंग्लंडमधील ओरिएन्टल इन्स्टिटयुशनमध्यें हिंदुस्थानी भाषेचा अभ्यास करून प्राविण्य मिळविलें होतें. गिलख्राइस्ट हे आपल्या

५९ शंकर बापूजी मुजुमदार, **महाराष्ट्रीय नाटककार यांचीं चरित्रें**. पृ. २२-२३.

शिष्यांवर इतके खूष होते कीं त्यांनीं, कँडीबंधु व इतर चार विद्यार्थी यांच्या हिंदुस्थानी भाषानैपुण्याबद्दल त्यांना आपलें 'Persian Rudiments' हें पुस्तक अर्पण केलें. [६०] हिंदुस्थानी भाषा टॉमस कँडीला येत असल्यामुळें दहाव्या नेटिव इन्फंट्रींत दुसऱ्या बॅटॅलियनमध्यें दुभाषी व क्वार्टरमास्टर म्हणून त्याची नेमणूक होण्याबद्दल शिफारस झाली. याचवेळीं त्यानें मराठी भाषेची परीक्षा दिल्यामुळें दुभाष्याच्या जागेसाठीं त्यास योग्य ठरविण्यांत येऊन त्याची त्या जागेवर नेमणूकहि झाली. जेम्स मोल्स्वर्थ हा सुद्धां लष्करी पेशांतील असल्यामुळें त्याचा व कँडीबंधूंचा संबंध आला व त्यानें सुरू केलेल्या मराठी-इंग्रजी कोशाच्या कामांत मदत करण्यासाठीं म्हणून त्यानें कँडीबंधूंना इ. स. १८२६ मध्यें आपल्याकडे बोलावून घेतलें. यावेळेपासून टॉमस कँडीचा मराठी भाषा व वाङ्मय यांच्याशीं आमरण निकटचा संबंध आला. इ. स. १८३१ मध्यें मराठी-इंग्रजी कोशाचें काम पूर्ण झाल्यावर त्यांनीं मोल्स्वर्थला इंग्रजी-मराठी कोशरचनेमध्यें मदत करावयास सुरुवात केली. इ. स. १८३२ ते इ. स. १८३५ पर्यंत हें काम चाललें. पुढें मोल्स्वर्थ आजारी पडून इंग्लंडला गेला व तेथें आपण कोशाचें काम पुरें करूं अशा भावनेनें त्यानें कोशाचे सर्व कागदपत्र बरोबर नेले; परंतु तें काम तसेंच पडून राहिलें. पुढें सरकारी विनंतीवरून टॉमस कँडीनीं त्या कोशाचें काम इ. स. १८४० मध्यें सुरू करून इ. स. १८४७ मध्यें तें पूर्ण केलें. तत्पूर्वी इ. स. १८३७ मध्यें कँडीची पुणें कॉलेजचे सुपरिंटेंडेंट व मराठी शाळांचे तपासनीस म्हणून नेमणूक झाली. कोशाच्या कामासाटीं शाळा तपासण्याचें काम त्यांच्याकडून काढून घेण्यांत आलें. पुणें कॉलेजचे सुपरिंटेंडेंट म्हणून त्यांची नेमणूक होईपर्यंत त्यांना संस्कृत भाषेचें ज्ञान जवळजवळ नव्हतें. ते स्वतःच कबूल करतातः—

"My knowledge of Sanskrit is exceedingly limited. I did not begin the study of that language till the superintendence of the College was proposed to me." [६१]

पुढें आणखी तीस पस्तीस वर्षांनीं—तारीख २८ सप्टेंबर, १८७१ रोजीं—आपल्या संस्कृतच्या अभ्यासाबद्दल ते म्हणतातः—

"I beg to premise that though I have read a little Sanskrit and know a good many Sanskrit words, I do not profess to be a Sanskrit Scholar." [६२]

---

६० *Asiatic Journal Vol.* 11. 1821. p. 159.
६१ *G. D. Vol.* 540. 1840. p. 18.
६२ *D. P. I. Government, Vol. 1.* 1871-72. p. 595.

इतकें असूनहि पुणें पाठशाळेचे मुख्याधिकारी म्हणून ते काम करीत असत. इ. स. १८४७ मध्यें त्यांची मराठी ट्रॅन्स्लेटर व रेफरी म्हणून नेमणूक झाली. त्यांच्याच प्रेरणेनें इ. स. १८५१ मध्यें पुण्याची पाठशाळा व इंग्रजी शाळा एकत्र केली गेली व ही जोडसंस्था न्यू पूना कॉलेज म्हणून ओळखली जाऊं लागली. मे. कॅंडीनीं लोकांच्या धर्मभावना न दुखविण्याचें धोरण प्रथमपासूनच अंगिकारिलें होतें. उदाहरणार्थ, या जोडसंस्थेंत विद्यार्थ्यांनीं पायांत बुट अगर चप्पल न घालतां आलें पाहिजे या मुद्यावर सरकारचा मुख्य सेक्रेटरी वॉर्डन याच्याशीं वादविवाद करून मेजर कॅंडीनीं आपलें म्हणणें खरें केलें. [६३] त्यांच्या विद्यार्थ्यांनीं त्यांच्याविषयीं असा एक 'वेडा वांकडा' श्लोक रचला होता :—

"तत्रैव मेजरः क्यांडी प्रिन्सीपालो बहुवहाः ॥
प्रोफेसरो महादेवो शुद्धाशुद्धौ विवेचकाः ॥ १ ॥
सखारामौच गौंडीचइदं मानेटरौकृता ॥
नवीनायां व्यवस्थायां स्थापितौ ग्रीनमेगडुगलौ ॥ २ ॥" [६४]

न्यू पूना कॉलेजचे प्रिन्सिपल व मराठी ट्रॅन्स्लेटर म्हणून त्यांनीं इ. स. १८५६ पर्यंत काम केलें व आजारीपणामुळें ते हिंदुस्थानच्या बाहेर गेले. जाण्यापूर्वी त्यांनीं विद्याखात्याच्या प्रमुखाकडे विनंतीवजा सूचना केली कीं हीं दोनहि कामें आपणांस झेपत नसल्यामुळें कॉलेजच्या प्रिन्सिपलच्या जागेवर ऑक्स्फोर्ड विश्वविद्यालयाचा एकादा पदवीधर आणावा व आपण मराठी ट्रॅन्स्लेटरचें काम करूं. या सूचनेचा विचार होऊन इ. स. १८५७ मध्यें ते परदेशांतून आल्यावर त्यांची फक्त मराठी ट्रॅन्स्लेटर म्हणून नेमणुक झाली. यावेळीं त्यांच्या सर्व कार्याला काळिमा लावणारी एक दुर्दैवी घटना घडली; ती म्हणजे त्यांच्या कारकीर्दीत कॉलेजमध्यें अनैतिक वातावरण पसरून त्यामुळें त्यांना कॉलेजच्या प्रिन्सिपलशिपचा त्यांच्या इच्छेविरुद्ध द्यावा लागलेला राजीनामा, ही होय. न्यू पूना कॉलेजच्या वार्षिक तपासणीमध्यें कॉलेजमधील अव्यवस्था व अनैतिक वातावरण याला मेजर कॅंडी हेच जबाबदार असल्याचें, तपासनीस कॅप्टन काउपर यांस दिसून आलें. त्यांनीं आपल्या अहवालांत असें लिहिलें :—

"The Principal for years and years had never seen the Institution after nine in the morning and during the hours of study of the great majority of the classes, entire absence of discipline, order and decorum, having of course resulted." [६५]

---

६३ *D. P. I. Board of Education, Poona College.* 1853. pp. 206-215.

६४ नारायण विष्णु जोशी, **पुणें शहरचें वर्णन**. १८६८. पृ. ८३.

६५ *D. P, I. Poona College. Vol. 16.* 1858. p. 347.

मेजर कँडी यांच्या जीवनांत त्यांना हा मोठाच धक्का होता. याच तपासणींत कृष्णशास्त्री चिपळुणकर यांच्या अनैतिक वर्तणुकीची सरकारी रीत्या चौकशी होऊन त्यांना चार महिने त्यांच्या कामावरून दूर केलें गेलें. [६६] कँडी शिस्तीचे इतके भोक्ते होते कीं एकदां पुणें कॉलेजमधील एक आचार्य चिनशास्त्री यांना त्यांच्या उद्धट वर्तनाबद्दल त्यांनीं काढून टाकलें होतें. [६७] त्याच कँडीवर असा प्रसंग ओढवला. कँडीनीं सरकारदरबारीं आपली बाजू मांडण्यासाठीं बराच पत्रव्यवहार केला; परंतु त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं व शेवटीं इंग्लंडच्या राणीसाहेबांकडून या निर्णयावर शिक्कामोर्तब केला गेला. [६८]

अशाप्रकारें स्थानभ्रष्ट झालेल्या कँडीचें आर्थिक दृष्टयाहि फार नुकसान झालें. दरमहा सहाशें रुपयावरून दोनशें सदसष्ट रुपयांवर त्यांना मराठी ट्रॅन्स्लेटरचें काम करावें लागलें. न कुरकुरतां इ. स. १८६३ पर्यंत ही पगारकपात त्यांनीं सहन केली व त्यानंतर त्यांनीं आपली बाजू सरकारकडे मांडली. [६९] आपल्या कैफियतींत ते म्हणतात कीं शिक्षणक्षेत्रांत काम करण्याच्या हेतूनें आपण लष्करी नोकरींत काम करण्यास असमर्थ (invalid) असल्याचेंहि इ. स. १८५० मध्यें ठरवून घेतलें होतें. इ. स. १८६३ मध्यें, बेचाळीस वर्षांच्या नोकरीनंतरची कँडीची ही आर्थिक हलाखी पाहून सरकारनें त्यांची Classifier of Records म्हणून नेमणूक करून त्यांना या कामाबद्दल दरमहा तीनशें रुपये द्यावयाचें ठरविलें. हिंदुस्थान सरकार इ. स. १८५७ मध्यें निर्माण झालेल्या राजकीय अरिष्टाशीं तोंड देत असल्यामुळें आपण इ. स. १८५७ पासून इ. स. १८६३ पर्यंत आपल्या अडचणी सरकारपुढें मांडल्या नाहींत असें वरील कैफियतींत ते लिहितात. त्यांची ही भूमिका पाहिली कीं त्यांच्या त्यागबुद्धीची कल्पना येते. पुढें पुन्हां एकदां त्यांनीं सरकारकडे आपल्या आर्थिक नुकसानीचा पाढा वाचला व त्यामुळें त्यांना इ. स. १८६५ मध्यें त्यांच्या क्रमिक पुस्तकांच्या रचनाकार्याबद्दल तीन हजार रुपये बक्षिस म्हणून मिळाले. [७०]

---

६६ *D. P. I. Poona College, Vol. 18.* 1856. pp. 519-543.

६७ *D. P. I. Board of Education, Poona College.* 1853. pp. 597-600.

६८ *D. P. I. Poona College. Vol. 17.* 1858. pp. 345-365.

६९ *D. P. I. Translation Department.* Vol. *16.* 1863-64. pp. 115-116.

७० *D. P. I. Translation Department. Vol. 17.* 1864-65. p. 50.

कँडीनीं इ. स. १८७३ पर्यंत मराठी ट्रॅन्स्लेटर म्हणून काम केलें. या मुदतींत इतरांनीं लिहिलेलीं शालेय पुस्तकें तपासण्याचें व स्वतः शालेय पुस्तकें लिहिण्याचें काम त्यांनीं केलें. याशिवाय बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या इंग्रजी नियमांचें मराठी भाषांतर इंडियन पीनल कोडचें मराठी भाषांतर हीं सुद्धां त्यांच्या नांवें जमा आहेत. त्यांचें पुस्तकें तपासण्याचें काम कसें चाले याबद्दल विनायक कौंडदेव ओक लिहितात :-

"ते ग्रंथ किती आस्थेनें पाहात असत, ह्याची माहिती ज्यांचे ग्रंथ त्यांनीं तपासून नीट केलेले आहेत, त्यांसच आहे. इतरांस त्याची कल्पना यावयाची नाहीं, ते अनुस्वारविसर्गापर्यंत बारीक पाहात असत. तरी त्यामध्यें त्यांचें एक मोठें धोरण हें असे कीं, कोणाही लेखकाची हिंमत खचूं द्यावयाची नाहीं. चुक्या दाखवायाच्या, ग्रंथ शुद्ध करावयाचा, आणि त्या रीतीनें तो सुधारण्यास ग्रंथकारास सुचवायाचें. तें इतकें जपून करावयाचें कीं, पुस्तक 'वाईट' असें कधीं सहसा म्हणायाचें नाहीं. तितकाच प्रसंग आला, तर 'चांगलें नाहीं' म्हणायाचें. दुखवायाचें नाहीं. हातपाय मोडावयाचे नाहींत. कां कीं, आपण इंग्लिश लोक जसे इतर अनेक विषय हिंदुस्थानच्या प्रजाजनांस शिकवीत आहों, तसें स्वभाषेचें ग्रंथलेखन हेंही त्यांना शिकवायाचें आपलें काम आहे, अशी यांची बुद्धि नेहमीं असे. तिचा फार उपयोग झाला आहे. मराठींत चांगले ग्रंथकार तयार करण्याकडे त्यांचा ओढा त्यांच्या अभिप्रायांत उघड दिसून येत असे." [७१]

निरनिराळ्या विषयांच्या अनेक शालेय पुस्तकांवर त्यांनीं दिलेल्या भाषा-विषयक अभिप्रायांपैकीं कांहीं ठिकठिकाणीं दिलेले आहेत. त्यांवरून मराठी भाषेंत चांगले ग्रंथकार निर्माण करण्याची व व्याकरणशुद्ध मराठी भाषा लिहून घेण्याची त्यांची धडपड दिसून येते. त्या धडपडीचें श्रेय म्हणजेच एकोणिसाव्या शतकांत मराठी भाषेला लागलेलें नवीन वळण होय.

"मेजर क्यांडी हे भक्तिमान खिस्ती होते म्हणून त्यांनीं परोपकारी व धर्म-संबंधी खिस्ती मंडळाच्या कामासहि फार सहाय केलें. पवित्रशास्त्राचें मराठी भाषांतर करण्याकरितां त्यांनीं व मि० मोल्स्वर्थ यांनीं फार चांगले शब्द निवडून दिले, आणि भाषांतराच्या कामींहि योग्य अभिप्राय वगैरे देऊन मदत केली."[७२] याशिवाय 'खऱ्या धर्माचीं चिन्हें' (१८२९), 'भाव कोणावर ठेवावा' (१८२९), 'खरा मार्ग कोणता याचा विचार' (१८३०), 'येशू खिस्तानें जी प्रार्थना आपल्या शिष्यास सांगितली तिजवर टीका' (१८३६), 'देवाच्या दहा आज्ञा,' 'खरा धर्म' इत्यादि खिस्तीधर्म-

---

७१ **बालबोध**, पु. ३०, अं. ११. १९११. पृ. २४६.

७२ **ज्ञानोदय**. पु. ३६, अं. ११. १८७७. पृ. १२५.

प्रसारार्थ उपयोगी पुस्तकें त्यांनीं लिहिलीं. हीं सर्व पुस्तकें अहमदनगर येथील अमेरिकन मिशनच्या कार्यालयांत पहावयास मिळतात. खिस्ती धर्माच्या प्रसारासाठीं इ. स. १८२७ मध्यें स्थापन झालेल्या 'The Bombay Auxiliary Religious Society' ला सुरुवातीपासून मदत करणारांपैकीं मेजर कँडी हे एक होते. या संस्थेच्या वतीनें वर दिलेलीं धर्मपर पुस्तकें प्रसिद्ध झालीं. त्यांच्या नांवावर मराठी भाषेंत लिहिलेलें 'Account of Missionaries' नांवाचें एक पुस्तक असल्याचा उल्लेख सांपडतो; [७३] परंतु तें उपलब्ध नाहीं.

सुमारें पन्नास वर्षें मराठी भाषेची सेवा केल्यानंतर मेजर कँडीनीं दृष्टिमांद्यामुळें तारीख २१ ऑगस्ट, १८७६ रोजीं आपल्या जागेचा राजीनामा सरकारकडे सादर केला. त्यावेळीं जड अंत:करणानें ते लिहितात :–

"I regret to say that the dimness of my sight has increased and is increasing so that I find it difficult to do my work I feel it my duty, therefore, to resign the appointment of Marathi Translator in the Educational Department ... It is with much regret that I seek the severance of my connection with the Department of Education and Marathi literature, a connection which commenced 50 years ago when (in 1826) I was taken from my Regiment and appointed to assist Captain Molesworth in the preparation of first Dictionary." [७४]

सरकारनें कँडीच्या राजीनाम्याचा स्वीकार तितक्याच नाइलाजानें तारीख ३ नोव्हेंबर, १८७६ रोजीं केला.

पुढें थोड्याच दिवसांत तारीख २६ फेब्रुआरी, १८७७ रोजीं महाबळेश्वर येथें ते मरण पावले. त्यांच्या अंतकाळचें वर्णन करतांना 'ज्ञानोदय' कार लिहितात :–

"शेवटीं ते कांहीं दिवस आजारी पडून त्यांस औषधोपचार चालले होते, व त्यांची प्रकृति अमळ बरी दिसूं लागली होती. 'मरून खिस्ताकडे जावें अशी माझी इच्छा आहे,' असें त्यानीं आपल्या कुटुंबास सांगितलें. शेवटच्या दिवशीं त्यांची मडम त्यांच्यापाशीं बसली असतां तिनें विचारल्यावरून त्यांनीं सांगितलें कीं, आतां माझ्या शरीरांत कोठें दुखत नाहीं. म्हणून त्यांची अत्यवस्था आहे असें कोणास वाटलें नाहीं; तरी एकाएकीं त्यांचा प्राण निघून गेला. याप्रमाणें त्यांचा अंतकाळ झाला." [७५]

---

[७३] *Twelfth Report of the Bombay Tract and Book Society.* 1840. p 23.

[७४] *D. P. I. Translation Department. Vol. 37.* 1876-77. (No paging.)

[७५] **ज्ञानोदय**, पु. ३६, अं. ११. १८७७. पृ. १२५–१२६.

प्रकरण अकरावें

गणितविषयक शालेय पुस्तकें

जॉर्ज जर्विस व स्थापत्य शाळा.

सर जॉन माल्कम मुंबई प्रांताचा गव्हर्नर असतांना इ. स. १८२८ मध्यें त्यानें आपले शिक्षणविषयक विचार व्यक्त केले होते. त्यावेळीं जॉर्ज जर्विस यानें इ. स. १८२३ मध्यें सुरू केलेल्या 'A Seminary for the Instruction of Natives in Engineering' या संस्थेबद्दल आदराचे उद्‌गार काढून तो म्हणतो :—

"Nothing can be more foreign to the habits of intrigue or gradually more subversive of those superstitions, prejudices for which the Brahmins are so remarkable than the studies and persuits to which those educated at this Institution will be devoted and while the knowledge of mathematics and other sciences which they attain are calculated to instill insensibly the love of truth into their minds." [१]

वरील अवतरणांत ज्या संस्थेची स्तुति माल्कमनें केली आहे त्या संस्थेंत विद्यार्थ्यांना अंकगणित, बीजगणित, भूमिति, drawing, architecture, mechanics इत्यादि विषय शिकविले जात. विद्यार्थ्यांमध्यें बुद्धीला पटणाऱ्या सत्याचा शोध लावण्याची प्रवृत्ति निर्माण व्हावी, या कल्पनेनें वरील विषय त्यांना शिकविले जात. इंग्लंडमध्यें ज्याप्रमाणें रेफर्मेशनच्या पूर्वी सर्व विषयांवरील पुस्तकें ग्रीक अगर लॅटिन या भाषांत होतीं, परंतु नंतर त्यांचीं भाषांतरें लोकभाषांत होऊन ज्ञानप्रसाराला मदत झाली, त्याप्रमाणें येथें होणें आवश्यक आहे, अशी तत्कालीन सरकारी अधिकाऱ्यांची कल्पना होती. उपरिनिर्दिष्ट स्थापत्यशाळेचा मुख्य आणि मुंबईच्या हैंदशाळा शाळापुस्तकमंडळीचा युरोपियन 'सक्रतार' जॉर्ज जर्विस यानें शाळापुस्तकमंडळीला शालेय पुस्तकें तयार करण्याबद्दल ज्या सूचना दिल्या होत्या, त्यांत गणित, भूगोल, इतिहास, पदार्थविज्ञानशास्त्र या विषयांवरील पुस्तकांची आवश्यकता प्रतिपादन केली होती. गणित या विषयाबद्दल जर्विस लिहितो :—

---

१ *G. D. Vol.* 10/163 1828. pp. 48–49.

"... A simplified system of Arithmetic giving the easiest method of solving those practical questions which are now so abstruse to the natives after going through these elementary studies, the committee consider the scholars prepared." [२]

गणितविषक पुस्तकांसंबंधीं सरकारी धोरण.

अशाप्रकारें, शालेय पुस्तकांचा आराखडा तयार करणाऱ्या खास पुस्तक समितीनें—जॉर्ज जार्विस यां समितीचा सभासद होता—केलेल्या सूचना सरकारनें मान्य केल्या. शाळापुस्तक मंडळीनें आपल्या कामाची रूपरेषा सरकारला निवेदन केली, त्यांत मंडळीनें सरकारला कळविलें :—

"A translation also into Muratha of the course of Practical Geometry' compiled by Colonel Pasley of the Royal Engineers, will be furnished in a few days. A work of this kind is indispensible to convey a high understanding of the terms of the science; the nomenclature of the provincial dialects being inadequate to make the commonest definition intelligible, in a study entirely novel to the natives without the detailed explanations given in this course. This work will be a valuable introduction to the study of 'the Elements of Geometry' and the Secretary has consented to give a Maratha translation of that portion of them which is contained in 'Doctor Hutton's Course of Mathematics;' a portion deemed quite sufficient in the first instance to which will be added their application to practise in mensuration etc." [३]

वर दर्शविल्याप्रमाणें शाळापुस्तक मंडळी व सरकार यांच्यामध्यें विचारविनिमय होऊन गणितविषयक शालेय पुस्तकें रचण्याचें ठरलें. पाश्चात्य पद्धतीला अनुसरून, शाळापुस्तक मंडळीचे एक पंडित जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांच्या मदतीनें जॉर्ज जर्विसनें अंकगणित, कर्तव्यभूमिति, आदिकरणभूमिति, बीजगणित, त्रिकोणमिति, क्षेत्रफळघनफळ, लाग्रतम् इत्यादि विषयांवरील पुस्तक तयार केलीं. हीं सर्व पुस्तकें बारकाईनें पाहणें आवश्यक आहे; कारण या पुस्तकांमुळें मराठी भाषेंत पाश्चात्य

---

२ *G. D. Vol. 63.* 1824. p. 112.

३ Ibid. pp. 364-365.

पद्धतीवर गणितविद्येचा पाया घातला गेला. वरील विषयावर पुस्तकें तयार होत गेलीं व तीं 'शिक्षामाला' या नांवानें दोन भागांत प्रसिद्ध झालीं. दादोबा पांडुरंग आत्मचरित्रांत या पुस्तकांबद्दल लिहितातः—

"Captain G. R. Jervis साहेब यांणीं सन १८२७ त Hutton's Course of Mathematics या गणितविषयक पुस्तकाचा तर्जुमा करून छापिला. त्याचे दोन भाग झाले. पूर्णांक, अपूर्णांक, गणित हा एक भाग. बीजगणित, भूमिति, त्रिकोणामिति, क्षेत्रफळ, घनफळ व लाग्रत्तम हा दुसरा भाग. या शिवाय आणखी त्या साहेबानें Pasley's Practical Geometry म्हणजे कर्तव्यभूमिति हें एक तिसरें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें होतें. या गणित पुस्तकाचे निरनिराळे प्रकरणांचीं निरनिराळीं पुस्तकें जशीं जशीं तयार होत गेलीं, तशीं एका सांच्याचीं छापून प्रसिद्ध होत गेलीं. तीं शिकणारांस विकत मिळत आणि पुढें तीं एकत्र करून त्यांचे वर सांगितलेले दोन भाग बांधले." ४

जॉर्ज जर्विस यानें तयार केलेल्या या पुस्तकांबद्दल सरकारकडून त्याला मिळालेल्या बक्षिसांचा हिशेब सरकारी दप्तरखान्यांत पहावयास मिळतो. पूर्णांक व अपूर्णांक यावरील पुस्तकें व कर्तव्यभूमिति आणि लोगॅरिथम याबद्दल तीन हजार रुपये आणि आदिकरण भूमिति व बीजगणित यांवरील पुस्तकांबद्दल सहा हजार रुपये जर्विसला मिळाले. ५

अंकगणितावरील पुस्तकें

उपरिनिर्दिष्ट गणितविषयक पुस्तकांपैकीं प्रथम तयार झालेलें पुस्तक 'गणितकृति अथवा गणितमार्ग' हें होय. हें भाषांतरित पुस्तक तयार करतांना भाषाविषयक अडचणी निर्माण होणें साहजिक होतें. पारिभाषिक शब्द वापरण्याची ही सुरुवात होती. असे शब्द तयार करतांना संस्कृत भाषेची मदत घेणें आवश्यक होतें व तशी ती घेतली गेली; कारण भाषांतरकार म्हणतो :—

"हा गणितमार्ग महाराष्ट्र भाषेंत दाखवितों यांत कितेक पदार्थांची नावें या भाषेंत अप्रसिद्ध आहेत त्यास संस्कृत शब्दैंकरूनच लिहिलीं आहेत व या मुलकाचे व्यवहारांत अनेक भाषांचे शब्द येतात परंतु यांत बहुतकरून महाराष्ट्र शब्दच लिहितों." ६

---

४ अनंत काकबा प्रियोळकर, **रावसाहेब दादोबा पांडुरंग**. १९४७. पृ. ३५.

५ *G. D. Vol.* 237. 1831. p. 81.

६ जॉर्ज जर्विस, **गणितकृति अथवा गणितमार्ग**. आ. २. १८२६. पृ. १.

वरील सूचना ध्यानीं ठेवून या पुस्तकाची तपासणी केल्यास त्यांत संख्यापरिमाण, कार्यप्रकाशकचिन्हें, त्रिराशीगणित, आदौअंतीं इत्यादि संस्कृत सामासिक शब्द आढळतात. प्राथमिक अवस्थेमध्यें कोणत्याहि शास्त्रीय विषयावरील विवेचन हें परिपूर्ण आणि विस्तृत असूं शकत नाहीं; त्यामुळें या व इतर गणितविषयक पुस्तकांत प्रत्येक विषयाची व्याख्यारूपानें ओळख करून दिलेली दिसते. उदाहरणार्थ :—

"मेळवणी म्हणजे अनेक रकमा एकत्र मिळवोन एकंदर बेरीज जाणावयाचा प्रकार." ७

"वजाबाकी म्हणजे एके अंकाहून दुसरा अंक किती अधिक आहे त्या दोहों अंकामध्यें जें अंतर आहे त्यास बाकी म्हणावी." ८

अशा पद्धतीनें प्रत्येक विषयाच्या लहान लहान व्याख्या देऊन त्याखालीं त्यांचें प्रात्यक्षिक म्हणून कांहीं उदाहरणें सोडवून दाखविलेलीं आहेत.

'गणितमार्ग' या पुस्तकानंतर तयार झालेलें दुसरें पुस्तक म्हणजे 'गणित दुसरा भाग अपूर्णांक' हें होय. या पुस्तकाची आवश्यकता प्रतिपादितांना लेखक जॉर्ज जर्विस म्हणतोः—

"याचा पूर्वी पूर्णांकांचा गणितमार्ग लिहिला. परंतु सर्वत्र पूर्णांकगणितानींच निर्वाह होत नाहीं याजकरितां अपूर्णांक गणिताचा मार्ग दाखवितो...हें अपूर्णांक गणित व्यवहारांत फार लोक घेतात झोटें उपयोगी आहे व याचा रीती बहुत प्रकारचा आहेत." ९

प्रथम भागांत दिलेल्या सूचनेप्रमाणें याहि भागांत अप्रसिद्ध पदार्थांचीं नांवे 'संस्कृत शब्देंकरून लिहिलीं आहेत.' कित्येक ठिकाणीं भाषा इतकी संस्कृतमय झालेली आहे कीं सर्वसाधारण विद्यार्थ्याला ती समजणें कठीण वाटतें. उदाहरणार्थः—

"इष्टराशिसाधन म्हणजे कित्येक प्रश्नांचीं उत्तरें उघड करायाची एक रीति आहे. किं जा प्रश्नाचीं उत्तरें साधारण पूर्वरीतींकरून उघड होत नाहींत. कोणेवेळेस या रीतीस मिथ्यामनोधृत म्हणतात. कारण सत्यसंख्येप्रमाणें मनःकल्पित मिथ्यासंख्यानी काम केल्यापासून शेवटीं सत्यसंख्या उत्पन्न होत्ये. कोणी या रीतीस चुकशोध म्हणतात कारण मिथ्यासंख्यांचे तपशीलानें शोध करितात. आणि चुक मिळविल्यापासून सत्यसंख्या उत्पन्न होत्ये." १०

---

७ जॉर्ज जर्विस, **गणितकृति अथवा गणितमार्ग.** आ. २.१८२६. पृ. ६.

तत्रैव. पृ. ९.

९ जॉर्ज जर्विस, **गणित दुसरा भाग, अपूर्णांक.** १८२६. पृ. ३–४.

१० तत्रैव. पृ. २००–२०१.

यासारखीं पुष्कळ उदाहरणें या पुस्तकांत दाखवून देणें शक्य आहे. या पुस्तकांतील प्रभागजातिअपूर्णांक, भागानुबंधपूर्णांक इत्यादि संस्कृत सामासिक शब्द पाहिले कीं जगन्नाथशास्त्री क्रमवंतांनीं हीं गणितविषयक पुस्तकें तयार करण्यांत जॉर्ज जर्विसला किती साहाय्य केलें असेल याची कल्पना येते.

वर उल्लेखिलेल्या पूर्णांक व अपूर्णांक या विषयावरील तयार झालेलीं दोन पुस्तकें एकत्र करून आणि 'वहिवाटवहि आणि नाण्याचे तपासणीचें वर्तमान' हे विषय जोडून एक स्वतंत्र ग्रंथ तयार झाला. प्राथमिक अवस्थेंत गणित विषयावर तयार झालेल्या पुस्तकांत अगदींच तोकडी माहिती होती; परंतु या विषयाचें सविस्तर विवरण करण्याच्या दृष्टीनें पहिल्या भाषांतरांत थोडा बदल करून व त्यांत थोडी भर घालून 'गणित वहिवाटवहि आणि नाण्याचे तपासणीचें वर्तमान' या नांवें इ. स. १८२८ मध्यें ४७० पृष्ठांचा एक मोठा ग्रंथ जॉर्ज जर्विसनें प्रसिद्ध केला 'मूळ पुस्तकें इंग्रजी भाषेंत आहेत त्यांचे कवी डांकतर चार्लस हटन आणि बाणि कांस्टेल साहेब त्या पुस्तकांचें भाषांतर क्यापटन जॉर्ज जार्विस साहेब इंजनेर यांनीं महाराष्ट्र भाषेंत केलें,' असें छापून जर्विसनें जगन्नाथ शास्त्री क्रमवंत यांच्या नांवाला फाटा दिलेला दिसतो.

अंकगणित व परिभाषा

जॉर्ज जर्विसच्या या श्रमामुळें गणितविषयक इंग्रजी शब्दांना मराठी पारिभाषिक शब्द या वेळेपासून तयार होऊं लागले. सांकळरीति (Chainrule of three), रूपभेद (Reduction of decimals), घातकर्म (Involution), मूलकर्म (Evolution), श्रेणी (Progressions), सर्कत (Fellowship) इत्यादि यावेळीं बनविलेले शब्द आजपर्यंत उपयोगांत आणिले जातात. त्यांचें मूळ जर्विसनें केलेल्या या गणितविषयक पुस्तकांत आढळतें. पारिभाषिक शब्द बनविण्याचा कठीण प्रश्न जर्विसच्याकाळीं किती सुलभतेनें सोडविला गेला हें या पुस्तकावरून दिसून येतें. या पुस्तकांमधील वहिवाटवहि अथवा जमाखर्च हा भाग नवीनप्रकारें हिशेब लिहिण्याच्या पद्धतीसंबंधीं आहे.

घेतलेल्या उदाहरणांतील हरि केशवजी, गोविंद नारायण, गोपाळराव देशमुख इत्यादि नांवें पाहून खरोखरच या व्यक्ती लेखकाच्या नजरेसमोर होत्या कीं काय असें वाटतें. तसेंच 'Book-keeping' या शब्दाचें 'वहिवाटवहि' हें रूपांतरहि गमतीचें वाटतें.

इ. स. १८४० नंतर

इ. स. १८४० पर्यंत वर उल्लेखिलेलीं पुस्तकें शाळांमधून वापरलीं जात. इ. स. १८४० मध्यें शालेय पुस्तकांची फेरतपासणी करण्यासाठीं शिक्षामंडळीनें एक समिति नेमली. या समितींतील एक सभासद मेजर कॅंडी यांनीं गणितावरील पुस्तकांबाबत अशीं सूचना केलीं कीं 'शिक्षामाला' या ग्रंथांचे लहान लहान भाग करून तें वापरावे. [११] या सूचनेप्रमाणें इ. स. १८४० मध्यें 'अंकगणित पूर्णांक' व 'अंकगणित अपूर्णांक' अशीं दोन पुस्तकें तयार झालीं. जर्विसच्या 'पूर्णांक' व 'अपूर्णांक' या पुस्तकांत फेरफार करूनच नवीन पुस्तकें निर्माण झालीं. 'जार्ज जार्विससाहेब यांणें केलेला जो अपूर्णांक ग्रंथ त्याच्या आधारानें व कांहीं अन्य ग्रंथाच्या आधारानें हा ग्रंथ विद्याभ्यास करणारे मुलांसाठीं सिद्ध केला आहे,' अशी 'सूचना' 'अंकगणित दुसरा भाग अपूर्णांक' (१८४०) या पुस्तकांत दिलेली आढळते. हे फेरफार जर्विसला पसंत पडले नाहींत; कारण या पुस्तकांबद्दल तो लिहितो :—

"I desire their utmost improvement and am merely induced to ask for the foregoing, in consequence of my previous translations having been disfigured by unauthorized and many useless interpolations and abridgements made by those persons entrusted with their republications."[१२]

नवीन पुस्तकें जर्विसला न आवडलीं तरीसुद्धां तीं कांहीं काळ शाळांमधून वापरलीं गेलीं. पुढें जर्विसनेंच इ. स. १८४९ मध्यें डमॉर्गनच्या 'Elements of Arithmetic' आणि 'Elements of Algebra' या दोन पुस्तकांचीं भाषांतरें तयार करून तीं सरकारकडे मान्यतेसाठीं पाठवून दिलीं आणि सरकारला विनंति केली कीं अद्यापपर्यंत वापरांत असलेलीं डॉ. हटन व बॉनिकॅसल् यांच्या पुस्तकांचीं भाषांतरें तितकीशीं उपयुक्त नसल्यामुळें तीं काढून टाकावीं. जर्विस आपल्या पत्रांत लिहितो :—

"Government will, if they condescend to accept of these their fruits, direct these Treatises of De Morgan, so preeminently adapted, for the cultivation of the intellectual faculties, may now be substituted as text-books in all schools, in supercession of the less perfect productions of Hutton, which appeal only to the memory." [१३]

---

११ *G. D. Vol.* 24A / 749 A. 1843. p. 655.

१२ *D. P. I. Board of Education, Government.* 1849. p. .237.

१३ *G. D. Vol. 64.* 1849. pp. 110-111.

शास्त्रीय विषयांवरील पुस्तकें कशीं भाषांतरित करावीं ?

बुद्धीची वाढ करण्याच्या दृष्टीनें हीं नवीन पुस्तकें जास्त उपयुक्त असून, पूर्वीचीं फक्त घोकंपट्टीला योग्य होतीं असें सांगून याच पत्रांत जर्विस म्हणतो कीं, दोन वर्षें खपून हीं भाषांतरें तीन विद्वान ब्राह्मणांच्या मदतीनें आपण तयार केलीं आहेत. हे तीन ब्राह्मण म्हणजे विष्णु सुंदर छत्रे, गंगाधरशास्त्री फडके आणि गोविंद गंगाधर फडके हे होत. या तिघांना प्रत्येकीं पांचशें रुपये बक्षिसादाखल देण्याचीहि जर्विसनें या पत्रांत विनंति केली होती. पत्रासोबत पुस्तकांबद्दलचीं मेजर कँडी, मोरशास्त्री साठे, शंकर जोशी, रे. विल्सन इत्यादिकांचीं मतेंहि जर्विसनें पाठविलीं होतीं. मोरशास्त्री साठे व शंकर जोशी यांनीं मत देतांना स्पष्टच लिहिलें कीं, हा विषय व पद्धति आपणांस नवीनच असल्यामुळें आपण विशेष कांहीं सांगूं शकत नाहीं; परंतु मेजर कँडीनीं आपलें मत असें दिलें :—

"I have looked at several parts of your translation; and compared them with the original. My general impression is that your rendering is faithful. I look on the work you have undertaken, to be a very arduous one, and I dare say that if 20 men sat down to translate the book, the rendering of every one would be in many points diverse from the rendering of the rest.

"You and I differ somewhat, I think, in some principles of translation: you keep closer to the structure of the English than I like, and thereby, I think, are sometimes obscure; but then everyone has his particular style, both of composition and translation, and it is natural that we should all prefer our own." [१४]

शास्त्रीय विषयावरील इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें करतांना कोणती खबरदारी घ्यावी याबाबतचें कँडीचें वरील मत विचारार्ह आहे. भाषांतर करतांना मूळ इंग्रजी रचनेला चिकटून राहिल्यानें भाषांतरांत एकप्रकारची कृत्रिमता व अगम्यता येते हें खरें आहे; परंतु कँडीचे हे विचार जर्विसला पटले नाहींत. या मुद्याबाबत जर्विस म्हणतोः—

---

१४ *G. D. Vol. 64.* 1849. p. 108.

"Mathematical language must be exact. In the exact sciences, loose, ambiguous language cannot be admitted. There is no obscurity in my translation but mere exactitude."[१५]

अशाप्रकारें भाषांतरित पुस्तकें व त्यांवरील विद्वानांचीं मतें जर्विसनें सरकारजवळ पाठवून दिलीं. सरकारनें मोठ्या आनंदानें त्या पुस्तकांचा स्वीकार केला व तीं अमेरिकन मिशनच्या छापखान्याकडे छपण्यासाठीं पाठवून दिलीं. यावेळीं सरकारनें जर्विसबद्दल मानाचे उद्‌गार काढले. सरकारी खलित्यांत पुढील मजकूर सांपडतोः-

"The translator Colonel Jervis is a rare if not a solitary instance...and it would scarcely be fair to him to be guided in our estimate of the value of these works by the opinions of mathematicians who were no linguists or of linguists who were no mathematicians." [१६]

ड मार्गन याचा अंकगणिताचा मूळपीठिका

वरील शब्दांत सरकारनें गणिती व भाषातज्ज्ञ म्हणून जर्विसची स्तुति केली. एवढा मोठा मान ज्यामुळें जर्विसला मिळाला त्या 'ड मार्गन याचा अंकगणिताचा मूळपीठिका' (१८५०) तपासून पाहणें जरूर आहे. गणितासारख्या विषयाचें महत्त्व वर्णितांना जर्विस म्हणतोः-

"ज्ञानप्राप्ती स्वकष्टानें आणि स्वविचारानें होती. दुसऱ्याचे सांगण्यावरून केवळ पाठ करणें, हा ज्ञानप्राप्तीचा उपाय नव्हे. जें कांहीं करायाचें त्याचें कारण सांगण्याची अवश्य संवय केली पाहिजे. अशी संवय करण्यास, जरी पहिल्यानें अवघड वाटतें, तथापि ती अभ्यासानें सोपी होती. आणि एकदां संवय झाली, ह्मणजे, ती कधीं सुटत नाहीं." [१७]

हा हेतु समोर ठेवून हें पुस्तक जर्विसनें भाषांतरित केलें. हटनच्या इंग्रजी पुस्तकाच्या भाषांतरांत केवळ व्याख्यारूपानें विषयाची माहिती दिलेली आढळते, पण या पुस्तकांत प्रत्येक विषयाचें विवरण केलेलें आहे. एकाद्या ठिकाणीं 'पुष्कळपणीं' (in abundance) सारखा विचित्र शब्दप्रयोग दिसतो. कॅंडीच्या म्हणण्याप्रमाणें जर्विसचें हें भाषांतर मूळ इंग्रजी रचनेला धरून असल्यामुळें भाषांतरांत कृत्रिमता आली आहे.

---

१५ *G. D. Vol. 64.* 1849. p. 108.

१६ Ibid. (Marginal note.) pp. 117–118.

१७ जॉर्ज जर्विस, **डमार्गन याचा अंकगणिताचा मूळपीठिका**. १८५०. पृ. १.

शास्त्रीमंडळीच्या मदतीमुळें भाषांतरांत संस्कृतप्रचुरता येणें अटळ होतें. 'बीज-रूपपद्धति' 'दशगुण', 'गुणितांश' 'वित्तविषय' इत्यादि शब्द वापरल्यामुळें सर्वसामान्य विषयाचें आकलन होणें कठीण व्हावें हें स्वाभाविक आहे.

कॅप्टन् जॉर्ज रिस्टो जर्विस (१७९४–१८५१)

माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन मुंबई प्रांताचा गव्हर्नर झाल्यावर त्याचें ज्ञानप्रसाराचें उदार धोरण पद्धतशीररीत्या अमलांत आणणाऱ्यांपैकीं जॉर्ज जर्विस हे एक होत. 'मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी' या संस्थेचे ते पहिले युरोपियन सेक्रेटरी होते. त्यांचे धाकटे बंधु ले. कर्नल टॉमस बेस्ट जर्विस (१७९६–१८५७) यांचें चरित्र त्यांचा मुलगा डब्ल्यू. पी. जर्विस यानें पित्याची शतसांवत्सरिक पुण्य-स्मृति म्हणून इ. स. १८९८ मध्यें लिहिलें; परंतु त्या ग्रंथांत जॉर्ज जर्विसबद्दल फारच थोडा उल्लेख आढळतो. जॉर्जचा जन्म ६ ऑक्टोबर, १७९४ मध्यें झाला. इ. स. १८०८ मध्यें त्यांची वुलविच येथील रॉयल मिलिटरी ॲकॅडॅमीमध्यें कॅडेट म्हणून निवड झाली व १८११ मध्यें प्रथम हिंदुस्थानांत आले. १८१८ मध्यें पेंढाऱ्यांच्या युद्धांत त्यांनीं भाग घेतला व कांहीं काळ रजेवर गेले. पुढें इ. स. १८२२ मध्यें चीफ इंजिनिअरचे असिस्टंट म्हणून ते परत आले. या वेळेपासून मुंबईच्या शाळापुस्तक मंडळीशीं त्यांचा संबंध आला आणि कांहीं दिवसांतच या संस्थेचे चिटणीस म्हणून त्यांची नेमणूक झाली. यावेळीं ते मुंबईला मुख्य इंजिनिअर असून त्यांना कॅप्टन हा हुद्दा प्राप्त झाला होता. याच सुमारास तारीख १८ एप्रिल, इ. स. १८२३ रोजीं त्यांनीं 'एंजिनिअरिंग इन्स्टिटयूशन' चालू केली. या संस्थेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अंकगणित, बीजगणित, भूमिति, क्षेत्रफळ घनफळ, त्रिकोणमिति, लोगॅरिथम् इत्यादि विषय शिकविणें आवश्यक असल्यामुळें व हे विषय देशभाषेंतून शिकविल्याशिवाय मुलांना समजणार नाहींत हें जाणून त्यांनीं शाळापुस्तक मंडळीच्या पदरीं असलेल्या जगन्नाथशास्त्री क्रमवंत या पंडिताच्या मदतीनें वर नमूद केलेल्या गणित शास्त्रा-वरील सर्व पुस्तकें मराठींत आणिलीं. त्याचबरोबर देशभाषांतून या व इतर पुस्तकांचा प्रसार व्हावा म्हणून सरकारी शिळाछापखान्यावर देखरेख करून त्यांनीं ज्ञान-प्रसाराचें मोठें काम केलें. आपल्या कामाचा उल्लेख ते स्वतः असा करितात :—

"In 1829 I was placed in charge of the Government Lithographic Establishment, the Educational Society and Engineer Institution. The examination I held of this latter before the judges of the Supreme Court, the Governor

and Commander–in-chief, led the Government to confide to me (at a subsequent period) the future examination of those educated at that institution." [१८]

१८३० पर्यंत शाळापुस्तक मंडळीचे चिटणीस म्हणून काम केल्यावर, त्यांची Inspecting Engineer in the Dukhan म्हणून पुण्यास बदली झाली. तोंपर्यंत त्यांनीं Dr. Hutton's Course of Mathematics, vol. I & II या ग्रंथांचीं भाषांतरें करून तीं 'शिक्षामाला' भाग १ व २ या नांवानें इ. स. १८२८ मध्यें प्रासिद्ध केलीं. तसेंच Col. Pasley's Practical Geometry या पुस्तकाचें 'कर्तव्य भूमिति' (१८२६) नामक भाषांतर केलें. गणितविषयक पुस्तकांशिवाय Lord Brougham's Treatise on the Objects, Advantages and Pleasures of knowledge या ग्रंथाचें भाषांतर 'विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष' (१८२९) हें जर्विसनीं तयार केलें. शालेय वाङ्मयांत त्यांनीं अशा रीतीनें भर घातली. याशिवाय त्यांची महत्त्वाची कामगिरी म्हणजे, इ. स. १८२७ मध्यें एल्फिन्स्टनची मुंबईचे गव्हर्नर म्हणून कारकीर्द संपल्यावर त्यांच्या स्मरणार्थ लोकांना उच्च शिक्षण देण्याच्या हेतूनें त्यांनीं पैसे जमविले. त्यांतूनच पुढें इ. स. १८३५ मध्यें एल्फिन्स्टन कॉलेज सुरू झालें.

जर्विसनीं शिक्षण क्षेत्रांत केलेल्या कामगिरीचा गौरव करण्याच्या हेतूनें, धाकजी दादाजी, जगन्नाथ शंकरशेट, सदाशिव काशीनाथ छत्रे, जमशेटजी जिजीभाई इत्यादि मुंबईच्या नागरिकांनीं, त्यांना तारीख १० मे, १८३० रोजीं एक मानपत्र व तीन हजार रुपये किंमतीचा अहेर अर्पण केला. या मानपत्रांत जर्विसबद्दल लिहिलें आहे:–

" During seven years that you have acted as Secretary to this Society, we have fully learned to appreciate the affable and conciliating manners, the conversancy with the native languages and customs, and the extensive literary and scientific acquirements which rendered you so peculiarly qualified for that situation and which has enabled you to promote so efficaciously the interests of the Society. " [१९]

यावरून जॉज जर्विस यांनीं लोकांचीं मनें किती जिंकून घेतलीं होतीं त्याची कल्पना येते. या समारंभाचें वर्णन Asiatic Journal, Vol. 3, New series,

---

१८ W. P. Jervis, *Thomas Best Jervis, A Centenary Tribute.* 1898. p. 33.

१९ *G. D. Vol. 6* 1830. p. 328.

Sept.-Dec. 1830, मध्यें पृ. १४२ वर पहावयास मिळतें. पुन्हां एकदां तारीख २२ फेब्रुआरी, १८३८ रोजीं त्यांच्या शिष्यांनीं व चहात्यांनीं त्यांना मानपत्र दिलें. कांहीं काळ इंग्लंडला घालविल्यावर, पुन्हां ते इकडे आले व इ. स. १८४३ ते १८४९ पर्यंत बोर्ड ऑफ् एज्युकेशनचे सभासद म्हणून त्यांनीं काम केलें. या काळांत अर्स्किन् पेरी हे बोर्डाचे अध्यक्ष होते. त्यांच्या कारकीर्दीत इंग्रजी-मराठी माध्यमवाद शिगेस पोहोंचला होता. या वादांत जर्विस यांनीं मराठी भाषेच्याद्वारा शिक्षणप्रसार व्हावा ही भूमिका घेऊन आपलीं मतें मांडलीं. बोर्डाच्या इ. स. १८४७-४८ च्या वार्षिक अहवालांत तीं पहावयास सांपडतात. मराठी भाषेच्या उपयुक्ततेबद्दल ते लिहितात :—

"The popular idioms, which have hitherto been employed only in a few meagre productions of the Chronicler and Minstrel must be summoned under our auspices, to act a new part, and consequently to reccive a new developement. In this way, we should endeavour to raise up a new world of Morality and Literature around the whole mass of native society and not contract their advancement solely within the bounds, which the tutelage of your English Government, and the medium of our English language would impose." २०

मातृभाषेंतून पाश्चात्य विद्यांचा प्रसार करतां येणें शक्य आहे हें गणित विषयक पुस्तकें मराठींत आणून त्यांनीं एकदां सिद्ध केलेंच होतें व फिरून 'डमार्गन याचा बीजगणिताचा मूळपीठिका' (१८४८) व 'डमार्गन याचा अंकगणिताचा मूळपीठिका' (१८५०) हीं दोन पुस्तकें तयार केलीं.

मराठी भाषिकांप्रमाणेंच गुजराती भाषिकांनाहि सज्ञान करण्याच्या उद्देशानें त्यांनीं पुष्कळ मराठी पुस्तकांचें गुजरातीकरण करवून घेतलें होतें. त्यांचीं स्वतःचीं पुस्तकें, त्याशिवाय मोल्स्वर्थची 'शालापद्धति', छत्रे यांची 'इसपनीति' व 'बाळमित्र', मेनवेअरिंगकृत 'भूगोल खगोल', दादोबांचें 'नकाशाचें पुस्तक', नाना नारायण यांचें 'इंग्लंड देशाचें वर्णन' फडकेकृत व्याकरण, बाळशास्त्री जांभेकर यांचें 'बालव्याकरण' व 'हिंदुस्थानचा इतिहास' इत्यादि बरींच पुस्तकें जर्विसच्या प्रोत्साहनामुळें गुजराती भाषेंत आलीं.

कॅ. जर्विस इ. स. १८५१ मध्यें बुलोन येथें मरण पावले.

---

२० *Report of the Board of Education*. 1847–48. p. 49.

केरो लक्ष्मण छत्रेकृत अंकगणित

इ. स. १८५५ पर्यंत शाळांमधून जर्विसकृत अंकगणिताचा उपयोग केला जात असे; परंतु त्यानंतर केरो लक्ष्मण छत्रे यांचीं त्या विषयावरील पुस्तकें तयार होऊन तीं मुलांच्या हातीं देण्यांत आलीं. विषयाचीं मूळ तत्त्वें जरी एकच असलीं, तरी रचनापद्धतींत फरक पडतोच. बदलत्या काळाला अनुसरून हीं नवीं पुस्तकें तयार झालीं. 'अंकगणित' (१८६०) हें पुस्तक प्रथमतः 'पहिले शिकगाराकरितां व मुख्यत्वेंकरून सरकारी मराठी शाळांच्या उपयोगाकरितां' केरो लक्ष्मण छत्रे यांनीं रचिलें. विषयांची विभागणी करून इयंत्तावार लहानलहान पुस्तकें बनविण्याबाबत झालेल्या पत्रव्यवहारांत 'A work on Arithmetic' बद्दल प्रो. मॅगड्रगल व छत्रे या दोघांचें एक पत्र उपलब्ध आहे.[२१] यावरून असें अनुमान निघतें कीं प्रथमतः दोघांनीं मिळून गणितावरील पुस्तक लिहिलें व नंतर मेजर कॅंडी यांच्या सूचनेवरहुकूम कांहीं फेरफार होऊन वर उल्लेखिलेलें केरोपंत छत्र्यांचें 'अंकगणित' बाहेर पडलें.

हें पुस्तक पाहिल्यावर जर्विसकृत गणिताची भाषा ओबड घोबड असल्याची जाणीव स्पष्ट होते. उदाहरणार्थ एकाच विषयाबद्दल दोघांनींहि लिहिलेल्या खालील ओळी पहा. जर्विस लिहितात :-

१ "मेळवणी ह्मणजे अनेक रकमा एकत्र मिळवोन एकंदर बेरीज जाणावयाचा प्रकार:"[२२]

२ "वजाबाकी ह्मणजे एके अंकाहून दुसरा अंक किती अधिक आहे त्या दोहों अंकामध्यें जें अंतर आहे त्यास बाकी म्हणतात."[२३]

याच व्याख्या छत्रे अशा देतात :—

(१) "अनेक रकमा एके ठिकाणीं करणें ती मिळवणी आणि ती जी बेरीज ती तीस बेरीज असें ह्मणतात."[२४]

(२) एका रकमेंतून दुसरी रकम कमी करून त्या दोन रकमांचें अंतर काढणें ह्यास वजाबाकी असें ह्मणतात."[२५]

थोडक्यांत, जर्विसपेक्षां केरोपंतांची लेखनपद्धति साधी, सोपी व सरळ असून जर्विस यांच्या लेखनांतील बोजडपणा येथें दिसत नाहीं.

---

२१ *D. P. I. Miscellaneous. Vol. 26.* 1858. p.159.

२२ जॉर्ज जर्विस, **गणितकृति अथवा गणितमार्ग.** आ. २. १८२६. पृ. ६.

२३ तत्रैव. पृ. ९.

२४ केरो लक्ष्मण छत्रे, **अंकगणित.** १८६०. पृ. ४.

२५ तत्रैव. पृ. ६.

छत्रे यांनीं 'अंकगणिता'ची रचना किती भागांत केली होती तें समजत नाहीं. वरील पुस्तकांवर 'पहिले शिकणारांकरितां व मुख्यत्वेंकरून सरकारी मराठी शाळांच्या उपयोगाकरितां' असें लिहिलेलें आहे त्याअर्थीं प्रौढ विद्यार्थ्यांसाठीं त्याचा पुढील भाग तयार झाला असावा; पण तो केव्हां झाला हें कळत नाहीं. मात्र त्यांच्या हयातींत इ. स. १८८२ मध्यें 'अंकगणित, उपपत्ति व उदाहरणें ह्यांसहित, भाग पहिला' तयार झाला.

इ. स. १८६० चें 'अंकगणित' व इ. स. १८८२ चें 'अंकगणित' यांत भाषेच्या दृष्टीनें विशेष फरक वाटत नाहीं. स्पष्टीकरणाच्या पद्धतींत थोडासा फरक भासतो. जी कल्पना, 'अनेक रकमा एके ठिकाणीं करणें ती मिळवणी आणि ती जी रकम येती तीस बेरीज, असें ह्मणतात' या शब्दांत व्यक्त झाली होती, तीच कल्पना नवीन पुस्तकांत, 'एकाच जातीच्या अनेक रकमा एके ठिकाणीं करणें त्यास मिळवणी, आणि मिळवणी करून जी रकम येत्ये तीस बेरीज, असें ह्मणतात' या शब्दांत दिलेली आढळते. शास्त्रीय विषयाच्या विवरणांत लागणारा भाषेचा काटेकोरपणा नवीन पुस्तकांत दिसून येतो.

केरो लक्ष्मण छत्रे यांच्या हयातींत इ. स. १८८२मध्यें तयार झालेले अंकगणिताचे दोन्ही भाग सुधारून पुढें इ. स. १८८८ मध्यें मोरो बल्लाळ धारप यांनीं छापिलेले आढळतात. सुधारलेल्या या पुस्तकांच्या तीन आवृत्त्यांनतर, नीलकंठ विश्वनाथ छत्रे यांना त्यांची आणखी सुधारलेली चौथी आवृत्ति इ. स. १८९६ मध्यें काढली. या आवृत्तीला जोडलेल्या प्रस्तावनेंत ते लिहितातः–

"मेहेरबान चाटफील्ड साहेब बहादूर डायरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रक्शन मुंबई, ह्यांनीं अंकगणित भाग १ ला व २ रा ह्या आमच्या वाडिलांच्या कृतींची मालकी आमचेकडे दिली ह्याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहें." २६

इतर लेखक

शाळांमधून वापरलीं जाणारीं पुस्तकें ज्याप्रमाणें शाळापुस्तक मंडळी अगर सरकारी विद्याखात्यातर्फे तयार केलीं जात, त्याचप्रमाणें खाजगीरीत्या तयार होणाऱ्या शालेय पुस्तकांनाही उत्तेजन मिळत असे. गणित विषयावर अशाप्रकारें अनेक पुस्तकें तयार झालीं होतीं. नारोशंकर दातारकृत 'पूर्णांक' (१८५८) व 'अपूर्णांक' (१८५९) नारो रघुनाथ मोहोळकरकृत 'वरावर्दी' (१८५७) वासुदेव मोरेश्वर पोतदारकृत 'अंक-गणित' (१८७६) विनायक गोविंद लिमयेकृत 'गणित विद्येचीं मूलतत्त्वें,' रावजी मोरे-

२६ केरो लक्ष्मण छत्रे, **अंकगणित, भाग २.** सुधारलेली चौथी आवृत्ति. १८९६. प्रस्तावना.

श्वर देवकुळेकृत 'तोंडचे हिशेब' (१८८३) इत्यादि पुस्तकें सांपडतात. या पुस्तकांच्या रचनेबद्दल अगर त्यांच्या लेखनपद्धतीबद्दल विशेष नमूद करण्यासारखें कांहींच नाहीं. विद्याखात्यातर्फे पसंत केलेल्या भाषापद्धतीनेंच तीं लिहिलीं गेल्यामुळें त्यांना खात्याचा आश्रय मिळूं शकला.

केरो लक्ष्मण छत्रे (१८२४–१८८४)

"There is little doubt that if Prof. Chhatre had had the advantages of scientific training in Europe, he would have made for himself a foremost name among the scientific men of the age." [२७]

या शब्दांत 'टाइम्स'सारख्या वर्तमानपत्रानें ज्यांचें वर्णन केल, ते केरो लक्ष्मण छत्रे इ. स. १८२४ मध्यें कुलाबा जिल्ह्यांतील नागांव येथें जन्मले. लहानपणींच वडील वारल्यामुळ त्यांचें शिक्षण मुंबईस त्यांच्या चुलत्यांकडे झालें. एल्फिन्स्टन कॉलेजमधील पहिल्या विद्यार्थ्यांपैकीं ते एक होते. प्रो. ओलबार व बाळशास्त्री जांभेकर यांचे ते आवडते शिष्य होते. कॉलेजमध्यें प्रो. ओर्लेबार व जर्विस यांनीं त्यांची परीक्षा घेतली तेव्हां ते पहिले आले. [२८] या विषयाची त्यांना इतकी आवड होती कीं जेवणावर भाताच्या चापटीवर सिद्धांत करण्यांत ते कित्येक घटका गुंग होऊन जेवायचें विसरत. [२९]

शिक्षणक्रम पुरा झाल्यावर वयाच्या सोळाव्या वर्षीं ते इ. स. १८४० मध्यें मुंबईच्या वेधशाळेंत दरमहा पन्नास रुपयांवर नोकरीला लागले. पुढें इ. स. १८५१ मध्यें पुणें कॉलेजमध्यें असिस्टंट प्रोफेसर, इ. स. १८६० मध्यें अहमदनगर येथील इंग्रजी शाळेंत मुख्याध्यापक, इ. स. १८६२ मध्यें पुणें ट्रेनिंग कॉलेजचे सुपरिंटेंडेंट, इ. स. १८६५ मध्यें एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें गणिताचे प्राध्यापक, पुढें डेक्कन कॉलेजमध्यें प्राध्यापक व कांहीं काळ ॲक्टिंग प्रिन्सिपल अशा चढत्या पायरीनें काम करून केरोपंत इ. स. १८७९ मध्यें दरसाल पांच हजार रुपयांवर सेवानिवृत्त झाले. सरकारनें खास ठराव करून त्यांच्या कामाची वाखाणणी केली व त्यांना एक चांदीचें पदक व रावबहादुर हा किताब दिला.

---

२७ *The Times, 24 th.* March, 1884.

२८ *Report of the United Institution of Elphinstone College and schools of Native Society.* 1839. p. 41.

२९ **इंदुप्रकाश**, पु. २३, अं. २२. २४ मार्च, १८८४.

केरोपंतांची ख्याति केवळ महाराष्ट्रापुरतीच नव्हती; कारण 'इंडियन क्रॉनिकल,' 'अमृतबझार पत्रिका' यांसारख्या महाराष्ट्राबाहेरील वर्तमानपत्रांनींहि त्यांच्यावर मृत्युलेख लिहिले होते. हे सर्व मृत्युलेख 'The Press on the Life and Doings of the Late R. B. Prof. K.L. Chhatre' (1884) नामक पुस्तिकेंत पहावयास सांपडतात.

शालेय वाङ्मयांत केरोपंतांनीं टाकलेली भर म्हणजे 'पदार्थविज्ञानशास्त्र' (१८५२), 'अंकगणित' (१८६०), भूमापन (१८६३), आणि 'अंकगणित' (१८८२), हीं पुस्तकें होत. खगोलशास्त्राचा त्यांचा विशेष अभ्यास असल्यामुळें त्यांनीं 'ग्रहसाधनाचीं कोष्टकें' (१८६०), 'पंचांग साधन कोष्टकें' (१८६१) तयार केलीं होतीं. तसेंच कांहीं दिवस 'पटवर्धनी' पंचांगहि काढिलें होतें.

बीजगणित

इ. स. १८२७ मध्यें जर्विसकृत 'शिक्षामाले'चा दुसरा भाग प्रसिद्ध झ ल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. या भागांत, 'बीजगणित,' 'लाग्रतंम,' 'आदिकरण भूमिति' (Elements of Geometry) 'बीजभूमिति संगतीकरण' (Application of Algebra to Geometry), 'सरळरेघ त्रिकोणमिति' (Plane Trigonometry), 'भूमापन' (Mensuration), आणि 'लाग्रतंमाचें कोष्टक' एवढे विषय आले आहेत. त्यांतील प्रत्येक भाग प्रथम वेगवेगळा छापून नंतर ते सर्व एकत्र बांधलेले दिसतात, कारण वरील 'शिक्षामालें'त या सर्व भागांचे पृष्ठांक निरनिराळे छापलेले आहेत.

जर्विसनें भास्कराचार्यांच्या बीजगणितावरील ग्रंथाचा तुलनात्मक अभ्यास करून पौर्वात्त्य व पाश्चिमात्य दृष्टि एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. मराठी भाषेंत हा प्रयोग प्रथमच होत असल्यामुळें बीजगणित अगर सरळरेघ त्रिकोणामिति अथवा भूमापन या विषयांवरील पुस्तकांत पारिभाषिक शब्द तयार करण्यासाठीं जर्विस यांना फार श्रम घ्यावे लागले. 'अपूर्ण बीज' (Fractions) 'वर्गघनादि' (Involution), 'वर्गघनादि मूळ' (Evolution), 'करणी' (Surds), 'गोळ्यांचे राशीचें गणित' (Piles of shots or shells), 'भूमितिप्रमाण आणि श्रेढी' (Geometrical Proportion and Progression), 'अनंत श्रेणी' (Infinite Series), 'एकवर्ण समीकरण' (Simple equations), 'वर्गसमीकरण' (Quadratic equations), 'घनादि समीकरण' (Cubic and higher equations) इत्यादि बीजगणितविषयक शब्द मराठींत आणण्याचें श्रेय जर्विस आणि त्यांचे साहाय्यक यांना दिलें पाहिजे. या पुस्तकांत विरामचिन्हांचा उपयोग केलेला दिसत नाहीं.

'शिक्षामाला' ग्रंथांतील दुसरा विषय 'लाग्रतंमें' हा आहे.

'शिक्षामाले' चा तिसरा भाग 'भूमितीचें आदिकरण' (Elements of Geometry) हा आहे. 'प्रत्यक्षें' (Axioms), 'सिद्धांत' (Theorems), 'गुणोत्तर' (Ratio), 'प्रमाण' (Proportion), भरिंव (Solid), कृत्यें (Problems) इत्यादि पारिभाषिक शब्द या भागांत आढळतात. भूमितीमध्यें येणाऱ्या अनेक प्रकारच्या आकृति व त्यांचीं समर्पक नांवें व व्याख्या, अनेक सिद्धांत व कृत्यें विशद करीत असतां मूळ इंग्रजी वाक्यरचनेचा परिणाम मराठी वाक्यरचनेंत स्पष्ट दिसतो. उदाहरणार्थ ही व्याख्या पहाः—

"एकरूपाकृती त्याच होत जो परस्पर समकोन असून समबाजू आहेत. अथवा एकीचा सर्व बाजू आणि सर्व कोन दुसरीचा सर्व बाजू आणि सर्व कोन यांशीं प्रत्येकीं अनुक्रमें बरोबर आहेत असें कीं एक आकृती दुसर्ये आकृतीवर ठेविली असतां एकीचा सर्व बाजू दुसरीचा सर्व बाजूंनीं सर्वांशीं ढाकिल्या जातील. यानंतर त्या दोन आकृती असोन एकच आकृती आहे असें दिसण्यांत येईल"[३०].

'शिक्षामाले' चा चौथा भाग, 'बीजगणिताचें भूमितीशीं संगतीकरण' हा आहे. पांचवा भाग 'सरळरेघ त्रिकोणमिति' हा असून त्यात 'त्रैकोणमितिक सारणी कोष्टक' (Trigonometrical Formulea) दिलें आहे. सहावा भाग 'भूमापन' असा असून त्यांत क्षेत्रफळ व घनफळ या विषयांची माहिती आहे शेवटचा भाग 'कोष्टक जांत संख्यांचीं लाग्रतंमें आहेत १ पासून १०००० पर्यंत' हा आहे.

मागें सांगितल्याप्रमाणें इ. स. १८४० पर्यंत 'शिक्षामाला' शाळांमधून वापरल्या जात; परंतु नंतर मेजर कॅंडीच्या सूचनेप्रमाणें वर नमूद केलेले सर्व भाग वेगवेगळे छापले गेले. ज्या काळांत मराठी भाषेमध्यें शास्त्रीय विषयावरील ग्रंथरचना होणें दुर्घट होतें अशा काळीं जार्ज जर्विस यांचा हा उद्योग पाहून खरोखरच अचंबा वाटतो.

इ. स. १८४७-४८ सालीं जेव्हां इंग्रजी-मराठी माध्यमवाद जोरांत चालू होता, तेव्हां मराठीचे पुरस्कर्ते जॉर्ज जर्विस यांनीं आपली बाजू बळकट करण्यासाठीं म्हणून डमार्गनच्या 'Elements of Arithmetic' व Elements of Algebra' या इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें तयार केल्याचें मागें लिहिलेंच आहे. त्यांतील 'डमार्गन याचा बीजगणिताचा मूळ पीठिका' (१८४८) हें एक होय. या दोन्ही पुस्तकांबद्दल सरकारला त्यांनीं लिहिलेलें सविस्तर पत्र सरकारी दप्तरांत

---

३० जॉर्ज जर्विस, **शिक्षामाला, भाग ३.** १८२७. पृ. १२.

आढळतें.[३१] या पत्रांत जर्विस यांनीं डमार्गननें आपल्या पुस्तकांना जोडलेल्या प्रस्तावनांची चर्चा करून नवीन धर्तीवर या विषयांचा अभ्यास कसा करावा हें विषद केलें आहे. बीजगणिताची 'मूळपीठिका' समजावून देतांना जर्विस म्हणतातः—

"बुद्धि पाजवून तीक्ष्ण केली असतां, केवढा लाभ होईल. हें सांगत फिरण्याचें प्रयोजन नाहीं. कां कीं, तो लाभ बहुत मोठा आहे, असें सर्व लोक कबूल करितात. कोणी एखादा मूर्ख मनुष्य आपल्ये मनांत समजेल, कीं मी फार शाहाणा होईन, परंतु जो माणूस, मी अति शाहाणा होईन, हें भय, जितकें जितकें धरितो, तितका तितका तो शहाणपणापासून दूर रहातो. सारांश हाच कीं गणितविद्येपासून लाभ होतो, असें पुष्कळ लोक मानितात; परंतु तो लाभ संपादायासाठीं शिकण्यास राजी असे थोडे आढळतात. गणितविद्येस बहुत लोक वाखाणितात; परंतु व्यापार उदीम, अशे हलके कामाचे गरजे खेरीज, या विद्येस शिकणारे थोडे. अशा कामांत लोभानें प्रवासाचे श्रम घेण्यासही, ते राजी होतात. अशा लोकांचा उपयोगासाठीं गणिताचा पहिला भाग तयार केला. परंतु हा दुसरा भाग पहिल्या भागापेक्षां किती उत्तम आहे, हें जर ते जाणतील, तर ते याजवर जो वेळ घालविला, तो फुकट गेला, असें कधींही मानणार नाहीं. इतकेंच केवळ नाहीं, दुसऱ्या विद्यांचा अभ्यासाविषयीं उपयोगी पडे, अशी या विद्येंत निपुणता प्राप्त होईपर्यंत, आपला वेळ चांगला गेला, असेंही ते मानणार नाहीं."[३२]

हा ग्रंथ तयार झाला त्यावेळीं मराठी भाषेंत शालेय पुस्तकें तयार होण्याच्या बाबतींत थोडीबहुत प्रगति झालेली होती. व्याकरणाच्या चौकटींत भाषा बसविण्याचे प्रयत्न मेजर कँडी यांच्या हस्तें होत होते; परंतु जर्विस यांच्या पुस्तकांवर त्याचा परिणाम झालेला दिसत नाहीं. च, छ, ज या अक्षरांचा तालव्य व दंततालव्य उच्चारभेद दर्शविण्यासाठीं शाळापुस्तक मंडळीच्या सुरुवातीच्या शालेय पुस्तकांत उपयोगांत आणलें जाणारें टिंब, जर्विस अजूनहि वापरतात. तसेंच आपल्ये, अशे, होत्ये, इत्यादि रूपें बदलण्याचा प्रयत्न मेजर कँडी करीत असतां जर्विस यांच्या पुस्तकांत तीं दिसतात. भाषेंत कृत्रिमता दिसते ती वेगळीच. 'संबंधी वजन' (Specific gravity), 'दृष्टांतार्थ कृत्य' (example), 'करणीगत' (irrational) इत्यादि नवीन पारिभाषिक शब्द या पुस्तकांत आढळतात, तर 'फङ्शनानुरूप समीकरण' सारखा इंग्रजी मराठी शब्दांचा समासहि एकाद्या ठिकाणीं आढळतो. भाषेंतील दोष बाजूला ठेविले तरी जॉर्ज जर्विस यांचे हे प्रयत्न विचारांत घेणें आवश्यक आहे.

---

३१ *D. P. I. Board of Education, Government.* 1849. pp. 235–240.

३२ जॉर्ज जर्विस, **डमार्गन याचा बीजगणिताचा मूळपीठिका. १८४८.**
मूळपीठिका.

भूमिति

जॉर्ज जर्विस यांनीं तयार केलेल्या गणितविषयक पुस्तकांत भूमितीवरील पुस्तकांचा सुद्धां समावेश होतो. यापैकीं 'कर्तव्यभूमिति' हें पुस्तक त्यांनीं जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांच्या मदतीनें तयार केल्याचा उल्लेख मागें आला आहे. हा विषय एतद्देशीयांना अगदीं नवीन होता आणि जर्विसला आपल्या स्थापत्यशाळेंत त्याचा फार उपयोग होत असे. त्यामुळें भूमितीवरील पुस्तकें तयार करणें अत्यावश्यक होतें. विद्यार्थी आणि शिक्षक या दोघांनाहि हा विषय नवीन असल्यामुळें 'कर्तव्यभूमिति' या पुस्तकांत ठिकठिकाणीं शिक्षकांसाठीं कांहीं सूचना दिलेल्या आढळतात. त्या सूचना वाचून आजच्या शिक्षकांना गंमत वाटेल. उदाहरणार्थ खालील ठिकाणीं पहाः—

"कर्तव्यभूमिति हा शब्द लिहि.

"ही आज्ञा दिल्यावर शिकिवणारानें आपण कर्तव्यभूमिति हा शब्द मोठ्ये अक्षरांनीं पाटीवर लिहावा. ती पाटी सर्व शिकणारांची दृष्टी पोंचेल आणि ते सर्व त्या पाटीवरचीं अक्षरें पाहून त्या अक्षरांप्रमाणें अक्षरें लिहुं सकतील अशे उंच ठिकाणीं ठेवावीं. आणि ती पाटी या कामांतील कित्येक शब्द व दुसरें लिहिणें लिहावयाशि पुरेल ऐशी मोठी असावी.

"जेव्हां शब्द किंवा दुसरें कामाचें लिहिणें शिकणारांनीं लिहिलें तें शिकिवणारानें स्वतां तपाशिल्यावांचून त्याणिं पुढें दुसरें करूं नये. शिकिवणारा यापुढें शिकणारांस जा आज्ञा करील त्या सर्व वर लिहिल्याप्रमाणें चालवाव्या." [३३]

या उताऱ्यांतील सूचनावजा भाग सोडून दिला आणि भाषेच्या दृष्टीनें तो पाहिला तर 'शिकिवणारानें,' 'लिहुं सकतील,' 'लिहावयाशि पुरेल,' 'ऐशी मोटी,' 'त्याणिं' इत्यादि शब्द व वाक्यावशेष पाहिले कीं व्याकरणनियम भाषेला लागू होण्याच्या या प्रारंभींच्या काळीं, ऱ्हस्वदीर्घ अगर शब्दरचना या गोष्टींकडे अजून लक्ष दिलें गेलें नव्हतें. शब्दांचीं निश्चित रूपें कोणतीं याचा निर्णय झालेला नसल्यामुळें ल्याहावें, लिहावें, ह्मणोन, ह्मणून, मोटे, ह्मोट्ये, आशीं, अशीं इत्यादि दोन्ही रूपें यावेळीं वापरांत होतीं. 'लांब्ये बाजूस,' 'आडव्ये रेघेखालीं,' 'उजव्ये हातानें' अशीं विशेषणांचीं एकारान्त रूपेंहि ठिकठिकाणीं दिसून येतात. याशिवाय भूमितिविषयक कांहीं शब्द नवीनच तयार केलेले पुष्कळ ठिकाणीं आहेत. 'कर्तव्यभूमिति' या पुस्तकाचा शेवट वेगळाच वाटेल तो असा :—

---

३३ जॉर्ज जर्विस, **कर्तव्यभूमिति**. १८२६. पृ. २.

"भूमितीचा व्याख्या आणि कृत्यें हीं सर्व पुरीं जालीं. आतां ही संपूर्ण भूमिति एकेपणें मनांत धरली तर बहुतकरून सर्व कामें श्रम न पडतां यथास्थित रीतीनें चांगली कर्तां येतील.

"या भूमीतीवर जो चांगला अभ्यास करील त्याचें मन निश्चळ होऊन बुद्धीची वृद्धी होईल. तेणेंकरून गुणिजनांत अति प्रतिष्ठाही पावेल." [३४]

'शिक्षामाले'च्या दुसऱ्या ग्रंथांत 'भूमितीचें आदिकरण' असा एक भाग असल्याचें मागें सांगितलेंच आहे. हा भाग स्वतंत्ररीत्या 'आदिकरण भूमिति' या नांवानें इ. स. १८४० मध्यें प्रसिद्ध झाला व इ. स. १८४९ मध्यें पुनर्मुद्रित झाला. तसेंच 'शिक्षामालें'तील 'भूमापन' हा भाग इ. स. १८३८ मध्यें 'महाराष्ट्र भाषेचें क्षेत्रफळ घनफळ' या नांवें छापिला गेला. या पुस्तकांत 'त्रापीज्यापद,' 'त्रापीज्यंम' 'सकतोर,' 'पराबला,' 'पृजंम,' 'शिलिंदर' इत्यादि शब्द इंग्रजी शब्दांचें मराठीकरण करून वापरलेले आढळतात. 'शिक्षामालें'तील आणखी एक भाग 'सरळरेघ त्रिकोणामिति' हा त्याच नांवानें, 'परशुरामपंत गोडबोले यांजकडून' इ. स. १८४५ मध्यें स्वतंत्ररीत्या प्रसिद्ध झाला. पंतांनीं मूळ पुस्तकांत भाषेच्या दृष्टीनें कांहीं फरक केलेले आढळतात. उदाहरणार्थ, "सरळरेघा त्रिकोणमिति सरळरेघ त्रिकोणाचा बाजू आणि कोन यांचे गुण आणि हिंसाब दाखवित्ये," [३५] हें वाक्य "सरळरेघ त्रिकोणमिति सरळरेघ त्रिकोणाच्या बाजू आणि कोन यांचे गुण आणि हिशेब दाखविते," [३६] असें सुधारलें आहे.

मेजर कँडी व गणितविषयक पुस्तकांची भाषा

इ. स. १८५४ मध्यें शाळांमधून वापरल्या जाणाऱ्या पुस्तकांची फिरून तपासणी झाली, त्यावेळीं या विषयावर नवीन पुस्तक असावें असें ठरलें. याचवेळीं जनार्दन हरी आठले यांनीं 'सरळरेघ आणि गोलीय त्रिकोणमिति' नामक एक पुस्तक छापलें होतें व शिक्षामंडळीकडे त्याच्या प्रती विकत घेण्याविषयीं विनंति केली होती; परंतु दक्षिणा प्राइझ कमिटीकडून याच विषयावरील एक पुस्तक विकत घेण्याचें शिक्षामंडळीनें ठरविलें असल्यामुळें आठले यांना नकार मिळाला. [३७] ठरविल्याप्रमाणें शिक्षामंडळीनें दक्षिणा प्राइझ कमिटीनें सांगितलेल्या पुस्तकाचें हस्तलिखित मागविलें व तें मेजर कँडी यांजकडे तपासण्यासाठीं पाठविलें. याचवेळीं गंगाधर

३४ जॉर्ज जर्विस, **कर्तव्यभूमिति.** १८२६. पृ. १७३.

३५ जॉर्ज जर्विस, **शिक्षामाला, भाग ५.** १८२७. पृ. १.

३६ **सरळरेघ त्रिकोणामिति.** १८४५. पृ. १.

३७ *D. P. I. Board of Education.* 1854. p. 103.

रामचंद्र टिळक यांचें 'सरळ रेघ आणि गोलीय त्रिकोणमिति' हें छापील पुस्तक कॅंडीकडे पुरस्कारार्थ आलें. मेजर कॅंडी हे स्वतः गणितविषयक पुस्तकें तपासण्याचें काम करीत नसत, त्यामुळें त्यांनीं हें पुस्तक केरो लक्ष्मण छत्रे यांच्याकडे पाठवून दिलें. छत्रे यांचें या पुस्तकाबद्दलचें मत अनुकूल झाल्यामुळें, विद्याखात्यानें तें लेखकाला मालकीहक्काबद्दल कांहीं रक्कम देऊन विकत घेतलें. [३८]

मेजर कॅंडी इतर विषयांवरील पुस्तकें तपासून त्यांतील व्याकरणविषयक दोष अगर लेखनपद्धतींतील चुका दाखवीत असत, परंतु गणितावरील पुस्तकें ते पहात नसत. त्याकाळचे गणितज्ञ केरो लक्ष्मण छत्रे यांच्या मतांना ते मान देत. एकदां नारो रघुनाथ मोहोळकर यांचें 'वरावर्दी'—तोंडच्या हिशेबाचें एक पुस्तक—तपासण्यासाठीं भास्कर दामोदर पाळंदे यांच्याकडे आलें. पाळंदे यांनीं तें तपासून लेखकाकडे पाठवून दिलें. लेखकानें आवश्यक त्या दुरुस्त्या करून पुन्हां तें पुस्तक भास्कर दामोदर यांच्याकडे पाठविलें. यानंतर पाळंदे यांनीं तें केरो लक्ष्मण यांच्याकडे पाठवून दिलें. ही गोष्ट मेजर कॅंडी यांना कळल्यावर त्यांनीं भास्कर दामोदर यांना दोष दिला. मेजर कॅंडीनीं या बाबतींत डी. पी. आय. हॉवर्ड यांना लिहिलेल्या एका पत्रांत हा इतिहास पहावयास सांपडतो. [३९] या घटनेचा उल्लेख करण्याचें कारण इतकेंच कीं ज्या विषयांत आपणाला गम्य नाहीं, त्या विषयासंबंधीं बोलणें अगर लिहिणें मेजर कॅंडीना आवडत नसे. म्हणून कीं काय, मेजर कॅंडी मराठी ट्रॅन्स्लेटर म्हणून इ. स. १८४७ मध्यें अधिकारावर आल्यानंतर सुद्धां जर्विस यांचीं गणितविषयक पुस्तकें भाषिक सुधारणा न होतां प्रसिद्ध केलीं गेलीं.

शालेय अभ्यासक्रम व्यवस्थित ठरल्यानंतर इ. स १८५९ मध्यें मुलांच्या आकलनशक्तीप्रमाणें विषयांची विभागणी केली गेली. भूमिति या विषयासाठीं चालू असलेल्या पुस्तकांशिवाय नानाशास्त्री आपटे यांचें 'युक्लिडकृत भूमितीचीं पहिलीं सहा पुस्तकें' वापरांत आलें. यानंतर इ. स. १८८४ मध्यें रावजी मोरेश्वर देवकुळेकृत 'महत्त्वमापन' उपयोगांत आणलें गेलें. 'विद्यार्थ्यांकडून महत्त्व-मापन ह्या विषयाचें थोडें तरी अध्ययन करवावें, असा सरकारचा विचार ठरून सन १८८३ सालीं डाक्टर कुक साहेब, साएन्स कालेजाचे प्रिन्सिपाल, ह्यांजकडून सरकारांनीं एक लहानसा ग्रंथ तयार करवून घेतला.' त्याच ग्रंथावरून देवकुळे यांनीं 'महत्त्वमापन' भाषांतरित केलें. या व जर्विसकृत भूमितीच्या पुस्तकांत भाषेच्या दृष्टीनें विशेष फरक झालेले आढळत नाहींत. जर्विस ज्याला 'समबाजू त्रिकोण' किंवा 'समद्विबाजू त्रिकोण' ह्मणतात त्याला 'महत्त्वमापनां'त 'समभुज त्रिकोण' अगर 'समद्विभुज त्रिकोण' असें म्हटलें आहे.

अंकगणित, बीजगणित, भूमिति इत्यादि विषयांवरील जर्विसच्या पुस्तकांनीं विषयाची परिभाषा तयार केली व तीच पुढील काळांतील लेखकांस उपयोगी पडली. या दृष्टीनें जर्विस व त्यांचे साहाय्यक यांना या विषयांतील पुस्तकरचनेच्या बाबत अग्रेसरत्त्व देणें जरूर आहे.

---

३८ *D. P. I. Poona College. Vol. 8.* 1858. pp. 108–116.

३९ *D. P. I. Miscellaneous. Vol 27.* 1858. p. 80.

प्रकरण बारावें

शास्त्रीय विषय

इंग्रजी अमलाच्या सुरुवातीपर्यंत महाराष्ट्रांतील लोकांमध्यें भौतिक शास्त्रांच्या ज्ञानाची लालसा मुळींच नव्हती; पण इ. स. १८२२ मध्यें 'मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी' स्थापन झाल्यापासून देशी भाषांच्याद्वारें एतद्देशीय लोकांना या शास्त्रांचें ज्ञान करून देण्याला सुरुवात झाली. किंबहुना भौतिक व इतर शास्त्रांचा एतद्देशीयांना परिचय करून देणें हें नव्या शिक्षणाचें एक उद्दिष्ट होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं; परंतु हे विषय शाळांत शिकविण्यासाठीं या विषयांवरील पाठ्यपुस्तकें एतद्देशीय भाषांत निर्माण होणें अवश्य होतें. याकरितां इंग्रजी ग्रंथांच्या भाषांतराची कास धरण्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

विद्येचे उद्देश, लाभ, आणि संतोष

अशा पुस्तकांपैकीं कॅप्टन जॉर्ज जर्विस यांनीं जगन्नाथ शास्त्री क्रमवंत यांच्या साह्यानें भाषांतरित केलेलें 'विद्येचे उद्देश, लाभ, आणि संतोष या विषयांचे संवाद' (१८२९) हें एक होय. या पुस्तकांत विद्या मिळविल्यानें कोणता फायदा होतो त्याची उपदेशपर चर्चा करून, नंतर विद्येचे शिक्षामालाविद्या, जडविद्या व नीतिविद्या असे तीन भाग पाडलेले आहेत. पुढें शिक्षामालाविद्या व जडविद्या 'यांचे सत्यतांतील भेद' लेखकानें व्यक्त केला आहे तो असा: 'शिक्षामालाविद्येस जड पदार्थांचे स्वभाव आणि सत्ता यांचे आधाराचें प्रयोजन नाहीं, परंतु, जडविद्येस, सर्वप्रकारें तें निश्चय पाहिजे.'[1] त्याचप्रमाणें, 'असा दुसरा एक त्या विद्यांत भेद आहे, तो हा कीं, शिक्षामाला जा सत्यता दाखविती, त्या अवश्य तशाच आहेत, त्या स्वतःसिद्ध आहेत...परंतु, जा सत्यता जडज्ञानेंकरून कळतात,...त्या सत्यतांस कर्मनिश्चय वास्तविक आधार आहे; तो कर्मनिश्चय प्रत्यक्षानें आणि अनुभवानें कळतो, त्या सत्यता कदापि केवळ तर्केंकरूनच सिद्ध होत नाहींत.'[2]

अशाप्रकारें विषयनिरूपण करून भाषांतरकर्ता शेवटीं लिहितो:—

---

१ जॉर्ज जर्विस, **विद्येचे उद्देश, लाभ, आणि संतोष या विषयांचे संवाद.** १८२९. पृ. २८.

२ तत्रैव. पृ. ३१.

"या सर्व ग्रंथावरून हें सिद्ध होतें कीं विद्येचे हर्ष आणि विद्येचे लाभ हे दोनही जोडफळासारिखे संयुक्त आहेत, कधींही ते एकमेकास सोडीत नाहींत; आणखी ते दुसऱ्या सर्व हर्षांहून परमविरूप आहेत, म्हणोन इतर हर्ष जसे आत्म्यास नीच पदवी देतात तसें न करितां हे त्यास सर्वोत्कृष्ट संतोषी आणि सर्वोत्कृष्ट पवित्र असा करितात; आणिखी आपणास लाभ व्हावा या लक्ष्यानें किंवा आपला स्वधर्म आहे या लक्ष्यानें आपलें मन जा उद्योगानें संतोष आणि पुण्य यांचा मार्गाकडे सरळ जाईल अशा उद्योगांत लावावें हें सर्व मनुष्यांस अवश्ययोग्य आहे, असेंही सिद्ध होतें." [३]

जर्विसच्या भाषांतरकृतीची क्लिष्टता व बोजडपणा ध्यानांत येण्यास वरील उतारा पुरेसा आहे. शास्त्रीय विषयावर तात्त्विक चर्चा करणारा इंग्रजी अमदानींतील सुरुवातीचा ग्रंथ म्हणून या पुस्तकास महत्त्व आहे एवढेंच. या भाषांतराबद्दल जर्विसला तीन हजार रुपये शाळापुस्तकमंडळीकडून बक्षीस म्हणून मिळाले.[४] या पुस्तकाबद्दल दादोबा पांडुरंग लिहितात :—

"सन १८२९ सांत Captain Jervis साहेबांनीं बाळ गंगाधर शास्त्री, जगन्नाथ शास्त्री क्रमवंत व बाळशास्त्री घगवे यांचे साह्यानें त्या वेळेस नुकताच Lord Brougham चा तयार झालेला लहानसा 'A Treatise on the Object, Advantages and Pleasures of knowledge' या नांवाच्या ग्रंथाचें मराठींत व त्यावरून पुढें गुजराथींत भाषांतर केलें. त्याचें नांव 'विद्येचे उद्देश, लाभ, आणि संतोष' असें ठेविलें; आणि तो ग्रंथ त्यांणीं सातारचे महाराज प्रतापसिंह राजे छत्रपति यांस मोठ्या आदरानें नजर केला. अशा करण्यानें Jervis साहेबानें एकी कडेस Lord Brougham आणि दुसरी कडेस His Highness Pratapsingh, the the Rajah of Satara या उभयतां मोठ्या पुरुषांच्या मनाची प्रसन्नता संपादित केली. हा ग्रंथ मराठींत फारच प्रौढ व सुरस झाला होता. असें असतां याची दुसरी आवृत्ति कधीं झालीच नाहीं. असे सरस प्रौढ ग्रंथ आज इतकी विद्या वाढली आहे, तथापि फारसे पाहण्यांत येत नाहींत. असा मागल्या ग्रंथकाराचें नांव व त्याची कृति यांस बहुतकरून बुडविण्याच्या बुद्धीस इतक्यांतच आरंभ झाला." [५]

दादोबांनीं जर्विसचे सहाय्यक म्हणून तीन नांवें दिलेलीं आहेत, परंतु प्रत्यक्ष पुस्तकावर जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांचेंच नांव नोंदलेलें आहे.

---

३ जॉर्ज जर्विस, **विद्येचे उद्देश, लाभ, आणि संतोष या विषयांचे संवाद.** १८२९. पृ. १५१.

४ *G. D. Vol. 237.* 1831. p. 81.

५ अनंत काकबा प्रियोळकर, **रावसाहेब दादोबा पांडुरंग.** १९४७. पृ. ५२–५३.

सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद

भाषांतरित शास्त्रीय पुस्तकांपैकीं हरि केशवजी यांचें, 'सिद्धपदार्थविज्ञानशास्त्र-विषयक संवाद' (१८३३) हें एक होय. हरि केशवजीनीं मिसेस मार्सेट यांच्या 'कॉन्व्हर्सेशन्स इन नॅचरल फिलॉसॉफी' नामक इंग्रजी ग्रंथाचें भाषांतर केलें व तें शाळापुस्तकमंडळीनें स्वखर्चानें छापिलें.

"हरि केशवजी यांची मराठी लिहिण्याची इतकी खुबी होती कीं, हा ग्रंथ इंग्लिश ग्रंथाचें भाषांतर असतांहि तसें त्या वेळेस कोणास वाटलें नाहीं; मूळचाच मराठी ग्रंथ असावा असें बहुतांस वाटावें. त्या वेळेस मराठींत 'विद्येचे उद्देश, लाभ, आणि संतोष' व हरि केशवजीचा 'सिद्धपदार्थ विज्ञान' हे मोठें प्रौढ व सरस ग्रंथ तयार झाले. परंतु पुढें विद्याखात्या वरील अधिकारी इंग्लिश लोक, व एतद्देशीय लोक यांची देशभाषे विषयीं इतकी रुचि कमी होत गेली कीं, हे ग्रंथ इतके सरस असतांहि आतां कोणास कांहींच त्यां विषयीं माहिती नाहीं." [६]

या शब्दांत दादोबा पांडुरंग यांनीं 'सिद्धपदार्थविज्ञाना'ची स्तुति केलेली आहे. पदार्थविज्ञानशास्त्राची परिभाषा निर्माण करण्याचें अवघड कार्य हरि केशवजींना प्रथमच करावयाचें असल्यामुळें त्यांच्यावर विशेष जबाबदारी होती व ती त्यांनीं बव्हंशीं यशस्वीरीतीनें पार पाडली असें म्हणावयास हरकत नाहीं. तत्कालीन पद्धती-प्रमाणें हें पुस्तक संवादात्मक असून अठरा अध्यायांत विभागिलेलें आहे. 'अथ प्रथम संवाद पदार्थाचे सामान्य धर्माविषयीं' अशी सुरुवात करून, 'इति प्रथम संवादः' या शब्दांत अध्यायाचा शेवट केलेला आढळतो. जुन्या काळानुसार प्रकरणांचा प्रारंभ व शेवट पोथीप्रमाणें केल्याचा हा नमुना होय. हें भाषांतर जरी शब्दशः केलेलें असलें, तरी परिस्थित्यनुरूप बदल करण्याची कला भाषांतरकाराला पूर्णपणें अवगत होती. मूळ ग्रंथांतील 'एमिली' व 'कॅरोलिन' या विद्यार्थिनींच्या जागीं हरि केशवजीनीं कृष्ण व गोपाळ हे दोन विद्यार्थी आणिले आहेत व त्यांना 'मिसेस बी.' ऐवजीं 'गुरुजी' करून विषयाचें विवरण ऐकविलें आहे. हरि केशवजीनीं प्रथमच तयार केलेले कांहीं पारिभाषिक शब्द खालीलप्रमाणें आहेत :—

निर्भेद्यता–Impenetrability.	परिमेयता–Extension.
विभाज्यत्त्व–Divisibility.	जडत्त्व–Inertia.
आकर्षकत्त्व–Attraction.	स्नेहाकर्षकत्त्व–Attraction of cohesion.
दार्ढ्य–Density.	वैरल्य–Rarity.

६ अनंत काकबा प्रियोळकर, **रावसाहेब दादोबा पांडुरंग**. १९४७. पृ. ५५.

गुरुत्वाकर्षकत्त्व—Attraction of gravitation.
लघुपदार्थोर्ध्वगमन—Ascent of light bodies.
समगति—Uniform motion.
वर्धमानगति—Accelerated motion.
आघात प्रत्याघात–Action reaction.
सच्छिद्रता—Porosity.
पतन कोण—Angle of incidence.
चलनमध्य--Centre of motion.
ध्रुवाकृष्टिप्रेरणा–Centripetal force.
तरंगभंगाकृत्यनुरूप पदार्थपतन—Fall of bodies in a parabola.
उच्चालन—Lever.
उच्चालक—Power.
कप्पी—Pulley.
उतरण—Inclined plane.
वात प्रतिबंध-Resistance of the air.
चलन—Motion.
क्षीयमाणगति—Retarded motion.
चालकत्त्व—Momentum.
नियताकारत्त्व—Elasticity.
परावृत्तिचलन—Reflected motion.
परावर्तन कोण—Angle of reflection.
महत्त्वमध्य–Centre of magnitude.
ध्रुवोत्सृष्टिप्रेरणा–Centrifugal force.
टेंका—Fulcrum.
उच्चाल्य—Weight.
आंसास खिळलेलें चाक—Wheel and axle.
पाचर—Wedge.
भुज—Latitude.
मळसूत्र—Screw.
कोटि—Longitude.
वातमानयंत्र—Barometer.

हरि केशवजी यांच्यासमोर त्यावेळीं कोणतींहि साधनें नसतांना त्यांनीं तयार केलेली शास्त्रीय परिभाषा पाहिली कीं, आज शास्त्रीय विषय मातृभाषेंतून शिकविण्यासाठीं त्या विषयांवरील पुस्तकें भाषांतरित होणें कां अवघड वाटावें हें समजत नाहीं. हरि केशवजीनीं केलेलें हें भाषांतर जरी शब्दशः असलें, तरी प्रसंगानुसार, एतद्देशीय वातावरण निर्माण करून शास्त्रीय विषयाचें काठिण्य कमी करण्याचा त्यांनीं प्रयत्न केलेला आहे. उदाहरणार्थः– 'What is it that makes the steel buttons on your brother's coat shine?' [७] याचें रूपांतर 'बरें देवळास सोन्याचा कळस असतो, तो कशानें चकाकतो?' [८] असें केलें आहे. अगर, 'We have a convex mirror in the drawing-room, which forms a beautiful miniature picture of the objects in the room,'

[७] Mrs. Marcet, *Conversations in Natural Philosophy*, Second Edition, Revised. *1820.* p. 146.

[८] हरि केशवजी, **सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद**. १८३३.पृ. १९५.

(p. 354) हें वाक्य, 'जगन्नाथ शंकरशेटचे घरांत एक गोलबाह्य आरसा आहे त्याजमध्यें दिवाणखान्यांतील सर्व वस्तूंचीं लहान लहान रमणीय प्रतिबिंबें दिसतात,' (पृ. ४७०) या शब्दांत मांडलें आहे. शास्त्रीय विषयावरील या पुस्तकांत जगन्नाथ शंकरशेटचें नांव आणून वास्तवता आणण्याचा भाषांतरकाराचा हा प्रयत्न दिसतो. खुद्द शाळापुस्तक मंडळीनें हरि केशवजी यांच्याकडून हें भाषांतर तयार करवून घेतल्यामुळें, मंडळीनें त्यांना या कामाबद्दल दोन हजार रुपये बक्षिसादाखल दिले. ९

मूळ लेखिकेप्रमाणेंच हरि केशवजी म्हणतात :—

"सिद्धपदार्थविज्ञानशास्त्राचें जें कांहीं मला स्वल्पज्ञान होतें, तें म्यां तुह्मास सांगीतलें, याकरितां आतां या शास्त्राविषयीं आपलें संभाषण समाप्त करावें. तुह्मास जें ज्ञान प्राप्त झालें आहे, तेणेंकरून जर तुमचा ठायीं या शास्त्रांत विशेष अभ्यास करावयाची योग्यता आली, तर माझे सांगण्याचें साफल्य होईल. ह्या सिद्धपदार्थ-विज्ञानशास्त्राचा पठनेंकरून, सिद्धपदार्थयुक्त सृष्टि औदार्यानें उत्पन्न करणारा जो प्रभू त्याचें ज्ञान, कृपालुत्व इत्यादि गुणाचे ठायीं, मनोवृत्ति परायण झाल्या, तरच त्या पठनापासून सुख होईल." १०

या शब्दांत व्यक्त केलेली सदिच्छा खरी आहे; तथापि हें व अशासारखीं शास्त्रीय विषयांवरील पुस्तकें निर्माण करण्यांतील हेतु वेगळाच होता. तत्कालीन अधिकाऱ्यांच्या मतें हें पुस्तक, 'Very interesting and calculated to improve the native mind and free it from error and prejudice in many subjects connected with physical science,' ११ या हेतूनें रचलें गेलें. पुराणोक्त कल्पना घालवून शास्त्रीय पद्धतीनें निसर्गातील घटनांचा विचार करावयास लावण्याचा उद्देश, अशीं पुस्तकें विद्यार्थ्यांच्या हातीं देण्यांत होता, स्पष्ट आहे.

पहिल्यानें उत्साहाच्या भरांत पदार्थविज्ञानशास्त्राची माहिती करून देणारें वरील पुस्तक जरी मुलांच्या हातीं शालेय पुस्तक म्हणून देण्यांत आलें, १२ तरी कांहीं काळानंतर एवढा मोठा पावणे सहाशें पृष्ठांचा ग्रंथ मुलांनीं अभ्यासावा, हें शक्य होईना. शिवाय या ग्रंथाची किंमतहि मुलांच्या आवाक्याबाहेरील म्हणजे आठ रुपये होती. या

---

९ *D. P. I Board of Education, Institution.* 1842. pp. 7–11.

१० हरि केशवजी, **सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद.** १८३३. पृ. ५७४-५७५.

११ *D. P. I. Board of Education. Vol. 12.* 1842. (No paging.)

१२ *G. D. Vol.* 530. 1840. p. 203.

मुळेंच कीं काय या ग्रंथाची दुसरी आवृत्ति निघूं शकली नाहीं. इ. स.१८३३ मध्यें पहिल्या आवृत्तीच्यावेळीं छापलेल्या पांचशें प्रतीपैकीं, तारीख १ जानेवारी, १८३६ पर्यंत फक्त एकशें नऊ प्रती खपल्या. [१३] यावरून या ग्रंथाचा उपयोग शालेय म्हणून फारसा झालेला दिसत नाहीं.

पदार्थविज्ञानशास्त्र

ही वस्तुस्थिति लक्षांत घेऊन इ. स. १८५२ मध्यें केरो लक्ष्मण छत्रे यांनीं पदार्थविज्ञानशास्त्राच्या वेगवेगळ्या शाखांवर तीन लहान पुस्तकें तयार करून तीं अभिप्रायार्थ मेजर कॅंडी यांच्याकडे पाठविलीं. मेजर कॅंडीनीं तीं तपासलीं व शिक्षामंडळीला तीं एकत्र छापण्याबद्दल सूचना केली. [१४] या सूचनेप्रमाणें इ. स. १८५२ मध्यें केरोपंतांचीं 'पदार्थविज्ञानशास्त्रांतील किती एक विषयांवर व्याख्यानें' छापलीं गेलीं. या पुस्तकाची, 'पदार्थाविज्ञानशास्त्र' या नांवानें इ. स. १८५७ मध्यें दुसरी आवृत्ति निघाली. हीं पुस्तकें तयार करतांना छत्रे यांच्यासमोर कोणतीं पुस्तकें होतीं तें कळत नाहीं; परंतु हरि केशवजी यांचे, 'सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद' त्यांच्यासमोर असावे असें दिसतें, कारण छत्रे यांनीं जरी विवरण पद्धतीनें आपलें पुस्तक रचलेलें असलें, तरी हरि केशवजी व केरोपंत छत्रे यांच्या लेखनांत बरेंच साम्य नजरेस पडतें. छत्रे यांनीं हरि केशवजींच्या पुस्तकाचा उपयोग केला असावा. अगर एकाच इंग्रजी पुस्तकावरून दोघांनींहि भाषांतरें तयार केलीं असावीं; कदाचित विषय एकच असल्यामुळें दोहोंत साम्यता आली असेल; पण कांहीं वाक्यें दोनहि पुस्तकांत जशींच्या तशीं दिसतात एवढें खरें. या दोन पुस्तकांची तुलना करतां, हरि केशवजी यांचें पुस्तक भाषांतरित असल्यामुळें त्यांत कांहीं ठिकाणीं संदिग्धता आढळते. त्याचें कारण हें असावें कीं भाषांतरकार स्वतः तें शास्त्र शिकलेले नव्हते; परंतु केरोपंत छत्रे स्वतः शास्त्रज्ञ असल्यामुळें त्यांच्या लेखनांत संदिग्धता राहाण्याची शक्यता फार कमी आहे. या दोन ग्रंथांचें तुलनात्मक विवेचन 'इंदुप्रकाश' मध्यें पहावयास मिळतें. [१५] शास्त्रीय परिभाषा हरि केशवजी यांनीं अगोदरच तयार केलेली असल्यामुळें, तिचा उपयोग पुढील लेखकांना फार झाला. छत्रे यांच्या पदार्थ-

---

१३ *Ninth Report of the Bombay Native Education Society.* 1836.

१४ *D. P. I. Board of Education, Poona College.* 1852. p. 87.

१५ **इंदुप्रकाश**, पु. २५. अं. ३७. १८८६.

'विज्ञानशास्त्रां'तील बरेचसे पारिभाषिक शब्द पूर्वीच तयार झालेले होते. क्वचित ठिकाणीं समीपदृष्टि–short-sight, गौडबंगाली फानस–magic lantern यांसारखे कांहीं नवीन शब्द आढळतात. हरि केशवजीनीं रसायन शास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहिला होता, परंतु छत्रे यांनीं वरील पुस्तकांतच पदार्थ विज्ञानाबरोबर स्वरशास्त्र, ज्योतिःशास्त्र आणि रसायनशास्त्र यांविषयींसुद्धां माहिती दिली आहे.

शिल्पविद्या या विषयाचे निबंध

हरि केशवजींचे 'सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद' (१८३३) तयार झाल्यावर, दोन वर्षांच्या अवधींत इ. स. १८३५ मध्यें,' शिल्पविद्या या विषयाचे निबंध' विल्यम हेन्री बेल यानें नारायणशास्त्री जोशी चौलकर यांच्या सहाय्यानें तयार केले. या पुस्तकांत फक्त तीन निबंध आहेत. त्यांचें सामान्य निरूपण करतांना म्हटलें आहे :—

"जो शिल्पविद्येचा भाग यंत्राचीं बीजें आणि स्वभाव यांविषयीं विचार करायाला अवधिभूत आहे त्यांत दोन उद्देश आहेत. त्यांचा परस्पर संबंध अति संनिहित आहे. त्या प्रत्येकांवरही बळकट लक्ष्य राहिलें पाहिजे. पहिलें उद्देश्य अकृत्रिम शिल्पसाधन किंवा आदिचालक आणि दुसरें यंत्रें किंवा पहिल्या बलास स्वाभिप्रायानुरूप रूपांतर देणारीं साधनें. या पहिल्या निबंधांत जा सृष्टींतल्या शक्ति आदिचालक रूपाने मिळतात त्यांचा स्वभाव व नियम आणि बलाचे व गतीचे गुण यांचें सामान्यतः वर्णन आहे. यांजवरच पाहणाराने लक्ष्य राखावें. यंत्राचीं बीजें वर्णन करायास या रीतीचा अनुरोधाने दुसरा निबंध केला आहे." १६

उर्ध्वाहतचक्र, पार्श्वाहतचक्र, छिन्नांग, अधराहतचक्र, जलस्थिरविज्ञानीय दमनयंत्र, शूलदंत, नरमळसूत्र, सततसरलगति, गमनापसरण सरलगति, सततवर्तुलगति, गमनापसरणवर्तुलगति, इत्यादि अनेक पारिभाषिक शब्द या पुस्तकांत दिसून येतात. ही परिभाषा बेलपेक्षां चौलकर शास्त्री यांच्या हातची असणें जास्त संभवनीय आहे. सिलिंडराकार (पृ. २८१) यासारखा एकादा धेडगुजरी सामासिक शब्द या निबंधांत आढळला तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें नाहीं. हे निबंध शाळांमधून मुलांनीं अभ्यासावे म्हणून भाषांतरित केलेले असले तरी पहिल्या आवृत्तीच्या वेळीं त्यांच्या फक्त आडीचशें प्रती काढलेल्या होत्या व किंमत प्रत्येकीं आठ रुपये ठेविलेली होती. १७

---

१६ विलियम हेन्री बेल, **शिल्पविद्या या विषयाचे निबंध**. १८३५. पृ. ३-४.

१७ *D. P. I. Board of Education. Vol.* 12. 1842. (No paging.)

रसायनशास्त्रविषयक संवाद

हरि केशवजीनीं पदार्थविज्ञानशास्त्राप्रमाणें रसायनशास्त्रावरहि 'रसायनशास्त्रविषयक संवाद' (१८३७) नामक पुस्तक भाषांतरित केलें. ज्या मार्सेट बाईच्या इंग्रजी ग्रंथावरून 'सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद' त्यांनीं रचले होते, तिच्याच 'कॉनव्हर्सेशन्स ऑन केमिस्ट्रि' या इंग्रजी ग्रंथावरून त्यांनीं 'रसायनशास्त्रविषयक संवाद' तयार केले. या ग्रंथाची रचना कशी झाली तें खुद्द लेखकानेंच 'राजमंत्री स्थानापन्न जेमस् फेरीश साहेब वास्तव्य मुंबई यांप्रति' ग्रंथ अर्पण करतांना दिली आहे. ते म्हणतात :—

"सदर अदालत संबंधी भाषांतरकार हरि केशवजी वास्तव्य मुंबई गिर्गांव-विज्ञप्ति ऐशीजे सन्मार्ग व एतद्देशीय जनांची शिक्षा यांचे प्रवर्तनार्थ आपले विख्यात उद्योग चालिले आहेत, आणि आपले इष्ट कारुणिक फेनी साहेब यांही मला आपल्या आश्रयास निरवून १० वर्षें झालीं त्या दिवसापासून तर आजपर्यंत आपण मजवर कृपाच करीत आलां आहां परंतु सिद्ध पदार्थ विज्ञान म्हणून जो पूर्वी माझे हातून ग्रंथ झाला तो व हा ग्रंथ आपण इतक्या थोर अधिकारारूढ असतां मला दयेनें, उत्साहानें, व आस्थेनें सांगितला व त्याचें जें अवघें मोठें भाषांतर झालें तें पंक्तिशः शोधून शुद्ध करून तर मजवर आपली सर्व प्रसिद्ध कृपा झाली आहे. हे आपले परमोपकार मी मनोभावें आठवीत आहें आणि या देशावर सुवर्तमानाचा व सुखाचा सूर्य पूर्ण तेजानें प्रकाशावयास आपल्या सारिख्या प्रकाशितकीर्ति पुरुषांचे यथार्थ स्तुत्य प्रयत्न चालिले आहेत त्यांस ज्ञानकल्याणदायक असें मानून त्याचें आनंदजनक स्मरण वर्तमान व भावी लोकांस ही नित्य राहील असा भाव धरून ज्ञानकल्याणप्रवृत्ति करण्याविषयीं अति कुशल जें शास्त्र त्याचा शुद्धांश अस्मद्देशीय जनास प्राप्त व्हावा या हेतूनें आरंभिलेला व आपल्या साहाय्यानें सिध्दीस गेलेला जो रसायन संवाद भाषांतररूप ग्रंथ आपल्या सकृतज्ञतोद्देशें परम विनयें करून अर्पिला असे हे विज्ञप्ति. शके १७५७ मन्मथनाम संवत्सर भाद्रपद शुद्ध एकादशी गुरुवार." १८

दादोबांनीं हरि केशवजींच्या दोन्ही शास्त्रीय ग्रंथांबद्दल लिहितांना त्यांची स्तुति केलेली आहे. दादोबा लिहितात :—

"हरि केशवजीचा स्वभाव इतका गरीब व शांत होता कीं, कोणीहि त्यास पाहिल्या वर त्याज वर त्यांणीं लोभ केल्या शिवाय राहूं नये. Mr. Farish साहेबानें तर त्यांस आपला विद्यार्थीच केला. हें सिध्दपदार्थविज्ञानशास्त्र त्यांणींच त्यांना समजावून त्यांच्या हातून हा ग्रंथ तयार करविला. पुढें सन १८३६ सांत बाईचा म्हणजे

१८ हरि केशवजी, **रसायनशास्त्रविषयक संवाद**. १८३७. (अर्पणपत्रिका.)

Mrs. Marcet यांचा आणखी दुसरा Conversations on Chemistry हा ग्रंथ त्यांस समजावून त्यांतील रसायनशास्त्राचे प्रयोग त्यांस दाखवून त्यांहीं ग्रंथाचें मराठी भाषांतर त्यांच्या हातून तयार करविलें. हे दोन ग्रंथ हरि केशवजीच्या हातून फार सरस झाले. ते अथवा त्यांचे कर्ते यांचीं आतां म्हणजे सन १८७१ त मी हें लिहितों त्या काळीं थोड्या लोकांस माहिती असेल." १९

दादोबांचें हें म्हणणें खरें आहे; कारण या पुस्तकांना दुसरी आवृत्ति पाहाण्याचें भाग्य लाभलें नाहीं. शाळापुस्तकमंडळीस सुद्धां असें वाटत होतें कीं, शालेय म्हणून तयार केलेलीं पुस्तकें उपयुक्त व्हावयाचीं असल्यास, तीं लहान व कमी किंमत असलेलीं अशीं असावीं. 'रसायनशास्त्रविषयक संवाद' छापल्यानंतर एक वर्षानें शाळापुस्तक मंडळी आपल्या वार्षिक इतिवृत्तांत लिहिते कीं सात हजार रुपये खर्च करून छापिलेलें हें पुस्तक मुळींच खपत नाहीं, कारण त्याची किंमत दर प्रतीला साडेसतरा रुपये इतकी आहे. २०

अशा या ग्रंथांत गुरुशिष्यसंवादरूपानें रसायनशास्त्राची चर्चा मूळ इंग्रजी ग्रंथाप्रमाणें केलेली आढळते. गोपाळा, कृष्णा व गुरुजी अशा तीन व्यक्तींमधील ती चर्चा आहे. प्रकाश आणि उष्णता अथवा कलारिक्, संयुक्त कलारिक्, वाफेचें यंत्र, इलेक्त्रिसितीचे रसायनरूप व्यापार, आक्सिजन् व नैत्रोजन्, हैद्रोजन्, सल्फर आणि फास्फोरस्, कार्बन् धातु, संयोगाकर्षकत्त्व, आल्केली, मूलरूप पदार्थांचें स्वरूप व रचना, वनस्पतींचें पृथक्करण, जीवरूप पदार्थांची रचना, जीवांचे इंद्रिय व्यापार, देहीभवन, पोषण, श्वासोच्छ्वसन, शरीराची उष्णता व अनेकप्रकारचे शारीर पदार्थ इत्यादि विषयांचें तपशीलवार विवेचन या ग्रंथांत केलेलें आहे. हरि केशवजीनीं ज्याप्रमाणें पदार्थविज्ञानशास्त्राची परिभाषा तयार केली, त्याप्रमाणें रसायनशास्त्राची केलेली दिसत नाहीं उलट, कलारिक्वाहकता (पृ. ४५), कलारिकाशय (पृ. ८३), आक्सीडकरण (पृ. १४७), आसिडभवन (पृ. १८९), आक्सिजनभूत (पृ. १८९) ग्यासरूपता (पृ. १६७), निराक्सिजन् (पृ. २१९) इत्यादि धेडगुजरी समास, ग्यासें, मसला हीं इंग्रजी गॅस्, मसल् या शब्दांचीं अनेकवचनें वगैरे विचित्र प्रकार आढळतात. शास्त्रीय विषयाची परिभाषा बनविण्यास, ज्या भाषेंतून ग्रंथ लिहिलेला असेल ती परकी भाषा चांगली अवगत असावी लागते, तसेंच मातृभाषेंतून शास्त्रीय विषयांतील नवीन शब्द निर्माण करण्यासाठीं संस्कृत भाषेचाहि अभ्यास झालेला असला पाहिजे. हरि केशवजीनीं रसायनशास्त्रांतील पारिभाषिक शब्द कां तयार केले नाहींत तें कळावयास मार्ग नाहीं; परंतु या बाबतींत त्यांनीं आपले विचार प्रगट केले आहेत ते असे :-

---

१९ अनंत काकबा प्रियोळकर, **रावसाहेब दादोबा पांडुरंग**. १९४७. पृ. ५७.

२० *Tenth Report of Bombay Native Education Society, for* 1836-37. p. 19

" नवीन संज्ञा संघाताची कोणेके शास्त्रांत प्रवृत्ति करावयास किती आयास लागतील हें तुह्मास ठाऊकें नाहीं. असें केलें असतां सर्व शास्त्र पाठकांस व शास्त्र प्रवर्तकांस पुनः शाळेंत जावें लागेल कळलें; जीं नावें कल्पिलीं तीं केवळ नवीन न दिसावीं, याजकरितां त्यांत कित्येक प्राचीन नावें जीं किंचित् दूषित आहेत तीं ठेविलीं नसतीं, तर ती अगदी नवी भाषा शिकावयास श्रमानें व स्थिरबुद्धीनें थोडके लोक प्रवृत्त झाले असते; आणि शिल्पकर्मकर्ते जे केवळ सामान्यजन, जे शास्त्राध्ययन न करितां केवळ संस्कारानें व व्यवहार पद्धतीनें व्यापार करितात, त्यांस त्यांच्या वोळखेचा संज्ञांत केवळ अंतर पडल्यामुळें कांहीं काळ मोठा व्यामोह प्राप्त झाला असता." [२१]

रसायनशास्त्र हा विषय एकंदरींत एतद्देशीयांना नवीन असल्यामुळें, तो विषय व त्याची परिभाषा लोकांना एकदम आकलन होणें कठीण होतें. हरि केशवजी म्हणतात त्याप्रमाणें 'नवीन युक्ति, विचार परम उपयोगीही असले, तथापि प्राकृत जनाचे बुध्यारूढ व्हावयास बहुत काळ लागत असतो,' हें खरें आहे.

हरि केशवजी (१८०४–१८५८)

हरि केशवजी हे सोमवंशी क्षत्रीय पाठारे ज्ञातींतील एक विद्वान गृहस्थ होत. मराठी भाषेंतील सुबोध भाषांतरकार म्हणून त्यांची त्या काळांत ख्याति होती. त्यांचें प्राथमिक शिक्षण झाल्यावर, रे. केनी यांनीं त्यांस फावल्यावेळीं उच्च प्रतीचें इंग्रजी शिक्षण दिलें. यानंतर कॅ. जर्विस यांच्या इंजिनिअरिंग शाळेमध्यें त्यांना कारकुनाची जागा मिळाली. याचवेळीं हरि केशवजींनीं बाबा व्यास नामक शास्त्र्याच्या हाताखालीं संस्कृत भाषेचा अभ्यास केला.

इ. स. १८२९ मध्यें ठाणें कोर्टांत हेडक्लार्क व मराठी ट्रॅन्स्लेटर म्हणून त्यांची नेमणूक झाली. इ. स. १८३४ मध्यें सोलापूर कोर्टांत व पुढें मुंबई अदालत कोर्टांत त्यांनीं चीफ ट्रॅन्स्लेटर म्हणून शेवटपर्यंत काम केलें. भाषांतरकार म्हणून त्यांची हुशारी पाहूनच कीं काय, मुंबईच्या शाळापुस्तक मंडळीमध्यें, शालेय पुस्तकें तयार करून छापण्यासाठीं जी पोटसमिति होती, तींत इ. स. १८३१ मध्यें त्यांची निवड झाली. इ. स. १८५१ पर्यंत ते मंडळीच्या ग्रंथप्रकाशन समितीचे सभासद होते. या नात्यानें त्यांनीं कांहीं शालेय पुस्तकें तपासलीं; त्याचबरोबर त्यांनीं स्वतः कांहीं शालोपयोगी पुस्तकें तयार केलीं. 'सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद' (१८३३), 'रसायनशास्त्रविषयक संवाद' (१८३७) 'इंग्लंडाचा वृत्तांत' (१८३८) 'यात्रिक

---

२१ हरि केशवजी, **रसायनशास्त्रविषयक संवाद.** १८३७. पृ. २७८.

क्रमण' (१८४१), 'शालोपयोगी नीतिग्रंथ' (१८४६), 'देशव्यवहार व्यवस्था' (१८५४) हे त्यांचे ग्रंथ होत. याशिवाय, ते इ. स. १८५२ मध्यें मराठी ज्ञान-प्रसारक सभेचे उपाध्यक्ष असतांना संस्थेच्या वतीनें जीं मराठी क्रमिक पुस्तकें तयार होत होतीं त्यांतहि त्यांचा हात होता. या संस्थेच्या इ. स. १८५२ च्या वार्षिक इतिवृत्तांमधील एक उतारा 'बॉंबे टाइम्स' मध्यें दिलेला आढळतो तो असा:—

"In connection with this school series, we have to express our obligations of Mr. Hari Keshawji, Vice-President of the Marathi Branch of the Society, for the valuable assistance rendered by him in supplying several pieces of poetry, original and selected." २२

हरि केशवजींच्या या पद्यचातुर्याबद्दल विनायक कोंडदेव ओक लिहितात:—

"हरि केशवजींच्या गद्यापेक्षां पद्यांचा आह्मांस फार चमत्कार वाटतो. त्यांच्या लहानपणांत छापखाने फारसे नव्हते. आणि मराठी कवितांचा प्रचार तर अगदींच थोडा होता. अभंग, श्लोक, आर्या ह्यांची ओळख साधारण लोकांत प्रथम नवनीता वरून झाली...असें असतां, त्यांनीं यात्रिक क्रमणाच्या भाषांतरांत इंग्रजी पद्यांचें मराठी पद्यांत जें भाषांतर केलें आहे, तें पुष्कळ अंशीं वामन पंडितांच्या कवितांच्या श्लोकांच्या बरोबरीचें दिसतें." २३

हरि केशवजीनीं लिहिलेलीं बहुतेक पुस्तकें शालोपयोगी असून भाषांतरित आहेत. मराठी भाषेंतील शास्त्रीय वाङ्मयांत भर टाकण्याची कामगिरी करून ते इ. स. १८५८ मध्यें मरण पावले.

हरि केशवजीचीं 'सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद' आणि 'रसायन-शास्त्रविषयक संवाद' हीं दोन पुस्तकें व विल्यम बेल याचे 'शिल्पविद्या या विषयाचे निबंध' जरी शाळापुस्तक मंडळीनें प्रौढ विद्यार्थ्यांच्या हातीं दिले, तरी त्यांचा विशेष अभ्यास त्यावेळीं होऊं शकला नाहीं; कारण त्या पुस्तकांची किंमत प्रमाणाबाहेर होती. त्याशिवाय शास्त्रीय विषयांच्या अभ्यासाला लागणारी उत्सुकता तत्कालीन मुलांमध्यें नव्हती असें दिसतें. या अडचणींतून मार्ग काढण्यासाठींच कीं काय त्यावेळच्या पुस्तक समितीचा एक सभासद इझडेल यानें इ. स. १८४१ मध्यें शाळा-पुस्तक मंडळीला अशी सूचना केली होती कीं विद्यार्थ्यांसाठीं वरील पुस्तकाच्या संक्षिप्त

---

२२ *The Bombay Times and Journal of Commerce, Vol. 3. No. 503. 1852. p. 155.*

२३ रामचंद्र हरि, **हरि केशवजी यांचें चरित्र.** १९११. उपोद्घात, पृ. ५.

आवृत्त्या मंडळीनें काढाव्या. [२४] याचवेळीं बाळशास्त्री जांभेकर यांनीं या पुस्तकांना जास्त उत्तेजन द्यावें असें आपलें मत दिलें होतें. बाळशास्त्री लिहितात :—

"Hari Kessowjee's works on Natural Philosophy and Chemistry and Bell's Mechanics are also calculated to give a tolerable stock of knowledge on these sciences, and it is desirable that they should be better encouraged, than at present." [२५]

शास्त्रीय विषयावरील पुस्तकें व मेजर कँडी.

वरील सूचनांचा उपयोग झालेला दिसत नाहीं. तसेंच पुढील काळांत कांहीं वर्षेंपर्यंत रसायनशास्त्राचा अभ्यास मातृभाषेंतून होणें थांबलें. पुढें इ. स. १८७५ मध्यें बाळाजी प्रभाकर मोडक यांचें 'रसायनशास्त्र' हें पुस्तक वापरांत आलें. हरि केशवजी यांचीं पुस्तकें तपासणीसाठीं मेजर कँडीच्या हातीं आलीं नसल्यामुळें कीं काय त्यांत भाषेच्या दृष्टीनें अनेक दोष राहून गेले होते. तथापि मोडक यांच्या 'रसायनशास्त्रा' ची तपासणी मेजर कँडीनीं कशी केली तें पहाण्यासारखें आह. तारीख १८ सेप्टेंबर, १८७४ रोजीं लिहिलेल्या या पुस्तकावरील टीकालेखांत मेजर कँडी म्हणतात :—

"I do not feel competent to pass an opinion on the scientific portion of the book, as I have no knowledge of chemistry....The book is very faulty as regards spelling, and here and there is a mistake in grammar.

"भरतखंडात. As the word is in the 7th case, it should be भरतखंडांत. The omission of the dot which marks the 7th. case runs through the book.

"किमया हा पारशी भाषेंतील शब्द आहे. Should not पारशी be फारशी? The latter is the rendering of 'Persian.'

"राहतानां. Is not the dot wrong? Should it not be राहतांना?...

"हे घटकावयव वेगळे केलें. The last word should be केले.—

"आधारावाचून	Should be	आधारावांचून
"नमुनें	,,	नमुने
"युरोपखंडात	,,	युरोपखंडांत
"ह्याचे स्वरूप	,,	ह्याचें स्वरूप

---

२४ *G. D. Vol. 24 A* 1843. p. 663.
749 A.

२५ *Ibid.* p. 679.

"The omission of the dot which marks the neuter 6 th case runs through the book.

"होणारहीं नाहीं	Should be	होणारही नाहीं
"यांत्रीक	"	यांत्रिक
"विभागीतां	"	विभागितां
"पाण्यातील	"	पाण्यांतील
"थेंबात	"	थेंबांत
"शक्ती	"	शक्ति
"सृष्टी	"	सृष्टि
"तांबे	"	तांबें
"परमाणू	"	परमाणु
"पाण्यात	"	पाण्यांत
"बारिक	"	बारीक
"खाणीत	"	खाणींत
"प्रीती	"	प्रीति
"नाहींसे	"	नाहींतसे

"The chief error is the omission of the dot in the 7th case, in the neuter of the sixth case, and in the first case neuter plural." २६

वरील टीकालेखावरून मेजर कँडीचें नेहमीचें भाषाविषयक धोरण–संस्कृत शब्द मुळाप्रमाणें लिहिणें, अनुस्वारांचा योग्य उपयोग, ठराविक शब्द ठराविक पद्धतीनें लिहिणें या गोष्टी शास्त्रीय विषयावरीलहि शालेय पुस्तकांतून अमलांत आणण्याचा आग्रह–स्पष्ट दिसतें. या आग्रहामुळेंच आज मराठी भाषेला पुष्कळसा एकसूत्रीपणा आला असें म्हणावें लागतें. शास्त्रीय परिभाषेबद्दल मात्र मेजर कँडी यांनीं आपलें धोरण या ठिकाणीं स्पष्ट केलें नाहीं; पण इतरांनीं या मुद्यावर ठिकठिकाणीं चर्चा केलेली आढळते. उदाहरणार्थ 'आमचा शास्त्रीय ग्रंथसमूह' नामक लेखांत, मोडक यांच्या 'रसायनशास्त्र' या पुस्तकाबद्दल लिहितांना 'इंदुप्रकाश'कार म्हणतात :–

"मोडफ यांनीं योजिलेली पारिभाषिक भाषा बरेच ठिकाणीं दुर्बोध झाली आहे खरी, परंतु त्याला उपाय नाहीं. एकतर आमचे इतर विद्वान लोक अर्वाचीन शास्त्रांची देशी परिभाषा ठरविण्याचा प्रयत्न जर करीत नाहींत, तर रा. मोडक यांनीं तयार

---

२६ *D. P. I. Book Depot, Vol. 27.* 1874–75. pp. 368–369.

केलेले कांहीं शब्द दुर्बोध व्हावे, यांत आश्चर्य नाहीं. शिवाय, आपल्या भाषेंत पूर्वी नसलेलें असें जर हें शास्त्र आहे, तर त्यांतले पारिभाषिक शब्द कानांस थोडेसे अपरिचित व कडू लागणारच." २७

यंत्रशास्त्राचीं मूळें

शालेय अभ्यासक्रमांत समाविष्ट करण्यासाठीं शिक्षामंडळीनें छापलेलें शास्त्रीय विषयावरील आणखी एक पुस्तक म्हणजे गोविंद गंगाधर फडकेकृत, 'यंत्रशास्त्राचीं मूळें' (१८५३) हें होय. या पुस्तकांत 'चलन आणि यंत्रशास्त्र यांचे नियमांचें सविस्तर वर्णन' केलेलें आहे. पुस्तकाची विभागणी तेरा अध्यायांत केलेली असून, शेवटीं शब्दपरिभाषा जोडलेली आढळते. या पुस्तकाचें हस्तलिखित तपासून प्रो. हार्कनेस लिहितातः–

"Govind's Translation so far as I have examined it, is closely and faithfully executed. Some passages may still be a little simplified, but upon the whole, it is well done." २८

जरी जॉन हार्कनेसच्या पसंतीला हें पुस्तक उतरलें, तरी मेजर कँडी यांना तें सदोष वाटलें व त्यांनीं त्यांत सुधारणा करण्याबद्दल लेखकाला सुचविलें. या पुस्तकाविषयीं लिहितांना एकंदरींतच या काळांत निर्माण होणाऱ्या ग्रंथांच्या भाषेबद्दल मेजर कँडीचें मत झालें होतें तें असें :–

"It is a source of pain to me that I have been constrained to give unfavorable reports of the works which have been submitted to my examination by the Board; but I feel it to be a point of importance that inferior works should not be published by authority." २९

मेजर कँडीच्या सूचनांबरहुकूम फेरफार होऊन उपरिनिर्दिष्ट 'यंत्रशास्त्राचीं मूळें' इ. स. १८५३ मध्यें छापलें गेलें.

विद्योपक्रमाचा ग्रंथ

'सारसंग्रह' (१८३१) प्रमाणें विद्यार्थ्यांना अनेक विषयांची एकदम ओळख करून देण्याच्या हेतूनें निर्माण झालेला महत्त्वाचा दुसरा एक ग्रंथ म्हणजे 'विद्योपक्रमाचा ग्रंथ' (१८४८) हा होय. माधवराव मोरोजी व नाना मोरोजी या दोघांनीं मिळून

---

२७ **इंदुप्रकाश**, पु २९, अं. २८. १८९०.

२८ *D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1849. p. 99.

२९ *Ibid.* p. 102.

'महाराष्ट्र देशांतील मराठी शाळांकरितां' हा ग्रंथ तयार केला. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें सरकार व पाद्री लोक मराठी व गुजराती शाळा काढीत आहेत. पण त्या भाषांत शालोपयोगी पुस्तकांचा 'तोटा' आहे. 'यास्तव न्यूनतेची पूर्णता व्हावी म्हणून या ग्रंथाची योजना केली आहे आणि या ग्रंथकर्त्यांनी जीं पुस्तकें ग्रेट ब्रिटन वगैरे देशांतील विद्यालयांत संमत आहेत त्यां सारिखाच हा ग्रंथ करण्याचा उद्देश धरिला आहे.' स्कॉटिश मिशनऱ्यांच्या 'ज्ञानसंग्रह' नामक पुस्तकांतील कांहीं धडे व दिग्दर्शन मासिकांतील कांहीं उतारे या ग्रंथांत घेतलेले आहेत. [३०] मकलकच्या 'कोर्स ऑफ एलिमेंटरी रीडींग' प्रमाणें या पुस्तकाची रचना असावी म्हणून त्यांत कृतज्ञता, सत्य, सौम्यता, परोपकार बुद्धि इत्यादि नीतिविषयक धडे, सूक्ष्मदर्शक यंत्र, भूमिकंप, ज्वालामुखी पर्वत, पृथ्वीचा आकार आणि परिणाम, पर्जन्य, उष्णमापक, सूर्यमंडली, ऋतु, भरती-ओहोटी, इत्यादि शास्त्रीय विषयांवरील धडे या पुस्तकांत दिलेले आहेत.

या पुस्तकाच्या प्रस्तावनेला जोडून, रे० नेसबिट, मेजर कँडी, केनडी, रे०स्टीव्हनसन, रे० मिचेल, मोल्स्वर्थ, फॅरिश इत्यादिकांचे अभिप्राय दिलेले आहेत. या सर्वांनीं या पुस्तकाची तोंडभर स्तुति केलेली आढळते. याला कारण असें दिसतें कीं ख्रिस्ती धर्मांतील कांहीं कल्पनांना त्यांत स्थान मिळालें आहे. 'उत्पत्तीपासून जलप्रलयपर्यंत जगाच्या ज्या गोष्टी त्या' या धड्यांत लिहिलें आहे:-

"परम समर्थ कर्ता जो ईश्वर त्याच्या शब्दाने जग उत्पन्न झालें. सजीव निर्जीव पदार्थ करण्यामध्यें देवाने सहा दिवस घालविले, आपलीं सर्व कामें करून तो सातवे दिवसीं विश्रांति पावला असें उदाहरण दाखवून त्याने सर्व मनुष्यांस असी आज्ञा केली कीं सात दिवसांत एक दिवस तुम्ही सर्व प्रापंचिक उद्योग आणि चिंताहि सोडून विशेषें करून माझें ध्यान करण्यामध्यें तत्पर असा." [३१]

मेजर कँडी व 'दंभहारक'

या पुस्तकाच्या भाषिक तपासणीचा इतिहास 'दंभहारक' मासिकाच्या इ. स. १८७२ च्या प्रथम वर्षाच्या चौथ्या अंकांत पहावयास मिळतो. मात्र तेथें 'शालोपक्रमाचा ग्रंथ' असें नांव दिलेलें आहे. दिलेल्या सर्व माहितीवरून तो 'विद्योपक्रमाचा ग्रंथ' असावा असें वाटतें. या इतिहासावरून असें दिसतें कीं या पुस्तकाचें हस्तलिखित प्रथम रे० नेसबिट याच्याकडे गेलें. त्यानें त्यांतील कांहीं दोष दाखविले.

---

३० *Oriental Christian Spectator, Vol.* 22. 1851. pp. 342–43.

३१ माधव मोरोजी आणि नाना मोरोजी, **विद्योपक्रमाचा ग्रंथ**. १८४८. पृ. ४६.

नंतर तें रे० स्टीव्हनसन याच्या हातीं आलें. आवश्यक तीं साधनें नसल्यामुळें पुस्तक-तपासणीचें काम प्रथम त्यानें नाकारिलें; पण नंतर एका ब्राह्मणाच्या मदतीनें त्यानें तें केलें. एवढा इतिहास देऊन 'दंभहारक'कार लिहितात :—

"या विचाऱ्यानें (रे० स्टीव्हनसन) मात्र आपलें खरें स्वरूप बाहेर दाखविलें व असें कबूल केलें कीं ज्याची जन्मभाषा त्याणेंच शुद्ध करावी. परंतु हे विचार आमचे प्रख्यात क्यांडीसाहेब यांस कसे वाटले असतील ते असोत; ते तर घडकून मोठमोठ्या विद्वानांचीं पुस्तकें शुद्ध करीत आहेत. स्टीव्हनसन् साहेबाप्रमाणें यांपाशींही मराठी शास्त्री आहेत, परंतु जेव्हां हे एकाद्या मोठ्या विद्वानाचें पुस्तक शुद्ध करण्याचें हातीं धरतात, तेव्हां स्टीव्हनसन् साहेबाप्रमाणें आपलें खरें स्वरूप दाखविणें ही मात्र त्यांना मोठी अपमानाची गोष्ट असें वाटत असावें? सरकारच्या वजनावर कसेंही चालो, परंतु विद्वानांची समजूत तर अशी आहे, कीं एकाद्या भाषेचें कोणीही परक्या गृहस्थानें एकादें पुस्तक लिहिलें, तर ती ज्याची जन्मभाषा, अशा एकाद्या विद्वानानें तें शुद्ध करावें तेव्हांच भाषेच्या दृष्टीनें त्यास तितका मोठेपणा येतो. तसेंच दुसऱ्याची मदत घेऊन एकादें कृत्य केलें, आणि त्याची खरी मदत जर कबूल केली नाहीं, तर ज्यांना पक्की माहिती नसते, ते कदाचित् फसून सर्व मान एकालाच देतात. तथापि जे आंतल्या खुब्या जाणतात, ते तर अशा कृत्याची चेष्टा करितात, आणि त्या कृत्याबद्दल अर्धा किंवहुना सर्वही मान त्या मदतनीसासच देतात, आणि त्यांतील दोषांना मात्र तो प्रख्यात मनुष्य मालक होतो; कारण त्या कृत्यांतील गुण त्याच्या आंगचे असण्यापेक्षां दोषच त्याच्या आंगचे असण्याचा संभव विशेष आहे." [३२]

वरील उताऱ्यावरून त्यावेळच्या कांहीं एतद्देशीय विद्वानांत मेजर कँडीच्या भाषाविषयक धोरणाबद्दल किती असंतुष्टता होती याची कल्पना येते.

'विद्योपक्रमाचा ग्रंथ' या पुस्तकाच्या प्रथमावृत्तीच्यावेळीं लेखकांना सरकारी मदत किती मिळाली तें समजत नाहीं; परंतु इ. स. १८५५ मध्यें त्याची दुसरी आवृत्ति निघाली तेव्हां शिक्षामंडळीनें त्याच्या दोनशें प्रती विकत घेतल्या. [३३]

दाक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी व शास्त्रीय विषयावरील शालेय पुस्तकें

'दाक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी' मार्फत जीं शास्त्रीय विषयांवरील शालोपयोगी पुस्तकें छापिलीं गेलीं त्यांत सखाराम रामचंद्र दीक्षित यांनीं विष्णु अमृतराव यांच्या मदतीनें रचलेला 'शास्त्रीय ज्ञानदर्शन' (१८५६) हा ग्रंथ नमूद करण्यासारखा

---

३२ **श्री दंभहारक**, पु. १, अं. ४. १८७२. पृ. ६९–७०.

३३ *D. P. I. Book Depot*. 1855, p. 193.

आहे. हरि केशवजी व कृष्णशास्त्री भाटवडेकर यांच्या तपासणीनंतर हा भाषांतरित ग्रंथ प्रसिद्ध झाला. यांत पदार्थविज्ञानादि शास्त्रांचें एकोणतीस प्रकरणांत संवादरूपानें वर्णन केलेलें आहे. पुस्तकाच्या शेवटीं 'अप्रसिद्ध शब्दपरिभाषा' जोडलेली आहे; परंतु या यादींत इंग्रजी शब्दांचे मराठी अर्थ दिलेले नसून, पुस्तकांत वापरलेल्या कठीण मराठी शब्दांचे अर्थ सांगितलेले आहेत. उदाहरणार्थ, परसा–अग्टी, झबडी–कुंडी, प्रस्फुटता–व्यक्तता, निवर्तित–परतलेली, कोशेटा–टरफल, हेंदर–मळ इत्यादि. बिंदुस्थान–Focus, आगपाणी–Nitric Acid, रोगिशाला–Hospital, सुरक्षक दीप–Safty Lamp इत्यादि पारिभाषिक शब्द या पुस्तकांत आढळतात. बायबलमधील कांहीं उताऱ्यांना या पुस्तकांत स्थान दिलेलें पाहून आश्चर्य वाटतें. 'खिस्ताचें भविष्यसूचक असें वाक्य आहे कीं, ज्या संध्याकाळीं आकाश तांबडें असतें त्याचे दुसरे दिवशीं निरभ्र असतें.' (माथ्यू, अध्याय १६ ओवी २) [३४] 'आकाश तांबडें आणि भरून आलें आहे. यावरून आज हवा खराब होईल असें जाणा.' (माथ्यू, अध्याय १६ ओवी ३). 'देव लोंकरीसारिखें बर्फ देतो असें बैबलांत सांगितलें आहे. याचें कारण काय? बर्फ उष्णतेचें अतिशय मंदवाहक आहे, म्हणून कंदमूलांचें आणि बीजांचें धुक्यापासून आणि थंडीपासून संरक्षण करतें.' [३५] '(१४७ अध्याय १६ ओळ) साामिसू याचें बर्फाविषयीं काय म्हणणें आहे तें सांगावें, आणि त्याच्या म्हणण्याचें काय तात्पर्य आहे तेंही स्पष्ट करून सांगावें? साामिसू असें म्हणतो, परमेश्वर बर्फ लोंकरीसारिखें देतोः त्याच्या या म्हणण्याचा अभिप्राय हाच कीं, बर्फ हें लोंकरीइतकें पांढरें आहे इतकेंच नाहीं; परंतु हें तिच्या इतकें उबेचेंही आहे.' [३६]

दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या मंडळीसाठीं, 'वर्तमानवाहक विद्युद्यंत्र' (१८५९) नांवाचें आणखी एक पुस्तक मंडळीचे पंडित कृष्णशास्त्री भाटवडेकर यांनीं लिहिलें. मंडळीचे सेक्रेटरी जेम्स फ्लिन याच्या सूचनेवरून तें लिहिलें गेलें. ग्रंथाच्या शेवटीं लोकोपयोगासाठीं विद्युद्यंत्राविषयीं सरकारनें जे कायदे केले होते त्यांचेंहि भाषांतर लेखकानें जोडलेलें आहे. ग्रंथकार लिहितात :—

"अहो धीर लोक हो, अहो श्रमिक जन हो, तुह्मी या विद्युद्विषयरूप शेतामध्यें शोध करण्याविषयीं कांहीं जास्त झटा. कारण कित्येक प्रकाशमान पदार्थ अजून तुमच्या

---

३४ सखाराम रामचंद्र दीक्षित, **शास्त्रीय ज्ञानदर्शन**. १८५६. पृ. ८९.

३५ तत्रैव. पृ. ९०.

३६ तत्रैव. पृ. २१२.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

शोधाचीं मार्गप्रतिक्षा करीत आहेत. आणि या अत्यंत पातळ व सूक्ष्म विद्युत्शक्ती-विषयीं जे नियम आहेत, त्यांची चांगली चालना करा. तेणेकरून तुमच्या श्रमाचें प्रतिफळ तुह्मांस लवकर मिळेल, हें शेत मोठें सुपीक असून विस्तीर्ण आहे. सावधपणें यांत चांगली मेहनत करा. आणि प्रयोग करून दाखवा, ह्मणजे सांप्रतकाळच्या तत्ववेत्त्यांचे मुकुट ज्यानें भूषित झाले आहेत, तो तुरा तुमच्या शिरोभूषणावर लावला जाईल." [३७]

वाय्वावरण आणि त्यांतील चमत्कार

शिक्षामंडळीनें इ. स. १८५४ मध्यें शालेय पुस्तकांची फेर तपासणी करून त्यांत कांहीं बदल केले व भर घातली. यावेळीं शास्त्रीय विषयावरील जीं नवीं पुस्तकें शाळांमधून वापरावयाचें ठरलें त्यांत, 'The Atmosphere and its phenomena to be procured from Duxina Prize Committee and revised and prepared for the press by Candy,' [३८] असा ठराव झाला. त्याप्रमाणें 'वाय्वावरण आणि त्यांतील चमत्कार' (१८५७) या पुस्तकाचा उपयोग शाळांत केला गेला. टॉमस् डिक याच्या इंग्रजी ग्रंथावरून भाऊशास्त्री थेऊरकर यांनीं हें पुस्तक तयार केलें. दक्षिणा प्राइझ कमिटीचे 'रिवैजर' नानाशास्त्री आपटे यांनीं तो भाषेच्या दृष्टीनें तपासला होता. सरकारी विद्याखात्याच्या ठरावाप्रमाणें जरी तो मेजर कँडी यांनीं शुद्ध केला नाहीं, तरी त्यांचेच शिष्य नानाशास्त्री आपटे यांनीं तो तपासला. मेजर कँडी यांच्याच मार्गानें नानाशास्त्री जाणार हें निश्चित. जेव्हां नानाशास्त्र्यांची दक्षिणा प्राइझ कमिटीचे 'ऑक्टिंग रिवैजर ऑफ् ट्रॅन्स्लेशन्स' म्हणून नेमणूक झाली, तेव्हां तारीख २७ मार्च, १८५३ रोजीं त्यांनीं मेजर कँडीना एक पत्र लिहिलें होतें. त्यांत नानाशास्त्री म्हणतातः—

"Had it not been for the unremitting exertions you made to give us a correct and critical knowledge of the English and Marathee tongues, I should never have been able to succeed in getting the situation of Reviser under the Duxina Committee, nor even the one which I have the honour to hold at present in the College. In fact, I can never be too thankful to you for the incessant exertions you took and the anxious solicitude you felt that we may apply ourselves diligently to profit by your instructions." [३९]

---

[३७] कृष्णशास्त्री भाटवडेकर, **वर्तमानवाहक विद्युद्यंत्र.** १८५९. पृ. ५२.

[३८] *Report of the Board of Education.* 1854–55. p. 12.

[३९] *D. P. I. Board of Education, Poona College.* 1853. p. 219.

अशाप्रकारें कँडीप्रणित नियमांचें पालन करून वर उल्लेखिलेला 'वाय्वावरण आणि त्यांतील चमत्कार' हा शालेय ग्रंथ तयार झाला. वाय्वावरणाचें गुरुत्त्व, भार, प्रकृत्यंश स्थितिस्थापकता, वायुघटकतत्त्वें, वाय्वावरणामुळें सृष्टींत जीं जीं हितकारक कृत्यें घडतात त्यांचा विचार, परमेश्वराचें चातुर्य व चांगुलपणा ह्यांची वाय्वावरणावरून सिद्धता, वाय्वावरणसंबंधीं चमत्कार, बाष्पभवन, पाऊस, वारा, विद्युत् इत्यादि विषयांसंबंधीं माहिती या ग्रथांत आलेली आहे. सृष्टिजन्य ईश्वरज्ञान होणाच्या दृष्टीनें हा ग्रंथ शालेय अभ्यासक्रमांत फार उपयुक्त ठरला.

अनेकविद्या–मूलतत्त्व–संग्रह

पदार्थविज्ञान, ज्योतिष, गणित, साहित्य, कला, नीति इत्यादि अनेक विषयांची थोडथोडी माहिती मुलांस व्हावी म्हणून ज्याप्रमाणें, 'सारसंग्रह' (१८३१) अगर 'विद्योपक्रमाचा ग्रंथ' (१८४८) हीं पुस्तकें रचलीं गेलीं, त्याप्रमाणें कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं इ. स. १८६१ मध्यें 'कितीएक इंग्लिश ग्रंथांच्या आधारें,' 'अनेकविद्या–मूलतत्त्व–संग्रह' तयार केला. "ह्या ग्रंथांत यंत्रशास्त्र, रसायनशास्त्र, दर्शनानुशासन, ज्योतिष, प्राणिधर्मविषयकशास्त्र, शारीरक इत्यादि ज्या पदार्थविज्ञानाच्या शाखा आहेत, त्यांतील मुख्य मुख्य गोष्टींचें संक्षेपानें व सोप्या रीतीनें वर्णन केलें आहे. ह्या वर्णनापासून त्या त्या विषयांची मोठी माहिती वाचणाऱ्यांस होईल, असें ग्रंथकाराचें मत नाहीं, पण त्यास अशी आशा आहे, कीं ह्या ग्रंथाच्या अवलोकनानें त्या अत्यंत उपयुक्त व चमत्कारिक शास्त्रांचें स्वरूप कांहींसें त्यांस समजून त्यांविषयीं विशेष माहिती करून घेण्याविषयीं त्यांची प्रवृत्ति होईल." ४०

तसें पाहिलें तर केवळ शास्त्रीय विषयांचीच माहिती या ग्रंथांत दिलेली नसून, वाक्यालंकार, अहिल्याबाईंचें चरित्र, हिमालय, ताजमहाल, वेरूळचीं लेणीं, दिमोस्थेनीसचें भाषण, सिसरोचें भाषण इत्यादि उपयुक्त व मनोरंजक विषयही त्यांत कृष्णशास्त्र्यांनीं आणिलेले आहेत. हा ग्रंथ रचून कोणत्याहि विषयावरील विचार मराठीमध्यें मांडतां येतात, हें कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं सिद्ध करून दाखविलें. कोणास स्थलवर्णनाचा उत्तम नमुना पहावयाचा असल्यास 'वेरूळाजवळचीं लेणीं', 'ताजमहाल', 'हिमालय पर्वत' हे धडे वाचावे, कोणास थोर व्यक्तीचें चरित्र कसें लिहावयाचें हें जाणून घ्यावयाचें असल्यास त्यानें 'अहिल्याबाईंचें चरित्र' हा धडा वाचावा, मनुष्याचें मन हालवून सोडण्याजोगें वक्तृत्त्व मराठींत करतां येईल कीं नाहीं याचा प्रत्यय 'वाक्चातुर्य' या धड्यावरून येईल. 'विद्यानंद', 'योग्य अभिमान', 'मेल्याविषयीं दुःख', 'आंगीं विनय असणें', इत्यादि धडयांवरून तत्त्वज्ञान,

४० कृष्णशास्त्री चिपळूणकर, **अनेकविद्या-मूलतत्त्व-संग्रह**. १८६१. प्रस्तावना.

मानसशास्त्र इत्यादि विषयांवर मराठी भाषेंत ग्रंथरचना करणें तेवढेंसें कठीण नाहीं, असा विश्वास कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या 'अनेक विद्या-मूलतत्त्व-संग्रह' या ग्रंथामुळें निर्माण झाला, असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति होणार नाहीं.

जरी वरील ग्रंथ दक्षिणा प्राइझ कमिटीसाठीं तयार होऊन छापिला गेला, तरी मेजर कँडी हे कमिटीचे अध्यक्ष असल्यामुळें साहजिकच त्यांनीं घालून दिलेल्या व्याकरण व भाषानियमांनुसार या ग्रंथाचें लेखन झालेलें असणार, यांत शंका नाहीं. तसेंच कृष्णशास्त्री चिपळूणकर, मेजर कँडीचे पट्टशिष्य असल्यामुळें त्यांची भाषासरणी व लेखनपद्धति विद्याखात्यानें घालून दिलेल्या मार्गानें जाणार, हेंहि तितकेंच खरें आहे. मात्र ज्या बाबतींत मेजर कँडी यांचा कटाक्ष होता ती म्हणजे संस्कृत शब्दांचा कमींत कमी उपयोग करणें ही होय. या मुद्यावर कृष्णशास्त्री लिहितातः-

"ह्या ग्रंथांत शास्त्रीय विषयांचें निरूपण करितांना संस्कृत शब्द आले आहेत, परंतु तसल्या विषयांवर लिहितांना संस्कृत शब्द घातल्यावांचून उपाय चालत नाहीं, हें प्रायः सर्व सुज्ञ मराठी ग्रंथ लिहिणाऱ्यांचे अनुभवास आलेंच असेल; ह्यास्तव विद्वज्जन निरुपाय गोष्टीविषयीं प्राकृत ग्रंथकारास नांव फारसें ठेवणार नाहींत, अशी खातरी आहे"[४१]

वैद्यक ग्रंथ

इंग्रजी अमलाच्या प्रारंभकाळांत ज्याप्रमाणें नवीन गणितविद्येचा पाया मराठी भाषेंत जॉर्ज जर्विसच्या श्रमामुळें घातला गेला, त्याप्रमाणें औषधिविद्या शिकविण्यासाठीं डॉ. मॅक्लेनन याच्या प्रयत्नानें इ स. १८२६ मध्यें 'Medical school for the Instruction of the Native Practitioners' ही संस्था सुरू झाली. या शाळेंतील विद्यार्थ्यांसाठीं मॅक्लेननें 'औषध-कल्पना-विधि' (१८२८) हा वैद्यक ग्रंथ रचिला. या ग्रंथांत, 'रोगनिवृत्तिपूर्वक शरीरास हितावह जे वनस्पति धातुजीव-संबंधी पदार्थ त्यानां औषध ह्मणतात त्यांतें सांगतो,' असें म्हणून पाश्चात्य व पौर्वात्य औषधांची माहिती दिलली आहे. औषधांचीं नांवें लॅटिन, इंग्रजी, प्राकृत, संस्कृत, हिंदुस्थानी, फारशी व अरबी इतक्या भाषांत दिलेलीं आहेत. तसेंच निरानिराळ्या रोगांचीं लक्षणें देऊन त्यांवर उपाय सुचविलेले आहेत. याच जॉन मॅक्लेननें इ. स. १८५२ मध्यें 'शारीर' या नांवाचा एक ग्रंथ भाषांतरित केलेला आढळतो.

"ही विद्या फार मोठ्ये कामाची आहे. प्राण कशानें राहातो मनुष्यें आणि जनावरें कशानें चालतात. पहातात. ऐकतात. व इतर हें मनुष्यांस या विद्येवरून ठाऊक

---

४१ कृष्णशास्त्री चिपळूणकर, **अनेकविद्या-मूलतत्त्व-संग्रह**. १८६१. प्रस्तावना.

होतें. व सुप्रकृति ठेवणें रोग न येऊं देणें रोगाचें ठिकाण जाणणें व झालेला रोग दूर करणें हेंही या विद्येनें ठाऊक होतें. या विद्येवांचून कोण कशानें रोगदमन करील.'' ४२ या शब्दांत शारीर विद्येची महति लेखक सांगतो.

मेजर कँडी यांचा हात या पुस्तकावरून न फिरल्यामुळें कीं काय त्यांत विराम-चिन्हांचा अव्यवस्थित उपयोग, मोठ्ये, आंतले इत्यादि एकारान्त विशेषणांचा वापर, संस्कृत शब्दांची जादा पेरणी, इत्यादि गोष्टी आढळतात. वैद्यक व शारीरशास्त्रांवरील ग्रंथ जरी तत्कालीन मराठी शाळांमधून वापरले गेले नव्हते, तरी त्यावेळीं सर्व शास्त्रीय विषयांचीं पुस्तकें मराठींत आणण्याचे जे प्रयत्न झाले, त्यांची कल्पना यावी एवढ्याच-साठीं वरील पुस्तकांना या विवरणांत स्थान दिल आह.

शेतकीविषयक शालेय पुस्तकें

इतर शास्त्रांबरोबर शेतकीविषयक ज्ञान मुलांना शाळांमधून देण्यासाठीं, 'दक्षिण देशांत तुतीचें झाड करण्याची व रेशमाचे किडे पाळण्याची व रेशिम उत्पन्न करण्याची रीति' (१८३८), 'जागती जोत किंवा शेतपोत रीतभात यांविषयीं संवाद' (१८३८), 'शेतकी आणि घरगुती व्यवस्था' (१८४६), अशासारखीं पुस्तकें तयार झालीं होतीं. याशिवाय गोविंद नारायण यांचें 'उद्भिजन्यपदार्थ' (१८५६) हेंहि पुस्तक शाळां-मधून वापरलें जाई. विद्याखात्याच्या इ. स. १८५८-५९ च्या वार्षिक इतिवृत्तामध्यें मराठी शाळांत अभ्यासिल्या जाणाऱ्या पुस्तकांची जी यादी दिलेली आहे, तींत या पुस्तकाचा समावेश केलेला आढळतो. तेरा भागांत, 'धान्य, दाणा, कंद, फळभाजी, इत्यादि मनुष्याची अन्नसामग्री हिचें वर्णन' या पुस्तकांत लेखकानें आणिलें आहे. या व इतर अनेक शालेय पुस्तकांच्याद्वारा मातृभाषेची सेवा करण्याची स्फूर्ति आपणांस कशी मिळाली तिचें वर्णन गोविंद नारायण खालील प्रमाणें करतात :-

"इंग्रजी शिकायास लागल्यापासून मला तर महाराष्ट्र भाषेचा तिरस्कार येत असे, असीच बहुतेक लोकांची स्थिति झाली होती. एकादा प्राकृत ग्रंथ वाचावा किंवा हातांत धरावा ह्मटलें ह्मणजे वाईट वाटे. जेव्हां मी फ्रिचर्च विद्यालयांत गेलों तेव्हां डाक्तर विल्सन व मयत रेवरेंड राबर्ट निसबिट यांची मराठी भाषेवर श्रद्धा आणि एतद्देशीय मुलांमध्यें ती भाषा शुद्ध येण्याविषयींची उत्कंठा व श्रम पाहून मला तिचा थोडा अभ्यास करण्याचें आवश्यक पडलें. पुढें सन १८४० सांत, दैवयोगानें असी गोष्ट झाली कीं, डाक्तर लीथ हे कधीं कधीं या शाळेंत येत असत त्यांणीं विद्यार्थ्यांस स्वभाषा चांगली आली असतां परभाषा शिकण्यास फार सुलभ पडतें, असें मनांत

४२ जॉन मॅक्लेनन, **शारीर**. १८५२. पृ. १.

आणून मोठ्या परोपकार बुद्धीनें महाराष्ट्र भाषेंत बसल्या बैठकीस कोणाची मदत न घेतां, व दुसरे ग्रंथ अवलोकन न करितां, त्याचवेळीं योजलेल्या विषयावर जो निबंध लिहील, त्यास शंभर रुपये इनाम देऊं असें दर्शविलें. ह्या त्याच्या स्तुत्य कृत्यावरून शाळेंतील बहुतेक शिक्षकांचीं व मुलांचीं मनें स्वभाषेकडे वळलीं. त्यावेळीं मलाहि त्या गोष्टीचा निदिध्यास लागल्यावरून मीहि तिजवर बरेच परिश्रम केले. तेव्हांपासून मराठी भाषेची गोडी लागून, जें कांहीं अल्पस्वल्प सध्यां त्या भाषेचें ज्ञान मला झालें आहे, त्याचा मी सदरीं सांगितलेल्या तीनहि गृहस्थांचा ऋणी आहे." [४३]

गोविंद नारायण व मेजर कँडी

परभाषी लोकांकडून स्फूर्ति व उत्साह घेऊन स्वभाषेची सेवा करण्याच्या हेतूनें गोविंद नारायण माडगांवकर यांनीं जीं अनेक शालेय पुस्तकें लिहिलीं त्यांतील 'उद्भिज्जन्यपदार्थ' हें एक होय. या पुस्तकाच्या मालकीहक्काबद्दल त्यांना विद्याखात्याकडून पांचशें रुपये मिळाले. या पुस्तकाची तपासणी करून मेजर कँडीनीं लिहिलेला टीकालेख पाहण्यासारखा आहे. मेजर कँडी लिहितात :—

"With regard to the style of the work, it is pretty fluent and pleasing, but I have noticed a number of minor errors of grammar and composition, a few of which I will append as a specimen, that the author may correct them if he thanks fit.

"Title उद्भिज्जन्य पदार्थ will do for 'vegetable substance' but it will not do for many of the things treated of in this book. The title is ungrammatical.

"The nouns धान्य, दाणा, कंद, फळभाजी, पालेभाजी आणि अन्न सामोग्री should be in the same case, whereas the former are uninflected and the latter is in the possessive case. It should be thus : धान्य, दाणा, कंद, फळभाजी पालेभाजी, इत्यादि मनुष्याची अन्न-सामग्री हिचें वर्णन....

"Instead of आम्हांस (नेहेमीं संघटण असतें) there should be आपणांस. The author is not speaking of himself only, but of men in general....

---

४३ गोविंद नारायण माडगांवकर, **उद्भिज्जन्यपदार्थ**. १८५६. प्रस्तावना. पृ. १४–१५.

"The author writes खावून, देवून, जावून, येवून etc., but this form is wrong. It should be खाऊन, देऊन, जाऊन, येऊन etc.

"The author does not attend to the right spelling of Sanscrit words. बुत्धी should be बुद्धि, श्रत्धा should be श्रद्धा etc

"सुज्ञ आणि अज्ञ : Is the : meant to be a visarga or a colon ? If the former, it is wrong. If the latter, it should not be use on account of its liability to be mistaken for the former.

"इंग्रज सरकारनें व इतर संभावित गृहस्थ यांनीं. The इंग्रज सरकार is not a गृहस्थ, which the use of इतर makes it to be.

"उत्कंठता. There is no such word. The word is उत्कंठा....

"एकाच प्रकारची जमीन असतां त्यांत etc. As जमीन is feminine त्यांत should be तींत.

"Why is the high word पादप used ?

"अति थोडा is very inelegant.

"प्राण्यादिकास जसी निद्रा, आहार, आणि भय हीं आहेत तसींच वृक्षादिकांस आहेत. the construction of the above sentence would be better thus : निद्रा, आहार, आणि भय हीं जसीं प्राण्यांस आहेत तसींच वनस्पतीस आहेत.

"एक दल धान्य Is this a correct formation ? दल means a half-grain. Therefore there is no एक दल धान्य. The form द्विदल is right....

"खंडात, कामात etc. the author frequently omits the sign of the locative case. It should be खंडांत, कामांत etc. ...

"गव्हांचें झुडूप Is this a correct use of the word झुडूप ?

ह्या उपद्रवास गहुं काजळला असें म्हणतात. This is not correct, गहूं काजळला is not the name of the disease. It might be thus, हा उपद्रव झाला म्हणजे गहूं काजळला असें म्हणतात. ...

"कांठेवाड should be काठेवाड. ...

"नसला पाहिजे would be better नसावा. ...

"Is लोंग used for a head of Jondhala ? Should not कणीस be used ?

"यांचा दाणा लाल्लूस What is meant by लाल्लूस ? Is there such word ?

"पृथ्वी निर्मूल झाली असती How could the earth be exterpated

"दखणांत is wrong....

"डोंगरांत पेरितात Is it correct to say डोंगरांत पेरणें ? should it not be डोंगरावर ?

"ओरिसा is not known in Marathi. ओढ्यादेश is the word....

"तो तांदळाप्रमाणें कांडावा लागतो. Instead of तांदळा, it should be माता, for rice is not called तांदुळ till it has been husked.

"स्काटलांड, आयरलांड, इंग्लांड, व फ्रेंच देशांत Instead of फ्रेंच there should be फ्रांस which is the name of the country. The construction should be ह्या देशांत.

"The Banana is not a wild plantain and should not therefore be rendered वनकदली. The Banana is the Musa Sapientum or सोनकेळ. The Marathi word for wild plantain is चवेणी.

"नवे उद्योग शोधून काढण्याची त्यांस फार कमी जिज्ञासा आहे. This is quite a misuse of the word जिज्ञासा. हौस or इच्छा would be better."[४४]

मेजर कँडी यांच्या वरील टीकालेखाचा बारकाईनें अभ्यास केल्यास त्यांनीं केलेल्या व्याकरणविषयक व अर्थविषयक फेरबदलांची कल्पना येते. त्यांनीं केलेल्या या प्रयत्नांमुळेंच मराठी भाषेला सुसूत्रता आली असें म्हणावयास हरकत नाहीं.

अर्थशास्त्र

एकोणिसाव्या शतकांत ज्याप्रमाणें पदार्थविज्ञान, रसायन, शारीर, शेतकी इत्यादि शास्त्रांवर शालेय पुस्तकें निर्माण झालीं, त्याप्रमाणें अर्थशास्त्रावरहि उपयुक्त ग्रंथ लिहिले गेले. गोपाळ हरी देशमुख यांचें लक्ष्मीज्ञान (१८४९) हें या विषयावरील नोंद करण्यासारखें पहिलें पुस्तक होय. दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या मंडळीच्या आश्रयानें तयार झालेल्या पुस्तकांत अर्थशास्त्रावरील 'देशव्यवहारव्यवस्था या शास्त्राचीं मूलतत्त्वें' (१८५४) हें एक आहे. मराठीमध्यें अर्थशास्त्रावर लिहिलेलें महत्त्वाचें पुस्तक होय. "मिसेस मार्सेट म्हणून एक ग्रंथकर्ती झाली, तिच्या ग्रंथाचें कोठें भाषांतर कोठें भावार्थ असी योजना करून तसेंच मेस्तर जान् स्टुअर्ट मिल्ल, ह्मणून जो या

---

४४ *D. P. I. Miscellaneous, Vol. 13.* 1856. pp. 146–149.

शास्त्रावर उत्कृष्ट अर्वाचीन ग्रंथकर्ता झाला, त्याचे पद्धतीस बहुतेक प्रकरणीं अनुसरून, हा संवादरूप ग्रंथ, महाराष्ट्र भाषेंत, अजम हेन्‌री ग्रीन एसक्वायर पुणें एथील मुख्य शाळेचे प्रोफेसर यांच्या सूचनपूर्वक हरि केशवजी सोमवंशी क्षत्री पाठारे सदर अदालतीचे त्रांसलेटर यांच्या हातून आरंभून विश्वनाथ नारायण मंडलिक एलफिन्‌स्टन् इंस्टीटयुशनमधील पहिल्या प्रतीचे विद्यार्थी यांजकडून सिद्धीस जाऊन" दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या मंडळीनें छापिला.

या पुस्तकासाठीं मंडळीनें बाराशें रुपये लेखकांना द्यावयाचें ठरविलें होतें. त्यांतील नउशें रुपये हरि केशवजींना मिळाले. प्रथम हरि केशवजींनी Mrs. Marcet's Conversations on Political Economy या इंग्रजी ग्रंथाचा बराचसा भाग भाषांतरित केला आणि प्रो. ग्रीन यांनीं त्याच्यावर हात फिरविला. या पुस्तकाचा इतिहास देतांना विश्वनाथ नारायण मंडलिक यांच्या कामाबद्दलचा उल्लेख आढळतो तो असाः—

"Between him and Hari Keshavji the work was shared in the following manner; Wishwanath Narain was made responsible for all the matter and Hari Keshavji for all the language, while the task of rendering the whole into familiar dialogue adapted to the present state of native thought and information and of finding Indian illustrations of the various topics discussed, was to be shared between them, though the greater part of this probably falls to the lot of Hari Keshavji." [४५]

अशाप्रकारें झालेल्या कामाच्या विभागणींत पुस्तकाच्या भाषेची जबाबदारी हरि केशवजी यांच्याकडे होती. यावरून त्यांच्या मराठी भाषेवरील नैपुण्याबद्दल मंडळीला किती खात्री होती याची कल्पना करतां येते. हें भाषांतर जसजसें तयार होत होतें, तसतसें तें पुणें कॉलेजमधील शास्त्री मंडळी व विद्यार्थी यांच्यासमोर वाचलें जाई. हरि केशवजी हे शास्त्रीय विषयांवरील ग्रंथ सोप्या भाषेंत लिहिण्यामध्यें हुशार असल्यामुळें 'सिद्ध-पदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद' अगर 'रसायनशास्त्राविषयक संवाद' या संवादांप्रमाणेंच 'देशव्यवहारव्यवस्थे' वरील संवादहि तितकेच सरस उतरले आहेत. या ग्रंथाच्या

---

४५ रामचंद्र हरि, **हरि केशवजी यांचें चरित्र.** १९११. पृ. ३०.

शेवटीं दिलेलें तीन पानी शुद्धिपत्र पाहिलें कीं, भाषा शुद्ध ठेवण्याकडे मंडळीकडून किती लक्ष पुरविलें जाई त्याची कल्पना करतां येते. शुद्धिपत्रांत बुद्धिमान, विद्वान, द्रव्यवान, क्वचित, पूर्ववत, अर्थात, इत्यादि शब्दांचें शेवटचें अक्षर व्यंजनान्त केलेलें आढळतें. संस्कृत शब्द शक्यतों कमी वापरावे या नियमाचें पालन करण्यासाठींच कीं काय 'फल' (पृ. १०, ओळ १८) हा शब्द बदलून त्याऐवजीं 'फळ' हा शब्द शुद्धिपत्रांत दिलेला आहे.

इ. स. १८५४ मध्यें बदललेल्या अभ्यासक्रमानुसार इतर विषयांच्या जोडीला अर्थशास्त्रावर एकादें पुस्तक तयार करवून घ्यावें या हेतूनें मेजर कँडी यांनीं कृष्णशास्त्री चिपळूणकर यांना सुचविल्यावरून, कृष्णशास्त्र्यांनीं जॉन स्टुअर्ट मिल याच्या 'दि प्रिन्सिपल्स ऑफ् पोलिटिकल इकनॉमी' या इंग्रजी पुस्तकाचें भाषांतर तयार केलें. त्याचें एक प्रकरण 'अर्थशास्त्रपरिभाषा, प्रकरण पहिलें' या नांवानें इ. स. १८५५ मध्यें प्रसिद्ध झालें. प्रो. ग्रीन यांच्या हाताखालीं मिलचें पुस्तक अभ्यासण्याचें भाग्य आपणांस लाभल्याचें कृष्णशास्त्र्यांनीं तारीख २९ ऑगस्ट, १८५४ रोजीं लिहिलेल्या एका पत्रांत नमूद केलेलें आहे. ते लिहितात :—

"My work is not a regular translation of Mill, but something like an adaptation of his treatise, which I had the good fortune of studying under Mr. Green. I think I have omitted nothing of the original, but such passages as I have thought exclusively of European interest and consequently least likely to be understood by the native reader. In a few places, I have added some new matter in the way of illustrations." ४६

या विषयाच्या अभ्यासाची आवश्यकता प्रतिपादितांना कृष्णशास्त्री म्हणतातः—

"अर्थशास्त्राचा अभ्यास फारच आवश्यक आहे असें मानलें पाहिजे. कारण, अर्थशास्त्रांत ज्या गोष्टींचें निरूपण केलें आहे, त्या गोष्टी नेहमींच्या व्यवहारांतल्या आहेत, व त्या गोष्टींच्या भ्रांतिपासून मोठमोठे अनर्थ होण्याचा संभव आहे. देशांतील संपत्तीचें स्वरूप, तिचीं कार्यें, तिचीं प्रधान व गौण कारणें, तिच्या मर्यादेचीं कारणें, देशांतील सरकाराशीं तिचा संबंध, परदेशच्या व्यापाराशीं तिचा संबंध, तिचा क्षय ज्या कारणांनीं होतो ती कारणें, इत्यादि अनेक विषयांचें प्रतिपादन ह्या शास्त्रांत आहे व ह्या विषयांचें यथार्थ ज्ञान होणें लोकांस किती आवश्यक आहे, हें ह्या शास्त्रांत त्या विषयीं जे सिद्धांत ठरवले आहेत ते व लोकांत ह्या विषयाविषयीं ज्या समजुती आहेत त्या, ह्यांची तुलना करून पाहिलें असतां, लक्ष्यांत सहज येईल." ४७

---

४६ *D. P. I. Board of Education, Poona college.* 1854. . 75.

४७ कृष्णशास्त्री चिपळोणकर, **अर्थशास्त्रपरिभाषा, प्रकरण पहिलें.** १८५५. प्रस्तावना.

'ह्या देशांतील व्यापाराची, शेतकीची, व राज्यव्यवस्थेची विशेष तपशीलवार माहिती' नसतांनासुद्धां मूळ पुस्तकांतील विषय समजावून घेऊन एका प्रकरणाचें भाषांतर करण्याचें कठीण काम कृष्णशास्त्र्यांनीं केलें. 'बाकीचीं प्रकरणें लौकरच प्रसिद्ध करावीं' अशी आपली इच्छा त्यांनीं व्यक्त करून दुसरें प्रकरणहि इ. स. १८५६ मध्यें लिहून तयार केलें.मेजर कँडी यांनीं पहिल्या प्रकरणाच्या भाषेबद्दल खालील शेरा मारला आहे :—

"I think that it does Krishna Shastri a great credit. The only fault, I find, is that he has occassionally introduced high Sanskrit words where they are not necessary. But I have pointed this out to him, and I doubt not that he will substitute comman words for them." ४८

कृष्णशास्त्र्यांनीं 'अर्थशास्त्र परिभाषा, प्रकरण पहिलें' तयार करतानांच लिहिलें होतें, कीं "महाराष्ट्र भाषेंत ह्या जातीच्या शास्त्रीय विषयांवर ग्रंथ फारच थोडे आहेत, व शास्त्रीय रीतीनें प्रकृत विषयासारख्या विषयांवर विचार करण्याचा प्रघातही लोकांत नाहीं, ह्यास्तव ह्या ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं कठीण कठीण संस्कृत शब्दांचा प्रयोग करणें ग्रंथकारास भाग पडलें." ४९ तरीसुद्धां मेजर कँडी यांनीं तपासणींत तोच दोष दाखविल्यामुळें, पारिभाषिक शब्द तयार करतांना संस्कृत शब्दांचा उपयोग करणें कसें अनिवार्य आहे, तें त्यांना पटवून देण्याचा कृष्णशास्त्र्यांनीं प्रयत्न केला. त्यांनीं कँडीला लिहिलें :—

"The scientific nature of the work has compelled me to make use of Sanskrit words in several places in this work; but wherever I could get good proper Marathi words, I always preferred them to the difficult Sanskrit ones. Those who are acquainted with the present state of the Marathi language, will, I think, admit the necessity of employing Sanskrit words in the vernacular works and particularly in works on scientific subjects." ५०

---

४८ *D. P. I. Miscellaneous. Vol. 13.* 1856. p. 49.

४९ कृष्णशास्त्री चिपळोणकर, **अर्थशास्त्रपरिभाषा, प्रकरण पहिलें.** १८५५. प्रस्तावना.

५० *D. P. I. Miscellaneous. Vol. 13.* 1856. p. 50.

या पुस्तकांत, धनोत्पत्तीच्या कारणांचा विचार, श्रम, भांडवल, श्रमसंयोग, लहानमोठे कारखाने, जमिनीचें उत्पन्न इत्यादि विषय आलेले आहेत. कृष्णशास्त्र्यांच्या या श्रमाबद्दल त्यांना दोन्ही प्रकरणांच्या भाषांतरासाठीं बाराशें रुपये बक्षिसादाखल मिळाल्याचा उल्लेख सरकारी दप्तरांत सांपडतो.[५१] पहिलें प्रकरण प्रसिद्ध झाल्यावर, विद्याखात्याच्या १८५४-५५ च्या वार्षिक इतिवृत्तांत, त्याबद्दल खालीलप्रमाणें लिहिलें आहे :–

"The work is most creditable both to his ability and industry. and will prove a valuable addition to our books for the higher class of vernacular students."

शास्त्रीय परिभाषा

महाराष्ट्रांत इंग्रजी अंमल सुरू झाल्यापासून जो नवीन अभ्यासक्रम उपयोगांत आणिला गेला, त्याला अनुसरून मराठी भाषेंत वेगवेगळ्या शास्त्रांवरील शालेय पुस्तकें तयार झालीं. अशा कांहीं पुस्तकांचा आढावा वर घेतला आहे. हीं पुस्तकें रचलीं जात असतांना प्रत्येक शास्त्राची परिभाषा बनत होती. हे सर्व विषय मराठी भाषेला नवीन असल्यामुळें, पारिभाषिक शब्द निर्माण करण्याचें काम फार कठीण होतें. तरी सुद्धां, जॉर्ज जर्विस, डॉ. मॅक्लेनन, हरि केशवजी, गोविंद नारायण, कृष्णशास्त्री भाटवडेकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर इत्यादि तत्कालीन लेखकांनीं मराठी भाषेंत शास्त्रीय ग्रंथ लिहिणें अवघड नाहीं हें सिद्ध केलें. 'The Maratha is merely a spoken language,' [५२] असें मत व्यक्त करणारा व्हॅन्स केनेडी जर आज हयात असता, तर त्याला आजपर्यंतची मराठी भाषेंतील शास्त्रीय विषयांवरील ग्रंथनिर्मिति पाहून अचंबा वाटला असता. याच्या उलट डॉ. स्टीव्हनसन या मराठी भाषातज्ज्ञानें सुमारें शंभर वर्षांपूर्वी केलेलें विधान– ' The Marathi is a very expressive language and...is capable of being applied to all the purposes of science and literature.' [५३] –आज सार्थ झालेलें दिसेल.

नवीन शिक्षणक्रमाला आवश्यक तीं शास्त्रीय विषयांवरील पुस्तकें भाषांतरित करतांना कोणत्या दृष्टीनें प्रयत्न करणें आवश्यक आहे, हें प्रथमपासूनच शाळापुस्तक मंडळीनें ठरविलें होतें. मंडळीची भाषांतरकर्त्यांना अशी सूचना होती:—

"With respect to translations, whether from English or Sanscrit into Maratha and Gujrathee dialects, it ought to be observed that **vernacular** terms should be used as much

---

५१ *D. P. I. Miscellaneous. Vol. 13.* 1856. p. 157.

५२ Vans Kennedy, *Dictionary of the Maratha Language.* 1824. प्रस्तावना. पृ. ४.

५३ *Journal of the Royal Asiatic Society of Great Britian and Ireland, Vol.* 7. 1843. p. 90.

as possible. The proper word, therefore, should be, at all times, sought for; and the display of learning by the introduction of foreign words should be most particularly avoided. But when, the idea, intended, cannot be expressed by a term in either of these dialects, the assistance should be derived from their cognate language the **Sanscrit** and not from **Persian** or **Arabic.**" ५४

या मुद्यावर बाळशास्त्री जांभेकर 'दर्पण' मधून आपले विचार प्रगट करतांना लिहितातः—

"त्यांणीं (कलकत्ता व मुंबईची शिक्षामंडळी) सर्व लोकांस शिकवायाचें जें मनांत कार्य धरिलें आहे तें साध्य होण्याकरितां जी रीति चालविली आहे ती सर्वांत उत्तम आहे. तीमध्यें दुसरा हा गुण आहे कीं, जा पदार्थांचे बोधक शब्द देशभाषांत नाहीं, ते शब्द आल्यानें तिचा योगानें देशाचा भाषा परिपूर्ण होतात, आणि चांगले रूपास येतात. अशी गोष्ट कांहीं काळानें घडेल हें जाणीं जाणीं एथील शिक्षामंडळीचे पूर्वीचे सक्रतारी कपतान जार्विस साहेब यांणी दोन वर्षांपूर्वी केलेलीं लार्ड ब्रहम साहेबांचे विद्योद्देशांची मराठी आणि गुजराथी भाषांतरें पाहिलीं असतील, ते नाहीं ह्मणणार नाहींत. त्या ग्रंथांत, गणित, शिल्प, रसायन, दर्शनानुशासन, आणि सृष्टीविज्ञानाचे दुसरे भाग यांचे विषय आहेत; म्हणोन वाचणारास नव्या गोष्टी बहुत समजतात, आणि नवे शब्दांचा परिचय होतो; जा शब्दांचा अर्थ त्या ग्रंथाचे शेवटीं कोश केला आहे त्यांत यथास्थित समजायाजोगा लिहिला आहे. परंतु या जातीचे आणि तसेच उपयोगी ग्रंथ मंडळीचे छापखान्यांत बहुत छापले आहेत, आणि दुसरे तयार होत आहेत, त्यांतला हा एक." ५५

शास्त्रीय विषयांवरील पुस्तकांत वापरल्या जाणाऱ्या परिभाषेविषयींचें धोरण, शाळापुस्तक मंडळीप्रमाणेंच पुढील काळांत सरकारी विद्याखात्यानेंहि निश्चित केलेलें होतें. विद्याखात्याशीं संबंध असलेल्या भास्कर दामोदर पाळंदे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, मेजर कँडी, डी. पी. आय. हॉवर्ड, इत्यादिकांचीं यासंबंधींचीं मतें जाणून घेणें जरूर आहे. पारिभाषिक शब्दांबद्दल कृष्णशास्त्री चिपळूणकर लिहितात :—

---

५४ *G. D. Vol. 63.* 1824. p. 101.

५५ **दर्पण**, पु. १. कागद ६. १६ मार्च, १८३२. पृ. ४५.

"I beg to recommend that in Marathi translations of scientific books, English technical terms...should always be given as accurately as possible in Marathi characters, with their translations. My object in making this recommendation is that the Marathi reader may not be puzzled and confused by finding different names for the same things or classes of things in different books. When there is no settled Marathi equivalent for an English word, as is the case with a large majority of technical scientific terms, the translator is required to choose or make the best word he can, and different translators will often choose or make different words." ५६

हे विचार मांडीत असतां आपलें म्हणणें इतरांना पटविण्यासाठीं, कृष्णशास्त्री कांहीं उदाहरणें देतात.

या सूचनेखेरीज एकंदरींतच शास्त्रीय विषयांवरील ग्रंथांचीं भाषांतरें करतांना भाषांतरकारानें कोणत्या गोष्टी ध्यानांत ठेविल्या पाहिजेत तेंहि कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं सुचाविलें होतें. ते लिहितात :—

"A translator in preparing a translation of books...ought always to exercise discretion and omit the translation of certain passages which are only of local importance and therefore not calculated to interest or instruct vernacular readers and to amplify those that are not likely to be intelligible to them in their original form." ५७

याठिकाणीं उदाहरणादाखल त्यांनीं 'गॅलन' ऐवजीं 'शेर' किंवा 'निठवें' हा शब्द वापरावा, 'लिंबू' अगर 'ओक' हे वृक्ष इकडील वातावरणाला अनुकूल नसल्यामुळें त्याऐवजीं येथील वृक्षांचीं नांवें द्यावीं इत्यादि सूचना दिलेल्या आढळतात. या संबंधीं एक मजेशीर उदाहरण त्यांनीं दिलेलें आहे तें येथें दाखल केल्यास अस्थानीं होणार नाहीं. कृष्णशास्त्री चिपळूणकर म्हणतात :—

"The translator too often introduces English words into his translation. For instance साधारण सोड्यावर is put for 'on common soda.' There is a word for soda in Marathi and therefore, the translator ought not to have inserted the English word.

---

५६ *D. P. I. Daxina Fund. Vol. 22.* 1861–62. p. 169.

५७ Ibid. p.221.

There is such a word as सोडा in Marathi signifying a particular kind of fish and therefore there is a risk of the readers misunderstanding the translation." [५८]

वरील सर्व सूचना कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं ते दक्षिणा प्राइझ कमिटीचे सेक्रेटरी व रिव्हायजर असतानांहि केलेल्या होत्या. दक्षिणा प्राइझ कमिटीच्या इ. स. १८६२-६३ च्या वार्षिक इत्तिवृत्तामध्यें या प्रश्नावर झालेल्या चर्चेचा जो सारांश दिलेला आढळतो, त्यावरून कमिटीसमोर या बाबतींत दोन मार्ग होते असें दिसतें. एक म्हणजे शास्त्रीय विषयांतील शब्द जसेच्या तसे इंग्रजीमधून मराठीमध्यें आणणें व दुसरा, अशा शब्दांचे संस्कृत भाषेच्या मदतीनें प्रतिशब्द बनविणें. यावेळीं शास्त्रीय वाङ्मयाची वाढ होण्यास सुरुवात झालेली असल्यामुळें या प्रश्नाचा निर्णय लागणें आवश्यक होतें. दक्षिणा प्राइझ कमिटीच्या वर उल्लेखिलेल्या वार्षिक इतिवृत्तामध्यें म्हटलें आहे तें असें :—

"There is another question in connection with vernacular literature which is of very great difficulty, but a solution of which is becoming more and more urgent with the growth of vernacular literature. It is the question of scientific nomenclature. In preparing translations of original works on science especially of modern origin such as Chemistry, Botany etc. how are we to deal with technical terms? Should we transfer them bodily and wholesale from European languages or should they be invented from the Sanskrit? Again in the latter case, are the invented Sanscrit terms to be strict translations of the European ones, such as जलजनक for Hydrogen, or are they to have sometimes altogether different connotations?" [५९]

या मुद्यावर दक्षिणा प्राइझ कमिटीच्या सभासदांत कितीहि चर्चा झाली तरी, शेवटीं सरकारी विद्याखात्याचेंच धोरण मान्य केल्याशिवाय कमिटीला गत्यंतर नव्हतें. तत्कालीन डी. पी. आय हॉवर्ड यानें व्यक्त केलेलें मत त्याच्याच शब्दांत द्यावयाच तर तें असें होतें :—

"As regards the question of scientific nomenclature... my opinion is decided that writers should be allowed to use at their descretion, terms borrowed from the English or from the Sanscrit just as Germans have the choice between two sets of scientific terms, one home-bred and the other adopted

---

[५८] *D. P. I. Duxina Fund. Vol. 22.* 1861-62. p. 222.
[५९] *D. P. I. Duxina Fund. Vol. 17.* 1863-64. p. 108.

from the classical languages. The Committee is not now, I think, in a position to issue a decree of prohibition against either of these modes. But it would no doubt be useful from time to time to publish lists of proposed scientific terms for the consideration of authors. " [६०]

थोडक्यांत सांगावयाचें तर, शास्त्रीय परिभाषेच्या बाबतींत लेखकांना मुभा देण्याचें धोरण विद्याखात्यानें यावेळीं अवलंबिलेलें दिसतें. पारिभाषिक शब्दांच्या याद्या वारंवार प्रसिद्ध करण्याची हॉवर्डची सूचना प्रत्यक्षांत आल्याचें दिसत नाहीं.

इ. स. १८७३ मध्यें पुन्हां एकदां या प्रश्नाला चालना मिळाली. यावर्षी हिंदुस्थानसरकारनें शालेय पुस्तकांच्या तपासणीसाठीं एक समिति नेमिली होती. तिनें प्रादेशिक उपसमित्या मुक्रर केल्या. त्यांत मराठी भाषेंतील शालेय पुस्तकांमध्यें सुधारणा सुचविण्यासाठीं नेमिलेल्या उपसमितींत, डी. पी. आय. चॅट्फील्ड, रे० डॉ. विल्सन, मेजर कँडी, नारायणभाई दांडेकर इत्यादि सभासद होते. या समितीनें बहुमतानें असें ठरविलें कीं पाश्चात्य शास्त्रीय विषयांतील शब्द परभाषांमधूनच लिहावे. समितीच्या ठरावांत म्हटलें आहे तें असें :—

'Transliteration of European scientific terms should be employed in all cases where precise vernacular equivalents are not already in current use'. [६१]

ही सूचना सर्वसाधारणपणें सर्वमान्य झालेली दिसते; कारण शिक्षणक्षेत्रांत सरकारी विद्याखात्याच्या धोरणावर वारंवार टीका करणाऱ्या 'इंदुप्रकाश'कारांचें मतहि वरील धोरणाशीं जुळणारें असेंच होतें. 'आमच्या देशी भाषांचा अभ्युदय' नामक लेखांत पारिभाषिक शब्दांबद्दल 'इंदुप्रकाश'कार लिहितात :—

" शास्त्रीय विषय लिहिण्यास एतद्देशीय भाषांत तशा अर्थाचे शब्द सांपडत नाहींत, अशी ओरड आहे, ती वाढवेल तितकी भाषांतरानें दूर करावी; अथवा, तेच शब्द जशाचे तसे मराठींत घेतले तरी कांहीं चिंता नाहीं. नंबर, बुक, अपील, डिक्री, टिकिट, लेट, लैनक्लियर, लगेज, इत्यादि शब्दांचा अर्थ इंग्रजी जाणणारांस जितका कळतो, तितकाच आतां मराठी जाणणारांस कळत आहे. आणि हें सगळें संवयीनें झालें आहे. तर, हाच प्रकार शास्त्रीय विषयांत कां न व्हावा ? होईल, प्रयत्न मात्र केला पाहिजे. ह्मणजे, असे अनेक शब्द—ह्मणजे अर्थ बरोबर एका शब्दानें सांगण्यास किंवा अनेक शब्दांनीं स्पष्ट करण्यास अशक्य वाटतें ते शब्द—बेलाशक जशाच्या तसे मराठींत व इतर एतद्देशीय भाषांत घ्यावे आणि काम चालवावें. " [६२]

---

६० *D. P. I. Daxina Fund. Vol. 17.* 1863–64. pp. 110–111.

६१ *Report of the Committee appointed to examine the Text-books in use in Indian Schools.* 1878. p. 20.

६२ **इंदुप्रकाश**, पु. ३०. अंक ४१. १८९१.

व्यावहारिक दृष्टया हे विचार पटण्यासारखे असले तरी, विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारख्या संस्कृतभाषाभिमान्यांस ते रुचणें शक्यच नव्हतें. पारिभाषिक शब्द कसे तयार करावेत व त्यांत कोणते गुण असावेत यासंबंधींचे आपले विचार विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं 'भाषांतर' नामक निबंधांत व्यक्त केलेले आढळतात. विष्णुशास्त्री म्हणतात :—

"यांचें (शास्त्रीय ग्रंथांचें) भाषांतर एरवीं पाहतां सगळ्यांना सोपें आहे; कारण त्या त्या शास्त्रांतील सिद्धांत जसे असतील तसे या दुसऱ्या भाषेंत ठेवून दिले म्हणजे झालें. मूळच्या ग्रंथांतील रस भाषांतरांत उतरला पाहिजे वगैरे संबंध यांत बिलकुल नसल्यामुळें केवळ व्याकरणशुद्ध व रूढिशुद्ध असा साध्या, सोप्या रीतीचा तर्जूमा इकडे उतरला म्हणजे पुरे होतें. पण एक मात्र मोठी जबरदस्त अडचण वरचेवर येऊन पडते. ती अर्थातच पारिभाषिक शब्दांची. प्रत्येक शास्त्राला त्याचे त्याचे असे ठरलेले कांहीं शब्द असतात; त्यांस संस्कृतांत परिभाषा म्हणतात. या परिभाषेला दुसऱ्या भाषेंत प्रतिपरिभाषा बनवणें हें मोठ्या चातुर्याचें व श्रमाचें काम असतें. असे जे नवे शब्द बनवायचे त्यांत इतके गुण असावे लागतात: एक तर या शब्दांचें वरचेवर काम लागणार, तेव्हां ते लांबलचक अवजड नसावे; तर जेवढे थोडक्यांत येतील तेवढे चांगले. जसें 'भूगर्भशास्त्र', 'पदार्थविज्ञान', 'वक्रीभवन' इत्यादि. दुसरें, ते ओबड धोबड अथवा कर्कश नसून कानास चांगले मृदु व मधुर लागावे. तिसरें, ते व्यावहारिक भाषेपेक्षां जितके निराळे असतील तितकें चांगलें; कारण जे शब्द नेहमीं बोलण्याचालण्यांत वगैरे आलेले ते शास्त्रीय ग्रंथांत शोभत नाहींत. असो; आतां या सर्व सोई संस्कृतामुळें मराठीस फार उत्कृष्ट साध्य झाल्या आहेत.... एक तर तींत समासांची व संधींची अत्युत्कृष्ट रचना असल्यामुळें नवा शब्द थोडक्यांत व बेमालूम असा बनवतां येतो. दुसरें, त्या भाषेंत शब्दसंग्रह फार मोठा असल्यामुळें व भाषाच एकंदर मोठी डौलदार असल्यामुळें वर सांगितलेले दोन गुण—मार्दव आणि माधुर्य—हेही सहज साधतां येतात. तिसरा गुण अपरिचितत्त्व—हा तर ती भाषा निराळी पडल्यामुळें अर्थात आहेच आहे. शिवाय त्या भाषेच्या रीतीप्रमाणें एक शब्द साधला असतां त्यापासून जवळ जवळच्या अर्थाचे शब्दही तेव्हांच साधतां येतात." [६३]

थोडक्यांत एकोणिसाव्या शतकांत पारिभाषिक शब्दांविषयीं जे विचार व्यक्त केले गेले त्यावरून असें म्हणावयास हरकत नाहीं कीं पुढील काळांत त्या विचारांचा पुष्कळसा उपयोग होऊं शकला.

---

६३ **निबंधमाला**, अंक १२, डिसेंबर, १८७४. पृ. ९–११.

प्रकरण तेरावें

इतिहास

विविधज्ञानविस्तार 'कर्ते 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' नामक लेखमालेंत लिहितात :—

"आम्हीं एका प्रसिद्ध विद्वानाशीं बोलत असतां त्यांणीं आपलें मत या विषयाचे संबंधें आम्हांस सांगितलें तें असें :— 'मला हिंदुस्थानचा इतिहास चांगलासा माहित नाहीं. मी जातीचा महाराष्ट्र ब्राह्मण पडलों म्हणून मला पुष्कळ इंग्रज लोक आमच्या इतिहासाच्या संबंधानें प्रश्न करितात तेव्हां त्यांचे उत्तराची मी हेळसांडच करितों. या विषयावर नवीन ग्रंथ होतात ते वाचण्याचे खटपटींतही मीं पडत नाहीं. लहानपणीं शाळेंत असतां मी 'मरेज ब्रिटिश इंडिया' हा ग्रंथ वाचला तेवढाच काय तो. हिंदुस्थानच्या इतिहासाचें अध्ययन करावें असें मला वाटत नाहीं; कां कीं कोणी स्वदेशाचा किंवा कांहीं सुमताचा अभिमान धरून सत्याची निष्ठा बाळगून जन्मदारभ्य मेहनत केल्याचीं उदाहरणें त्यांत मुळींच सांपडत नाहींत.'" [1]

बखर मराठ्यांची

विस्तारकर्ते कोणा विद्वानाशीं बोलत होते हें समजण्यास मार्ग नाहीं; परंतु या विद्वानाच्या वरील मताकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं. हें मत त्यानें कां बनविलें हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यासाठीं महाराष्ट्रांत इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांसमोर इतिहासाचीं जीं पुस्तकें ठेविलीं गेलीं, त्यांचा इतिहास जाणून घेणें आवश्यक आहे. मुंबईच्या शाळापुस्तक मंडळीनें प्रथम इ. स. १८२५ मध्य जे 'प्रसिद्धि पत्रक' छापिलें, त्यांत इतिहास या विषयावरसुद्धां शालेय पुस्तकें तयार करण्याचें ठरविलें होतें. त्याला अनुसरून इ. स. १८२९ मध्यें 'बखर मराठ्यांची' भाषांतरित केली गेली. ही 'बखर लिहिण्याचें कारण' असें आहे :—

"कोणी म्हणेल कि ही बखर कोणी कशी निर्माण केली व करण्याचे कारण काय तर त्याणें असें समजावें कि बाजिराव असतां, अल्पिष्टन साहेबाचा वेळीं कारभार चालविणारा कप्तान ग्रांट साहब पुण्यास होता. तो पुढें बाजिराव गेल्यावर साताऱ्यास नेमिला. तो तेथें असतां, त्याचा मनांत आलें कि महाराष्ट्र लोक इतक्या योग्यतेस कसे चढले, तें समजावयास त्या लोकांचें प्राचीन वृत्त ध्यानास आणिलें पाहिजे. तेणेंकरून विलायतेंतील लोकांसहि विदित होईल, ह्मणोन त्यानें बहुत जागचे

---

१ **विविधज्ञानविस्तार,** पु. ८, अं. ८. १८७६. पृ. १४५.

पुरातन लेख जमा केले. त्यांत कित्येक कोणी आपले संतोषेंकरून दिले, व कित्येक त्याणें द्रव्य खर्चून घेतले; याशिवाय सरकारचीं दप्तरें, पुणें आदिकरून जितके जागीं होतीं, त्या सर्व जागींचे पुरातन लेख आणिले. याशिवाय जा जा देवस्छानीं पूर्वीचीं देवास अग्रहार करून दिलेलीं पत्रें; तीं, व कोणी मोठे सरदार लोक यांस जहागिरीचा सन्दा करून दिलेल्या त्या, व मुसलमानानी लिहिलेल्या बखरा, व पूर्वी साहेब लोकांनीं लिहिलेलें हिंदूंचें वृत्त; यांतील सर्व गोष्टींचा बहुत विचार करून, त्या त्या समयविशेषाचाहि शोध करून, त्या सर्व विस्तारांतील सारांश निवडून, आपले बरोबर घेऊन विलायतेस गेला. आणि तेथें इंग्रेजी भाषेंत त्याची बखर लिहून छापिली; तिचीं तीन बुकें जालीं. त्यांतील गोष्टी महाराष्ट्र मुलखीं लोकांस फार हितावह आहेतशा समजून सरकार कंपेनी इंग्रेज बहादूर यांचे आज्ञेवरून, कप्तान केपिन साहेब याणीं बाबा साने यांचे साहाय्यानें, ती इंग्रेजी भाषेची बखर, मराठी भाषेंत लिहून, सन अठराशें एकुणातिसांत मुंबैमध्यें छापिली." [२]

या बखरींत पुष्कळ ठिकाणीं ऐतिहासिक सत्य विपरित करून मांडलेलें आढळेल. शिवाजीविषयीं लिहितांना बखरकार म्हणतो :– 'तो अद्वितीय पुरुष होता. परंतु राज्यकार्य करण्यांत, त्याचे बुद्धीस सरळमार्गापेक्षां कुटिलमार्ग चांगला वाटे; हा एक त्याचा दोष, आणि त्यानें कितिएक वेळा आपलें क्रौर्य, आणखीं घातकपणा प्रसिद्ध करून दाखविला.' [३] शिवाजीविषयीं बखरकारानें कसेंहि लिहिलेलें असो, तत्कालीन लोकांच्या मनांत शिवाजीविषयीं आजच्या इतकाच अत्यादर होता, याचें प्रत्यंतर असें आहे. टाऊन्शेंड नामक एक इंग्रज रेव्हिन्यु कमिशनर असतांना मराठी शाळांना भेट देत असे. शाळांतून 'बखर मराठ्यांची' अभ्यासिली जाई. [४] ती पाहून तो म्हणतोः—

"The hero of Maratha History is Shevajee, a cunning, cruel, unprincipled man, who laughed at truth, and broke thro' treaties like cobwebs. The little Hindoo, whose eyes glisten when he reads of the exploits of alternate daring and perfidy, with which this adventurous chief outwitted the Muhamedans, will derive little benefit from the best moral precepts upon truth and virtue, when his mind is preoccupied with the fascinating narratives of unprincipled daring in Maratha History."[५]

---

२ डेविड केपन, **बखर मराठ्यांची**. १८२९. बखर लिहिण्याचें कारण.

३ तत्रैव. पृ. ८८–८९.

४ *G. D. Vol. 530.* 1840. p. 203.

५ *D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1851. p. 195.

थोडक्यांत राज्यकर्त्यांनीं मराठ्यांचा इतिहास कोणत्याहि स्वरूपांत मुलांसमोर ठेविला तरी त्यांच्या मनांत शिवाजीविषयीं ज्या आदराच्या भावना वसत होत्या त्या घालविणें अशक्य होतें.

त्याकाळीं शाळेंत जाणारीं मुलें वयानें आजच्यापेक्षां मोठीं असल्यामुळें शालेय पुस्तकांत, 'हा दवलतराव शिंदा आह्मापेक्षां जी धाकटी बायी तिसीं बलात्कारें संग करूं इच्छितो'[६] यासारखीं विधानें असणें हें जास्त आक्षेपार्ह वाटतें. भाषेच्या दृष्टीनें या बखरीचा विचार करतां तिची भाषा बहुधा पेशवाईच्या शेवटच्या काळांत प्रचारांत असलेली अशी दिसते. 'ऐशींयास हीच मसलत' सारखे वाक्यांश पेशवेकालीन भाषेची आठवण करून देतात. च, ज, झ या अक्षरांचा तालव्य व दंततालव्य उच्चार स्पष्ट होण्यासाठीं उपयोगांत आणलेलें टिंब या बखरींत सांपडतें. प्रारंभापासून भाषेच्या शुद्धतेकडे लक्ष पुरविलें जाई, हें या पुस्तकाला जोडलेल्या शुद्धिपत्रावरून स्पष्ट होतें. 'दिल्हें' बद्दल 'दिलें,' 'दिल्ही,'–'दिली,' 'दिल्हे'–दिले,' 'जाहाले–'झाले,' 'पोंचला'–'पोंहचला,' 'विशीं'–'विषयीं,' 'आणीक'–'अणीक,' हे त्या शुद्धिपत्रांतील कांहीं शब्द होत. केपिननें केलेल्या या भाषांतराबद्दल त्याला पांच हजार रुपये सरकारनें दिले होते.[७]

या बखरीची दुसरी आवृत्ति इ. स. १८४६–४७ मध्यें छापिली गेली. यावेळीं या पुस्तकाचे दोन भाग झाले. या भागांची भाषाविषयक सुधारणा करण्याचें काम परशुरामपंत गोडबोले यांनीं केलें. तात्यांनीं केलेले फरक म्हणजे किं बद्दल कीं, हिं-हीं, जितके जागीं– ज्या ज्या जागीं अशासारखे आहेत. याशिवाय च, ज आणि झ या अक्षरांच्या दंततालव्य उच्चाराच्यावेळीं सरळ य जोडून 'त्याच्या', 'ज्या योगें' अशीं रूपें तात्यांनीं घातलीं आहेत. शालेय पुस्तकांची भाषा सोपी करण्याकडे शिक्षामंडळीचें नेहमींच लक्ष असल्यामुळें तात्यांनीं कांहीं कठीण शब्द काढून त्याजागीं सोपे शब्द वापरले आहेत. उदाहरणार्थ, 'अनिष्ट' बद्दल 'वाईट' 'हितार्थ',—'हितासाठीं', 'क्रौर्य'—'क्रूरपणा', 'अनीतिवर्तनप्रकरणीं'—'अन्यायें वर्तन केल्या प्रकरणीं' 'मातृगामी'–'मात्रा गमनी' इत्यादि.

ग्रँट डफ याच्या हातीं जे कागदपत्र आले त्यांचा उपयोग करून विशिष्ट दृष्टीनें मराठ्यांचा इतिहास त्यानें इंग्रजींत लिहिला व पुढील काळांत यासारख्या पुस्तकांचीं भाषांतरें महाराष्ट्रांतील विद्वानांनीं केलीं. त्यामुळें सत्यासत्यतेचा विचार झालाच

---

६ डेविड केपन, **बखर मराठ्यांची.** १८२९. पृ. ३५८.

७ *G. D. Vol. 237.* 1831.p. 81.

नाहीं; परंतु पुढें इ. स. १८६८ मध्यें नीलकंठ जनार्दन कीर्तने यांनीं विद्यार्थिदशेंतच 'ग्रांटडफकृत मराठ्यांच्या बखरीवर टीका' लिहिली. तींत या बखरीला ते 'मराठ्यांचे मोहिमांचा इतिहास' [८] म्हणतात, तर विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांच्या मतें ही बखर म्हणजे 'इंग्रजांना मराठ्यांची कांहीं माहिती देणारें वृत्तांतवजा पुस्तक' [९] होय. कसेंहि असो, पण शाळापुस्तक मंडळीच्या समोर सुरुवातीला कांहीं काळपर्यंत मराठ्यांच्या इतिहासावर एवढें एकच पुस्तक असल्यामुळें शालेय अभ्यासक्रमांत तिला स्थान मिळालें. विद्याखात्याचा या पुस्तकाबद्दलचा अभिप्राय तर– 'the only standard work on the subject,' [१०] असाच होता.

महाराष्ट्र देशाचें वर्णन

जरी 'बखर मराठ्यांची' शाळांमधून अभ्यासिली जाई, तरी चारशें सत्तावीस पृष्ठांचा हा ग्रंथ मराठी शाळांतील मुलांना तितकासा उपयोगी पडणारा नाहीं असें वाटूनच कीं काय मुंबईच्या शाळापुस्तकमंडळीनें तो सारांशरूपानें छापावयाचें ठरविलें. ग्रँटडफच्या इंग्रजी ग्रंथाचा इझ्डेल यानें जो संक्षेप केला त्याचें मराठी भाषांतर कुशाबा लिमये यांनीं केलें व तें 'महाराष्ट्र देशाचें वर्णन आणि इतिहास यांचा प्रश्नोत्तरावलिरूप ग्रंथ' (१८४०) या नांवानें प्रसिद्ध झालें. प्रश्नोत्तर रूपानें शालेय पुस्तकें रचण्याच्या या काळच्या पद्धतीप्रमाणेंच हें पुस्तकहि 'प्रश्नोत्तरावलिरूप' असेंच होतें. प्रश्नोत्तरांचें स्वरूप असें आहे :—

"त्याणें (शिवाजीनें) आपली सत्ता कोणत्या प्रकारानें वाढविली ?

"त्याणें आपली सत्ता बहुतकरून दिल्लीचे व विजापूरचे मुलखांत लूट करून वाढविली. आणि त्या लुटीच्या द्रव्यानें त्याला मोठी फौज ठेवण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें.' [११]

---

८ नीलकंठ जनार्दन कीर्तने, **ग्रांटडफकृत मराठ्यांच्या बखरीवर टीका.** १८६८. पृ. ७.

९ विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें**–१७५० पासून १७६१ पर्यंत, खंड १. १८९८. पृ. ३१.

१० *Bombay Educational Record, Vol. 8. No. 11.* 1872. p. 375.

११ कुशाबा लिमये, **महाराष्ट्र देशाचें वर्णन आणि इतिहास यांचा प्रश्नोत्तरावलिरूप ग्रंथ.** १८४०. पृ. २१–२२.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

महाराष्ट्राच्या इतिहासावरील प्रश्नोत्तरांचें हें पुस्तक इतकें उपयुक्त ठरलें कीं, इ. स. १८७३ पर्यंत त्याच्या चौदा आवृत्त्या निघाल्या. इ. स. १८७१ मध्यें मराठी शाळांमधून नवीन अभ्यासक्रम सुरू झाला त्यावेळीं हेंच पुस्तक पुढें वापरलें जावें असें ठरलें.[१२] या पुस्तकाला एवढें महत्त्व येण्याचें कारण म्हणजे मेजर कँडी यांचा या पुस्तकाविषयीं अनुकूल अभिप्राय हें होय. इ. स. १८४० मध्यें पहिल्या आवृत्तीच्या वेळीं या पुस्तकाच्या तीन हजार प्रती काढून शाळापुस्तक मंडळीनें त्यांतील पांचशें प्रती भाषांतरकार कुशाबा लिमये यांना बक्षिस म्हणून दिल्या होत्या.

कुशाबा लिमये कृत 'महाराष्ट्र देशाचें वर्णन आणि इतिहास यांचा प्रश्नोत्तरावलिरूप ग्रंथ' या पुस्तकाचें स्वरूप बदलून याच विषयावर लहानसा ग्रंथ तयार करण्याबद्दल डी. पी. आय. नें सुचविल्यावरून, दक्षिणा प्राइझ कमिटीचे सेक्रेटरी व रिवैजर' रावजी सदाशिव गोडबोले यांनीं जास्त माहिती घालून 'महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास' (१८७६) रचिला. मेजर कँडीनीं पुस्तकाची तपासणी केल्याबद्दल 'परम आभारी' असल्याचें लेखकानें प्रस्तावनेंत म्हटलें आहे. या पुस्तकाची दुसरी आवृत्ति इ. स. १८७८ मध्यें निघाली.

इंग्लंड देशाची बखर

केवळ महाराष्ट्राचाच इतिहास मुलांसमोर ठेवून भागणार नाहीं याची कल्पना शाळापुस्तक मंडळीला होती. त्यामुळें इ. स. १८२९ मध्यें 'बखर मराठ्यांची' भाषांतरित केल्यानंतर लगेच 'इंग्लंड देशाची बखर' तयार करण्याचें काम शाळापुस्तक मंडळीचे तत्कालीन सेक्रेटरी रॉबर्ट मनी व बाळशास्त्री जांभेकर या दोघांनीं मिळून केलें.[१३] ही बखर दोन भागांत प्रसिद्ध झाली. पैकीं पहिला भाग इ. स. १८३२ मध्यें व दुसरा इ. स. १८३४ मध्यें तयार झाला. राज्यकर्त्यांचा–परकी लोकांच्या देशाचा इतिहास येथील लोकांना नवीनच होता. त्यामुळें त्यांतील नांवें गांवें बहुतेकांना अनोळखी होतीं. त्यांची कल्पना वाचकांना यावी, त्यांचे उच्चार कसे करावे हें समजावें, तसेंच कांहीं इंग्रजी शब्द या भाषांतरांत अधुनमधून आलेले आहेत, त्यांचे अर्थ कळावे या हेतूनें भाषांतरकर्त्यांनीं बखरीच्या पहिल्या भागाच्या सुरुवातीला 'हा ग्रंथ वाचणाऱ्यांस सूचना' दिलेल्या आहेत त्या अशा :—

"मोठे अक्षरांनीं जे शब्द लिहिले आहेत ते इंग्रेजी असें समजावें.

---

१२ *Bombay Educational Record, Vol. 7. No. 10.* 1871. p. 341.

१३ *Report of the Bombay Native Education Society.* 1832 p.58.

"इंग्रेजी शब्दांचा अर्थ बहुधा पृष्ठाचे खालचे बाजूस खुणा करून बारीक अक्षरानें लिहिला आहे; आणि कोणते शब्दाचा अर्थ कोणते पृष्ठावर आहे हें कळायाकरितां, आणि ग्रंथामध्यें कोठे कोठे अप्रसिद्ध किंवा प्रौढ संस्कृत शब्द पडले आहेत त्यांचा अर्थ कळायाकरितां अक्षरांचे अनुक्रमाप्रमाणें पुस्तकाचे शेवटीं सर्व अप्रसिद्ध शब्दांचा कोश केला आहे. त्या कोशांत इंग्रेजी शब्दांचा अर्थ कोणते पृष्ठावर केला आहे त्या पृष्ठाचा अंक लिहिला आहे.

"इंग्रेजी अकारांत शब्दांचे शेवटचे अक्षरांचा उच्चार अकार सोडून करावा. गुण, द्रव्य, इत्यादि स्थलीं ण, व्य, या अक्षरांचा होतो तसा.

"च ज या शब्दांचा उच्चार सर्व ठिकाणीं संस्कृतांतील चर्म, जन या शब्दांतील चकारजकारासारिखा करावा. चामडें, जमा, या शब्दांसारिखा करूं नये.

"झ याचा उच्चार झोंप, झोळी, यांतील झकारासारिखा करावा.

"फ, याचा उच्चार वरचे दात खालचे ओठांवर ठेवून करावा.

"व, हें अक्षर कोठे उअ, कोठे व, आणि क्वचित् केवळ व, असें लिहिलें आहे, त्याचा उच्चार बहुधा उअ, असा करावा." [१४]

पहिल्या भागाप्रमाणेंच बखरीच्या दुसऱ्या भागालाहि कांहीं सूचना जोडलेल्या आहेत. उदाहरणार्थ :—

"१ या पुस्तकामध्यें इंग्रेजी किंवा दुसरे परभाषांतील शब्द कोणते, याचा वाचणारास सहज बोध होण्याकरितां, त्या शब्दास विभक्ति जोडिल्या नाहींत, परंतु ते वेगळे मोठे अक्षरानें लिहून त्यांपुढें यास, याणें, यापासून, याचा, यांत इत्यादिक जोडलीं आहेत.

"२ सर्व परभाषेंतील शब्दांचा अर्थ, आणि या ग्रंथांत प्रसंगानें आलेले देशांचा व प्रांतांचा कांहीं कांहीं वृत्तांत, पुस्तकाचे शेवटीं अक्षरांचे अनुक्रमाप्रमाणें लिहिला आहे.

"३ जे शब्द एकच वेळ आले आहेत, त्यांचा अर्थ त्याच ठिकाणीं पृष्ठाचे खालचे बाजूस खुण करून लिहिला आहे.

"४ इंग्रेजी वगैरे शब्दांचे उच्चाराविषयीं पहिले पुस्तकांत नियम लिहिले आहेत, त्याप्रमाणें उच्चार करावा.

"५ त याचा उच्चार सर्वत्र टांक या शब्दांतील टकारासारिखा करावा.

---

१४ **इंग्लंड देशाची बखर, भाग १. १८३२. सूचना.**

"६ द याचा बहुधा डबी यांतील डकारासारिखा करावा. क्वचित् नेदर्लंड इत्यादि शब्दामध्यें दीन यांतील दकारासारिखा करावा.

"७ शब्दांचे शेवटीं अनुस्तार येईल त्या ठिकाणीं, देवांचा, पाणीं, गुरुं, तळें, इत्यादि मराठी शब्दांचे शेवटील अनुस्वारासारिखा करावा. जसें एमियां, मामौं, इत्यादि. अशा शब्दांचे शेवटीं कोठें ॅ अशी खूण केली आहे." १५

वरील सूचनांमधील विशेष महत्त्वाची सूचना म्हणजे 'ग्रंथामध्यें कोठे कोठे अप्रसिद्ध किंवा प्रौढ संस्कृत शब्द पडले आहेत त्यांचा अर्थ कळायाकरितां' ग्रंथाच्या शेवटीं जोडलेला शब्दकोश ही होय. भाषांतरकर्त्यांनीं प्रयत्न करूनसुद्धां भाषांतरांत कांहीं कठीण शब्द 'पडले.' त्यामुळें त्यांचे अर्थ सोप्या भाषेंत सांगणें आवश्यक होतें. शाळापुस्तक मंडळीचें अगदीं पहिल्यापासून हें धोरण होतें कीं, शालेय पुस्तकें शक्यतों सोप्या भाषेंत लिहावयाचीं व संस्कृत शब्द टाळावयाचे. हेंच धोरण पुढील काळांत मेजर कँडी यांच्या कारकीर्दीत चालू राहिलें. या बखरीच्या पहिल्या भागाच्या शेवटीं जो कोश जोडलेला आहे त्यांत, 'अनिंद्रिय निग्रह' (इंद्रियें स्वाधीन नसणें), 'आदिकारणभूत' (मुख्य कारण), 'उपदिष्ट' (शिकविलेला), 'उर्ण्णावस्त्र' (लोकरीचें कापड), 'औद्धत्य' (दांडगेपणा), 'देहांतरप्राप्ति' (मेल्यानंतर जीवास दुसरा देह होतो), 'देवत्रित्व' (तीन देव), 'भर्त्सना' (निंदा), 'महत्कर्मारंभ' (मोठें कर्म करायास लागणें) इत्यादि शब्द व त्यांचे अर्थ दिलेले आढळतात. प्रथम पुस्तकांत कठीण संस्कृत शब्द वापरावयाचे व नंतर त्यांचे अर्थ सोप्या भाषेंत द्यावयाचे यापेक्षां पुस्तकांतच कठीण शब्दांना स्थान न देणें हें योग्य ठरलें असतें. बखरीच्या दोन्ही भागांच्या इ. स. १८५७ च्या तिसऱ्या आवृत्तींतसुद्धां मूळ भाषेंत फरक केलेला आढळत नाहीं.

इंग्लंड देशाचें वर्णन

वर उल्लेखिलेल्या 'इंग्लंड देशाची बखर' या पुस्तकांपेक्षांहि जास्त उपयुक्त असें आणखी एक पुस्तक यावेळीं तयार झालें होतें; त्याचें नांव 'इंग्लंड देशाचें वर्णन' (१८३५) हें होय. मिस बर्ड नामक बाईच्या इंग्रजी पुस्तकाचें नाना नारायण यांनीं केलेलें हे मराठी भाषांतर आहे. तत्कालीन सरकारी अधिकाऱ्यांचें या पुस्तकाबद्दल अनुकूल मत झाल्यामुळें सरकारनें त्याच्या चारशें प्रती विकत घेण्याचें ठरविलें. व्यक्तिशः जे. फॅरिश या अधिकाऱ्यानें शंभर, डॉ विल्सननें पन्नास, रे. मरे मिचेल या

१५ इंग्लंड देशाची बखर, भाग २. १८३४. सूचना.

मिशनऱ्यानें तीस अशा प्रती विकत घेतल्या.[१६] या पुस्तकाला एवढा आश्रय मिळण्याचें कारण सरकारचा मुख्य सेक्रेटरी वॉथेन यानें या पुस्तकाबद्दल लिहिलेला अनुकूल अभिप्राय होय असें वाटतें.[१७]

पुस्तकाच्या प्रस्तावनेंत, 'ज्ञानापासून जे लाभ होतात त्यांचा विचार' करतांना लेखक म्हणतो :—

"बहुतेक लोकांचे मनांत, ज्ञानप्राति करून घेण्याविषयीं अतिशय उदासीनपणा आहे त्यावरून सहज असा सिद्धांत होतो कीं, ज्ञानाचे लाभ अनेक आणि उघड असून, त्याविषयीं त्याहीं विचार केला नाहीं. यास्तव इंग्लंड देशाचें वर्णन करायाचे प्रारंभीं ज्ञानापासून लाभ होतात त्यांचें प्रस्तावन संक्षेपें करून केलें असतां अप्रासंगिकरूप दोष घडेल असा अर्थ नाहीं."[१८]

अशाप्रकारें लेखकानें ज्ञानमहती गाऊन नंतर ईश्वरमाहात्म्य पटविलें आहे. विशेषतः सूर्य, पृथ्वी जनावरें इत्यादींचा मोठेपणा वर्णिला आहे. सोळा प्रकरणांत इंग्लंडचा सुरुवातीपासून थोडक्यांत इतिहास, त्यांचें सैन्य, व्यापार, उद्योगधंदे, शिक्षण, धर्म, लग्नसंस्था यांची माहिती दिलेली आढळते. सरकारमान्यता मिळून शाळांत वापरलें जाणारें[१९] 'इंग्लंड देशाचें वर्णन' मुलांसमोर ठेवतांना राज्यकर्त्यांचें गुणगान करावयास भाषांतरकार विसरला नाहीं. 'ज्ञानापासून जे लाभ होतात त्यांचा विचार' करून शेवटीं तो लिहितो :—

"सांप्रत या देशाचे बहुत लोक, इंग्लंड देशांतील राजनीति, लोकरीति, साहित्य, हवा, आणि उत्पन्न जाणायास परम उत्कंठित जाले आहेत, तर त्यांचा इच्छेची परिपूर्ति व्हावी ह्मणोन, त्या देशाचें वर्णन करायाचें कारण जालें. जा देशाशीं आपला इतका जवळचा संबंध आहे, त्या देशांतील लोकांस इंग्लंड देशाचा लोकांचें निर्विवाद जें विशेष ज्ञान, आणि तशीच व्यवहारीक नीति, यांचा कार्यकारणभाव सांगून, त्यांचें हित व्हावें, यास्तव हा ग्रंथ करितों, आणि विश्वप्रकाश जनक जो भगवान् त्याचा आशीर्वादानें मताभिमान दूर होऊन सत्याची आणि दयालुत्वाची वृद्धि होईल, असें समजून हें कर्म सुगम नसतांही रमणीय मानितों."[२०]

---

१६ *G. D. Vol.* $\frac{12}{327}$ 1835. p. 37.

१७ *G. D. Vol.* $\frac{22}{354}$ 1836. p. 155.

१८ नाना नारायण, **इंग्लंड देशाचें वर्णन**. १८३५. प्रस्तावना. पृ. १.

१९ *G. D. Vol. 530.* 1840. p. 203.

२० नाना नारायण, **इंग्लंड देशाचें वर्णन**. १८३५. पृ. १०

इंग्लंडाचा वृत्तांत

'इंग्लंड देशाची बखर' व 'इंग्लंड देशाचें वर्णन' या दोन पुस्तकांपेक्षांहि जास्त मनोरंजक व पत्ररूपानें लिहिलेला 'इंग्लंडाचा वृत्तांत' (१८३८) या काळांत शाळांमधून अभ्यासिला जात असे. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर लिहिल्याप्रमाणें, 'हा सोपा, लहान ग्रंथ, बालबोधार्थ केला असे. हा, कोणे एके गृहस्थाने आपल्या लेंकास पत्रद्वारें लिहून प्रत्येक पत्राच्या शेवटीं कांहीं प्रश्न करून सांगितला, त्याचें इंग्रेजी मूलग्रंथावरून मराठी भाषेंत, हरि केशवजी यानी भाषांतर केलें.' हीं पत्रें मुळांत 'कॉटेजर्स मंथली व्हिजिटर' नामक मासिकाच्या संपादकानें लिहिलेलीं होतीं त्याचें हें भाषांतर होय. हें पुस्तक लेखकानें आपल्या जबाबदारिवर छापिलें. कोणा एका शिक्षणप्रेमी गृहस्थाच्या (बहुतेक हा गृहस्थ जेम्स फॅरिश असावा) सूचनेवरून, दोन वर्षें खपून, मूळ पुस्तकांत येथील वातावरणाला योग्य असे बदल करून, मुलांना समजेल व मनोरंजक होईल अशा भाषेंत पत्ररूपानें लिहिलेला हा 'इंग्लंडाचा वृत्तांत' तत्कालीन सरकारी मदतीला पात्र व्हावा म्हणून लेखकानें शिक्षामंडळीला विनंति केली. अधिकाऱ्यांना तो पसंत पडला व सरकारनें पन्नास प्रती घेण्याचें कबूल केलें; परंतु तें छापण्याची जबाबदारी मात्र त्यांनीं लेखकावरच टाकली. भाषांतरकाराला प्रती खरेदी करून मदत करण्यापूर्वी सरकारचा मुख्य सेक्रेटरी वॉथेन यांनीं तें वाचून पाहिलें. आणि त्याकाळीं शाळांमधून वापरल्या जाणाऱ्या पुस्तकांशीं या पुस्तकाची तुलना करून तें चांगलें असल्याचें ठरविलें. पत्ररूप इतिहासलेखनाची कल्पना यावेळीं नवीन होती. पहिल्याच पत्राची सुरुवात कशी कादंबरीवजा केली आहे पहा :-

"चिरंजीव राजश्री गोविंदपंत मुकाम पुणें यांप्रत काशिनाथ विठोबा मुकाम मुंबई अनेक आशिर्वाद उपरी येथील कुशल तागाईंत माहे फाल्गुन शुद्ध ११ पावेतों सुखरुप असों, विशेष तुह्मी येथून निघून गेलां त्यावेळेस तुम्ही विनंती केली होती, त्याप्रमाणें मी तुह्मास सदैव पत्र पाठवीत जाईन, आणि तुमची बुद्धि वाढावयाजोगें वर्तमान त्या पत्रांत लिहित जाईन, तें वर्तमान कोणतें तर इंग्लांड देशाचा वृत्तांत; त्या देशींचे लोक आतां येथें राज्य करतात, ते शाहाणे व गुणी आहेत, याजकरितां येथील लोकानीं त्यांचा वृत्तांत जाणून घ्यावा. ते जेणेंकरून इतक्या चातुर्यास व वैभवास पावले; त्या गोष्टी समजल्या असतां मोठ्या उपयोगी पडतील, याजकरितां तो वृत्तांत मी थोडक्यांत लिहावयास आरंभिला आहे तो वाचीत जावा, म्हणजे त्यां

लोकांचें सविस्तर वर्त्तमान समजण्यास सुलभ होईल. त्यांचा देश ज्या बेटांत आहे त्या बेटास ग्रेटब्रिटन म्हणतात. ज्या देशा सभोंवता समुद्र असतो त्या देशास बेट म्हणतात.'' २१

आठनऊ शतकांचा इंग्लंडचा इतिहास विस्तारपूर्वक तेहतीस पत्रांत लिहिणें अशक्य असल्यामुळें शेवटीं पत्रलेखक म्हणतो, ' हीं सर्व वर्तमानें बाळशास्त्री यांहीं जो इंग्लंडचा वृत्तांत ग्रंथ केला आहे त्यांत विस्तरें करून सांगितलीं आहेत, तो ग्रंथ तुह्मीं पुढें मोठेपणी वाचून समजून घ्यावा.' २२ सदरील उल्लेख रॉबर्ट मनी व बाळशास्त्री जांभेकर यांनीं भाषांतरित केलेली 'इंग्लंड देशाची बखर' भाग १ व २ (१८३२,३४) या पुस्तकांबद्दल आहे. हरि केशवजीनीं भाषांतर करण्यासाठीं निवडलेलीं इंग्रजी पत्रें मुळांत पहावयास मिळालीं नाहींत; परंतु पहिल्या दर्जाचे भाषांतरकार म्हणून त्यांची त्यावेळीं ख्याति असल्यामुळें 'इंग्लंडाचा वृत्तांत' भाषांतरित आहे असें सांगितल्याशिवाय वाचकाच्या ध्यानीं येणें शक्य नाहीं, इतक्या सफाईनें तें लिहिलेलें आहे. हें भाषांतर नसून रूपांतर आहे असा निर्वाळा त्यांनीं प्रथम सरकारजवळ केलेल्या विनंति अर्जांत दिलाच आहे. लेखनपद्धति निश्चित करण्यासाठीं मेजर कॅंडीसारखी व्यक्ति यावेळीं अधिकारारूढ नसल्यामुळें, इणें, इचीं हीं रूपें अगर जीवंत, बाकिचे इत्यादि शब्दांतील अशुद्धता या पुस्तकांत दिसते. तसेंच राजाकडेस, आपल्याकडेस अशा सकारयुक्त रूपांतील सकार काढून टाकण्याचा पुढील काळांत मेजर कॅंडीनीं जो प्रयत्न केला, तीं रूपें या पुस्तकांत आढळतात. 'अग्निचा थिंगळ' (पृ. १८५), 'इछापन्न' (पृ. १५५) इत्यादि आज अपरिचित असलेले शब्द या रूपांतरांत पहावयास मिळतात. कांहीं काळानंतर मराठी शाळांच्या अभ्यासक्रमांत इंग्लंडच्या इतिहासाला स्थान न राहिल्यामुळें प्रथमावृत्तीनंतर बऱ्याच उशिरानें इ. स. १८६१ मध्यें या पुस्तकाची दुसरी व इ. स. १८६७ मध्यें तिसरी आवृत्ति निघाली.

बाळशास्त्री जांभेकरकृत हिंदुस्थानाचा इतिहास

शालेय पुस्तकें तयार करण्याच्या कामीं ज्यांनीं कसून प्रयत्न केले त्यांत बाळशास्त्री जांभेकर यांना मानाचें स्थान द्यावें लागेल. शाळापुस्तक मंडळीचे चिटणीस झाल्यापासून तों इ.स. १८४६ मध्यें कैलासवासी होईपर्यंत त्यांनीं अनेक शालेय पुस्तकें रचिलीं. त्यांच्या मृत्यूपूर्वी प्रसिद्ध झालेलें शेवटचें शालेय पुस्तक म्हणजे 'हिंदुस्थानाचा इतिहास' (१८४६) हें होय. हें पुस्तक एल्फिन्स्टनच्या 'The Abridged History of India, या इंग्रजी पुस्तकाचा संक्षेप आहे. भाषेच्या दृष्टीनें तें कसें उतरलें याची कल्पना तें तपासणाऱ्या मेजर कॅंडीच्या खालील अभिप्रायावरून दिसून येईल. मेजर कॅंडी आपल्या टीकालेखांत म्हणतातः—

२१ हरि केशवजी, **इंग्लंडाचा वृत्तांत**. १८३८. पृ. १.

२२ तत्रैव. पृ. २७९.

"The blemishes of the work are inattention to the rule of grammar respecting the past tense of a transitive verb when both the agent and the object are inflected-the use of some vulgar phrases and idioms – and confusion arising from too frequent a use of the suspensive participle. I have brought forward some instances of all these, and others are marked with pencil in the pages of the work. I feel very great diffidence in expressing an opinion on a composition by so distinguished a scholar as Bal Shastree, but my opinion having been required I feel it my duty to say that to render this book worthy of the high character of Bal Shastree and of adoption by the Board of Education, it should undergo a very careful revision, the faults I have pointed out should be corrected and the style should be simplified." २३

वरील उतारा ज्या टीकालेखांतून घेतला आहे त्यांत बाळशास्त्र्यांच्या या पुस्तकाची भाषेच्या दृष्टीनें प्रकरणवार तपासणी करून मेजर कँडीनीं अनेक चुका दाखवून दिल्या आहेत. उदाहरणार्थ :—

"A very inelegant and bad phase ...कांहीं माहितगारी कळत नाहीं, no knowledge is known. It should be कांहीं कळत नाहीं or कांहीं माहितगारी होत नाहीं. Bal Shastree says यानें त्यास मुक्त केला. This construction is contrary to the rules of Marathi grammar which lay(s) down that where both the agent and the object of a transitive verb are inflected, **the verb must be neuter singular**...This incorrect construction is very common through-out the book....

"तक्ताधिपति is partly Persian and partly Sanscrit. It is in use, but it is inelegant, and should be avoided. Bal Shastree should so write that his writings should be referred to as standard authorities...किल्ला घेण्याचा उपाय would be better than मसलत...

---

२३ *D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1845. p. 327.

"Such phrases as मेले जाऊन are vulgarisms and should be avoided....

"हस्तमुख for a pleasant countenance is a vulgar curruption. It should be हास्यमुख.

"निद्रा आणि विश्रांति यार्णी शहराचा निरोप घेतला. Is not this a mere translation of an English idiom? निरोप घेणें is not to forsake but to take leave of ceremoniously." २४

जरी मेजर कँडीनीं बाळशास्त्र्यांचें हें पुस्तक तपासलें होतें तरी त्या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीवर तसा उल्लेख केलेला नाहीं; परंतु इ. स. १८५५ च्या दुसऱ्या आवृत्तीवर स्पष्ट म्हटलें आहे: 'हें पुस्तक बाळशास्त्री जांभेकर ह्यांनीं नामदार एलफिन्स्तन साहेब ह्यांच्या इंग्रेजी भाषेंतील ग्रंथाचा संक्षेप करून मराठी भाषेंत केलें, तें मेजर क्यांडीसाहेब पुणें पाठशाळेचे प्रिन्सिपाल ह्यांनीं शोधिलें. त्या शोधलेल्या प्रतीची ही दुसरी आवृत्ति.' २५

बाळशास्त्री जांभेकरांच्या 'हिंदुस्थानाचा इतिहास' या पुस्तकावरील मेजर कँडीनीं केलेल्या टीकेचा कांहीं भाग वर दिला आहे. या कडक टीकालेखामुळें बाळशास्त्र्यांना वाईट वाटूं नये म्हणून कीं काय शिक्षामंडळीनें जें पत्र त्यांना तारीख २२ नोव्हेंबर, १८४५ रोजीं लिहिलें होतें त्यांतील कांहीं भाग येथें द्यावासा वाटतो. तो असाः–

"In forwarding Captain Candy's remarks, and at the same time, returning your original work, the Board desire to express the high opinion they entertain of the ability you have shewn in preparing so valuable an addition to Murathee literature; Captain Candy's remarks are written with the minuteness which is due to the interests of the Department when commenting on so important a production, and with the freedom which is required by unfettered criticism with regard to the differences of opinion on some points between you and Captain Candy, the Board feel utterly incapable of making any remarks. Differences of opinion between distinguished scholars must always happen and, the result is usually beneficial." २६

---

२४ *D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1845. pp. 310–326.

२५ बाळशास्त्री जांभेकर, **हिंदुस्थानाचा इतिहास**. आ. २. १८५५. मुखपृष्ठ.

२६ *D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1845. p. 331.

मराठीभाषातज्ज्ञ बाळशास्त्री जांभेकर यांच्या लेखनांत मेजर कँडी यांनीं बरेच फेरफार केलेले आढळतात. या पुस्तकाच्या १८४६ व १८५५ सालच्या आवृत्तीच्या पुस्तकांना जोडलेल्या प्रस्तावनांची तुलना करतां, मेजर कँडी यांनीं केलेले बदल-त्यांणीं–त्यांनीं, चवघांमध्यें–चौघांमध्यें, पढणारांनीं–पढणाऱ्यांनीं, विचार करीत असावा–विचार करीत असावें, ह्मणोन–म्हणून, जाहला–झाला, याविषयीं–ह्याविषयीं, तश्या–तशा, अशे–अशा इत्यादि आज बव्हंशीं वापरांत आलेले दिसतात; आणि त्याचें कारण म्हणजे ते वरीलसारख्या सर्व शालेय पुस्तकांच्याद्वारा मुलांसमोर सतत ठेविले गेले हें होय.

हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास

बाळशास्त्र्यांच्या मृत्यूनंतर दोनतीन वर्षांच्या अवधींत त्यांचें इतिहासावरील आणखी एक शालेय पुस्तक छापिलें गेलें. तें म्हणजे 'हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास' (१८४९) हें होय. हा ग्रंथ, 'इंग्रेजी भाषेंतील मूळ ग्रंथावरून संक्षेपरूपानें माजी बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर ह्यांनीं मराठी भाषेंत केला, तो मेजर क्यांडी साहेब पाठशाळेचे सुपरिंटेंडेंट ह्यांनीं शोधिला.' असें या पुस्तकावर नमूद केलेलें आहे. शिक्षामंडळीला तारीख ११ मार्च, १८४८ रोजीं मेजर कँडी यांनीं कळविलें कीं, 'I should rather edit than review the work.'[२७] या सूचनेला शिक्षामंडळीनें मान्यता दिली. पुढें तारीख ६ जुलै, १८४८ रोजीं मेजर कँडीनीं शिक्षामंडळीला पुन्हां एकदां कळविलें कीं, बाळशास्त्र्यांनीं हस्तलिखितांत या पुस्तकाचे दोन भाग केले होते, पण छापतांना तें एकत्रच छापावयाचें आहे. याच पत्रांत बाळशास्त्र्यांनीं मूळ इंग्रजी ग्रंथांवरून माहिती घेतांना केलेले फरक आणि स्वतः केलेल्या सुधारणा त्यांनीं दिल्या. बाळशास्त्र्यांच्या मराठी लेखनाबद्दल मेजर कँडीचें म्हणणें येथें जाणून घेणें जरूर आहे. वरील पत्रांत ते लिहितात :

"I think that this work will be a valuable addition to Native Literature. Its chief fault perhaps is that it is too brief. The style is superior to that of Bal Shastree's previous work 'The Introduction to the History of India'. The criticisms which were made on that work have evidently been beneficial to this. I can trace many alterations and interlineations in this which were made in consequence of the exposure of the faults of that. There remained still a good deal of obscurity, which

---

२७ *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1848. p. 176.

I have laboured to remove, and there are many bad constructions, which I have corrected. I carefully compared Bal Shastree's work with the Histories of Thornton and Gleig as I read it. Of the other Histories from which he compiled it, I had not copies." २८

वर दर्शविल्याप्रमाणें मेजर कँडीनीं जे भाषाविषयक दोष हस्तलिखितांत दिसले त्यांची दुरुस्ती करण्याऐवजीं सर्व पुस्तक त्यांनीं स्वतः पुन्हां लिहिल्याचें दुसऱ्या एका पत्रांत स्पष्ट म्हटलें आहे. त्यांचे शब्द असे आहेत :—

" Revision of books – this work involves much trouble. Bal Shastree's History of British India, which the Hon' ble the President states was 'seen through the press' by me, was entirely revised and corrected by me; and written out afresh, and I afterwards saw it through the press."२९

अशाप्रकारें बाळशास्त्र्यांच्या मृत्यूनंतर, त्यांच्या हस्तलिखितांत बरेचसे बदल करून, नव्हे मेजर कँडी म्हणतात त्याप्रमाणें तें पुन्हां लिहून इ. स. १८४९ मध्यें छापिलें गलें. मूळ हस्तलिखित समोर नसल्यामुळें, मेजर कँडीनीं भाषेच्या दृष्टीनें काय काय फरक करून तें छापलें हें समजणें कठीण असलें तरी, त्यावरून त्यांचा सफाईदार हात फिरला असल्याचें स्पष्ट दिसतें. खुद्द मेजर कँडीनींच पहिली आवृति 'शोधिलेली' असल्यामुळें, इ. स. १८५४ च्या दुसऱ्या आवृत्तींत फारसे फरक झालेले आढळत नाहींत.

सत्तावीस प्रकरणांत, युरोपियन लोक प्रथम हिंदुस्थानांत आल्यापासून इ. स. १८४४ पर्यंतचा इतिहास देऊन शेवटीं 'इंग्लिशांच्या राज्याची सांप्रतची स्थिति आणि त्यांचा उदय होण्याचीं कारणें' या पुस्तकांत दिलेलीं आढळतात. या पुस्तकाची तिसरी आवृत्ति निघण्याचा योग आलेला दिसत नाहीं.

---

२८. *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1848. PP. 177 – 178.

२९. *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1850. P. 263.

हिंदुस्थानचा इतिहास

स्वतंत्ररीत्या हिंदुस्थानचा इतिहास लिहिण्याचें सामर्थ्य या काळीं एतद्देशीयांमध्यें नसल्यामुळें, परकीय इतिहासकार एल्फिन्स्टन्, मरे, मॉरिस, थॉर्न्टन्, ग्लेग इत्यादिकांच्या इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें करणें एवढेंच एतद्देशीयांचें काम होतें असें कोणासहि वाटण्याचा संभव आहे; परंतु तसें नसून, सरकारी धोरणानुसार त्यांना वागावें लागत असल्यामुळेंच कीं काय, परकीय इतिहासकारांच्या पुस्तकांवरून मराठीमध्यें इतिहासाचीं पुस्तकें त्यांना तयार करावीं लागत. अशा पुस्तकांपैकीं वर उल्लेखिलेल्या बाळशास्त्र्यांच्या दोन पुस्तकांनंतर तयार झालेला महत्त्वाचा भाषांतरित इतिहास म्हणजे मरेकृत 'हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया' या इंग्रजी पुस्तकाचें भाषांतर 'हिंदुस्थानचा इतिहास' होय. मेजर कँडी यांनीं मूळ पुस्तकाचीं थोडथोडीं प्रकरणें वेगवेगळ्या लोकांकडे भाषांतरासाठीं सोंपवून दिलेलीं होतीं. त्यापैकीं पहिलीं सहा प्रकरणें कोणाकडे गेलीं होतीं तें समजत नाहीं; परंतु सहा ते नऊ हीं चार प्रकरणें नरसिंह विनायक शास्त्री ओक यांच्याकडे आलीं होतीं. तीं 'हिंदुस्थानचा इतिहास' भाग २ या नांवानें इ. स. १८६० मध्यें प्रसिद्ध झालीं. तसेंच दहा ते चौदा हीं पांच प्रकरणें विष्णुशास्त्री पंडित यांनीं भाषांतरित करून, 'हिंदुस्थानचा इतिहास' भाग ३ या नांवें इ. स. १८६१ मध्यें छापिलीं. या भाषांतरांबद्दलची एक खास सूचना या दोनहि पुस्तकांच्या सुरुवातीला जोडलेली आढळते ती अशी:—

"This book has not received European revision; but it has been carefully revised by the Translator, and also looked over by the Pandit of the Marathi Translator in the Educational Department."

ही सूचना जोडण्याचा हेतु असा दिसतो कीं, मेजर कँडीच्या गैरहजिरींत तयार झालेलीं हीं दोन भाषांतरें असल्यामुळें त्यांत भाषेच्या दृष्टीनें जर कांहीं दोष राहून गेले असतील तर त्यांच्याकडे कोणी बोट दाखविल्यास असें सांगतां यावें कीं, युरोपिअन दृष्टीखालून हीं भाषांतरें गेलेलीं नसल्यामुळें कांहीं चुका राहण्याचा संभव आहे. वास्तविक नरसिंह शास्त्री ओक अगर विष्णुशास्त्री पंडित हे मेजर कँडी यांच्या हाताखालीं तयार झालेले 'ट्रॅन्स्लेशन् एक्झिबिशनर' होते. तसेंच मेजर कँडीचे खास पंडित परशुरामपंत गोडबोले यांच्या नजरेखालून हीं भाषांतरें गेलेलीं होतीं.

हिंदुस्थानच्या इतिहासाचे हे भाग शाळांमधून विशेष वापरले गेले नाहींत, त्यामुळें त्यांची दुसरी आवृत्ति निघण्याचा प्रसंगच आला नाहीं; परंतु शाळांमधून विशेष अभ्यासिलें गेलेलें असें दुसरें एक भाषांतरित इतिहासाचें पुस्तक यावेळीं प्रसिद्धीला आलें. 'हेनरी मारिस साहेबाच्या मूळ इंग्रेजी पुस्तकाचें मराठी

भाषांतर–हिंदुस्थानाचा इतिहास' हें तें पुस्तक होय. सरकारी विद्याखात्यातर्फे हें पुस्तक इ. स. १८६१ मध्यें प्रथम प्रसिद्ध झालें. एकाच व्यक्तीनें हें भाषांतर केलेलें नसल्यामुळें 'Translated into Marathi by several Translation Exhibitioners,' असा उल्लेख प्रत्यक्ष पुस्तकावर केलेला आहे. मुलांच्या हातीं पाठ्यपुस्तक म्हणून दिल्या गेलेल्या या पुस्तकांत 'इकडे'–'हिकडे,' 'उगवला'– 'उगिवला,' 'जास्ती'–'ज्यास्ती' इत्यादि एकाच शब्दाचीं. वेगवेगळीं रूपें आढळावीं, हें आश्चर्यजनक आहे. 'अस्वार्थपणा' (पृ. ३'९), 'अदिकांप' (ए. डी. सी. पृ. ९७), 'जनरल उत्रम' (Outram पृ. ५७) इत्यादि शब्द आज विचित्र वाटण्यासारखे आहेत.

८०५२.

रावसाहेब मंडलिककृत हिंदुस्थानाचा इतिहास

माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टननें लिहिलेल्या हिंदुस्थानच्या इतिहासाची मोहिनी या काळांत विद्वान लोकांवर इतकी पडली होती कीं, या पुस्तकाचें संक्षिप्त भाषांतर प्रथम इ. स. १८४६ मध्यें बाळशास्त्री जांभेकरांनीं केलें, त्यानंतर रावसाहेब मंडलिक यांनीं या इंग्रजी पुस्तकाचें भाषांतर तीन भागांत प्रसिद्ध केलें. जरी मंडलिकांनीं भाषांतरित केलेला हा 'हिंदुस्थानाचा इतिहास' शाळांमधून वापरला गेला नाहीं तरी विषयाची पूर्तता करण्यासाठीं या ग्रंथांची दखल घेणें आवश्यक आहे. भाषांतराचें काम रावसाहेबांनीं इ. स. १८५४ मध्यें सुरू केलें व सरकारी नोकरीचें काम संभाळून जो वेळ मिळाला त्यांत तें चालविलें. 'हिंदुस्थानाचा इतिहास' या नांवानें दोन-भागांत इ. स. १८६१ मध्यें तें प्रसिद्ध झालें. पहिला भाग एल्फिन्स्टन कॉलेजचे तत्कालीन प्रिन्सिपल जॉन हॉर्कनेस यांना शिष्यत्वाच्या नात्यानें कृतज्ञतापूर्वक सादर अर्पण करून प्रस्तावनेंत मंडलिक म्हणतातः–

"पुढील भाषांतरांत शब्दास शब्द न उतरतां सरळ मराठी भाषेंत ग्रंथकाराचा आशय कळविण्याचा यत्न केलेला आहे. तो यत्न सर्वत्र तडीस गेला आहे असा अभिप्राय भाषांतरकर्ता बागवित नाहीं; परंतु मूळांतील अर्थ अगदीं सोडून लिहिलेले असे लेख फार नसतील अशी त्याची आशा आहे; आणि अशा चुक्या जर कोणी गृहस्थ कृपा करून त्यास कळवितील, तर (या ग्रंथाची दुसरी आवृत्ति छापल्यास तींत) त्या नीट करण्याचा यत्न त्याजकडून होईल." हा भाग त्यावेळचे डी. पी. आय. हॉवर्ड व दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी यांच्या उदार आश्रयामुळें प्रसिद्ध होऊं शकला. दुसरा भाग हॉवर्ड यांस, 'त्यांचा परमनम्र व आभारी सेवक भाषांतरकर्ता, यानें, साहेबमवसूफांनीं एतद्देशीय व्युत्पत्तीस जो उदार आश्रय दिला ते उपकार प्रसिद्धपणें कबूल करण्याचा उद्देशानें' नजर केला आहे.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

वर्ग.....क्रमांक.....

तिसरा भाग 'हिंदुस्थानाचा इतिहास, उपोद्घात' या नांवानें इ. स. १८६२ मध्यें प्रसिद्ध झाला, तो 'मेहेरबान मेजर जनराल जी. लिग्राण्ड जेकब साहेब बहादुर...यांस साहेब मवसूफ यांणीं एतद्देशीय लोककल्याणार्थ जे निरक्षेप श्रम घेतले ते पाहून सानन्दाश्चर्य-भरित होऊन, भाषान्तरकर्ता, याणें अत्यन्त कृतज्ञता व सत्कारपूर्वक' अर्पण केला आहे.

मंडलिक यांच्या 'हिंदुस्थानाचा इतिहास, उपोद्घात' या भागावर गोपंत छत्रे यांनी उपयुक्ततेच्या दृष्टीनें जें मत खुद्द मंडलिकांकडे व्यक्त केलें आहे प्रस-येथें आठवण होते. छत्रे म्हणतात :—

"माझ्या मतें हा भाग तिन्हीं भागांत उत्तम आहे. आमच्या देशांतील धर्म, नीति, चाली व रीती यांवर एका विद्वान व सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करणाऱ्या इंग्रजानें दिलेले विचार या भागांत येतात. आमच्या देशाकरतां हे विदेशी लोक जें करीत व लिहीत आहेत त्यापैकीं एकही गोष्ट नीट शोधपूर्वक निरीक्षण करून, आह्मांपैकीं २० कोटींत अथवा त्याहून अधिक जनसंख्येंतून एकजण पुढें येऊन लिहूं शकत नाहीं ही गोष्ट आम्हां सर्वांस फार लज्जास्पद आहे. कांहीं प्रकारें डॉ. भाऊ, तुम्हीं स्वतां व दुसरी कांहीं बंगाल्यांतील पटुमति तरुण मंडळी ही कदाचित अपवाद म्हणून जन्मलां आहांत. म्हणून तुमच्या प्रयत्नास यश येवो."[३०]

मेजर कँडी यांनीं सुद्धां रावसाहेब मंडलिकांच्या भाषांतरकौशल्याबद्दल चांगले उद्गार काढले. कँडी लिहितात :—

"The translation is remarkably free from errors of grammar excepting one or two points which are contested (which I therefore do not adduce), I have noticed scarcely any slip in what I have read. It generally too expresses the sense of the original correctly and in the main, idiomatically. Of some passages the renderings are very susceptible of improvements; but the renderings of others may be characterised as excellent."[३१]

भाषांतराबद्दल सर्वसाधारण रीत्या जरी मेजर कँडीचें मत अनुकूल झालें, तरी सुद्धां त्यांना कांहीं बारीकसारीक दोष दिसलेच. तारीख २२ जुलै, १८६१ रोजीं लिहिलेल्या टीकालेखांत ते म्हणतात :—

"I do not agree with the translator with regard to certain forms of words that he uses, (as चा for च्या, जा for ज्या, त्ये, for ते or ती, करित for करीत and some others) but as these points have not been authoritatively settled, everyone must be left to adopt the forms he prefers....ज्या टीपा साधारण वाचणारांचा

---

३० गणेश रामकृष्ण हवालदार, **रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें चरित्र, भाग १.** १९२७. पृ १४०

३१ *D. P. I. Miscellaneous. Vol. 23.* 1861 – 62. P. 549

उपयोगी नाहींशा दिसल्या. There seem to me to be three errors in the passage. टीपा should be टिपा, उपयोगी should be उपयोगीं and नाहींशा should be नाहींतशा....पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत. This is not idiomatic; it should be पूर्वेकडून पश्चिमेकडे....विलक्षण धर्म peculiarity. विशेष धर्म be better....हें लोकांस खाण्याच्या उपयोगी पडतें. Here उपयोगी should be उपयोगीं. उपयोग is in the 7 th. case....त्यांणीं एकछत्री पृथ्वी केली. Would it not be better to say त्यांणीं पृथ्वी एकछत्री केली?" ३२

केरोपंत छत्रे सारख्या विद्वानाला मंडालिकांचें भाषांतर पसंत पडलें, मेजर कँडीसारख्या चिकित्सक टीकाकाराच्या कसोटीला तें उतरलें; परंतु विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें या तीनहि भागांबद्दलचें मत मराठी भाषेच्या दृष्टीनें प्रतिकूल झालें. विष्णुशास्त्री म्हणतातः—

"ऐतिहासिक ग्रंथास व सामान्यतः देशभाषेंतील सर्व पुस्तकांस जो भिकारपणा आला आहे तो कोणत्याहि प्रकारच्या उणिवेमुळें आला आहे असें नाहीं, तर लोकांच्या शुद्ध अनास्थेमुळेंच आला आहे. त्या विषयीं त्या पुस्तकांमधूनच एक मोठें प्रमाण दृष्टीस पडतें. तें कोणतें म्हणाल?—तर धेडगुजरी भाषा! अशुद्ध शब्द किंवा लिहिण्याची तऱ्हा मराठी आहे कीं नाहीं याचा निश्चय करणें हें तर मराठी दप्तर चाळण्यापेक्षां व हिंदुस्थान फिरण्यापेक्षां फारच सोपें ना! पण चमत्कार हा कीं मुंबईच्या विद्वत्समाजानें जो इतिहासग्रंथ (वि. ना. मंडलिक यांनीं केलेलें एल्फिन्स्तनच्या इतिहासाचें भाषांतर) बी. ए. सारख्या वरच्या परीक्षेस मराठीकरितां तिगस्त सालपर्यंत नेमला असे, त्याची लिहिण्याची शैली इतकी विचित्र आहे, कीं इंग्रजी न शिकलेल्या एकाद्या मनुष्यापुढें जर त्याचें एक अर्ध पृष्ठ वाचलें तर तो भांबावून जाऊन, ही भाषा कोण म्हणून वाचणारास विचारूं लागेल! हा प्रसाद मुंबईच्या वस्तीनें ग्रंथकर्त्यास दिला, किंवा अशा प्रकारच्या भाषेशिवाय मराठींत इतिहास शोभत नाहीं असें त्यास वाटलें कीं काय नकळे...शेवटीं आह्मास आमच्या नवीन विद्वानांस येवढेंच सांगणें आहे, कीं आजपर्यंत भाषांतर रूपानेंच इतिहासाची माहिती लोकांस होण्याचा जो मार्ग होता तो ठीकच होता, पण यापुढेंही तोच मार्ग ठेवणें यासारखें मात्र हास्यास्पद कांहीं नाहीं." ३३

---

३२ *D. P. I. Miscellaneous. Vol. 23.* 1861–62. pp. 549–553.

३३ खंडेराव भिकाजी बेलसरे, **विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या किरकोळ लेखांचा संग्रह,** भाग १. १८९६. पृ. ८४–८५.

स्वतंत्ररीत्या इतिहासलेखनाचें काम व्हावें ही विष्णुशास्त्र्यांची सूचना अमलांत येण्यास थोडा अवधि होता. मंडलिकांच्या या ग्रंथांवरून शिवराम भास्कर काणे यांनीं 'हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास' रचिला. काणे म्हणतात, "प्रथम हा ग्रंथ प्रश्नोत्तरावलीनें लिहिण्याची तयारी केली होती, पण वि. ना. मंडलिक यांहीं प्रश्नोत्तरावलीपेक्षां इतिहासाचे पद्धतीनें ग्रंथ लिहिला असतां विशेष ग्राह्य होईल असें सुचविल्यावरून...इतिहासाचे पद्धतीनें लिहिला." ३४

विनायक कोंडदेव ओक व शालेय इतिहास

शालेय पुस्तकें तयार करण्यांत विनायक कोंडदेव ओक यांना मानाचें स्थान द्यावें लागतें. इतिहासविषयक शालेय पुस्तकांत त्यांचीं 'हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास' (१८६८) व 'हिंदुस्थानकथारस' (१८७१) हीं दोन पुस्तकें त्याकाळीं मुलें आवडीनें वाचीत असत. यांपैकीं पहिलें पुस्तक सरकारी विद्याखात्यातर्फे प्रसिद्ध झालें होतें. इ. स. १८९१ पर्यंत त्याच्या नऊ आवृत्त्या झाल्या. या आवृत्त्यांत भाषेच्या दृष्टीनें फारसा फेरबदल केलेला आढळत नाहीं. याचें कारण म्हणजे विनायक कोंडदेव ओक हे मेजर कँडी यांचे व्याकरणविषयक नियम शिरोधार्य मानीत असत. 'हिंदुस्थान कथारस' हें पुस्तक वरील पुस्तकापेक्षांहि मुलांना विशेष आवडत असे; कारण तें गोष्टीरूप होतें. विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारख्यांचें प्रशस्तिपत्र या पुस्तकाला लाभलें हें विशेष होय. 'भाषापद्धति' या निबंधांत विष्णुशास्त्री लिहितात:—

"आज आमच्या भाषेंत आमच्या देशाचे जे इतिहास आहेत, त्यांत शब्दास शब्द भाषांतर नसतां स्वतंत्र आपल्याच बुद्धीनें लिहिलेले असे दोन मात्र आह्मांस माहित आहेत:- एक जांभेकर यांचा 'हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास' आणि दुसरा रा. विनायक कोंडदेव ओक यांचा 'हिंदुस्थानकथारस.' या दोघां ग्रंथकारांनीं, व त्यांतून विशेषतः दुसऱ्यानें, स्वतंत्र इतिहासरचना करण्याचा जो आपल्या देशबंधूस कित्ता घालून दिला आहे, त्याजबद्दल त्यांचें सर्वांनीं मोठे आभार मानणें अवश्य होय हें उघडच आहे. तथापि खरोखरी पाहतां दोघांनींही आपापल्या ग्रंथांत केवळ शब्दरचनेच्या पलीकडे कोणत्याही प्रकारें स्वातंत्र्य दाखविलें आहे असें नाहीं; त्यांचे ग्रंथांत इंग्रेज ग्रंथकारांच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा प्रकार आहे तो आहेच.

---

३४ शिवराम भास्कर काणे, **हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास**, आ. २. १८६९. प्रस्तावना.

"मेकॉले, मारिस, यांच्यासारख्या महासमर्थ ग्रंथकारांनीं आमच्या इतिहास-सिंधूचें आलोडन करून आम्ही परमदुर्बल, परमनीच, परममूर्ख अशीं सत्याचीं रहस्यें जीं आम्हांस नजर केलीं आहेत तीं अद्यापहि आम्हीं उराशींच बाळागेलीं आहेत. तीं तेथून केव्हां निघतील तीं निघोत! आमच्या साधारण संभाषणांत मोठमोठ्या सभांतून, लोकमान्य ग्रंथांतूनहि वरच्यासारख्याच कल्पना व विचार आढळून येतात. वर सांगितलेल्या 'कथारसां'त ग्रंथकारानें कित्येक ठिकाणीं आपल्या समजुती सदरहूप्रमाणेंच प्रगट केल्या आहेत. त्यांचा मासला ज्या कोणास पाहणें असेल त्यानें तो वरील ग्रंथाच्या शेवटीं सत्तावन सालच्या बंडाच्या संबंधानें दोन लेख लिहिले आहेत त्यांत पाहावा.'' ३५

विष्णुशास्त्र्यांचें वरील विधान खरें आहे. ओक यांनीं 'हिंदुस्थानकथारसां' त 'लार्ड क्लैव,' 'कलकत्त्यांतील कोंडमारा,' 'हिंदुस्थानाची सांप्रतची स्थिति' इत्यादि धड्यांत राजनिष्ठा व्यक्त केली आहे. ओक यांची ही राजनिष्ठा बाजूला ठेवून त्यांच्या शालेय पुस्तकांचा विचार केला तर 'बालबोध' पद्धतीनें लिहिण्यांत ते पटाईत असल्यामुळें त्यांचीं सर्व पुस्तकें मुलांच्या दृष्टीनें सोपीं अशींच झालीं.

जगाचा इतिहास

महाराष्ट्राचा इतिहास, हिंदुस्थानचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास व इंग्लंडचा' इतिहास या विषयांवर जशीं शालेय पुस्तकें तयार झालीं, तशींच जगाच्या इतिहासाची थोडक्यांत कल्पना देणारीं कांहीं शालेय पुस्तकें रचिलीं गेलीं. मार्शमन कृत 'ब्रीफ् सर्वे ऑफ् हिस्टरी' या इंग्रजी ग्रंथावरून 'जगाचा संक्षिप्त इतिहास' दोन भागांत प्रसिद्ध झाला. दक्षिणा प्राइझ कमिटीसाठीं हरी रघुनाथ गाडगीळ यांनीं भाषांतरित केलेल्या दोन भागांपैकीं पहिला इ. स. १८५२ मध्यें व दुसरा इ. स. १८५७ मध्यें छापिला गेला. पहिल्या भागांत, 'जगाचे उत्पत्तीपासून मासिडनची बादशाहत गारद झाली तोंपर्यंत' चा व दुसऱ्या भागांत, 'रूम शहरचे स्थापनेपासून एसू क्रिस्ताचे जन्मा पर्यंत' चा इतिहास आलेला आहे. पहिला भाग कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं व दुसरा नानाशास्त्री आपटे यांनीं तपासला. दक्षिण प्राइझ कमिटीला मेजर कँडी यांनींच भाषांतर कसें करावें याबद्दलचे नियम तयार करून दिलेले असल्यामुळें शक्यतों सोपीभाषा वापरण्याकडे बहुतेक भाषांतरकर्त्यांचा कल असे. 'जगाचा संक्षिप्त इतिहास कर्ते गाडगीळ म्हणतात, 'हा ग्रंथ संस्कृत शब्दांनीं सर्वत्रांस समजण्यास अवघड असा

३५ **निबंधमाला**, अंक २७, मार्च, १८७६. पृ. १७–१८.

न व्हावा म्हणून ह्यांत प्राकृत व नेहमीं बोलण्यांत व लिहिण्यांत येणारे असे शब्द घालून लिहिला आहे.' [३६] दक्षिणा प्राइझ कमिटीनें या पुस्तकांना दोनशें रुपये बक्षिस म्हणून दिले होते. याशिवाय बेहरेकृत 'जगाचा संक्षिप्त इतिहास' (१८७१) मोडक यांचें 'जगाच्या इतिहासाचें सामान्य निरूपण' (१८७२) इत्यादि पुस्तकें वापरांत होतीं.

परराष्ट्रांचा इतिहास

जगाच्या इतिहासाप्रमाणेंच हिंदुस्थानबाहेरील प्राचीन काळचीं मोठमोठीं साम्राज्यें स्थापन करणाऱ्या व जुन्या काळांत जगाच्या इतिहासांत आपलीं नांवें अजरामर करणाऱ्या 'ग्रेकी,' 'आशुरी,' 'बाबेली,' 'मिस्त्री,' 'मेदी,' 'पार्शी' इत्यादि लोकांचा व त्यांच्या राज्यांचा इतिहास मुलांसमोर ठेविला गेला. या विषयावरील पुस्तकें जरी शाळापुस्तक मंडळीनें स्वतः तयार केलीं नाहींत, तरी 'मडम विल्सन साहेबानें' रचिलेलीं पुस्तकें तत्कालीन शाळांत वापरलीं जात.

या पुस्तकांपैकीं, 'मेदी आणि पार्शी लोकांचें वृत्तांत कथन' (१८३५) हें एक होय. त्यांत 'जित्रब' (पृ. ३), 'भुईंवर' (पृ. ४), 'संगें घेऊन' (पृ. ५) 'राखांपासून' (पृ. ३०) इत्यादि देशी शब्द कोठें कोठें आढळतात; तर 'ह्या राजाने आपलें राज्य प्रतापयुक्त करून मरण पावला' (पृ. ५), 'त्या दोहों दंगेखोरानी त्या राजास धरून देशास नेऊन जाऊं लागले' (पृ. ४२) यासारखीं वाक्यें पाहून, इ. स. १८३५ खालीं पेशवाई मराठीची छटा शिल्लक होती असें दिसतें.

'ग्रेक देशाच्या इतिहासांत आथेनाईकरी, लाकेडेमनी आणि माकेडनी लोकांसंबंधीं कथाभाग फार सरस आहेत. यास्तव आह्मी ते कथाभाग एक एक अनुक्रमाने निवेदन करितों' अशी प्रस्तावना करून मडम विल्सननें दुसरें पुस्तक रचिलें, तें म्हणजे 'ग्रेकी लोकांचें वृत्तांतकथन' हें होय. या पुस्तिकेंत फक्त आथेनाईकरी यांविषयीं माहिती आली आहे. प्राचीन इतिहासाचें मडम विल्सननें लिहिलेलें आणखी एक पुस्तक म्हणजे 'आशूरी आणि बाबेली लोकांचें वृत्तांत कथन' (१८३५) हें होय. बाबेल शहराच्या वैभवाचें वर्णन या पुस्तकांत केलेलें आहे. हें वैभवशाली बाबेल शहर शेवटीं 'निर्दलित' झालें; त्याचें कारण लेखिकेच्या शब्दांत द्यावयाचें तर तें असें आहे :—

---

३६ हरी रघुनाथ गाडगीळ, **जगाचा संक्षिप्त इतिहास**, भाग १. १८५२. प्रस्तावना.

"त्यांची मूर्तिपूजनाची रीती इतकी परम निंद्य होती कीं त्यांस अतिदुष्ट विचार करावयास मोकळीक होती आणि आश्रय होता. ज्या रीती मूर्तिपूजक लोकांसहि लिहायास फार वाईट आणि भयंकर वाटल्या त्या रीती त्यांच्या धर्माचरणांत सांगितल्या होत्या. ह्याप्रमाणें देवाच्या पवित्रपणाची त्या लोकांनी छलना केली त्याचा अपमान केला आणि केवळ अयोग्य जे पदार्थ त्यांस त्यानी देवाचें गौरव दिल्हें. यास्तव त्या लोकांवर देवाचा कोप होऊन त्यांचें सतेज स्थल निर्दलित झालें ह्यांत आपणास आश्चर्य वाटावें कीं काय? नाहीं त्यांत कांहीं आश्चर्य वाटूं नये. देवानें त्यांचे अपराध बहुत सोसले हा मात्र आपणास विस्मय वाटावा. आणि आपल्या अपराधें करून देवाचा कोप आपणावर होईल आणि आपणासहि तशीच शिक्षा होईल यास्तव आपण भय धरावें. जशा बाबेल देशाच्या लोकांच्या मानभंग करणाऱ्या पापिष्ठ रीती होत्या तशा ह्या देशांत आणि इतर मूर्तिपूजक लोकांच्या देशांतहि आहेत. यास्तव जे कोणी त्या लोकांचा इतिहास वाचतील त्यानी मूर्तिपूजा त्यागून जिवंत देवास भजावें." [३७]

याच धार्मिक विचारानें प्रेरित होऊन मडम विलसननें 'प्राचीन मिस्त्री लोकांचें वृत्तांत कथन' (१८३५) लिहिलें. 'फिरमिदां'चें लेखिकेनें केलेलें वर्णन बहारदार आहे. मिसर देश एकाकाळीं वैभवाच्या शिखरावर होता पण त्याची 'वाईट कामामुळें विधवाट झाली.' लेखिकेच्या मतें त्याचें कारण हें आहे:—

"देवाच्या समोर कांहीं कर्म लपत नाहीं आणि त्याच्या बोलण्यांत एकहि चूक नाहीं. आतां पुष्कळ देशांची हलाकी होत चाललेली आहे. यास्तव देवाच्या बोलण्याचा फार विचार केला पाहिजे. पुढें कांहीं वेळ उलटापालट होऊन सर्वत्र खीस्ती धर्म स्थापिला जाईल आणि तेव्हां सर्व लोक देवाची भावें भक्ति करितील व आनंद पावतील. आणि जसें पाणी उथळ जमिनीवर पसरतें तसाच खीस्ती धर्म सगळ्या पृथ्वीवर पसरेल." [३८]

अशाप्रकारें प्राचीन परकीय साम्राज्यांचा व तेथील लोकांचा इतिहास मुलांसमोर शालेय पुस्तकांच्याद्वारें ठेवण्याच्या निमित्तानें मडम विल्सननें मोठ्या युक्तीनें केलेला खिस्तीधर्मप्रसार, शाळापुस्तकमंडळीला मान्य होता असें म्हणावें लागतें; कारण वरील पुस्तकें सरकारी मराठी शाळांमधून वापरलीं जात असत व सरकारी

---

३७ मडम विलसन, **आशूरी आणि बाबेली लोकांचें वृत्तांत कथन**, आ. २. १८३८. पृ. ५९–६०.

३८ मडम विलसन, **प्राचीन मिस्त्री लोकांचें वृत्तांत कथन**, आ. २. १८३९. पृ. ७९–८०.

पुस्तकखान्यांत, तीं विक्रीसाठीं ठेविल्याचे उल्लेख सांपडतात. 'मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी' आपल्या इ. स. १८३६ च्या नवव्या वार्षिक इतिवृत्तामध्यें, हीं पुस्तकें मंडळीच्या वतीनें छापल्याचें मान्य करते व तारीख १ जानेवारी, १८३६ रोजीं मंडळीच्या पुस्तकखान्यांत या पुस्तकांच्या प्रत्येकीं किती प्रती शिल्लक आहेत त्याचा तपशील देते. [३९] मात्र सातआठ वर्षांतच ही गोष्ट शाळापुस्तकमंडळीच्या ध्यानांत आली. मंडळीनें इ. स. १८४३ मध्यें नेमिलेल्या पुस्तक समितीनें शालेय पुस्तकांची जेव्हां तपासणी केली तेव्हां तिला कळून आलें कीं, मडम विलसनचीं वर उल्लेखिलेलीं चार पुस्तकें उपयुक्त आहेत; परंतु त्यांतील कांहीं भाग (opinions and speculations of the author in regard to historical and chronological matters which rest on doubtful authority.) वगळावा. [४०] हीं पुस्तकें पुढें वापरांतून केव्हां निघालीं तें समजत नाहीं. इ. स. १८६० च्या सुमारास ज्यावेळीं फिरून शालेय पुस्तकांची तपासणी झाली, आणि नवीन प्रकारचीं व नवीन पद्धतीवर शालेय पुस्तकें लिहिलीं गेलीं, त्यावेळीं हीं पुस्तकें बंद झालीं असावींत.

चरित्रें

इतिहासविषयक पुस्तकांप्रमाणेंच प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें मुलांच्या हातीं देण्याचा क्रम प्रथमपासून सुरू झाला होता. अशा पुस्तकांपैकीं रघुनाथशास्त्री दात्ये यांचें 'शालिवाहन चरित्र' (१८४०) एक होय. खास शाळेंतील मुलांसाठीं लिहिलेल्या या चरित्रग्रंथाला सरकारी मदत मिळावी म्हणून लेखकानें सरकारजवळ विनंति केली. पुस्तकमंडळीकडे हें पुस्तक मतप्रदर्शनार्थ आलें व पुस्तक समितीनें त्यावर आपला अभिप्राय दिला कीं नायकाच्या जीवनांतील घटना अवास्तव व अतिरंजित आहेत. शाळापुस्तक मंडळीच्या नियमाप्रमाणें या पुस्तकाला मदत मिळूं शकणार नाहीं. [४१] हा अभिप्राय पुस्तक समितीच्या सभासदांपैकीं बाळशास्त्री जांभेकर व महमद इब्राइम मखबा यांनीं दिला. याच्या अगदीं उलट अभिप्राय ऑलेंबार यांनीं दिला व हरि केशवजीनीं त्याला दुजोरा दिला. [४२]

---

३९ *Ninth Report of the Bombay Native Education Society.* 1836. p 31.

४० *G. D. Vol.* $\frac{24\ A}{749\ A.}$ 1843. p. 704.

४१ *D. P. I. Board of Education, Circular Book.* 1841. p. 66.

४२ Ibid. p. 66.

हीं परस्पर विरुद्ध मतें विचारांत घेऊन शाळांमध्यें वापरण्यास हें पुस्तक निरुपयोगी असल्याचा निर्णय शाळापुस्तक मंडळीनें घेतला.[४३] या नकारामुळें लेखकानें तें स्वतः छापलें. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सरकारी पुस्तकखान्यांत या पुस्तकाच्या प्रती विक्रीसाठीं ठेविलेल्या आढळतात. [४४] अशा या चरित्रग्रंथाबद्दल लेखक म्हणतात :—

"शालिवाहनाचें चरित्र आजपर्यंत पुस्तकद्वारा प्रसिद्धीस न येण्याचें कारण काय असेल तें असो. हल्ली शालिवाहनाच्या इतिहासाचें पुस्तक पैठणांत मिळालें व बखरीही पाहण्यांत आल्या त्यावरून हें शालिवाहनचरित्र मराठीं भाषेंत केलें आहे. यद्यापि हें शालिवाहन चरित्र फारच संक्षिप्त आहे खरें. तथापि वाचणारांस प्रीति व विस्मयकारक आहे." [४५]

ओर्लेबार यानें या पुस्तकाबद्दल जो अनुकूल अभिप्राय दिला त्याचें कारण असें दिसतें कीं, लेखकानें महमद व खिस्त यांचीं चरित्रेंहि या पुस्तकाला जोडिलीं आहेत; शालिवाहनाच्या जीवनांतील अनेक असंभाव्य गोष्टींचा अंतर्भाव या पुस्तकांत असल्यामुळें, शाळापुस्तकमंडळीच्या धोरणाप्रमाणे हें पुस्तक मुलांच्या हातीं न देणेंच इष्ट होतें.

प्रसिद्ध पुरुषाचें चरित्र पुरवणीवाचनादाखल वापरांत येण्याचा मान, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या 'साक्रेटीस ह्याचें चरित्र' (१८५२) या चरित्रग्रंथाला मिळाला. जिनोफेन व प्लेटो या दोघांनीं सॉक्रेटीसाचें चरित्र ग्रीक भाषेंत लिहिलें. त्याचा सारांश रोलिननें फ्रेंच भाषेंत तयार केला व त्याच्या इंग्रजी तरजुम्यावरून हें चरित्र कृष्णशास्त्र्यांनीं मराठी भाषेंत आणिलें. या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत कृष्णशास्त्र्यांनीं चरित्रवाचनाचे 'सामान्य लाभ' दाखवून दिले आहेत.

दाक्षिणा प्राइझ कमिटीनें पसंत केलेल्या व एकशें पन्नास रुपये बक्षिसाला पात्र ठरलेल्या या पुस्तकाची फार वाहवा झाली. कृष्णशास्त्र्यांचें बहुतेक लेखन जरी भाषांतरित असलें, तरी ते इतक्या सहज सुलभ रीतीनें लिहीत कीं, तें भाषांतरित आहे याची कोणाला कल्पनाहि येऊं नये. चांगल्यापैकीं भाषांतरकार असल्यामुळेंच 'कृष्णा चिपळोणकर पाठशाळेंतील एक विद्यार्थी ह्यानें इंग्रेजी पुस्तकांतील विषय मनांत आणून इकडील रीतीप्रमाणें' रचिलेल्या तीन गोष्टीना मेजर कँडींनीं आपल्या 'वाचन पाठमालें' त स्थान दिलें होतें. मेजर कँडीनीं घालून दिलेल्या पद्धतीप्रमाणें लिहिण्याचा त्यांचा सराव होता.

---

४३ *G. D. Vol. 594.* 1841. p. 348.

४४ *D. P. I. Report of the Board of Education,* Appendix I. 1842.

४५ रघुनाथशास्त्री दात्ये, **शालिवाहन चरित्र.** १८४०. प्रस्तावना.

दक्षिणा प्राइझ कमिटीनें मान्यता देऊन छापलेलें आणखी एक चरित्र म्हणजे सदाशिव गणेशशास्त्री लेलेकृत 'कपतान कूकसाहेब ह्याचे जलपर्यटनाचा वृत्तांत' (१८५३) हें होय. रेवरेंड विलियम विंगली याच्या इंग्रजी ग्रंथावरून हा वृत्तांत मराठी भाषेंत आणिला गेला. हा वृत्तांत संवादात्मक आहे.

मेजर कँडी व इतिहास विषयक पुस्तकांची भाषा.

अद्यापपर्यंत नमूद केलेल्या इतिहासविषयक पुस्तकांखेरीज आणखी अनेक लहानमोठीं याच विषयावरील पुस्तकें या काळांत प्रसिद्ध झालेलीं आढळतात. लेखकांनीं स्वतःच्या हिमतीवर अनेक उपयुक्त शालेय पुस्तकें देशभाषांतून लिहावीं, या हेतूनें त्यांतील प्रत्येक पुस्तकाच्या कांहीं प्रती उत्तेजनार्थ सरकारी विद्याखातें विकत घेत असे. मात्र अशीं पुस्तकें प्रथम मेजर कँडी यांच्याकडे भाषिक तपासणीसाठीं येत असत. मेजर कँडीनीं सुचविलेल्या दुरुस्त्या अमलांत आल्यास, विद्याखात्यातर्फे या पुस्तकांच्या कांहीं प्रती विकत घेतल्या जात. अशा कांहीं इतिहासाच्या पुस्तकांवर मेजर कँडीनीं लिहिलेले टीकालेख सरकारी दप्तरखान्यांत उपलब्ध झाले आहेत. त्यांतील कांहीं येथें मुद्दाम उतरून घेतले आहेत. त्यामागील हेतू हा कीं मेजर कँडी यांनीं शालेय पुस्तकांच्या द्वारा मराठी भाषेला व्याकरणशुद्ध बनवून तिच्या घडणींत कसकसे फेरफार केले, याची कल्पना यावी.

कृष्णाजी प्रभाकर काळे यांच्या 'हिंदुस्थानचा इतिहास' (१८६९) या पुस्तकाबद्दल मेजर कँडी म्हणतातः—

"मुसलमान राज्यांच्या ताब्यांत—the word राज्यांच्या should be राजांच्या. सिंधुनदी should be सिंधु नद. तिचा पराभव होऊन येत असतां मार्गांत त्या फौजेचे हाल होऊन त्यांतील बहुतेक लोक मरण पावले. As फौज is feminine त्यांतील should be तींतील... क्रुर should be क्रूर. ठेऊन should be ठेवून. नितिमान् should be नीतिमान्... या अपराधाबद्दल त्यास फांशी दिला. The last word should be दिलें as the prayog is Bhawi... पाठऊन should be पाठवून." [४६]

रामचंद्र विनायक रणजित यांचा "इंग्लंडाचा प्रश्नोत्तररूप संक्षिप्त इतिहास' (१८७०) या पुस्तकावरील मेजर कँडीची भाषाविषयक टीका अशी होती :—

"पृथ्वीचें राज केलें. In Marathi the word is राज्य, not राज. This error abounds in the book. पुजा should be पूजा....

---

४६ *D. P. I. Government. Vol. 1.* 1871–72. pp. 632. 633.

" मौंश, दुध आणि ओक झाडाचीं फळें. there is no such word as मौंश. I suppose मांस was meant, दुध should be दूध. ती विष खावून मेली. It should be खाऊन instead of खावून. आधिकार should be अधिकार. विशीं should be विषयीं... सर्वस्वि should be सर्वस्वीं... प्रघात घातली should be प्रघात घातला." [४७]

सदोबा भागोबा पवार नामक एका लेखकाचें 'अर्वाचीन बखर' (१८७०) नांवाचें एक पुस्तक मेजर कँडी यांनीं तारीख ३१ जानेवारी, १८६५ रोजीं तपासून त्यावर खालील टीकालेख लिहिला. 'Pinnock's Catechism of Modern History' या इंग्रजी पुस्तकाचें हे भाषांतर असल्यामुळें पुस्तकाच्या नांवावर टीका करतांना मेजर कँडी लिहितात :—

"...History is rendered बखर; but बखर does not express the meaning of history in the phrase 'modern history.' बखर means a written narrative or history in Prakrit prose; but a catechism of modern history is not a catechism of a book, but of events that have occurred in modern times. This misuse of the word बखर vitiates the book throughout.

"The following sentence खीस्ती सनानंतर सुमारें सन ४१० वर्षांनीं is not good Marathi. the use of the word सन before ४१०is wrong. It should be better thus : खीस्ती (or खिस्ती) सन सुरू झाल्यानंतर ४१० वर्षांनीं...

"ते विद्येच्या मोलाविषयीं अज्ञानी. The word मोल is not good here. योग्यता would be better." [४८]

विनायक जनार्दन कीर्तने यांच्या 'मध्य हिंदुस्थानाचा इतिहास' (१८७१) या पुस्तकाची तपासणी करून मेजर कँडीनां आढललेल्या चुकांपैकीं कांहीं खालील-प्रमाणें:—

"हमराह रस्ते. राह and रस्ते are not both wanted. हमराह (or रहा) and हमरस्ता mean the same thing....उन्हाळ्या दिवसांत the word उन्हाळा is not an adjective. It should be उन्हाळ्याच्या दिवसांत..."[४९]

---

४७ *D. P. I. Government, Vol. 1.* 1871-72. pp. 205-206.
४८ *D. P. I. Miscellaneous, Vol. 22.* 1865-66. p. 390.
४९ *D. P. I. Government, Vol. 1.* 1871-72. pp. 347-349.

गोविंद रामकृष्ण फणसळकर कृत 'हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास (१८७१) या पुस्तकावरील टीकालेखांत मेजर कँडी लिहितात :—

"आपल्यास should be आपणांस.

"रजपूत लोक आणि बाबर यांजमध्यें the word यांजमध्यें should be यांच्यामध्यें ...

"अर्काट आणि हैद्राबाद येथील गादीकरितां लढाया चालल्या होत्या. It should be येथील गाद्यांकरितां.

"मसलत चालविली होती त्यांत इंग्लिश मिळाले. As मसलत is feminine, त्यांत should be तींत ...

"स्वातंत्रतेला. There is no such word as स्वातंत्रता. The forms of nouns from स्वतंत्र are स्वतंत्रता and स्वातंत्र्य...." [५०]

व्यंकटेश गोपाळ बेहरे यांचा 'जगाचा संक्षिप्त इतिहास' (१८७१) पाहून मेजर कँडी म्हणतात :—

"मुख्य तीन शाखेविषयीं This is ungrammatical शाखे should be शाखां....

"लिबानन व भूमध्यसमुद्र यांमध्यें तो देश होता. the word यांमध्यें should be यांच्यामध्यें. The meaning of यांमध्यें is in them. यांच्यामध्यें is between them.

"हिंदु महासागर ! the Indian Ocean is called हिंदी महासागर, not हिंदु महासागर...." [५१]

मार्तंड रामचंद्र यांचा 'इंग्लंडचा प्रश्नोत्तर इतिहास' तपासून मेजर कँडी लिहितात :—

"मूर्ती पूजक. This is very bad. The proper form is मूर्ति पूजक.

"प्रज्येनें. This is very bad. The word is प्रजेनें...

"माझ्या देखता should be माझ्या देखतां.

"बातमी कळाली. There is no such word as कळाली. It should be कळली.

"पंडीत, the right word is पंडित. प्रख्यांत should be प्रख्यात. तो फार ढोंग करीत असें. the last word should be असे. मी सुटलो असतो.

---

५० *D. P. I. Government. Vol. 1.* 1871-72. pp. 820-823.

५१ Ibid. pp. 679-681.

should be मी सुटलों असतों. चार लोक गेलें should be चार लोक गेले. म्हेवणा should be मेहुणा....” ५२

‘ कवितारूप मराठ्यांचा संक्षिप्त इतिहास ’ हें विश्वनाथ महादेव गोखले यांचें गद्यपद्य मिश्रित पुस्तक पाहून मे. कँडी लिहितात :—

“I am aware that there are some persons who consider करित and घालित to be more correct than करीत and घालीत.”...५३

वरील उताऱ्यांत ‘some persons’ असे शब्द वापरतांना मेजर कँडी यांच्या मनांत व्याकरणकार दादोबा पांडुरग हे असावे असें वाटतें; कारण दादोबा ‘करित,’ ‘घालित’ इत्यादि धातुसाधित अव्ययांतील उपान्त्य स्वर ऱ्हस्व लिहीत असत. ५४ परंतु मेजर कँडीना तें पसंत नव्हतें. म्हणून त्यांनीं ‘करीत,’ ‘घालीत’ इत्यादि धातुसाधित अव्ययांतील उपान्त्य स्वर दीर्घ लिहिण्याबद्दलची सूचना अनेक वेळां केलेली आढळते. या त्यांच्या दुरुस्तीप्रमाणेंच आज वरीलसारख्या धातुसाधित अव्ययांतील उपान्त्य स्वर दीर्घ करून तीं ‘करीत,’ ‘घालीत’ अशीं लिहिलीं जातात.

मेजर कँडी व मराठी काव्य

वर उल्लेखिलेलें विश्वनाथ महादेव गोखले यांचें ‘कवितारूप मराठ्यांचा संक्षिप्त इतिहास’ हें पुस्तक पाहून मेजर कँडीना असें वाटलें कीं, परशुरामपंत गोडबोले यांच्याकडून असाच एक काव्यरूप इतिहास लिहवून घ्यावा. त्याप्रमाणें त्यांनीं पंताकडून ‘मराठ्यांच्या इतिहासावर लहान मुलांकरितां सोपी कविता’ (१८६४) रचून घेतली. महादेव गोविंद रानडे यांनीं हें पुस्तक तपासलें. कारण कँडीच्या गैरहजिरींत ते १८६६ जून पासून १८६८ च्या एप्रिल पर्यंत काम करीत होते. सहाजिकच गोखले आणि गोडबोले या दोघांच्या पुस्तकांपैकीं तात्यांच्या पुस्तकाला मान्यता मिळाली. ५५ इ. स. १८६३ मध्यें गोखले यांनीं ‘हिंदुस्थानाचा इतिहास’ कवितारूपानें रचून तो मेजर कँडी यांच्याकडे पाठविला. तें पुस्तक पाहून मेजर कँडी म्हणतात:—

“The author like most other Marathi versifiers has no hesitation in lengthening a short vowel or shortening a long vowel where his verse requires it. I hope that this slovenly mode of composition will soon be discarded, and that poetry will be carefully written, as regards orthography, as prose.” ५६

---

५२ *D. P. I. Government, Vol. 1.* 1871–72. PP. 324 – 328.
५३ *D. P. I. Miscellaneous, Vol. 17.* 1862—63. P. 233.
५४ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण**, आ. ३. १८५७. पृ. १७८.
५५ *D. P. I. Miscellaneous, Vol. 17.* 1862–63. PP. 235–37.
५६ *D. P. I. Miscellaneous, Vol. 19.* 1863–64. P. 253.

कवि निरंकुश असावा ही कल्पना मेजर कँडीना न पटल्यामुळें त्यांनीं वरील विचार मांडलेले आढळतात. तसें पाहिलें तर संस्कृतमधून आलेल्या वृत्तांमध्यें ऱ्हस्वाचें दीर्घ किंवा दीर्घाचें ऱ्हस्व लिहिण्याचें स्वातंत्र्य वामन मुक्तेश्वरादि कवि घेत असत. रघुनाथ पंडित अगर मोरोपंत हे मात्र मुळास धरून राहात असलेले दिसतात.

इतिहास पुस्तकांच्याद्वारा मराठी भाषेचा अभ्यास

मेजर कँडी यांनीं इतिहासावरील शालेय पुस्तकांची भाषिक तपासणी करून लिहिलेले जे टीकालेख सरकारी दप्तरखान्यांत उपलब्ध झाले, त्यांतील कांहीं लेखांतलि उतारे वर दिले आहेत. ते बारकाईनें अभ्यासिल्यावर संस्कृत शब्द मुळांत आहेत तसे लिहिण्याचें धोरण, वाक्यांतील शब्दांचा लिंगवचनाप्रमाणें उपयोग करणें, मराठी भाषेची लेखनपद्धति निश्चित करण्यासाठीं ऱ्हस्वदीर्घांची बारकाईनें दुरुस्ती करणें, प्रयोगरचना ठरविल्याप्रमाणें नसल्यास ती सुधारणें, थोडक्यांत, मुलांच्या हातीं कोणतेंहि पुस्तक जाण्याच्या अगोदर तें व्याकरणशुद्ध असणें, या गोष्टी कटाक्षानें अमलांत आणण्याचा प्रयत्न सरकारी विद्याखात्यानें मेजर कँडीच्या मार्फत केलेला दिसेल. जरी हीं सर्व पुस्तकें प्रत्यक्ष शाळांमधून नेमिलीं गेलीं नव्हतीं, तरी तत्कालीन सरकारी धोरणानुसार, मेजर कँडी यांच्या म्हणण्याप्रमाणें तीं भाषेच्या दृष्टीनें दुरुस्त झाल्यावर खासगी लेखनाला उत्तेजन म्हणून उपयुक्त पुस्तकांच्या कांहीं प्रती विद्याखातें घेत असे व तीं मुलांच्या वाचनालयासाठीं म्हणून मंजुर केलीं जात. इतिहासासारखा विषय असला तरी सुद्धां मुलांच्या हातीं या विषयावरील पुस्तकें देतांना तीं व्याकरणशुद्ध असावीं, असें सरकारी विद्याखात्याचें धोरण होतें. या धोरणामुळेंच मराठी भाषेला आजचें स्वरूप आलें असें म्हणावयास हरकत नाहीं.

रेवरेंड मरे मिचेल यानें पुणें कॉलेजमधील मराठी भाषेच्या वर्गाची तपासणी करून, तारीख १३ जानेवारी, १८५७ रोजीं लिहिलेल्या एका निवेदनांत, शालेय पुस्तकांबद्दल जे विचार व्यक्त केले आहेत ते फार महत्त्वाचे वाटतात. मिचेल लिहितो :–

"A question of considerable interest presented itself soon after I began to visit the Poona College. In our teaching Marathi, shall we teach the language simply? or shall we attempt at the same time to convey other knowledge? Here for example, is a Marathi work on History, read by a class not very far advanced. Clearly in the hands of the teacher, the

book becomes a medium of teaching the facts of History, not the structure of the language. I found this kind of thing exceedingly common. So common that when I pointed out the mistake, it was difficult to convince the teachers that in this case style should take precedence of subject. I very decidedly think that those branches of study which will afterwards be mastered in English need not be prosecuted far in Marathi, and that in the Marathi classes, it should never be forgotten that the study of the language is the great thing to be aimed at. Accordingly, on this principle, our reading books have been selected. In the higher classes, scientific and philosophical works have been introduced, but still not for the purpose of teaching science and philosophy so much as for that of familiarizing them with the terms used in science and philosophy. Of course we do not exclude the teaching of the subject–we ony subordinate it to the other object, in classes which are distinctively classes for the study of Marathi". [५९]

L०५२

सुमारें शंभर वर्षांपूर्वीचे हे विचार आज पटण्यासारखे नसले तरी, त्या काळाच्या धोरणानुसार कोणत्याहि विषयावरील पुस्तक अभ्यासितांना तें भाषेच्या दृष्टीनें अभ्यासिलें जाणें साहजिक होतें; कारण भाषेच्या अभ्यासाला प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांनीं ठरलेल्या भाषासरणीचा व लेखनपद्धतीचा अभ्यास करून त्याप्रमाणें लिहावें या धोरणाचा अवलंब केला जात होता. यामुळेंच शालेय पुस्तकांच्याद्वारा आज मराठी भाषेला कांहीं प्रमाणांत निश्चित स्वरूप आलें आहे असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं.

---

[५९] *D. P. I. Poona College, Vol. 9.* 1857. (No paging.)

प्रकरण चौदावें.

भूगोल खगोल

भूगोलविषयक अज्ञान

पेशवाईत, तत्कालीन राज्यकर्त्यांना भौगोलिक ज्ञान–विशेषतः हिंदुस्थानाबद्दल असणें शक्य आहे. सवाई माधवरावाला शास्त्रीय पद्धतीनें भूगोलाचें शिक्षण मिळालें होतें. डॉक्टर फिंडले नामक एक युरोपिअन त्याला भूगोल शिकवित असे; परंतु सर्वसाधारणपणें लोकांच्या कल्पना, पृथ्वी शेषाच्या मस्तकावर आहे, खंडें नऊ आहेत, समुद्र सात आहेत, अशाच होत्या.

शाळा पुस्तक मंडळीचें धोरण

लोकांमध्यें रूढ असलेल्या पुराणमतवादी भौगोलिक व खगोलविषयक कल्पना नाहींशा करून, भूगोलखगोलाची शास्त्रशुद्ध माहिती त्यांच्यापुढें ठेवण्याचें मुंबईच्या शाळापुस्तकमंडळीनें ठरविलें. या नवीन कल्पनांचा प्रसार करण्यास शालेय पुस्तकां–व्यतिरिक्त दुसरें कोणतेंच साधन परिणामकारक ठरणार नाहीं असें पाहून, त्यावेळीं तयार होणाऱ्या शालेय पुस्तकांत भूगोलविषयक पुस्तकें रचण्याचें ठरलें. शिक्षामंडळीची पुस्तकसमिति अशा ग्रंथांच्या स्वरूपाद्दल लिहितेः—

"A treatise on geography, in this it is indispensible to describe Hindoostan and the adjacent countries particularly, and England as intimately connected with it.

"A short but prespicuous account of the solar system preceeded by such a succinct description of the laws of motion, attraction and gravity, as are necessary to render the system plain and intelligible, to this might be added a comparison of their own system."[१]

जुन्या रूढ कल्पना घालविण्यासाठीं लोकांचीं मनें दुखविण्याचें कठीण काम शाळापुस्तक मंडळीला करावयाचें होतें; पण ती जबाबदारी अशा नाजूक रीतीनें पार पाडावयाची होती कीं, लोकांना धक्का न देतां जुन्या कल्पना उखडून त्याठिकाणीं नवीन शास्त्रीय कल्पनांचें बीजारोपण व्हावें. यामुळेंच कीं काय शाळापुस्तकमंडळीनें पहिलीं कांही वर्षें या बाबतींत मुग्धताच स्वीकारली. तसें पाहिलें तर, इ. स. १८४०

---

१ *G. D. Vol. 63.* 1824. p. 112.

पर्यंत या विषयाकडे जेवढें लक्ष शाळापुस्तकमंडळीनें द्यावयाला पाहिजे होतें तेवढें दिलेलें दिसत नाहीं. मेजर कँडी आपल्या एका निवेदनांत लिहितात कीं, आपण शाळा तपासण्याचें काम हातीं घेतल्यापासूनच या विषयाच्या पद्धतशीर अभ्यासाला सुरवात झाली. जेथें शाळांतील शिक्षकांनाच या विषयाचा गंध नाहीं, तेथें मुलांना ते काय ज्ञान देऊं शकणार असाहि शेरा या निवेदनांत त्यांनीं मारला. [२]

भूगोलखगोलविषयक लोकांचें अज्ञान व नवीन शास्त्रीय कल्पना उचलण्याबद्दलची अनास्था बराच कालपर्यंत दिसून येते. इ. स. १८४६ मध्यें प्रो० ग्रीन यांनीं गुजरात विभागांतील शाळांच्या परीक्षा घेतल्या, त्यावेळीं त्यांना आलेले विचित्र अनुभव त्यांनीं एका निवेदनांत मांडले आहेत. [३]

गुजरातमधील भूगोलखगोलविषयक अनास्था महाराष्ट्रांतहि दिसते. दादोबा पांडुरंग शाळा तपासण्याचें काम करीत असतां इ. स. १८४९ मध्यें लिहिलेल्या एका अहवालांत शिक्षकांच्या भूगोलज्ञानाबद्दल ते म्हणतात :—

"It is a lamentable fact to notice that a considerable number may still be found among them who can not yet bring their consciences to believe that the earth is not placed on one of the heads of the great serpent, and that there might not yet be discovered, in some parts of it which have not yet been explored by European navigators, oceans of milk and curd. But, in spite of all these drawbacks, I have strong reason to believe that the knowledge is surely making its way, though slowly, but steadily."[४]

---

२ *G. D. Vol. 530.* 1840. p. 196.
३ *Report of the Board of Education.* 1847. pp. 47–48.
४ *Report of the Board of Education.* 1851. p. 23.

भूगोल आणि खगोल इत्यादिविषयक संवाद

तसें पाहिलें तर शाळापुस्तक मंडळीतर्फे इ. स. १८३२ मध्येंच 'भूगोल आणि खगोल इत्यादिविषयक संवाद' हें पुस्तक प्रसिद्ध झालें होतें. मंडळीच्या मुंबईमधील इंग्रजी शाळेंतील एक शिक्षक मि. मेनवेअरिंग आणि मंडळीच्या पदरीं असलेल्या शास्त्र्यांपैकीं एक व मंडळीच्या मराठी शाळांचे पहिले तपासनीस रामचंद्रशास्त्री जन्हवेकर या दोघांनीं मिळून हे संवाद तयार केले होते.

वरील पुस्तकावर लेखकांचीं नांवें छापलेलीं नाहींत. तथापि कँडीनीं लिहिलेल्या एका निवेदनांत तीं दिलेलीं आहेत. [५] शालेय पुस्तकें तयार करतांना बंगाली भाषेंतील कांहीं पुस्तकांचा उपयोग केल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. 'भूगोल आणि खगोल इत्यादिविषयक संवाद' या पुस्तकाच्या अंतरंगावरून तें कलकत्ता स्कूलबुक सोसायटी-तर्फे प्रसिद्ध झालेल्या या विषयावरील पुस्तकावरून तयार केल्याचें स्पष्ट दिसतें. [६] या पुस्तकांत डाव्या बाजूला इंग्रजी व उजव्या बाजूस बंगाली अशा पद्धतीनें मजकूर छापलेला आहे. या ग्रंथाचें मराठी भाषांतर आंधळेपणानें न करतां आवश्यक त्या ठिकाणीं फेरबदल केलेले आढळतात. उदाहरणार्थ, मूळ पुस्तकांतील बंगाल प्रांतांतील जिल्ह्यांच्या माहितीचीं प्रकरणें या पुस्तकांत गाळलेलीं आहेत, महासागरांची माहिती देतांना मूळ पुस्तकांत तीनच नांवें दिलीं आहेत, त्याऐवजीं या ठिकाणीं पांच नांवें घातलीं आहेत, एकाच वेळीं दोन ठिकाणीं किती वाजले हें समजावून सांगतांना मूळ पुस्तकांत लंडन–कलकत्ता हीं शहरें होतीं, तर या पुस्तकांत लंडन–मुंबई अशी जोडी आहे. यापेक्षांहि जे महत्त्वाचे फेरफार केले गेले ते मराठी वाचकांच्या भावना दुखवल्या जाऊं नयेत या हेतूनें केलेले दिसतात. उदाहरणार्थ मूळ पुस्तकांत खाऱ्या पाण्याबद्दल सांगतांना अंड्यांचा एक प्रयोग दिलेला आहे तो असाः—

"Throw an egg into fresh water, and it will go to the bottom, but if you mix the water with salt, it will swim." [७]

या प्रयोगाचें मराठीकरण झालें नाहीं! तसेंच दुसऱ्या एका ठिकाणीं 'इंग्लंड देशाचें विवरण' करीत असतांना इंग्लडची मूळची रानटी स्थिति व नंतर झालेली सुधारणा यांबद्दल चर्चा करतांना या फरकाला कारण ईश्वर आहे ही गोष्ट मराठी पुस्तकांत मान्य केलेली आहे; पण जेथें बायबलचा नामोल्लेख आहे त्या एका वाक्याला फांटा दिला

---

५ *G. D. Vol. 530.* 1840. p. 196.

६ भूगोल एवं ज्योतिष इत्यादिविषयक कथोपकथन. आ. २. १८२७.

७ तत्रैव. पृ. १६.

आहे. बायबलचें नांव जरी शालेय पुस्तकांत आलें तरी लोक बुजतील या कल्पनेनेंच हें वाक्य सहेतुकपणें मराठी पुस्तकांतून गाळलें गेलें. तसेंच 'डूम्स् डे' ची मूळ पुस्तकांतील (पृ. २८०) कल्पना टाळली गेली आहे. एवढ्या बारकाईनें खिस्ती धर्मासंबंधीं असलेले उल्लेख मराठी भाषांतरांत न येण्याची खबरदारी भाषांतरकारांनीं घेतलेली आहे. या पुस्तकाच्या पहिल्या भागांत भूगोलाचें नैसर्गिक वर्णन असून, दुसऱ्या भागांत पृथ्वीच्या सर्व खंडांची व खंडविभागांची माहिती आहे. तिसऱ्या भागांत खगोलविषयक वर्णन आलें आहे. इंग्रजींतिल 'इंडिया' हा शब्द न वापरतां 'हिंदुस्थान' असा शब्दप्रयोग केलेला आढळतो. तसेंच 'इंदियन् महासागर' म्हणजे 'हिंदु महासागर' असें म्हटलें आहे. 'गोलज्ञ' (पृ. १२७)– geographers, 'चुंबक शलाका' (पृ. १५१) - magnetic needle, 'घूर्णवात' (पृ. १४७)– water–spout, 'भद्राश भूशलाका' (पृ. १९)– Cape of Good Hope, 'श्रीहट' (Sylhet) इत्यादि शब्द नजरेंत भरण्यासारखे वाटतात. तत्कालीन शालेय पुस्तकें बहुतेक संवादरूपानें लिहिलेलीं असल्यामुळें या पुस्तकांत 'नित्यानंद आणि परमानंद या दोघांचा संवाद' आहे. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें खालील शब्दांत ईशस्तुति करून पुस्तकाचा शेवट केलेला आहे:—

"अरे नित्यानंदा, त्याचे दयेचें वर्णन तर काय करावें! जर प्रजा राजाच्या सर्व आज्ञा मानीत असून राजा त्यांचे कल्याणाविषयीं यत्न करीत असला, तर आपण ह्मणतो कीं राजा फार दयालु आहे; परंतु पहा कीं, मनुष्यें ईश्वराचे आज्ञांचा सर्वदां अवमान करीत असतां तो त्यांचे शरीरोपजीविकेचा निर्वाह चालवितो; निर्वाहच नाहीं, तर आपले पातकांचें शासन करण्याविषयीं फार क्षमा करितो; सारांश ऐहलौकिक आणि पारलौकिक सुखाचा मार्ग आपणास तो प्रत्यक्ष दाखवितो. आणखी क्षणभर विचार कर बरें कीं ईश्वरापेक्षां आपण किती तुच्छ आहों! आणि त्याशीं सारखें करून पाहिलें असतां केवळ अभावापेक्षांही कमी भरूं! ईश्वराचे दृष्टीनें सर्व गोल केवळ परमाणुरूप होय, त्यापुढें आपली कथा काय! असें असतां तो आपलें इतकें कल्याण करितो, हें पाहून मनास विस्मय वाटूं नये बरें?" [८]

भूगोल खगोल वर्णनाशिवाय मुसलमानी व इंग्रजी अमलाचा त्रोटक इतिहासहि या पुस्तकांत दिलेला आहे.

---

८ **भूगोल आणि खगोल इत्यादिविषयक संवाद**. आ. २. १८४१. पृ. १५९-१६०

मराठी नकाशाचें पुस्तक

भूगोल खगोलविषयक नवीन कल्पना देणारें वरील पुस्तक इ. स. १८३२ मध्यें प्रथम प्रसिद्ध झाल्यावर, जगांतील सर्व देशांची कल्पना देणारें असें नकाशाचें एकादें पुस्तक तयार होणें आवश्यक होतें. ही उणीव बिनसरकारी प्रयत्नानें भरून निघाली. दादोबा पांडुरंग आणि नाना नारायण या दोघांनीं मिळून इ. स. १८३६ मध्यें 'मराठी नकाशाचें पुस्तक' प्रसिद्ध केलें. शाळापुस्तकमंडळीतर्फे हें पुस्तक तयार झालेलें नसल्यामुळें ग्रंथकर्त्यांनीं सरकारी मदतीसाठीं विनंति केली. सरकारनें पुस्तक पहावयास पाठविण्याबद्दल कळविलें, परंतु अद्यापि तें तयार नसल्याचें त्यांनीं लिहिलें, व सुमारें तीन महिन्यांनीं नमुन्यादाखल जगाचा एक व युरोपचा एक असे दोन नकाशे तपासणीसाठीं सरकारकडे पाठवून दिले. नकाशांची माहिती असलेली त्यावेळची व्यक्ति म्हणजे गणितशास्त्रावरील पुस्तकें मराठींत आणणारे जॉर्ज जर्विस यांचे बंधु टॉमस जर्विस हे होते. स्थापत्यशास्त्रज्ञ म्हणून ते प्रसिद्ध होते. त्यांनीं अनुकूल मत दिल्यामुळें हें नकाशाचें पुस्तक छापलें गेलें. पृथ्वी, एशिया, युरोप, आफ्रिका, उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, हिंदुस्थान, महाराष्ट्र देश, आणि ग्रेटब्रिटन असे नऊ नकाशे या पुस्तकांत असल्यामुळें 'नाइन् मॅप्स्' या नांवानें तें त्याकाळीं ओळखलें जात असे. 'या देशांत हा केवळ पहिला उद्योग आहे म्हणोन जरी त्यांत कांहीं दोष आढळले तरी विशेष आश्चर्य मानाया जोगी गोष्ट नाहीं,' [९] अशी सूचना ग्रंथकर्त्यांनीं दिली आहे.

यावेळीं भूगोलाची माहिती देणारें नकाशांचें हें एकच पुस्तक होतें. परंतु तें सदोष वाटल्यामुळें पुन्हां त्याची दुरुस्त कलली नवीन आवृत्ति काढण्याबद्दल बाळ शास्त्री जांभेकर यांनीं तारीख १४ मार्च, १८४२ रोजीं ग्रंथकर्त्यांना सूचना केली. कांहीं काळपर्यंत या सूचनेचा उपयोग झाला नाहीं. म्हणून स्वतः बाळशास्त्र्यांनीं नकाशांचें एक पुस्तक तयार करावयाचें ठरविलें व त्याप्रमाणें एकदोन नकाशे तयारहि केले. दुर्दैवानें त्यांच्या मृत्यूमुळें हें काम अपुरें राहिलें. बाळशास्त्र्यांनीं केलेल्या नकाशांचा आदर्श ठेवून, दादोबांनीं नवीन नकाशे तयार करावयाचें ठरविलें व त्याप्रमाणें शिक्षामंडळीकडे तारीख २१ ऑक्टोबर, १८४७ रोजीं अर्ज केला. ज्यावेळीं इ. स. १८३६ मध्यें प्रथमच 'मराठी नकाशाचें पुस्तक' तयार झालें होतें, त्यावेळीं मेजर कॅंडी यांच्या नजरेखालून तें गेलें नव्हतें; पण आतां ते मराठी ट्रान्स्लेटर असल्यामुळें त्यांनीं तें तपासणें आवश्यक होतें. मेजर कॅंडीनीं या पुस्तकावर लिहिलेली टीका पाहिली कीं नकाशांचें पुस्तकहि ते किती बारकाईनें तपासत असत याची कल्पना येते. त्यांच्या टीकालेखांतील खालील उतारे पहा :—

---

[९] दादोबा पांडुरंग, **मराठी नकाशाचें पुस्तक**. १८३६. प्रस्तावना.

"There is a want of uniformity in spelling of words. For instance, Ireland is sometimes spelt अयर्लंड and sometimes ऐर्लंड. Then the land of England,, Ireland, Iceland, etc. is usually लंड, but sometimes लांड. Irish is spelt ऐरिश, which is not in keeping with अयर्लंड.

"There is no system of nomenclature. Sometimes the English word is half translated, and sometimes kept untranslated. Sometimes it is written according to the pronunciation and sometimes according to the English spelling. For instance, New Holland is नवें होलंड, the 'new' being translated, but Newport is न्यूपोर्ट, without a translation of the 'new'. In New York, and New South Wales, the 'new' is translated, but in Northhampton, Southhampton, etc. 'north' and 'south' are not translated. In New South Wales, the 'south' is translated as well as the 'new'. In Little Hampton, (लहान हमटन) again the 'little' is translated, and in Long Island, 'long' is translated (लांब बेट). Again in East Lavington (पूर्व लाविंगटन) the 'east' is translated. In short there seems to be no system according to which words are translated or retained untranslated. ...The compiler of the maps, or his assistant, has manifested ignorance of the English language. I have noticed two or three places where the word किनारा is used for 'sand bank', but it has no such meaning. Probably on the English maps from which these were copied the word was 'bank', instead of 'sand bank', but Dadoba Pandoorang should know that it means a sand bank. किनारा means 'brim, brink, edge or margin', and therefore is absurd as a rendering for 'sand bank', which should be rendered भाट किनारा and used also for 'coast', but by itself it scarcely suits. मलबारचा किनारा means 'the brink of Malbar' and the mind must supply some words before what is meant by 'The Malbar Coast' can be apprehended."[१०]

---

१० *D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1847. pp. 369–371.

वर दर्शविल्याप्रमाणें मेजर कँडीनीं दादोबांना कांहीं सूचना दिल्या. त्याबरोबर प्रत्येक नकाशा व त्यावरील स्थळें यांची बारकाईनें तपासणी करून आढळलेल्या चुकांची लांबलचक यादी त्यांनीं तयार करून दादोबांकडे पाठवून दिली. नकाशावरील स्थळें एकाच लेखनपद्धतीनें लिहिलीं जावींत हा त्यांचा मुख्य मुद्दा होता.

या सूचनांचा विचार होऊन इ. स. १८४७ मध्यें 'मराठी नकाशाचें पुस्तक' पुन्हां छापलें गेलें. पुढें तारीख ४ जून १८५१ रोजीं शिक्षामंडळीनें दादोबांकडे डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीनें तयार केलेली Hints for Translators' ही पुस्तिका पाठवून दिली व तिचा उपयोग करून वरील नकाशांचें पुस्तक पुन्हां छापावें असें कळविल्याची नोंद सरकारी दप्तरांत आढळते.[११] पण त्याप्रमाणें पुढील आवृत्ति निघाल्याचें दिसत नाहीं.

बाळशास्त्री जांभेकरकृत 'भूगोल विद्या'

यावेळीं 'भूगोल खगोल,' 'भूगोल विद्या' आणि 'भूगोल शास्त्र' हीं तीन पुस्तकें वापरांत होतीं. यापैकीं पहिलें पुस्तक वर निर्देशिलेलें, 'भूगोल आणि खगोल इत्यादि विषयक संवाद,' (१८३२) हें होय. दुसरें 'भूगोल विद्या.' या पुस्तकाच्या इ. स. १८३६ च्या उपलब्ध प्रतीवर आवृत्ति अगर लेखक यांचा नामनिर्देश आढळत नाहीं. सर्वसाधारण समजुतीप्रमाणें बाळशास्त्री जांभेकर यांच्या नांवावर हें पुस्तक जमा केलें जातें. या पुस्तकाच्या पुढील आवृत्त्यांवरून तें बाळशास्त्रीकृत असावें असें म्हणावयास हरकत नाहीं. या पुस्तकाची 'नवीन आवृत्ति' म्हणून इ. स. १८४९ मध्यें 'मेजर क्यांडी...यांनीं शोधिलेली' पहावयास मिळते पण या आवृत्तीवर लेखकाचें नांव छापलेलें नाहीं; परंतु त्या अगोदरची इ. स. १८४६ मध्यें छापलेली जी आवृत्ति उपलब्ध झाली, तीवर 'भूगोल विद्या, प्रथम पुस्तक, सरकारी मराठी शाळांकरितां बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांणीं केलें. दुसरी आवृत्ति तपासून शुद्ध केली, ती बोर्ड आफ् इज्युकेशन यांचे आज्ञेवरून छापली,' असें म्हटलेलें आढळतें. यावरून असें दिसतें कीं, इ. स. १८३६ च्या आवृत्तीनंतर दहा वर्षांनीं या छत्तीस पानी पुस्तिकेची दुसरी आवृत्ति छापली गेली. दुसऱ्या एका प्रतीवर, 'भूगोल विद्या, प्रथम पुस्तक, बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांणीं केलें. तें पुणें पेठ बुधवार येथें गंगाधर गोविंद सापकर यांणीं आपले ज्ञानचक्षु छापखान्यांत छापिलें. आवृत्ति दुसरी, सन १८६७ इसवी,' असें छापिलेलें आढळतें. जरी या प्रतीवर 'आवृत्ति दुसरी' असें म्हटलें आहे, तरी ती दुसरी निश्चित नव्हे. इ. स. १८४६ च्या आवृत्तीबरहुकूम 'ज्ञानचक्षु'कारांनीं

११ *D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1851. p. 292.

इ. स. १८६७ मध्यें आणखी एक आवृत्ति काढली एवढेंच म्हणतां येईल, कारण या दोन्ही आवृत्तींच्या प्रतींत कानामात्रेचाहि फरक केलेला दिसत नाहीं. वरील इ. स. १८४६ च्या प्रतीवरून असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, ही 'भूगोल विद्या' बाळशास्त्री जांभेकरकृतच आहे. बाळशास्त्री जांभेकर यांचे चरित्रकार गणेश गंगाधर जांभेकर यांनीं आपल्या 'बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर (१८१२-१८४६) यांचें जीवन वृत्त व लेखसंग्रह' या शताब्दि-स्मारक ग्रंथाच्या तिसऱ्या खंडांत पृ. ६२५-६२६ वर भूगोल विद्येच्या कर्तृत्वाबद्दल चर्चा करून हें पुस्तक बाळशास्त्री जांभेकर यांचें नसावें असा निष्कर्ष काढिला आहे. यासाठीं त्यांनीं दिलेला आधार म्हणजे 'बोर्ड ऑफ एज्युकेशन'च्या पहिल्या वार्षिक इतिवृत्तांतील (१८४०-४१) 'Bhoogole Vidyah, or A Little Geography, by Vishnoo Shastree' ही नोंद होय; परंतु इ. स. १८४६ च्या उपलब्ध झालेल्या 'भूगोल विद्ये'च्या प्रतीवर 'Outlines of Geography' असें म्हटलेलें आहे. 'A Little Geography' आणि 'Outlines of Geography' हीं दोनही पुस्तकें एकच असणें असंभवनीय आहे. त्यामुळें निःसंदिग्धपणें असें मानावयास प्रत्यवाय नाहीं कीं, 'भूगोल विद्या' या पुस्तकाच्या इ. स. १८३६ च्या प्रतीवर जरी बाळशास्त्र्यांचें नांव नसलें तरी पुढील आवृत्त्यांवरून तें त्यांचेंच असलें पाहिजे.

या पुस्तकाच्या अंतरंगाकडे पाहिलें कीं, तें संवादात्मक न लिहितां वर्णनात्मक लिहिलेलें आढळतें. आठ प्रकरणांत सर्व जगाची थोडक्यांत माहिती दिलेली आहे.

बाळशास्त्र्यांच्या पुस्तकांत 'व्यास ह्मणजे गर्भसूत्र' [१२] असें आहे, पण रामचंद्र-शास्त्री आपल्या 'भूगोल आणि खगोल इत्यादिविषयक संवादां' त 'व्यास ह्मणजे उदर सूत्र' [१३] म्हणतात. अशाप्रकारचे कांहीं फरक या दोन पुस्तकांत आढळतात.

भूगोलशास्त्र गणितभाग

तत्कालीन शालेय भूगोलविषयक पुस्तकांपैकीं आणखी एक पुस्तक 'भूगोलशास्त्र-गणितभाग' (१८३६) हें होय. बाळशास्त्री जांभेकरानीं या पुस्तकाबद्दल सरकारकडे केलेला विनंतिअर्ज आणि पुस्तकावर सरकारी अधिकाऱ्यांनीं व्यक्त केलेलीं मतें याबद्दलचे कागदपत्र सरकारी दप्तरांत उपलब्ध आहेत. त्यावरून या पुस्तकामागील भूमिका स्पष्ट होते व हें पुस्तक तयार करतांना बाळशास्त्र्यांबरोबरच ले. शॉर्टरीड नामक एका युरोपिअन माणसाचें किती अंग होतें याची कल्पना येते.

---

१२ बाळशास्त्री जांभेकर, **भूगोलविद्या**. आ. २. १८४६. पृ. ३३.

१३ **भूगोल आणि खगोल इत्यादिविषयक संवाद**. आ. २. १८४१. पृ. ५.

बाळशास्त्र्यांनीं या पुस्तकासाठीं मदत मिळावी म्हणून सरकारकडे विनंतिअर्ज केला. या अर्जाचा विचार सरकारनें सहानुभूतिपूर्वक करावयाचें ठरविलें कारण पुस्तक फार उपयुक्त होतें. परंतु त्यांतील शास्त्रीय विधानांबद्दल सरकारला खात्री वाटत नव्हती. त्यामुळें या पुस्तकाची कांहीं तज्ज्ञांकडून तपासणी करून घेण्याचें सरकारनें ठरविलें. या तज्ज्ञांपैकीं कोशकार मोल्स्वर्थ हा एक होता. परंतु मोल्स्वर्थनें या विषयाबद्दलचें आपलें अज्ञान प्रांजलपणें व्यक्त करून पुस्तक-तपासणीसाठीं ले. शॉर्टरीड व कॅ. जर्विस यांचीं नांवें सुचविलीं. शॉर्टरीडनें पुस्तकावरील आपला अभिप्राय सरकारला कळविला. त्यांत त्यानें पुस्तकांतील कांहीं चुकीचे पारिभाषिक शब्द, मुळांतील कांहीं वगळलेला भाग इत्यादि बाबतींत करावयाच्या सुधारणाहि सुचविल्या. तसेंच भास्कराचार्यांचा सिद्धांत खोडून काढण्याबद्दलचा भाग त्यानें स्वतः लिहून हें दुरुस्त्या सुचविलेलें पुस्तक बाळशास्त्र्यांकडे पाठवून दिलें. आवश्यक ते फेरफार करून बाळशास्त्र्यांनीं पुनः तें पुस्तक शॉर्टरीडकडे अभिप्रायार्थ पाठविलें. [१४]

'भूगोलशास्त्र–गणितभाग' या पुस्तकाच्या रचनेंत बाळशास्त्री जांभेकरांबरोबर शॉर्टरीडचा हात असल्याचा आणखी पुरावा द्यावयाचा तर, सरकारचा तत्कालीन मुख्य सेक्रेटरी वॉथेन याचें म्हणणें पाहावें लागेल. तो म्हणतोः–

"Much of it is also the contribution or the suggestion of that talented officer Lt. Shortrede–indeed I believe the exposure of the errors of Bhaskaracharya's system is entirely the work of that able and talented officer. I need only say that this treatise is calculated to do infinite good in exposing error and will be eagerly read, as the Hindoos especially Brahmins are fond of disputing on the subject of astronomy."[१५]

बाळशास्त्री जांभेकर व ले. शॉर्टरीड या दोघांनीं रचलेल्या 'भूगोलशास्त्र गणितभाग' या पुस्तकाच्या शंभर प्रती सरकारनें विकत घेतल्या.

या पुस्तकांत भूगोल विषयाची शास्त्रीय चर्चा करून लोकांच्या जुन्या कल्पना कशा चुकीच्या आहेत तें सिद्ध केलेलें आहे. अक्षांशरेखांश, काळमानाची रीत, नक्षत्रमान, दृश्यसौरमान, मध्यमसौरमान, पृथ्वीचा आकार, ध्रुवोत्सारप्रेरणा इत्यादि विषयांची माहिती या पुस्तकांत आलेली आहे. याच ग्रंथांत जो 'भास्कराचार्यांच्या

---

१४ *G. D. Vol.* $\frac{44}{414}$ 1837. pp. 15-16.

१५ *Ibid.* p. 12.

ताचा विचार ' केलेला आहे तो पाहिला कीं जुन्या, भोळसट, अशास्त्रीय कल्पनांचा स्फोट करण्याचा लेखकाचा उद्देश कसा काय सफल झाला आहे याची कल्पना येते. जुन्या समजुतींचें वर्णन असें केलें आहेः—

" पृथ्वीवर कोठें दुग्ध समुद्र, दधि समुद्र, घृत समुद्र, इक्षुरस समुद्र, मधु समुद्र किंवा शुद्धोदक समुद्र यांतून एकही आढळत नाहीं, कित्येक स्थळीं गोड पाण्याचीं मोठमोठीं (चाळीस पन्नास कोश लांबीचीं) सरोवरें आहेत, ज्यांच्या सभोवताली चारही बाजूनीं भूमी, व अशींच कितेक क्षार पाण्याचींही आहेत, परंतु जेथें जावें तेथें समुद्राचें उदक खारें आढळतें, शाक, शाल्मल इत्यादिक दक्षि-णार्धांतील साहा द्वीपेंही कोठें आतां दृष्टीस पडत नाहींत. दक्षिण समुद्राजवळ १२ य जनें पर्यंत वडवानळ आहे असें जें लिहिलें आहे त्याचा कधीं प्रत्यय येणार नाहीं, कारण अतिशय थंडीमुळें तेथें पाणी गोठतें त्यामुळें दक्षिण ध्रुवापासून सुमारें २० अंशांच्या आंत गमन होणें परम अशक्य आहे. ... जंबूद्वीपामध्यें नव खंडें आणि देशसंस्था लिहिली ती प्रत्यक्षास केवळ विरुद्ध आहे. मुंबईमध्यें काबुल, कंदहार, इराण, तुर्कस्तान, तार्तरी, रशिया, चीन, इत्यादि सर्व देशचे लोक आहेत त्यांतून कोणी तशी देशसंस्था । ि ली नाहीं. आणि भास्कराचार्यांनीं सर्व देशसंस्था लिहून हें सर्व पुरा-णाश्रित म्हणोन लिहिलें, यावरून याविषयीं त्यांची ही अश्रद्धा भासती." १६

भूगोल ि नवीं पुस्तक

वर उल्लेखिलेल्या 'भूगाल आणि खगोल इत्यादिविषयक संवाद' (१८३२) 'भूगोल विद्या' (१८३६) आणि 'भूगोलशास्त्र-गणितभाग' (१८३६) या तीन पुस्तकांचा अभ्यास, मेजर कँडीनीं स्वतः लिहिलेलीं भूगोलविषयक पुस्तकें उपयोगांत येईपर्यंत, शाळांमधून चालत असे. कँडी यांना ते शाळा तपासनीस असतांना जे अनुभव आले त्यांवरून, या विषयाचा अभ्यास जास्त शास्त्रशुद्ध पायावर व्हावा असें त्यांना वाटूं लागलें. पुष्कळ ठिकाणीं वरील पुस्तकें मुलें तोंडपाठ करतात असेंहि त्यांच्या प्रत्ययास आलें. खुद्द शिक्षकांचेंहि या विषयाचें अज्ञान पाहून ते रागावत असत त्यामुळ भूगालाचें एकादें चांगलें पुस्तक भाषांतरित करवून घेण्याचें त्यांनीं ठरविलें. या प्रयत्नांमुळें महादेवशास्त्री पुराणिक यांच्याकडून 'Sulivan's Geography Generalized' या पुस्तकाचें 'भूगोल खगोल म्हणजे भूगोलविद्येचीं आणि खगोल

---

१६ **भूगोलशास्त्र-गणितभाग**. १८३६. पृ. १०९-११०.

विद्येचीं मूलतत्त्वें' (१८५४) नामक भाषांतर तयार झालें. भाषांतराचें काम पूर्ण झाल्यावर महादेव शास्त्र्यांची पुण्याहून कराची येथें बदली झाल्यामुळें, तें तपासून छापविण्याचें काम मेजर कँडी यांनीं केलें. या पुस्तकाच्या भाषेबद्दल लिहितांना ते म्हणतात कीं सदाशिव काशीनाथ छत्रे यांच्या 'बाळमित्रा' पेक्षां या पुस्तकांत भाषेमधील कोंकणी छटा (Concanisms) कमी आहेत. [१७] पृथ्वीचा आकार, गति, कटिबंध, पर्वत, मैदानें, अरण्य, नद्या, सरोवरें, भरतीओहटी, वातावरण, वारे इत्यादि विषयांची माहिती एका भागांत देऊन, दुसऱ्यांत ग्रह तारे इत्यादींचें वर्णन केलेलें आहे. या उपयुक्त पुस्तकावर आलेला स्तुतिपर अभिप्राय 'ज्ञानोदय' पु. १४, अंक ५, इ. स. १८५५ च्या ७४–७५ पृष्ठांवर पहावयास सांपडतो.

मेजर कँडीकृत हिंदुस्थानाचें वर्णन

या सर्व पुस्तकांमुळें मेजर कँडीचें समाधान झालें नाहीं. खरें पाहिलें तर त्यांनीं इ. स. १८५० मध्येंच या विषयावर एक पुस्तक रचण्याचें ठरविलें होतें; परंतु प्रत्यक्षांत इ. स. १८६० मध्यें 'हिंदुस्थानाचें वर्णन' या नांवानें तें प्रसिद्ध झालें. 'हिंदुस्थानाचें वर्णन' रचण्याला सुरुवात केल्यापासून तें छापण्यापर्यंतच्या मधल्या काळांत हिंदुस्थानच्या इतिहासांत एक महत्त्वाची घटना घडली. ती म्हणजे इ. स. १८५७ सालचें स्वातंत्र्ययुद्ध होय. त्यामुळें प्रारंभींच्या कल्पनेंत मेजर कँडीना बदल करावा लागला. हिंदुस्थान हें नांव कसें पडलें, त्याची लांबी रुंदी, नैसर्गिक विभाग, महत्त्वाचे पर्वत, नद्या, सरोवरें, कालवे, हवा, जमीन, उत्पन्न, कलाकौशल्य, व्यापारउदीम, लोक व जाती, लोकसंख्या, भाषा, लिप्या, धर्म, इतिहास इत्यादि माहिती क्रमशः या पुस्तकांत दिलेली आढळते. धार्मिक बाबतींत मुग्धता स्वीकारणाऱ्या मेजर कँडीनीं या पुस्तकांत हिंदुधर्माची माहिती विशेष पद्धतीनें दिलेली आहे. 'हें पुस्तक हिंदु लोकांसाठीं करावयाचें' असल्यामुळें हिंदुधर्माविषयींची सामान्य माहिती देतांना ते लिहितात :–

"हिंदु लोकांचें विशेष लक्ष ज्या गोष्टींकडे आहे त्या वेगळ्याच आहेत, म्हणजे त्या जातीच्या गोष्टी, लग्न, प्रेतकर्म, उत्तरकार्य, आशौच, भोजन, सोंवळें, ओंवळें, ह्यासंबंधीं गोष्टी आहेत. ह्या गोष्टींची हिंदु लोकांत मान्यता व विचक्षणा फारच असते. ह्यांविषयीं जे विधिनिषेध आहेत ते कोणीं मोडतां कामास येत नाहींत. ते जो मोडील त्यास लागलीच चौकशी होऊन दंडण होतें." (पृ. ८८)

---

[१७] *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1850. p. 111.

जातीपोटजातींची बारकाईनें माहिती ते अशी देतात :—

" दक्षिणी ब्राह्मणांत देशस्थ, कोंकणस्थ, आणि कऱ्हाडे, हे मुख्य तीन भेद आहेत. त्यांतही वेदास लक्षून कोंकणस्थांत ऋग्वेदी आणि आपस्तंभ हे भेद आहेत, आणि देशस्थांत ऋग्वेदी व यजुर्वेदी किंवा माध्यंदिन असे दोन भेद आहेत. ह्यांचा परस्पर अन्नव्यवहार होतो, परंतु कन्याव्यवहार होत नाहीं. ह्यांतही एकेकाचे उपभेद पुष्कळ आहेत. त्यांपैकीं कोंकणस्थांची मुळीं ६० कुळें आणि १४ गोत्रें होतीं. त्यांत गोत्रांच्या प्रतिबंधानेंही कितीएक कुळांचा परस्पर कन्याव्यवहार होत नाहीं." (पृ ८९)

इतक्या सूक्ष्मतेनें लिहिणाऱ्यानें हिंदुस्थानांतील 'देवळेंही कोशल्याविषयीं विशेष वर्णावयाजोगीं नाहींत,' असें विधान करावें याचें आश्चर्य वाटतें. 'तें पीक फार माजाचें मनस्वी येतें' (पृ. ६४), 'मलबार आणि कोरोमंडल येथील हवा इंग्लिश लोकांस सात्म्याची नाहीं' (पृ. ११९), 'येथील जमीन वाळूची अगदीं नादान आहे' (पृ. ६६), 'ह्या हिंदुस्थानांत उन्हाळ्याच्या दिवसांत वारा फार उष्ण असतो म्हणून दिवसास चालणें किंवा खपणें दुःखास व रोगास कारण होतें' (पृ. ६७). 'पाण्याची वाहाणी, 'व्यापाराचा मोठा भरभराट,' 'पाण्याचा पुरावा,' 'बंदराहून बंदरास,' 'चीन-वाल्यांच्या मुलखांत', 'कौशल्याची भरभर', 'मुळापासून शेवटवर' इत्यादि वाक्यांश कानाला विचित्र वाटतात, पण इंग्रजीच्या भाषांतरामुळें हा विचित्रपणा आला असें म्हणावें लागतें.

भूगोलाचें वर्णन

'हिंदुस्थानाचें वर्णन' रचित असतांनाच मेजर कॅंडीनीं, महादेवशास्त्री पुराणिकांच्या 'भूगोल खगोल ह्मणजे भूगोल विद्येचीं आणि खगोलविद्येचीं मूलतत्त्वें' या पुस्तकाची नवीन आवृत्ति काढण्याचें इ. स. १८५६ मध्यें ठरविलें; परंतु हें पुस्तक सुधारतांना त्यांना असें वाटलें कीं आपणच स्वतंत्र पुस्तक लिहावें. या दृष्टीनें साहित्य जमा करून महादेवशास्त्र्यांच्या मूळ पुस्तकाचें स्वरूप बदलावें व 'भूगोलाचें वर्णन' हें पुस्तक लिहावें असा निर्णय त्यांनीं घेतला.

एकोणिसाव्या शतकांतील प्रारंभींचीं कांहीं मराठी शालेय पुस्तकें पाहिल्यावर एक गोष्ट प्रामुख्यानें नजरेस पडते तीं ही कीं, त्यांतील बरीचशीं पुस्तकें संवादपद्धतीनें लिहिलेलीं होतीं; परंतु कांहीं काळानंतर ही पद्धति जाऊन तीं वर्णनात्मक अशीं लिहिलीं गेलीं. या फरकाला कारण मेजर कॅंडी हे होत. व्याकरण, इतिहास, भूगोल इत्यादि विषयांवरील सुरुवातीचा शालेय पुस्तकें संवादात्मक असून विद्यार्थी तीं पाठ करीत असत. त्यामुळें त्यांची स्वतंत्रपणें विचार करण्याची शक्ति मारली जाते असें मेजर कॅंडी यांस वाटून त्यांनीं या पुस्तकांचें स्वरूप

बदलून टाकिलें. याच धोरणाला अनुसरून त्यांनीं 'भूगोलाचें वर्णन' तयार करून इ. स. १८६३ मध्यें प्रसिद्ध केलें. या पुस्तकांत भूगोलाचें सामान्य वर्णन व आशिया खंडाचें विशेष वर्णन आहे. या पुस्तकाच्या रचनेसाठीं त्यांनीं थॉरन्टन, हॅमिल्टन, मॅकलक्, निकोल्स, रीड, मॉरिस इत्यादिकांच्या भूगोलविषयक इंग्रजी पुस्तकांचा उपयोग केला आहे. पुस्तकाच्या शेवटीं दिलेल्या शुद्धिपत्रांत, हिंदु बदल हिंदू, कस्तुरी–कस्तूरी, माणिक–माणीक असे फरक केलेले आढळतात. त्यावरून उच्चारानुसारी लेखनपद्धतीचा अवलंब त्यांना करावयाचा होता असें दिसतें. 'तिरुवण', (त्रावणकोर), 'कोची' (कोचीन), 'पुदूचेरी' (पांदेचरी), 'पनगाम', (पणजी), 'शनवार तेली' (बेने इझ्राइल) इत्यादि नांवें आजच्यापेक्षां वेगळ्या पद्धतीनें लिहिलेलीं आढळतात. इंग्रजीवरून मराठींत भाषांतर करतांना येणाऱ्या कृत्रिमतेचीं या पुस्तकांतील कांहीं उदाहरणें पहाः—'ह्या बेटावर पाऊस हमेशा पडत असतो ह्यामुळें रान हिरवेंगार शोभायमान दिसतें.' (पृ. १८३), 'सन १८१८ ह्या सुमारास हिंदुस्थानाचा धनीपणा इंग्लिशांकडे कायम झाला.' (पृ. १९१) 'त्यांचें मन खट्टें झालें तर अफू खाऊन अमल आणून आततायीपणा मनस्वी करितात.' (पृ. २१९)

'भूगोलाचें वर्णन' या पुस्तकावरूनच परशुरामपंत गोडबोले यांनीं इ. स. १८६५ मध्यें 'संक्षिप्त भूगोल वर्णन' तयार केलें. ज्या उद्देशानें तात्यांनीं हें 'संक्षिप्त भूगोल वर्णन' तयार केलें, तो साध्य झाला असें म्हणावें लागतें; कारण या पुस्तकाची पहिली आवृत्ति इ. स. १८६५ मध्यें, दुसरी इ. स. १८६६ मध्यें, तिसरी इ. स. १८६७ मध्यें व चौथी इ. स. १८६९ मध्यें निघाली. आपल्या पुस्तकाचें यश तात्यांनीं 'भूगोल वर्णन बुकाच्या कर्त्याकडे' दिलें आहे.

मराठी पांचवी व सहावी या इयत्तांमध्यें या पुस्तकाचा उपयोग केला जाई, तर पहिल्या चार इयत्तांसाठीं बापू पुरुषोत्तम जोशी टोंकेकर यांचें 'हिंदुस्थानाचा भूगोल, मुंबई इलाख्याच्या विशेष वर्णनासहीत' (१८६१) हें पुस्तक वापरलें जात असे. मेजर कँडीच्या 'हिंदुस्थानाचें वर्णन' या पुस्तकाच्या मदतीनें हें रचिलें गेलें.

मेजर कँडीचें भाषाविषयक धोरण

यावेळीं सखाराम बापू दांडेकर यांचें 'मुंबई इलाख्याचा भूगोल' हें पुस्तकहि मुलांच्या वाचनांत येत असे. इ. स. १८७० मध्यें त्याची तिसरी आवृत्ति निघाली तेव्हां तें मेजर कँडीच्या नजरेखालून गेलें होतें. पुन्हां इ. स. १८७१ मध्यें चौथ्या आवृत्तीचें पुस्तक त्यांच्या हातीं आल्याबरोबर त्यांनीं त्या पुस्तकावर जी कडक टीका केली त्यांत ते म्हणतात कीं या अगोदर तिसऱ्या आवृत्तीच्यावेळीं दाखविलेल्या

एकवीस चुकांपैकीं आतां फक्त सात दुरुस्त केल्या आहेत, दहा तशाच ठेविल्या आहेत व ज्या भागांत उरलेल्या चार चुका होत्या तो भागच गाळलेला आहे. प्रत्येक शालेय पुस्तक शुद्ध भाषेंत लिहिलें जावें या धोरणामुळें मेजर कँडी पुन्हां पुन्हां त्याच चुका दाखवून देत. मात्र हें कटु कर्तव्य करतांना त्यांची भूमिका नम्रपणाची पण निश्चित असे. वर उल्लेखिलेल्या टीकालेखांत ते म्हणतात :—

"I do not set up my claim to be considered infallible as a Marathi critic but I seldom point out anything as a mistake unless it be so clearly a mistake that he who made it must see it to be a mistake when pointed out." १८

या भूमिकेवरून मेजर कँडी या पुस्तकांतील पुढील प्रमाणें चुका दाखवितात :—

"सह्याद्रि पर्वताची ओळ. Here पर्वताची should be पर्वतांची. There cannot be a line, range or chain of one mountain....

"वाघर व मेवासी लोकांनीं. This is not correct composition. It should be वाघर व मेवासी ह्या लोकांनीं or वाघर लोकांनीं व मेवासी लोकांनीं.

"...प्राचीन इतिहास लक्ष्यपूर्वक वाचला तर ह्या देशांत पूर्वी सिथियन, आर्य, बौद्ध, हिंदु, मुसलमान, पोर्तुगीज, ह्यांनीं राज्यें केलीं...The words असें समजेल कीं or असें दिसेल कीं or words of similar meaning should follow तर....

"कित्येक कारणानें should be कित्येक कारणांनीं as कित्येक expresses more than one." १९

अशाच प्रकारें सखाराम बापूशेट दांडेकर यांच्या 'सृष्टिज्ञान परिभाषा' (१८७१) नामक पुस्तकावर, तारीख २९ ऑगस्ट, १८७१ रोजीं लिहिलेल्या टीकालेखांत मेजर कँडी म्हणतात :—

"कर्कवृत्त व मकरवृत्त यांमध्यें उष्ण कटिबंध आहे. Instead of यांमध्यें there should be ह्यांच्यामध्यें. The word यांमध्यें means in them, ह्यांच्यामध्यें means between them ...

"ग्रहण लागण्याचा मध्य झाला. It should be ग्रहणाचा मध्य झाला ...

"भारमापक झपाट्यानें उतरत असतें. This is an Anglicism- It ought to be भारमापक यंत्रांतील पारा उतरत असतो ...

"Sanskrit words are generally written wrongly ..." २०

---

१८ *D. P. I. Government. Vol. 1.* 1871–72. p. 237.
१९ Ibid. pp. 238-239.
२० Ibid. pp. 459-461.

मेजर कँडी यांचें भाषाविषयक धोरण समजण्यास वरील उतारे पुरेसे आहेत. या त्यांच्या धोरणामुळेंच मराठी भाषा व्याकरणशुद्ध बनून तिला ठराविक वळण लागलें.

भूगोलाचीं इयत्तावार पुस्तकें

भूगोलाच्या अभ्यासासाठीं वर उल्लेखिलेलीं सर्व पुस्तकें शाळांमधून वापरलीं जात. पुढें इ. स. १८७१ मध्यें विद्याखात्यानें असें ठरविलें कीं इयत्तावार अशीं पुस्तकें तयार व्हावीं. त्याप्रमाणें त्यावेळचे पुणें ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपल रा. सा. सीताराम विश्वनाथ पटवर्धन यांच्याकडून सरकारी विद्याखात्यातर्फे 'भूगोल विद्येचीं मूलतत्त्वें' नांवाचीं तीन पुस्तकें लिहवून घेतलीं गेलीं. हा वेळ पावेतों भूगोलविषयक पारिभाषिक शब्द तयार झालेले असल्यामुळें या विषयावर लिहिणाऱ्या कोणत्याहि लेखकाला विशेष अडचण पडण्याचें कारण नव्हतें.

'भूगोलविद्येचीं मूलतत्त्वें' भाग २ या पुस्तकांत हिंदुस्थानाचें स्वाभाविक वर्णन व राजकीय विभाग यांची माहिती दिलेली आढळते. क्रमशः इयत्तावार भूगोलाचा अभ्यास व्हावा या हेतूनें हीं पुस्तकें तयार केलेलीं असल्यामुळें पहिल्या भागांत मुंबई इलाख्याचें वर्णन व दुसऱ्या भागांत हिंदुस्थानाचें वर्णन आहे. मराठी पांचवी व सहावी या इयत्तांना सर्व जगाची माहिती असणें आवश्यक असल्यामुळें 'भूगोल विद्येचीं मूलतत्त्वें' भाग ३ मध्यें 'संक्षिप्त भूगोल वर्णन' केलेलें आहे. प्रथमच भूगोल हा विषय शास्त्रीय रीत्या कसा शिकवावा याची माहिती दिलेली आहे.

हीं पुस्तकें भाषेच्या दृष्टीनें निर्दोष व्हावीं ही दृष्टि या पुस्तकांच्या रचनेमागें होतीच. यासाठीं मेजर कँडीनीं तीं तपासणें आवश्यक होतें. कँडीनीं तीं कशीं तपासलीं, त्याची कल्पना येण्यासाठीं 'भूगोलविद्येचीं मूलतत्त्वें' भाग १, या पुस्तकावरील त्यांच्या टीकालेखांतील कांहीं भाग असा आहे:—

"म्हैसूर संस्थान व मद्रास इलाखा यांच्या सीमेपर्यंत should not सीमे be सीमां – ?

"The word स्वदेशीय is used throughout the book to express 'Native', but it means 'belonging to one's own country.' The word एतद्देशीय is generally used to express 'Native.'

"आरबी Is not the correct form अरबी ?...

"कोंकणांतील नद्या लहान लहान आहेत आणि समुद्रापासून कांहीं दूरपर्यंत त्यांतून गलबतें नेतां येतात. Would not तरी be better than आणि in the above sentence ?

"पश्चिम घांट should be पश्चिम घाट ...

"पूर्वेस नाशिक, अहमदनगर, व पुणें जिल्हा. Should not the construction be पूर्वेस नाशिक, व पुणें हे जिल्हे?

"नारळ पिकविण्याचे मळे. Is it idiomatic?

"मासे मारण्याचीं गांवें. I suppose this is a translation of 'fishing villages,' i. e. villages in which fishermen live. I do not think the phrase मासे मारण्याचीं गांवें is good....

"मुंबईचा गव्हरनर बरसातीचे दिवसांत पुण्यास राहतो. Would not पावसाळ्यांत be better than बरसातीचे दिवसांत? Would not पुण्यानजीक be better than पुण्यास? The Governor's mansion is some miles from Poona.

"मुख्य उद्योग विणणें व शेतकी हा आहे. Would not हे आहेत be better than हा आहे?...

"पंचगंगा व इतर नद्यांजवळची जमीन सुपीक आहे. This is not grammatical and should be corrected. It may be corrected in two ways. It might be पंचगंगेजवळची व इतर नद्यांजवळची जमीन सुपीक आहे. or पंचगंगा व इतर नद्या ह्यांजवळची जमीन सुपीक आहे....

"संगीत वाद्यें. The word वाद्य means 'an instrument of music', what does संगीत mean as an adjective of it?..." २१

वरील टीकालेखावरून असें म्हणावयास हरकत नाहीं कीं भूगोल विषयावरील शालेय पुस्तकें सुद्धां ठराविक लेखनपद्धतीनें लिहिलीं जावीं, त्यांतील वाक्यरचना व्याकरणशुद्ध असावी, यासाठीं मेजर कँडी या पुस्तकांची कसून तपासणी करीत व त्यांच्या दृष्टीनें त्यांना आढळणाऱ्या चुका लेखकाला दाखवून देत व त्या दुरुस्त केल्या जात

'भूगोल विद्येचीं मूलतत्त्वें' या पुस्तकाचे तीनहि भाग प्रथम इ. स. १८७५ मध्यें छापले गेले. सरकारी विद्याखात्यातर्फे हीं पुस्तकें शाळांत वापरलीं गेल्यामुळें त्यांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. पहिल्या भागाची दहावी आवृत्ति इ. स. १८९६ मध्यें दुसऱ्याची सातवी आवृत्ति इ. स. १८९० मध्यें व तिसऱ्या भागाची आठवी आवृत्ति इ. स. १९०२ मध्यें निघाली. त्यांतील भाषासरणी व लेखनपद्धति पहिल्या आवृत्तीच्या वेळीं मेजर कँडी यांच्या हयातींत ठरून गेल्यामुळें पुढील आवृत्त्यांत कांहीं विशेष फरक झालेला आढळत नाहीं.

---

२१ *D. P. I. Book Depot. Vol. 31.* 1875-76. (No paging.)

इ. स. १८७१ मध्यें विद्याखात्यानें केलेल्या नियमाप्रमाणें जिल्ह्याजिल्ह्याच्या भूगोलाचींहि अनेक पुस्तकें पहावयास सांपडतात. हीं छोटीं छोटीं पुस्तकें मेजर कॅंडीच्या नजरेखालून जात असत, त्यामुळें तीं कॅंडीकृत पद्धतीनें लिहिलीं जात.

शाळापुस्तक मंडळीच्या कल्पनेप्रमाणें पुढील काळांत हळुहळु लोकांच्या भूगोल-खगोलविषयक अशास्त्रीय कल्पना नाहींशा होण्यास या पुस्तकांची बरीच मदत झाली हें खरें. हिंदू लोकांप्रमाणेंच इस्लाम धर्माच्या लोकांमध्यें अशा खोट्या समजुती होत्या. त्या घालविण्यासहि हीं पुस्तकें उपयुक्त ठरलीं; तथापि हें काम सहजासहजी होण्यासारखें नव्हतें. उदाहरणार्थ कराचीला इ. स. १८५४ मध्यें तेथील नॉर्मल क्लासच्या विद्यार्थ्यांनीं भूगोल विषय शिकविण्यास हरकत घेतली.[२२] त्यासाठीं त्यांनीं शिक्षामंडळीकडे अर्ज केला कीं पृथ्वी वाटोळी आहे, ती पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते इत्यादि विधानें कुराणांतील विचारांशीं जुळणारीं नाहींत; म्हणून या विषयाचा अभ्यास होत असतांना वापरल्या जाणाऱ्या शालेय पुस्तकांतील हीं विधानें काढून टाकावीं. विद्याखात्याच्या कडक धोरणामुळें तसा बदल झाला नाहीं हें सांगावयास नकोच. अशाप्रकारें हिंदु अगर मुसलमान धर्मांतील लोकांच्या भूगोलासंबंधीं अशास्त्रीय समजुती नाहींशा करण्यांत या पुस्तकांचा उपयोग फारच झाला आणि त्याबरोबरच भूगोलविषयक परिभाषा तयार होऊन तीं सर्व पुस्तकें विद्याखात्यानें पुरस्कारिलेल्या मराठी भाषेच्या व्याकरणनियमांच्या चौकटींत बसविलीं गेलीं.

---

२२ *D. P. I. Government.* 1854. P. 577.

प्रकरण पंधरावें

ख्रिस्ती शालेय वाङ्मय

ख्रिस्ती धर्मोपदेशक व देशभाषा

महाराष्ट्रांत इंग्रजी सत्ता दृढमूल झाल्यावर, परकी सत्तेनें एतद्देशीयांच्या मदतीनें शिक्षणप्रसारकार्य सुरू करून त्यासाठीं आवश्यक तीं शालेय पुस्तकें मराठी भाषेंत कसकशीं रचिलीं व ज्ञानदानाबरोबरच मराठी भाषेला व्याकरणशुद्ध वळण देण्याचे कसकसे प्रयत्न झाले तें पाहिल्यावर, शिक्षणक्षेत्रांत कार्य करणाऱ्या ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं आपल्या परीनें कशी धडपड केली तेंहि अभ्यासणें आवश्यक आहे. अन्यभाषिकानें मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांमध्यें जाऊन धर्मप्रसाराचें कार्य शिक्षणक्षेत्रद्वारा करणें थोडेंसें कठीणच; परंतु तें अनेक परदेशस्थ धर्मोपदेशकांनीं केलें. धर्मप्रसारासाठीं अनेक ठिकाणीं शाळा स्थापणें व त्या शाळांमधून ख्रिस्ती धर्माचा प्रसार ज्यांच्यायोगें करतां येईल अशीं मराठी शालेय पुस्तकें रचून मुलांच्या मनावर ख्रिस्ती धर्माची महती बिंबवणें हाच एक उत्कृष्ट मार्ग पुष्कळशा धर्मोपदेशकांसमोर होता. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या या सामुदायिक शिक्षणप्रसाराच्या कल्पनेंतूनच पुष्कळशीं शालेय पुस्तकें देशभाषांमध्यें निर्माण झालीं. हीं पुस्तकें रचण्याचें कारण रे. विल्सन याच्या शब्दांत मांडावयाचें झालें तर पुढीलप्रमाणें आहे.:—

"For the study of the vernacular languages of the west of India, I had for myself the most powerful motives. They form the most direct and efficient media, and the only media in the first instance, for social, educational, intellectual, moral and religious inter-communion. The readiest key to the hearts and sympathies of those who habitually use them; and the only channels through which instruction can be conveyed to the masses of the people."[१]

वरील विचार रे. विल्सननें, त्याला मुंबईच्या नागरिकांनीं इ. स. १८६९ मध्यें जें मानपत्र दिलें त्या प्रसंगीं काढलेले आहेत. असेच विचार यापूर्वीच पन्नास वर्षांमागें महाराष्ट्रांत खितीधर्मप्रसारार्थ आलेल्या इतर धर्मोपदेशकांचेहि होते असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति होणार नाहीं.

---

१ *Native Opinion, Vol.* 6. No. 9. 1869. p. 69.

या धर्मोपदेशकांपैकीं गॉर्डन हॉल व सॅम्युअल नॉट हे मुंबईला येणारे पहिले धर्मोपदेशक होत. ते तारीख १२ फेब्रुआरी, १८१३ रोजीं मुंबईला उतरले. प्रथम इ. स. १८१५ मध्यें मुंबईत अमेरिकन मराठी मिशनची स्थापना झाली व त्याच वर्षी मुंबईस पहिली मराठी शाळा सुरू झाली. सुरुवातीला या शाळेंत सुमारें पंचवीस मुलें होतीं. या कामांत त्यांना बरेच अडथळे निर्माण झाले. सरकारचा विरोध, लोकांची बेपर्वाई, आवश्यक साधनांची कमतरता इत्यादि अडचणींमुळें प्रारंभीं शिक्षणप्रसाराचें कार्य तेवढ्या झपाटयानें त्यांना करतां आलें नाहीं. नवीनच निघालेल्या या शाळांमधून वापरण्यासाठीं, कांहीं शालेय पुस्तकें तयार झालीं. जरी तीं पुस्तकें योग्य पद्धतीनें तयार केलेलीं नव्हतीं तरी सुद्धां यावेळीं तीं फारच उपयुक्त ठरलीं. रे० गॉर्डन हॉल व न्यूवेल यांनीं 'लेंकरांची पहिली पोथी' इ. स. १८२० च्या पूर्वी लिहिली. तसेंच 'खगोल भूगोल इत्यादिक' प्रथम इ. स. १८२४ मध्यें तयार झालें. पुढें त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. गणितविषयक, 'Marathi Numerical Tables' (1818), 'Elementary Arithmetic' (1826) हीं पुस्तकें प्रथम वापरांत होतीं, पण पुढें इ. स. १८३७ मध्यें 'अंकगणित' हें पुस्तक रे० फेअरबँक यानें तीन भागांत तयार केलें व तें सुमारें चाळीस वर्षें वापरलें गेलें. या पुस्तकावरून इ. स. १८७५ मध्यें नवीन धर्तीवर गणिताचीं तीन पुस्तकें तयार झालीं. याशिवाय मिसेस बॅलंटाईननें रचलेलें 'मनोकृत्यगणित' इ. स. १८४० पासून पुढें चालू झालें. 'पदार्थविज्ञान' इ. स. १८४६ मध्यें रे० अॅबट यानें रचिलें, तेंहि उपयोगांत होतें. या सर्व शालेय पुस्तकांबद्दल हेन्री ब्रूस लिहितो:—

"It has always been the aim of the Mission to provide the best books possible for its schools, and it has from the first always insisted that the Reading Books used in the schools should be of a strictly religious character. 'The Evangelist and Reporter', published in Bombay, in its issue for June 1837, says, 'Our American friends are very guarded as to the character of the Books in the schools. In all their efforts in the cause of education, they have one great aim, viz. to raise the native population from their state of ignorance, to remove those prejudices which keep them morally and intellectually degraded, and above all, to make them acquainted with Christianity, so that they may feel the force of its great truths,

on their hearts and become wise unto salvation. With this view the books used for reading in all the schools are Scriptures and religious works, and no book, not approved by the Mission is allowed to be used, or to be kept in the Schools."[२]

दि बॉंबे ऑक्झिलियरी रिलिजस ट्रॅक्ट सोसायटी व शालेय पुस्तकें

सर्वसाधारण लोकांमध्यें पुस्तकांच्याद्वारा खिस्तीधर्मप्रसार करण्याच्या उद्देशानें, तारीख १० डिसेंबर १८२७ रोजीं 'The Bombay Auxiliary Religious Tract Society' नांवाची खास संस्था जन्मास आली. या संस्थेचें इ. स. १८३२ मध्यें 'The Bombay Tract and Book Society' असें नामांतर करण्यांत आलें. या संस्थेनें देशभाषांतून खिस्ती धर्माचीं महती सांगणारीं लहान लहान पुस्तकें तयार करून तीं लोकांत वाटण्याचा सपाटा सुरू केला. या संस्थेला आर्थिक मदत करणाऱ्यांची जी यादी संस्थेच्या पहिल्या वार्षिक अहवालांत दिली आहे, तींत मोल्स्वर्थ, टी. कॅंडी यांचीं नांवें आढळतात. तयार होणारीं पुस्तकें भाषेच्या दृष्टीनें व्याकरणशुद्ध असावीं म्हणून जी तपासणी समिति नेमिलेली होती तींत मोल्स्वर्थ, जॉर्ज कॅंडी, वेब, स्टीव्हनसन, मिचेल, नेस्बिट, विल्सन यांचीं नांवें आढळतात.[३] या संस्थेच्या वतीनें तयार होणारीं बहुतेक शालेय पुस्तकें प्रथमतः युरोपियन धर्मोपदेशकांनीं लिहिलेलीं आहेत.

ख्रिस्ती शाळांत वापरलीं जाणारीं पुस्तकें

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर मिशनरी शाळांमधून कोणकोणते विषय शिकविले जात असत तें सांगतांना 'ज्ञानोदय' कार लिहितातः–

"मिशनारी शाळांत ज्या रितीनें आतां शिकवितात त्याप्रमाणेंच तेव्हां देखील शिकवीत असत. लहान लेंकरांस शिकविण्याकरितां त्यावेळीं मराठीत एकहि पुस्तक नव्हतें, यास्तव कित्येक पुस्तकें स्वतां त्या उपदेशकानी (गार्डन हॉल, न्यूवेल वगैरे) रचिलीं आणि जो छापखाना त्यानी घातला होता (अमेरिकन मिशन छापखान्याची सुरुवात इ. स. १८१६ मध्यें मुंबईला झाली) त्यांत छापून लोकांत त्यांच्या हजारो प्रति प्रसिद्ध केल्या. त्यानी जीं पुस्तकें केलीं त्यांतून कित्येक अद्यापि शाळेंत शिकवितात... त्या उपदेशकांनी भूगोल, खगोल, धर्म, नीति इत्यादि विषयांवर पुष्कळ पुस्तकें छापून शाळांत शिकविलीं...त्या उपदेशकांस ह्या विषयांवर पुस्तकें लिहिण्याचें अगत्य होतें. कारण त्यानी पुस्तकें रचिल्या अगोदर ह्या मुंबई इलाख्यांत तर चुकीरहीत भूगोल खगोल, नीति, धर्म इत्यादि विषयांवर एकहि पुस्तक नव्हतें."[३ अ]

---

२ H. Bruce, *The Literary work of the American Marathi Mission*. 1882. P. 25.

३ *Second Report of the Bombay Auxiliary Religious Tract Society*. 1829. P. 15.

३ अ **ज्ञानोदय**, पु १२. १८५३. पृ. ३४५–३४६.

वरील म्हणण्याप्रमाणें मिशनरी मंडळींनीं आपल्या शाळांतून वापरण्यासाठीं अनेक विषयांवर जीं पुस्तकें तयार केलीं, त्यांची यादी 'A Catalogue of Marathi Christian Literature, during eighty years, 1813–1892,' by Rev. I. E. Abbott, (1892) आणि 'Memorial Papers of the American Marathi Mission, 1813–1881' या दोन ग्रंथांमध्यें दिलेली आढळते.

लेंकरांची पहिली पोथी

अमेरिकन मिशनच्या वतीनें प्रथम जीं पुस्तकें तयार झालीं तींत 'लेंकरांची पहिली पोथी' हें एक होय. या पोथीचें जनकत्व रे. हॉल व न्यूवेल यांच्याकडे जातें. हीं पोथी इ. स. १८२० च्या पूर्वी लिहिली गेली.

या पोथीच्या इ. स. १८८२ पर्यंत पन्नास आवृत्त्या निघाल्या. पोथीची जुन्यांत जुनी आवृत्ति जी प्रत्यक्ष पहावयास मिळाली ती बाणकोटांत छापलेली इ. स. १८२८ मधील एक व इ. स. १८२९ मधील एक होय. याशिवाय इ. स. १८३१ व १८३२ मुंबई या आवृत्तींतील पुस्तकें मिळूं शकतात; परंतु त्यांवर आवृत्तींचा आंकडा नाहीं. पुढें इ. स १८३३ ची चौथी आवृत्ति, इ. स. १८३४ ची सहावी आवृत्ति, हीं पुस्तकें पहावयास मिळालीं. या वेगवेगळ्या आवृत्तींचीं पुस्तकें एकत्र ठेवून तुलनात्मक दृष्टीनें पाहिल्यावर एक चमत्कारिक गोष्ट आढळते ती ही कीं, एका घड्याच्या (धडा पांचवा) सुरुवातीला 'अठराशें एकतीस वर्षांमागें येशूखीस्तानें मनुष्यजन्म घेतला' हें इ. स. १८३१ च्या आवृत्तीच्या पुस्तकांतील वाक्य पुढील कांहीं आवृत्त्यांत जशाचें तसेंच ठेविलेलें आढळतें. वास्तविक ही पोथी जशीच्या तशी छापली जात होती असेंहि नव्हे. उदाहरणार्थ इ. स. १८२८ मधील बाणकोटी आवृत्ति व इ. स. १८३० ची बॉंबे ट्रॅक्ट सोसायटीनें मुंबईला छापलेली आवृत्ति या दोन पोथ्या तपासून पाहिल्या तर भाषेच्या दृष्टीनें थोडासा फेरबदल केलेला आढळतो. कथावाङ्मयाच्या दृष्टीनें या पोथीकडे पाहिलें तर तींत येशूच्या जन्माबद्दल व इतर कांहीं गोष्टी दिलेल्या आहेत. उदाहरणादाखल एक धडा दिला आहे :—

॥ धडा ५ ॥

"सवा अठराशें वर्षांमागें सुमारें येशु खीस्ताने मनुष्य जन्म घेतला ॥ येशु खीस्ताची आई कुवारी। माराया नावें। होती येशू खिस्ताला पृथिवींतला बाप नव्हता। देव त्याचा बाप होता॥ जे आंधळे। त्यांचे डोळे येशु खीस्ताने आणिले । जे मुके होते। त्यांस बोलण्याचि शक्ती। जे बहिरे होते। त्यांस ऐकण्याची शक्ती। अशी त्याणे दिल्ही॥ जे अज्ञानी होते। त्यांस। येशु खिस्ताने देवाचा मार्ग दाखविला ॥ येशू

ख्रिस्ताने सर्व लोकांस देवाची गोष्ट सांगीतली । यास्तव शास्त्रि आणि पंडित खिन्न होते । आणि त्याजवर तुफान आणावें । ह्मणोन त्याचे जपणीस लागले ॥ त्यांनी त्याला धरायास माणसें पाठविलिं पण त्याचेसमोर तीं माणसें आलिं असतां त्यांची शक्ती नाहीशी झाली आणि ते भुमीवर पडले तथें त्यांचे स्वाधीन येशु आपोआप झाला ॥ मग बहूत प्रकारचें दुःख त्या पापी माणसांपासून सोसून आपणाला खांबाशीं खिळ्यानि खिळुं दिल्हें ॥ त्या खांबावर येशु खिस्त देवापासून व मनुष्यांपासून व भूतांपासून बहूत दुःख सोसून आपला प्राण सोडला आणि त्याचें शरीर पुरलें होतें । तिसरे दिवशीं तो फिरून जिवंत होउन मेलेल्यांमधून उठला आणि उठल्या नंतर चाळिसावे दिवशीं तो देवापाशीं वर गेला ॥ येशु खिस्ताची गोष्ट ध्यानांत धरली याने देवाची चोळख होत्ये ॥ जसा वारा चहुंकडे वाहतो परंतु डोळ्यांस दिसत नाहिं तसा देव सर्व ठिकाणी आहे खरें परंतु दृष्टीस पडत नाहिं जसें साखरेचें गोडपण डोळ्यांनिं दिसत नाहिं पण जिभेला साकर लाविली असतां तिचें गोडपण दिसतें तसें देव ह्या शरीराचे डोळ्यांनी दिसत नाहीं परंतु मनांत प्रगट होतो ॥ त्यानें जगावर केवढी दया केली ॥ त्याने आपला पुत्र जगांत पाठउन जगावर केवढा उपकार केला अशे गोष्टीचें मनन नित्य करीत असतां देव तुझे मनांत प्रगट होईल ॥ ”[४]

या पोथींत विरामचिन्हांऐवजीं चरण वापरलेले आहेत. ह्रस्वदीर्घांचा कांहींच थरबंध दिसत नाहीं. कसेंहि असो, या पोथीच्या अनेक आवृत्त्या निघाल्या व तिला ‘ A body of divinity for children ’ असें म्हटलें गेलें.

‘ पहिली पोथी—ज्ञानोदय ’ या नांवाचें एक पुस्तक पाहाण्यांत आलें; परंतु त्यावर प्रकाशनकालनिर्देश नाहीं. एकंदर रचनेवरून तें शाळांतील मुलांसाठीं तयार केलेलें दिसतें. प्रथम कांहीं शब्दसमूह व नंतर वाक्यसमूह त्यांत दिलेले आहेत. उदा०–

“ तुम्ही साळेंत गोंगाट न करावा तो बरा नाहीं–गोंगाट करणें ह्मणजे जवळच्या मुलापासीं बोलणें–तुझा पंतोजी असें बोलेल कीं रे दुष्टा–आणि तुझ्या दोषामुळें जो तुझा धिःकार करील तो सर्व पाहतील—” (पृ. १९). पुस्तकांतील भाषासरणीवरून तें सुरुवातीच्या काळांतील असावें असें वाटतें.

लेंकरांची दुसरी पोथी

‘लेंकरांची दुसरी पोथी’ या पुस्तकाची रचना थोडीशी वेगळ्या धर्तीवर केलेली आढळते. या पोथीचे चार भाग पाडलेले आहेत. पहिल्या भागांत ‘देवाविषयीं’ सव्वीस वाक्यसमूह, दुसऱ्यांत ‘मनःकल्पित गोष्टी,’ तिसऱ्यांत ‘मनोरंजक व ज्ञानदायक

[४] लेंकरांची पहिली पोथी. १८२८. पृ. ११–१४.

गोष्टी 'व चौथ्या भागांत 'इंग्रेजी कवितेचें भाषांतर' आहे. उपदेशकाची भूमिका घेऊन पुस्तककर्त्यानें येशुमाहात्म्य वर्णिलें आहे :— "देवाची आज्ञा आचरण्याचा नेम आहे. मी त्याची आज्ञा पाळीन कां कीं माझी आशा त्याच्या शब्दावर आहे आणि जे त्याला भीत आहेत त्यांस आनंद होईल. जर आह्मी देवाची प्रीति करितों तर आह्मास आपणाजवळ नेईल. हे देवा मला ने आणि मी तुझ्याजवळ धावून येईन जर मी वांचतों तर मी देवासाठीं वांचतों. जर मी मरतों तर मी प्रभूसाठीं मरतों. वांचतों अथवा मरतों हे प्रभूच्या साठीं मला असो." [५]

या पोथींतील 'इंग्रेजी कवितेचें भाषांतर', विल्यम मावरच्या 'The English Spelling Book' नामक इंग्रजी पुस्तकांतील 'My Mother' या कवितेचें आहे. मूळ कविता व त्याचें या पोथींतील भाषांतर मुद्दाम येथें दिलें आहे.

My Mother

"Who fed me from her gentle breast,
And hush'd me in her arms to rest,
And on my cheek sweet kisses prest?
My Mother.

When sleep forsook my open eye,
Who was it sung sweet lullaby,
And soothed me that I should not cry?
My Mother.

Who sat and watched my infant head,
When sleeping on my cradle bed,
And tears of sweet affection shed?
My Mother.

When pain and sickness made me cry,
Who gazed upon my heavy eye,
And wept for fear that I should die?
My Mother.

---

[५] लॅकरांची दुसरी पोथी. आ. २. १८४०. पृ. २.

Who loved to see me pleased and gay,
And taught me sweetly how to play,
And minded all I had to say?

My Mother.

Who ran to help me when I fell,
And would some pretty story tell,
Or kiss the place to make it well?

My Mother.

who taught my infant heart to pray,
And love God's Holy Book and Day,
And taught me wisdom's pleasant way?

My Mother.

And can I ever cease to be
Affectionate and kind to thee,
Who was so very kind to me

My Mother?

Ah, no! the thought I can not bear;
And if God please my life to spare,
I hope I shall reward thy care

My Mother.

When thou art feeble, old, and grey,
My healthy arm shall be thy stay,
And I will soothe thy pains away,

My Mother.

And When I see thee hang thy head,
'Twill be my turn to watch thy bed,
And tears of sweet affection shed,

My Mother.

For God, who lives above the skies,
Would look with vengance in his eyes,
If I should ever despise

My Mother." ६

---

६ William Mavour, *The English Spelling Book*. Year of Publication? P. 135.

माझी आई

" मृदुउरस्थलेंकरून मला कोणी पोसलें. मला विश्रांति व्हावी म्हणून आपल्या भुजांच्या ढायीं घेऊन माझें कोणी सांत्वन केलें. आणि माझ्या गालाचे गोड मुके कोणी घेतले. माझ्या आईनें.

जेव्हा मला झोंप न लागे त्यासमयीं सांत्वनाचें मधुर गाणें कोणी गायलें ? आणि म्या न रडावें म्हणून मला कोणी हालविलें ? माझ्या आईनें.

मी पाळण्यांतल्या आंथरुणावर निज़लों असतां वारंवार मजकडे पाहून माझ्या कोंवळ्या डोक्याची चौकी कोणी केली ? माझ्या आईने.

जेव्हां दुःख आणि रोग याणी मला रडविलें तेव्हां माझ्या जडे झालेल्या डोळ्यांकडें डोळे लावून कोणी पाहिलें ? मी मरेन या भयाने कोणी रुदन केलें ? माझ्या आईने.

माझ्या कोमल ओष्ठांस देवाची प्रार्थना करायाला कोणी शिकविलें ? आणि देवाचें पवित्र पुस्तक व पवित्र दिवस यांजवर प्रीति करायास कोणी शिकविलें ? आणि ज्ञानाच्या सुखदायक मार्गांत चालायास कोणी शिकविलें ? माझ्या आईनें.

जी तूं मजविषयीं इतकी भारी मायाळू त्या तुजवरची प्रीति आणि ममता सोडणारा असा मी कधीं होईन ? माझ्या आई.

अरेरे नाहीं नाहीं ! ही कल्पना माझ्याने सोसवत नाहीं. जर माझें जीवन राखायास परमेश्वर खुशी आहे. तर तूं जी मजविषयीं काळजी वाहिलीस तिचा उतराई म्या व्हावं एवढी मी आशा करितों. माझ्या आई.

जेव्हां तूं अशक्त व पिकलेली म्हातारी होतीस तेव्हां ह्या माझा निरोगी हात तुला टेंकण होईल. आणि तुझीं दुःखें सुखोपचारांने दूर घालवीन. माझ्या आई.

तुला मान टाकलेली असी जेव्हां मी पाहीन तेव्हां आंथरुणाची चौकी करण्याचा वांटा मजकडे येईल. आणि गोड प्रीतीचीं आंसवें मी काढीन. माझ्या आई.

कांकीं. जो देव वर आकाशांत राहतो तो सूड घेण्याच्या भावाने मजकडे पाहील. जर मी कधीं तिरस्कारायास प्रवर्तेन. माझ्या आईला." [७]

---

[७] **लेकरांची दुसरी पोथी.** आ. २. १८४०. पृ. ४९–५२.

ज्या इंग्रजी कवितेचें हें भाषांतर आहे, त्याच कवितेचें रूपांतर सरकारी विद्याखात्यातर्फे तयार झालेल्या पाळंदेकृत 'लहान मुलांकरितां पहिलें पुस्तक, भाग दुसरा' या पुस्तकांत पहावयास सांपडतें. खिस्ती धर्मोपदेशकांच्या कृत्रिम भाषांतराशीं त्याची तुलना करून पाहण्यासारखी आहे. तें रूपांतर खालीलप्रमाणें:—

"थोर तुझे उपकार ॥ आई थोर तुझे उपकार ॥ धृ ॥
वदत विनोदें, हांसत सोडी ॥ कोण दुधाची धार ॥ १ ॥
नीज न आली तर गीत म्हणे ॥ प्रेम जिचें अनिवार ॥ २ ॥
येई दुखणें तेव्हां मजला ॥ कोण करी उपचार ॥ ३ ॥
कोण कडेवर घेउनि फिरवी ॥ चित्तीं लोभ अपार ॥ ४ ॥
बाळक दुर्बळ होतों तेव्हां ॥ रक्षण केलें फार ॥ ५ ॥
त्वांचि शिकविलें वाढविलें त्वां ॥ आहे मजवर भार ॥ ६ ॥
स्मरण तुझ्या या दृढ ममतेचें ॥ होतें वारंवार ॥ ७ ॥
नित्य करावें साह्य तुला मीं ॥ हा माझा अधिकार ॥ ८ ॥" [८]

हितोपदेश पोथी

खिस्ती धर्मोपदेशकांच्या शाळांमधून वापरलें जाणारें यानंतरचें पुस्तक म्हणजे 'हितोपदेश पोथी' हें होय. मुंबईच्या शाळापुस्तक मंडळीचा 'हितोपदेश' समोर ठेवून ही पोथी तयार केली कीं काय अशी शंका येते. हातीं आलेल्या पोथीच्या शेवटीं 'संवत १८३२ मुंबईमध्यें छापली' असें आहे. परंतु 'सन' या शब्दाऐवजीं 'संवत' हा शब्द चुकून पडला असावा. नामसाधर्म्याशिवाय शिक्षामंडळीचा 'हितोपदेश' व 'हितोपदेश पोथी' यांत कसलेंच साम्य नाहीं; कारण या पोथींत सुरुवातीला 'व्यंजनें', 'स्वर', 'अंक', 'व्यंजनें आणि स्वर जोडले'—येथें बाराखड्या दिलेल्या आहेत—, 'जोड अक्षरें' आणि नंतर तीस धडे आहेत. पुढ पत्रांचे कांहीं नमुने आहेत, आणि 'ज्यास ऐकायाचा कान आहे त्यानें ऐकावें' या सदराखालीं खिस्तविषयक कांहीं प्रश्न आहेत. केवळ उपदेशवजा अशी ही पोथी आहे. या पोथींत नजरेंत भरणारी गोष्ट म्हणजे तींतील प्रार्थनागीतांना चाली व राग दिलेले आहेत. उदाहरणार्थ चाल कानडा, स्वर तोडी, चाल धनाश्री, चाल बिहाग, चाल भैरव इत्यादि.

---

[८] भास्कर दामोदर पाळंदे, **लहान मुलांकरितां पहिलें पुस्तक, भाग दुसरा**. आ. २. १८६१. पृ. ३६.

उपदेशाच्या दृष्टीनें खिस्ती बालवाङ्मय व सरकारी बालवाङ्मय यांत फरक आहे. शाळापुस्तक मंडळीच्या बालवाङ्मयांत जरी उपदेश असला तरी त्याची पार्श्वभूमि धार्मिक नाहीं. परंतु खिस्ती वाङ्मयांत अथपासून इतिपर्यंत धर्मकारण आढळतें. यांत आश्चर्य करण्यासारखें कांहींच नाहीं; पण भाषेच्या दृष्टीनें विचार केला तर सरकारी बालवाङ्मयाचें जनकत्व बहुधा शास्त्रीमंडळीकडे असल्यामुळें त्यांत कृत्रिमता कमी आहे. खिस्ती धर्मोपदेशकांना जरी शास्त्र्यांची मदत असली तरी मुख्य रचना युरोपियन पाद्र्यांची होती व त्याचा परिणाम भाषेवर होणें स्वाभाविक आहे.

खिस्तमाहात्म्यपर बालवाङ्मय

धर्मप्रसारार्थ मुलांच्या हातीं देण्यासाठीं जें बालवाङ्मय मिशनऱ्यांनीं रचिलें त्यामध्यें येशू खिस्ताच्या जीवनांतलि चमत्काराशिवाय इतर गोष्टींना मुळींच स्थान नव्हतें. कित्येकदां गोष्टीरूप पुस्तकांत इतर कथा असल्या तरी त्यांमध्यें खिस्तमाहात्म्य हें असावयाचेंच. केवळ खिस्ताच्या जीवनांतील चमत्कृतिजनक गोष्टी घेऊन रचलेल्या पुस्तकांत 'शास्त्रांतील कांहीं गोष्टी,' 'आमचे धन्य उद्धरणाराचे चमत्कार' (१८२६), 'त्रिभुवनाची गोष्ट', 'धर्माच्या मुख्य गोष्टी'(१८२७) इत्यादि पुस्तकें महत्त्वाचीं आहेत.

केवळ खिस्ताच्या जीवनांतील चमत्कारावर आधारलेल्या गोष्टींचीं पुस्तकें मिशनऱ्यांनीं तयार केलीं; त्याबरोबरच इतर व्यावहारिक कथा घेऊन त्यांत खिस्ती धर्माचा मोठेपणा सांगणाऱ्या गोष्टीहि तयार केल्या होत्या. अशा कथावाङ्मयांत 'हेनरी आणि त्याचा संभाळणारा गडी संभू ह्यांची गोष्ट' (१८३३), 'मुलांसाठीं बोधाच्या गोष्टी' (१८३३), 'नवीन पंचोपाख्यान' (१८३७) अशासारख्या गोष्टींच्या पुस्तकांचा समावेश होतो. हेनरी नांवाच्या एका आठदहा महिन्यांच्या मुलाला 'पोरपोरका' करून त्याला एका युरोपियन बाईकडे आणविलें. पुढें त्याचा सांभाळ संभू गड्यानें केला. ही मामुली गोष्ट मिसेस फरारनें 'हेनरी आणि त्याचा संभाळणारा गडी संभू ह्यांची गोष्ट' या पुस्तकांत लिहिली आहे.

मिसेस फरारप्रमाणें मिसेस कँडी यांनीं 'मुलांसाठीं बोधाच्या गोष्टी' (१८३३) लिहिल्या. 'आंबा घेण्याची गोष्ट', 'खादाड पोरांची गोष्ट', 'मुंग्या माशांची गोष्ट,' 'रागाच्या उपायाची गोष्ट,' 'जीभ आटोपण्याविषयीं गोष्ट', 'कुणब्याच्या कुटुंबाविषयीं गोष्ट', 'विधवांची गोष्ट', अशा गोष्टी सांगून या कथासंग्रहद्वारा खिस्ती तत्त्वज्ञानाचें प्रतिपादन लेखिकेनें केलें आहे.

शिक्षामंडळीच्या शाळांमधून वापरल्या जाणाऱ्या 'पंचोपाख्याना'वर खिस्ती मिशनरी सतत टीका करीत असत, हें मागें सांगितलेंच आहे. या पुस्तकाला उत्तर म्हणून मिशनऱ्यांनीं 'नवीन पंचोपाख्यान' (१८३७) तयार केलें कीं काय न

कळे. पांच गोष्टींचा हा संग्रह आहे. 'गुणी मुलगी,' लेखक–लालजी रघुनाथ ओक; 'तीन फुलझाडें,' लेखक–रामचंद्र अमृत दुगल; 'लहान कुतरी,' लेखक–मोरोबा भवानीशंकर परभू; 'द्राक्षें तोडणारे,' लेखक–रघु त्र्यंबकजी सानप; आणि 'मोगऱ्यांचा तुरा,' लेखक–रामा संताजी शिंदे. असा हा विविध लेखकांनीं लिहिलेल्या गोष्टींचा संग्रह आहे. लेखक एतद्देशीय असले तरी भाषेच्या दृष्टीनें मिशनरी छाप दिसतेच दिसते. ख्रिस्ती धर्माचा मोठेपणा सांगण्यासाठींच या कथा तयार करवून घेतलल्या आहेत. ख्रिस्ती मराठीचा खालील नमुना पहाः—

"हे माझ्या प्रिया, मी तुला बहुत वेळ सांगितलें, कि आपलीं अंतःकरणें फार दुष्ट आहेत, पवित्र आत्म्याच्या साहाय्यावांचून आपणास चांगलें होववत नाहीं. तो पवित्र आत्मा आह्मासाठीं मिळवायास आमचा तारणारा जो येशू खीस्त, तो क्रूसावर मरण पावला, आणि जीं लहान मुलें जपून चालायास इच्छितात, त्यांचीं वाईट अंतःकरणें दूर व्हावयास, आणि त्यांस पवित्र आत्म्याचें साहाय्य मिळवायास, त्यांजला येशू खीस्ताची प्रार्थना वारंवार केली पाहिजे. असें असतां, मुला तूं प्रार्थना करायास विसरतोस, तर तुझ्याने कद्धीं चांगलें होववणार नाहीं; आणि जर तूं चांगला होत नाहींस, तर मरणानंतर जेथें दुष्ट मुलें जातात ती जागा फार दुःखाची आहे; परंतु तुला त्या वाईट जागेस जाण्याविषयीं माझ्याने गोष्ट काढवत नाहीं."[९]

कांहीं प्रश्नोत्तरावली

मिशनऱ्यांनीं प्रारंभींच्या काळांत जें बालवाङ्मय तयार केलें त्यांतील कांहीं पुस्तकांचा आढावा वर घेतला आहे. याच काळांत ख्रिस्ती धर्माची प्रश्नोत्तर-रूपानें माहिती देण्याच्या पद्धतीचा अवलंब करून तयार झालेल्या प्रश्नोत्तरावली पुष्कळ पहावयास सांपडतात. अहमदनगर येथील अमेरिकन मराठी मिशनच्या संग्रहीं असलेल्या कांहीं प्रश्नोत्तरावली अशा आहेत. :- 'प्रश्नोत्तरावली' (१८१९) रे. निकोल्स व गॉर्डन हॉल यांनीं रचलेली; 'प्रश्न आणि उत्तर' (१८२३); 'मुलां साठीं प्रश्नोत्तरावली' (१८२८)–लेखक, रे. मिचेल; 'लहान मुलांसाठीं प्रश्नोत्तरावली; 'पहिली प्रश्नोत्तरावली' (१८३३)–लेखक, रे. विल्सन; 'प्रार्थनासंबंधी प्रश्नोत्तरें' (१८३६)–लेखक, रे. मंगर.

---

९ **नवीन पंचोपाख्यान.** १८३७. पृ. २०–२१.

ख्रिस्तीधर्मतत्त्वचर्चात्मक पुस्तकें

प्रौढ लोकांमध्यें खिस्ती धर्माच्या स्वरूपाची यथार्थ कल्पना देण्यासाठीं व धर्मप्रसार करण्यासाठीं, याच पद्धतीचीं आणखी कांहीं पुस्तकें तयार झालेलीं आढळतात. उदाहरणार्थ, न्यूवेलकृत 'शुभवर्त्तमान' (१८२४), टॉ. कॅंडीकृत 'येशू खिस्तानें जीं प्रार्थना शिष्यास सांगितली तिजवर टीका' (१८३६), 'भाव कोणावर ठेवावा याचा विचार' (१८३१), 'खरा मार्ग कोणता याचा विचार' (१८३०), 'खऱ्या धर्माचीं चिन्हें' (१८२९), तसेंच मोल्स्वर्थकृत 'पापपीडितांस शांति' (१८२९) इत्यादि. हीं सर्व पुस्तकें अहमदनगर येथील अमेरिकन मराठी मिशनच्या संग्रहीं आहेत. या पुस्तकांचें स्वरूप शालेय दिसत नाहीं. त्यांत खिस्ती धर्माची तात्त्विक चर्चा केलेली आढळते. हीं पुस्तकें तत्कालीन मिशनरी शाळांमधून वापरलीं जात नसावीं असेंहि म्हणतां यावयाचें नाहीं. कदाचित पुरवणीवाचना-दाखल त्यांचा उपयोग केला जाणें शक्य आहे. हीं सर्व पुस्तकें मराठीमध्यें रचतांना भाषेची जी अडचण होती, तीबद्दल डॉ. ॲलन लिहितो :—

"Of such doctrines the people have no idea; and of such affections none among them have ever had any experience. To communicate a knowledge of such doctrines, and intelligibly to describe such affections, new words must be introduced and defined; or words already in use must have new and intelligible significations. The language of the Marathas, as well as the people themselves must be christianized. And the change in the people and in their language must go on together. Neither can very much precede the other." [१०]

क्रमिक पुस्तकें–बाबा पदमनजी

प्रथम पासूनच खिस्ती धर्मोपदेशकांनीं, शिक्षामंडळी अगर सरकारी विद्याखातें यांच्या प्रमाणेंच शाळांत वापरण्यासाठीं बहुतेक विषयांवरील पुस्तकें तयार केलीं होतीं. हीं सर्व पुस्तकें प्रत्यक्ष पहावयास मिळालीं नाहींत; परंतु जीं पाहणें शक्य झालें त्यांवरून या पुस्तकांची कल्पना करतां येते.

ज्याप्रमाणें सरकारी विद्याखात्यातर्फे क्रमिक वाचन पुस्तकांची कल्पना निघून इ. स. १८५७ ते १८६१ पर्यंत तीं तयार झालीं, त्याप्रमाणें मिशनऱ्यांनींहि अशीं क्रमिक वाचन पुस्तकें बनाविलीं. सरकारी क्रमिक वाचन पुस्तकें तयार करण्यांत

---

१० H. Bruce, *The Literary work of the American Marathi Mission.* 1882. p. 13.

मेजर कँडीचें नांव प्रामुख्यानें घेतलें जातें. त्याप्रमाणें ख्रिस्ती शाळांतील मुलांसाठीं ख्रिश्चन व्हर्नॅक्युलर एज्युकेशन सोसायटीतर्फे जीं क्रमिक पुस्तकें तयार झालीं, तीं तयार करण्यांत बाबा पदमनजी यांचें नांव घ्यावें लागेल. इ. स. १८६२ मध्यें मुलांकरितां पहिलें पुस्तक, दुसरें पुस्तक आणि तिसरें पुस्तक, अशीं पुस्तकें तयार झालीं. चौथें पुस्तक इ. स. १८६५ मध्यें रचलें गेलें. या पुस्तकांच्या प्रथमावृत्तीच्या प्रती पहावयास मिळत नाहींत; परंतु त्यांच्या पुढील आवृत्त्यांच्या प्रतींवरून मूळ पुस्तकांची कल्पना येते. उदाहरणार्थ, 'मुलांकरितां दुसरें पुस्तक' (१८७२) आवृत्ति पांचवी: पशु, पक्षी इत्यादिकांची माहिती देणारे कांहीं धडे आणि 'मूर्तिपूजा', 'मूर्तिपूजक', 'मूर्तिपूजकांसाठीं आम्ही काय करावें' या शीर्षकांखालीं कांहीं धडे आहेत. मिशनरी क्रमिक वाचन पुस्तकांतील काव्याचा एक नमुना पहा:—

पंढरी

"जाऊं म्हणतांची पंढरी ॥ नरकराज हर्ष करी ॥१॥
धरितां पंढरीची वाट ॥ जरी मरी घेई पाठ ॥२॥
करितां चंद्रभागा स्नान ॥ देहमळा पडे हान ॥३॥
होतां पांडुरंगदर्शन ॥ पडे दृष्टीसीं पाषाण ॥४॥
दास म्हणे रे केशवा ॥ आम्हा नको रे तुझी सेवा ॥५॥"[११]

बाबा पदमनजींनीं तयार केलेल्या या क्रमिक वाचन पुस्तकांपैकीं पुष्कळशीं पहावयास सांपडलीं नाहींत; तथापि त्यांच्याविषयीं १८६१ च्या 'ज्ञानोदय'च्या २० व्या पुस्तकांत पृ. ३७०–७२ वर माहिती दिलेली आढळते.

विनायक कोंडदेव ओककृत क्रमिक पुस्तकें

बाबा पदमनजी यांच्या नंतर 'बालबोध'कार विनायक कोंडदेव ओक यांच्याकडून ख्रिश्चन व्हर्नॅक्युलर एज्युकेशन सोसायटीनें मिशनरी शाळांसाठीं खास क्रमिक वाचन पुस्तकें तयार करवून घेतलीं. मुलांकरितां पहिलें पुस्तक' भाग १ व २ (हीं पुस्तकें ॲबट् यांच्या कॅटलॉगमध्यें, जे. एस्. हेग व वि. कों. ओक या दोघांच्या नांवावर घातलेलीं आहेत) इ. स. १८७६, 'मराठी दुसरें पुस्तक,' इ. स. १८८२, 'मराठी तिसरें पुस्तक,' इ. स. १८८२, 'मराठी चौथें पुस्तक,' इ. स. १८८५, या क्रमानें हीं पुस्तकें तयार झालीं 'अर्थस्य पुरुषो दासः' याचें ठळक उदाहरण म्हणून ओक यांनीं तयार केलेल्या या पुस्तकांकडे बोट दाखविण्यास हरकत नाहीं. उदाहरणार्थ 'मूर्तिपूजा' नामक एक धडा वाचावा :—

११ बाबा पदमनजी, **मुलांकरितां दुसरें पुस्तक**. आ. ५, १८७२. पृ. ७३

"अशी कल्पना कर कीं, तुला भूक लागली आहे. तुला खायाला पाहिजे आहे; तें तूं आपल्या ममताळू आईपाशीं न मागतां जर एकाद्या दगडापाशीं मागितलेंस, तर तें तुला मिळेल काय? नाहीं. तुला तें मिळणार नाहीं. त्या दगडास तुझें बोलणें ऐकूं सुद्धां येणार नाहीं. पण पुष्कळ लोक अशा वेडेपणाच्या रीतीनें वागतात. ह्मणजे त्यांस जें पाहिजे असतें, तें आपल्या आकाशांतील बापापाशीं ह्मणजे खऱ्या देवापाशीं ते मागत नाहींत, तर तें ते निर्जीव मूर्तीपाशीं मागतात. ह्याविषयीं देवाच्या शास्त्रांत असें लिहिलें आहे :–'राष्ट्रांच्या मूर्ति रुपें व सोनें आहेत, मनुष्याच्या हाताचें काम आहेत. त्यांस मुखें आहेत परंतु बोलत नाहींत, त्यांस डोळे आहेत परंतु दिसत नाहीं, त्यांस कान आहेत परंतु ऐकूं येत नाहीं, त्यांस नाकें आहेत परंतु हुंगतां येत नाहीं, त्यांस हात आहेत परंतु चांचपवत नाहीं, त्यांस पाय आहेत परंतु चालवत नाहीं, आणि त्यांस आपल्या गळ्यांतून शब्द उच्चारवत नाहीं." १२

जरी ओकासारख्या एका हिंदु गृहस्थानें हीं पुस्तकें रचलेलीं असलीं, तरी त्यांत एकहि धडा असा नाहीं कीं ज्यांत खिस्ती धर्मप्रसाराची कल्पना नाहीं. मिशनरी मंडळींच्या योजकतेपेक्षां ओकांची स्वधर्मनिंदेला कारणीभूत होण्याची तयारी विचित्र दिसते. याच काळांत ओकांनीं सरकारी विद्याखात्यालासुद्धां कांहीं शालेय पुस्तकें तयार करून दिलीं होतीं. त्या पुस्तकांची माहिती मागें दिली आहे. त्यांत व्यक्त होणारी राजनिष्ठा आपण समजूं शकतों. या सर्व पुस्तकांतील विचार बाजूला ठेवून त्यांची भाषेच्या दृष्टीनें पाहणी केली तर असें दिसून येईल कीं त्यांची भाषा साधी व सोपी असून मेजर कँडी यांनीं घालून दिलेल्या नियमांच्या चौकटींत बसणारी आहे.

क्रमिक वाचनपुस्तकांखेरीज मुलांना उपयुक्त अशा पुस्तकांत 'वाचनपाठावलि' (१८८४) नामक एक पुस्तक खिस्ती शाळांमधून वापरलें जाई. डॉ. बिसल व रामकृष्णपंत मोडक यांनीं 'ज्ञानोदय' या खिस्ती मासिकांतील निवडक वेंचे एकत्र करून ही 'वाचनपाठावलि' तयार केली, या पुस्तकांत विद्वान व सुधारलेल्या हिंदूपैकीं बाळशास्त्री जांभेकर यांचें त्रोटक चरित्र पृ. १०२–१०३ वर पहावयास सांपडतें.

---

१२ विनायक कोंडदेव ओक, **मराठी तिसरें पुस्तक**. आ. २. १८८६. पृ. ३१–३२.

खास मुलींसाठीं वाचनपुस्तकें

मिशनरी लोकांनीं केवळ मुलांच्याच शिक्षणाकडे लक्ष पुरविलें असें नव्हे, तर प्रथमपासूनच मुलींनाहि त्यांनीं संसारोपयोगी शिक्षण देण्यास सुरुवात केली होती. महाराष्ट्रांत मुलींच्यासाठीं शाळा काढून स्त्रीशिक्षणाला सुरुवात करण्याचें श्रेय ख्रिस्ती मंडळींनाच द्यावें लागतें. इ. स. १८२४ च्या मार्चमध्यें प्रथमच अमेरिकन मिशनच्या वतीनें मुंबईला पहिली मुलींची शाळा स्थापिली गेली. दोन वर्षांच्या अवधींत या शाळेंत सुमारें ७५ मुली शिकूं लागल्या. या शाळेला तत्कालीन सरकारी अधिकाऱ्यांनींहि मदत केली होती. माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टननें पांचशें रुपये, मालकमनें तीनशें रुपये असें आर्थिक सहाय्य या शाळेसाठीं मिळालें होतें. मुलींच्या शाळांत होणारा अभ्यास असा होता:—

"विद्येचीं मूळतत्त्वें ह्मणजे वाचन, लेखन, भुगोल, खगोल, व्याकरण, गणित इत्यादि शिकवीत असें केवळ नाहीं, तर पुढें संसारांत त्यांस फार उपयोगी पडेल असें शिवणकाम व विणकामहि शिकवीत आले आहेत." [१३]

मुलींसाठीं निराळीं पुस्तकें निर्माण करण्याची कल्पना त्यामानानें उशिरानें निघाली. इ. स. १६६८ मध्यें 'स्त्रीकंठभूषण' नामक एक पुस्तक इंग्रजीवरून तयार केलें गेलें. जरी पुस्तकावर लेखकाचें नांव नसलें तरी तें ॲबट यांच्या कॅटलॉगप्रमाणें बाबा पदमनजी यांच्या नांवावर मोडतें.

विचार आणि भाषा या दोनहि बाबतींत विचित्र वाटणारे असे घडे या पुस्तकांत आढळतात. 'नवरा कसा करावा' या शीर्षकाखालील हा घडा पहा :—

"ख्रिस्ती लोकानी लग्न करितांना जो नेम पाळावयाचा तो हाच आहे कीं त्यानी आपलीं लग्नें प्रभूकडल्यासीं करावीं. यांत केवळ मूर्तिपूजकांसीं लग्न करूं नये इतकाच निषेध आहे असें नाहीं, तर जे भक्तिवान ख्रिस्ती आहेत त्यांस नांवाच्या ख्रिस्त्यांशीं (ते जरी चांगल्या चालीने चालणारे असले तरी) शरीरसंबंध जोडण्याची मनाई आहे. प्राचीन काळीं हा नियम मोडून लग्नें होऊं लागल्यानें जग दुष्टाईनें भरलें आणि जलप्रलयाची तयारी झाली. जर भक्तिमान बायको नांवाच्या ख्रिस्ती मनुष्यासीं लग्न करिती तर तीही त्याच्या सारखी धर्माविषयीं अनास्था करणारी होऊन त्यांचीं लेंकरें त्यांच्या सारखींच होतील असा संभव आहे. परंतु जर उभयतां नवरा बायको खरोखर ईश्वरभक्त आहेत तर तीं एकमेकांस आकाशाच्या मार्गांत चालायास सहाय करतील, आणि त्यांच्या लेंकरांचें पाऊल त्यांच्या वाटेंत पडण्याची आशा आहे. तुह्मी अविश्वास्यांच्या जोडीचे होऊं नका; का कीं न्यायीपणा व अधर्म यांचा काय संबंध? आणि उजेड व अंधार यांचा काय भागीपणा?" [१४]

---

१३ रामकृष्ण वि. मोडक, **अमेरिकन मराठी मिशन यासंबंधीं मंडळ्यांची संक्षिप्त बखर**. १८८३. पृ. ५०.

१४ **स्त्रीकंठभूषण**. १८६८. पृ. ८२-८३.

एकाद्या परदेशीयानें वरील सारखें भाषांतर केलें असतें, तर त्यांतील हास्यास्पदता व कृत्रिमपणा हीं क्षम्य ठरलीं असतीं; पण बाबा पदमनजीसारख्यांच्या लेखणींतून तें उतरावें याचें आश्चर्य वाटतें. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत त्यांनीं तयार केलेलीं क्रमिक वाचनपुस्तकें मिशनरी शाळांतून वापरलीं जात असत ही गोष्ट विचारांत घेतली कीं मिशनरी लोकांनीं चालविलेल्या शाळांतील मुलांच्या समोर कशाप्रकारची मराठी भाषा ठेविली गेली, याची कल्पना येते.

भूगोलविषयक पुस्तकें

सरकारी विद्याखात्याच्या शिक्षणक्रमाप्रमाणेंच मिशनऱ्यांच्या शालेय अभ्यासक्रमांत लेखनवाचनाबरोबर गणित व भूगोल हे विषय शिकविले जात असत. महाराष्ट्रांतील जुन्या पौराणिक भौगोलिक कल्पना नाहींशा करून लोकांना शास्त्रीय पद्धतीनें विचार करावयास लावण्याचें काम ज्याप्रमाणें शाळापुस्तक मंडळीनें प्रारंभापासून केलें, त्याप्रमाणें मिशनऱ्यांनीं सुद्धां या विषयावर पुस्तक लिहून मुलांच्या भूगोलसंबंधीं असलेल्या अज्ञानमूलक कल्पना नाहींशा करण्याचा प्रयत्न केला. प्रथम इ. स. १८२४ मध्यें 'खगोल भूगोल इत्यादिक' हें पुस्तक रे० गॉर्डन हॉल यानें रचिलें, आणि इ. स. १८२९ मध्यें रे० ॲलन यानें तें सुधारून वाढविलें. या पुस्तकाच्या प्रारंभींच्या प्रती दुर्मिळ आहेत; परंतु इ. स. १८३५ मध्यें छापलेली जी प्रत उपलब्ध आहे, तिवरून या पुस्तकाच्या रचनेची व भाषेची कल्पना करतां येते.

मुंबईच्या शाळापुस्तक मंडळीतर्फे इ. स. १८३२ मध्यें 'भूगोल आणि खगोल इत्यादिविषयक संवाद' प्रसिद्ध झाले होते. त्याच्याहि अगोर इ. स. १८२४ मध्यें या विषयावरील पुस्तक मिशनऱ्यांच्या वतीनें छापिलें गेलें. जुन्या धार्मिक खुळ्या समजुतींना धक्का देऊन त्य घालविण्याच्या दृष्टीनें मिशनऱ्यांनीं आघाडीला असावें हें साहजिकच होतें. 'खगोल भूगोल इत्यादिक' च्या इ. स. १८३५ च्या उपलब्ध प्रतीप्रमाणें या पुस्तकांत एकंदर सदतीस धडे आहेत. प्रत्येक धड्याच्या शेवटीं कांहीं प्रश्न दिलेले आहेत. पहिल्या दहा धड्यांत 'सूर्यमंडळाविषयीं,' 'पृथ्वीचा आकार व फिरणें,' 'ग्रहणाचें कारण,' 'अचळ ताऱ्यांचें वर्णन,' 'पृथ्वीचे मूळवांटे,' 'वाऱ्यांचें वर्णन,' 'भूमिकंपांचें व ज्वालामुखीचें वर्णन' इत्यादिविषयक माहिती आहे. पुढें प्रत्येक देशाची माहिती. उदाहरणार्थ, 'तुर्क म्हणजे रूमशाम याचें वर्णन,' 'पर्शे म्हणजे इरान याचें वर्णन,' 'भर्मादेश,' 'स्वेदन,' 'रूषे मुलखाचें वर्णन,' 'नेदळंज,' 'स्पेनी देश,' 'प्रुषे देश,' 'आस्त्रे,' 'आमाजोन्या,' 'पातागोन्या,' 'युरपेचें वर्णन,' 'आश्याचें वर्णन' इत्यादि.

वरील सर्व वर्णनांत मिशनरी पद्धतीप्रमाणें ईशस्तुति ठिकठिकाणीं आढळते. 'शास्त्रांत असें लिहिलें आहे, कीं जें कांहीं यहोवाने इछिलें तें त्याने आकाशांत, आणि पृथ्वींत, आणि समुद्रांत, आणि सर्व खोल जाग्यांमध्यें, केलें आहे. पृथ्वीच्या पाठीपासून वाफा उठवितो. पाऊसासहित तो विजा घडवितो. तो आपल्या भांडारांमधुन वारे आणितो. तो आपला वारा सुटवितो, आणि पाणी वाहातात.' [१५] व्याकरणाच्या दृष्टीनें एवढ्याच परिच्छेदाची तपासणी केली तर असें आढळतें कीं कांहीं वाक्यांत कर्ता नाहीं तर एका वाक्यांत 'पाणी' हा एकवचनी कर्ता असून 'वाहातात' हें अनकवचनी क्रियापद त्याला जोडलेलें आहे 'आश्याचें वर्णन' करतांना परधर्मांची नालस्ती केली आहे.

या पुस्तकांत इंग्रजी वाक्यरचना अनेक ठिकाणीं आढळते. उदाहरणार्थ, 'एक बाग नामे एदेन' (पृ. २१), 'सात जणें या नाशापासून गलबतांत तारलीं' (पृ. २१), 'त्यांच्या दूरपणापासून ते एवढे लहान दिसतात' (पृ. ६), 'पृथ्वीच्या पाठीवर सुमारें तीन **चांटे** पाणी आहे' (पृ. ९), 'पृथ्वीचें **पोटमेज** सुमारें आठहजार मिल आहे' (पृ. ३), 'पृथ्वीचें **घेरमेज** सुमारें चोवीस हजार मिल आहे' (पृ. ३), 'पृथ्वीचा एक **सोबती** ह्मणजे चंद्र आहे' (पृ. ३) या वाक्यांमधील जाड अक्षरांतील शब्द पाहिले कीं, गॉर्डन हॉलसारखा एक परदेशस्थ, परभाषी ख्रिस्ती धर्मोपदेशक भूगोलासारखें शास्त्रीय विषयावरील पुस्तक मराठी भाषेंत तयार करतांना कसा धडपडत होता, तें दिसतें.

'खगोल भूगोल इत्यादिक' या पुस्तकानंतर याच विषयावर रे० बर्जेस याचें 'खगोलविद्या,' मिसेस बॅलंटाइनचें 'लहान खगोलविद्या,' रे० फेअरबँकचें 'भूगोलविद्या' हीं पुस्तकें तयार झालीं. इ. स. १८७५ मध्यें रे० फेअरबँकचें 'भूगोलविद्या' हें पुस्तक दोन भागांत प्रसिद्ध झालें. हें पुस्तक प्रश्नोत्तररूपानें लिहिलेलें आहे. यावेळीं मराठी भाषेला सुव्यवस्थित स्वरूप येत असल्यामुळें, मिशनऱ्यांच्या पुस्तकांतील भाषेवरहि त्याचा परिणाम हळुहळु होत होता असें दिसतें.

एतद्देशीयांच्या भूगोल खगोलसंबंधीं अशास्त्रीय कल्पना नाहींशा करण्यासाठीं, नवीन पुस्तकें रचून मिशनऱ्यांनीं तीं आपल्या शाळांमधून वापरलीं तरी त्यांत 'पृथ्वीचा मोठा गोळा आहे. त्याला परमेश्वरावांचून कोणाचा आधार नाहीं,' या कल्पनेलाच त्यांनीं प्राधान्य दिलेलें आढळतें!

---

१५ **खगोल भूगोल इत्यादिक.** १८३५. पृ. १२.

गणितविषयक पुस्तकें

सुरुवातीच्या काळांत मिशनरी अभ्यासक्रमांत, लेखनवाचन, खिस्तीधर्म-विषयक ज्ञान, गणित व भूगोल खगोल एवढेच विषय होते. त्यामुळें भूगोलाप्रमाणेंच गणित विषयावर कांहीं पुस्तकें तयार झालेलीं आढळतात. 'Marathi Numerical tables' (1818), 'Elementary Arithmetic, First Lessons,' by Mrs. Garret (1826), 'Arithmetic, three parts,' by A. Abbott (1837), 'Intellectual Arithmetic,' by Mrs. Ballantine (1840), 'A Small Arithmetic,' by Rev. Fairbank (1848) इत्यादि पुस्तकांची नोंद आढळते. रे० हेनरी ब्रूस यांच्या 'लहान मुलांकरितां गणित' (१८८०) या पुस्तकाचा विशेष म्हणजे तें सचित्र आहे. त्यामुळें तें मुलांना मनोरंजक वाटणें साहजिकच आहे.

सरकारी विद्याखात्याच्या मराठी शाळांप्रमाणें या शाळांमधूनहि बीजगणित व भूमिति हे विषय शिकविले जात, परंतु या विषयांवर मिशनऱ्यांनीं वेगळीं पुस्तकें तयार केलेलीं दिसत नाहींत.

इतिहासविषयक पुस्तकें

इतिहास या विषयावर मिशनऱ्यांचीं अशीं पुस्तकें प्रथम झालीं नव्हतीं. शाळापुस्तक मंडळीतर्फे तयार झालेलें कुशाबा लिमये यांचें 'महाराष्ट्र देशाचें वर्णन आणि इतिहास यांचा प्रश्नोत्तरावलिरूप ग्रंथ' हेंच पुस्तक मिशनरी शाळांमधून वापरलें जाई. तसें पाहिलें तर मराठी भाषेच्या व्याकरणाचाहि अभ्यास मिशनरी शाळांमधून बाळशास्त्री जांभेकर यांच्या 'बालव्याकरणा'वरून होत असे.[१६] इतिहास या विषयासाठीं मिसेस विल्सन यांचीं 'आशुरी आणि बाबेली लोकांचें वृत्तांत कथन', 'ग्रेकी लोकांचें वृत्तांत कथन', 'मेदी आणि पार्शी लोकांचें वृत्तांत कथन' ही पुस्तकें या शाळांत उपयोगिलीं जात. विशेष महत्त्वाचें इतिहासाचें पुस्तक म्हणजे बाबा पदमनजी यांचें 'महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास' (१८६६) हें होय. 'इतिहास शिकल्यानें ईश्वरी सूत्राचा मार्ग बराच स्पष्ट दिसतो,' ही बाबांची या पुस्तकामागील भूमिका आहे. कोणत्याहि विषयावरील शालेय पुस्तक असो, त्यांत खिस्ती धर्माचें महत्त्व या ना त्या प्रकारें पटविण्याची मिशनरी लेखकाची पद्धति बाबा पदमनजीनीं इतिहासाच्या पुस्तकांतहि स्वीकारली यांत आश्चर्यजनक असें कांहींच नाहीं.

---

१६ *Oriental Christian Spectator, Vol. 19.* 1848. p. 400.

शास्त्रीय विषयावरील पुस्तकें

शाळापुस्तक मंडळीनें ज्याप्रमाणें लोकांच्या जुन्या अशास्त्रीय कल्पना नाहींशा करून शास्त्रीय कल्पनांचें बीजारोपण करण्याच्या हेतूनें पदार्थविज्ञान व रसायन या विषयांवरील पुस्तकें शालेय अभ्यासक्रमांत आणिलीं, त्याप्रमाणें मिशनऱ्यांच्या शालेय अभ्यासक्रमांतहि या विषयांना स्थान मिळालें होतें. रे. ॲबटच्या सूचीप्रमाणें 'पदार्थ विद्या, भाग पहिला, शिल्पविद्या' (१८४६) हें या विषयावरील पहिलें पुस्तक दिसतें. हें पुस्तक तयार करतांना शाळापुस्तक मंडळीतर्फे तयार झालेल्या पदार्थ विज्ञानावरील पुस्तकाची मदत लेखकानें घेतलेली दिसते; कारण दोनहि पुस्तकांत कांहीं ठिकाणीं साम्य दिसतें. कदाचित विषय एकच असल्यामुळें कांहीं कल्पना सारख्याच शब्दांत व्यक्त झाल्या असणें शक्य आहे.

लहान मुलांना मनोरंजक होऊन कांहीं प्राण्यांची त्यांना ओळख व्हावी या हेतूनें रे० ह्यूमनें तयार केलेलें सचित्र 'पशुज्ञानप्रकाश' (१८५१) हें एक नोंद करण्यासारखें मिशनरी शालेय पुस्तक आहे. "कोणतीं जनावरें कसीं आहेत, आणि त्यांचे उपयोग व गुण कसे आहेत, हें लोकानीं जाणावें ह्मणून या पुस्तकांत चित्रें काढून संक्षेपाने वर्णन केलें आहे.... मनुष्याने ईश्वराला ओळखून त्याच्या आज्ञेंत राहावें, परंतु गाई बैल, घोडा इत्यादि पशूंस ईश्वराच्या सेवेविषयीं ज्ञान नाहीं. ते मनुष्यापेक्षां हलके व मनुष्यांच्या उपयोगाकरितांच त्यांस ईश्वराने उत्पन्न केलें. आणि बैल, घोडा इत्यादि मनुष्यांच्या कामासाठींच असतां कित्येक अज्ञानी लोक ईश्वरास सोडून त्यांची पूजाअर्चा करितात, आणि त्यापेक्षां आपणास हलकेपणा आणितात. परंतु असें करणें मनुष्यांला योग्य नाहीं." [१७] या शब्दांत ह्यूमनें विषयाचें महत्त्व वर्णिलेलें आहे.

सृष्टिजन्य ईश्वरज्ञान मुलांना व्हावें म्हणून त्यांच्या अभ्यासक्रमांत स्थान मिळालेलें आणखी एक शालेय पुस्तक रे० विल्डरकृत 'ईश्वरीविद्या' (१८५७) हें होय. या पुस्तकाच्या इंग्रजी प्रस्तावनेंत भाषांतरकारानें पुस्तकाची कुळकथा दिली आहे तो म्हणतो कीं या विषयावर एका एतद्देशीय गृहस्थानें एक पुस्तक तयार केलें होतें; परंतु तें तितकेसें चांगलें उतरलें नाहीं. म्हणून आपण हें काम हातीं घेतलें. याठिकाणीं उल्लेखिलेलें पुस्तक पांडुरंग गणोबाकृत 'सृष्टिजन्य ईश्वरज्ञान' (१८४२) हें असावें असें वाटतें. रे० विल्डरनें केलेल्या भाषांतरकार्यांत कांहीं एतद्देशीय पंडितांचें साहाय्य घेतल्याचें त्यानें नमूद केलें आहे.

---

१७ रे. ह्यूम, **पशुज्ञानप्रकाश**. १८५१. पृ. २.

ख्रिस्ती शालेय वाङ्मय व शास्त्रीपंडितांची मदत

यावरून कोणत्याहि विषयावरील पुस्तक असो, तें एतद्देशीय भाषातज्ज्ञांच्या मदतीनें लिहिलें जात असे असें म्हणावयास हरकत नाहीं. प्रारंभापासून ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं जें शालेय वाङ्मय निर्माण केलें तें पाहिल्यावर हॉल, न्यूवेल, मिचेल, कॅंडी, मोल्स्वर्थ इत्यादि युरोपियन लोकांची स्वधर्मप्रसाराची तळमळ स्पष्ट होते. या शालेय पुस्तकांवर लेखक म्हणून जरी युरोपियन धर्मप्रसारकांचीं नांवें छापलेलीं आढळतात, तरी त्यांच्या मदतीला कोणीतरी शास्त्री असतच व हें ऋण त्यांनीं मान्य केलें आहे. त्याबद्दलचे खालील उद्गार ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत.

"We are more indebted to our Hindu friends for our Christian literature than many suppose. To begin with, there is the Shastri, whose name does not appear on the cover of any book, but every page of Marathi that any Missionary has written has passed under his scrutinizing eye. Its English idioms have been twisted into Marathi idioms, and the whole made fairly presentable to critical Marathi readers. The number of those who have helped in the preparation of Christian books are very many but they will never be known by name to history. Nevertheless it would be ungrateful not to acknowledge the debt that will be owed by posterity to the silently working pundit." [१८]

युरोपियन धर्मप्रसारकांनीं तयार केलेल्या शालेय अगर अन्य पुस्तकांवरून जरी शास्त्रीपंडितांची नजर फिरलेली असली, तरी मूळ रचना मराठी भाषेचें अपूर्ण ज्ञान असणाऱ्या परक्या लेखणीनें केलेली असल्यामुळें मराठी भाषेचे बारकावे त्यांत नसणें साहाजिक आहे, याहि गोष्टीची जाणीव त्यांना होती. तथापि या प्रचारी वाङ्मयाकडे भाषेच्या दृष्टीनें न पाहतां, धर्मप्रसारार्थ तें किती उपयुक्त ठरलें या गोष्टीचाच विचार केला, तर ख्रिस्ती धर्मोपदेशकांनीं आपली कामगिरी चांगल्या रीतीनें बजावली एवढें खरें. या मुद्याबाबत रे. ॲबट म्हणतोः—

"Foreigners labour under a great disadvantage, in that the language is not their own, and their productions, even when extensively polished by the help of pundits, must lack

---

[१८] Rev. J. E. Abbott, *A Catalogue of Marathi Christian Literature during eighty years*, 1813-1892. 1892. pp. 8-10.

that attractiveness that the works of Native writers naturally possess. There is however a class of literature where excellence of diction is of lesser importance, and here the missionary may still do most important service." [१९]

मूळ लेखकांची धर्मप्रसाराची दृष्टि बाजूला ठेवून, या वाङ्मयाची भाषिक तपासणी केली तर, तें कसोटीला उतरणार नाहीं. ख्रिस्ती शालेय वाङ्मयाची पूर्ण कल्पना वाचकाला यावी, यासाठीं त्या वाङ्मयांतील कांहीं उतारे ठिकठिकाणीं दिलेले आहेत. त्यांत अनेक अनोळखी शब्द आढळतील, कित्येक ठिकाणीं संस्कृत-प्रचुरता दिसेल, तर कोठें गांवढळ शब्दप्रयोग नजरेला पडतील, विचित्र वाक्यरचना पदोपदीं सांपडेल. या बाबतींत लोकमान्य टिळक 'महाराष्ट्र भाषेची वाढ' नामक एका लेखांत लिहितातः—

" मिशनरी लोकांनीं मराठी भाषेस हातीं धरूनच भाषेचा कोश व व्याकरण करण्याच्या कामीं मदत केली, व छापण्याची कला आणि वर्तमानपत्रें यांचाही महाराष्ट्रांत प्रचार सुरू केला. पण मिशनरींच्या ग्रंथांत मराठी शिकलेल्या साहेब लोकांनीं वापरलेली भाषा खऱ्या मराठी भाषेपेक्षां विचित्र असल्यामुळें मराठी भाषेच्या अभिवृद्धीस मिशनऱ्यांचें व्हावें तसें साहाय्य झालें नाहीं व मिशनऱ्यांचे धेडगुजरी भाषेंतील मराठी ग्रंथ वाङ्मयास कधींही शोभादायक व्हावयाचे नाहींत, किंबहुना हे ग्रंथ खऱ्या मराठी वाङ्मयाचा भाग कधींही समजला जाईल कीं नाहीं, याची शंका आहे. "[२०]

लोकमान्य टिळकांच्या या मतांत पुष्कळ तथ्यांश आहे यांत शंका नाहीं.

———

१९ Rev. J. E. Abbott, *A Catalogue of Marathi Christian Literature during eighty years*, 1813–1892. 1892. Preface. p. 7.

२० **लो. टिळकांचे केसरींतील लेख, भाग ४. १९३०. पृ. ५००.**

प्रकरण सोळावें

मेजर कँडी व एकोणिसाव्या शतकांतील भाषिक वाद

मेजर कँडी व आदर्श भाषांतर

एकोणिसाव्या शतकामध्यें निरनिराळ्या विषयांवरील शालोपयोगी पुस्तकें कसकशीं तयार झालीं व त्यांमागील सरकारी विद्याखात्याचें म्हणजेच पुष्कळ अंशीं मेजर कँडी यांचें भाषाविषयक धोरण काय होतें, याचें दिग्दर्शन मागील कांहीं प्रकरणांत केलेलें आहे. मराठी ट्रान्स्लेटरच्या जागेवर असल्यामुळें मेजर कँडी यांच्या म्हणण्याला मान असणें साहजिक आहे; परंतु त्यापेक्षांहि, मराठी भाषेचा व व्याकरणशास्त्राचा त्यांचा अभ्यासहि सखोल होता. त्याच्या जोरावर त्यांनीं मराठी भाषेच्या घटनेंत महत्त्वाचे फेरबदल घडवून आणिले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील मराठी गद्यग्रंथांची भाषिक घडण, ही त्यांच्याच श्रमाचें फळ होय असें म्हणावयास हरकत नाहीं. विशेषत: इ. स. १८४७ मध्यें त्यांची मराठी ट्रान्स्लेटर म्हणून नेमणूक झाल्यापासून तों इ. स. १८७६ मध्यें दृष्टिदोषामुळें त्या जागेचा राजीनामा देईपर्यंत, मराठीमध्यें लिहिल्या गेलेल्या अनेक पुस्तकांत त्यांनीं व्याकरणाच्या दृष्टीनें जे फेरबदल केले, ते पाहिल्यास वरील विधानाची सत्यता पटण्यासारखी आहे. इतरांनीं लिहिलेलीं पुस्तकें तपासण्याबरोबरच त्यांनीं दुसरी महत्त्वाची कामगिरी केली ती म्हणजे मराठी भाषेंत उपयुक्त इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें करणें व करवून घेणें ही होय. पुणें कॉलेजचे प्रमुख म्हणून काम करीत असतां, कॉलेजमधील विद्यार्थ्यांकडून आदर्श भाषांतरें करवून घेण्याचें काम त्यांनीं केलें. परभाषेंतून मराठीमध्यें चांगलीं भाषांतरें व्हावींत म्हणून त्यांनीं कांहीं नियम तयार केले होते. दिल्ली व्हर्नाक्युलर सोसायटीनें भाषांतरासाठीं केलेले नियम वाचून, मेजर कँडीनीं हे नियम बनविले होते. भाषांतर करतांना मुळांतील सर्व विचार व्याकरणशुद्ध मराठी भाषेंत कसे आणावे, शब्दशः भाषांतर करणें कां टाळावें परक्या भाषेंतील शब्द, मराठीमध्यें कोणत्या पद्धतीनें लिहावे, अनोळखी शब्दांबद्दल वाचकांच्या माहितीसाठीं टीपा कोठें व कशा द्याव्या, शास्त्रीय शब्दांबद्दल पारिभाषिक शब्द कसे तयार करावे, दोन भिन्न भाषांतील शब्दांचे समास कसे टाळावे, इत्यादि सर्व सूचना मेजर कँडी यांनीं 'Hints for the guidance of Translators' नामक लेखांत दिलेल्या आढळतात. हा लेख परिशिष्ट (१) मध्यें मुद्दाम दिला आहे.

वाचनपाठमाला

पुणें कॉलेजमध्यें इतर विषयांबरोबर शालेय इंग्रजी पुस्तकांचीं भाषांतरें करण्यासाठीं 'भाषांतर' या विषयाचाहि अंतर्भाव केलेला होता. कॉलेजमधून आदर्श भाषांतरकार निर्माण करण्याच्या हेतूनें, मॅकलूकच्या तिसऱ्या पुस्तकाचें भाषांतर करण्याचें काम प्रथम हातीं घेण्यांत आलें. त्यांतील कांहीं धड्यांचें भाषांतर खुद्द मेजर कॅंडी यांनीं केलें व कांहीं धड्यांचें विद्यार्थ्यांकडून करवून घेतलें. या सर्व भाषांतरित धड्यांचें एक पुस्तक तयार झालें व तें 'वाचनपाठमाला' या नांवें इ. स. १८५० मध्यें छापिलें गेलें. आदर्श भाषांतर कसें असावें, त्याचा नमुना म्हणून हें पुस्तक विद्यार्थ्यांसमोर ठेवावें व इतर लोकांमध्येंहि त्याचा प्रसार व्हावा म्हणून या पुस्तकाची जाहिरात कांहीं वर्तमानपत्रांतून द्यावी, अशीहि एक कल्पना पुढें आली. मेजर कॅंडी यांना जाहिरातबाजी पसंत नव्हती. ज्याप्रमाणें एकादा आदर्श समाजसेवक आपल्या समाजसेवेच्या कार्यानें प्रसिद्धि मिळवितो, त्याला आपल्या कार्याची जाहिरात आपणच करावी हें पसंत पडत नाहीं, त्याप्रमाणें मेजर कॅंडी यांनाहि जाहिरातीच्या मार्गानें आपल्या कामाची माहिती सर्व लोकांस व्हावी, हें नापसंत होतें. तथापि या पुस्तकाची व त्यामुळें भाषांतर कसें करावें, यासंबंधींची कल्पना लोकांस यावी या हेतूनें जाहिरातीच्या सूचनेला मेजर कॅंडी यांनीं स्वतः होऊन पाठिंबा दिला. या बाबतींत शिक्षामंडळीच्या चिटणिसाला लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतातः—

"One of the objects in view of collecting these pieces into a book and publishing them is that they might serve as a help and a guide to translation...But that this object may be attained, it is necessary that the existance of the book should be known both to European students of Marathee and to natives acquainted with English. Newspaper fame I have always rather shunned than sought. I have never puffed myself, nor got anyone else to puff me. Consequently when the Dictionary was published, the press (excepting the O. C. S.) took no notice of it. But in order to make it known that such a work has been prepared, what think you of sending a copy of the Vernacular Reader to one or more of the Bombay Papers?" [१]

---

१ *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1850. p. 124.

शिक्षामंडळीच्या नियमांचें दादोबा पांडुरंगकृत भाषांतर

आदर्श भाषांतरें निर्माण होण्याच्या दृष्टीनें मेजर कँडी यांनीं भाषांतरकारांना दिलेल्या सूचनांचा उल्लेख मागें आलाच आहे. या सूचना देतांना त्यांच्या मनांत दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनीं शिक्षामंडळीच्या सांगण्यावरून मंडळीच्या नियमांचें केलेलें भाषांतर असावें असें वाटतें. इ. स. १८४७ मध्यें शिक्षामंडळीनें दादोबांना मंडळीच्या इंग्रजी नियमांचें मराठी भाषांतर करावयास सांगितलें होतें. दादोबांनीं तें करून मंडळीकडे पाठवून दिलें; परंतु मेजर कँडी यांचा विचार घेतल्याशिवाय तें छापून बाहेर पडणें शक्य नव्हतें. मेजर कँडीनीं तें वाचून त्यावर अभिप्राय दिला कीं दादोबांनीं केलेलें भाषांतर फार चुकीचें आहे. त्यांत पुष्कळ फेरबदल करावे लागतील. भाषांतराचें काम आपणहि करूं, मात्र सध्यां कोशाच्या कामांत गुंतल्यामुळें यावेळीं तें शक्य नाहीं. असें सुद्धां मेजर कँडीनीं शिक्षामंडळीला कळविलें. याच पत्राबरोबर त्यांनीं शिक्षा-मंडळीचे चिटणीस स्टोवेल यांना एक खासगी पत्र लिहिलें. त्यांत दादोबा व त्यांनीं केलेलें भाषांतर यांबद्दल ते म्हणतातः—

"It is **Very bad**. I, of course, will lithograph it if the Board wish it, but I feel it my duty to bring to their notice how erroneous it is... I do it very reluctantly first because I am very sorry to lower the reputation of Dadoba Pandurang for whom, though I am not personally acquainted with him, I have a very kind feeling and secondly because **I don't want** to have it to do myself. But of course I must do my duty." [२]

मेजर कँडी यांच्याप्रमाणेंच जॉर्ज जर्विस याचेंहि मत प्रतिकूल पडलें. जर्विस लिहितो :—

"Dadoba Pandurang is a man whom we consider sincere....He was appointed the master of the Surat School and has been selected for the charge of the normal class, and superintendence of the vernacular schools at the Presidency, on account of his attainments being superior to all others educated under this system. This man, who, it must be therefore supposed, understands the meaning of the English regulations of the Board, cannot convey them intelligibly in his own language." [३]

---

२ *D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1847. p. 62.

३ Ibid. p. 65.

अशा परिस्थितींत, मेजर कँडी यांनीं तें भाषांतर तपासून शिक्षामंडळीकडे पाठवून दिलें. मंडळीनें दुरुस्तीसाठीं तें पुन्हां दादोबांकडे धाडलें. दादोबांना या घटनेबद्दल वाईट वाटलें व त्यांनीं शिक्षामंडळीला कळविलें :—

"It must always be unpleasant to the feelings of any person, and most painful to one in my position to speak much in his self-defence, but when dragged to the necessity of doing so, he cannot do himself injustice to avoid furnishing even a short indication. It suffers therefore to state here for thorough knowledge of the Board that the criterion employed by the author of the memorandum for testing my translation is of such a nature that no translation whatever, can stand its severity. It is impossible to translate verbatim and at the same time idiomatically from one language into another however closely allied. Much then to do so from English into Marathee both on account of the vast difference of their idioms, and also of the comparative poorness of the latter." ४

या पत्रासोबत दादोबांनीं कांहीं सुधारणा करून तें भाषांतर शिक्षामंडळीकडे पाठवून दिलें. तें मेजर कँडीकडे येणें क्रमप्राप्त होतें; आदर्श भाषांतर कसें असावें याबद्दलची आपली कल्पना यावेळीं मेजर कँडीनीं पुन्हां एकदां स्पष्ट केली ती अशी:—

" If only that translation is to be considered correct which has been made verbatim then indeed the test is a very severe one, but I am no advocate for verbatim translations. if, however, that should be considered a correct translation which **renders fully** and fairly the ideas expressed in the original, then my test seems not only a good one, but almost the only practicable one, if a translation, on being retranslated, be found to give only a part of the ideas expressed in the original, or if it gives **some other** ideas, then it is not a correct translation, but if it gives the same ideas though under different expressions, I consider it to be faithful."५

या कसोटीप्रमाणें दादोबांचें भाषांतर आपणांस पसंत नाहीं असें त्यांनीं शिक्षामंडळीला सिद्ध करून दाखविलें व दादोबांबद्दल कडक शब्दांत आपलें मत व्यक्त केलें. 'मराठी भाषेचे पाणिनी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दादोबा पांडुरंगांबद्दल मेजर कँडी लिहितातः—

४ *D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1847. p. 70.
५ *D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1848. p. 76.

"I very much regret that I cannot speak more favourably of the work of one who is doubtless a meritorious and very useful servant of the Board; and of whom I have always thought with respect since I have known him by report; but while I acknowledge that it is easy to find fault with that which it may not be easy to excel, I feel it my duty to say that I do not consider D. P.'s translation of the Rules to be worthy of adoption as an official Marathee version of them." [६]

'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' या दादोबांच्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति निघण्याच्या अगोदर मेजर कँडी यांनीं त्या ग्रंथाबाबत जे विचार मांडले होते ते व सदरहु भाषांतराबाबत व्यक्त केलेले वरील विचार सारखेच आहेत. मेजर कँडी यांच्या नापसंतीमुळें शिक्षामंडळीनें हें भाषांतराचें काम खुद्द मेजर कँडी यांच्याकडेच सोपविलें व सुमारें दीडवर्ष चाललेल्या या वादावर कायमचा पडदा टाकला. कँडीनीं हें काम पार पाडलें कीं नाहीं तें समजत नाहीं. आदर्श भाषांतर कसें असावें, याबद्दलचीं मेजर कँडी यांचीं मतें या वादावरून व्यक्त होत असल्यामुळें, त्याचा इतिहास थोडक्यांत याठिकाणीं देणें आवश्यक वाटलें.

मेजर कँडी व भाऊ महाजन

मेजर कँडी यांच्या कल्पनेप्रमाणें, बहुतेक भाषांतरकारांनीं इतिहास, भूगोल, पदार्थविज्ञान रसायनादि शास्त्रें इत्यादि विषयांवरील इंग्रजी ग्रंथांचीं मराठीमध्यें भाषांतरें केलीं; परंतु मेजर कँडी यांचे आदर्श भाषांतराबद्दलचे विचार त्यावेळच्या कांहीं मराठी भाषाभिमानी विद्वानांना आवडले नाहींत. तसेंच मेजर कँडीसारख्या परभाषिकानें एतद्देशीयांच्या मराठी लेखनांतील अशुद्धें व चुका दाखवाव्या, हें त्यांना पटण्यासारखें नव्हतें. त्यामुळें मेजर कँडी यांच्या भाषाविषयक धोरणावर जाहीरपणें टीका होऊं लागली. टीकाकारांमध्यें गोविंद विठ्ठल ऊर्फ भाऊ महाजन हे प्रमुख होते. त्यांना मेजर कँडी यांची मराठीभाषाक्षेत्रांतील सासुगिरी मुळींच पसंत पडली नाहीं व 'प्रभाकर' मधून त्यांच्याविरुद्ध भाऊनीं टीकेची झोड उठविली. 'प्रभाकरा'चे तत्कालीन अंक उपलब्ध झाल्यावांचून त्या टीकेची पूर्ण कल्पना येऊं शकणार नाहीं. भाऊ महाजनांच्या स्वभाषाभिमानदर्शक झुंझार वृत्तीची अटकळ करावयाची झाल्यास, त्यांच्यावरील मृत्युलेखांत 'विविधज्ञानविस्तार' कर्त्यांनीं सांगितलेल्या एका घटनेचा उल्लेख करणें आवश्यक आहे. 'विस्तार'कर्ते लिहितातः—

---

६ *D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1848. P. 77.

"शालोपयोगी मराठी पुस्तकें करण्याकरितां, आणि बेकनकृत 'नोव्हम् ऑर्गेनम्' नामक शास्त्रीय ग्रंथाचें मराठी भाषांतर करण्याकरितां त्यांस डिरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन् मिस्टर हॉवर्ड यांणीं सूचना केली होती, आणि त्यांणींही तें काम कबूल केलें होतें. परंतु त्यांची अट अशी होती कीं मराठी भाषा ही आमची आहे, इजमध्यें अमुकच रीतीनें लिहा, अमुक रीतीनें लिहूं नका, हें सांगण्याचा अधिकार मराठी विद्वानांलाच आहे. परक्यांना नाहीं. आमच्या भाषेमध्यें अमुक शुद्ध, आणि अमुक अशुद्ध हें आमचें आह्मांला ठाऊक आहे. त्यावर परक्या मनुष्यानें ढवळाढवळ करणें आह्मांस मान्य नाहीं. यास्तव मी लिहिलेले ग्रंथ विद्याखात्याचे भाषांतरकार मेजर क्यांडिसाहेब यांजकडे, शुद्ध करण्याकरितां ह्मणून आपण पाठवूं नयेत. परंतु हॉवर्ड साहेबांनीं तें ह्मणणें मान्य केलें नाहीं, आणि तें काम चालू झालें नाहीं. ही मोठी दुःखाची गोष्ट होय."[७]

भाऊ महाजनांनीं जरी कितीहि टीका केली तरी मेजर कँडी यांच्या भाषाविषयक धोरणावर तिचा यत्किंचितहि परिणाम होऊं शकला नाहीं; उलट 'ज्ञानोदय' नामक ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या मासिकांतून त्या टीकेला उत्तरें दिलीं गेलीं. मेजर कँडीनीं कसल्याहि टीकेला भीक घातली नाहीं; तथापि शेवटीं त्यानांहि आपली लेखणी उचलावी लागली व टीकाकारांना उत्तर देणें भाग पडलें. उत्तरादाखल लिहिलेल्या पत्राच्या शेवटीं मेजर कँडी म्हणतातः—

"ह्या पत्राचे शेवटीं माझें मुख्य सांगणें हेंच आहे कीं, माझ्या ग्रंथांतील दोष कोणी काढूं नयेत असें माझें मत सर्वथा नाहीं. मी जे ग्रंथ छापून प्रसिद्ध केले आहेत त्यांतील शुद्धाशुद्धाचा विचार ज्यास पाहिजे त्यानें करावा; परंतु त्यानें जीं वास्तविक अशुद्धें असतील तीं प्रामाणिकपणें काढावीं; त्यानें माझी उगीच निंदा करूं नये व हे अमुक वाईट उद्देशानें अमुक गोष्ट करतात असें म्हणूं नये. इतरांपासूनही घडण्याचा संभव आहे, आणि कोणी प्रांजलपणें जर माझ्या चुक्या काढील तर मी त्याचे उपकार मानीन.

"आतां मी इतकेंच सांगतों कीं ज्या भाषांतर करण्याविषयीं मी वर लिहिलें आहे तें इंग्लिश भाषेंतल्या चालीप्रमाणें मराठी लिहिणें जर सोडून देतील, तसेंच कोंकणांतच ज्या बोलण्याच्या रीती आहेत त्या व बोलण्याच्या इतर वाईट चाली आहेत त्या सर्व मोडून जर चांगले ग्रंथ लिहितील, तर ह्यांचे ग्रंथ चांगले आहेत असें मी आपलें मत देण्यास अगदीं तयार आहे.

"ह्या ग्रंथकारांपैकीं एकानें 'भाषांतर करणाऱ्यांचा उपमर्द करणारा' असा किताब मला दिला आहे. तर दोषयुक्त भाषांतरें हाणून पाडणारा कोणी तरी पाहिजेच. तरी चांगलीं भाषांतरें करणारे जे असतील त्यांस उत्तेजन देण्यास मला विशेष संतोष आहे. कां कीं दुसऱ्याचे दोष काढण्यापेक्षां दुसऱ्याच्या गुणांचें कीर्तन करणें मला फार आवडतें."

---

७ **विविधज्ञानविस्तार**, पु. २२ अं. १–२. १८९०. पृ. २४, ब.

मेजर कँडी यांनीं उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रांतील वरील उताऱ्यावरून, त्यांच्या भाषाविषयक धोरणाची कल्पना करतां येते. तपासणीसाठीं त्यांच्या हातीं आलेल्या पुस्तकांच्या भाषेवरून त्यांना असें वाटे कीं पुष्कळसे एतद्देशीय भाषांतरकार इंग्रजी भाषा चांगली जाणतात; परंतु मातृभाषेंतून इंग्रजी ग्रंथांतील विचार व्यक्त करतांना त्यांच्या हातून बऱ्याच चुका होतात. याचें कारण मेजर कँडी यांच्या मतें या सर्व लेखकांचा मातृभाषेचा व संस्कृत भाषेचा अभ्यास फारच अपुरा हें होतें. भाषांतरांत होणारे ठळक दोष दाखविण्याचें कटु कर्तव्य मेजर कँडी यांना करावें लागे. तें करतांना आपण कोणालाहि शक्य तों न दुखविण्याची खबरदारी घेत असल्याचें ते वारंवार म्हणत असत. त्याच्याउलट 'प्रभाकर' कर्त्यांनीं त्यांच्याविरुद्ध रान उठविलें. मेजर कँडीना मराठी भाषेचें मुळींच ज्ञान नाहीं, सदाशिव काशिनाथ छत्रे, बाळशास्त्री जांभेकर इत्यादिकांना ते कमी लेखतात, हरि केशवजीसारख्या भाषांतरकर्त्यापेक्षांहि स्वतःला ते श्रेष्ठ समजतात, इत्यादि आरोप मेजर कँडी यांच्याविरुद्ध केले गेले, व त्यांना उद्देशून मेजर कँडी यांनीं वरील पत्र लिहिलें.या पत्रव्यवहाराचा कांहीं भाग परिशिष्ट (२) मध्यें दिला आहे.

मेजर कँडी व 'ज्ञानप्रसारक' कार

शालेय पुस्तकांप्रमाणेंच कांहीं उपयुक्त नियतकालिकें मुलांच्या वाचनांत यावीं या हेतूनें विद्याखातें 'ज्ञानप्रसारक,' 'चंद्रिका' यांसारख्या मासिकांच्या कांहीं प्रती विकत घेत असे. ज्याअर्थी हीं मासिकें मुलांच्या हातीं येत होतीं, त्याअर्थी त्यांची भाषा व त्यांमधील विचार यांची तपासणी होणें जरूर होतें. हें काम ओघानेंच मेजर कँडी यांजकडे आलें होतें. मेजर कँडी यांनीं नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें तपासणीचें काम केलें. तपासलेल्या मासिकांपैकीं 'ज्ञानप्रसारक' मासिकाच्या माहे जुलै, १८५७ च्या अंकावर त्यांनीं जो टीकालेख लिहिला त्यामुळें मोठें वादळ निर्माण झालें. 'ज्ञानप्रसारक' कारांना त्या टीकालेखांतील कांहीं मुद्दे न पटल्यामुळें त्यांनीं मेजर कँडी यांना उत्तरादाखल एक पत्र लिहिलें. यांतूनच वादविवादाला सुरुवात झाली. या वादांत त्रयस्थ या नात्यानें, पुणें कॉलेजमधील मराठीचे प्राध्यापक कृष्णशास्त्री चिपळूणकर व दक्षिणा प्राइझ कमिटीचे 'रिवैजर' नानाशास्त्री आपटे यांनीं आपलीं मतें दिलीं. तेवढ्यानें 'ज्ञानप्रसारक' कर्त्यांचें समाधान न होऊन त्यांनीं पुन्हां एकदां आपलें म्हणणें मेजर कँडी यांच्यापुढें मांडलें. शेवटीं मेजर कँडी यांनीं आपलें निर्णायक मत देऊन या वादविवादावर पडदा टाकला. हा सर्व पत्रव्यवहार इतर मराठी भाषिकांना मार्गदर्शक व्हावा या हेतूनें विद्याखात्यातर्फे तो 'Correspondence on the subject of the Dnyanprasarak' या नांवानें इ. स. १८५८ मध्यें छापिला गेला. हीं मूळपत्रें

सरकारी दप्तरखान्यांत पहावयास मिळतात. तीं बारकाईनें वाचल्यानंतर, मेजर कँडी व 'ज्ञानप्रसारक' कार यांच्यामध्यें कोणकोणत्या व्याकरणविषयक मुद्यांवर मतभेद होता, त्याची पूर्ण कल्पना येते. या चर्चेंत मेजर कँडी यांची भूमिका त्यांच्याच शब्दांत सांगावयाची झाली तर ती अशी होती:—

"I am very desirous that the magazine of the Dnyan Prasarak Society should be instrumental in furthering the improvement of the Marathi language and should not be chargable with aiding to deteriorate it. I would, therefore, earnestly suggest to the conductors of it, that greater care should be taken to exclude foreign idioms and incorrect construtcions." ८

भाषा व विचार या दोन्ही बाबतींत मुलांच्या हातीं देण्याला योग्य अशीं मासिकें असावीं, या शुद्ध हेतूनेंच मेजर कँडी त्यांतील दोष दाखवित असत. विशेषतः भाषेच्या शुद्धतेबद्दल त्यांचा किती कटाक्ष असे, हें त्यांच्या एका पत्रांत व्यक्त होतें. मेजर कॅंडी लिहितातः—

"Government cannot consistently countenance and circulate periodicals which tend to bring the governing class of persons into contempt; Nor can Government without fear of injuring public interest, circulate trashy productions, or papers, written in a vulgar, unidiomatical and ungrammatical style. If papers of this last description be circulated in schools, great injury may be the result. They may be considered as the Government standard of composition, and vitiation of the language may ensue." ९

शाळांमधील मुलें जीं पुस्तकें अगर मासिकें वाचतील, त्यांची भाषा व लेखनपद्धति सरकारमान्य आहे, असें मुलांस वाटेल; यासाठीं तीं व्याकरणशुद्ध असलींच पाहिजेत म्हणून मेजर कँडी त्यांत दुरुस्त्या सुचवित व त्या अमलांत आणण्याचा प्रयत्न करीत. या प्रयत्नांत त्यांना विरोध होणें साहजिकच होतें. यावेळीं 'ज्ञानप्रसारक'कारांनीं सुद्धां आपली बाजू खंबीरपणें मांडली. मेजर कँडी यांना उत्तर देतांना 'ज्ञानप्रसारक'कार लिहितातः—

"As official and authoritative criticisms considerably affect the character of literary publications, it would be better if such criticisms were made only where urgently required and when their accuracy can be proved beyond doubt." १०

---

८ *D. P. I. Miscellaneous, Vol. 32.* 1858. pp. 134–135.
९ *Ibid.* p. 108.
१० *Ibid.* p. 155.

भाषेचें व्याकरण व लोकव्यवहार

मेजर कँडी यांच्या सूचना पुष्कळ वेळां लोकव्यवहाराला सोडून असल्यामुळें त्यांचा स्वीकार लगेच होणें फार कठीण पडे. जरी त्यांच्या दुरुस्त्या व्याकरणनियमांनुसार असत, तरी प्रघातांत नसलेली भाषापद्धति अगर वाक्यरचना सुचवून ती गळीं उतरविण्याचा त्यांचा प्रयत्न असल्यामुळें लोकमताचा त्यांना विरोध होई. भाषाविषयक सूचना पूर्ण विचारांनीं व्हाव्या असें 'ज्ञानप्रसारक' कारासारख्यांना वाटे. म्हणूनच त्यांनीं मेजर कँडी यांना वरील विनंति केली. त्याशिवाय त्यांनीं एक भाषाशास्त्रविषयक सिद्धांत मेजर कँडी यांच्याकुडें मांडला. तो असाः—

"In the science of language, nothing is more to be guarded against than theory of what is commonly called universal grammar. Here, as in all physical sciences the rules which Leonardo da Vinci laid down a hundred years before Bacon, applies with particular force :— 'Begin with observations, go on with experiments, and supported by both, try to find out laws and causes.' There is more philosophy in the simple facts of language than in the most recondite system of universal grammar."[११]

मेजर कँडी यांच्या भाषाविषयक सूचना अमान्य करतांना, 'सॅटर्डे रिव्ह्यू'च्या तारीख २९ मे, १८५८ मधील हा मार्मिक उतारा 'ज्ञानप्रसारक' कारांनीं दिला. मेजर कँडी यांनीं भाषाशास्त्राचा अभ्यास कोणत्या पद्धतीनें करावा, याचें जणुं मार्गदर्शन करणारे ते विचार आहेत. मेजर कँडी व 'ज्ञानप्रसारक'कार यांच्यामध्यें झालेल्या या वादविवादांत, त्रयस्थ म्हणून ज्यांचीं मतें विचारांत घेतलीं गेलीं, त्या कृष्णशास्त्री चिपळूणकर व नानाशास्त्री आपटे यांची भूमिका अधिक शास्त्रशुद्ध होती. ते दोघे म्हणतातः—

"In the discussions of grammar, authority and usage are considered as the sovereign guiding principles. प्रयोगशरणाः वैयाकरणाः. Grammar does not and ought not to govern and mould a language. Its object is much humbler. It examines the whole body of the language and tries to find out certain general principles by which its formation and use are governed. It is not for the language to harmonize with any artificial system of grammar, but it is for the grammar to harmonize with the lan-

११ *D. P. I. Miscellaneous, Vol 32.* 1858. pp. 156-157.

guage. Again it is argued that grammar should deal with language in the same way as modern philosophy deals with physical facts. It should not pretend to form a new language, but should try to discover the actual rules by which an existing language is governed.

"It is our humble opinion that the above reasoning is valid to a great extent, but it is not so entirely. We believe that popular usage is a great regulator in constructing a system of grammar, but we cannot think that it is the only regulator. Besides usage, there are other principles which demand, at least, equal attention, as analogy, simplicity, etc. For instance, when there are two forms in use, one in accordance with the rules and the other in opposition to them, we believe that the former should be sanctioned, and the latter condemned. This we should do for the sake of simplicity.

"We again beg to observe that those, who attach supreme authority to usage in grammar do not mean usage in general, but the usage which is prevalent among classical writers. But it may be asked here why in framing the rules of the language, preference should be given to the expressions of the educated And superior minds before those of the uneducated and common ones ? In other words why should we sanction and perpetuate the former and condemn and suppress the latter ? Answer that can be given to these questions is, that the former, for obvious reasons, are more consonant with the principles of logic than the latter. From this, it will be perceived that it is not only usage, but usage supported by logical considerations which ought to guide us in discussions similar to the one under notice." [१२]

हेच विचार कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं आपल्या 'मराठी व्याकरणावरील निबंधां'त व्यक्त केलेले आढळतात. ते लिहितातः—

"...आतां युक्ति व रूढि यांच्यामध्यें विरोध असल्यास रूढि प्रबळ होय. म्हणजे प्रयोग करणें तो युक्तीस सोडून रूढीप्रमाणें करावा....याप्रमाणें भाषाविचारांत रूढि प्रधान खरी, तथापि रूढि दोन्ही प्रयोगांस सारखी अनुकूल असून एकास युक्ति

१२ *D P. I. Miscellaneous. Vol. 32.* 1858. pp. 140–141.

साधक व दुसऱ्यास ती बाधक असल्यास ज्यास युक्ति साधक तो विशेष ग्राह्य असें आम्हांस वाटतें. 'प्रयोगशरणाः वैय्याकरणाः' या न्यायांतील अभिप्रायहि वर सांगितल्याप्रमाणेंच वर्णिला पाहिजे. तसेंच वरील न्याय संस्कृतांतील आहे. व त्या भाषेंतही एकाद्या व्याकरणाच्या सामान्य नियमाशीं विरुद्ध प्रयोग एकाद्या मान्य ग्रंथांत असला तरी तेवढ्यावरून तो प्रयोग ग्राह्य व इतरांनीं करण्यास योग्य असा समजत नाहींत. जेथें तो असेल तेथें मात्र त्याची कशी तरी उपपत्ति करतात म्हणजे त्यास अशुद्ध मात्र म्हणत नाहीं. परंतु तसा प्रयोग कोणी नवीन केल्यास त्यास दोष देतात." [१३]

'ज्ञानप्रसारक'कार व मेजर कँडी यांच्या वादांत कृष्णशास्त्री चिपळूणकर आणि नानाशास्त्री आपटे यांनीं दिलेल्या निर्णयपत्रकांत त्यांनीं हेंहि कबूल केलें कीं, मेजर कँडी यांच्या हाताखालींच आपण मराठी भाषेचा अभ्यास केलेला असल्यामुळें त्यांच्या व आपल्या मतांत फारसा फरक पडणार नाहीं. तरीसुद्धां जेथें प्रामाणिक मतभेद असतील, तेथें ते स्पष्टपणें मांडण्याचें मनोधैर्य त्यांनीं दाखविलें.

'गौरकाय जलचरें'

'ज्ञानप्रसारक' आणि मेजर कँडी यांच्या वादविवादांत दोघांची भूमिका कोणती होती हें जाणून घेतल्यावर, त्यांच्यामधील विवाद्य मुद्यांपैकीं कांहीं, समजून घेणें आवश्यक आहे. 'ज्ञानप्रसारका' च्या ज्या अंकाच्या तपासणीमुळें या वादाला तोंड फुटलें, तो अंक—जुलै, १८५७—पाहतां, त्यांत 'हिंदुस्थानांत विद्येचा प्रसार' नामक एक लेख आहे. त्यांतील एक विचार मेजर कँडीना फार झोंबला. तो विचार असा होता :—"खरा विद्याप्रसार, ज्यापासून भरतखंड सुखी आणि सुप्रकाशित होईल अशी आम्ही आशा करितों, त्याची प्रवृत्ति आणि वृद्धि केल्याचें यश, प्राचीन काळचे हिंदु राजे, मधल्या काळचे मुसलमान, आणि अर्वाचीन काळचे मराठे, यांतून कोणासही न मिळतां, तें पश्चिमेकडील गौरकाय जलचरें, ज्यांच्या वानरजातीय पूर्वजांनीं पूर्वी रामास रावणावर जय मिळवून दिला होता, आणि त्याबद्दल सीतेनें त्यांस पुढें हिंदुस्थानचें राज्य प्राप्त होईल असा वर दिला होता, त्यासाठीं खिस्ती शकाच्या एकुणिसाव्या शतकापर्यंत राखून ठेविलें होतें." [१४]

युरोपियन लोकांना 'गौरकाय जलचरें' म्हणून संबोधणें व त्यांना वानरजातीचे वंशज ठरविणें ही गोष्ट मेजर कँडी यांना न आवडणें साहजिक होतें. राज्यकर्त्यांबद्दल अनादर निर्माण करण्याची कल्पना यामागें आहे, अशी मेजर कँडी यांची समजूत

---

१३ **कृष्णशास्त्री चिपळूणकरकृत मराठी व्याकरणावरील निबंध.** १८९३, पृ. २८६.

१४ **मराठी ज्ञानप्रसारक,** पु. ८, अं. ४.१८५७. पृ. १०२–१०३.

झाली. म्हणूनच अशा प्रकारचे विचार ज्या मासिकांतून व्यक्त केले जातात तें वाचकांच्या, विशेषतः शाळांत जाणाऱ्या मुलांच्या हातीं देणें अत्यंत अनिष्ट, असें त्यांस वाटलें. मेजर कँडी हे तत्कालीन राज्यकर्त्यांच्याच जातीचे असल्यामुळें, राज्यकर्त्यांबद्दल जर कोणत्याहि लिखाणांत अनादर व्यक्त केलेला त्यांना दिसला, तर तात्काळ आपली नापसंति ते व्यक्त करीत. यावेळीं सूचना देऊन सुद्धां पुढें पुन्हां एकदां अशीच नापसंति व्यक्त करण्याची पाळी त्यांच्यावर आली होती. मराठी ज्ञान प्रसारकाच्या सेप्टेंबर, १८६० च्या अंकांत, 'डाक्तर जान विलसन यांणीं केलेली इंग्रेजी आणि मराठी वाक्यावळी–चवथी आवृत्ति,' या पुस्तकाचें परीक्षण करतांना एका वाक्याच्या भाषांतरावरून 'ज्ञानप्रसारक'कारांनीं युरोपियन लोकांविषयीं अनादर दाखविल्याचें मेजर कँडी यांना दिसलें. उपर्युक्त पुस्तकांत, 'A claim to that gentleman's estate' या वाक्यांशाचें भाषांतर डॉ. विल्सन यानें 'त्या साहेबाच्या मालावर वाद' असें केलें होतें. या ठिकाणीं 'साहेब' या शब्दावरून मतभेद निर्माण झाला. 'अलिकडेस साधारण लोकांत साहेब हा शब्द जातिवाचक होत चालला आहे. कोणीही युरोपियन म्हटला म्हणजे तो साहेब' असें म्हणून 'ज्ञानप्रसारक'कारांनीं या पुस्तकावर असा शेरा दिला:—

"असें सदोष पुस्तक शाळेंत वापरूं नये. ही वाक्यावळी करतांना इतर हुशारीपेक्षां साधारण प्रचारांतील बोलण्याच्या रीतीची माहिती पाहिजे. ही माहिती केवळ पुस्तकें वाचून मिळणार नाहीं तर एकाद्या मराठी गृहस्थास दाखवून नंतर तें छापायला पाहिजे होतें." [१५]

'Young Bombay'

'ज्ञानप्रसारक'कारांनीं या टीकालेखांत 'साहेब' या शब्दाबद्दल जें लिहिलें तें न पटून त्यावर मेजर कँडी यांनीं उत्तर दिलें:—

Some years ago, Dr. Wilson would have been styled डाक्तर जान विल्सन साहेब, and not merely डाक्तर जान विल्सन, as he is in this review, and the Director of Public Instruction would have been called मेहेरबान हावर्द साहेब instead of merely मिस्तर हावर्द, as he is constantly styled in the Dnyan Prasarak Magazine. The reviewer attributes the practice, which he condemns, to the pride of Europeans who all arrogate the title of Saheb to

१५ मराठी ज्ञानप्रसारक, पु. ११, अं. १०. १८६०. पृ. २१५.

themselves. (यांचें कारण हेंच कीं युरोपियन लोक देशाचे स्वामी पडल्यामुळें ते सर्वच आपणास मोठे मानून साहेब म्हणवून घेतात.) This is a bold charge but it is not quite true. The converse is nearer the truth. The people of India give European gentlemen, the title of Saheb, therefore they use it. It is plain enough that the use of it to European gentlemen is displeasing to 'Young Bombay.' I have dwelt at this length on the subject because, I think it important as indicating a state of feeling that is to be regretted." [१६]

राज्यकर्त्यांबद्दल तत्कालीन तरुणांच्या मनांत उद्भवलेली अनादराची भावना मारून टाकण्याचा मेजर कँडी यांचा हा प्रयत्न होता. राज्यकर्त्यांविरुद्ध आपलीं मतें व्यक्त करणारांत 'दंभहारक' नांवाचें एक मासिक होतें. त्याच्या एका अंकांत 'एतद्देशीय भाषांचें इंग्लिश लोकांचें ज्ञान,' नामक लेखांतील विचार मेजर कँडी यांना मान्य झाले नाहींत. म्हणून सरकारी मदत मिळविण्यासाठीं 'दंभहारक'कारांनीं केलेल्या विनंति-अर्जाला उत्तर देतांना मेजर कँडीनीं लिहिलें कीं इंग्रज लोकांविरुद्ध लिहावयाचें व त्याचबरोबर सरकारकडे मदत मागावयाची ही रीत कोठली ? [१७]

'तेथें माझा काय उपाय ?'

ज्यांनीं मेजर कँडीचें शिष्यत्व पूर्णपणें मान्य केलें होतें व 'मला मराठी लिहिण्यास मेजर क्यांडी साहेबांनीं शिकविलें,' असा कबुलीजबाब जे स्वतः देतात, त्या विनायक कोंडदेव ओक यांनीं सुद्धां मेजर कँडी यांच्या बाबतींतला आपला असाच एक अनुभव नमूद करून ठेविलेला आहे, तो असा :-

"पुस्तकांस आश्रय मिळण्याचें सगळें धोरण मराठी ट्रान्स्लेटरांच्या अभिप्रायावर असे. आणि तेव्हां मराठी ट्रान्स्लेटर परलोकवासी मेजर क्यांडी होते. ते इंग्रज होते, सत्यप्रिय होते, आणि निष्पक्षपाती होते. तरी, ते सरकारी नौकर होते. त्यांस सरकारच्या किंवा सरकारी कामदारांच्या विरुद्ध खरा प्रकार असला तरी त्याचें एक अक्षरही सहन होत नसे. आणि ग्रंथांचें शुद्धीकरण त्या दृष्टीनें होई. त्यास मला मान्य व्हावें लागे. कां कीं, तसें शुद्ध केल्यास पुस्तकास आश्रय द्यावा, असें ते आपल्या रिपोर्टांत स्पष्ट लिहीत असत. तेव्हां अर्थात् सरकारच्या किंवा सरकारी कामदारांच्या विरुद्ध जें काय खरें खरें पुस्तकांत सहजगत्या येत असे तें देखील गाळून टाकावें लागे. अशीं अनेक उदाहरणें झालीं आहेत. त्यांतलें एक ठळक उदाहरण येथें आतां आठवतें आहे, तेवढें सांगतों. मी 'हिंदुस्थान

---

१६ *D. P. I. Translation Department, Vol. 18.* 1860. pp. 58–59.

१७ *D. P. I. Government, Vol. 1.* 1871–72. p. 768.

कथारस ' लिहिला, त्यांत लार्ड डलहौसी ह्यांविषयीं एक निबंध घातला होता. तो सगळा इंग्लिश ग्रंथांच्या आधारानें लिहिला होता. त्यांत पदरचें कांहींएक घातलें नव्हतें. त्यांनीं नानाप्रकारचीं कारणें लावून एतद्देशीय राज्यें कशीं खालसा केलीं, तें, अगदीं यथातथ्य, सप्रमाण प्रदर्शित केलें होतें. आणि त्यासंबंधीं इंग्लिश ग्रंथकार काय ह्मणतात तें बरोबर सांगितलें होतें. तरी, ती सगळी गोष्ट इंग्लिश लोकांस आणि राज्यास भूषणावह नव्हती. ह्मणून ती गाळून टाकण्याविषयीं क्यांडीसाहेबांनीं फार मोठा आग्रह धरिला. त्यांत त्यांनीं असें लिहिलें कीं, ह्या निबंधांतल्या सगळ्या गोष्टी जरी खऱ्या आहेत, तरी त्या राजकारणासंबंधानें छापण्यास आणि प्रसिद्ध करण्यास फार अयुक्तिक आहेत, ह्मणून हा विषय अजीबात गाळला पाहिजे. झालें. तो विषय मला गुपचूप गाळावा लागला. असें आणखी कितीएक विषयांचें झालें. तेथें माझा काय उपाय ? " [१८]

जहांगीर बादशाहानें तिला आपली मुख्य व आवडती राणी केली कीं केलें ?

वर दिलेल्या कांहीं उदाहरणांवरून शालेय पुस्तकें अगर नियतकालिकें तपासतांना त्यांतील भाषेच्या दुरुस्ती बरोबरच, राज्यकर्त्यांच्या हितसंबंधांना बाधक ठरणारे विचार काढून टाकण्याकडे मेजर कँडी किती बारकाईनें लक्ष देत असत, त्याची कल्पना करतां येते.

' ज्ञानप्रसारक 'कारांच्या स्वाभिमानी विचारांवर मेजर कँडी यांनीं केलेली कडक टीका पाहिल्यानंतर, त्यांच्यामध्यें झालेल्या व्याकरणाविषयक वादविवादांतील महत्त्वाच्या मुद्यांची नोंद येथें करणें जरूर आहे. पहिला मुद्दा मराठी भाषेंतील प्रयोगासंबंधींचा होता. ' ज्ञानप्रसारक'च्या जुलै, १८५७ च्या अंकांत ' नूरजाहान राणी ' नामक लेखांतील एक वाक्य प्रयोगदृष्ट्या चुकीचें असल्याबद्दल मेजर कँडी यांनीं आपलें मत दिलें. तें वाक्य असें होतें:– ' जहांगीर बादशाहानें तिला आपली मुख्य व आवडती राणी केली.' या वाक्याची रचना कर्मणि प्रयोगांत केलेली आहे, ती तशी नसून, ' जहांगीर बादशाहानें तिला आपली मुख्य व आवडती राणी केलें,' अशी भावे प्रयोगी असावी, असा मेजर कँडीचा आग्रह होता. ' ज्ञानप्रसारक'कारांच्या ह्मणण्याप्रमाणें, हा बदल प्रघाताला सोडून होता. ' राणी ' हा शब्द ' केली ' या क्रियापदाचें कर्म असून, ' तिला ' या शब्दाचा

---

१८ **विविधज्ञानविस्तार**, पु, ३६. फेब्रुवारी, १९०५. पृ. ४८.

विचार केला नाहीं तरी चालण्यासारखें आहे, असें त्यांस वाटे. 'त्यानें राणी केली,' या वाक्याचा प्रयोग कर्मणि असून, वाक्यरचनेंत बदल न करतां, 'तिला' हा शब्द या वाक्यांत घालावा असें त्यांचें मत होतें 'त्यानें तिला धरली,' या वाक्यांत 'धरली' या क्रियापदांतील क्रिया ज्याच्यावर घडली तो शब्द 'ती' हा होय, आणि 'ती' हें कर्म स्त्रीलिंगी, तृतीय पुरुषी, एकवचनी असून, क्रियापद 'धरली' हें सुद्धां कर्माप्रमाणें बदललेलें आहे. यास्तव हा कर्मणि प्रयोग आहे, असा 'ज्ञानप्रसारक'-कारांचा युक्तिवाद होता. तथापि तो मेजर कँडी यांस मुळींच पटला नाहीं. मेजर कँडी यांचें म्हणणें त्यांच्याच शब्दांत देतों :—

" The Committee discuss the sentence तिला आपली मुख्य व आवडती राणी केली; They maintain that it is correct, and reject the proposed substitution of केलें for केली. The Committee say, 'The proposed substitution would set aside universal usage, even if it were sanctioned and prescribed by grammarians.' I admit that the constuction I have objected to is very common, but I do not admit the 'universal usage' claimed for it by the Committee. The construction which I suggested is used by many correct speakers, and is accordant with the principles of grammar; Therefore, it is to be preferred. The Committee ask, 'Is not राणी the object of the verb केली ?' I reply, not in the sentence तिला राणी केली any more than 'Queen' can be considered the object of the verb 'made' in the English sentence, 'He made her queen.' The Committee further ask, 'Can we not in this case ignore altogether the anomalous dative तिला ?' I reply, most certainly not. The question excites great surprise. The Committee forget that त्यानें राणी केली and त्यानें तिला राणी केली (or केलें) do not mean the same thing. (The first is 'He made a queen,' the second, 'He made her queen.' 'Her' is surely a very important word, and cannot be ignored. Equally important and necessary is 'तिला'). The Committee labour to show that a karmani prayog may have the karm either in the first or

second case (i.e. uninflected or inflected) as well as the kartari prayog, but a fallacy seems to run through their reasoning. With regard to the sentence त्याणें तिला धरली, they say, 'We find here that ती (she) is the object of the action which धरली (held) implies. This object ती is of the feminine gender, third person, and singular number, and so is the verb धरली. If these two agree, why is not this a karmani prayog?' This kind of reasoning would prove, 'I beat she' and 'her beat me,' to be quite correct sentences. How can the Committee say that in the sentence त्याणें तिला धरली, the object is ती? The object is तिला, for which they silently substitute ती, and they argue as if the sentence was त्याणें ती धरली! The Committee say, 'the karmani prayog in Sanscrit is not the same as the prayog designated karmani in Marathi.' The Committee are under a necessity to say this or else they would condemn themselves. I would rather say, the karmani prayog in Marathi is the same as the karmani prayog in Sanscrit. The karm must be in the प्रथमा–first or uninflected case. If the karm be put into an inflected case, the prayog is no longer karmani, but bhawe. I would point out here, and solicit attention to the statement, that the rules about kartari, karmani, and bhawe prayogs were not invented by Europeans. They were educed and established by Pandits, such as Bal Shastree Jambhekar, Bal Shastree Ghagwe, Gangadhar Shastree Phadke, Ramchandra Shastree Janvekar etc. Before their time little or no attention was paid to Marathi as a language. Every one spoke as he pleased. Let us not now retrograde."[१९]

मेजर कँडी यांची वादविवादपद्धति वाचकांस पूर्णपणें समजावी या हेतूनें वरील उतारा मुद्दाम दिला आहे. प्रयोगाविपर्यींचे हे बदल आपण नव्यानें करीत नसून, आपल्या अगोदरच बाळशास्त्री जांभेकर, बाळशास्त्री घगवे, गंगाधरशास्त्री फडके, रामचंद्रशास्त्री जन्हवेकर इत्यादि विद्वानांनीं ते प्रघातांत आणलेले आहेत या मेजर कँडी यांच्या विधानाचा खरेपणा पारखून घेण्यासाठीं या मुद्यावरील इतरांचीं मतें जाणून घेणें जरूर आहे.

१९ *D. P. I. Miscellaneous, Vol. 32.* 1858. pp. 131–132.

गंगाधरशास्त्री फडके या प्रयोगरचनेबद्दल नियम देतात तो असा :—

"कर्मणि प्रयोगस्थलीं कर्त्ता तृतीयांत आणि कर्म प्रथमांत जेव्हां आहे तेव्हां पुढील क्रियापदास कर्माचें लिंग वचन होतें. उ० त्याणे घोडा बांधिला. जेव्हां द्वितीयांत कर्म आहे तेव्हां क्रियापदास नपुसकत्व आणि एकवचन होतें. उ० त्याणे घोड्यास बांधिलें. त्याणे घोड्यास बांधिला असाही प्रयोग क्वचित करितात."[२०]

दादोबा म्हणतात--

बाळशास्त्री जांभेकर यांनीं, मेजर कँडीपुरस्कृत वाक्यप्रयोग आपण होऊन पाळलेला दिसत नाहीं; तथापि व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांना मेजर कँडीचें म्हणणें मान्य होतें. जेव्हां एकादें वाक्य भावे प्रयोगी असतें तेव्हां कर्म द्वितीयान्तच असलें पाहिजे, कर्ता आणि कर्म हीं प्रथमान्त असतां त्यांचा अधिकार क्रियापदांवर असावा, आणि तीं सविभक्तिक असतां क्रियापदाचें भावी रूप व्हावें, असें दादोबांचें मत होतें. ते म्हणतात :—

"'त्याणें त्यास धरिला' यापेक्षां 'त्याणें त्यास धरिलें,' हा प्रयोग विशेष ग्राह्य होय....कारण मराठी भाषेंत कर्त्ता अथवा कर्म जें क्रियापदास वागवितें, त्याचें सूक्ष्म दृष्टीनें रहस्य पाहतां, व इतर भाषेशींहि तोलून पाहतां, असें लक्षांत येतें कीं, तेथें त्याचा आणि क्रियापदाचा विशेष्यविशेषणभावसंबंध असतो; व तें जें कर्त्ता आणि कर्म यांहींकरून वागणारें क्रियापद, तें मूळचें धातुसाधित विशेषण असून क्रियापदाच्या रूपांत आलेलें असें असतें; 'त्याणें वाघ मारिला,' अथवा 'ती चमत्कार करित्ये,' यांत पूर्व वाक्यांत–'त्याणें वाघ मारिला,' ह्मणजे–तो जो तेणें वाघ जो तो मारिला गेला, अथवा मारिलेला असा आहे, असा मूळचा अर्थ. तेव्हां एथें मारिला हें मूळचें वाघाचें धातुसाधित विशेषण होय. तसेंच–'ती चमत्कार करित्ये' यांत मूळ करता या धातुसाधित विशेषणाचें करती हें स्त्रीलिंगी एकवचनाचें रूप होय. आतां मराठी भाषेंत असा नियम आहे कीं जेथें हा विशेष्यविशेषणभाव संबंध असतो, तेथें विशेष्य जर प्रथमान्त असलें, तर त्याच्या विशेषणाचें रूप त्याच्या लिंगवचनाच्या अनुरोधानें प्रथमान्त तटस्थ असतें; परंतु जर त्या विशेष्यास कांहीं विकार झाला, तर विशेषणाचें जें असें तटस्थ राहिलेलें रूप त्यास सामान्यरूपादि लागलाच विकार होतो. परंतु, 'त्याणें वाघाला मारिला' अथवा 'त्याणें आपल्या बायकोस घरीं ठेविली,' यांत वाघ आणि बायको हे विशेष्यरूप शब्द जर प्रथमान्त

---

२० गंगाधरशास्त्री फडके, **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.** १८३६. पृ. १४६–१४७.

असते तर ते मारिला आणि ठेविली या मूळच्या विशेषणरूप धातुसाधितांस वागविते, परंतु हीं विशेष्यें सविभक्तिक आहेत, तेव्हां एथें केवळ शुद्ध भूतकाळाच्या क्रियापदाचें साधारण जें नपुंसकरूप तें असून भावी प्रयोग व्हावा असा निर्णय केला ह्मणजे या वैकल्पिक प्रयोगांत विशेष ग्राह्यत्व या भावीप्रयोगा कडेसच येतें. ह्मणोन, माझ्या विचारास सकर्मक धातूंच्या भूतकाळीं कर्म जर सविभक्तिक आहे, तर तेथें भावीप्रयोग करावा, हें चांगलें दिसतें; 'त्याणें वाघाला मारिला,' 'त्याणें आपल्या बायकोला घरीं ठेविली,' या पेक्षां 'त्याणें वाघाला मारिलें,' आणि 'त्याणें आपल्या बायकोला घरीं ठेविलें,' असा भावीप्रयोग विशेष ग्राह्य होय." [२१]

दादोबांच्या या विवेचनावरून मेजर कँडी यांनीं सुचविलेल्या प्रयोगाबद्दलची आवश्यकता पटूं शकते. कृष्णशास्त्री चिपळूणकर व नानाशास्त्री आपटे यांनींसुद्धां मेजर कँडी यांच्याच बाजूनें निर्णय दिला. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें प्रघातांत असलेली वाक्यरचना जर व्याकरणनियमांच्या चौकटींत बसत नसेल तर, ती बदलण्यास हरकत नसावी. तसें पाहिलें तर भाषा सतत बदलत असते. त्यामुळें जुने वाक्यप्रयोग बदलले तर त्यांत कांहीं वावगें नाहीं, असा निर्णय या पंडितद्वयानें दिला. ते म्हणतात :—

"That, the Marathi language has undergone in the course of time, vast changes, will at once be perceived from a comparison between what it was at the time of ज्ञानेश्वर, and what it is at present. It must be, also, observed, that what is regarded novel in one age becomes quite familiar in the other, and acquires authority of usage. We, therefore, think that if slight changes be made slowly and gradually in a language for the purpose of improving it, they will not much attract the notice of the people, and, if they do, they will, in the course of a short time become familiar." [२२]

इतर तज्ज्ञांचीं मतें

रे० डॉ. स्टीव्हनसन या मराठीभाषातज्ज्ञाचें या संबंधींचें मतहि वरीलप्रमाणेंच होतें. [२३] कृष्णशास्त्री गोडबोले यांनीं या प्रश्नाचा विचार, 'मराठी भाषेचें नवीन व्याकरण' या आपल्या ग्रंथांत जो केला आहे तो असा :—

---

२१ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण**. आ. ३, १८५७. पृ. ३०८-३०९.

२२ *D. P. I. Miscellaneous, Vol. 32*. 1858. p. 148.

२३ Rev. J. Stevenson, *The Principles of Marathi Grammar*. 1854. p. 92.

"कर्माणि क्रियापद आणि कर्मपद ह्यांचा अभेदान्वय असतो, म्हणून कर्मपद प्रथमान्त असतें,...परंतु कधीं कधीं ह्या नियमाकडे दुर्लक्ष करून, कर्मपद चतुर्थ्यंत असतांही, कर्माणिक्रियापद योजतात. जसें, मी मुलीला निजविली. वैद्यानें रोग्यास बरा केला....(अ) ह्या उदाहरणांतील कर्म प्रथमान्त किंवा क्रियापद भावे केल्यानें प्रयोग शुद्ध होतात. (ब) वरील दोन कलमांत दाखविलेले अशुद्ध प्रयोग कोंकणस्थांच्या बोलण्यांत आणि लिहिण्यांत येतात. मराठी भाषेंत कोंकणी भाषा आणि देशी भाषा असे दोन प्रकार आहेत. पण कोंकणस्थ आणि देशस्थ ह्यांचा निकट संबंध झाल्यामुळें, त्यांच्या भाषा मोठमोठ्या गांवांत मिसळून गेल्या आहेत; म्हणजे जे आपणांस कोंकणस्थ म्हणवितात ते कांहीं कोंकणी आणि कांहीं देशी भाषा बोलतात, आणि जे देशस्थ म्हणवितात ते कांहीं देशी व कांहीं कोंकणी भाषा बोलतात, म्हणून दळणवळणानें वरील अशुद्ध प्रयोग (आणि शब्द लिहिण्याचे कांहीं अशुद्ध प्रकार) ग्रंथांतून नाहींतसे होत तोंपर्यंत व्याकरणांत अपवाद मानून राखले पाहिजेत. कां कीं वैयाकरणाचें काम, भाषेंतील सर्व चालू प्रकार पाहून नियम शोधून काढणें हें आहे, आणि नियमाप्रमाणें भाषा ग्रंथांत आणि बोलण्यांत आणणें हें समंजस लोकांचें काम आहे. ह्याच अर्थाची संस्कृत म्हण प्रयोगशरणाः वैयाकरणाः ही आहे."[२४]

या प्रश्नावर रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनीं एक वेगळीच तोड काढली. ते म्हणतात :—

"नुसत्या सकर्मक क्रियापदाच्या कर्माणि आणि भावी प्रयोगामध्यें जो कित्येकांचा वाद आहे, तो सहज दूर होण्याजोगा आहे. 'कृष्णानें कंसास मारिलें,' हा तर भावी प्रयोग आहेच; परंतु 'कृष्णानें कंसास मारिला,' यामध्यें 'केला' हें द्विकर्मक क्रियापद अध्याहृत धरून 'कृष्णानें कंसास मारिला केला,' असा जर अर्थ घेतला तर वादास मुळींच जागा राहणार नाहीं." [२५]

दक्षिणा प्राइझ कमिटीचे सेक्रेटरी रावजीशास्त्री गोडबोले या मुद्याचा विचार करतांना लिहितात :—

"रामानें वाघाला धरिला, मला तिला पाठविली पाहिजे, इत्यादि प्रयोग जरी प्रतिष्ठित लोकांच्या बोलण्यांत नेहमीं येतात तरी ते अशुद्धच समजावे. हे प्रयोग दोन रीतीनीं शुद्ध करितां येतील :—

---

[२४] कृष्णशास्त्री गोडबोले, **मराठी भाषेचें नवीन व्याकरण.** आ. २, १८७४. पृ. २३७–२३८.

[२५] **विविधज्ञानविस्तार,** पु. ४, अं. ४, १८७१. पृ. ५८.

"(१) भावे प्रयोग समजून क्रियापद नपुंसकलिंगीं एकवचनीं करावें. जसें– रामानें वाघाला धरिलें, मला तिला पाठविलें पाहिजे.

"(२) कर्मणि प्रयोग मानून कर्म प्रथमान्त करावें. जसें–रामानें वाघ धरिला, मला ती पाठविली पाहिजे." २६

या प्रश्नाचा उहापोह एकोणिसाव्या शतकांतील वैयाकरणांप्रमाणेंच विसाव्या शतकांतील व्याकरणकारांनींहि चर्चिलेला आढळतो. उदाहरणार्थ मोरो केशव दामले आपल्या 'शास्त्रीय मराठी व्याकरणां'त लिहितात :—

" 'त्यानें गोविंदाला पाठविलें' हें वाक्य व्याकरणदृष्ट्या विशेष मानास लायक ठरतें; आणि 'त्यानें गोविंदाला पाठविला' हें त्या दृष्टीनें कमी दर्जाचें दिसतें, इतकेंच. बाकी 'त्यानें गोविंदाला पाठविला किंवा पाठवावा' हा प्रयोग स्वाभाविक आहे.... तसेंच तो बराच शिष्टसंमतही आहे, हेंही निर्विवाद आहे. ह्यामुळें ह्याचाही मराठी वैयाकरणानें संग्रह केलाच पाहिजे. येथें साधारण नियमाप्रमाणें भावी प्रयोग व्हावा, पण रूढीप्रमाणें कर्मणि प्रयोग होत आहे. म्हणून त्यास कर्मभावसंकर असें म्हटलें आहे." २७

जुन्या काव्याचा आधार

मराठी भाषेच्या निरानिराळ्या वैयाकरणांचीं मतें येथें देण्याचें कारण इतकेंच कीं मेजर कँडी यांच्या म्हणण्याला त्यांपैकीं पुष्कळांचा पाठिंबा होता, ही गोष्ट स्पष्ट व्हावी. ज्यावेळीं 'ज्ञानप्रसारक' कर्त्यांनीं वरील प्रयोगाच्या फेरफाराबद्दल नापसंती व्यक्त करून, अशा नवीन प्रकारच्या प्रयोगाचा उपयोग जुन्या वाङ्मयांत केलेला आढळत नाहीं असें प्रतिपादिलें, त्यावेळीं मेजर कँडी यांनीं प्राचीन काव्यांमध्यें आढळणारीं भावेप्रयोगी वाक्यरचनेचीं उदाहरणें त्यांना दाखवून दिलीं आणि हा प्रयोग केवळ सरकारी विद्या-खात्याच्याच पुस्तकांमधून आढळतो, हें विरोधकांचें विधान खोटें पाडलें. मेजर कँडी लिहितातः—

The Committee (as I understand them) assert that the construction termed Bhavi prayog is never used by the people... They say that it is admitted to be an innovation not to be found any where except in some of the Government vernacular books, and they deny it to be a part of the

२६ रावजी सदाशिवशास्त्री गोडबोले, **मराठी भाषेचें मध्यम व्याकरण**, १८९७. पृ. २००.

२७ मोरो केशव दामले, **शास्त्रीय मराठी. व्याकरण** आ. २. १९२५. पृ. ७८३.

language. I greatly marvel both at their assertion and at their denial. I fully admit that the construction they contend for is very common, it may be even more common than that which I advocate; but how the Committee can say that such phrases as त्यानें मुलीस मारलें, तिनें मला सांगितलें, त्या मेल्यानें मला छळलें, etc. are never used by the people, I cannot imagine. They have only to listen to people in the bazars and in the fields to hear them. As for the assertion that it is not to be found any where except in some Government school-books, it is equally destitute of foundation. I have no doubt that it will be found in many places in the writings of the late Bal Shastri and others. Is Moro Pant, the famous poet, one of my school? Are his works Government school-books prepared by me? Yet Moro Pant often uses the construction which I advocate. For example :—

"वत्सा बहु कष्टविलें त्वां स्वीकारूनि मज्जराजीवा.
हांसुनि तीहि म्हणे हो प्रार्थावें प्रणत पारिजातातें.
जागें केंवि करावें निपटकपटनिद्रिता जना अन्यें.
त्वां मोडावें न हिला स्वस्वास्थ्य सुखार्थ बा जपावें गा.
नळ तीस म्हणे कुलजे त्वां जरि देवांसमक्ष मज वरिलें.

"But I need not go on quoting. This construction, which the Committee of the Dnyan Prasarak Society say, is an innovation of mine, and is found no where except in some Government books, is the construction commonly used by Moro Pant. I add two or three examples from Mukteshwar:—

"ऐसें बोलोनि चक्रपाणी ॥ उभे ठेले समरांगणीं ॥ जरासंधें राज्यासनीं ॥
अभिषेकिलें पुत्रासीं ॥
धर्में डाव खेळतां पणीं ॥ तुज स्वामिणी हारविलें ॥
न धरी तमोगुणाचा तवकू ॥ दुःशासना उठविलें ॥" [२८]

अशाप्रकारें मेजर कँडी यांनीं आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ जुन्या काव्यांतील कांहीं उदाहरणें दाखवून, आपण सुचविलेला प्रयोग नवीन नसल्याचें सिद्ध केलें. त्याचप्रमाणें हिंदुस्थानी भाषेंतसुद्धां अशीच प्रयोगव्यवस्था असल्याचें त्यांनीं दाखवून दिलें. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें 'उसने लडकी मारी' हें 'त्यानें मुलगी मारली' या वाक्याप्रमाणें कर्मणि प्रयोगाचें व 'उसने लडकीको मारा' हें 'त्यानें मुलगीस मारलें' या वाक्याप्रमाणें भावे प्रयोगाचें उदाहरण होय. जर कोणी 'उसने लडकीको मारी' असें म्हटलें तर 'त्यानें मुलीस मारली' या वाक्याप्रमाणेंच तें चुकीचें ठरतें, असें मेजर कँडी यांचें मत होतें.

---

२८ *D. P. I. Miscellaneous, Vol. 32.* 1858. p. 195.

नियतकालिकांतून चर्चा

मेजर कँडी यांनीं सुचविलेली प्रयोगरचना रूढीविरुद्ध असल्यामुळें, ती नवीन वाटून तीवर पुष्कळवेळां सार्वजनिक चर्चा होत असे.[२९] विष्णुशास्त्री चिपळूणकरासारख्यांनींसुद्धां या बाबतींत 'निबंधमाले'मधून लिहिलेलें आढळतें. विष्णुशास्त्री म्हणतात :—

"'बाजीरावास पुणें द्यावें लागलें' इत्यादि प्रयोगांची वाटाघाट आज कित्येक वर्षें चालू आहे; तरी त्यांविषयीं अजून पक्का निश्चय कोणताच होत नाहीं; तसेंच 'त्यानें त्या पोरीस मारिली,' 'मी अंघोळ केलीं,' 'त्यानें तुला लहानाचा मोठा केला,' तुम्हीं जेवलांत,' वगैरे विलक्षण प्रयोगांविषयींही मोठाच वाद आहे. मराठी भाषेचें नियमन करणारांत अग्रभागीं गणण्यास योग्य अशा एका गृहस्थानें वरील प्रयोगांस केवळ अशुद्ध ठरवून त्यांस आपल्या नजरेखालून जाणाऱ्या ग्रंथांत बिलकूल थारा दिलेला नाहीं. हें त्याचें मत व्याकरणदृष्ट्या बरोबर आहे. कां कीं, वरील प्रयोग शुद्ध रीतीनें म्हटलें म्हणजे, 'त्यानें त्या पोरीस मारिलें,' अथवा, 'त्यानें ती पोर मारली,' 'मी अंघोळ केली,' 'त्यानें तुला लहानाचें मोठें केलें,' 'तुम्हीं जेवलां,' असेच असावे."[३०]

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं, 'मराठी भाषेचें नियमन करणारांत अग्रभागीं गणण्यास योग्य' अशा ज्या गृहस्थाचा उल्लेख केला आहे, तो गृहस्थ मेजर कँडी होय, असें स्पष्ट दिसतें. त्यांची सूचना विष्णुशास्त्र्यांस मान्य होती असें वरील उताऱ्यावरून उघड होतें.

तत्कालीन प्रश्नपत्रिका

मेजर कँडी यांनीं सुचविलेला वाक्यप्रयोग सरसहा वापरांत यावा म्हणून त्यांनीं तो शालेय पुस्तकांत उपयोजिलाच; पण त्यांनीं जीं जीं इतर पुस्तकें तपासलीं त्यांतूनहि या दृष्टीनें सुधारणा केली. परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांमधून खालील वाक्यांची रचना बरोबर आहे काय, असा प्रश्न विचारून चुकीचे प्रयोग बरोबर करण्यासाठीं कांहीं वाक्यें दिलेलीं आढळतात. इ. स. १८६१ च्या मॅट्रिकच्या प्रश्नपत्रिकेंत, 'त्या पोरानें मुलीस

---

२९ *Elphinstone School Paper*, June, 1861. pp. 158–159;
January, 1862. pp. 16–18.

३० **निबंधमाला**, अंक १०, ऑक्टोबर, १८७४. पृ. १२–१३.

मारिली,' 'त्याच रात्रीस त्यानें आपल्या खोपटांत कोणा मनुष्यास आणिला होता'[३१] किंवा इ. स. १८६४ च्या प्रश्नपत्रिकेंत, चुकीचा प्रयोग दुरुस्त करा, असा प्रश्न देऊन, त्यांत 'त्या पोरीस त्यानें चांगली तरबेज केली,' 'त्यानें वाघास खूप बडविला,'[३२] अशा प्रकारचीं वाक्यें दिलेलीं आढळतात.

इ. स. १८५७ मध्यें मेजर कॅंडी यांनीं या चुकीच्या वाक्यप्रयोगाची जाणीव 'ज्ञानप्रसारक'कारांना करून दिली होती; तथापि रूढ प्रयोगाचा पगडा त्यांच्यावर एवढा होता कीं, मेजर कॅंडी यांना पुन्हां इ. स. १८६२ मध्यें तीच चूक 'ज्ञानप्रसारका' मध्यें दिसून आली. 'ज्ञानप्रसारका'च्या माहे मे, १८६२ च्या अंकांतील या चुकीच्या प्रयोगाचीं अनेक उदाहरणें मेजर कॅंडी यांनीं दाखवून दिलीं. 'मला हतभागिनीला एथें कशी रे सोडलीस' (पृ. ४२), 'गंगाबाईस कैदीचे कटड्यांत उभी केली' (पृ. ५०), 'त्यांणीं हात धरून तिला हालविली' (पृ. ५३), 'रामय्या म्हणून होता त्यास उभा केला' (पृ. ५५), हे सर्व चुकीचे वाक्यप्रयोग सुधारण्याविषयीं त्यांनीं 'ज्ञानप्रसारक'कारांस सांगितलें. 'ज्ञानप्रसारक'कारांप्रमाणेंच इतरांना सुद्धां कॅंडी यांनीं ठिकठिकाणीं हा दोष दाखवून दिला. वाक्यांत कर्ता तृतीयान्त व कर्म द्वितीयान्त असतां क्रियापद नपुंसकलिंगीं असावें व वाक्य भावेप्रयोगीं व्हावें, हा मेजर कॅंडी यांचा आग्रह होता व त्याप्रमाणें त्यांनीं अनेक शालेय व अन्य पुस्तकांमधून तो आणण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नामुळेंच मेजर कॅंडीप्राणित हा प्रयोग आज सरसहा वापरांत आलेला आढळतो. वाक्यरचनेला ठराविक पद्धति असावी यासाठीं त्यांची ही धडपड होती व तिचा परिणाम आतां आपणांस दिसत आहे.

तीपेक्षां कीं तिजपेक्षां ?

ज्ञानप्रसारक व मेजर कॅंडी यांच्यामध्यें आणखी एक मतभेदाचा मुद्दा पुढील वाक्यामुळें निर्माण झाला:— 'तेवढ्याचाच सदुपयोग करून त्याची थोडी तरी वृद्धि प्रजेनें केली असती, तरी एतद्देशीय लोक हल्लीं आहेत त्यापेक्षां बरे स्थितींत असते.' या वाक्यांतील अधोरेखित शब्दाबद्दल 'तीपेक्षां' हा शब्द व्याकरणदृष्ट्या जास्त योग्य असल्याचें मेजर कॅंडी यांनीं ठरविलें. याबाबतींत नापसंति दर्शवून 'ज्ञानप्रसारक'कारांनीं आपलें म्हणणें असें मांडलें कीं, 'लोक हल्लीं आहेत' या वाक्यांशाऐवजीं 'लोक हल्लीं ज्या स्थितींत आहेत' असें असतें तर 'त्यापेक्षां' ऐवजीं 'तीपेक्षां' हा शब्द, 'स्थिति' या स्त्रीलिंगी शब्दाला जुळणारा, म्हणून योग्य ठरला असता.

३१ *Elphinstone School Paper*, April, 1861. p. 106.
३२ *Elphinstone School Paper*, June, 1864. p. 3.

तरीसुद्धां, 'ज्ञानप्रसारक'कर्त्यांना 'तीपेक्षां' ऐवजीं 'तिजपेक्षां' हा शब्दप्रयोग सयुक्तिक वाटला. या विधानाला पुष्टि देण्यासाठीं ते म्हणतात कीं, ज्याप्रमाणें 'मीपेक्षां' 'तूं पेक्षां' असें बोलण्याऐवजीं 'मजपेक्षां', 'तुजपेक्षां' असें बोलण्याचा प्रघात आहे, त्याप्रमाणें 'तिजपेक्षां' हा शब्दप्रयोग प्रघाताला धरून होईल. यावर मेजर कॅंडी यांनीं उत्तर दिलें तें असें :—

"I have no objection to तिजपेक्षां. It is quite correct and idiomatic; but I add, so is तीपेक्षां. I would point out to the Committee feminine pronoun ती has two forms of the सामान्यरूप, viz. ती and तिज, therefore, तीपेक्षां, तीपासून, तीवर etc, are as correct as तिजपेक्षां, तिजपासून, तिजवर etc." [३३]

कृष्णशास्त्री चिपळूणकर व नानाशास्त्री आपटे यांनीं या प्रश्नाचा विचार निराळ्याच पद्धतीनें केला. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, नामांना व सर्वनामांना एकाच पद्धतीनें व्याकरणाचे नियम लागू होतात. ते लिहितात :—

"तीपेक्षां then, must be preferred to तिजपेक्षां because nouns ending in ई in the singular number do not suffer any change, when they receive the signs of cases, and the expression तीपेक्षां is in common use." [३४]

तिणें कीं तिनें ?

वरील मुद्यावर विशेष मतभेद नसल्यामुळें मेजर कॅंडी यानीं फार आग्रह धरला नाहीं; परंतु दुसऱ्या एका बाबतींत त्यांचें धोरण फार कडक होतें. 'तिणें बराच जवळ पैका केला,' या वाक्यांतील 'तिणें' या सर्वनामाऐवजीं 'तिनें' वापरावें, हा तो बदल होय. तृतीया विभक्तीचा 'नें' अगर 'नीं' प्रत्यय नामाप्रमाणेंच सर्वनामाला लागावा असें त्यांचें म्हणणें होतें. 'ज्ञानप्रसारक'कार आपली बाजू मांडतांना म्हणतातः—

"Many forms which are classed as irregular by grammarians, must nevertheless be retained as legitimate; thus while we have नें in the third case of nouns, as रामानें, गोष्टीनें etc., we have णें in the third case of personal, relative and demonstrative pronouns. Are त्याणें, तिणें and similar other forms to be laid aside as incorrect, because by the application of the general rule, which holds good in the case of nouns, we are led to expect the forms त्यानें, तिनें etc.? How is it that this ण has taken

३३ *D. P. I. Miscellaneous, Vol. 32.* 1858. p. 131.
३४ *Ibid.* p. 144.

the place of न ? We see from the grammar of वररुचि that in the प्राकृत dialects ण was very frequently used for न. In the modern Marathi, there is a general tendency to restore Sanscrit words to their proper forms, instead of using the old प्राकृत forms. This has, in many cases, restored the न, but still ण prevails to a very great extent, more especially in familiar words, pronouns, verbs. numerals etc. such as त्याणें, ज्याणें, याणें, जाणें, येणें, विकासणें, दिसणें, पडणें, एकुणीस, एकुणतीस, एकुणचाळीस, एकुणपन्नास, नव्याण्णव, पाणी, लोणी, राणी, वाण, खाण, पाळणा, झोळणा, and numerous others. The Sanscrit forms of these words have न, while in प्राकृत or मराठी we have ण. Are we then to set aside forms which long usage has sanctioned to make a rule, which we have laid down, universally applicable?" [३५]

अशाप्रकारें नामें व सर्वनामें या दोघांनाहि एकाच पद्धतीनें विभक्तिप्रत्यय लावण्याच्या कल्पनेविरुद्ध 'ज्ञानप्रसारक'कारांनीं आपली बाजू मांडली. या मुद्याचें आणखी स्पष्टीकरण करतांना ते म्हणतात कीं नामांस व सर्वनामांस विभक्तिप्रत्यय लावतांना जर सारखेच बदल व्हावयाचे असतील तर, 'मी' या प्रथमपुरुषवाचक सर्वनामाचें 'मला' असें रूप न होतां 'मीला' अगर 'म्याला' असें झालें पाहिजे. परंतु प्रघातांत तें तसें नाहीं. एकंदरींत त्यांचे विचार प्रघातावर आधारलेले होते. पण मेजर कँडी यांना हा विचार मान्य नव्हता. मेजर कँडी यांचें म्हणणें कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं कसें मांडलें तें पहाण्यासारखें आहे. कृष्णशास्त्री लिहितात :–

"Whether णें or नें is to be used in the third case of the third personal, relative and demonstrative pronouns. as nouns and pronouns, as we have already remarked, are similar in their nature, and as the former receive नें in the third case, while the said pronouns receive नें as well as णें, it appears proper to reject णें and keep नें for the sake of bringing both the nouns and the pronouns under the operation of the same rule. It may be said that by following this arrangement the usage on the side of णें will be violated; but to this, it may be replied that if this usage be violated, the other, on the side of नें will be preserved, and at the same time, the uniformity of the declensions of nouns and the said pronouns in the third case will be secured, an advantage that will not be gained on the other side." [३६]

---

३५ *D. P. I. Miscellaneous, Vol. 32.* 1858. p. 127.
३६ Ibid. pp. 144-145.

विद्वानांचीं मतें

या बाबतींत, मेजर कॅंडी अगर कृष्णशास्त्री चिपळूणकर, यांच्याप्रमाणेंच बाळशास्त्री जांभेकर यांचें मत होतें. दादोबा पांडुरंग यांच्या व्याकरणाची दुसरी आवृत्ति निघण्याआधीं, इ. स. १८४५ मध्यें, बाळशास्त्री जांभेकरांनीं दादोबांना ज्या सूचना केल्या होत्या, तींत एक सूचना अशी होती :—

"Should not the only three anomalous forms of त्याणें, ज्याणें and ह्याणें be changed into त्यानें, ज्यानें and ह्यानें for the sake of uniformity? The missionaries have done this; and I think very properly. I have now come to this opinion after thinking otherwise for many years." [३७]

बाळशास्त्री जांभेकर यांची ही सूचना दादोबांना मुळींच पसंत पडली नाहीं. दादोबांच्या मतानें 'त्यानें,' 'तिनें' इत्यादि रूपें देशस्थांमध्यें वापरण्याचा फार प्रघात आहे; परंतु तीं केवळ एकदेशीय आहेत. या मुद्यावर दादोबा पुढें म्हणतात:—

"बहुतेकांचें असें मत आहे कीं...त्यानें, यानें, इनें, ज्यांनीं इ० अशीं रूपें लिहावीं; व या प्रमाणें बोलण्याची प्रवृत्तिही देशस्थ लोकांमध्यें आहे. त्यास मला ही हें मत पहिल्या दृष्टीस ग्राह्य दिसतें, कां कीं लोकव्यवहारा वरून, व्याकरणा वरून, आणि प्राचीन ग्रंथां वरून, पाहिलें असतां नें आणि नीं यांच्या स्थानीं जो णें आणि णीं आदेश होतो हा व्यभिचार होय. तथापि अलिकडेस या वैकल्पिक रूपांची पुणें प्रांतीं व साऱ्या कोंकणांत प्रवृत्ति विशेष झाली आहे, आणि हीं जीं मूळचीं रूपें तीं बहुधा अक्षरशत्रु अशा गंगथड्यांच्याच मुखांतून येतात, ह्मणोन त्यांवर अलिकडेस निंद्यपणाची छाया आली आहे. त्यांत आणखी जर कुलीन व प्रतिष्ठित अशा नागरिक लोकांचा वाग्व्यवहार सोडून केवळ व्याकरणनियमासच अनुसरलें, तर जसें नेंच्या स्थानीं णें आदेश करणें हा व्यभिचार त्याज्य, तसाच हा ही, यांच्या स्थानीं या, ई हा आदेश ही त्याज्य होय. (कोंकणांत ह्यास, ह्याणें, इ० रीतीनें बोलण्याची प्रवृत्ति आहे) अतएव ह्यानें, हिनें, ह्यांनीं, अशीं रूपें लिहिणें प्राप्त होईल. ह्मणोन मला वाटतें एथें लोकव्यवहारास अनुसरून याणें, इणें, इ० रूपांचें ग्रहण करणें प्रशस्त दिसतें. कित्येक प्रसंगीं सर्वमान्य अशा लोकव्यवहारासच अनुसरलें पाहिजे." [३८]

---

३७ *D. P. I. Board of Education, Miscellaneous*. 1845. p. 19.

३८ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण**, आ. ३, १८५७. पृ. १२२.

याउलट रे० डॉ. स्टीव्हनसन आपलें मत व्यक्त करतो, तें असें :—

"Should it be asked why त्याने is preferable to त्याणे when तेणे is used, and not तेने, let it be considered, that in the oblique case of adjectives या is the Desh, and ए the kokunee termination; again, that the Deshusth prefers न to ण, while the kokunusth prefers ण to न; analogy thus leads us to affix ने to त्या and णे to ते." ३९

मेजर कँडीपुरस्कृत व्याकरणव्यवस्था कांहीं बाबतींत अमान्य असणाऱ्यांपैकीं रामचंद्र भिकाजी गुंजीकर हे एक होते. 'महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धि' या पुस्तिकेंत ते लिहितातः—

"कित्येक लोक 'हा', 'ही', 'हें', या सर्वनामांचीं रूपें चालवितांना, ह्यास, हिला, ह्याचा, ह्याकरितां, अशीं हकारयुक्तच अक्षरें लिहितात. यास, इला, याचा, याकरितां, अशीं रूपें त्यांना आवडत नाहींत. ह्याच प्रकार, तो–ती–तें, हा–ही–हें, जो–जी–जें, यांच्या तृतीयेच्या रूपांमध्यें येणाऱ्या नें आणि नीं या प्रत्ययां विषयीं आहे. म्हणजे त्यानें, ह्यांनीं, ज्यांनीं, अशींच रूपें ते लिहितात. त्याणें, यांणीं ज्यांणीं, अशीं लिहीत नाहींत. परंतु दोहों प्रकारचींही रूपें व्यवहारदृष्टया शुद्ध आहेत. किंबहुना पहिल्या रूपांपेक्षां दुसरींच रूपें प्रचारामुळें विशेष कर्णप्रिय अतएव विशेष ग्राह्य आहेत."४०

गुंजीकर यांच्या या मताला मेजर कँडी अनुमति देणें शक्यच नव्हतें. म्हणून वरील पुस्तिकेबद्दल आपलें मत देतांना मेजर कँडी म्हणतातः—

"The rules, based on usage, are clearly and concisely expressed. The author disapproves the practice of indiscriminately dotting the nasals and some other letters, and of proscribing some idiomatic forms from the Marathi vocabulary, such as इला, याचा, त्याणें, त्याणीं." ४१

---

३९ Rev. J. Stevenson, *The Principles of Marathi Grammar*. 1854. p. 16. Foor–note.

४० रामचंद्र भिकाजी गुंजीकर, **महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धि**. आ. २. १८७८. पृ. १७.

४१ *Bombay Educational Record, Vol.* 5, No. 12, 1869. 366.

अशा प्रकारें दादोबा पांडुरंग अगर रामचंद्र भिकाजी गुंजीकर या मराठी भाषातज्ज्ञांचीं प्रघातावर आधारलेलीं मतें बाजूला सारून, मेजर कँडी यांनीं आपल्या विचाराप्रमाणें, तो, हा, जो, इत्यादि सर्वनामांस तृतीयेचे नें अगर नीं हे प्रत्यय लावतांना त्यांचीं रूपें त्यानें, त्यांनीं, ह्यानें, ह्यांनीं, ज्यानें, ज्यांनीं, अशीं व्हावयास पाहिजेत असा आग्रह धरला; व त्याप्रमाणें सर्व शालेय पुस्तकांमधून तीं रुपें आणिलीं. या त्यांच्या आग्रहामुळेंच त्यानें, त्यांनीं इत्यादि नकार युक्त रूपें आज वापरांत आलेलीं आढळतात.

आपल्यास व आपणास

'ज्ञानप्रसारक' आणि मेजर कँडी यांच्यामधील भांडणांत, आणखी एक वादाचा मुद्दा, 'आपल्यास' व 'आपणास' यांपैकीं व्याकरणशुद्ध रूप कोणतें, हा होता. मेजर कँडीच्या मतें, 'आपणास' हें रूप शुद्ध होतें. या चर्चेंत त्यांनीं, 'आपल्यास' is a vulgarism for आपणास' असा शेरा मारला होता. तो पसंत न पडून त्याला विरुद्ध पक्षातर्फे खालील उत्तर मिळालें :—

"The Committee does not understand why आपल्यास is a vulgarism. Those natives who may be supposed to speak pure Marathi, divested of Conkanee or Dekkanee peculiarities, will be found to use आपल्यास instead of आपणास. Is मला a vulgarism for म्याला or मीला because nouns ending in ई or ईं (masculine, feminine, or neuter) either retain the ई or change it into या, not into अ? The pronouns, which are the most familiar words in a language, are very irregular In their forms. The genitive or sixth case of आपण is आपला–ली–लें etc., not आपणाचा–ची–चें, etc and surely आपला cannot be considered a vulgarism for आपणाचा. Philologically considered, न or ण and ल are interchangable, and to this interchange, we must ascribe the forms आपल्याला and आपला. Vara Ruchi in his grammar of the Prakrit Dialects, says that आत्म was corrupted into आप. आत्मनः (The Sanscrit genitive of आत्म) would, therefore, by substituting ल for न, be changed into आपला." ४२

४२ *D. P. I. Miscellaneous, Vol. 32.* 1858. pp. 124-125.

वरील विवेचनांत 'ज्ञानप्रसारक' कारांनीं असेंहि दाखवून दिलें कीं, इंग्रजी अमलाच्या पूर्वी 'आपल्यास' हाच शब्द वापरांत होता. तसेंच दादोबा पांडुरंग व गंगाधरशास्त्री फडके यांनींहि दोन्ही रूपें उपयोगांत आणण्यास हरकत नाहीं, असा निर्णय केव्हांच दिल्याचें त्यांनीं मेजर कँडीच्या नजरेस आणून दिलें. शेवटीं 'ज्ञानप्रसारक' कर्ते थोड्याशा रागानेंच म्हणतात :—

"If in spite of all this, foreigners will call it a 'Vulgarism,' 'barbarism' or anything else they please, the Committee have nothing further to say on the subject than that they hope no attempt will be made to force the individual opinions of such persons upon native writers or speakers." [४३]

या सर्व युक्तिवादाचा मेजर कँडी यांच्यावर कांहींच परिणाम झाला नाहीं. उलट, त्यांनीं आपली बाजू मांडली. त्यासाठीं त्यांनीं कोशकार मोल्स्वर्थ यांचा आधार घेतला. तसेंच कृष्णशास्त्री चिपळूणकरांनींहि मेजर कँडी यांचीच कड घेतली. या मुद्यावर निर्णायक मत देतांना कृष्णशास्त्री चिपळूणकर व नानाशास्त्री आपटे लिहितात :—

"Both the forms of the word आपण, namely आपल्यास and आपणास, are used for second case of आपण, but the question for the consideration is which of them ought to be used. The form आपल्यास bears two significations, viz. 'to oneself' and 'to that belonging to oneself;' and as it is one of the principal aims of a good composition to remove ambiguity as far as possible, it is proper to use the form आपणास in the second case of आपण, and to restrict the form आपल्यास to its second meaning." [४४]

अशाप्रकारें आणखी एका मुद्यावर, मेजर कँडी यांनीं आपलें निश्चित मत दिलें. त्यांनीं तपासलेल्या अनेक पुस्तकांतील वरील दोष वारंवार दाखवून दिला व तो काढून टाकण्याचा प्रयत्न केला, असें मागें दिलेल्या कांहीं टीकालेखांवरून समजून येण्यासारखें आहे.

---

४३ *D. P. I. Miscellaneous. Vol. 32.* 1858. p. 153.
४४ *Ibid.* p. 144.

आणखी एक वादग्रस्त प्रश्न

'ज्ञानप्रसारक'मधील, 'अशा प्रसंगीं काजाआयास याची पत्नि प्रसुत होण्याचा समय समीप आला' या वाक्याच्या रचनेंत मेजर कँडीनीं सुचविलेल्या दुरुस्तीमुळें मतभेद निर्माण झाला. वरील वाक्यांतील सर्व शब्द व्याकरणदृष्ट्या चालविणें अशक्य असल्याचें मेजर कँडीना वाटून त्यांनीं असें सुचविलें कीं, हें वाक्य, 'याच्या पत्नीचा प्रसूत होण्याचा समय' असें असावें. 'ज्ञानप्रसारक'कारांनीं अनेक उदाहरणें देऊन मेजर कँडीचें म्हणणें खोडून काढलें. उदाहरणार्थ, 'पैसा मिळविण्याची हीच वेळ आहे' हें वाक्य 'पैशाची मिळविण्याची हीच वेळ आंहे' असें बदलणें अगर 'सर्व व्यापार बंद पडण्याचा संभव आहे' हें वाक्य, 'सर्व व्यापाराचा बंद पडण्याचा संभव आहे' या पद्धतीनें लिहिणें चुकीचें ठरेल. 'ज्ञानप्रसारक'कारांच्या मतें 'प्रसूत होणें,' 'मिळणें,' 'बंद पडणें' यांना लावलेला षष्ठीचा 'चा' प्रत्यय, 'पत्नी प्रसूत होणें,' 'पैसा मिळणें,' 'सर्व व्यापार बंद पडणें' या शब्दसमूहांस लावावयाचा आहे. संस्कृतमध्यें हे शब्द संधीच्या योगें जोडतां येतील; परंतु प्राकृत भाषेंत संधि कमी प्रमाणांत असल्यामुळें तसें करणें योग्य नव्हे. आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ त्यांनीं गुजराती भाषेंतील 'तेनी टोपी फाटवानो वखत आव्यो,' अगर 'घोडा जवानो वखत थयो,' हीं उदाहरणें दिलीं. मेजर कँडी यांना हें म्हणणें पटल्यामुळें त्यांनीं तें मान्य केलें. ज्याठिकाणीं मेजर कँडी यांचें व्याकरणदृष्ट्या समाधान होत असे त्याठिकाणीं त्यांनीं विशेष आग्रह धरला नाहीं.

शब्दरचना

वरीलप्रमाणेंच शब्दरचनेसंबंधीं आणखी एक वादाचा मुद्दा निघाला. 'या देशांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास' या रचनेऐवजीं 'इंग्लिशांच्या या देशांतील राज्याचा इतिहास' अशी रचना असावी, अशी मेजर कँडीची सूचना होती; कारण मूळ रचनेच्या मागें, 'the history of the government of India by the English', हा अर्थ असावा, परंतु प्रत्यक्षांत the history of the kingdom of the English that are in India' असा अर्थ होतो. म्हणूनच आपण सुचविलेली रचना जास्त सयुक्तिक असल्याचें मेजर कँडी यांना वाटलें. विरुद्ध पक्षानें त्यांना असा प्रश्न टाकला कीं, इंग्रजी रचनेंत जी कल्पना गृहित धरलेली आहे, ती तशीच मराठींतहि कां असावी? त्याचप्रमाणें मेजर कँडी यांची दुसरी एक चूक त्यांनीं दाखवून दिली. ती अशी कीं, बाळशास्त्री जांभेकर यांच्या एका पुस्तकाचें नांव, 'हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास' असें आहे व

मेजर कँडी यांच्या नजरेखालून तें गेलेलें आहे. तर मग बाळशास्त्री जांभेकर अगर मेजर कँडी या दोघांपैकीं एकाची रचनापद्धति चुकीची असली पाहिजे. या बाबतींत मेजर कँडी यांचें उत्तर असें होतें :—

"My answer is, that as the noun इंग्लिश is in juxtaposition with देशांतील, it naturally (if not necessarily) will be taken as qualified, and, therefore, the meaning that at once presents itself to the mind of the reader is that which I have given. The meaning intended by the Committee seems to me to require a rather forced construction." [४५]

संयुक्त क्रियापदें

त्याचप्रमाणें, 'राज्यें संपादन करण्याची' या रचनेबद्दल, 'राज्यांचें संपादन करण्याची' अशी रचना असावी, असें याच वादाच्या वेळीं मेजर कँडी यांनीं सुचविलें. तें 'ज्ञानप्रसारक'कारांना मान्य झालें नाहीं. 'घडा पाठ करणें', 'तांदूळ गोळा करणें' इत्यादिमध्यें 'घडा', 'तांदूळ' हीं 'पाठ करणें', 'गोळा करणें' या संयुक्त क्रियापदांचीं कर्मे आहेत. त्याचप्रमाणें 'राज्यें' हें 'संपादन करणें' या संयुक्त क्रियापदाचें कर्म होय, असें त्यांचें म्हणणें होतें; पुढें ते म्हणतात :—

"Why not admit compound verbs which it is the spirit of the Marathi and its sister dialects of India to use freely in place of simple verbs? When a compound verb is formed, it must in every way be treated as a simple verb. संपादन करणें may have an object राज्यें, just as the simple verb संपादणें." [४६]

या मुद्यावर मेजर कँडी यांनीं मांडलेली बाजू पाहिली कीं त्यांच्या व्याकरणाच्या अभ्यासाचा सखोलपणा दिसून येतो. इंग्रजी भाषेंतील उदाहरणें घेऊनच त्यांनीं आपल्या म्हणण्याचें समर्थन केलें. त्याचा सारांश असा कीं इंग्रजींत himself किंवा themselves हे शद्ब जरी वापरांत असले तरी ते चुकीचे आहेत व त्याप्रमाणें meself किंवा usselves असे शद्ब बनविले तर तेहि चुकीचे ठरतील. किंवा इंग्रजींत me thinks अगर me thought हे प्रयोग चुकीचे असूनसुद्धां वापरांत आहेत, म्हणून ते समोर ठेवून आपण him thinks, her thought असे प्रयोग करणें योग्य होणार नाहीं. त्याचप्रमाणें 'पाठ करणें,' 'गोळा करणें' वगैरे anomalous formations मराठी भाषेंत प्रघातांत आहेत म्हणून ते समोर ठेवून चालणार नाहीं.

---

४५ *D. P. I. Miscellaneous, Vol. 32.* 1858. p. 133.

४६ *Ibid.* 1858. p. 127.

'संपादन करणें', 'कथन करणें', 'रक्षण करणें', 'निवेदन करणें', इत्यादि क्रियापदें व 'पाठ करणें', 'गोळा करणें' हीं क्रियापदें यांच्यामध्यें व्याकरणदृष्ट्या फार फरक आहे. संपादन, कथन, रक्षण, निवेदन, श्रवण, इत्यादि शब्द धातुसाधित नामें आहेत व ज्यावेळीं हीं नामें, एकादें क्रियापद व दुसरें नाम यांच्यासह वाक्यांत उपयोजितात, तेव्हां दुसरें नाम नेहमीं षष्ठ्यंत पाहिजे. उदाहरणार्थ, 'राज्यें संपादन करा' 'अब्रू रक्षण करा', 'गोष्ट निवेदन केली', 'गोष्ट श्रवण केली' इत्यादि वाक्यांश 'राज्यांचें संपादन करा' 'अब्रूचें रक्षण करा' 'गोष्टीचें निवेदन केलें' 'गोष्टीचें श्रवण केलें' अशा पद्धतीनें लिहिले अगर बोलले पाहिजेत; परंतु 'पाठ' हें संस्कृत भाषेंत नाम असलें तरी मराठींत त्याचा नामासारखा उपयोग करतां येत नाहीं व संस्कृतांतील 'पाठ' या शब्दाचा अर्थ मराठीमधील 'पाठ' या शब्दाहून वेगळा आहे. तसेंच 'गोळा' हा शब्द जरी नाम असला तरी 'तांदूळ गोळा करा' अशा वाक्यांत तो नामासारखा वापरतां येणार नाहीं. तसा तो वापरल्यास त्याचा अर्थ 'तांदळाचा गोळा करा' असा होईल.

एकंदरींत 'संपादन करणें', 'रक्षण करणें', इत्यादिकांना संयुक्त क्रियापदें मानावीं हें 'ज्ञानप्रसारक'कारांचें वरील मत मेजर कँडी यांना मान्य झालें नाहीं. ज्याप्रमाणें 'give attention', 'make 'application,' 'give instruction' इत्यादिकांना इंग्रजीमध्यें संयुक्त क्रियापदें म्हणतां येणार नाहीं, तसेंच मराठीमध्यें 'संपादन करणें,' 'रक्षण करणें,' इत्यादिकांना संयुक्त क्रियापदें म्हणणें चुकीचें होईल, असें मेजर कँडी यांचें म्हणणें पडलें. या बाबतींत ते लिहितात:—

"The use of such constructions as राज्यें संपादन केलीं has, I admit, become very common, and I do not entertain the expectation that my remonstrance will stop it. It saves speakers a little trouble. It is not difficult to show how the construction came into use. Frequent and elegant use is made both in Sanscrit and in Marathi of the form of composition षष्ठी तत्पुरुष, as राज्यसंपादन, पुराणश्रवण, शास्त्रकथन, वृत्तांतनिवेदन, etc. An unlearned or careless hearer may have supposed when he heard such sentences as राज्यसंपादन केलें. पुराणश्रवण करा, शास्त्रकथन करीन etc., that राज्य, पुराण, शास्त्र, were the objects of the verbs and that संपादन केलें, श्रवण करा and कथन करीन were the verbs of which they were the objects; and under this idea he could

begin to make (as he thought) similar formations. But संपादन is joined to राज्य, not to केलें, श्रवण is joineed to पुराण, not to करा; कथन is joined to शास्त्र, not to करीन. Indeed the very term षष्ठी तत्पुरुष समास shows that if the two words were not formed into a compound word the first would be in the possessive case. Thus पुराण श्रवण करतों without a compound is पुराणाचें श्रवण करतों, and in Sanscrit पुराणस्य श्रवण करोमि. This is just what I contend for. If a compound noun be used, the gender of the second member of it must be regarded as कन्यादान केलें; if a compound be not used then the construction should be कन्येचें दान केलें. In neither case should it be कन्यादान केली." ४७

कृष्णशास्त्री चिपळूणकर व नानाशास्त्री आपटे यांनींहि या मुद्यावर लांबलचक चर्चा केली. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, 'संपादन करणें' हें संयुक्त क्रियापद मानून 'राज्य' हा शब्द त्याचें कर्म मानणें चुकीचें होईल.

'ज्ञानप्रसारक' कारांची विनंतिवजा सूचना

'ज्ञानप्रसारक'कार आणि मेजर कँडी यांच्यामध्यें झालेल्या वादाचा बराचस भाग मागील कांहीं पृष्ठांत दिला आहे, त्याचें कारण इतकेंच कीं मराठी भाषेला व्याकरण शुद्ध बनविण्याच्या बाबतींत मेजर कँडी यांनीं घेतलेल्या परिश्रमांची कल्पना वाचकांस यावी. मेजर कँडी यांचे सर्वच विचार तत्कालीन महाराष्ट्रीय विद्वानांस पसंत पडले नाहींत, ही गोष्ट सुद्धां वरील वादविवादावरून सिद्ध होण्यासारखी आहे. मतभेदाचा महत्त्वाचा मुद्दा एवढाच होता कीं, मेजर कँडी यांनीं प्रघातांत असलेली भाषेची व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न करूं नये. 'ज्ञानप्रसारका' मधील लेखनांत व्याकरणदृष्ट्या कांहीं दोष असणें संभवनीय असलें तरी, ते दोष दाखवितांना कँडी यांनीं आपल्या अधिकाराचा उपयोग करावा हें पुष्कळांस आवडलें नाहीं. या बाबतींत 'ज्ञानप्रसारक'कारांनीं मेजर कँडी यांना असें सुचविलें:—

"The Translator will, therefore, render service to the Committee and to vernacular literature by noticing these (faults) in a friendly and indulgent spirit, so as to encourage rather than suppress juvenile aspirations after literary distinc tion. The 'Dnyan Prasarak Society' neither makes, nor de-

४७ *D. P. I. Miscellaneous, Vol. 32.* 1858. p. 134.

sires to make any money by the publication of the magazine. The Society's object is the same that the Translator may be supposed to have in view, viz, the promotion of Marathi literature, and the dissemination of useful information through the Marathi language...How with such information, before him, he thought proper to use such severe criticism as occurs in his first report, the Committee cannot understand.

"Marathi spelling and grammar are still unsettled. The utmost that writers can do is to read existing grammars and to conform to them. But even this is not safe. Grammatical constructions and expressions which the authors of the grammars approve and would use themselves, are set aside as ungrammatical. The Committee would suggest the preparation of a Marathi grammar in the Translator's Department, which may be a guide to writers. Such a grammer will not, of course, be promulgated as authoritative till all the leading questions, have been discussed and set at rest. This is the more necessary as the Committee observe that the two Shastrees claim prescriptive right for innovations, which have been introduced into some Government vernacular books, but which are quite opposed to all ancient usage." [४८]

'ज्ञानप्रसारक'कारांची वरील सूचना मेजर कँडी यांनीं कधींच मान्य केली नाहीं. त्याच्या उलट त्यांचें धोरण प्रथमपासूनच असे लोकांच्या तोंडीं असलेले वाक्प्रचार अगर भाषापद्धति जर व्याकरणशुद्ध असेल तरच तिला लिखित भाषेंत स्थान असावें, असें त्यांचें म्हणणें होतें. या त्यांच्या आग्रही धोरणाचें कारण त्यांच्याच शब्दांत सांगावयाचें झालें तर तें असें होतें :—

"Now that great efforts are being made to promote education, and to raise a native literature, we must be particularly careful not to encourage or sanction bad composition. If the Murathas were an educated people, well acquainted with

---

[४८] *D. P. I. Miscellaneous, Vol. 32.* 1858. pp. 158-159.

the rules of conposition, and if they had a standard literature, an inelegant or ungrammatical work might safely be left to the fate to which the public taste and perception of propriety would doom it. But under present circumstances, those who are endeavouring to direct and advance the progress of education and literature must feel that much responsibility rests upon them. It solecisms and barbarisms are now sanctioned and published by authority, they may obtain such a firm hold in the language as to vitiate it for ever." [४९]

मेजर कँडी व 'विविधज्ञानविस्तार'

मेजर कँडी यांच्या या आग्रही धोरणामुळें त्यांच्या हयातींत एतद्देशीय मराठी भाषातज्ज्ञांशीं त्यांचे अनेक वेळां व्याकरणविषयक वाद झाले. अश विद्वान मंडळींपैकीं प्रामुख्यानें 'विविधज्ञानविस्तार'कर्ते मेजर कँडीशीं दोन हात करावयास पुढें आले. मेजर कँडी व 'ज्ञानप्रसारक'कार यांच्यामध्यें झालेल्या वादाला उद्देशून विस्तारकर्ते लिहितात:--

कांहीं वर्षांमागें पुण्यास 'मेजर क्यांडि' नांवाचे सरकारचे विद्याखात्यांतील भाषांतरकार होते. त्यांना मराठी भाषेच्या ज्ञानाचा मोठा गर्व असे ही गोष्ट पुष्कळांना ठाऊक असेल. कांहीं लेखांच्या संबंधानें, मेजर क्यांडि आणि त्यांचें कांहीं आश्रित मंडळ हें एका बाजूला, आणि मुंबईतील कांहीं विद्वान् मंडळी दुसऱ्या बाजूला, असें होऊन त्यांच्यामध्यें बरेच दिवस लेखी वादविवाद चालला होता. त्यामध्यें हे म्हणत, आमचें मत खरें; आणि ते म्हणत आमचें मत खरें. आणि आपापल्या मताच्या पुष्टीकरणार्थ उभयपक्षांकडून तऱ्हतऱ्हेचे पुरावेहि पुष्कळ पुढें येत असत.

"मेजर क्यांडि अधिकारावर असतां त्यांच्या हाताखालून जीं मराठी पुस्तकें गेलीं, त्या सर्वांवर त्यांच्या नेमक्या भाषेचा छाप असेच. त्यांचा एक मोठा सिद्धांत किंवा आग्रह होता, कीं भाषेमध्यें वैकल्पिक प्रयोग म्हणून जितके आहेत, तितके सरकारी पुस्तकांतून हटकून दूर करायाचे. त्यांना पुढें येऊं द्यावयाचें नाहीं उदाहरणार्थ तृतीयेचे प्रत्यय नें आणि नीं हे दोनच घ्यावयाचे. णें, णीं, हे घ्यावयाचे नांहींत. 'हा' शब्दाच्या विभक्तीमध्यें 'या' हें रूप येऊं द्यावयाचें नाहीं. सारांश ह्यानें, ह्यांनीं, असेंच लिहिलें पाहिजे. यानें, याणें, किंवा ह्याणें म्हटलें कीं त्यांचें पित्त खवळलें. 'तूं काम केलेंस' हें अशुद्ध, 'त्वां काम केलें' हेंच शुद्ध. 'तिला राणी केली' हें अशुद्ध, 'तिला राणी केलें' हेंच शुद्ध. असे कित्येक प्रकार होते; आणि त्यांवर त्यांचा इतका

---

९ *D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1848. pp. 156-157.

कटाक्ष होता कीं, जेव्हां जेव्हां त्यांच्या त्या नेमक्या पद्धतीला अनुसरून लिहिलेलें पुस्तक सरकारचा आश्रय मागायाला येई, तेव्हां तेव्हां त्याला आश्रय अवश्य देण्याविषयीं क्यांडिसाहेबांकडून शिफारस झाल्यावांचून बहुशः राहूं नये. आणि भिन्न प्रकार असतां बहुशः त्याविरुद्ध मत यावयाचेंच. दोन तीन गृहस्थांनीं तर ही खुबी पक्की ध्यानांत आणून तदनुरूप बिनचूक वागण्याचा निश्चय केल्यामुळें, त्यांनीं लिहिलेलें कोणतेंहि पुस्तक असो, तें क्यांडिसाहेबांच्या हातीं गेलें की, पसंत पडलेंच! त्यांच्या लेखांच्या ठायीं असा मोहकपणा येण्याला आणखी एक दोन कारणें होतीं ही जरी गोष्ट खरी आहे, तरी एकंदरींत पट्टशिष्यत्त्व स्वीकारणें हें मुख्य कारण होतें यांत संशय नाहीं." [५०]

'विस्तार' कर्त्यांचा हल्ला

असलें पट्टशिष्यत्त्व 'विविधज्ञानविस्तार' कर्त्यांनीं न स्वीकरल्यामुळें मेजर कँडीशीं व्याकरणविषयक कांहीं मुद्यांबाबत त्यांचे मतभेद झाले व सार्वजनिक रीत्या त्यांवर चर्चा झाली. या चर्चेमधून मेजर कँडी यांचें भाषाविषयक धोरण स्पष्ट होत असल्यामुळें तिचा अभ्यास करणें आवश्यक आहे. परीक्षांमधून, व्याकरणदृष्ट्या शुद्ध करण्यासाठीं कांहीं वाक्यें दिलीं जात व त्या वाक्यांचे प्रयोग शुद्ध कीं अशुद्ध. असा एक प्रश्न या काळांत विचारला जाई; त्याबद्दल मागें उल्लेख आलाच आहे. त्यावरून विस्तारकर्ते व मेजर कँडी यांच्यामध्यें वाद निर्माण होऊन 'विविधज्ञानविस्तारां' त एक लेख छापिला गेला. 'विस्तार'कर्ते या लेखांत लिहितातः—

"मराठी भाषेची परीक्षा घेण्याचा जेथें जेथें प्रसंग येतो, तेथें तेथें बहुधा, 'तूं काम केलेंस', 'तूं उद्योग केलास', 'तूं पोथी लिहिलीस' इत्यादि प्रयोग शुद्ध किंवा अशुद्ध व अशुद्ध असल्यास, कां अशुद्ध ते कळवावें. अशा प्रकारचे प्रश्न वारंवार येत असतात. परीक्षा देणारानें हे प्रयोग शुद्ध आहेत असें जर म्हटलें तर त्याला मराठी भाषा येत नाहीं, व व्याकरण समजत नाहीं, असें म्हणून परीक्षक त्याला कांहींच 'गुण' देत नाहींत, व त्यामुळें त्याचा फार तोटा होतो; परंतु असें करणें परीक्षकाला योग्य आहे कीं काय याचा विचार करणें अवश्य आहे. परीक्षकांना 'हे प्रयोग अशुद्ध' असें उत्तर मिळालें पाहिजे. कारण त्यांचें म्हणणें असें असतें कीं, वरील वाक्यांमध्यें केलें, केला, व लिहिली, हीं क्रियापदें लिंग, वचन, पुरुष या तिन्ही गोष्टींनीं कर्माशीं अनुसरून आहेत, यामुळें कर्मणि प्रयोग होय. कर्म तृतीय पुरुषीं आहेत, व क्रियापदेंही तृतीय पुरुषीं आहेत. असें असतां, त्यांच्यापुढें द्वितीय पुरुषवाचक 'स' हा प्रत्यय लावणें ही

---

[५०] **विविधज्ञानविस्तार**, पु. २१, अंक ६. १८८९. पु. १२९–१३१.

चूक आहे. याकरितां हा प्रयोग रूढींत जरी असला, तरी व्याकरणदृष्ट्या अशुद्ध आहे. व प्रख्यात मोरोपंत व वामन इत्यादि कवीनीं ही चूक जाणूनच अशा प्रयोगामध्यें 'स' जोडलेला नाहीं.

"आतां याविषयीं विचार करूं. अमुक एक प्रयोग, 'रूढींत आहे, परंतु तो व्याकरणदृष्ट्या अशुद्ध' हें म्हणणें अगदीं अप्रशस्त आहे, याविषयीं पुष्कळ लेख आलेले आहेत. व्याकरण म्हणजे काय? रूढीमध्यें जे प्रयोग असतील ते सिद्ध धरून त्यांमध्यें जे अंतर्गत नियम दिसतील, ते उघड करणें याचें नांव व्याकरण. असें असतां रूढींत असलेला प्रयोग व्याकरणदृष्ट्या अशुद्ध, याचा अर्थ काय? कांहीं नाहीं. सारांश रूढी अशुद्ध म्हणण्यापेक्षां आपल्या भाषेच्या व्याकरणाची स्थिति अद्यापि अशुद्ध किंवा अपक्व आहे, असें म्हणणें हें विशेष रास्त आहे. प्रथमतः व्याकरण सिद्ध करून नंतर भाषा उत्पन्न केली असें नाहीं. तर, आधीं भाषा, आणि मग व्याकरण, असा क्रम आहे. कित्येक लोक असें म्हणतात कीं, ही गोष्ट इंग्रजी वगैरे भाषांशीं मात्र लागू आहे, आणि भाषानुसारी व्याकरण ही कल्पना इंग्लिश लोकांची असून आलीकडे आपले लोक ती घेऊं पाहताहेत. परंतु असें नाहीं. हें म्हणणें अगदीं पोकळ आहे. कारण मराठी व्याकरण तीस चाळीस वर्षांपूर्वीं नव्हतें, म्हणून मराठी भाषाही नव्हती हें म्हणणें किती असमंजस आहे हें सांगण्याची गरज नाहीं....यावरून पाहतां, रूढीपेक्षां व्याकरणाचें वजन विशेष, ही कल्पना आपल्या लोकांमध्यें मुळींच नाहीं हें उघड दिसेल.

"परीक्षकाची जी शंका असते, कीं तृतीय पुरुषीं प्रयोग असतां त्याजवर पुनः आणखी 'स' कां लावावा? तिला उत्तर हेंच कीं 'रूढी आहे म्हणून.' पण हें व्याकरणाच्या नियमांत नाहीं, त्यास काय करावें? तर अमुक एक रूढींतला नियम तुमच्या व्याकरणामध्यें लिहिलेला नाहीं, म्हणून त्याप्रमाणें तुम्ही बोलूं नका व लिहूं नका, असें ज्यांची ती भाषा असेल त्यांना सांगणें हा मोठा जुलूम आहे; याकरितां व्याकरणामध्यें हा नियम नसला तर आतां घालावा आणि व्याकरण शुद्ध करावें."[५१]

'विस्तार'कर्त्याच्या म्हणण्याप्रमाणें, परीक्षकांच्या मतानुसार प्रश्नपत्रिका न सोडविल्यामुळें आपल्या मुलाला परीक्षेंत कमी गुण मिळाल्याबद्दल इ. स. १८५५ मध्यें 'प्रभाकर'कर्ते गोविंद विठ्ठल महाजन यांनीं हरकत घेतल्याचा उल्लेख सरकारी दप्तरांत पहावयास सांपडतो.[५२]

---

५१ **विविधज्ञानविस्तार**, पु. ३. अं. २. १८७०. पृ. २६–२७.
५२ *D. P. I. Miscellaneous, Vol. 19.* 1855. pp. 403–405.

मेजर कँडीचें उत्तर

व्याकरणाच्या नियमापेक्षां रूढीला प्राधान्य देऊन, प्रघातांत असलेल्या 'तूं काम केलेंस,' 'तूं उद्योग केलास,' 'तूं पोथी लिहिलीस' इत्यादि वाक्यांत क्रियापद सरकारयुक्त असणें योग्य होय, असें 'विस्तार'कर्त्यांचें म्हणणें होतें; परंतु मेजर कँडी यांना 'विस्तार'कर्त्यांनीं या मुद्यावर केलेली वरील चर्चा न आवडून, त्यांनीं खालील उत्तर दिलें :—

"The writer complains that in Marathi examinations, examiners put such questions as this, are such constructions as तूं काम केलेंस, तूं उद्योग केलास, तूं पोथी लिहिलीस, correct or incorrect? If incorrect, show why they are incorrect? And that if the person under examination says they are correct, the examiners put him down as one who does not know grammar.

"The writer blames examiners for objecting to a construction as ungrammatical which is in common use, and he thinks that its being in common use stamps it as correct.

"I suppose that no one will say that grammar comes first before language; but all will admit that rules of grammar must be drawn out from the language, and follow the genius of the language.

"Where all people speaking a language use a garticular construction, that construction must be admitted, however contrary it be to the principles of general grammar; but if there be two constructions in use, one accordant with the principles of general grammar, the other in variance with them, then, I would suggest thatt he first shou'd be followed, and the second discouraged at least in written composition; A greater latitude is rightly allowed in conversation than to written composition.

"The question should be asked, is the karmani prayog of authority in Marathi? And does the karmani prayog require that the verb should agree with the karma in gender, number and person? If an affirmative answer be given to these questions, it must be admitted that the constructions referred to are not accordant with the rule.

"Then comes the question, do all persons whose language is Marathi say तूं काम केलेंस etc.? Are there none that say त्वां (or तूं used for त्वां) काम केलें? If it be the case that all say

तूं काम केलेंस, the point is settled. The construction must be admitted. But it some say त्वां (or तूं) काम केलें, it must be admitted that these are in accordance with the rule.

"There is a curious case in English. We may say myself or ourselves, thyself and yourselves; and according to analogy, we ought to say hisself and theirselves; but instead of these forms, we say himself and themselves. Though incorrect himself aad themselves **are established,** and it would be affectation to speak otherwise.

"If तूं काम केलेंस etc. are to be received as **correct,** Marathi grammar should be altered.

"The writer tries to show that तूं काम केलेंस is an abridgment of and an equivalent to ज्याणें काम केलें तो तूं आहेस. Will this be generally admitted ?" [५३]

'युरोपियन लोकांचीपोकळ घमंडी'

परकीयांनीं आपल्या मराठीभाषाज्ञानाबद्दल विनाकारण अहंकार बाळगूं नये, या भूमिकेवरून 'विस्तार'कर्ते मेजर कँडी यांच्यावर टीका करीत असल्यामुळें त्यांना ती झोंबणें साहजिक होतें. 'विस्तार'कर्त्यांना मेजर कँडी यांची सासुगिरी मुळींच मान्य नव्हती. उघडउघडपणें ते त्यांच्यावर टीका करीत असत. 'विविधज्ञानविस्तारा'मधील 'युरोपियन लोकांची एतद्देशीय भाषाज्ञानाविषयीं पोकळ घमंडी' नामक एका लेखांत या टीकेचा सरस नमुना पहावयास मिळतो. 'विस्तार'कर्ते लिहितात :–

"जरी तीस बत्तीस वर्षें, मुंबई इलाख्यांत जेथें उत्तम मराठी बोलतात अशा ठिकाणीं राहणें झालें, जरी एतद्देशीय महाराष्ट्र विद्वानांची बराच काळ संगति आहे, जरी मराठी भाषेच्या ज्ञानाविषयीं अतिशय आढ्यता आहे, जरी मराठी भाषांतरकाराचें काम बरेंच दिवस करणें पडतें, तरी अझूनहि पूर्तेपणीं शुद्ध वाक्य लिहितां येत नाहीं. वाक्य लिहिणें झाल्यास 'तरी घोड्याच्या खुरां पेक्षां बकऱ्याचे खूर मेंढराच्या खुराला जवळ असतात' असल्या प्रकारचीं अशुद्ध व अनर्थकारक वाक्यें लिहायाचीं इतकीच जरी मराठी भाषेच्या संबंधानें स्वतःची योग्यता, तरी सदाशिव काशीनाथ छत्रे, बाळ गंगाधर शास्त्री इत्यादिक महाराष्ट्रीय विद्वानांचीं उत्तम पुस्तकें तपासण्यास, शुद्ध करण्यास हेच काय ते योग्य. हे गृहस्थ जरी स्वतः अशुद्ध व अनर्थकारक भाषा लिहितात तरी लोकांनीं मुख्यतः (जन्मापासून मराठी भाषा बोलणाऱ्या

---

५३ *D. P. I. Translation Department, Vol 28.* 1870–71. (No paging.)

लोकांनीं) मराठी भाषा कशी लिहावी, तींतील शब्दांचे उच्चार कसे करावे व ते शुद्ध कसे लिहावे इत्यादिक विषय लोकांस ते शिकवितात. असा चमत्कार पोकळ अभिमानाचा. जर आपल्याला बरोबर येत नाहीं तर तज्ज्ञानाविषयीं फुकट डौल काय म्हणून मिरवावा? असल्या प्रकारचा दुरभिमान बहुतेक युरोपियन लोकांत आढळतो."[५४]

परीक्षा व भाषा

वरील टीकेचा रोख मेजर कँडी यांच्या विरुद्ध होता, हें स्पष्टच आहे. मेजर कँडी यांनीं लिहिलेल्या टीकालेखांतील जें कांहीं उतारे मागील पृष्ठांत ठिकठिकाणीं दिलेले आहेत, ते पाहिले असतां मेजर कँडी 'स्वतः अशुद्ध व अनर्थकारक भाषा लिहितात' हें 'विस्तार'कर्त्यांचें विधान कोणासहि मान्य होण्यासारखें नाहीं. त्यांनीं सुचविलेल्या भाषाविषयक दुरुस्त्या जरी रूढीच्या विरुद्ध होत्या तरी व्याकरणशास्त्राच्या चौकटींत बसण्यासारख्या होत्या. लेखनाची भाषा व्याकरणशुद्ध असावी या हेतूनेंच 'मराठी भाषेचें व्याकरण व रचना ह्यांविषयींचे प्रश्न' मॅट्रिक परीक्षेच्या व शिक्षक-विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांत विचारले जात. 'तूं बुक वाचलेंस ह्या वाक्यांत क्रियापदास स लागला तो कोणत्या नेमानें लागला?' या प्रश्नाचें उत्तर मेजर कँडी यांच्या अपेक्षेप्रमाणें 'कोंकणी प्रयोगाच्या नियमानें', असें मिळत असे. अशाप्रकारचीं आणखी कांहीं प्रश्नोत्तरें अशीं आहेत:—

"त्वां मला अगोदर सांगावयाचें होतेंस हा प्रयोग कोणता?—कोंकणी प्रयोग. मनास येईल तशीं कर्मे तूं केलींस आतां मला काय विचारतोस? हें वाक्य शुद्ध करा—मनास येईल तशीं कर्मे तूं किंवा त्वां केलीं, हें बरोबर आहे. तूं आंगठी मस्करीनें ठेविलीस असशील असें मला वाटतें हें वाक्य नीट करा—त्वां आंगठी मस्करीनें ठेविली असेल, असें असावें.

कर्मणि प्रयोगाचा भावी प्रयोग कसा करावा?—कर्मास प्रत्यय लावून क्रियापद भूतकालीं नपुंसकलिंगीं करावें.

हें काम तूं केलेंस, हें वाक्य व्याकरणशुद्ध आहे कीं काय? प्रयोग कोणता?—केलेंस हें व्याकरणशुद्ध नाहीं. केलें असें असावें.

त्या पोरानें ह्या मुलीस मारली, हें वाक्य व्याकरणशुद्ध आहे काय? प्रयोग कोणता?— हें वाक्य व्याकरणशुद्ध नाहीं. त्या पोरानें ह्या मुलीस मारलें असें पाहिजे.

लोकांनीं सद्गुणाची स्तुति करावी, किंवा करीत असावें. कोणतें शुद्ध आहे? कशावरून?— लोकांनीं स्तुति करीत असावें हें शुद्ध. कारण, स्तुति हें कर धातूचें कर्म आहे, करीत हें अस धातूचें क्रियाविशेषण आहे, अस धातु अकर्मक आहे, व हा भावे प्रयोग आहे.

---

५४ **विविधज्ञानविस्तार**, पु. ५. अं. १. १८७२. पृ. १५–१६.

अरे तुला त्यावेळेस छेडायाची होती. हें वाक्य शुद्ध आहे ?—अरे तुला त्यावेळेस छेडायाचें होतें. हें शुद्ध आहे."

वरील प्रश्नोत्तरें पुणें कॉलेजमधील शिक्षक–विद्यार्थ्यांच्या (Normal Department) इ. स. १८५२ व १८५३ च्या परीक्षांमधील आहेत. [५५] पुढें प्रवेश परीक्षेच्यावेळींहि असेच प्रश्न विचारले जात.

'विस्तार'कर्त्यांनीं अशाप्रकारच्या प्रश्नपत्रिका काढणाऱ्या व तपासणाऱ्या परीक्षकांवर टीकेची झोड उठविली. [५६] विशेषतः मॅट्रिक परीक्षेच्या मराठीच्या उत्तरपत्रिका तपासणारांवर त्यांचा रोख होता. त्यावेळचे परीक्षक खालीलप्रमाणें होते.

इ. स.	१८५९,	जे. एस्. एस्. रॉबर्टसन व दादोबा पांडुरंग.
	१८६०,	रे० मरे मिचेल व विनायक वासुदेव.
	१८६१,	मेजर कँडी व वि. ना. मंडलिक.
	१८६२,	मेजर कँडी व विनायक वासुदेव.
	१८६३,	मेजर कँडी व म. गा. रानडे.
	१८६४,	मेजर कँडी व बा. मं. वागळे.
	१८६५,	डॉ. विल्सन व बा. मं. वागळे.
	१८६६,	जी. ए. जेकब व बा. मं वागळे. [५७]

परीक्षक आणि परीक्षांमधून विचारले जाणारे 'मराठी भाषेचें व्याकरण व रचना ह्यांविषयींचे प्रश्न,' यांवर 'विस्तार' कर्त्यांनीं केलेली टीका मेजर कँडी यांना फार झोंबली, व त्यांनीं आपली बाजू खालील शब्दांत मांडली :—

"It is not right that an anonymous writer should be allowed to bring such charges against examiners without any attempt to substantiate them. As I have been several times an examiner in Marathi, I may say for myself that I have ever endeavoured to deal fairly with those that have come up for examination, and that I have inclined to leniency rather than to severity. It is true that I think the forms त्यानें, ह्यानें, etc. more correct than त्याणें, याणें, etc., but I have never given a mark less because the paper before me had the latter." [५८]

---

[५५] *D. P. I. Board of Education, Poona College.* 1853. (No paging)

[५६] **विविधज्ञानविस्तार**, पु. २. अं. ९. १८६९. पृ. १४१–१४२.

[५७] *Matriculation Examination papers in Marathi*, 1859 to 1866.

[५८] *D. P. I. Translation Department, Vol. 28.* 1869–70. p. 21.

ऐकावें जनांचें, करावें मनाचें

मेजर कँडी यांनीं 'विस्तार' कर्त्यांच्या टीकेला दिलेलें हें उत्तर जोरदार आहे; त्याचबरोबर त्यांत दुसऱ्यांच्या मताची कदर बाळगण्याची त्यांची वृत्तीहि दिसून येते. परमतसहिष्णुतेमुळें त्यांना त्यांच्या सूचना अमलांत आणतां आल्या असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. वर उल्लेखिलेले वाक्यप्रयोग, तसेंच 'त्यानें' 'ह्यानें' इत्यादि शब्दप्रयोग आज सरसहा वापरले जातात याचें कारण मेजर कँडी यांनीं ठेविलेलें खंबीर धोरण होय. 'बाळमित्र' भाग पहिला, (१८२८) या पुस्तकाची सुधारलेली आवृत्ति काढतांना कँडी यांनीं केलेले बदल मागें दाखवून दिलेच आहेत. 'ज्ञानप्रसारक' मासिकाचा नोव्हेंबर, १८६१ चा अंक तपासून या मुद्याबद्दल कँडी यांनीं लिहिलें :—

"There occurs one sentence लागलीच काढून कां टोपलींत भरलीस नाहींस. One स is redundant here even according to the common (though incorrect) way of writing. भरलीस नाहीं or भरली नाहींस would be the common way. As a karmani prayog the correct way is ती कां टोपलींत भरली नाहीं. The leading and governing word is ती." [५९]

वामन कृष्ण देशमुख यांच्या 'सुहास्यवदन' नामक नाटकाचें भाषा व व्याकरण दृष्ट्या परीक्षण करतांना मेजर कँडी यांनीं जवळजवळच असलेलीं दोन वाक्यें घेऊन, त्यांतील एक कसें शुद्ध व दुसरें कसें अशुद्ध हें दाखविलें आहे. ते लिहितात :—

"At page 54, तूं तिजकरितां जे कांहीं प्रश्न घेतले आहेस, and at page 55, जे श्रम सुहास्यवदनेकरितां मी घेतले आहेत, these two prayogs ought to be the same (both being karmani), but they are quite different. In the first sentence, a part of the verb घेतले agrees with जे कांहीं श्रम; but the substantive verb आहेस agrees with तूं whereas it ought to be आहेत to agree with श्रम. The correct sentence is त्वां (or तूं if considered as in the third or agential case) तिजकरितां जे कांहीं श्रम घेतले आहेत. This would agree with the next sentence which is correct except that मी should be म्यां or मीं (both forms of the third case.)" [६०]

---

५९ *D. P. I. Translation Department, Vol. 19.* 1861. p. 144.

६० *D. P. I. Government, Vol. 1.* 1871–72. p. 165.

त्याचप्रमाणें, सीताराम विश्वनाथ पटवर्धनकृत 'मोडी पुस्तक, दुसरें' तपासतांना मेजर कँडी म्हणतात कीं, एका ठिकाणीं 'ही गोष्ट फार वाईट केलीस' हें वाक्य प्रयोगाच्या दृष्टीनें चुकीचें असून तें 'ही गोष्ट फार वाईट केली' असें कर्मणि प्रयोगी असावें. [६१]

शालेय पुस्तकें व 'ज्ञानप्रसारक,' 'चंद्रिका' यांसारखीं नियतकालिकें यांमधून मेजर कँडी वर उल्लेखिलेला सप्रत्ययविरहित वाक्यप्रयोग मुलांसमोर सतत ठेवीत होते व या त्यांच्या प्रयत्नांची प्रतिक्रिया तत्कालीन वर्तमानपत्रांतून होत होती. लोकांच्या बोलण्यांत 'त्यानें घोडा जुंपलान,' 'कृष्णानें मुरली वाजविलीन,' 'वेणुनें सुंदर चित्र काढिलेंन,' 'तूं काम केलेंस' इत्यादि प्रयोग असतांना ते चुकीचे ठरवून, त्यांतील 'न' 'अगर 'स' हे क्रियापदाला लागणारे प्रत्यय काढून टाकणें इष्ट नाहीं, अशा आशयाचें एक कडक पत्र 'एल्फिन्स्टन स्कूलपेपर' नामक एका इंग्रजी मासिकांत छापलेलें आढळतें.[६२] त्यांत पत्रकारानें 'बालमित्रा'च्या मेजर कँडी यांनीं शोधिलेल्या आवृत्त्यांमध्यें, अशा वाक्यांतील द्वितीय पुरुषीं एकवचनीं क्रियापदाला लागणारा 'स' प्रत्यय काढून टाकल्याबद्दल नापसंती व्यक्त करून, त्या प्रत्ययामुळें कर्त्याचा पुरुष व वचन समजूं शकतें, यासाठीं तो प्रत्यय ठेवणें आवश्यक आहे, असें प्रतिपादिलें आहे. तसेंच 'त्यानें घोडा जुंपलान,' या वाक्यांतील क्रियापदाला लागणारा 'न' प्रत्यय, कर्ता तृतीय पुरुषीं, एकवचनीं असल्याचें दर्शवितो, यास्तव तो प्रत्यय काढून टाकणें इष्ट नव्हे असें त्या पत्रकाराचें म्हणणें होतें. त्याचप्रमाणें, 'तुम्ही काम केलेंत,' 'त्यांनीं काम केलेंनी' वगैरे वाक्यांतील क्रियापदांत असणारा 'त' हा द्वितीय पुरुषीं अनेक वचनीं प्रत्यय व 'नी' हा तृतीय पुरुषीं अनेकवचनीं प्रत्यय वापरण्याची आवश्यकता या पत्रांत सिद्ध केलेली आहे. या पत्राला रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनीं दिलेलें उत्तरहि पहावयास मिळतें. [६३] त्यांनीं मेजर कँडी यांचीच बाजू उचलून धरली.

वरील सर्व विवेचनावरून असें दिसून येईल कीं, मेजर कँडी यांनीं रूढींत असलेला हा वाक्यप्रयोग बदलून तो व्याकरणशुद्ध केला व शालेय पुस्तकांमधून तो मुलांसमोर ठेविला. या प्रयत्नामुळें आज जरी बोलण्यांत कांहीं ठिकाणीं रूढिप्रियतेमुळें जुनाच वाक्यप्रयोग आढळला, तरी लेखनांत मेजर कँडीप्राणित प्रयोग वापरांत आलेला दिसतो.

---

६१ *D. P. I. Book Depot, Vol. 27.* 1874–75. p. 266.

६२ *Elphinstone School Paper, Vol. 2.* No 8. 1861. pp. 217–218.

६३ *Ibid.* p. 238.

इंग्रजी शब्दांचे उच्चार कसे करावे ?

सरकारी विद्याखातें म्हणजेच मेजर कँडी यांच्या भाषाविषयक धोरणावर टीका करणारांत ' विविधज्ञानविस्तार 'कर्ते हे एक होते हें आपण पाहिलेंच आहे. त्यांच्या टीकेमुळें मराठी भाषेंतील व्याकरणविषयक कांहीं प्रश्नांना वाचा फुटली. अशा प्रश्नांत इंग्रजी शब्दांचे उच्चार कसे करावे, हा महत्त्वाचा प्रश्न होता. 't' आणि 'd' या इंग्रजी अक्षरांबद्दल वापरल्या जाणाऱ्या, ट आणि ड यांचा उच्चार मराठींतल्या इतका कठोर होत नाहीं; त्यांस तकार आणि दकार यांची कांहीं छाप मारते,' [६४] असें एक विधान 'विस्तार'कर्त्यांनीं केलें. सरकारी विद्याखात्याच्या धोरणाविरुद्ध तें असल्यामुळें, मेजर कँडी यांनीं ' विस्तार ' कारांना मोल्स्वर्थ यांच्या कोशांत आढळणारे यासंबंधींचे विचार अभ्यासावयास सांगितलें. ' विस्तार 'कर्ते प्रथमपासूनच विद्याखात्याच्या भाषिक धोरणाविरुद्ध असल्यामुळें त्यांनीं मेजर कँडी यांच्या मताचा खरपूस समाचार घेतला. त्यांनीं लिहिलें :—

'' आमच्या पुस्तकामध्यें ट, ड हे जिकडे इंग्लिश उच्चार दिले आहेत, तिकडेच असें लिहिलें आहे कीं त्यांमध्यें किंचित् तकार व दकार यांचा भास होतो; म्हणजे त्यांचा उच्चार अमळ मृदु होतो, मराठींतील ट, ड, यांसारखा इतका प्रखर होत नाहीं. परंतु ट्रान्स्लेटर यांचें म्हणणें उलट पडतें. ज्या इंग्लिश उच्चारांच्या जागीं हीं अक्षरें योजिलीं आहेत, त्याचें ट, ड यांशीं जितकें साम्य आहे, त्याहून त द यांशीं विशेष आहे असें ते म्हणतात. तेव्हां याचा निर्णय स्पष्ट रीतीनें झाला पाहिजे. कारण स्वाभाविकपणें हें उघड आहे, कीं इंग्लिश शब्दांचा उच्चार साधारणपणें इंग्लिश लोकांस इतर लोकांपेक्षां चांगला करितां येईल. आणि हाच नियम सर्वत्र; म्हणजे मराठीचा उच्चार साधारणपणें इतर लोकांपेक्षां मराठी लोकांस चांगला करितां येईल. तेव्हां ज्या इंग्लिश उच्चार विषयीं हा वाद आहे, तो मराठींतील ट, ड यांशीं किंवा त, द यांशीं विशेष साम्यतेचा आहे हें सिद्ध करणें ही गोष्ट अमळ विचाराची आहे. मोल्स्वर्थकृत कोशामध्यें जरी पाहिलें तरी तेथें सिद्धता म्हणून कांहींच नाहीं. या ग्रंथकाराचेंही म्हणणें असें आहे कीं हे उच्चार ट, ड आणि त, द यांच्यामध्यें आहेत. तथापि त्यास वाटलें त्यामुळें त्याणें ते त, द यांशीं विशेष सान्निध्य ठेवणारे असें म्हटलें आहे. यावरून पाहतां शेवटीं सिद्धता म्हणून झालीच पाहिजे. याकरितां आपण पुढील गोष्टीकडे लक्ष देऊं. इंग्रजी भाषेंत त आणि ट किंवा द आणि ड असे वेगळे उच्चार नाहींत; तर या दोहोंच्या मध्यें ज्यांचा उच्चार आहे अशीं दोन व्यंजनें आहेत,

---

६४ **विविधज्ञानविस्तार**, पु. १, अं. ७. १८६८. पृ. १०२.

याविषयीं तर वादच नाहीं. परंतु मराठींत त आणि ट आणखी द आणि ड अशीं वेगवेगळीं अक्षरें आहेत. यामुळें त, ट आणि द ड यांचा उच्चार भेद जाणण्याविषयीं मराठी लोकांच्या कानांची तीक्ष्णता फार जागृत असते, व त्यांस त्या उच्चारांविषयीं कधींही भ्रांति पडत नाहीं. बरें पुढें; मराठींत अक्षरांचा जो उच्चार बांधलेला आहे त्याहून वेगळा कधीं व्हावयाचा नाहीं. परंतु इंग्रजींत एकच शब्द निरनिराळे लोक निरनिराळ्या रीतीनें उच्चारतात असें वारंवार घडतें...tea, stand, London, director, administrator इत्यादिकांचे उच्चार ती, स्त्यान्द, लंदन, दैरेक्तर, आद्मिनिस्त्रेतर इत्यादिकांच्या सन्निध, किंवा टी, स्टँयड, लंडन्, डायरेक्टर, ॲड्मिनिस्ट्रेटर इत्यादिकां सन्निध होतात याचा कोणीही इंग्लिश जाणत्या विद्वानानें विचार करून पाहवा." [६५]

'विस्तार'कर्त्यांना उच्चारासंबंधीं मेजर कँडी यांचें मोल्स्वर्थपुरस्कृत धोरण मुळींच पसंत नव्हतें, त्यामुळेंच एवढ्या कडक शब्दांत त्यांनीं वर दिल्याप्रमाणें आपलें मत मांडलें. मेजर कँडी यांनाहि तें झोंबलें; त्यानीं आपली बाजू मांडतांना लिहिलें कीं, मराठी व्याकरण अगर भाषेची रूढी यांच्यासंबंधानें स्वतःचें कांहीं मत प्रस्थापित करण्याविषयीं आपला मनोदय मुळींच नसतो. जर आपणाला कांहीं विशेष गोष्ट वाटली तर ती आपण कळवितों, आपल्या मताची जी वास्तविक योग्यता असते, ती योग्य रीतीनें कळवावी, एवढाच आपला हेतु असतो, असें त्यांचें म्हणणें असे.

'याचा कोणीही इंग्लिश जाणत्या विद्वानानें विचार करून पाहवा'

या चर्चेंत मुख्य मुद्याला फाटा फुटून एका वेगळ्याच बाबतींत वाद निर्माण झाला. 'विस्तार'कारांचें एक वाक्य–'याचा कोणीही इंग्लिश जाणत्या विद्वानानें विचार करून पाहवा'–नवीन चर्चेचा विषय बनलें. मोल्स्वर्थसारख्या मराठी भाषातज्ञाच्या मताला 'विस्तार'कारांनीं मुळींच मान देऊं नये, याचा मेजर कँडीना अचंबा वाटला. गैरसमज वाढूं नये म्हणून 'विस्तारा'मध्यें 'खोटा आरोप' या नांवाचा एक लेख 'विस्तार'कर्त्यांनीं लिहिला, [६६] आणि त्यांत मेजर कँडीनीं विपर्यास केल्याचा त्यांच्यावर आरोप ठेविला. मेजर कँडी स्वस्थ बसणें शक्यच नव्हतें. त्यांनींही पण 'विस्तार'कर्त्यांना झणझणीत उत्तर दिलें. आपल्या उत्तरांत ते मोल्स्वर्थबद्दल लिहितात :—

---

[६५] **विविधज्ञानविस्तार**, पु. १. अं. ११. १८६८. पृ. १७०–१७१.

[६६] **विविधज्ञानविस्तार**, पु. २. अं. १. १८६८. पृ. १०–११.

"I assure the editor that I had not the least desire or thought of misrepresenting his meaning... I took the word English as an adjective, whereas he used it as a noun... If the rendering the editor has given had occurred to me, I should just as willingly have used it... Mr. Molesworth is a learned person who knows both Marathi and English, and he had given a decided opinion on the subject, to which opinion the editor yielded no deference whatever. I would remind him that an intelligent Englishman who knows Marathi is as competent to give an opinion upon the subject as an intelligent Maratha who knows English." [६८]

'विस्तार'कर्ते व मेजर कँडी यांची भेट

या वादविवादामुळें t आणि d या इंग्रजी अक्षरांचे उच्चार खुद्द मेजर कँडी कसा करितात तें जाणून घेण्याची संधि 'विस्तार'कर्त्यांनीं मिळविली. या प्रसंगाचें वर्णन करतांना 'विस्तार'कर्ते लिहितात :—

"t आणि d यांचे उच्चार ट् आणि ड् यांसारिखे होतात, असें आमचें मत होतें. तें मराठी ट्रान्स्लेटर यांस न आवडून, ते त् आणि द् यांसारखे होतात अशाविषयीं त्यांणीं आपलें मत लिहिलें व त्या मतास आधार म्हणून कांहीं इकडचे तिकडचे दाखलेही पुढें केले. हें तर काय; परंतु त्यांच्या हाताखालीं आजपर्यंत जीं मराठी पुस्तकें छापलीं गेलीं आहेत त्यांमध्यें पाहिलें असतां स्पष्ट नजरेस येईल कीं, हा त्यांचा नियम त्यांणीं फारच कडकपणें चालविण्याचा यत्न केला आहे. तो एथवर कीं ज्या बहुतेक लोकांनीं प्रख्यातीस आलेल्या चांगल्या इंग्लिश लोकांच्या तोंडचे उच्चार शिकून इंग्रजी भाषेचा चांगलाच अभ्यास केला आहे, त्या लोकांस, ट्रान्स्लेटर यांणीं मराठी अक्षरांनीं लिहिलेले इंग्रजी शब्द बराच वेळपर्यंत आपल्या परिचयांतले वाटत नाहींत; याचें कारण पाहिलें असतां दुसरें कांहीं नाहीं, फक्त t आणि d यांचे उच्चार त्यांणीं त् आणि द् यांसारखे लिहिले आहेत हेंच होय. आतां t आणि d यांचा उच्चार त् आणि द् यांसारखा होतो असें म्हणण्याचा त्यांचा आग्रह ज्या पक्षीं आहे त्या पक्षीं त्यांच्या म्हणचे खुद्द ट्रान्स्लेटर यांच्या तोंडचे मराठी उच्चार ऐकून घ्यावे अशी आमची इच्छा होती, ती थोड्या दिवसांपूर्वी पूर्ण झाली. परंतु त्यांचे उच्चार खरेखोटे हें एथें लिहून दाखविणें प्रशस्त वाटत नाहीं, म्हणून त्यांविषयीं कांहीं लिहीत नाहीं."[६९]

---

६८ *Bombay Educational Record, Vol. 4,* No 10. 1868. pp. 315-316.

६९ **विविधज्ञानविस्तार,** पु. २, अं.१०–११–१२.१८७०. पृ.१७०–१७१.

'विस्तार'कर्ते व मेजर कॅंडी यांच्यामध्यें प्रत्यक्ष काय चर्चा झाली, हें जर विस्तार'कर्त्यांनीं सविस्तर लिहिलें असतें तर बरें झालें असतें. त्यांच्या या थोड्याशा निंदागर्भ टीकेला मेजर कॅंडीनींहि जोरदारपणें उत्तर दिलें. कोशकार वेब्स्टर, तसेंच बुहलर, राजेंद्रलाल मित्र इत्यादि विद्वानांचीं प्रस्तुत मुद्यावरील मतें 'विस्तार'कर्त्यांनीं आपल्या विधानाच्या समर्थनार्थ दिलीं होतीं. तर मेजर कॅंडी यांनीं विल्यम जोन्स, जिलख्राइस्ट, स्टीव्हनसन यांचीं मतें आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ मांडलीं होतीं. मेजर कॅंडी लिहितात:—

"I readily allow that the English dentals are not so soft as the Sanskrit and Marathi dentals, and therefore, they are not exact representatives each of the other. But I confidently maintain that **generally speaking** d and t are much nearer to त and द than they are to ट and ड

"I say 'generally speaking' for as there are not in the English alphabet both a dental t and a cerebral t or both a dental d and a cerebral d, it is possible that a few English words may be found in which t and d are nearer to ट and ड than to त and द; but it is a great mistake to make ट and ड the general representatives of t and d....

"I regret the writer of the article on which I am remarking should have indulged in personality. Personality does not help the cause of him he uses it, but it must be unpleasant to him against whom it is used. Even if it be proved that the Marathi Translator has a shockingly bad pronunciation of Marathi, it does not follow that ट and ड are the right representatives of t and d." [७०]

इंग्लंड नव्हे तर इंग्लंद !

मेजर कॅंडी यांच्या मताप्रमाणेंच या काळांतील सर्व शालेय पुस्तकांत t आणि d या इंग्रजी अक्षरांऐवजीं मराठींत त आणि द हीं अक्षरें वापरलीं जात असत. त्यांनीं तपासलेल्या प्रत्येक पुस्तकांत तीं तशींच असावीं असा त्यांचा आग्रह असे. विशेषतः त्यांनीं या मुद्याचें विस्तारपूर्वक विवेचन तर्खडकरांची 'भाषांतर पाठमाला' तपासतांना केलेलें आढळतें. [७१]

---

७० *D. P. I. Translation Department, Vol. 28.* 1870–71. (No paging)
७१ *D. P. I. Book Depot, Vol. 31.* 1875-76. p. 358.

विष्णुशास्त्री म्हणतात—

ज्या ज्या ठिकाणीं t आणि d या इंग्रजी अक्षरांचे उच्चार मराठींत लिहिण्याची गरज पडे, त्या त्या ठिकाणीं मेजर कँडी आपला मार्ग सुचवित असत; इतकेंच नव्हे तर या काळांत छापल्या गेलेल्या सर्व शालेय पुस्तकांमध्यें त्यांच्या पद्धतीचा अवलंब करणें भाग पडे. विशेषतः त्यांनीं रचलेल्या भूगोलाच्या पाठ्यपुस्तकांत t आणि d यांबद्दल सरसहा त आणि द या अक्षरांचाच उपयोग केलेला आढळतो. हा जुलूम 'विस्तार'कर्त्याप्रमाणेंच विष्णुशास्त्री चिपळूणकरांनाहि न आवडून त्यांनीं याबाबत कडक शब्दांत आपले विचार मांडले. ते लिहितात:—

"वर्णशुद्धिविषयीं एकंदरींत पाहतां सध्यांची पद्धत बहुतकरून बरोबर आहे असें आम्हांस वाटतें. वीस पंचवीस वर्षांपूर्वी 'स्थ' च्या जागीं 'स्छ' 'च' चा दंततालव्य उच्चार कर्तव्य असतां त्याच्यामार्गे टिंब द्यावयाचें, वगैरे जे विलक्षण प्रकार चालू होते ते आतां कोठेंहि दृष्टीस पडत नाहींत. इंग्रेजींतील 'ट' 'ड' यांच्याजागीं 'त' 'द' असें लिहिण्याचा परिपाठही अलीकडे अंमळ माजीच पडला असें दिसतें.'स्कातलंद,' 'त्रान्स्लेतर, 'वाशिंग्तन्' वगैरे रूपें सरकारी मराठी पुस्तकांतून व मिशनरींच्या ग्रंथांतून अगदीं नेहमीं आढळतात खरीं. पण बाकीच्या पुस्तकांतून वरील नियम तितका अबाधित चालत नाहीं. 'इंग्लंड,' 'आक्टोबर' अशींच रूपें बोलण्यांत व लिहिण्यांत अलिकडे चालू झालीं आहेत.

"हा विलक्षण प्रघात कशामुळें पडला असेल तो असो! 'इंग्लंड'शब्दाचें 'इंग्लंद' असें जें रूपांतर करायाचें तें मराठींत 'ड' नाहीं म्हणून, किंवा तसा उच्चार आम्ही नेहमीं करतों म्हणून, काय असेल तें असो! आमच्या लिपींत तर 'ड' आहेच, व इंग्रेजी शब्दांचाही उच्चार 'बटाटा,' 'पोष्ट,' 'अल्पिष्टन' असाच आमचे लोक करीत आले आहेत. एक मात्र कारण दिसतें, कीं इंग्रेजींत 'त' नसल्यानें Calcutta असें इंग्रेज लोक त्या शब्दाचें रूपांतर करतात, तेव्हां असे शब्द पुनः मराठींत आणले असतां 'ट' चा पुनः 'त' करावा लागतो. पण या इंग्रेजी लिपीच्या उणीवेबद्दल मराठीला काय म्हणून तिसऱ्या ठिकाणीं प्रायश्चित्त!" [७२]

असेच विचार 'मराठी शाळापत्रकांत' पहावयास सांपडतात. [७३]

---

७२ **निबंधमाला**, अं. १०, आक्टोबर, १८७४. पृ. ७–८.

७३ **मराठी शाळापत्रक**, पु. ११, अं. ११–१२. १९००. पृ. ३६५.

अशा पद्धतीनें मेजर कॅंडी यांनीं घालून दिलेल्या या नियमाविरुद्ध ठिकठिकाणीं नापसंती व्यक्त केली गेली, आणि त्याचा परिणामहि झाला. मेजर कॅंडी यांच्या पश्चात त्यांच्या पद्धतीप्रमाणें 'इंग्लंद' 'स्कातलंद' असें न लिहितां t आणि d या अक्षरांचें रूपांतर ट आणि ड असें करून 'इंग्लंड,' 'स्काटलंड' असें लिहिलें जाऊं लागलें.

कोंकणी प्रयोग व मेजर कॅंडी

सुशिक्षितांचा प्रघात भाषेला वळण लावीत असतो. एकोणिसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत मुंबईच्या 'हैंदशाळा शाळापुस्तकमंडळी' च्या पदरीं जे शास्त्रीपंडित होते ते सर्व कोंकणांतील होते. जगन्नाथशास्त्री क्रमवंत, दाजीशास्त्री शुक्ल, गंगाधरशास्त्री फडके इत्यादि त्यावेळचे बरेच शास्त्री चौलअष्टागर प्रांतांतील होते. तसेंच बापू छत्रे, बाळशास्त्री जांभेकर हे शाळापुस्तकमंडळीचे चिटणीस देखील कोंकणांतील होते. त्यामुळें या सर्वांच्या लेखनांत कोंकणी प्रकाराचें प्राबल्य असणें अपरिहार्य होतें. त्यांच्या भाषेंतील एकदेशीपणा त्यांच्या लिहिण्यांत व्यक्त होत असे. लिखित भाषेला आदर्श बनवावयाचें असल्यास, त्या भाषिक प्रांताचा जो मध्यभाग असेल त्याठिकाणची भाषा खरी शुद्ध भाषा मानून त्याप्रमाणें इतरांनीं तिचें अनुकरण करावयास पाहिजे, ही दृष्टि समोर ठेवून या काळांत सरकारी विद्याखात्यानें म्हणजेच पुष्कळ अंशीं मेजर कॅंडी यांनीं मराठी भाषेंतील एकदेशीपणा काढून टाकण्याचा प्रयत्न केलेला आढळतो.

मेजर कॅंडी यांनीं पुस्तकांची व्याकरणविषयक तपासणी करतांना भाषाशुद्धीची जी दृष्टि ठेविली होती, तींत भाषेमधील कोंकणी प्रचारांना फाटा देण्याबद्दल त्यांचा कटाक्ष असे. त्यांनीं शोधिलेल्या पुस्तकांत जर कोंकणी वाक्प्रचार अगर प्रयोग त्यांना आढळले तर ते काढून टाकण्याची सूचना ते वारंवार देत असत. मराठीचें विद्याकेंद्र पुणें शहर हें पेशवाईंत राजधानी ठरून त्यास इंग्रजी अंमलांतसुद्धां पश्चिम हिंदुस्थानच्या दुय्यम राजधानीचा मान मिळाल्यामुळें, तेथील भाषा शुद्ध, शिष्ट म्हणून अनुकरणीय मानली गेली. येथील भाषेप्रमाणें मराठीचें लेखन असावें अशा दृष्टीनें मेजर कॅंडी यांनीं त्यांच्या हातीं तपासण्यासाठीं आलेल्या अनेक पुस्तकांतील भाषेची दुरुस्ती केली. पेशवाई बुडाल्यावर जे कित्येक शास्त्रीपंडित मराठी भाषेच्या उत्कर्षाकडे लागले, त्यांतील बहुतेक कोंकणांत राहाणारे असल्यामुळें त्यांनीं लिहिलेल्या पुस्तकांत कोंकणी प्रकारांचें (Concanisms) प्राबल्य दिसूं लागलें. त्याकडे दुर्लक्ष केल्यास लिखित मराठी भाषेंत ते प्रकार रूढ होतील या भीतीनें, मेजर कॅंडी यांनीं बारकाईनें ते शोधून काढून त्यांचें उच्चाटण करावयाचें ठरविलें.

'बाळमित्र'

मराठीमध्यें आदर्श म्हणून मानल्या गेलेल्या 'बाळमित्रा'ची भाषाविषयक तपासणी करून मेजर कँडी यांनीं केलेल्या सुधारणा अशा प्रकारच्या होत्या :—

"कोंकणी शब्द कोठें कोठें होते ते काढून देशभाषेप्रमाणें शब्द घातले.

कोठें दूरान्वित शब्द होते ते जेथील तेथें समीप केले.

विरामचिन्हें म्हणजे कामा, फूलष्टाप् , इत्यादिक ह्यांची व्यवस्था केली.

कितीएक ठिकाणीं व्याकरणदोष होते ते काढून नीट केले.

ग्रंथांत कोठें कोठें हिंदुस्थानी भाषा आली आहे ती शुद्ध नव्हती, ती हिंदुस्थानी भाषेच्या रीतीप्रमाणें नीट केली.

मी शब्द तृतीयांत जेथें आला तेथें त्यावर अनुस्वार देऊन मीं असें केलें, किंवा म्यां असें शब्दरूप लिहिलें.

कर्मणिप्रयोग भावीप्रयोग ह्यांची व्यवस्था व्याकरणाच्या रीतीप्रमाणें नीट केली.

जेथें दुर्बोध शब्द होते तेथें सुबोध शब्द घातले.

यांशिवाय जें न्यूनाधिक आढळलें तें नीट करून प्रत शोधिली असे." ७४

पुस्तक दुरुस्तीच्या वेळीं साधारणपणें मेजर कँडी यांची दृष्टि कशी होती तें समजण्यासाठीं, 'बाळमित्र भाग १'च्या नव्या आवृत्तीला जोडलेली 'सूचना' येथें दिली आहे. तींत पहिला फरक कोंकणीबद्दलचा आहे. गेस्फोर्डकृत 'बाळमित्रा'च्या दुसऱ्या भागाची तपासणी करतांना मेजर कँडीची हीच दृष्टि होती. ते लिहितात :—

"The chief alterations which have been made in this edition of Capt. Gaisford's excellent work, consist in a substitution of easy words for some hard ones, in a simplification of the construction here and there and in replacing Concanee forms by pure Desh ones." ७५

या ठिकाणीं असा एक विचार मनांत येतो कीं जर एकट्या गेस्फोर्डनें 'बाळमित्रा'चा दुसरा भाग भाषांतरित केला होता तर त्यांत कोंकणी शब्द व प्रयोग कसे आले ? त्याच्या मदतीस कोणी कोंकणस्थ शास्त्री असल्याशिवाय ही गोष्ट शक्य नाहीं. पुस्तकावर मात्र फक्त गेस्फोर्ड याचेंच नांव भाषांतरकार म्हणून छापलेलें आढळतें.

---

७४ सदाशिव काशीनाथ छत्रे, **बाळमित्र, भाग १**. आवृत्ति नवी. १८४९. सूचना.

७५ टी. गेस्फोर्ड, **बाळमित्र, भाग २**. आवृत्ति नवी. १८५१.

कोंकणी शब्द व वाक्प्रचार काढून टाकण्याच्या या दृष्टीमुळें रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांच्या 'अभिज्ञान शाकुंतल' नाटकावर अभिप्राय देतांना मेजर कँडी लिहितात :—

"In some cases the sense of the original passages is not quite clearly grasped. This, with a caution against provincialisms in Marathi which may be noticed here and there...is all we have to say as to the improvement." [७६]

दादोबांच्या व्याकरणावर कोंकणीची छाप

कोंकणी वाक्प्रचार निवडून काढून टाकण्याचें मेजर कँडी यांचें धोरण विद्याखात्यांतील इतर अधिकाऱ्यांनींहि अवलंबिलेलें होतें. खुद्द दादोबा पांडुरंग यांच्या व्याकरणाच्या पुस्तकावर हाच आक्षेप घेतला गेला होता. व्याकरणाचीं दोन तीन पुस्तकें याकाळीं शाळांमधून वापरलीं जात होतीं. त्यांतील बाळशास्त्री जांभेकरांचें 'बाल व्याकरण' अगदीं मामुली होतें व दादोबा पांडुरंगांचें 'महाराष्ट्र भाषेचें व्याकरण' शाळांतील मुलांच्या दृष्टीनें फार मोठें व शास्त्रीय चिकित्सा करणारें होतें. या दोन टोंकांचा समन्वय करणाऱ्या एकाद्या व्याकरण पुस्तकाची गरज यावेळीं भासत होती. त्यासाठीं दादोबा पांडुरंगांनीं मेजर कँडी यांच्या गैरहजिरींत इ. स. १८५६ मध्यें हंगामी मराठी ट्रान्स्लेटर भास्कर दामोदर पाळंदे यांना या बाबतींत खासगी पत्र लिहून असें पुस्तक लिहिण्याची तयारी दर्शविली. हें नवीन पुस्तक शाळांमधून वापरलें जाईल एवढी हमी त्यांना पाहिजे होती. त्यावेळचे डी. पी. आय. हॉवर्ड आणि प्रि. हार्कनेस यांच्यामध्यें यासंबंधीं पत्रव्यवहार झाला. तारीख २३ डिसेंबर, १८५६ रोजीं लिहिलेल्या एका पत्रांत प्रि. हार्कनेस यांनीं असें सुचविलें कीं, दादोबांच्या चालू व्याकरणांतच कांहीं बदल करून नवीन स्वरूपांत तें पुस्तक मुलांच्या हातीं द्यावें. ते बदल कोणते असावे हें सुचवितांना प्रि. हार्कनेस यांनीं लिहिलें होतें :—

"The larger work might, in my opinion, be improved by omitting, (a) All speculative discussion regarding phrases of doubtful authority, Konkanisms and other confessedly corrupt forms of speech, (b) All tenses, not found in Marathi literature, or used in speaking or writing by educated natives of the Maharashtra country though not unfrequently employed in translations from English." [७७]

---

[७६] *Bombay Educational Record, Vol. 9.* No 6. 1873. p. 124.

[७७] *D. P. I. Miscellaneous, Vol. 19.* 1855. pp. 505–506.

या पत्रांतील प्रि. हार्कनेस यांची कोंकणी शब्द व वाक्प्रचार काढून टाकण्याची सूचना मेजर कँडी यांच्या अधिकृत धोरणाला अनुसरूनच होती. स्वतः दादोबांनाहि आपल्या व्याकरणग्रंथामध्यें हा दोष असल्याची जाणीव होती; कारण ते लिहितात :-

"या व्याकरणांत, महाराष्ट्र देशाचा मध्यभाग जो पुणें प्रांत त्यांत जी भाषा राजकीय व विद्वान् लोक बोलतात तिचें अनुसरण केलें आहे. त्यांत माझा व माझ्या वडिलांचा जन्म कोंकणांतला, ह्मणून यांत कदाचित् कोंकणी प्रकाराचें यत्किंचित् आधिक्य असलें तरी मला क्षमा मागायास कांहीं अवकाश आहे." ७८

रे. स्टीव्हनसनचे विचार

मेजर कँडी यांचा कोणकोणत्या कोंकणी प्रयोगाबद्दल कटाक्ष होता, हें पाहणें मनोरंजक होईल. या मुद्यावर रे० स्टीव्हनसन व मेजर कँडी यांचें बव्हंशीं एकमत होतें असें दिसतें; कारण रे० स्टीव्हनसन यांनीं आपल्या 'प्रिन्सिपल्स ऑफ् मराठी ग्रामर' या ग्रंथांत, कोंकणी व देशी बोलीभाषांचीं जीं वैशिष्ट्यें दिलीं आहेत, त्यांना अनुसरून मेजर कँडी यांनीं सर्व पुस्तकांची शुद्धि केलेली आढळते. रे० स्टीव्हनसन कोंकणी बोलीभाषेबद्दल लिहितातः—

"Besides the Rajapooree and Wadee dialects, spoken in Malwan, there are two principal dialects of the Murathee language spoken in the Murathee country, viz., the Desh dialect, spoken in those parts of the Dukhun which lie to the northward and eastward of Poona, and the Kokunee dialect, spoken throughout both the Kokuns. The Language about Satara, and in the southern parts of the Dukhun, is a mixture of the two dialects, inclining chiefly, however to the Kokunee. I have endeavoured, as much as possible, to avoid the extremes of both the Kokunee and Desh dialects, inclining to the latter, but keeping always in view the general analogy of the language." ७९

वरील धोरणाला अनुसरून रे० स्टीव्हनसन यांनीं कोंकण व देश या विभागांतील बोलीभाषेचीं वैशिष्ट्यें आपल्या व्याकरणग्रंथांत दिलीं आहेत तीं अशीं :-

---

७८ दादोबा पांडुरंग तर्खडकर, **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.** आ. २, १८५०. प्रस्तावना.

७९ James Stevenson, *Principles of Marathee Grammar*, 1854. Preface, p. 5.

1 Peculiarities of the Desh Dialect,

The inhabitants of the Desh use

In marking the nuet. gen.,	अ	for	ए,	as केलं	for केलें done.
At the beginning of words,	अ	आ	अहे	आहे	is.
In the 3rd. per. imp.,	उ	ओ	करू	करो	let him do.
At the beginning of words,	वो	ओ	वोजवणें	ओजवणें	preserve carefully.
Ditto ditto,	व	ओ	वजवणें	ओजवणें	Ditto.
Before fem. terminations,	ई	ए	अकलीनें	अकलेनें	with wisdom.
In the middle of words,	अ & ई	ऐ	बइल	बैल	an ox.
Ditto ditto,	अ & ऊ	औ	हउस	हौस	desire.
At the beginning of words,	ये	ए	येक	एक	one.
In 2nd. per. plur. pr. ind.,	आंत	आं	आहांत	आहां	ye are.
In 1st. per. plur. pr. ind.,	ओंत	ओं	नव्वोंत	नव्वों	we are not.
Before term. in intr. verbs,	इ	अ	उठितो	उठतो	he arises.
In various positions,	न	ण	पानी	पाणी	water.
Ditto ditto,	से	शे	सेंग	शेंग	a pod.
In terminations,	स्या	शा	अस्या	अशा	to such.
The omission of anooswar...			लेकरू	लेंकरूं	a child.
Unaspirated for aspirated letters...			जालें	झालें	became.

2 Peculiarities of the Kokunee Dialect,

The kokunusths use

In transitive verbs,	अ	for	इ,	as करतो	for करितो he does.
At the beginning of words,	आ	अ	आका	अका	an aunt.
Ditto ditto,	ओ	वो	ओढणें	वोढणें	draw.
In 2nd. per. sing. past ind.,	एस	ए	सोडलेंस	सोडलें	thou loosedst.
In 2nd. per. pl. past ind.,	एत	ए	सोडलेंत	सोडलें	ye loosed.
Ditto ditto,	एत	आं	झालेंत	झालां	ye became.
In 2nd. per. sing. past ind.	तूं	त्वां	तूं केलेंस	त्वां केलें	thou didst.

In 1st. per. sing. past ind.,	मीं	म्यां	मीं केलें	म्यां केलें I did.
In 1st. per. fem. past ind.,	ल्यें	लें	बोलल्यें	बोललें I spoke.
In 1st. per. fem. pr. ind.,	त्यें	तें	सोडित्यें	सोडितें I loose.
In 2nd. per. fem. pr. ind.,	त्येस	तीस	सोडित्येस	सोडितीस thou loosest.
In 3rd. per. fem pr. ind.,	त्ये	ती	सोडित्ये	सोडिती she looses.
In oblique case of adj.,	ये	या	चांगल्ये	चांगल्या good.
In plu. per. participle,	ओ	ऊ	करोन	करून having done.
In various positions,	शि	सि	शिंह	सिंह a lion.
Ditto ditto,	शे	से	शेवा	सेवा service.
Ditto ditto,	ण	न	त्याणें	त्यानें by him.
The superfluous use of anooswar,			कदांचित्	कदाचित् perhaps.
Aspirated for unaspirated letters,			शेंघ	शेंग a pod.[८०]

रे० स्टीव्हनसन यांनीं दाखवून दिलेलीं कोंकणी बोलींतील वैशिष्ट्यें समोर ठेवून, मेजर कँडी यांनीं सर्व शालेय पुस्तकांत व इतरत्र दिसणारे कोंकणी प्रकार काढून टाकिले असें दिसतें. 'करतो', 'मारतो' इत्यादि क्रियापदांत इडागम आणून 'करितो', 'मारितो' अशीं रूपें वापरणें; 'सोडलेंस', 'केलेंस', 'सोडलेंत,' 'केलेंत' इत्यादि क्रियापदांत कोंकणी बोलीप्रमाणें येणारा स अगर त काढून 'सोडिलें,' 'केलें' अशीं स अगर त विरहित रूपें वापरणें; 'सोडित्ये', 'मारित्ये' इत्यादि क्रियापदांतील यकार काढून 'सोडिती', 'मारिती' अशीं रूपें वापरणें; 'चांगल्ये,' 'मोठ्ये' इत्यादि विशेषणांतील येकार काढून 'चांगल्या', 'मोठ्या' अशीं रूपें वापरणें; 'त्याणें', 'ज्याणें', 'त्यांणीं', 'ज्यांणीं' इत्यादि सर्वनामांच्या रूपांतील णें अगर णीं या तृतीयेच्या विभक्तिप्रत्ययांबद्दल नें अगर नीं हे प्रत्यय लावून 'त्यानें', 'ज्यानें', 'त्यांनीं', 'ज्यांनीं' इत्यादि रूपें वापरणें; 'तिला राणी केली', 'त्या पोरानें ह्या मुलीस मारली' इत्यादि वाक्यांची रचना कोंकणी प्रचारानुसार कर्मणि प्रयोगांत न करतां, 'तिला राणी केलें', 'त्या पोरानें ह्या मुलीस मारिलें' अशी भावे प्रयोगांत करणें, इत्यादि बदल मेजर कँडी यांनीं घडवून आणिले व ते शालेय पुस्तकांच्या द्वारा मुलांच्या अंगवळणीं पाडण्याचा प्रयत्न केला. मागील कांहीं प्रकरणांत दिलेल्या मेजर कँडी यांच्या टीकालेखांवरून त्यांनीं केलेल्या प्रयत्नांची कल्पना करतां येते. त्यांनीं घडवून आणलेल्या बदलांतील कांहींनीं लिखित भाषेंत मूळ धरलें, परंतु कांहीं बदल यशस्वी होऊं शकले नाहींत. उदाहरणार्थ तृतीयपुरुषीं, स्त्रीलिंगीं, एकवचनीं

८० James Stevenson, *Principles of Marathee Grammar*, 1854. pp. 15–16.

क्रियापदाचें रूप 'सोडिती', मारिती' असें न होतां 'सोडिते', 'मारिते' असें झालें; अगर 'तूं काम केलें' वा 'त्वां काम केलें' यांतील पहिला प्रकार रूढ झाला व दुसरा होऊं शकला नाहीं. असा एकादा दुसरा अपवाद बगळल्यास मेजर कँडी यांनीं सुचविलेले बरेचसे बदल आज अमलांत आलेले आढळतात व ते अमलांत येण्यास शालेय पुस्तकें बव्हंशीं कारणीभूत झालीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

विरामचिन्हें

एकोणिसाव्या शतकांतील शालेय वाङ्मयामुळें मराठी भाषेंत आणखी एका गोष्टीची भर पडली ती म्हणजे विरामचिन्हांच्या परिभाषेची होय. प्राचीन मराठी काव्यांत विरामचिन्हांचा मागमूसहि नव्हता. चरण (।) किंवा (:) एवढींच चिन्हें वापरलीं जात. तसेंच जुन्या गद्य वाङ्मयांतहि विरामचिन्हांचा उपयोग होण्याची शक्यता नव्हती. इतकेंच काय, पण इंग्रजी अमदानीच्या सुरुवातीला मुंबईंत मुद्रित झालेल्या गद्य वाङ्मयांतहि तीं आढळत नाहींत. उदाहरणार्थ, 'पंचोपाख्यान' (१८२२), 'विदूरनीति' (१८२३), 'सिंहासनबत्तीशी' (१८२४) यांसारख्या सुरुवातीच्या ग्रंथांत विरामचिन्हांचा उपयोग केलेला आढळत नाहीं. तथापि जसजसा इंग्रजी वाङ्मयाचा संबंध वाढूं लागला, तसतशी विरामचिन्हांचा उपयोग करण्याची प्रवृत्ति लेखकांत निर्माण झाली; आणि जेव्हां मेजर कँडी यांच्याकडे पुस्तकें तपासण्याचें काम आलें तेव्हां या प्रवृत्तीला योग्य वळण लागूं लागलें.

विरामचिन्हांची परिभाषा

मेजर कँडी यांनीं इ. स. १८५० मध्यें 'विरामचिन्हांची परिभाषा' नामक एक पुस्तक लिहून लेखकांना या बाबतींत मार्गदर्शन केलें. हें पुस्तक प्रत्यक्ष पहावयास मिळूं शकलें नाहीं; परंतु या पुस्तकाबद्दल शिक्षामंडळीला तारीख १६ मे, १८५० रोजीं लिहिलेल्या एका पत्रांत मेजर कँडी म्हणतात :—

"I have been led to prepare it from a consideration of the desirableness of introducing a correct system of punctuation into Marathi, and from seeing the mistakes which are made by persons imperfectly acquainted with the subject."[८१]

या पुस्तकाच्या एकहजार प्रती छापल्याचा उल्लेख आढळतो; पण आज त्या पुस्तकाची प्रत दुर्लभ आहे. 'ज्ञानोदय'कारांनीं या पुस्तकाविषयीं लिहितांना त्यांतील प्रस्तावनेचा कांहीं भाग उतरून घेतला आहे, त्यावरून मेजर कँडी यांचे या पुस्तकासंबंधींचे विचार समजूं शकतात. ते लिहितात :—

८१ *D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1850. p. 132.

"मराठी भाषेंतील ग्रंथांत विरामचिन्हें घालण्याची चाल मागें नव्हती; परंतु युरोपखंडांतील इंग्लिश वगैरे भाषांमध्यें ह्या चिन्हांपासून बहुत उपयोग होतो, हें पाहून मराठी भाषेंतहि हीं चिन्हें घालण्याची चाल पडावी असी इच्छा अलीकडे बहुतांस झाली आहे. ह्मणून इंग्लिश भाषेंतील जीं चिन्हें मराठी भाषेंत घ्यावयाजोगीं आहेत तीं घेऊन, त्यांचें ज्ञान सर्व लोकांस व्हावें या हेतूनें, ही परिभाषा केली आहे." ८२

हें पुस्तक बाहेर पडण्याच्या अगोदर जरी गद्य लेखनांत विरामचिन्हांचा उपयोग कांहीं काळ होत होता, तरी मेजर कँडी यांच्यामुळें विरामचिन्हांचा पद्धतशीर वापर होऊं लागला. मात्र अवतरणचिन्ह मराठी भाषेला आवश्यक नाहीं असें त्यांचें मत होतें बायबलच्या मराठी भाषांतरांत विरामचिन्हांचा उपयोग करावा कीं नाहीं असा एक वादग्रस्त प्रश्न निर्माण होऊन अनेक विद्वानांचीं मतें मागविलीं गेलीं होतीं. रे० स्टीव्हनसन, रे० मरे मिचेल, डॉ. विल्सन, मेजर कँडी इत्यादिकांचीं या मुद्यावरील मतें Oriental Christian Spectator च्या इ. स. १८५४ च्या चौव्विसाव्या पुस्तकांत पृष्ठें २६४–२६५ वर पहावयास मिळतात यावेळीं मेजर कँडी यांनीं आपलें मत खालील शब्दांत मांडलेलें आढळतें:-

"My opinion is decidedly against the use of quotation marks. I think they are quite contrary to the genius of oriental languages. I agree with Mr Allen in all that he has said against them, and agree with Mr. Hume, that 'they are generally of no use whatever' and that they are 'often worse than useless'. I would therefore avoid them." ८३

विरामचिन्हांचा अतिरेकी उपयोग

मेजर कँडी यांच्या धोरणानुसार सर्व शालेय पुस्तकांत विरामचिन्हांचा योग्य उपयोग होऊं लागला. वाक्याचा अर्थ स्पष्ट समजण्यासाठीं लेखनांत व वाचनांत विरामचिन्हांचा उपयोग होतो; तथापि विरामचिन्हें मराठी भाषेंत नवीनच येत असल्यामुळें केव्हां केव्हां त्यांचा अतिरेकी उपयोग केला जात होता. इंग्रजीप्रमाणें मराठी भाषेंत परिच्छेद व विरामचिन्हें यांचा कांहीं वेळां दुरुपयोग होत असल्यामुळें 'प्रभाकर' कर्त्यांनीं एक मजेशीर सूचना 'प्रभाकर' मध्यें दिलेली पहावयास सांपडते. ते लिहितात:-

८२ **ज्ञानोदय,** ऑगस्ट १५, १८५०. पृ २९७.

८३ *Oriental Christian Spectator, Vol. 24,* 1854. p. 265.

"ज्ञानसिंधूच्या मागील अंकांत त्या पत्राच्या कर्त्यानें आपणास इंग्रेजी चांगलें येतें, असा भावार्थ स्पष्ट केला आहे, आणि तो पारेग्राफ तोडून लिहितो, व इंग्रेजी खुणा घालितो, त्यावरून त्याणें लिहिल्याप्रमाणें ए, बी, सी त्यास येत असेल, यांत संशय नाहीं. त्यास माझा प्रश्न प्रस्तुत इतका आहे, कीं पृ. १५२ तील असंभाव्य बातमीच्या सदराखालीं सुमारें २६ ओळी आहेत, तितक्यांत अजमासें १५२ कामे आहेत, ते असे कीं "त्याणें, ते घोडे, राजास, देऊन, रुपये घेतले," या रीतीनें प्रतिशब्दापुढें, तसेंच कर्ता क्रियापद यांमध्यें, विशेषण विशेष्य यांमध्यें कामे बहुधा आहेत....तेव्हां असे कामे लिहिण्यास सनद कोणत्या इंग्रेजी ग्रामरांत आहे, तें लिहून याविषयीं शास्त्रार्थ कसा असेल त्याचें उपपादन करावें म्हणजे कांहीं इंग्रेजीचा अभ्यास सिंधुकारास आहे, असें लोकांच्या अनुभवास येईल...."[८४]

'प्रभाकर'कर्त्याच्या वरील टीकेंतील बोंचकपणा जरी वगळला तरी विरामचिन्हांचा योग्य उपयोग व्हावा, ही त्यांची सदिच्छा मान्य करावी लागेल. शालेय पुस्तकांची भाषाविषयक तपासणी करतांना विरामचिन्हांचा दुरुपयोग झालेला मेजर कँडी यांच्या नजरेस पडल्यास, ते लगेच दुरुस्ती सुचवीत असत, हें त्यांनीं लिहिलेल्या अनेक टीकालेखांवरून स्पष्ट होतें.

विरामचिन्हांचा अपुरेपणा

वापरांत आलेलीं विरामचिन्हें अपुरीं वाटल्यामुळें विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं 'मराठींतील शुद्धलेखनासंबंधी व विरामचिन्हासंबंधी कांहीं सूचना' केलेल्या आढळतात.[८५] प्रघातांत आलेल्या चिन्हांशिवाय, दीर्घविराम (: :), स्वल्पप्रश्न (ˀ), अर्धप्रश्न (⸮), स्वल्पउद्गार (!), अर्धउद्गार (¡) या चिन्हांचाहि वापर करावा अशी त्यांची सूचना होती; परंतु सरकारी विद्याखात्याचा पाठिंबा नसल्यामुळें कीं काय या सूचनेचा उपयोग होऊं शकला नाहीं.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सरकारी विद्याखात्यानें मेजर कँडी यांच्या हस्तें मराठी भाषेच्या घडणींत आवश्यक ते फेरफार घडवून आणल्याचें आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून स्पष्ट होईल. मराठी भाषेची लेखनपद्धति, शब्दप्रयोग, वाक्यरचना व भाषाप्रचार स्थिर होऊन गद्यपद्धतीला एकप्रकारचा स्थिरपणा आणण्यांत शालेय पुस्तकांनीं बराचसा हातभार लावला असें म्हणावयास हरकत नाहीं.

---

८४ **प्रभाकर**, १४ ऑगस्ट, १८४२. पृ. ३३८.

८५ विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, **संकीर्ण लेखसंग्रह**. पृ. १–१५.

मेजर कँडी यांच्या निधनानंतरहि त्यांनीं घालून दिलेल्या मार्गानेंच बहुतेक भाषिक व्यवहार चालले, परंतु गेल्या शतकाच्या शेवटीं त्यांत बदल घडवून आणण्याच्या दृष्टीनें प्रयत्न सुरू झाले इ. स. १८९८ मध्यें सरकारी विद्याखात्यांतील काशीनाथ नारायण साने, रामचंद्र परशुराम गोडबोले आणि शंकर रामचंद्र हातवळणे या तीन गृहस्थांनीं मराठी भाषेच्या शुद्धलेखनांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं आपले विचार 'शाळापत्रका' मधून जाहीर केले.[८६] त्यानीं केलेल्या विशेष सूचना म्हणजे ऱ्हस्व इकारान्त अगर ऱ्हस्व उकारान्त रवि, भानु यांसारखे शुद्ध संस्कृत शब्द मराठीमध्यें लिहितांना उच्चारानुसारी म्हणजेच दीर्घ लिहिणें, अंत्याक्षर अकारान्त असतां उपान्त्य ऱ्हस्व इ व उ ह्यांचा उच्चार दीर्घ करण्याची प्रवृत्ति आहे, तीप्रमाणें ते दीर्घ लिहिण्याचा परिपाठ ठेवणें, मूळ संस्कृत शब्दांत अनुनासिक वर्ण असल्यामुळें त्यापासून निघालेल्या मराठी शब्दांवर अनुस्वार द्यावा हें ठीक; पण जोडाक्षर, द्वित्व, रेफ, षकार व हकार ह्या वर्णांपैकीं कोणताहि वर्ण मुळांत असतां मराठी शब्दांतील वर्णांवर अनुस्वार न देणें, इत्यादि सूचना प्रमुख होत्या. या सर्व सूचनांवर अनेक विद्वानांचीं मतें त्यांनीं मागविलीं व आपले विचार 'मराठी भाषेची लेखनपद्धति' (१९००) नामक पुस्तकाच्या द्वारें प्रसिद्ध केले. याचसुमारास इ. स. १९०३ मध्यें सरकारनें मराठी भाषेच्या शुद्धलेखनपद्धतींत सुधारणा करण्यासाठीं एक समिति नेमिली. समितीनें केलेल्या सूचनांपैकीं कांहीं अशा होत्या :— विकार होणाऱ्या संस्कृत शब्दांच्या अंतींचे ऱ्हस्व इ आणि उ हे स्वर मराठीच्या प्रथमा विभक्तीमध्यें दीर्घ लिहावे, जसें गिरी, बुद्धी इत्यादि; संस्कृत किंवा मराठी अव्ययाच्या अंतींचे इ, उ स्वर दीर्घ लिहावे, जसें इत्यादी, परंतू, आणी. अकारान्त संस्कृत नामें आणि विशेषणें यांच्या उपान्त्याक्षरांतील मूळचे ऱ्हस्व इ आणि उ हे मराठींत प्रथमा विभक्तीमध्यें दीर्घ लिहावे, जसें वीष, गूण, हीत इत्यादि. पण संस्कृत किंवा मराठी उपान्त्याचे इ, उ छंदःशास्त्रानुरोधानें दीर्घ असतील म्हणजे पुढें जोडाक्षर असेल तर ते दीर्घ लिहिण्याचें कारण नाहीं. व्यंजनान्त संस्कृत शब्द मराठींत आल्यास ते अकारान्त करून घ्यावे, जसें भगवान, विद्वान, क्वचित इत्यादि. ज्या अनुस्वारांचें मूळ संस्कृतांत किंवा प्राकृतांत सांपडत नाहीं ते काढून टाकावे, जसें धावतो, शेपूट, लाकूड, कोपर, ऊस इत्यादि. समितीनें सुचविलेले हे बदल, तिनें साधार सिद्ध करून दाखविले होते. या समितींत काशीनाथ नारायण साने हे एक सभासद होते व त्यांनीं पुस्तक रूपानें आपले विचार अगोदरच प्रसिद्ध केल्याचा उल्लेख वर आलाच आहे.

---

८६ **मराठी शाळापत्रक**, पु. ९, अं. ६. १८९८. पृ. १–१५.

समितीनें सुचविलेले हे बदल शालेय पुस्तकांच्या द्वारा अमलांत येणें सहज शक्य आहे, अशी शंका येऊन मुंबईला सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांच्या अध्यक्षतेखालीं सामिति स्थापन होऊन तिनें वरील नियमांस आपल्या हरकती सरकारी समितीकडे पाठविल्या. याचवेळीं लो. बाळ गंगाधर टिळक यांनींहि 'मराठी भाषेची लेखनपद्धति' या शीर्षकाखालीं तारीख १२, १९, २६ जुलै व २ ऑगस्ट, १९०४ च्या 'केसरी' मध्यें चार लेख लिहिले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें कोणत्याहि भाषेंतील शब्दांचीं निरनिराळीं स्वतंत्र रूपें बनविणें अगर नवीन प्रयोग प्रचारांत आणणें हें वैय्याकरणाचें काम नव्हे व तशा रीतीनें तो जर प्रयत्न करील तर त्यास यश यावयाचें नाहीं. लोकांमध्यें जे शब्द, अक्षरें, वर्ण, उच्चार अगर प्रयोग प्रचलित असतात तेच घेऊन त्यास लागू होतील असे सामान्य नियम किंवा अपवाद शोधून काढणें आणि सदर नियमापवादाची शास्त्रीयरीत्या व्यवस्था लावणें हें वैय्याकरणाचें पहिलें कर्तव्य होय. वैय्याकरणांनीं हें काम केलें म्हणजे त्याचा स्वभावतःच असा परिणाम होतो कीं, सामान्य नियमास अनुसरून जीं रूपें किंवा प्रयोग नाहींत त्यांस भाषेंतून हळू हळू फाटा मिळत जातो; आणि असें झालें म्हणजे कांहीं काळानें अपवादाची संख्या कमी होऊन भाषेस स्थैर्य आणि त्याचबरोबर सरलताहि प्राप्त होते.

वरील घडामोडींचा उल्लेख येथें करण्याचें कारण इतकेंच कीं, मराठी भाषेच्या लेखनपद्धतीला स्थैर्य आणण्यासाठीं एकोणिसाव्या शतकांत शालेय पुस्तकांच्या द्वारा जे प्रयत्न झाले त्याचा परिणाम शतकाच्या शेवटीं काय झाला तें कळावें व विषयाल पूर्तता यावी.

प्रमाण भाषा

लेखननिविष्ट भाषेला स्थैर्य आणण्याच्या दृष्टीनें गेल्या शतकांत जे प्रयत्न झाले त्यांचा आढावा मागील पृष्ठांत घेतलेला आढळेल. भाषेमधील एकदेशीयता काढून टाकून तिला प्रमाण (standard) करण्यांत वैय्याकरणी व लेखक यांचा वाटा फार मोठा असतो. जे. वेंद्रे यानें फ्रेंच भाषेबद्दल जे विचार प्रगट केले आहेत तेच मराठी भाषेलाहि लागू पडण्यासारखे आहेत. जे. वेंद्रे लिहितो :—

"The services rendered by our writers to the formation of the standard language are very great. It is to the combined efforts of authors and grammarians that Frenchmen owe the French they learn at school. It is they who have forged this fine instrument for the general user, and taken care that no rust defiles it. The purification of the language, carried on for several centuries, may seem to be a work of trivial and

pedantic quibbling, yet we have received so much benefit from this work that those who have done it deserve thanks. Thanks to the schoolmasters trained by the study of the best writers, all who use the language have at their disposal the most appropriate form for the expression of their thoughts, a language in which all the words have an exact meaning, and all the turns of speech are stabilized in their most delicate shades of meaning. In abolishing from the written language all that would shock natural feeling and good taste, in submitting it continually to rules of reason and decency, they have rendered it capable, as Bouhours has said, "of sustaining the strongest subjects and elevating the weakest." In a word, they have adapted it in advance to all the requirements of the mind. And the standard language has amply benefited from the work they have performed. It has gained in clearness, elegance, precision, variety, and, in the words of Rivarol, in 'the integrity belonging to its genius!' "[८८]

वरील विचार मराठी भाषेलाहि लागू करण्यास हरकत नाहीं.

८८ J. Vendryes, *Language*. 1949. p. 274.

परिशिष्ट १

होतकरू भाषांतरकारांसाठीं मेजर कँडी यांनीं तयार केलेले नियम :—

Hints for the guidance of Translators.

1. The great thing to be aimed at in translation is to give a faithful, idiomatical and grammatical rendering of the original. The first point is gained when *all the meaning* of the original has been transferred into the new version, and nothing beyond it has been added. The second and third points are gained when the translation is agreeable to the rules of correct composition; and to the customary phraseology, of the second language as the text is to those of the original. The translator, in short, should endeavour to render the *sense* of the text, not merely the words which compose it, and he should use such construction that though the *ideas* he presents may strike as novel, there should be nothing uncouth or barbarous in the phraseology by which he expresses them. The faithfulness of a translation may be generally tested by retranslating it into the original. If the *ideas* in the retranslated passage be the same as those of the original passage, however the words may vary, it is evident that the translation was sufficiently faithful. A translator, therefore, should *study* the meaning of the passage, he is about to translate, before he begins translating, that he may feel confident of having comprehended it.

2. Though a translator should be much more anxious to translate the sense than the mere words of a passage, he should still avoid all unnecessary departure from the style of the original. Most good writers have each a particular style of his own, which style the translator should endeavour to preserve. If attention to this rule be neglected the most opposite styles will lose all difference in the hands of a loose translator.

3 Translators should be careful to be consistent in their orthography. It is very common for a native to write a word in two or three different ways, sometimes even on the same page (as for example काढणें, कहाडणें, काहाडणें) but this is bad. In former days there was the same inattention to spelling in English writing, but now bad spelling is universally considered a mark of a defective education.

4 Foreign names should be written according to the genus of the language into which the translation in which they occur is made. For instance, Asia should be written एशिया (Ai-see-iah) or एश्या (As-ia) not एशिआ (Ai-see-ah). William should be written विलियम (Vee-lee-um) or विल्यम (Vil-iam) not उइलिअम, (Ui-li-um). Wilson should be written विल्सन not उइल्सन.

5 English writers often assume many things to be known to their readers, and therefore in referring to them they give no explanation. But as many of these things may be unknown to natives, the translator in rendering the passages in which they occur should afford help to the readers in understanding them. Where a word or two added to the text will be sufficient to make the author clear the translator need do no more than add them; but where a long explanation is required, it will be least to give it in a note. For example if a translator has to render 'Lapland is the native region of the Reindeer,' though a native reader may never have heard of lapland or of the reindeer, the passage will be quite intelligible to him if the translator writes 'लापलांड नामें देशांत रेनदीर नामें जनावर उत्पन्न होतें,' or if he has to render, 'The Empress Anne built a palace of ice in Moscow,' though the native reader may never have

heard of Anne or of Moscow, it will be sufficient for the translator to say 'आन्न नामें रुशिया देशाची राणी होती तिणें मास्को नामें शहरांत बर्फाचा वाडा बांधिला' In both sentences the one or two words added make the sense clear. But if a translator has to render such a sentence as this, 'In the Wars of the Roses which were waged between the Houses of York and Lancaster,' or such as this, 'When the famous William Pitt, who afterwards became Lord Chatham, held the office of First Lord of the Treasury,' it seems evident that besides adding a word or two in the text the translator must give notes to make the subjects clear to native readers.

6 With respect to the best way of expressing scientific and technical terms there is room for considerable difference of opinion on some points, but the more the subject is considered the fewer will be these points, and the less will the difference become; till at length some writer will attain to sufficient eminence to give him authority and his way will then be followed as the best way.

7 Whenever a scientific or technical word occurs which has an exact equivalent in Marathi the equivalent is of course to be used; as Lokhand (लोखंड) for iron, Gandhak (गंधक) for sulphur, Mantri or Pradhan (मंत्री or प्रधान) for minister, Sabhadhyksh or Sabhapati (सभाध्यक्ष or सभापति) for chairman, Najir (नाजीर) for sheriff etc.

8 When a scientific or technical term occurs which has no equivalent in Marathi, and there is no word in use of the same general meaning which might be appropriated to it and be made its equivalent, the best and simplest way seems to be to transfer the word as it stands from the English into Marathi.

9 With respect to titles and dignities peculiar to Europeans or Christians, the English words should of course be transferred bodily, as Duke, Earl, Baron, Bishop etc., but where a word is descriptive of an office or duty as well as being a title, as Governor, Judge, Doctor, General, etc., I would suggest that where used merely as a title the English word should be retained, but when there is a particular reference to office or duty there the native equivalent should be used, as न्यायाधिश (Nyayadhish) for Judge, सेनापति (Senapati) for General, वैद्य (Waidya) for Doctor or Physician.

10 With respect to geographical terms, names of places, a rule somewhat similar to the above should, I think, be maintained. Simple names of places, as England, Scotland, London, etc. should of course be transferred bodily, and written according to the rules of euphony in the language to which they are transferred. Names that are significant or descriptive should, I think, be translated where the grounds on which they were given were general and where the translation of them would adjust the understanding of them, but where the grounds for giving them were of a mere personal kind, I would not have them translated. For example, I would translate the words 'north' and 'south' in 'North America', 'South America,' 'North Carolina', South Carolina' because these words are descriptive and distinguish the regions to which they are prefixed. I would, therefore, say उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, उत्तर कारोलैना etc. In the cases of such words as 'New Holland', 'Nova Zembla', 'New Foundland', 'New York' etc., though the words 'new' and 'nova' be significant and descriptive, I would still not translate them, for they are not required by natives as descriptive terms, and the translation of them would only tend to perplex. To an

English reader the word 'new' in 'New Holland,' 'New york' etc. is required to distinguish these places from those countries or cities after which they are named; but to native reader न्यूहाल्लंड, न्यूयार्क etc. are more distinguishing than would be नवा हाल्लंड, नवा यार्क etc. How would a native reader be puzzled (in stead of being assisted) by a translation of 'New foundland' नवा सापडलेला देश ! In the cases of such names as 'navigators', 'islands' etc. though the name be significant I would not translate it for the grounds on which it was given are not now known, or if known are not applicable. I would, therefore, just transfer them. With regard to the descriptive names of seas, as the grounds on which they were given were of general interest and are still applicable, I would translate them as काळा समुद्र, तांबडा समुद्र, पिवळा समुद्र, भूमध्य समुद्र etc. for the Black Sea, the Red Sea, the Yellow Sea, the Mediterranian Sea etc.

11 With respect to the English nomenclatures of chemistry,- botany, zoology, etc. it is greatly to be hoped that some of the young men who are now studying these sciences will by and by be able to compile nomenclatures for them in Marathi with the help of Sanscrit. Nomenclatures thus framed would be easier to natives than the Greek and Latin terms transferred from the English, and natives would be more attracted to the study of these branches of knowledge by knowing the component parts of the terms employed in them. To frame scientific nomenclatures as thus mentioned a person must combine a good knowledge of science with a mastery of Sanscrit and Marathi. Till such a person shall arise and do this work, the only feasible plan seems to be to transfer the English word where there is no equivalent for it in Marathi. When an English scientific and technical term has an equi-

valent in Marathi it should of course be used. In the cases of compound English words, of the words composing which one has an equivalent in Marathi and the other has not, the translator will use the equivalent for one and will transfer the other; but he must avoid making a barbarous compound, half Marathi and half English, and must connect the words by the sign of the possessive case.

12 I would not have such words as 'order,' 'class,' 'genus,' 'species' and transferred into Marathi, as recommended by the writer of the proposed rules for the Delhi Vernacular Society with respect to the Urdu; for though it is true that the native equivalents for them are mostly synonyms of each other, and the promiscuous use of them would lead to very great confusion, they do not seem to me to require transferring. Let the translator avoid the confusion which would follow from the promiscuous use of synonyms to express different things, by selecting the most appropriate Marathi equivalent for each English word, and then keep to it. And let him indicate by a note or table which Marathi word he has appropriated to which English word. English words, 'class' 'order' etc. were originally synonyms, but have been separated in some such way as is here recommended. When a writer of authority and influence has distinguished the words that are now used promiscuously he will be followed by others; and the distinction will gradually be established. It would be well for every translator, or taking up a work to translate, to begin with preparing a list of the technical and other terms that he will require to use.

—*D. P. I. Board of Education, Poona Sanscrit College.* 1850. pp. 145–149.

परिशिष्ट २

'प्रभाकर' कर्त्यांनीं केलेल्या टीकेला मेजर कँडी यांनीं 'ज्ञानोदय' मध्यें दिलेलें उत्तर व अन्य वाचकांचे विचार

To

The Editor of The Dnyanodaya.

Sir,

In your notice to correspondents and subscribers in your no. of the 1st inst., you refer to the letters and editorials which have appeared for months past in the Prabhakar in revilement of me. I beg permission to give you and your readers a few words on the subject.

Conscious of labouring earnestly for the enlig! tenment and welfare of the natives of this country, I was impressed by the conviction that my labour was appreciated by them. I was, therefore, a good deal surprised, at first, by the bitter feeling which the Editor of the Prabhakar and his correspondents manifest against me; a feeling, the bitterness of which could scarcely be exceeded, had I been their enemy and had done them some great injury. But a little reflection led me to what I doubt not is the true cause of it all.

For some years past, it has been a part of my duty to examine translations and original compos tions by natives. Some have been sent to me by Government, some by the Board of Education, and some by the Committee of the Deccan Vernacular Society. Most of these translations have been made by young men who have picked up a moderate knowledge of English, but who, having never cultivated their mother tongue, are unable to transfer into it in an elegant, or even idiomatical style the knowledge they have acquired through a foreign language. Most of them are ignorant of Sanskrit, and some of them decry the study of that classical language as useless.

Very many of the works sent to me for examination have had glaring errors of grammar, construction, and idiom. These, as in duty bound, I have pointed out; but I have always endeavoured to avoid giving offence or hurting the feelings of the authors. I have never magnified their errors, and have often passed over many that were of minor importance. I must add that so far as I remember, I have in no case volunteered a critique on any native work. The criticisms which I have made have always been made in the discharge of duty. In the performance of my duty, I have always endeavoured to act on the precept, शत्रोरपि गुणा वाच्या दोषा वाच्या गुरोरपि । ... Young men, who are immoderately puffed up by their moderate knowledge of English, and fancy themselves fit for everything, have of course felt very sore at their works being found fault with; and they have resolved, apparently, to seek their revenge by abuse of me. Having found in the editor of the Prabhakar, a man like themselves, they have made his paper the vehicle of their venom. The amount of pride, conceit, ignorance, enmity to the English and disrespect for authority, which they have exhibited, it is painful to contemplate. They hope probably that their clamor will deter me from expressing my opinion in future; and I dare say that they are particularly anxious to intimidate me just now, as they understand that Dakshina is to be given to those who make translations into Marathi, and they fear that if I be not intimidated their unidiomatical translations may not be accepted.

I am not going to drag you and your readers through all the mire of the Prabhakar which would be any thing but pleasant to you and them. Indeed I have not waded through it myself, for I am not a subscriber to that paper and have read only such numbers of it as have been shown to me by native friends. But I will refer to a few of the charges against me.

I am charged with **great ignorance of Marathi,** and with inability to translate even two lines without the assistance of a Pandit !! It is not for me to speak of my own Marathi scholarship, but I may say that as I have been studying the language for 25 years and more, I ought to have some knowledge of it. With regard to my inability to translate, I am quite ready to enter the lists with my traducer, and try which is the better translator. I should blush to write such bad Marathi as I have read in the Prabhakar. Even this very charge against me is expressed in most miserable language, 'त्याऱ्यानें दोन ओळी भाषांतर करतां यावयाचें नाहीं'. (vide Prabhakar of 27, October, page 3753) Now a mere Tyro in Marathi scholarship knows that त्याच्यानें करतां यावयाचें नाहीं is altogether wrong. It should be either त्याच्यानें करवणार नाहीं or त्यास करतां यावयाचें नाहीं. The Editor of Prabhakar should be ashamed of such composition, and of having his errors pointed out by a foreigner ! Again दोन ओळी भाषांतर is as bad in Marathi as 'two lines translation' in stead of 'two lines of translation' in English.

I am charged with endeavouring to increase my fame by decrying others, and my revision of some native works, especially of the Bal Mitra, is brought forward in proof of the charge. So far am I however from thinking lightly of Sadashiva Kashinath Chhatre, the translation of Bal Mitra and of Aesop's Fables that I consider him superior to any native writer of the present day. I have never spoken but with respect of him or of Bal Shastri. But excellent as their writings were, they contained errors of various kinds, which I have endeavoured to remove. Of my success, the public can judge by comparing my editions of the Bal Mitra and Aesop's Fables with the former ones.

I am charged with pride, and with endeavouring to depress natives as much as possible. I am sure that no native who knows me can honestly bring this charge against me.

I am charged with decrying Mr. Hari Keshavji and with inducing the Committee of the Deccan Vernacular Society to withdraw the translation of Elphinstone's History of India from him and to give it to myself. I am charged with having written to the Committee 'that no one could do the work properly but I.' (Prabhakar, 27, October, P.3752) All this is a base calumny invented by the Editor of the Prabhakar. I have not a copy of my minute on Hari Keshavji's specimen of translation, so that I cannot give you the words I used; but I remember that I spoke in praise of Hari Keshavji's performance. As to my writing to the Committee that no one could do it well, but myself, it is utterly false. I hope that there are many right-minded natives who on reading this will feel ashamed of their countrymen who invented and published these calumnies.

In conclusion, I must emphatically say that I do not deprecate criticism. Everyone is welcome to criticize my publications but let the criticism be honest and fair, not personal abuse, nor imputation of bad motives. I am as liable to err as others, and I shall be thankful to have all my errors pointed out in a fair spirit.

I will add only that if the translators of whom I have spoken, will avoid writing Marathi in English idiom, and will renounce Concanisms and barbarisms, they will find me quite ready to report favourably of their works. I have been dubbed by one of the writers in the Prabhakar, 'Suppressor of translations.' A suppressor of bad translations is indeed a necessary person. If **bad** translations come before me, I shall condemn them, but I shall be more pleased to be 'an encourager of **good** translations,' for to praise is more pleasant to me than to blame.

Poona, 23rd Janu. 1851. Thomas Candy.

ज्ञानोदय, १ फेब्रुआरी, १८५१. पृ. ४०-४१.

(२) कांहीं महिन्यापासून मेजर क्यांडी साहेबाची निंदा प्रभाकरांत चालली आहे त्याविषयीं हल्लीं जें पत्र त्यानें लिहिलें आहे तें हें सर्व सुज्ञहीं पाहावें. कांहीं दिवसपर्यंत बोर्ड आव एज्युकेशन म्हणजे शिक्षणमंडळी इने पुस्तकांचें भाषांतर छापविलें तेव्हां त्यांत बहुत चुकी व कांहीं खोटीं मतें लोकांच्या दृष्टीस येऊन त्यानी फार गडबड केली आणि असीं पुस्तकें कशाकरितां ती मंडळी छापविते असा तिजवर शब्द लाविला असतां निरुपाय होऊन तिने जो सर्वांस मान्य व प्रमाणिक विद्वान साहेब त्यास असलीं भाषांतरें तपासायाच्या कामावर नेमावें असें ठरविलें. नंतर मेजर क्यांडीवर सरकारचा व सर्व सुज्ञांचा भरवसा आहे असें तिला वाटून त्या कामावर त्याला नेमलें आणि हें त्या मंडळीने बराबर केलें; कारण या कामास त्यापेक्षां चांगला दुसरा मनुष्य कोणी मिळणार नाहीं आणि जीं पुस्तकें त्याजकडे शोधायास पाठविलीं होतीं त्यांतील जे दोष त्याच्या वास्तवीक नजरेस आले ते त्याने लिहिले उगीच द्वेषाने किंवा स्वेछेने लिहिलें नाहीं. आणि जें काम तें यथायोग्य करावें हा कामदाराचा धर्म आहे.

जे क्यांडी साहेबावर दोष लावणारे ते थोडेसें इंग्रजी शिकून अभिमानाने फुगलेले आहेत, त्यांचा किती स्वभाषेवर अभ्यास आहे तो त्यांच्या पत्रावरून समजण्यांत येतो. आणि अस्या निंदारूप बडबडीने जर अर्धा अधीक प्रभाकर ते नेहेमी भरून टाकितात तर त्यांत इतकाच फायदा कीं केवळ ते आपला मूर्खपणा व पोकळ अभिमान उघडीस आणितात. त्यानीं पक्कें समजावें कीं उगाच जर कोणाची निंदा केली तर त्यांत निंदा करणाराचा हलकेपणा मात्र आहे. एल्फिन्स्तन विद्यालयांतील मुख्य गुरु हार्कनेस साहेब गेला आणि त्याच्या जागीं ग्रीन साहेब आला तेव्हां शिक्षणमंडळीचा मुख्य सभासद सर अर्स्किन पेरी यानें थोडासा इंग्लिश शिकलेल्या लोकांस जो बोध केला आहे तो वाचला असतां या प्रभाकरांतील पत्र लिहिणाऱ्यांच्या उपयोगी पडेल.

हरी केशवजी व सदाशिव काशिनाथ यांस क्यांडी साहेबाने तुच्छ मानलें व एतद्देशीय लोकांस मराठी भाषा येत नाहीं असें झटलें असें त्या पत्रांत लिहिलें आहे. परंतु याप्रमाणें त्याचें कांहीं झणणें नाहीं.

ज्ञानोदय, १ फेब्रुआरी, १८५१. पृ. ३९.

(३) फेब्रुएरीच्या पहिल्या तारखेच्या ज्ञानोदयांत मेजर क्यांडीने प्रभाकरकर्त्याला जें उत्तर दिलें तें पाहून त्याने कमर बांधून मोठ्या आवेशानें १६ वे तारखेचें आपलें पत्र अडीच पट वाढवून केवळ याजबद्दल लिहिलें, आणि पुष्कळ शाई व कागद खर्चाला; परंतु फळ अगदीं थोडेंच. या वादावरून त्यास अब्रु किंवा वजन

प्राप्त आहे, असें दिसत नाहीं; उलटें असी अतिशय निंदा केल्याने आपणालों हलक करून घेतलें आहे. मेजर क्यांडीनें मराठींत कधीं चूक केली असेल, कारण चूक केल्याशिवाय मराठी लेख कोणाचा आहे? प्रभाकरांत चुकी नाहींत काय? तर दुसऱ्याची चूक योग्य रीतीने व योग्य कारणास्तव काढणें हें बरें आहे. परंतु प्रभाकर-रीतीप्रमाणें गर्वाने झुलून दुसऱ्याची अति निंदा व्यर्थ करणें हे कोणाला शोभत नाहीं. आणि असल्या हलक्या वादविवाद करणाराला मेजर क्यांडी पुनः जबाब देईल असें आम्हास वाटत नाहीं. 'चिखलांत दगड टाकून चिखल आंगावर कशाला उडवून घ्यावा?'

ज्ञानप्रकाश पत्रकर्ता वजनदार व निःपक्षपाती आहे, त्याने प्रभाकरांतील मेजर क्यांडीवर लावलेले दोष व त्याविषयीं मेजर क्यांडीचें उत्तर पाहून फेब्रूएरी महिन्याच्या १७ वे तारखेच्या पत्रांत तो आपलें मत असें लिहितो :—

"मेजर क्यांडी साहेब याचा प्रभाकरास जबाब ज्ञानोदय पत्रांत छापला आहे, आणि त्यास चांगलें उत्तर मिळालें आहे. मेजर क्यांडीस जे बोध आणि भाषणें प्रभाकराने लिहिलीं तीं बरोबर नाहींत, हें आह्मास माहीत आहे."

असो; तर यावरून सर्वांची खात्री झालीच असेल ह्मणून विस्तारें कशाला लिहावें? त्या मताप्रमाणें सर्व सुज्ञाचें मत असेलच.

ज्ञानोदय, १ मार्च, १८५१. पृ. ६९–७०.

(४) विनंति विशेष. आपल्या मागल्या पत्रांत अजम क्यांडी साहेब यांजविषयीं कांहीं मजकूर पाहण्यांत आला, त्याजवरून लिहिण्यांत येतें कीं मोलस्वर्त व क्यांडी या साहेबानीं परिश्रम घेऊन जे उपकार केले त्यांचा कधींच हिंदु लोकांस विसर पडूं नये. मराठी अथवा इंग्लिश भाषारूप नगरी प्रत जे येणारे त्यांस त्या साहेबांचे ग्रंथ जसें जाणों काय चंद्र सूर्यच आहेत. असे जे विद्वान ते अभिमानारूढ होऊन इतरांची निंदा करतील असें संभवत नाहीं. यद्यपि जरी त्यानी निंदा केली असली तरी आपले विद्वत्तेची प्रशंसा व्हावयास उगेंच गुणाच्या ठायीं दोषारोपण केलें नसेल. गुणाचें चांगलें स्पष्टीकरण व्हावें ह्मणून कांहीं दोषांश दर्शविला असेल त्याचा खेद मानूं नये उपकार मानावा. विद्वान असून निराभिमान वृत्तीने वागूं लागल्यास विद्येचा ओहा-पोह घडणार नाहीं. परंतु इतकेंच कीं सदभिमान असावा तारतम्यावर दृष्टि ठेवून दुराग्रह सोडून द्यावा.

भाषांतरांविषयीं बोभाटा चालला आहे तें नीटच आहे कारण कीं मराठी आणि इंग्लिश ह्या दोन्ही भाषांची प्रवृत्ति पाहिली असतां पूर्वाभिमुख व पश्चिमाभिमुख नद्यांत जसें भिन्नत्व तसें दृष्टीस पडतें. तेव्हां मराठीचें हिंदुस्थानींत, अथवा

इंग्रेजीचें फ्रेन्च भाषेंत भाषांतर करणें सोपें तसें इंग्रेजीचें मराठींत करणें सोपें नव्हे. एके भाषेंतील जो वाक्यरस अथवा शब्दालंकार तो तसाच्या तसाच दुसरे भाषेंत उठवूं म्हटलें असतां, प्रायः होणारच नाहीं. करूं गेलें असतां आरंभिला गणपति आणि उतरला माकड तसें होईल. मराठी भाषा म्हटली असतां असी आहे कीं तिची उत्तम व्यवस्था नुकतीच होऊं लागली आहे. याजकरितां उगीच चिट्या अर्ज्या वाचणारा कार्कून आख्यानें पाठ करणारा हरदास किंबहुना शुद्ध संस्कृत घोकया शास्त्रीबावा असल्या गृहस्थांच्या हातून चांगली स्पष्ट सुश्राव्य बोधक ग्रंथोपयोगी भाषारचना होणें कठीण, आणि पूर्वोक्त कांहीं सामुग्री नसतां इंग्लिश पांडित्याच्याच्च जोरांवर हिंदुनीं जरी कंबर बांधिली आणि जरी शुद्ध व्याकरणाच्या रीतीने भाषांतर केलें, तथापि साहेब लोकांस जसें पागोटें आंगरखा घालून मिरविणें तसें होईल. त्याच्या स्वरूपावरूनच कळेल कीं हा गोरा. असो. सारांश क्यांडी साहेब भाषांतराविषयीं ज्या गोष्टी सांगतात त्या ग्रहणीय आहेत आणि असें ऐकण्यांत आलें कीं हरि केशवजीने पाठविलेला नमुना पसंत होऊन त्यांस त्या ग्रंथाचें भाषांतर करायास सांगितलें परंतु त्यांस फुरसूत नाहीं, तशांत ग्रंथाविषयींचें इनाम फार स्वल्प तें कागद नकल करणें वगैरे खर्चासच पुरूं नये इतके थोडें त्यामुळें पुढें काम चालविण्यास नाकार केला. तें त्यांस देऊं नये असें क्यांडी साहेबाने सांगितलें नाहीं. बहुत दिवसाचा बोलण्याचा लिहिण्याचा जो परिपाठ त्याप्रमाणें पडलेलीं अशुद्धें व तसेच एक दोन शब्द फिरवून स्तुति केली. व एक फार पसंत गोष्ट सांगितली कीं ग्रंथाचें भाषांतर करितांना केवळ मुळाला धरूं नये स्पष्टार्थ होत असला तर तात्पर्य दिलें असतां चालेल. इंग्रेजीप्रमाणें लांबचे लांब अर्शी वाक्यें लिहूं नये. व उगेच प्रौढ शब्द घालूं नये. व आबाळवृद्धांस कळे असें लिहावें याप्रमाणें भाषांतर नसल्यास क्यांडी साहेब जें सांगतात तें नीट आहे.

तुमचा एक पत्र वाचणारा.

ज्ञानोदय, १ फेब्रुआरी, १८५१, पृ ६३.

(५) ज्ञानोदयाचे कर्ते मुकाम मुंबई यांस, विनंती विशेष.

आम्हीं तारीख ९ फेब्रुआरीचे प्रभाकरांत पाहिलें कीं, दुर्दैवी हिंदु अशी सही करणाऱ्यानें मेजर क्यांडी साहेब यांजवर हातपाय चोळून दांतओंठ खाऊन पत्र लिहिलें आहे. तर त्या दुर्दैव्याचा असा कोणता नाश त्या साहेबानें केला हें समजत नाहीं. दुर्दैवी हिंदु त्या साहेबांचीं छिद्रें काढून त्याचा उपहास करावयास झटतो, परंतु त्यांत त्या दुर्दैव्याचाच उपहास होतो हें त्यास कसें कळत नाहीं. क्यांडी साहेबानें बहुत वर्षांमागें केलेले धर्मप्रकरणीं लहानसान ग्रंथ शोधून काढून त्यांतील अशुद्ध वाक्यें

निवडून त्यांचीं शुद्ध वाक्यें लिहून दाखविलीं आहेत तीं पाहातां त्यांत मराठी रीतीस विरुद्ध अशीं दोन चार असतील, बाकीचीं मतभेदाचीं आहेत, आणि एक वाक्य तर शुद्ध असतां अशुद्ध कल्पून तेथें जावईशोध लावला आहे. तो असा, 'येशूनें देहधारण केलें' असें वाक्य अशुद्ध ठरवून 'येशूनें देहधारण केला' हें शुद्ध म्हणून लिहून दाखविलें तें सर्वथैव अशुद्ध झालें. यावरून दुर्दैव्यास व्याकरणाचें ज्ञान कितपत आहे हें समजून येतें. ज्याला आपली खोड कळत नाहीं त्याने दुसऱ्याची काढण्यास झटूं नये. देहधारण केला या वाक्यांत देहधारण हा एक कर्मस्थानीं नपुंसकलिंग असतां केला या क्रियापदांत पुल्लिंग निर्देश दिसतो. बरें, केला या क्रियापदाचा अन्वय केवळ देह शब्दाकडे आहे म्हणावें तर धारण शब्दाची वाट काय? धारण हें काय देहाचें विशेषण कीं क्रियेचें विशेषण. हें संयुक्त क्रियापद म्हणावें तर धारण हें नाम आहे. नामाचा व क्रियेचा संयोग होतां कोठें आढळला नाहीं, अशीच बहूत करून सर्व वाक्यांची वाट आहे. असो, हे ग्रंथ क्यांडी साहेबानें केले त्यास अजमासें वीस पंचवीस तरी वर्षें झालीं असतील, त्यावेळेस शब्दशुद्धीकडे विशेष लक्ष देण्याचा परिपाठ आतां प्रमाणें होता असें वाटत नाहीं. आणि साहेब लोकांच्या मराठी रचनेंत जरी एकादें अशुद्ध पडलें तरी तें जमेस धरण्या सारखें नाहीं. इत्यादि कारणावरून हीं अशुद्धें काढण्यास योग्य नाहींत. क्यांडी साहेब हिंदूची व्यर्थ निंदा व निर्भत्सना करितो असें दुर्दैवी लिहितो, तर त्याच्याच लेखावरून क्यांडी साहेबानें कोणाची निंदा केली असें दिसत नाहीं. प्रभाकर पत्रांत या साहेबाची निंदा व अमर्याद शब्द लिहिले असतात तसे त्याच्या लिहिण्यांत कोणास आढळत नाहींत. इतकेंच कीं अमुक रीतीनें लिहावें, अमुक रीतीनें लिहूं नये अशी सूचना मात्र मराठी लोकांस दिली आहे. कोणी कोणास बऱ्याची गोष्ट सांगितली तर त्याने त्याची निंदा केली असें म्हणतां येईल काय? एतद्देशीय लोकांकरितां साहेब लोकांनीं हरएक गोष्ट चांगली हितावह केली तरी ती एतद्देशीय लोकांस आवडूं नये अशी चाल पडून गेली आहे, तदनुसारें, हा साहेब परमुलखीचा असून आम्हांस आमच्या भाषेविषयीं ज्ञान शिकवितो काय? एवढेंच वैषम्य धरून विदेशी पुरुषांची युक्ति कधींहि घेऊं नये या अभिमानाने हीं क्षुल्लक दूषणें काढलीं असतील असें दिसतें. हें आमचें लिहिणें पाहून दुर्दैव्यास वाटेल कीं हा कोणी त्या साहेबाचा आर्जवी खिरपापड्या आहे तर त्यानें केवळ असें समजूं नये. आम्ही त्याच्या हितासाठीं त्यास सूचना देतों, कीं ही चाल फार वाईट आहे. कोणी कोणाचा गुण घ्यावा. दोषदर्शी होऊं नये. क्यांडी साहेब हा परमुलुखाचा, परजातीचा, परभाषेचा आहे खरा तरी त्याला मराठी भाषेंत जसा समज आहे तसा हिंदूमध्यें थोडक्यांसच असेल. म्हणून त्यांशीं असूया करणें किंवा द्वेष धरणें

योग्य नाहीं. लोकांचें कल्याण व्हावें, भाषा सुधारावी, विद्यावृद्धि व्हावी इत्यादि गोष्टीविषयीं मोठमोठे विद्वान परोपकारी पुरुष उमेद धरीत आहेत. त्या गोष्टीशीं ही असूया फार विरुद्ध आहे. आपल्या हिंदुच्या भाषेचा इतका शोध साहेबलोक करितात हा त्यांचा आपण उपकार मानावा त्यांच्या शोधापासून जितके लाभ होतील त्यांचे शतांशही तोटा होणार नाहीं. जर आपणास एकादी कल्पना सुचली तर त्यांस कळवावी, न सुचेल तर विचारावी, त्यांची विरुद्ध दिसली तर समजून घेऊन खरी स्थापित करावी असे कांहीं विचार परस्पर सुरळीत चालले तरच भाषा सुधारेल, आणि लोकांचें हित होईल. अशा द्वेषबुद्धीनें फायदा कांहींच व्हावयाचा नाहीं. अशा बुद्धीच्या पुरुषास दुर्दैवी हें नाम ठीकच आहे. प्रभाकरकर्ते तरी अशा पत्रास आपल्या कागदांत जागा कां देतात आणि दुर्दैव्याच्या संगतीस लागून दुर्दैवी कां होतात. प्रभाकरास हें मोठें लांछन आहे. तर आपण कृपा करून प्रभाकर कर्त्यांस आपल्या पत्रद्वारा ज्ञानोदय करवावा ही आमची प्रार्थना आहे.

निःपक्षपाती हिंदु.

मुकाम पुणें.

ज्ञानोदय, १ मार्च, १८५१. पृ. ७८–७९.

मेजर कँडी यांच्याशीं वाग्युद्ध व आव्हान

पुण्यांत संस्कृत पाठशाळा होती. तें एक मोटें प्रस्थ झालें होतें. त्या शाळेवर मेजर क्याँडी साहेब सुपरिंटेंडेंट असत. आणि त्यास बोर्ड आफ् एज्युकेशन सोसायटी नावाची मुंबई इलाख्यांतील सरकारी शाळांवरील नेमलेली मंडळी होती तिनें मराठी भाषेंत पुस्तकें होतील त्याचे तपासणीस व भाषांतरें करण्याचें काम मिळाले होतें. त्या साहेबांचे हाताखाली संकृत पाठशाळेंतील बरेच शास्त्री असत. मराठी भाषेंतील पूर्वीचे बापु छत्रे यांनीं भाषांतर केलेले ग्रंथ बाळमित्र, इसापनिती, वगैरे यांत साहेब बहादूर अशुद्ध प्रकार काढून टिका करूं लागले असत. साहेबांची मराठी भाषेंत परिगम्यता, आणि बापु छत्रे यांचे सारखे विरळा भाषांतरकर्ते, यांत जेव्हां पैशुन्यें काढीत बसणें कठीण. शास्त्रीपणा त्या वेळीं फारच माजलेला होता. व क्याँडी साहबांनीं मराठी व इंग्रजी कोश सरकाराश्रयानें करण्याचें काम चालविलें होते. त्या कोशांत मराठी खरे आणि भारदस्त शब्द फारच थोडे आणि लोकव्यवहारांत क्वचित अप्रासिद्ध व चारगट शब्दांचा व म्हणींचा संग्रह विशेष होत असे. या कारणावरून माऊंचें प्रभाकर नामें जें आठवडी वर्तमानपत्र मराठींत निघत असे त्यांत साहेब बहादुरांचे सुरस म्हणी व लाक्षणिक वाक्यें बेधडक खोडाखोडी करून साहेब मराठी भाषेचे आपण पंडीत आहोंत इतरांस ती भाषा येत नाहीं असा टेंभा उघडपणें पाजळूं लागले होते.

तेव्हां त्या वेळीं मराठी भाषा जाणणारे विद्या खात्यांतील कित्येक शिक्षक व विद्यार्थी वगैरे मंडळींस तें वाईट वाटून त्यांनीं प्रभाकरांत लेखनद्वारें लिहून साहेबांचें भाषांतरांत फेरफार करणें चुकीचें असून माधुर्य भाषा रसाचें नाहींसें साहेब करतात. असे लेख येऊं लागले. मराठी वर्तमानपत्र त्या वेळीं मुंबई इलाख्यांत भाऊंचें चालत असे. व एक इंग्रजी मराठी पाक्षिक आमेरिकन मिशनचें ज्ञानोदय इतकींच होतीं. साहेब बहादुरांचे लेख प्रतिलेख ज्ञानोदयांतून बाहेर पडत. मराठी भाषेचे पक्षाकडील प्रभाकरांतून जाहीर होत असत.

या उभय पक्षांचा वादविवाद सदरील दोहों वर्तमान पत्रांतून बराच काळ पावेतों चालला होता. होतां होतां परिणामी दोहों पक्षांचे मुख्य सरदार यांनीं आपल्या लेखण्या सज्ज केल्या. आणि परस्परांनीं वाग्बाण युद्धास सज्ज झाले. या द्वंद्व युद्धांत भाऊंची सरशी झाली. ती अशी कीं क्याँडी साहेब व भाऊ महाजन या उभयतांनीं प्रथम इंग्रजींत आणि नंतर मराठी भाषेंत भाषांतर करण्याची व व्याकरणाची आणि संस्कृत भाषेची व त्या भाषेंत भाषांतरें करण्याची परीक्षा द्याव्या [वी] व परीक्षकांची कमेटी गोरे लोकांची असावी. व मुंबईस परीक्षा व्हावी. व भाऊंनीं क्याँडी साहेबांचा सर्व खर्च द्यावा. असें क्याँडी साहेबांस प्रभाकर द्वारें निमंत्रण केलें होतें. व तें ही क्याँडी साहेबांनीं भाऊंचें भाषाज्ञान आपले पेक्षां कमी आहे व परीक्षेंत नापास होतील असे अर्थाचे टोंचून ज्ञानोदयांत लिहीलें होतें. त्यावरून भाऊंनीं लेखी कळविलें. व तारीख व कमीटी मुकरर करावी म्हणून कळविलें. साहेबांनीं भाऊ कंबर बांधून सज्ज झाले हें जेव्हां पाहिलें तेव्हां हा प्रभाकराचा नुसता नामधारी कर्ता नव्हे. हा कोणीतरी मोठ्यांतील मोठा विद्वान व पंडीत आहे असें वाटून चौकशी करावयास लागले. आणि मग त्यांना भाऊंचें स्वरूप खरें त्यांचे इतर स्नेहा [ह्यां] कडून कळून आलें. आणि मग भाऊंचे संबधानें हतवीर्यपण स्विकारलें. व पुण्याचे शास्त्री व पंडीत मंडळांत भाऊंचे योग्यते विषयीं ते शोध करूं लागले. व तो एक विद्वान व मानी पुरुष आहे, असें कल्पूं लागले होते. तोच पुरुष पुण्यास आला आहे त्याला अवलोकन करावें अशी शास्त्री, पंडीत इच्छा करूं लागले. त्याचें कारण भाऊंचा मानी स्वभाव; स्वतंत्रपणा; असे. तेव्हां त्यांची व आपली भेट मोकळेपणानें होईल. व ज्ञान भांडार वास्तवीक किती व कसें आहे हें समजून येईल, कीं नाहीं याची अपेक्षा करीत. भाऊ हे पुण्यास कैलास वासी अण्णासाहेब चिपळोणकर यांचे स्नेह्यांचे वाड्यांत उतरत असत. तेथें विठोबा आप्पा यांचे समागमे त्यांचे मित्र कृष्ण शास्त्री चिपळोणकर आदि करून विद्वान मंडळी प्रथम भेटावयास गेली होती.

बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांचें जीवनवृत्त व लेख संग्रह,
खंड ३, परिशिष्ट ३, १९५०. पृ. ५१–५२.

परिशिष्ट ३

दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्या व्याकरणाची दुसरी आवृत्ति निघण्या- पूर्वी त्या पुस्तकावर बाळशास्त्री जांभेकर व मेजर कँडी यांनीं लिहिलेले टीकालेख व त्यांना दादोबांनीं दिलेलें उत्तर या संबंधीचा सरकारी दप्तरखान्यांतील पत्रव्यवहार.

1st Jan. 1847.

To

M. Stovell, Esqr.

Secretary to the Board of Education.

Sir,

In compliance with the instructions conveyed in your letter dated the 4 th. December, 1845, recommending the revisal of my Marathi grammar for a second edition, I do myself the honor to report for the information of the Board fo Education that the work is now finished and is ready for the press.

In my reply to the above letter I had the honor to intimate to you that in revising the Grammar, I should not only attend to the points which the late Bal Gangadhar Shastree has kindly suggested in his memorandum, but altogether remodel the work with such additions and improvements as my experience and reflection for the last ten years (which have elapsed since the publication of the first edition) on a multiplicity of points connected with Marathi Grammar, some of which have not been treated in a manner I might now wish, while others have altogether escaped my observations, have not suggested to me. It had long occurred to me that my grammar, though the largest of the one or two little treatises that have hitherto appeared on the subject, was still wanting in supplying rules and explanations for a variety of points which could never be settled but by the aid of grammar and the analogy of languages; and the satisfactory adjustment of which had long since been felt as a great desideratum both by the teachers and writers of the Marathi language. It can be easily imagined that such

a language as Marathi which cannot be said to have attained a higher rank than that of a colloquial tongue, there may be no small numbers of such anomalies. Now to reconcile these, and to reduce the heterogeneous mass to something like a harmonious system, supported by rules, derived from analogy, and the best established usage, *and not the mere collection of facts*, must be considered as the essential object of the grammar of such a language as the Marathi, and this will appear the most absolutely necessary when the use of such a work is viewed in connection with the educational establishments now multiplying throughout the country, and the numerous books which are likely to be in the course of being published in the vernacular languages for the use of these schools. Under this impression, the work of revising the former edition of my Grammar was undertaken, and is now brought to a close. The Board will then clearly see that under this circumstance, it is no wonder that the book should swell to a size almost double of what it was before, a circumstance, which I could not possibly avoid without detracting from its utility as a class-book for the higher classes, in the Marathi schools, and a book of reference for the teachers themselves.

Imperfect as I consider the first edition was, both Capt. Candy and Mr. Bal Shastri recommended the work very favorably to the patronage of Government in their letters to the then Chief Secretary Mr. Wathen who had submitted it to their inspection. I take the liberty to subjoin extracts from their minutes for the information of the Board of Education.

Extract from Capt. Candy's minute:-

"I beg to report very favorably of the work upon the

whole. I think that it does the author great credit, and that it is deserving of the patronage of Government. It would be a useful work for the senior classes of the Gov. Marathi Schools, and would be a suitable present to deserving Scholars at the annual examination."

Extract from Bal Shastri's minute:–

"I think this Grammar tolerably well executed. It is much superior in point of arrangement to another work that has been published by Gangadhar Shastri on Marathi Grammar, and its definitions are much more clear and precise. As a first attempt we must make allowance for its few imperfections, which, however, it will be seen from the following particular examination of its various sections, are far from being such as to outweigh its merit. It seems in many points to enter into the philosophy of grammar which has not yet been done in any grammatical treatise in Marathi; and the notes in smaller letters contain great mass of useful information and instructive discussions in illustration of obscure parts, or in support of the preference which the author has given to particular opinions. The work must, therefore, prove as a valuable sequel to the study of the smaller grammars now in use in the Schools of Gov."

In returning you the accompanying memorandum, I beg respectfully to state that though I generally agree with Bal Shastri in regard to the points submitted by him in this memorandum (which accompanies this) yet, I am sorry to say there are some points regarding which I cannot agree with him. This can easily be accounted for when it will be imagined that they are so intricate and so nice as to excite no wonder if, amidst the multiplicity of occupations in which Bal Shastri was always engaged they had not attracted his

patient and deliberate attention. I have in support of my own views attempted to remove the arguments which Bal Shastri has advanced in their refutation; This I beg leave to append herewith. The only circumstance that makes me deeply regret on this occasion is, that that learned scholar and the only person who had patience and talent to examine and appreciate the justice of the arguments tho' made use of in refutation of his own views, as well as the merit of the work in general, has not lived to see the completion of this newly improved edition.

<0452

In conclusion, I beg most respectfully to submit to the support and patronage of the Board of Education this newly revised work, which, when printed, will, in all probability contain upwards of 400 pages quarto, which the first edition had only 194; and in the preparation of which no ordinary degree of patience and labor has been exerted. Its former price was two rupees and eight annas per copy, but should the Board be pleased to take two thousand copies at once, I can afford to sell this enlarged edition even at one quarter of a rupee less than its former price. But should they subscribe for only one thousand copies, I shall not be able to dispose of them at less than three rupees per copy.

I have the honor to be
Sir
Your most obedient humble servant
Dadoba Pandurang.

[*D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1857. pp. 6-9]

Memorandum of points requiring revision or discussion in Dadoba's Grammar :—

Paragraphs should be numbered and the different subjects when occupying more than one paragraph should

have titles in large letters as वर्तमानकाळ, भूतकाळ etc. Bad or ungrammatical constructions should be corrected. These certainly cannot be many but in the very first page we meet with 'दुसऱ्यानें बोललें असतां,' p. 3 'हे बाळबोध लिपि शिकाविणारे,' p. 27 समजला जातो instead of समजतो.

One uniform system of spelling should be introduced. जेणें करून, तेणें करून etc. should give place to ज्याणें करून, त्याणें करून. अक्षरांचा अवयवांचा विचार, जांचा आश्रयावाचून etc. are wrong, according to Dadoba's 19th rule of syntax which should be strictly followed, except perhaps in the case of the feminine pronouns जी and ती, which may retain ज्या and त्या for their सामान्यरूप instead of being inflected into ज्ये and त्ये. येथें for एथें, दित्त for द्वित्व, झोटा for मोठा are some instances of bad spelling.

p. 3 ऌ is never lengthened.

p. 4 A rule may be here given stating that च आणि ज in Sanscrit words or words derived from Sanscrit are to be pronounced as in that language. If this be done and the principle explained in page 86 and in the 19th rule of syntax followed, there will be little occasion for the dotting system which has been objected to by Captain Molesworth and many others. I myself however do not object to its being retained to distinguish the Sanscrit from the Prakrit sound as चार four and चार green grass, but the adoption of the dots should not lead to the violation of the rules of grammar by writing त्याच्यास, त्याच्यानें, etc.

p. 10 The distinction between the sounds of ड mentioned in the note is one which nobody has ever heard or known except Dadoba. It may exist in the jargon used by Conkani Musalmans, but *is never recognized* by any correct speakers. At all events if it is to be noticed at all, it should be done only with a view to guard the student against it.

p. 12 The above remark also applies to the pronunciation of the अनुस्वार in संहार etc.

p. 19 The important distinction between the first four classes of words and the last or अव्यय should be noted, i.e. words should be divided into 'declinables' and 'indeclinables' and the former then subdivided into nouns, pronouns, etc. The assertion at the bottom of p. 20 and at p. 157 that the indeclinables are not at all inflected is inconsistent with what is stated in p. 162 about them. 'They are not generally inflected' will be quite unobjectionable.

p. 21 The classification into सिद्ध or primitive, साधित or derivative and संयुक्त or compound belongs rather to all words instead of nouns only. The division into शब्दसाधित and धातुसाधित is bad. Words should be called नामसाधित, विशेषणसाधित etc. according to their derivative.

p. 24 It is rather the 'union' of words that is called समास and not their connection. 'Compound words' are called समस्त and not समासान्त.

p. 26. The अव्ययीभाव समास should be noticed at least in the form of an opinion of other grammarians.

p. 29. The rules for genders here given except the last are no rules since they have hundreds of exceptions.

p. 38 In the plural of चमचा and राजा the letters च and ज are pronounced exactly as in the singular. Again in the third example the word is आरशी and not आरसी. So the whole rule may be spared.

p. 57 आरसे and not आरशे is the plural of आरसा. p. 59 माशे is bad. It should be मासे.

p. 38, 62 Declension of nouns. It is not true that one case is confined only to one sense, as is here implied. This is not the case in any language. In Sanscrit and Latin, the

accusative द्वितीया is frequently used for the dative चतुर्थी and the locative सप्तमी. Does the principle hold in Marathi? In the sentence तो वाघ मारितो Dadoba indeed calls the first form the प्रथमा and the second द्वितीया; but for a like reason, he must designate in the sentence त्यानें हातानें झाड तोडलें, त्यानें as the प्रथमा and हातानें as the तृतीया or abandon his theory. Again if वाघास is accusative in वाघास मारितो, and dative in वाघास खायास घालितो, then in the sentence काल धरलेला वाघ हुशार आहे. तो कांहीं मरत नाहीं, त्या वाघास काय चिंता, वाघास must be styled the genitive or possessive and in डोक्यास पागोटें, डोक्यास should be locative. In दर दुकानदारास सरकार दोन रुपये घेतें, दुकानदारास would be the ablative. The same thing may be noticed in reference to other cases. How does our author remove this confusion? Of course by considering his द्वितीया and other cases to be used in different senses. If so, why not consider it in ब्राह्मणास गाय देतो as used for the dative or to express the receiver of the gift? Dadoba is afraid that if ब्राह्मणास be in the द्वितीया, the meaning would be that the Brahman himself was given. But his apprehensions are groundless. The द्वितीया is used in many other senses besides that of the object, and may here denote a receiver of the gift. In truth the dispute is chiefly about words. In ब्राह्मणास गाय देतो, it cannot be disputed that गाय is the object, and ब्राह्मण is the receiver, but Dadoba makes the former to be in the 2nd case, and the latter in the 4th case, whereas I think them in the 1st and 2nd cases respectively. I name the cases according to their terminables which alone characterize a case or विभक्ति in the proper sense of those words. I have the system of the Latin and Sanscrit grammarians to support me. Some of Dadoba's cases are named according to their terminations, and some according to their senses, so that he follows neither principle throughout. It should be borne in mind that the cases are named 1st.

2nd, 3rd etc. in Marathi and not nominative, accusative etc. which would have been an objection to my plan.

p. 45 The whole paragraph beginning with विशेषनामास विभक्तिकार्य होत नाहीं, should be left out. गंगास, केशवचा etc. are only provincialisms and not sanctioned by good usage.

p. 46 Should not त्याच्यानें, माझ्याहून be considered as the inflections of त्याचा and माझा though they frequently mean nothing more than त्याणें, मजहून ? The fact should be stated that the form called genitive case admits, as an adjective, of regular inflexion.

p. 55 The rule given here about the penultimate ई and ऊ does not hold in regard to Sanscrit. Ex. रीतीनें, सूत्रानें, सूत्रीं.

p. 62 The last two paragraphs are founded on a misconception The truth is that all the particles there ennumerated are significant words and are preceeded by the possessive or genitive case; the two being often turned into a compound which is called the अव्ययीभावसमास.

p. 63 I don't see why श्रीमान्, भांडखोर etc. should be called nouns, while at page 91, बुद्धिवान्, लक्ष्मीवान् etc. are properly styled as adjectives. Lessons 12th. and 13th. together with the latter part of the 14th. should be thrown together into one chapter on the derivation of nouns and adjectives.

p. 72 Should not the only three anomalous forms of त्याणें, ज्याणें and ह्याणें be changed into त्यानें, ज्यानें and ह्यानें for the sake of uniformity ? The missionaries have done this; and I think very properly. I have now come to this opinion after thinking otherwise for many years.

p. 71. If ते is changed into त्या and हे into ह्या, I would recommend जे to be written ज्या and not जा. The three are declined precisely in the same way.

p. 76 The remark on the pronoun ही may be extended to the masculine हा. Though the forms are considered harsh by Dadoba, it is highly desirable that they should be recognized and recommended; as the adoption of them would remove one great anomaly in time.

p. 82 कोणी is evidently a compound of कोण and ही. The सामान्यरूप in the masculine gender is कोणा and in the feminine कोणे.

p. 95 Another distinction between active and neuter verbs may here be properly noticed. Active transitive verbs are used in the past tense of the indicative in the कर्मणीप्रयोग. The verbs बोलणें, जेवणें, पिणें, भिणें, विणें appear to be exceptions; but they are not so in reality, for though they express some action, they are not transitive, as the fruit of the act does not pass to the agent. ह्मणणें is used either transitively or intransitively. A third prominent distinction may also be laid down. The present participle of all active transitive verbs terminating in अ end in इत, that of the intransitive verbs in अत. The rule is very general, and remarkable examples are to be noticed and among those verbs which are used either transitively or otherwise. तो जसजसा कापित आहे तसतसें तें लाकूड कापत चाललें आहे. वारा दार उघडित आहे, तसतसें तें उघडत आहे. उपचार शरीरास मानितो. राजा पंडितास मानितो. ect. बोलत आहे, ह्मणत आहे are exceptions for not being transitive. करित आहें being a contraction of करितों आहे and करितों being a contraction of करित आहें through करितों हें, they should be written करित आहें and करितों, and not करत आहें and करतों, as Dadoba is in the habit of doing.

The verbs used either transitively or intransitively are those whose causals are the same as the originals, such as उघडणें, मोडणें.

Further, the causal verbs end in इव as Dadoba has very properly demonstrated; and as they are all necessarily active, they take इत to make the present participle for which reason, their progressive and simple present tenses should properly be करिवित आहें, and करिवितों. This however being laid, it is optional to drop the 1st or 2nd इ and so करिवतों and करवितों. Under this explanation करवितों is not quite so incorrect as Dadoba would make it appear.

p. 96 Though करीव, बोलीव are the correct imperatives, the penultimate vowel is changed into the corrosponding short one when these verbs are inflected करिवणें, करिवण्यास, करिवल्यास.

p. 100 वाटणें is not impersonal or unimpersonal. It is followed in a sentence for its nominative. अर्थ वाटतो, रीति

उत्तम वाटती are decided examples to the contrary. कर्तरी, कर्मणी are wrong, they should be कर्तरि, कर्माणि.

p. 108 The para—beginning with कोठें हा भूत should be expunged.

p. 109 It is stated that तें सोडतें is the only change from the masculine that the neuter admits, but तूं सोडतेंस is certainly another.

p. 115-116 Four paragraphs here containing particular remarks will be spaced, if it be clearly stated that जाणें, गेलें and जावें are nouns and adjectives to all intents and purposes and they admit most of their inflections.

p. 134 The three last tenses noticed here namely असत असेन, असलों असेन and असणार असेन are very properly named वर्तमान भविष्य, भूत भविष्य, भविष्य भविष्य. Could not जात असलों, गेलों असलों, जाणार असलों, be named वर्तमान भूत, भूतभूत and भविष्य भूत ?

p. 136 A considerable difficulty will be got over by considering जाऊं, लिहूं, जातां, लिहितां as verbal nouns or particles for in such sentences as जाऊं सांगितलें, it can be construed as an object to the verb. That this is perfectly consistent with the nature of the language will be seen from the expression रडूं कोसळलें, हसूं आवरेना etc. Its inflections are of course the same as those of जावें.

p. 143 The anomalous form दिल्हें should give place to दिलें.
p. 145 The several tenses are here called भावि प्रयोग instead of the कर्माणि.

p. 149 As to the forms पाहिजेल and पाहिजेत होतें, they are like करिजेल and करिजत होतें which certainly belong to the old passive voice करिजेतें, करिजेलें, करिजेल which are noticed at p. 52. नये is composed of the two words न and ये, the latter of which is the evident contraction of येई.

p. 151–52 In the analysis of the sentences आंबा झटला etc. Dadoba forgets all grammar. In order to avoid what he calls bringing 'an agent from a distance,' he begins to prove that the thing 'said' 'seen' or acted upon is the agent of the verb.

p. 153, 147 Under the auxiliary लाग the form नलगे should be noticed. In the general remarks on verbs some method should be pointed out of explaining देतां, देतांना which include both a verb and an adverb of time as in the example त्याणें देतांना मला सांगितलें, i. e. त्याणें दिलें तेव्हां मला सांगितलें or they may be said to express देतेवेळीं.

p. 158 It is much better to consider देत, बोलत etc as adjectives contracted from देता, देती, देते, बोलता, बोलती, बोलते instead of calling them indeclinables.

p. 161 प्राय: and प्रायश: are more frequently adverbs than conjunctions.

p. 162 अधिकरणवाचक is erroneously used for अपादानवाचक. Do not the postpositions also take the possessive चा in common with many adverbs? The affix ऊन is also common to adverbs of place तेथें, एथें etc.

p. 163 हरहर, शिवशिव, काय मौज, भले,are surely not interjections.

I have nothing to say about the syntax and parsing further than this that they should be modified in one or two places agreeably to the preceeding views. This applies particularly to rules 6 th. 7th. and 8th. of syntax.

p. 178 I do not see the object of the orthographical rules here given. They are all to be found in the different parts of the work, and if this be a recapitulation it is too brief for any useful purpose.

Several points which Dadoba regarded as doubtful when he wrote in 1836 have since been settled with concurrance of all parties; so that many of the long arguments that he used to support them are now unnecessary. Many of his notes on the margin are important enough to form a part of the text or observations.

I would recommend Dadoba in revising his work for a second edition to consult the grammar of Dr. Stevenson whose views will be found to confirm mine in almost every instance.

Ball G. Shastree.

[*D. P. I. Board of Miscellaneous.* 1847. pp. 16–21.]

Remarks on Bal Shastri's Memorandum.

In his instructions regarding the adoption of one uniform system of spelling, Bal Shastri condemns the forms जेणें करून, तेणें करून, 'which' he says 'should give place to ज्याणें करून, त्याणें करून'. These forms though partly consistent with the rules of grammar, are yet wholly devoid of the idiom of the language; no man in Maharashtra can use ज्याणें करून and त्याणें करून, and as the main object of grammar is to **follow** and not **violet** the long established usages of a language, tho' they may be the exceptions to the general rules, I do not therefore think that the adoption of the -yet-never- used forms ज्याणें करून etc. is warrantable.

p. 2 It has been a long disputed point as to which of the two forms त्याच्यानें, माझ्यानें, ज्याणें etc. or त्याचानें, माझानें, जाणें etc. is more conformable to the rules of grammar, and, as such, entitled to preference. The reason of my preferring the latter form to which Bal Shastri seems to object as being ungrammatical, may be here explained at some length to show that it is not so. According to my opinion though the letters च, छ, ज and झ have two distinct sounds in Marathi, yet the one which they (with the exception of छ) acquire in conjunction with all the vowels excepting इ and ए is an accidental sound, and not their original; and as no particular rule can be given regarding the precise circumstances under which this original sound is modified the necessity of distinguishing this modification by the addition of some mark, a dot for instance, becomes absolute, for though it is an *accidental* sound yet is by no means on that account *unessential* in the Marathi language. I know that it is a general opinion that a rule might be laid down as to this accidental pronunciation viz. that all Sanscrit words or words derived from that language containing these letters retain their original sounds, as also most of the Persian and Arabic words, that is to say, the pure Marathi words, and such foreign words as have been naturalized in the language have these modified sounds. Now the question which naturally arises out of this rule is, how are the generality of the readers particularly foreigners

to know the distinction; must they all provide themselves with the Marathi kosh (or dictionary) to write and pronounce distinctly? How are we to know what Sanscrit and foreign words containing those letters are sufficiently naturalized in the Marathi language so as to admit of this modified sound? Why should we give the letters च, ज and झ the modified sound in the following words such as चलनी, चलन, चांद, चल, चुरा, जात, जाळ जासूद, जनावर, राजा, जोशी झळक, झालर, झाज. etc. which are either originals or derivations from Sanscrit, Persian or Hindustani. The marking therefore of these sounds becomes under this circumstance quite unavoidable, since no finite rule can be given by which the learners can guide themselves in their pronunciation. It appears that Capt. Molesworth objects to the dotting system, merely because he is apprehensive lest its adoption might lead to its frequent omission in printing as well as in writing and thus causing confusion. But this apprehension of the author of the Marathi Dictionary though plausible is not however in my opinion so well grounded as should lead to the dispensing with this appendix. Of course there will be some difficulty at first, in its universal adoption; but when writing and printing will be much more common than are practised now, as the march of intellect which has already commenced, and which promises a fair and rapid progress warrants us to anticipate that the application of this mark to च, छ, ज and झ will then lead to no more omission or confusion than is now done in the case of **anuswar** and **Visarga**, or in marking the dot over the English letters i and j. Bal Shastri does not seem, however, to object wholly to the dotting system, nay, on the contrary, is fully convinced as may be seen from his remark of the necessity of distinguishing this sound of च ज etc. but after all I wonder he does not put full stress upon it. Under the conviction of this necessity, the Pundits also (the compilers of the Marathi kosh) have adopted the mark throughout their work; as also in all the Marathi works published under the Superintendence of Col. Jervis.

Having thus far endeavoured to establish the necessity

of the dotting system, the reason of my not writing त्याच्यानें, माझ्यानें ज्याणें etc. would be quite evident for I conceive that the change which the inflections produce upon the inflective bases त्याचा, माझा, जो etc. has no more effect than that of reverting the letters च, ज, झ to their original sounds, or in, other words the adding of य which the inflection requires to च ज, झ is equivalent to their conversion into their original sounds, and forms च, ज, झ, and not into च्य, ज्य, झ्य, in which case we shall have to suppose the inflectional य to be productive of two effects, instead of one, as, in all other cases, viz. the addition of that semi-vowel, and the reverting the letter च, ज, झ to their original sound. Now according to the rule of grammar which Bal Shastri seems to have firmly laid hold of, त्याच्यानें, ज्याला etc. out to be pronounced and written त्याच्यानें, ज्याला etc. as might easily be perceived; otherwise he will have not provided for the conversion of the sound of च, ज, झ into च, ज, झ. Why not then say at once that the adding of य to च etc., is च etc. for there could be no exception to this rule, and thus save ourselves a world of confusion. Besides, this rule will have the advantage over Bal Shastri's in affording a clue to trace the inflected forms of words ending in च, ज etc. to their original bases; as for instance, सांजाचा, राजानें etc. will at once show the learners that the original words are सांजा and रांजा; whereas according to Bal Shastri's forms, these words must be written thus सांज्याचा, राज्यानें, which gives birth to another confusion, since the inflectional forms of राजा, a king and राज्य a kingdom, would in this case, be quite identical, a difficulty which according to Bal Shastri, would be quite unavoidable, but following the rule laid down in my grammar is at once, avoided. The forms therefore त्याच्यास, त्याच्यानें etc. which I have adopted are quite conformable to the rules of grammar, and is no violation whatever as Bal Shastri seems to have apprehended.

p. 11 Bal Shastri being a native of that part of the Conkan, where perhaps the two distinct sounds of ड are not much observed, had not a delicacy enough in catching these sounds which all the rest seem to acknowledge. There is not the least doubt that ड has two distinct sounds. Bal Shastri seems

to labour under great mistake when he writes thas 'the distinction between the sounds of ड mentioned in the note is one which nobody has ever heard, or known except Dadoba,' which distinction has not even escaped the notice of foreign writers such as Dr. Stevenson and Capt. Molesworth in their respective works. See Stevenson's Grammar P. 9 and the letter ड in the Marathi Dictionary P. 29. In preparing this new edition there are perhaps few parts which have been so minutely investigated as the gender of nouns, and I have peculiar satisfaction to add that during my investigation of this subject many important and new rules have been discovered, by the aid of which this part of the Marathi Grammar, which has hitherto been a mass of confusion, has now been reduced to a good systematic form.

p.38, 62. After mature consideration, I have found that Bal Shastri's views regarding the declension of nouns etc. are quite correct. I have therefore adopted them in this editions The only objection that can be brought forward against hit system would be in reference to the dative case, which according to his plan must altogether be expunged from the list of cases; a view, which we cannot adopt without destroying the beauty and harmony of the whole scheme of Marathi cases. I have retained both the accusative and the dative tho' under the same form; to be distinguished by the sense they respectively imply; तो ब्राह्मणास गाई देतो, here ब्राह्मणास is the 4th case or dative, and तो ब्राह्मणास बोलावितो here ब्राह्मणास is the 2nd case or accusative.

p. 43 I do not think that घरांत, दारांत should be classed under the head of compounds. There is indeed not much difficulty in resolving the words घरांत, दारांत etc. into घर, दार and आंत, but how would Bal Shastri manage गाईंत, शेंगेंत etc. which do not retain the आ of आंत. There are therefore decidedly the forms of the locative cases and not compounds, whatever their origin may be.

p. 45 It has escaped the notice of Bal Shastri that some of the proper nouns or names admit of the regular inflection of a common noun only when they are used contemptuously, and

not otherwise. In their ordinary inflection their bases undergo no change. गंगास and गंगेस are both the 2nd cases of गंगा, but the latter form is used only when contempt or the lowness of rank is to be implied.

p. 63 With regard to the derivatives I have adopted Bal Shastri's suggestions and have thrown the whole subject under one head at the conclusion of that part of the grammar called शब्दविचार or etymology. The further improvement that has occurred to me while writing on this subject is arrangement in the alphabetical order according to their terminations of all the derivatives as far as they have been found out, which I trust, will greatly contribute towards facilitating reference.
p. 72 I cannot agree with Bal Shastri in changing the common forms जाणें, त्याणें and याणें into ज्यानें, त्यानें and ह्यानें which are extremely vulgar.

p. 82 कोण्ही is the compound of कोण and ही and not कोणी as Bal Shastri states. कोणी is either an indefinite pronoun or the 3rd case of कोण.

p. 95 Another distinguishing characteristic which Bal Shastri has found out in the transitive and intransitive verbs in the Marathi language reflects great credit upon him.

p. 108 I do not see any reason why the paragraph should be expunged.

p. 158 I cannot call देत, बोलत etc. adjectives; they are decidedly adverbs or adverbial participles to all intents and purposes. In the sentences तो खेळत जातो, हंसत बोलतो etc. खेळत and हंसत are decidedly adverbs and cannot be considered as adjectives as Bal Shastri supposes them to be.

p. 163 हरहर ! शिवशिव ! काय मौज ! भले ! if not interjections or interjectional phrases, what are they then ?

Dadoba Pandurang.

[*D. P. I. Board of Education, Miscellaneous.*
1847. pp. 10–15.]

To

H. J. Carter, Esquire.

Officiating Secretary to the Board of Education, Bombay.

Sir,

In accordance with the request conveyed by Mr. Secretary Stovell's letter of the 29th May last, No. 390, I have the honour to submit to the Board of Education my review of the revised copy of Mr. Dadoba Pandoorang's Marathi Grammar.

I was not able to begin my examination of the work till I completed the English and Marathi Dictionary which I had in hand and till I had prepared my reports of the 1st and 3rd Divisions of Vernacular schools and my part of the Poona College. While I was occupied with them, I requested my friend the Rev. Dr. Stevenson, who has paid much attention to Murathee grammar, to look at the work and favor me with his observations on it. He wrote to me in reply that he could not enter on a critique of the work itself; but he favored me with his opinion on the points at issue between Dadoba Pandoorang and the late Bal Shastree. A copy of Dr. Stevenson's letter is among the papers appended to this. I put the work also into the hands of Ramchundra Shastree, Inspector of the Vernacular schools of the 1st division, whose occupation has given him much practical acquaintance with the subject on which it treats. Ramchundra Shastree examined it before he proceeded on his tour, and left his remarks with me. They also are appended to this. I looked forward to receiving a valuable review of the work from my own personal Pundit, Raghoonath Shastree Tullekar, but he was cut off by sudden death before the English and Marathi Dictionary was off my hands. My present acting Pundit Purshuram Punt Gurbole has made remarks on a portion of the work, which I append. I myself took it up as soon as I was able and I have gone patiently through it, making remarks on the paragraphs as I read. These remarks constitute the first appendix.

The examination which I have now made of the work has been close and searching, while that which I made of the first edition was comparatively cursory. I regret that I cannot speak in such strong terms of commendation of the revised work as those in which I expressed myself of the first edition. I still think that Dadoba Pandoorang's diligence and research are commendable, and that the result as manifested in the 1st. edition was creditable to him. Had he in this revised copy corrected the errors of the first edition he would have been deserving of high commendation, and his work would have been much enhanced in value. But I have been greatly disappointed at finding that most of the blemishes of the first edition remain uncorrected in the revised copy. They might be passed over in the first edition, as perfection is progressive, and first attempts are almost necessarily defective; but if they are retained in a revision of the work, it becomes necessary to expose and reprobate them. Instead, therefore, of contenting myself with general remarks as in my report of the first edition, I have in this examination entered into detail.

As I consider that every author, whether treating of grammar or any other science, has a right to arrange his subject in the way which seems best to himself, I have not set myself to pick holes in Dadoba's scheme of Marathee grammar, or to bring forward my own in preference to his. Where I have thought his statements incorrect, or his rules unsound, or his examples and illustrations foreign to his rules, I have marked the passages and pointed out what I thought to be erroneous; but in other cases I have made no comment on his rules. I may say here, in general, that I think a simpler, clearer and at the same time shorter scheme of Marathee grammar might

be drawn up. The great increase of bulk of this revised copy is not attended with a corresponding increase of worth. Some of the knotty points have been very unsatisfactorily handled by Dadoba.

What I particularly wish to point out is Dadoba's vicious Marathee composition. This is a subject quite distinct from his scheme of grammar; even though his rules of grammar were not excellent his style and composition would still be bad. His book abounds with solecisms and barbarisms of various kinds. What would be thought of an English author who should write 'cis alpine or atlantic countrie's meaning cis to apply to atlantic as well as to 'alpine'? or who would make mention of 'ultra–montane or marine productions' meaning the 'ultra' to apply to 'marine' as well as to 'montane' ? Yet as construction similar to this is very common in Dadoba's composition. I have pointed out many instances, but I have left others unnoticed not to swell out my review. Another great fault of Dadoba's style in this grammar is his unnecessary use of high Sanscrit words. I do not here refer to the mere technical terms of grammar, which when they do not exist in Murathee must be borrowed from the Sanscrit, but to his explanations, which ought to be as simple as can be. It is very creditable to Dadoba that he has made himself acquainted with many Sanscrit terms and phrases that are not commonly known by his countrymen, but he should be cautious in his use of them. Sometimes he shows that he does not himself understand the words he uses. I have pointed out one or two instances of this in my remarks. I fear that his book, as it now is, will be above the comprehension of $\frac{19}{20}$ of the masters of Vernacular Schools. To their scholars of course it will be still more difficult.

I consider the subject treated of in the preceding paragraph to be of such great importance that I beg to press it most earnestly on the attention of the Board of Education, now that great efforts are being made to promote education, and to raise a native literature, we must be particularly careful, not to encourage or sanction bad composition. If the Murathas were an educated people well acquainted with the rules of composition, and if they had a standard literature, an inelegant or ungrammatical work might safely be left to the fate to which the public taste and perception of propriety would doom it. But in the present circumstances, those who are endeavoring to direct and advance the progress of education and literature must feel that much responsibility rests upon them. If solecisms and barbarisms are now sanctioned and published by authority, they may obtain such a firm hold in the language as to vitiate it for ever. I trust Mr. Dadoba Pandoorang, for whom I feel unfeigned respect as one who has endeavored to benefit his countrymen will not be offended at the freedom with which I have expressed myself. My remarks are not directed against him personally, but against what I consider his solecisms. I invite him to unite his efforts with mine to banish barbarisms, and to inculcate correct views of composition.

Though I do not think that this book supplies the desideratum of a complete Murathee grammar, or that it has claims to be set forth as a standard work and to be published by authority, I am yet of opinion that if the author will correct the errors and blemishes that have been pointed out, and will endeavor to make himself intelligible to common Prakrit Puntojees, it might be very useful. Under these conditions, I would recommend it to the liberal patronage of the Board. Corrected, cleared of barbarisms and made intelligible to common readers, it might serve as the Board's book of grammar till some more able person shall arise to furnish the superior treatise that we desiderate.

My opinion on the points of controversy between Dadoba Pandoorang and the late Bal Shastree might be left to be gathered from my remarks on Dadoba's book; but I have written a separate minute on them, which I have appended to this report.

I return, as requested, Dadoba's letter, the late Bal Shastree's memorandum, and Dadoba's reply to it.

Poona College.
11–2–1848 Thomas Candy

(*D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1848. p. 162.)

My dear Dadoba,

Having examined your grammar both alone and with yourself, and spent some time in aiding you with suggestions as to the best mode of obviating Major Candy's objections in cases where he had not intimated the mode of doing so, I think, I can say you have now by additions, omissions and amendments freed the work from the blemishes on which he animadverted and that it is extremely desirable it should go to the press without further delay.

When I attended at Mr. Harkness's request, the examinations in Maratha, I was rather amazed at the imperfect acquaintance with the Grammar of their own language the pupils displayed. This was attributed to the want of a proper manual of Maratha grammar. I believe that in its present state, it (the work) is well fitted to supply the wants of your Institution and give the more advanced students a complete view of the grammar of their own language

I am,

yours very sincerely,

J. Stevenson

(*D. P. I. Board of Education, Miscellaneous*, 1848. pp. 155-158.)

Bombay 26th. Sept. 1841.

To,

H. J. Carter, Esqr.

Secretary, Board of Education.

Sir,

I have the honour to forward the manuscript of my Marathi grammar, which, in conjunction with Rev. Dr. Stevenson, I have corrected and improved to the best of my ability after the suggestions of Major Candy, and to request now the Board of Education will do me the favour to submit it, if they think it necessary to Major Candy for final revision.

I beg also to request you will be kind enough to forward the accompanying memorandum to Major Candy with my grammar.

I have honour to be

sir,

your most obedient servant,

D. Pandurang.

Memorandum

As the manuscript copy is the same, I am obliged in adopting Major Candy's suggestions to write the corrections and other additional matter in a very small hand, which, I am afraid, will not be very easily read.

याणें, ह्यानीं, चा, च्या and such other little terminations and words, which occur some thousand times in the body of the work and consequently might disfigure the manuscript if corrected, throughout other suggestions about which Major Candy has not given his decided opinion, and some few

points about which he and Dr. Stevenson seem to disagree will, if Major Candy should kindly favor me with his decided opinions, be altered in the proof-sheets according to his final suggestions.

There may be many instances found in which words, sentences or spellings corrected according to Major Candy's suggestions at the places where he has pointed them out, may have been left out in other places in their original state; this being in the hope that they will also be altered everywhere as the work will go to the press, to preserve uniformity and consistency throughout which is the most important point.

D. Pandurang.

(*D. P. I. Board of Education, Miscellaneous.* 1848.
pp. 165-166.)

आधारग्रंथ

१ हस्तलिखित साधनें (इंग्रजी)

(अ) पुणें येथील डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन (हल्लींचे डायरेक्टर ऑफ एज्युकेशन) यांचा दप्तरखाना

Board of Education. 1840.
Board of Education, Report. 1840.
Board of Education, Circular Book. 1841.
Report of the Board of Education. 1842.
Board of Education. Vol. 12. 1842.
Board of Education, Institution. 1842.
Government. 1842.
Circular Book. 1843.
Board of Education, Miscellaneous. 1845.
Board of Education, Poona Sanscrit College. 1845.
Board of Education, Miscellaneous. 1847.
Circular Book. 1848.
Board of Education. Poona Sanscrit College. 1848.
Board of Education, Miscellaneous. 1848.
Board of Education, Miscellaneous. 1849.
Board of Education, Government. 1849
Board of Education, Elphinstone Institute. 1849.
Board of Education, Poona Sanscrit College. 1850.
Board of Education, Miscellaneous. 1851.
Board of Education, Poona College. 1852.
Board of Education, Poona College. 1853.
Board of Education, Elphinstone Institute. 1853.
Board of Education. 1854.
Board of Education, Poona College. 1854.
Government. 1854.
Book Depot. 1855.
Poona College. Vol. 8. 1855.
Miscellaneous, Vol. 19. 1855.
Government. 1856.

सार्वजनिक वाचन मंदिर
स्थापना: १८४८
१८१ बुधवार
पुणें २.

Government Vol. 5. 1856.
Government, Vol, 6. 1856.
Miscellaneous, Vol. 13. 1856.
Miscellaneous, Vol. 15. 1856.
Poona College, Vol. 18. 1856.
Poona College, Vol. 9. 1857.
Miscellaneous, Vol. 20. 1857.
Translation Department, Vol. 22. 1857.
Poona College, Vol. 8. 1858.
Poona College, Vol. 16. 1858.
Poona College, Vol. 17. 1858.
Miscellaneous, Vol. 26. 1858.
Miscellaneous, Vol. 27. 1858.
Government, Vol. 28. 1858.
Miscellaneous, Vol. 32. 1858.
Government, Vol. 7. 1859.
Book Depot, Vol. 22. 1859.
Government, Vol 27. 1859.
Translation Department, Vol. 18. 1860.
Translation Department, Vol. 19. 1861.
Book Depot. Vol. 18. 1861-62.
Duxina Fund, Vol. 22. 1861-62.
Miscellaneous, Vol. 23. 1861-62.
Duxina Fund, Vol. 15. 1862.
Translation Department, Vol. 14. 1862-63.
Duxina Fund, Vol, 15. 1862-63.
Miscellaneous, Vol. 17. 1862-63.
Translation Department, Vol. 16. 1863-64.
Duxina Fund, Vol. 17. 1863-64.
Book Depot, Vol. 18. 1863-64.
Miscellaneous, Vol. 19. 1863-64.
Translation Department, Vol. 17. 1864-65.
Book Depot, Vol. 20. 1864-65.
Miscellaneous, Vol. 22. 1864-65.
Miscellaneous, Vol. 22. 1865-66.
Book Depot, Vol. 14. 1867-68.

Duxina Fund, Vol. 15. 1867–68.
Translation Department, Vol. 28. 1869–70.
Translation Department, Vol. 28. 1870–71.
Book Depot, Vol. 25. 1870–71.
Government, Vol. 1. 1871–72.
Book Depot, Vol. 13. 1873.
Government, Vol. 23. 1873.
Book Depot, Vol. XL. 1873–74.
Book Depot, Vol. 27. 1874–75.
Book Depot, Vol. 31. 1875–76.
Translation Department, Vol. 37. 1876–77.
Government, Vol. 29. 1887.
Government, Vol. 38. 1888.
Book Depot, Vol. 55. 1889–90.
Book Depot, Vol. 59. 1894–95.

(ब) मुंबई सरकारचा मुंबई येथील दप्तरखाना

G. D. Vol. 10. 1821.
G. D. Vol. 2. 1821–23.
G. D. Vol. $\frac{50}{55.}$ *1823.*
G. D. Vol. $\frac{15}{73.}$ *1824.*
G. D. Vol. 63. 1824.
G. D. Vol. 101. 1825.
G. D. Vol. 149. 1827.
G. D. Vol. 171. 1828.
G. D. Vol. $\frac{10}{163.}$ *1828.*
G. D. Vol. $\frac{6}{203.}$ *1830.*
G. D. Vol. 232. 1831.
G. D. Vol. 237. 1831.
G. D. Vol. 285. 1833.
G. D. Vol. $\frac{12}{327.}$ *1835.*
G. D. Vol. $\frac{10}{342.}$ *1836.*

G. D. Vol. $\frac{22}{354.}$ *1836.*

G. D. Vol. $\frac{44}{414.}$ *1837.*

G. D. Vol. $\frac{28}{455.}$ *1838.*

G. D. Vol. 530. 1840.

G. D. Vol. 540. 1840.

G. D. Vol. $\frac{12}{529.}$ *1840.*

G. D. Vol, 586. 1841.

G. D. Vol. $\frac{23}{594.}$ *1841.*

G. D. Vol. $\frac{30}{655.}$ *1842.*

G. D. Vol. $\frac{24\ A}{749\ A.}$ *1843.*

G. D. Vol. $\frac{41}{766.}$ *1843.*

G. D. Vol. $\frac{29}{934.}$ *1845.*

G. D. Vol. 24. 1847.

G. D. Vol. 64. 1849.

२ मुद्रित साधनें (इंग्रजी)

(अ) नियतकालिकें, वार्षिक वृत्तांत इ.

Asiatic Journal, Register, Vol. 9. 1809.

Asiatic Journal and Monthly Register, Vol. 1. 1816. Vol. 5. 1818. Vol. 6. 1818. Vol. 7. 1819. Vol. 10. 1820. Vol. 11. 1821. Vol. 13. 1822. Vol. 22. 1826.

Asiatic Journal and Monthly Register, New Series, Vol. 3. 1830. Vol. 6. 1831. Vol. 21. 1836.

Board of Education, Report No. 5. 1845. Report No. 7. 1850. Report No. 8. 1851. Report No. 9. 1851. Report. 10. 1852. Report. No. 13. 1855.

Bombay Auxiliary Religious Tract Society, Report No. 2. 1829.

Bombay Educational Record, Vol. 4. 1868. Vol. 5. 1869. Vol. 7. 1871. Vol. 8. 1872. Vol. 9. 1873. Vol. 30. 1894.

Bombay Gazette, Vol. 12. 1852.

Bombay Native School-book and School Society, Report No. I. 1824. Report No. 2. 1825. Report No. 3. 1827.

Bombay Native Education Society, Report No. 4. 1828. Report No. 5. 1829. Report No. 7. 1833. Report No. 9. 1837. Report No. 10. 1838.

Bombay Quarterly Review, Vol. 1. 1855.

Bombay Times and Journal of Commerce, Vol. 3. 1852. Vol. 4.1853.

Bombay Tract and Book Society, Report No. 6. 1834. Report No. 12. 1840.

Calcutta School-book Society, Report No. 1. 1818.

Catalogue of the Marathi Manuscripts in the India Office Library, Oxford. 1950.

Director of Public Instruction, Bombay, Reports for the year 1856-57. 1857-58. 1858-59. 1859-60. 1861-62. 1865-66. 1866-67.

Elphinstone School Paper, Vol. 2. 1861. Vol. 3. 1862. Vol. 4. 1863. Vol. 5. 1864.

Journal of East India Association, Report for the year 1867-68.

Journal of the Royal Asiatic Society of Great Britian and Ireland, Vol. 7. 1843.

Native Opinion, Vol. 6. 1869. Vol. 20. 1883.

Oriental Christian Spectator, Vol. 2. 1831. Vol. 5. 1834. Vol. 7. 1836. Vol. 13. 1842. Vol. 14. 1843. Vol. 17. 1846. Vol. 19. 1848. Vol. 22. 1851. Vol. 24. 1853.

Report of the Committee appointed to examine the text-books in use in Indian Schools. 1878.

Report of the United Institution of Elphinstone College and Schools of Native Society. Bombay. 1839.

Report of the Society for promoting Education of the poor within the Government of Bombay, Report No. 10. 1825. Report No. 24. 1838.

Report on the Vernacular Reading Books in the Bombay Presidency. Bombay. 1906.

Students' Miscellany, Bombay. Vol. I 1851.

The Times, March, 24. 1884.

(ब) संदर्भग्रंथ (इंग्रजी)

Adam, W., *Reports on the State of Education in Bengal*, 1835 & 1838. Calcutta. 1941.

Abbott, J. E., *A Catalogue of Marathi Christian Literature During Eighty years*, 1813–1892. Bombay. 1892.

Bruce, H., *The Literary work of the American Marathi Mission*, (1813–1881). Bombay. 1882.

Colebrooke, T. E., *Life of M. S. Elphinstone*. London. 1884.

Forest, G. W., *Official Writings of M. S. Elphinstone*. London. 1884.

Hazen, W., *A Century in India* (American Marathi Mission (1813–1913). Bombay 1913.

Jervis, W. P., *Thomas Best Jervis, A Centenary Tribute*. London. 1898.

Jesperson, Otto, *Language*. London. 1947.

Marcet, (Mrs.) *Conversations on Natural Philosophy*. London. 1820.

Marshman, John, *The Life and Times of Carey, Marshman and Ward*. London. 1859.

Mavor, W., *The English Spelling Book*. London. year of publication?

Mitchell, M., *In Western India*. Edinburg. 1899.

Smith, G., *The Life of William Carey*. London. 1885.

Matriculation Examination Papers. 1859–1866. Bombay. 1867.

Memorial Papers of American Marathi Mission (1813–1881). Bombay. 1882.

The Selections From Educational Records, Vol. 1.

The College of Fort William in Bengal. London. 1805.

३ हस्तलिखितें (मराठी)

किताब गाइच्या देवीची उत्पत्ती व गुण त्याचा तपसील. १८१२.

गिरिधर स्वामीकृत **व्याकर्ण.**

निरंजन माधव, **वाक्यसुधाटीका.**

शिवराम अकोल सामवासीकृत **अष्टावक्र गद्यटीका.** लेखनकाल, १७७१.

शेवकबोधनी. १८२५.

श्री. अ. का. प्रियोळकर यांच्या संग्रहांतील एक बाड.

४ नियतकालिकें (मराठी)

इंदुप्रकाश, पु. २२, १८८३, पु. २३, १८८४, पु. २४, १८८५,
पु. २५, १८८६. पु. २९, १८९०, पु. ३०, १८९१,
पु. ३४, १८९५.
दर्पण, पु. १, १८३२.
दंभहारक, पु. १, १८७२.
दिग्दर्शन, पु. १, १८४०.
निबंधमाला, अं. १०, ऑक्टोबर, १८७४.
अं. २७, मार्च, १८७६.
पुणें पाठशाळापत्रक, पु. १, १८६१.
प्रभाकर, पु. २, १८४२.
बालबोध, पु. ३०, १९११.
भारत इतिहास संशोधन ग्रंथमाला, पु. ४, शके १८३४.
मराठी शाळापत्रक, पु. ३, १८६३, पु. ५, १८६५, पु. १५, १८७५,
मराठी ज्ञानप्रसारक, पु. ८, १८५७, पु. ११, १८६०, पु. १२, १८६१,
पु. १३, १८६२.
विविधज्ञानविस्तार, पु. १, १८६८, पु. २, १८६९, पु. ३, १८७०,
पु. ४, १८७१, पु. ५, १८७२, पु. ८, १८७६,
पु. २१, १८८९, पु. २२, १८९०, पु. ३१, १९००,
पु. ३६, १९०५.
शाळापत्रक, पु. ४, १८९३, पु. ७, १८९६, पु. ८, १८९७,
पु. ९, १८९८, पु. ११, १९००.
ज्ञानोदय, पु. ५, १८४६, पु. ९, १८५०, पु. १०, १८५१,
पु. ११, १८५२, पु. १२, १८५३, पु. १३, १८५४,
पु. १४, १८५५, पु. १६, १८५७, पु. २०, १८६१,
पु. ३१, १८७२, पु. ३६, १८७७.

५ इतर संदर्भग्रंथ (मराठी)

गुंजीकर, रामचंद्र भिकाजी, **सरस्वती मंडळ.** मुंबई. १८८४.
गोडबोले, परशुराम बल्लाळ, **नवनीत.** पुणें. १८५४.
गोडबोले, परशुराम बल्लाळ, **नवनीत.** नवी आवृत्ति. मुंबई. १८७८.

गोडबोले, परशुराम बल्लाळ, **नवनीत. भाग २ रा.** पुणें. १८६३.
चिपळूणकर, विष्णु कृष्ण, **कैलासवासी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या किरकोळ लेखांचा संग्रह, भाग १ ला.** मुंबई. १८९६.
चिपळूणकर, विष्णु कृष्ण, **निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या किरकोळ लेखांचा संग्रह, भाग २ रा.** मुंबई. १९०२.
जांभेकर, गणेश गंगाधर, **बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांचें जीवनवृत्त व लेखसंग्रह.** पुणें १९५०.
जोशी, गोविंद बाबाजी, **माझे प्रवासाची हकिकत** (योजनिशी). बडोदें. १८९६.
जोशी, नारायण विष्णु, **पुणें शहरचें वर्णन.** मुंबई. १८६८.
टिळक, बाळ गंगाधर, **लो. टिळकांचे केसरींतील लेख–भाग ४ था.** पुणें. १९३०.
देशमुख, गोपाळ हरी, **निबंधसंग्रह–प्रथमांश.** अहमदनगर. १८६६.
पदमनजी, बाबा, **अरुणोदय.** मुंबई. १८८८.
प्रियोळकर, अनंत काकबा, **रावबहादूर दादोबा पांडुरंग** (आत्मचरित्र, चरित्र). मुंबई. १९४७.
माडगांवकर, गोविंद नारायण, **मुंबईचें वर्णन.** मुंबई. १८६३.
मोडक, रामकृष्ण वि., **अमेरिकन मराठी मिशन यासंबंधीं मंडळ्यांची संक्षिप्त बखर.** पुणें. १८८३.
मुजुमदार, शंकर बापूजी, **महाराष्ट्रीय नाटककार यांचीं चरित्रें.** पुणें.
(ऑगस्ट १९०७ ते सप्टेंबर १९१२ पर्यंत रंगभूमि मासिकांत प्रसिद्ध झालेलीं)
राजवाडे, विश्वनाथ काशीनाथ, **मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, १७५० पासून १७६१ पर्यंत, खंड १.** वाई. १८९८.
राजवाडे, विश्वनाथ काशीनाथ, **संकीर्ण लेखसंग्रह.** (ग्रंथमालेंतील)
रामचंद्र हरि, **हरि केशवजी यांचें चरित्र.** मुंबई १९११.
वॉकर, बेंजामिन सिमियन, **काव्यदोषविवेचन.** मुंबई. १८८३.
विल्सन्, जॉन, **वाक्यावळी, इंग्रेजी आणि मराठी.** आ. ४. मुंबई. १८६०.
हवालदार, गणेश रामकृष्ण, **रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचें चरित्र, भाग १ ला.** मुंबई. १९२७.
ग्रंथांचीं भाषांतरें किंवा नवीन ग्रंथ करणारांस बक्षिसाविषयींचें प्रसिद्धिपत्र. मुंबई. १८२५.
पेशवे दप्तरांतील निवडलेले कागदपत्र. पु. २२, ४२, ४३.

६ शालेय वाङ्मय (मराठी आणि इंग्रजी)

(क) व्याकरण-व्युत्पत्तिशास्त्र

अठल्ये, जनार्दन हरि, **शब्दसिद्धि निबंध.** (साहा. विनायकशास्त्री आगाशे) आ. २. मुंबई. १८६८.

कॅरे, डब्ल्यू., *A Grammar of the Mahratta Language.* Serampore. 1805

गुंजीकर, रामचंद्र भिकाजी, **लहान मुलांकरितां सुबोध व्याकरण.** मुंबई. १८८६.

गुंजीकर, रामचंद्र भिकाजी, **महाराष्ट्रभाषेची लेखनशुद्धि.** आ. २. मुंबई. १८७८.

गोडबोले, विनायक वासुदेव, **शब्दसिद्धि निबंध.** (साहा. भास्कर अनंत ताम्हनकर) मुंबई. १८७८.

गोडबोले, कृष्णशास्त्री, **मराठी भाषेचें नवीन व्याकरण.** मुंबई. १८६७.

गोडबोले, कृष्णशास्त्री, **मराठी भाषेचें नवीन व्याकरण.** आ. २. मुंबई. १८७४.

गोडबोले, रावजी सदाशिवशास्त्री, **मराठी भाषेचें मध्यम व्याकरण.** रत्नागिरी. १८९७.

चिपळूणकर, कृष्णशास्त्री, **कै. कृष्णशास्त्री चिपळूणकरकृत मराठी व्याकरणावरील निबंध.** (सं. रामचंद्र भिकाजी जोशी) पुणें १८९३.

जांभेकर, बाळ गंगाधर, **बाल व्याकरण.** आ. ३. मुंबई. १८३८.

तर्खडकर, दादोबा पांडुरंग, **मराठी भाषेचें व्याकरण.** मुंबई. १८३६.

तर्खडकर, दादोबा पांडुरंग, **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.** आ. २. मुंबई. १८५०.

" " " **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.** आ. ३. मुंबई. १८५७.

" " " **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.** आ. ७. मुंबई. १८७९.

" " " **मोठ्या महाराष्ट्र व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीची पूरणिका.** मुंबई. १८८१.

" " " **लघु व्याकरण.** मुंबई. १८६५.

दामले, मोरो केशव, **शास्त्रीय मराठी व्याकरण.** आ. २. मुंबई. १९२५.

दिवेकर, विनायकशास्त्री, **शब्दसिद्धि निबंध.** (साहा. गोविंद विठ्ठल महाजन) मुंबई. १८४३.

फडके, गंगाधरशास्त्री, **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.** मुंबई. १८३६.

" " **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.** आ. ३. मुंबई. १८४९.

बापट, गोविंद शंकरशास्त्री, **व्युत्पत्तिप्रदीप.** आ. २. मुंबई. १८८६.

बेल्लर्स, एच्. एस्. के., *A Grammar of the Marathi Language.* मुं. १८६८.

मखबा, महंमद इब्राहीम, *A Grammar of the Mahratha Language.* Bombay. 1825.

टिळक, गंगाधर रामचंद्र, **लघु व्याकरण.** रत्नागिरी. १८५८.

" " " **लघु व्याकरण.** आ. २. रत्नागिरी. १८५९.

स्टीव्हन्सन, जे., *The Principles of Marathi Grammar.* Calcutta. 1833

स्टीव्हन्सन, जे., *The Principles of Marathi Grammar. 3rd. edi.* Bombay. 1854

The Student's Manual of Marathi Grammar. Bombay. 1868.

The Hand-book of Marathi Grammar. Bombay. 1872.

(ख) कोश

आठले, भिकदेव वासुदेव, *A Marathi-English Dictionary.* मुंबई. १८७१.

कॅंडी, टी., *A Dictionary, English and Marathi.* मुंबई. १८४७.

कॅंडी, टी., *A Dictionary, English and Marathi.* मुंबई. १८७३.

कॅरे, डब्ल्यू., *A Dictionary of the Maharatta Language.* श्रीरामपूर. १८१०

केनेडी, व्हॅन्स, *A Dictionary of the Maratha Language in two parts.* मुंबई. १८२४.

गोडबोले, रघुनाथ भास्कर, **हंसकोश.** पुणें. १८६३.

तळेकर, श्रीकृष्ण रघुनाथशास्त्री, **इंग्लिश आणि मराठी कोश.** मुंबई. १८६१.

पदमनजी, बाबा, *A Compendium of Molesworth's Marathi and English Dictionary.* मुंबई. १८६३.

पदमनजी, बाबा, *A Comprehensive Dictionary, English and Marathi.* नवी आवृत्ति. मुंबई. १८७०.

पंडित, विष्णु परशुराम, **इंग्रेजी आणि मराठी कोश.** मुंबई. १८६४.

पंडितमंडळ, **महाराष्ट्र भाषेचा कोश, भाग १ ला.** मुंबई. १८२९.

पंडितमंडळ, **महाराष्ट्र भाषेचा कोश, भाग २ रा.** मुंबई. १८२९.

पंडितमंडळ, **महाराष्ट्र भाषेचे कोशाची पुरवणी.** पुणें. १८३१.

बीडकर, बाळकृष्ण मल्हार, **रत्नकोश.** मुंबई. १८६९.

मोल्स्वर्थ, जे. टी., *A Dictionary, Murathee and English.* मुंबई. १८३१.

मोल्स्वर्थ जे. टी., *A Dictionary, Marathi and English.* आ. २. मुं. १८५७.

(ग) इतिहास-चरित्रें

ओक, नरसिंह विनायकशास्त्री, **हिंदुस्थानाचा इतिहास.** भाग २ रा. मुंबई. १८६०.

ओक, विनायक कोंडदेव, **हिंदुस्थानकथारस.** मुंबई. १८७१.

ओक, विनायक कोंडदेव, **हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास.** आ. २.मुंबई. १८७०.
ओक, विनायक कोंडदेव, **हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास.** आ. ७. मुंबई. १८८५.
काणे, शिवराम भास्कर, **हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास.**आ.२. रत्नागिरी.१८६९.
कीर्तने, नीळकंठ जनार्दन, **ग्रांट डफ्कृत मराठ्यांच्या बखरीवर टीका.** मुंबई. १८६८.
केपन, डेव्हिड, **बखर मराठ्यांची.** मुंबई. १८३०.
केपन, डेव्हिड, **बखर मराठ्यांची. पूर्वार्ध.** आ. २. पुणें. १८४६.
गाडगीळ, हरी रघुनाथ, **जगाचा संक्षिप्त इतिहास. भाग १ ला.** मुंबई. १८५२.
गाडगीळ, हरी रघुनाथ, **जगाचा संक्षिप्त इतिहास. भाग २ रा.** मुंबई. १८५७.
गोडबोले, रावजी सदाशिव, **महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास.** मुंबई. १८७६.
चिपळोणकर, कृष्णशास्त्री, **साक्रेटीस ह्याचें चरित्र.** पुणें. १८५२.
जांभेकर, बाळ गंगाधरशास्त्री, **हिंदुस्थानाचा इतिहास.** मुंबई. १८४६.
जांभेकर, बाळ गंगाधरशास्त्री, **हिंदुस्थानाचा इतिहास.** आ.२. पुणें. १८५५.
जांभेकर, बाळ गंगाधरशास्त्री, **हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास.** मुंबई. १८४९.
ट्रान्स्लेशन एक्झिबिशनर्स, **हिंदुस्थानाचा इतिहास.** मुंबई. १८६१.
दात्ये, रघुनाथशास्त्री, **शालिवाहन चरित्र.** मुंबई. १८४०.
नाना नारायण, **इंग्लंड देशाचें वर्णन.** मुंबई. १८३८.
पंडित, विष्णु परशुराम, **हिंदुस्थानचा इतिहास.** मुंबई. १८६१.
पाठारे, हरि केशवजी, **इंग्लंडाचा वृत्तांत.** मुंबई. १८३८.
मंडलिक, विश्वनाथ नारायण, **हिंदुस्थानाचा इतिहास. भाग १ ला.** मुं. १८६१.
मंडलिक, विश्वनाथ नारायण, **हिंदुस्थानाचा इतिहास. भाग २ रा.** मुं. १८६१.
मंडलिक, विश्वनाथ नारायण, **हिंदुस्थानाचा इतिहास. उपोद्घात.** मुंबई.१८६२.
लिमये, कुशाबा, **महाराष्ट्र देशाचें वर्णन, आणि इतिहास, यांचा प्रश्नोत्तरावलिरूप ग्रंथ.** पुणें. १८४०.
लेले, गणेश सदाशिव, **कपतान कूक साहेब ह्याचे जलपर्यटनाचा वृत्तांत.** पुणें. १८५३.
विल्सन (मडम), **आशूरी आणि बाबेली लोकांचें वृत्तांतकथन.** आ. २. मुंबई. १८३८.
विल्सन (मडम), **ग्रेकी लोकांचें वृत्तांतकथन.** आ. २. मुंबई. १८३८.
विल्सन (मडम), **प्राचीन मिस्त्री लोकांचें वृत्तांतकथन.** आ. २. मुंबई. १८३९.

विल्सन (मडम), **मेदीं आणि पार्शी लोकांचें वृत्तांतकथन.** आ. २. मुंबई. १८३८.

इंग्लंड देशाची बखर–भाग १ ला. मुंबई. १८३२.

इंग्लंड देशाची बखर–भाग २ रा. मुंबई. १८३४.

हिंदुस्थानाचा इतिहास. मुंबई. १८६९.

(घ) भूगोल

कँडी, टॉमस, **हिंदुस्थानाचें वर्णन.** मुंबई. १८६०.

कँडी, टॉमस, **भूगोलाचें वर्णन–भाग १ ला.** मुंबई. १८६३.

गोडबोले, परशुराम बल्लाळ, **संक्षिप्त भूगोलवर्णन.** आ. २. मुंबई. १८६६.

जांभेकर, बाळ गंगाधर, **भूगोलविद्या.** आ. २. मुंबई. १८४६.

" " " **भूगोलशास्त्र–गणित भाग.** मुंबई. १८३६.

जोशी, बापू पुरुषोत्तम, **हिंदुस्थानाचा भूगोल.** आ. ३. पुणें. १८६९.

तर्खडकर, दादोबा पांडुरंग व नाना नारायण, **मराठी नकाशाचें पुस्तक.** मुंबई. १८३६

पटवर्धन, सीताराम विश्वनाथ, **भूगोलविद्येचीं मूलतत्त्वें–भाग १ ला.** मुंबई. १८७५

पटवर्धन, सीताराम विश्वनाथ, **भूगोलविद्येचीं मूलतत्त्वें–भाग २ रा.** मुंबई. १८७५.

पटवर्धन, सीताराम विश्वनाथ, **भूगोलविद्येचीं मूलतत्त्वें–भाग ३ रा.** आ. ४. मुंबई. १८८३.

पुराणिक, महादेवशास्त्री, **भूगोलखगोल म्हणजे भूगोल विद्येचीं आणि खगोलं विद्येचीं मूलतत्त्वें.** मुंबई. १८५४.

भूगोल आणि खगोल इत्यादिविषयक संवाद. आ. २. पुणें. १८४१.

भूगोल एवं ज्योतिष इत्यादिविषयक कथोपकथन. आ. २. कलकत्ता. १८२७.

८०५२

(ङ) गणित

छत्रे, केरो लक्ष्मण, **अंकगणित.** मुंबई. १८६०.

छत्रे, केरो लक्ष्मण, **अंकगणित–भाग १ ला.** मुंबई. १८८२.

छत्रे, केरो लक्ष्मण, **अंकगणित–भाग २ रा.** सुधारलेली चौथी आवृत्ति. मुंबई. १८९६.

जर्विस, जॉर्ज, **कर्तव्यभूमिति**. मुंबई. १८२६.
,, ,, **गणितकृति अथवा गणित मार्ग**. आ. २. मुंबई. १८२६.
,, ,, **गणित मार्ग–भाग २ रा**. मुंबई. १८२६.
,, ,, **गणित वहिवाटवहि आणि नाण्याचें तपासणीचें वर्तमान**. मुंबई. १८२८.
,, ,, **डमार्गन याचा अंकगणिताचा मूळपीठिका**. मुंबई. १८५०.
,, ,, **डमार्गन याचा बीजगणिताचा मूळपीठिका**. मुंबई. १८४८.
,, ,, **शिक्षामाला**–भाग पहिला. मुंबई. १८२८.
,, ,, ,, –भाग २ रा.
देवकुळे, मोरेश्वर रावजी, **महत्वमापन**. मुंबई. १८८४.
अंकगणित, दुसरा भाग. पुणें. १८४०.
महाराष्ट्र भाषेचें क्षेत्रफळ. मुंबई. १८३८.
सरळरेघ त्रिकोणमिति. पुणें. १८४५.

(च) शास्त्रीय विषय

चिपळोणकर, कृष्णशास्त्री, **अर्थशास्त्रपरिभाषा–प्रकरण पहिलें** पुणें. १८५५.
चिपळोणकर, कृष्णशास्त्री, **अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह**. मुंबई. १८६१.
छत्रे, केरो लक्ष्मण, **पदार्थविज्ञानशास्त्र**. आ. २. पुणें. १८५७.
जर्विस, जॉर्ज, **विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष या विषयांचे संवाद**. मुंबई. १८२९.
थेऊरकर, भाऊशास्त्री, **वाय्वावरण आणि त्यांतील चमत्कार**. मुंबई. १८५७.
दीक्षित, सखाराम रामचंद्र, **शास्त्रीय ज्ञानदर्शन**. मुंबई. १८५६.
भाटवडेकर, कृष्णशास्त्री, **वर्तमानवाहक विद्युद्यंत्र**. मुंबई. १८५९.
मॅक्लेनान, जॉन, **औषध कल्पना विधि**. मुंबई. १८२८.
मॅक्लेनान, जॉन, **शारीर**. मुंबई. १८५२.
माडगांवकर, गोविंद नारायण, **उद्भिज्जन्यपदार्थ**. मुंबई. १८५६.
माधवराव मोरोजी आणि नाना मोरोजी, **वाचण्याकरितां मराठी भाषेंत विद्योपक्रमाचा ग्रंथ**. मुंबई. १८४८.
पाठारे, हरि केशवजी, **सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद**. मुंबई १८३३.
पाठारे, हरि केशवजी, **रसायनशास्त्रविषयक संवाद**. मुंबई. १८३७.
पाठारे हरि केशवजी, **देशव्यवहारव्यवस्था या शास्त्राचीं मूलतत्त्वें**. मुंबई. १८५४.

फडके, गोविंद गंगाधर, **यंत्रशास्त्राचीं मूळें**. मुंबई. १८५३.
बेल, विलियम हेनरी, **शिल्पविद्या या विषयाचे निबंध**. मुंबई. १८३५.
सारसंग्रह. मुंबई. १८३१.

(छ) कथावाङ्मय

आळशी आणि दिवाळखोर यांस उपदेश. आ. २. पुणें. १८४०.
नवीन लघुहितोपदेश. आ. २. मुंबई. १८४७.
नीतिकथा. आ. ३. मुंबई. १८३८.
पंचोपाख्यान. मुंबई. १८२२.
बोधकथा. आ. २. पुणें. १८३१.
मराठी बोधवचनें. आ. ३. मुंबई. १८३१.
लघु हितोपदेश. आ. २. मुंबई. १८३८.
लोकाचें दुःख जाऊन सुख होण्याविषीं संभाषण. (मुखपृष्ठ गहाळ).
विदुरनीति. मुंबई. १८२३.
वेताळपंचविशी. मुंबई. १८७१.
सिंहासनबत्तिशी. मुंबई. १८२४.
कँडी, टॉमस, **नीतिज्ञानाची परिभाषा**. पुणें. १८४८.
गेस्फोर्ड, टी., **मराठी बाळमित्र-भाग २ रा**. मुंबई. १८३३.
गेस्फोर्ड, टी., **मराठी बाळमित्र-भाग २ रा**. मुंबई. १८५१.
गेस्फोर्ड, टी., **मराठी बाळमित्र-भाग २ रा**. मुंबई. १८९०.
छत्रे, सदाशिव काशीनाथ, **इसप नीतिकथा**. मुंबई. १८२८.
छत्रे, सदाशिव काशीनाथ, **इसपनीति कथा**. मुंबई. १८५१.
छत्रे, सदाशिव काशीनाथ, **बाळमित्र-भाग १ ला**. मुंबई. १८२८.
छत्रे, सदाशिव काशीनाथ, **बाळमित्र-भाग १ ला**. आ. नवी. पुणें. १८४९.
छत्रे, सदाशिव काशीनाथ, **बाळमित्र-भाग १ ला**. मुंबई. १८५९.
दुगल, रामचंद्र अमृत, **जागती जोत किंवा शेतपोत रीतभात यांविषयीं संवाद**. नासीक. १८३८.
देवळे, राघो नारायण, **वाटसराची गोष्ट**. नासीक. १८३८.
पाठारे, हरि केशवजी, **यात्रिक क्रमण**. मुंबई. १८४१.
पाठारे, हरि केशवजी, **चेंबर्सकृत शालोपयोगी नीतिग्रंथ याचें महाराष्ट्र भाषांतर**. मुंबई. १८४६.
फरार, मिसेस, **यात्रेकऱ्याचा वृत्तांत**. नासीक. १८३८.
बापट, विष्णुशास्त्री, **नीतिदर्पण**. आ. २. मुंबई. १८३७.
बापट, विष्णुशास्त्री, **बालोपदेशकथा**. आ. २. मुंबई. १८३८.
मंडलिक, विश्वनाथ नारायण, **सवयी आणि अभ्यास**. मुंबई. १८५७.

(ज) मराठी क्रमिक पुस्तकें

लहान मुलांकरितां दुसरें पुस्तक. मुंबई. १८५८.
वाचनपाठमाला. पुणें. १८५०.
शाळांतील मुलांकरितां तिसरें पुस्तक. आ. ४. मुंबई. १८६३.
शाळांतील मुलांकरितां तिसरें पुस्तक. आ. १३. मुंबई. १८९४.
शाळांतील मुलांकरितां चौथें पुस्तक. आ. ३. मुंबई. १८६१.
शाळांतील मुलांकरितां चौथें पुस्तक. आ. १४. मुंबई. १८९५.
शाळांतील मुलांकरितां पांचवें पुस्तक. मुंबई. १८६०.
शाळांतील मुलांकरितां पांचवें पुस्तक. आ. ३. मुंबई. १८६५.
शाळांतील मुलांकरितां पांचवें पुस्तक. आ. १४. मुंबई. १८९६.
शाळांतील मुलांकरितां पांचवें पुस्तक. आ. १५. मुंबई. १८९९.
शाळांतील मुलांकरितां सहावें पुस्तक. मुंबई. १८६१.
शाळांतील मुलांकरितां सहावें पुस्तक. आ. ८. मुंबई. १८९३.
पाळंदे, भास्कर दामोदर, लहान मुलांकरितां पहिलें पुस्तक–भाग २ रा. आ. २. मुंबई. १८६१.
ज्ञानबोधक–पुस्तक दुसरें. मुंबई. १८५२.

(झ) ख्रिस्ती शालोपयोगी वाङ्मय

आमचे धन्य उद्धरणाराचे चमत्कार. मुंबई. १८२६.
ईश्वरी विद्या. मुंबई. १८५७.
खगोल भूगोल इत्यादिक. मुंबई. १८३५.
खऱ्या धर्माचीं चिन्हें. मुंबई. १८९४.
देवाच्या दहा आज्ञा. आ. ४. प्रकाशनकाल ?
धर्माच्या मुख्य गोष्टी. बाणकोट. १८२७.
नवीन पंचोपाख्यान. नासीक. १८३७.
पदार्थविद्या, भाग पहिला. मुंबई. १८४६.
पहिला पोथी–ज्ञानोदय. प्रकाशनकाल ?
प्रथम अभ्यासक्रमवही. प्रकाशनकाल ?
प्रश्न आणि उत्तर. मुंबई. १८२३.
भूगोलविद्या–भाग २. मुंबई. १८७५.
मुलांकरितां दुसरें पुस्तक. आ. ५. मुंबई. १८७२.
लहान मुलांसाठीं प्रश्नोत्तरावली. प्रकाशनकाल ?

लैंकरांचीं पहिली पोथी. बाणकोट. १८२८.
लैंकरांची पहिली पोथी. मुंबई. १८३०.
लैंकरांची पहिली पोथी. मुंबई. १८३५.
लैंकरांची दुसरी पोथी. आ. २. मुंबई. १८४०.
शास्त्रांतील कांहीं गोष्टी. प्रकाशनकाल ?
शुभवर्तमान. मुंबई. १८२४.
स्त्रीकंठभूषण. मुंबई. १८६८.
हितोपदेशपोथी. मुंबई. १८१९.
हितोपदेशपोथी. मुंबई. १८३२.
ओक, विनायक कोंडो, **मराठी पहिलें पुस्तक, भाग २ रा.** मुंबई. १८७५.
ओक, विनायक कोंडो, **मराठी तिसरें पुस्तक** आ. २. मुंबई. १८८६.
कँडी, टॉमस, **खरा मार्ग कोणता याचा विचार.** १८३०.
कँडी, टॉमस, **भाव कोणावर ठेवावा याचा विचार.** मुंबई. १८२९.
कँडी, टॉमस, **येशू ख्रीस्तानें जी प्रार्थना आपल्या शिष्यांस सांगितली तिजवर टीका.** १८३६.
कँडी, मिसेस, **मुलांसाठीं बोधाच्या गोष्टी.** मुंबई. १८३३.
कोलबर्न, वॉरन, **मनोकृतगणित.** मुंबई. १८४०.
पदमनजी, बाबा, **महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास.** मुंबई. १८६६.
फरार, मिसेस, **बाळबोध गोष्टी.** आ. ३. पुणें. १८५१.
फरार, मिसेस, **यात्रेकऱ्याचा वृत्तांत.** नासीक. १८३८.
फरार, मिसेस, **हेनरी आणि त्याचा संभाळणारा गडी संभू ह्यांची गोष्ट.** नासीक. १८३५.
ब्रूस, हेनरी, **लहान मुलांकरितां गणित.** मुंबई. १८८०.
मोडक, रामकृष्णपंत, **वाचनपाठावलि.** मुंबई. १८८४.
मोल्स्वर्थ, जे., **पापपीडितांस शांति.** मुंबई. १८२८.
ह्यूम, आर., **पशुज्ञानप्रकाश.** मुंबई. १८५१.

पुणें नगर वाचन मंदिर, पुणें २.

वर्ग.....क्रमांक.....

दर्शिका

अंकगणित (छत्रे), २३०, २३३.
अंकगणित-पूर्णांक (जर्विस), २२४.
अंकगणित-अपूर्णांक (जर्विस), २२४.
अंकगणित (पोतदार), २३१.
ॲडॅम, विल्यम, २६.
अनेकविद्या-मूलतत्त्व-संग्रह, २५७, २५८.
ॲबट, रे., ३२०, ३२२, ३३३, ३३६, ३३७, ३३८.
अभिज्ञान शाकुंतल, १८०, ३९०.
अमेरिकन मराठी मिशन, ३२०, ३२९, ३३०, ३३३.
अरुणोदय, १६१, १७५.
अर्थशास्त्रपरिभाषा, २६४, २६५, २६६.
अर्वाचीन बखर (पवार), २९७.
ॲलन, डॉ., ३३०, ३३४.
अविरोधप्रकाश, १७५.
आइटकीन, १८६.
ऑक्लंड, ४७.
आगाशे, विनायकशास्त्री, ११३.
आठल्ये, जनार्दन हरी, ११३,
आठल्ये, भास्कर बापूजी, १०९.
आठल्ये, भिकदेव वासुदेव, १३३.
आदिकरण भूमिति, ३९, ४३, २३३, २३७.
आपटे, नानाशास्त्री, ५४, ६५, २३८, २५६, २९१, ३४६, ३४८, ३५०, ३५७, ३६३, ३६८ ३७२.
आपटे, भास्कर बल्लाळ, १३६.
आपटे, वामन शिवराम, १९७.
आमचे धन्य उद्धरणाराचे चमत्कार, ३२८.
आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी, १८२.
आशूरी आणि बाबेली लोकांचें वृत्तांतकथन, २९२, २९३, ३३६.
आळशी आणि दिवाळखोर यांस उपदेश, १६३, १६४.
इंग्रेजी आणि मराठी कोश (पंडित), १३३, १३४.
इंग्लंड देशाची बखर, ४६, २७६, २७७, २७८, २८०, २८१.

इंग्लंड देशाचें वर्णन, ४६, ४७, २२९, २७८, २७९, २८०.
इंग्लंडचा प्रश्नोत्तर इतिहास, २९८.
इंग्लंडाचा प्रश्नोत्तररूप संक्षिप्त इतिहास, २९६.
इंग्लंडाचा वृत्तांत, ४६, ४७, २४८, २८०, २८१.
इंग्लिश आणि मराठी कोश (तळेकर), १३२, १३३.
इंग्लिश स्पेलिंग बुक, ३२४.
इंजिनिअरिंग इन्स्टिस्टयूट, ४३, ४४. २१९.
इझडेल, ४८, १७६, २०९, २४९, २७५.
इंदुप्रकाश, ७०, ७१, १०८, १४३, २००, २०१, २३२, २४४, २५१, २५२, २७०.
इसप नीतिकथा, २५, ३६, ३९, ४७, ४९, ५३, १५०, १५१–१५३, १५९, १६०, १७४, २११, २२९.
ईस्ट इंडिया कंपनी, ११, १२, १३, १५, १९, २०.
ईश्वरीविद्या, ३३७.
ईस्टवुइक, प्रो. १३.
उत्तररामचरित्र, २००, २१२.
उद्भिज्जन्यपदार्थ, २५९, २६०, २६१, २६२.
उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा, ७१–७३, १७७, २४९.
एल्फिन्स्टन, मा. स्तु., ४९, १२१, १२७, १५०, २८१, २८३, २८६, २८७, ३३३, ३८७ शिक्षणाविषयक धोरण, १, ३, ४, १६, १७, १८, १९, २०, २१, २३, २४, २६, २९, ११५, १३७, २२७, शालेय पुस्तकांसंबंधीं विचार, ३१, ३२, ३७, छापखान्यासंबंधीं विचार, ३२, ३३.
एल्फिन्स्टन स्कूल पेपर, ६५, १८६, ३६२, ३८२.
ओक, नरसिंह विनायक, ५४, २८६.
ओक, लालजी रघुनाथ, ३२९.
ओक, विनायक कोंडदेव, ५५, १५६, १९३, २०४, २१७, २४९, २९०.
ओरिएन्टल खिश्चन स्पेक्टेटर, ७८, १२६, १३८, १४०, १४१, १७२, ३३६, ३९५.
ओलेंबार, प्रो., २७, ४८, २३२, २९४, २९५.
औषध कल्पना विधि, ४४, २५८.
कँडी, टॉमस, मे., २२, २८, ४८, ७९, ८०, ८३, ८४, १११, १३३, १४८, १६७, १७१, १८२, १८३, १८४, २०३, २३४, २३५, २४४,

२५०, २५१, २५२, २५३, २५४, २५६, २५७, २५८, २५९, २६०, २६१, २६२, २६७, २७०, २७६, २७८, २८६, २९६, २९७, २९८, २९९, ३००, ३०३, ३०४, ३१५, ३१६, ३१७, ३१८, ३३१, ३८७, ३८८, ३८९, ३९०, ३९१, ३९३, ३९४, ३९५, ३९६, **इसप नीतिकथा**, १५१–१५३, **इंग्रजी-मराठी कोश**, १२९–१३०, उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा, ७१–७३, ओक वि. कों., ५५, २०४, २९०, ३३२, चरित्र, २१३-२१८, क्रमिक वाचन पुस्तकें, ५५-५९, १८६–२०२, २१६, खिस्ती वाङ्मय, २१७-२१८, ३२१, ३३०, ३३८, गुंजीकर, रा. भि. १०६–१०८, १८०, १८१, ३६६, गोडबोले, प. ब., १८१, २०९–२१२, २९९, चिपळूणकर, कृ., १८२, २५८, २६४, २६५, २९५, ३५०, ३५७, ३६३, ३६४, छत्रे, के. ल., २३०, २३८, जर्विस, जॉ., २२४-२२६, जांभेकर, बा., २८१-२८५, ३६९, टिळक, गं., ९९-१०२, तर्खडकर, दा., ८७-९६, ३०६-३०८, ३४२-३४४, ३५६-३५७, ३९०, दक्षिणा प्राइझ कमिटी, ६४-६६, १०५, १०९-११०, १३१, २३७, २९१, दाक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी, ६९-७०, **नवनीत**, २०६, २०७, **नीतिबोधकथा**, १४९, १५०, **नीतिज्ञानाची परिभाषा**, १७६, **बाळमित्र**, १५४-१५९, ३१२, ३८९, **भूगोल**, ३११-३१४, **मराठी-इंग्रजी कोश** १२७-१२८, मराठी ट्रॅन्स्लेटर, ५२, ५३, ५४, १७५, १७६, ३४०, ३४१, महाजन, भाऊ, १३४–१३५, ३४४-३४६, मंडलिक, वि. ना., १७७-१८०, २८८–२८९, **विविधज्ञानविस्तार**, ३७४-३८६, **ज्ञानप्रसारक**, ३४६-३५६, ३५९–३६०, ३६१-३७४.

कपतान कूकसाहेब ह्याचे जलपर्यटनाचा वृत्तांत, ६२, २९६.

कर्तव्यभूमिति, ३९, ४३, २२१, २२८, २३६.

कॅरे, विल्यम, १०, १४-१५, १६, ४५, ७४-७५,७६, ७७, ७८, ११५, ११६, १२३, १२४.

कलकत्ता स्कूलबुक सोसायटी, २६-२७, ३३, ३४, ३५, ३०४.

कवितादर्पण, १३६.

कवितारूप मराठ्यांचा संक्षिप्त इतिहास, २९९.

कॅसिडी, रे., ६६.

काउपर, कॅ., २१५.

काणे, शिवराम भास्कर, २९०.

कादंबरीसार-पूर्वार्ध, १८१, २१२.

कान्हेरे, गणेश बल्लाळ, १०९.

कॉब, रे., २३.

काव्यदोषविवेचन, २००.
काळे, कृष्णाजी प्रभाकर, २९६.
काळे, सखारामशास्त्री, ८४.
किताब गाईच्या देवीची उत्पत्ती व गुण त्याचा तपसील, ८.
कीर्तने, नीळकंठ जनार्दन, २७५.
कीर्तने, विनायक जनार्दन २९७.
कीर्तिकर, कृष्णराव सुंदरजी, १६१.
कीर्तिकर, विनायक वासुदेव, १८६.
कुरीअर, ३१, ३२.
कृष्णनाथ काशीनाथजी, १५०, १५१.
केनेडी, व्हॅन्स, ४, ७६, ११६, ११७-११८, १२१, १२२, १२३, १२४, १२५, १४६, २५३, २६६.
केपन, कॅ, ४६, ११६, २७३, २७४.
केळकर, गोपाळ जिवाजी, १०९.
कोल्हटकर, महादेवशास्त्री, ७१, ८४.
क्रमवंत, जगन्नाथशास्त्री, ४६, ८१, ११९, १२१, २२०, २२३, २२७, २३६, २३९, २४०, ३८८.
क्रमिक वाचन पुस्तकें, ५५–५९, १८६–२०२, २१६.
खगोल भूगोल इत्यादिक, ३२०, ३३४, ३३५.
खगोलविद्या, ३३५.
खरा धर्म, २१७.
खरा मार्ग कोणता याचा विचार, २१७, ३३०.
खऱ्या धर्माचीं चिन्हें, २१७, ३३०.
खिश्चन व्हर्नॅक्युलर एज्युकेशन सोसायटी, ३३१.
खेर, आप्पाजी काशीनाथ, ८०.
गणितकृति अथवा गणितमार्ग, २२१.
गाडगीळ, हरी रघुनाथ, ६२, २९१, २९२.
गिलख्राइस्ट, बोर्थविक, २१३, ३८६.
गुजरात व्हर्नॅक्युलर सोसायटी, २०७.
गुजराती पाठ्यपुस्तकें, २०२–२०३.
गुजराती भाषा व नवनीत, २०७.
गुजराथ देशाचा इतिहास, ६९.
गुंजीकर, रामचंद्र भिकाजी, ५५, १०६-१०८, १५९, १८०, १८१, ३५८, ३६६, ३६७.
गेल्या तीस वर्षांपूर्वीचे लोक व त्यांच्या समजुती अथवा माझे प्रवासाची हकिकत, १४२.
गेस्फोर्ड, टी., १५६, ३८९.

गोखले, विश्वनाथ महादेव, २९९.
गोखले, शंकरशास्त्री, ६२.
गोडबोले, कृष्णशास्त्री, ८०, ९७, १०४, १०५, १०६, १०९, ३५७, ३५८.
गोडबोले, परशुराम बल्लाळ, ५८, ७८, ९६, ९९, १००, १०९, ११३, ११९, १६७, १८१, १९२, १९९, २०४, २०५, २०६, २०७, २०८–२१३, २७४, २८६, २९९, ३१४.
गोडबोले, रघुनाथ भास्कर, १३६.
गोडबोले, रामचंद्र परशुराम, ६०, ३९७.
गोडबोले, रावजी सदाशिव, १०३, २०६, २०७, २७६, ३५८, ३५९.
गोडबोले, विनायक वासुदेव, ११४.
गोळे, महादेव शिवराम २०२.
ग्रँट, रॉबर्ट, ३५, ४४, १६४, १६५.
ग्रंथांचीं भाषांतरें किंवा नवीन ग्रंथ करणारांस बक्षिसाविषयीचें प्रसिद्धिपत्र, ३६, ३७, ४३.
ग्रहसाधनाचीं कोष्टकें, २३३.
ग्रीन, प्रो., ३०३.
ग्रेकी लोकांचें वृत्तांतकथन, २९२, ३३६.
ग्लासगो, रे., ५७, १८६, २०२.
घगवे, बाळशास्त्री, २८, ४६, ८१, ११९, २४०, ३५५.
घोड्याची विद्या, १७५.
चिपळूणकर, कृष्णशास्त्री, ५४, ६२, ६५, ६६, १०३, १०४, १०८, १०९, १२६, १३६, १६७, १८२, २०४, २१३, २१६, २५७, २५८, २६४, २६५, २६६, २६७, २६८, २६९, २९१, २९५, ३४६, ३४८, ३४९, ३५०, ३५७, ३६३, ३६४, ३६५, ३६८, ३७२.
चिपळूणकर, विष्णुशास्त्री, १०, २०६, २०८, २७१, २८९, २९०, २९१, ३६१, ३८७.
चिपळूणकर लेखसंग्रह–भाग २ रा, १०, २०६.
चौलकर, नारायणशास्त्री जोशी, २४५.
चॅटफील्ड, ५८, ७०, १०३, २०६, २३१, २७०.
चॅपलीन, ६१.
छत्रे, केरो लक्ष्मण, २३०, २३१, २३२–२३३, २३८, २४४, २४५, २८८, २८९.
छत्रे, विष्णु सुंदर, २२५.
छत्रे, सदाशिव काशीनाथ, २२८, २२९, ३१२, ३४६, ३७८, ३८८, शाळा-पुस्तक मंडळी, २४, २५, **मराठी बोधवचनें**, १३७–१३८, **बोध-कथा**, १४६-१४८, **वेताळपंचविशी**, १५०, **इसप नीतिकथा**, १५१–१५३, **बाळमित्र**, १५४–१५९, ३८९, चरित्र, १५९–१६०.

जगन्नाथ शंकरशेट, २५, ५०, ६७, २२८, २४३.
जगाचा संक्षिप्त इतिहास (गाडगीळ), २९१, २९२.
जगाचा संक्षिप्त इतिहास (बेहरे), २९२, २९८.
जगाच्या इतिहासाचें सामान्य निरूपण, २९२.
जनावरांचें वर्णन, ४७, १७४, १७५.
जन्हवेकर, रामचंद्रशास्त्री, ३०, ४६, ८१, ८२, ९६, ११९, ३०४, ३०९, ३५५.
जमशेटजी जिजीभाई, २२८.
जर्विस, कॅं. जॉर्ज, २४८, २५८, २६६, २६७, ३०६, ३१०, ३४२, शाळा-पुस्तक मंडळी, २५, २८, ८१, १४६, २३२, गणिताचीं पुस्तकें, ४२, ४३, ४४, २१९–२२३, २३०, २३३–२३८, माध्यमवाद, ५०, ५१, चरित्र, २२७–२२९, **विद्येचे उद्देश लाभ आणि संतोष या विषयांचे संवाद**, २३९–२४०.
जर्विस, ले. क. टॉमस, २५, ३०६.
जागती जोत किंवा शेतपोत रीतभात यांविषयीं संवाद, ४२, १६७, १६९, १७४, १७५, २५९.
जांभेकर, बाळ गंगाधर, २७, ४१, ४६, ४८, ४९, ८३, ८८, ९०, ९१, ९२, ९३, ९४, ९५, ९६, १११, ११२, १७३, १७४, २११, २३२, २५०, २६७, २८६, २९४, ३०६, ३३२, ३४६, ३५५, ३५६, ३६५, ३७८, ३८८, **बाल व्याकरण**, ८४–८७, ९९, १०२, २२९, ३३६, ३९०, **नीतिकथा**, १४८–१४९, **इंग्लंड देशाची बखर**, २७६–२७८, २८०, २८१, **हिंदुस्थानाचा इतिहास**, २२९, २८१–२८४, २८७, **हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास**, २८४–२८५, २९०, ३६९, ३७०, **भूगोलविद्या**, ३०८–३०९, **भूगोलशास्त्र-गणितभाग**, ३०९–३११, **बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांचें जीवनवृत्त व लेखसंग्रह, खंड** ३, ८५, ३०९.
जेकब, जी. ए., ६६, ३८०.
जेस्पर्सन, ऑट्टो, २.
जोशी, कृष्णाजी सदाशिव, १३६.
जोशी, गोविंद गणेश, १०९.
जोशी, गोविंद बाबाजी, १४१, १४२.
जोशी, दिनकर भिकाजी, १३६.
जोशी, नारायण विष्णु, ६१, २१५.
जोशी, रघुनाथ कृष्ण, २४.
जोशी, रामचंद्र भिकाजी, ८०, ८१, १०३, १०८, १०९.
जोशी, सखारामशास्त्री, ११९.

टिळक, गंगाधर रामचंद्र, ६२, ९९–१०२, २३७, २३८.
टिळक, बाळ गंगाधर, ९१, १४८, ३३९, ३९८.
टेलर, डॉ., २५.
टौनशेंड, १७५, २७३.
डमार्गन याचा अंकगणिताचा मूळपीठिका, २२४, २२६, २२९.
डमार्गन याचा बीजगणिताचा मूळपीठिका, २२४, २२९, २३४, २३५.
ड्रमंड, ११५.
तर्खडकर, दादोबा पांडुरंग, १, १०, २८, ४६, ५५, ७१, ७८, ७९, ८०, ८४, ८६, १०५, १०९, २११, २९९, ३०३, ३४२, ३४३, ३४४, ३६७, ३६८, ३८०, ३९०, ३९१, **मराठी भाषेचें व्याकरण,** ८७–९९, १००, १०१, १४८, ३५६, ३५७, ३६५, **लघुव्याकरण,** १०२, १०३, आत्मचरित्रांतील उल्लेख, १३८, १५५, १६०, २२१, २४०, २४१, २४६, २४७, क्रमिक वाचन पुस्तकें, १८६, १८७, १८८, १८९, १९०.
मराठी नकाशाचें पुस्तक, २२९, ३०६, ३०७, ३०८.
तळेकर, श्रीकृष्णशास्त्री, १३१, १३२, १३३, २०६.
ताम्हनकर, भास्कर अनंत, ११४.
तोंडचे हिशेब, २३२.
त्रिकोणमिति, ३९, ४३, ६२.
त्रिभुवनाची गोष्ट, ३२८.
थेऊरकर, भाऊशास्त्री, २५६.
दंभहारक, २५३, २५४, ३५२.
देवकुळे, रावजी मोरेश्वर, २३१, २३२, २३८.
देवळे, राघो नारायण, १६८.
देवाच्या दहा आज्ञा, २१७.
देशव्यवहारव्यवस्था, ६९, २४९, २६२, २६३, २६४.
धर्माच्या मुख्य गोष्टी, ३२८.
धाकजी दादाजी, २५, २२८.
धारप मोरो बल्लाळ, २३१.
नवनीत, २०४-२०८, २१२.
नवलकर, गणपत रघुनाथ, ८०, १०९.
नवीन पंचोपाख्यान, ३२८, ३२९.
नवीन मराठी व्याकरण, १०९.
नवीन लघुहितोपदेश, १६१, १६२, १७४, १७५.
नाईक, व्यंकोबा, २४-२५, १५९.
नागानंद, २१२.

नॉट, सॅम्युअल, ३२०.
नातू, विनायकशास्त्री, १८३.
नाना नारायण, ४६, २२९, २७८, २७९.
नाना फडणवीस यांची बखर, ६९.
नाना मोरोजी, २५२, २५३.
नामार्थदीपिका, २१२.
निकोल्स, रे., ३२९.
निबंधमाला, २७१, २९१, ३६१, ३८७.
निरंजन माधव, ७.
नीतिकथा, ४१, ४७, १४८-१४९, १७४.
नीतिदर्पण, ४१, ४७, १६४-१६६, १६७, १७४.
नीतिबोधकथा ५३, १४९, १५०, १७५.
नीतिज्ञानाची परिभाषा, १७६.
नेटिव ओपिनियन, २००.
नेसबिट, रे., ७८, १७२, २५३, २५९, ३२१.
न्यूवेल, रे., ३२०, ३२१, ३२२, ३३०, ३३८.
पंचवार्तिक, ७३.
पंचांगदर्शन, २१२.
पंचांगसाधन कोष्टकें, २३३.
पंचोपाख्यान, ३०, ३१, ५१, ७७, १३७, १३८, १३९-१४३, १७४, १७५, ३२८, ३९४.
पटवर्धन, सीताराम विश्वनाथ, ३१६–३१७, ३८२.
पंडित मंडळाचा कोश, ११९-१२१, १२४, १२५.
पंडित, विष्णुशास्त्री, १३३-१३४, २८६.
पदमनजी, बाबा, १३०-१३२, १६१, १६२, १७५, १९२, ३३०, ३३१, ३३३, ३३४, ३३६.
पदार्थविद्या, ३२०, ३३७.
पदार्थविज्ञानशास्त्र, २३३, २४४.
पद्यात्मक लघुहितोपदेश, १९२.
पद्यात्मक व्याकरण, १०९.
परभू, मोरोबा भवानीशंकर, ३२९.
पवार, सदोबा भागोबा, २९७.
पशुज्ञानप्रकाश, ३३७.
पहिली पोथी–ज्ञानोदय, ३२३.
पहिली प्रश्नोत्तरावले, ३२९.

पाटकर, आत्माराम विनायक, १८२.
पाठारे, हरि केशवजी, ४५, ४६, ४८, १७१, १७२, १७३, १७४, १९२, २२३, २४१, २४२, २४३, २४४, २४५, २४६, २४७, २४८-२५०, २५५, २६३, २६६, २८०, २८१, २९४, ३४६.
पाठावलि-संस्कृत भाषेचें पहिलें पुस्तक, २१२.
पांडुरंग गणोबा, ३३७.
पापपीडितांस शांति, १२८, ३३०.
पार्वतीपरिणय, २१२.
पाळंदे, भास्कर दामोदर, ५७, ६५, १०९, १२६, १८६, १८७, १९४, २१२, २३८, २६७, ३२७, ३९०.
पुणें पाठशाळा, २१, २२, २३.
पुणें पाठशाळापत्रक, १०१, १०४.
पुणें शहरचें वर्णन, ६१, २१५.
पुराणिक, नारायण शास्त्री, ८४.
पुराणिक, महादेवशास्त्री, ५४, १७४, ३११, ३१२, ३१३.
पेटकर, भाऊशास्त्री, ६२.
पेरी, अर्स्किन, ५०, ५१, २२९.
पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद, २०, २१.
पोतदार, वासुदेव मोरेश्वर, २३१.
प्रभाकर, २८, ३५, ६३, ३४४, ३४६, ३७६, ३९५, ३९६.
प्रभु, नारायण केशव, १८४.
प्रश्न आणि उत्तर, ३२९.
प्रश्नोत्तरावलि, ३२९.
प्राचीन मिस्त्री लोकांचें वृत्तांतकथन, २९३.
प्राणवल्लभदास, २०३.
प्रार्थनासंबंधी प्रश्नोत्तरें, ३२९.
प्रौढबोध मराठी व्याकरण, १०९.
फडके, गंगाधरशास्त्री, ४६, ८१, ८२, ८३, ८४, ८५, ८६, ९२, १००, १०१, ११९, २२९, ३५५, ३५६, ३६८, ३८८.
फडके, गोविंद गंगाधर, २२५, २५२.
फडके, विष्णु गंगाधर, ८४.
फणसळकर, गोविंद रामकृष्ण, १३५, २९८.
फरार, सी. पी., १६८.
फरार, मिसेस, १७०, ३२८.
फॉरिश, जेम्स, ४२, ५०, १६७, १७१, २४६, २५३, २७८, २८०.
फिंडले, डॉ., ३०२.
फ्लिन, जेम्स, ७०, २५५.

फुलें वेचणार मुलाची गोष्ट, १७५.
फेअरबँक रे., ३२०, ३३५, ३३६.
फ्रेंच, कॅ. टी., २७, ६७.
फोर्ट विल्यम कॉलेज, ११-१३ १४, १९, ७४, ७५, ७६.
फोर्बस, १३१.
बखत्यारनामा, १८४.
बखर मराठ्यांची, ३६, ४०, ४६, ४७, २७२–२७५, २७६.
बर्जेस, रे. ७९, ८०, १००, ३३५.
बॅलेंटाइन, मिसेस, ३२०, ३३५, ३३६.
बापट, गोविंद शंकर, ११४.
बापट, विष्णुशास्त्री. १६५, १६६, १६७.
बॉबे ट्रॅक्ट अँड बुक सोसायटी, ३२१, ३२२.
बार्नेस, २३.
बालकोश, १३६.
बार्लो, जॉर्ज, १३.
बालगोष्टी, ३९, १७४, १७५.
बालबोध, १९३, २१७.
बालबोध मराठी व्याकरण, १०९.
बालव्याकरण, ४६, ४७, ८४, ८४–८७, ९९, १०२, २२९, ३३६, ३९०.
बालोपदेश, ४७.
बालोपदेशकथा, १६६, १६७, १७४.
बाळमित्र, भाग १, ३६, ४०, ४७, ४९, ५३, १५०, १५४–१५९, १६०, १७४, १७५, १७६, २२९, ३१२, ३८१, ३८२, ३८९.
बाळमित्र, भाग २, १५६, १५८, ३८९.
ब्रिग्ज, ले., १.
बिसल, डॉ., ३३२.
बीडकर, बाळकृष्ण मल्हार, १३४.
बीजगणित, ३९, ४३, २३३.
बीजभूमितिसंगतीकरण, २३३.
ब्रूस, हेन्री, ३२०, ३३६.
बेकर, १८६.
बेंजामीन फ्रांक्लीनाचा वृत्तांत, ६२.
बेरडे, विनायक यशवंत, १९२.
बेल, विल्यम हेन्री, ४५, ४८, २४५, २४९.
बेल, डॉ., २३.

बेल्झर्स एच. एस. के., ८०.
बेलसरे, खंडेराव भिकाजी, १०, २०६, २८९.
बेहरे, व्यंकटेश गोपाळ, २९२, २९८.
बैठकचावडी, १६२, १७५.
बोधकथा, ३४, ३९, १४७-१४८, १५९, १७४.
भाटवडेकर, कृष्णशास्त्री, २५५, २५६, २६६.
भाटवडेकर, भालचंद्र कृष्ण, ३९८.
भांडारकर, रामकृष्ण गोपाळ, ११४, १५६, १८५, ३८२.
भारत इतिहास संशोधक मंडळ, षाण्मासिक वृत्त शके १८३४, ५.
भाव कोणावर ठेवावा याचा विचार, २१७, ३३०.
भिडे, वामन अनंत १०९.
भिडे, विष्णु मोरेश्वर, ६२.
भिल्लिणी, १८३.
भूगोल आणि खगोल इत्यादिविषयक संवाद, ३४, ३५, ४६, ४७, २२९, ३०४–३०५, ३०८, ३०९, ३११, ३३४.
भूगोल खगोल म्हणजे भूगोलविद्येचीं आणि खगोलविद्येचीं मूलतत्त्वें, ३११, ३१२, ३१३.
भूगोलविद्या ४६, ३०८–३०९, ३११.
भूगोल विद्येचीं मूलतत्त्वें, ३१६–३१७.
भूगोलशास्त्र-गणितभाग, १४८, ३०८, ३०९–३११.
भूगोलाचें वर्णन, ३१३–३१४.
भूमापन, २३३.
भूमितीचें आदिकरण, २३३, २३४, २३७.
भोगीलाल, २०३.
मॅक्लेनन, जॉन, ४४, ४५, १४६, २५८, २५९, २६६.
मखबा, महमद इब्राहीम, २५, ५०, ७६, ७७, ७८, १५१, २९४.
मंगर, रे., ३२९.
मंडलिक, विश्वनाथ नारायण, २८, ५७, ६९, १५६, १७७, १८०, १८६, २११, २६३, २८७, २८८, २८९, २९०, ३८०.
मध्य हिंदुस्थानाचा इतिहास, २९७.
मनरो, टॉमस, १८, १९.
मनी, रॉबर्ट, ४, ३८, १२५, १२६, २७६, २८१.
मनोकृत्यगणित, ३२०.
मनोबोधकथा, १७४, १७५.
मराठी-इंग्रजी कोश (मोल्स्वर्थ) ४६, १२१-१२६, २१४.

मराठी नकाशाचें पुस्तक, ४६, २२९, ३०६, ३०७, ३०८.
मराठी बोधवचनें, ३०, ३९, ४७, १३७-१३८, १५९, १७४.
मराठी भाषेचा कोश (कॅरे) १५, ११५.
मराठी भाषेची लेखनपद्धति, ६०, ३९७.
मराठी भाषेचें नवीन व्याकरण, ९७, १०४, १०५, १०६, ३५७, ३५८.
मराठी भाषेचें मध्यम व्याकरण, १०३.
मराठी भाषेचें लहानसें व्याकरण, १०९.
मराठी भाषेचें सुलभ व्याकरण, १०९.
मराठी भाषेचें व्याकरण, (कॅरे) १५, ७४, ७५, ७६.
मराठी भाषेचें व्याकरण, (तर्खडकर) ४६, ८७–८८, ९४.
मराठी व्याकरण व्याख्यानमाला, १०९.
मराठी व्याकरणसार, १०९.
मराठी व्याकरणावरील निबंध, १०३, ३४९, ३५०.
मराठी शाळापत्रक, १०२, १०८, २०२, ३८७, ३९७.
मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, १, २७५.
मराठ्यांच्या इतिहासावर लहान मुलांकरितां सोपी कविता, २१२, २९९.
महत्त्वमापन, २३८.
महाजन, भाऊ, २७, २८, ५५, ६३, ७२, १११, ११२, ११३, १३४, १३५, २११, ३४४, ३४५, ३७६.
महात्मे, सूर्याजी सदाशिव, १८३.
महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास, (गोडबोले), २७६.
महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास, (पदमनजी), ३३६.
महाराष्ट्र देशाचें वर्णन आणि इतिहास यांचा प्रश्नोत्तरावलिरूप ग्रंथ, २७५, २७६, ३३६.
महाराष्ट्र भाषेचा कोश (पंडितमंडळ), ४६, ११९–१२१, १२४, १२५, २०८.
महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धि, १०७, ३६६.
महाराष्ट्र भाषेचें व्याकरण, (पंडित मंडळ), ४६, ८१–८२.
महाराष्ट्र भाषेचें व्याकरण, (फडके), ८३, ८४, ८५, ३५६.
महाराष्ट्र भाषेचें व्याकरण, (तर्खडकर), ४७, ८९, ९६–९९, १४८, २९९, ३४४, ३५७, ३६५, ३९०, ३९१.
महाराष्ट्र भाषेचें व्याकरणसार, १०९.
महाराष्ट्रीय नाटककार यांचीं चरित्रें, २१३.
महिपतराम रूपराम, २०३.
माडगांवकर, गोविंद नारायण, २८, ५७, ६७, ६८, ७१, १८७, १८८, १८९, १९०, १९२, २११, २२३, २५९, २६०, २६६.

माधव मोरोजी, २५२, २५३.
माध्यमवाद, ४९, ५०, २३४, २३५.
मालकम, जॉन, १२१, १४६, २१९, १३३.
मॉवर, विल्यम, ३२४, ३२५.
मिचेल, रे० मरे, ५७, ६४, ६५, ६६, १०९, १३२, १४०, १८६, २५३, २७८, ३००, ३२१, ३२९, ३३८, ३८०, ३९५.
मिशनरी क्रमिक पुस्तकें, ३३०, ३३१, ३३२.
मुजुमदार, शंकर बापूजी, २१३.
मुंबई इलाख्याचा भूगोल, ३१४, ३१५.
मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तक मंडळी, ३, ६, ९, २३, २६, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ८१, ११९, १२४, १२७, १३७, १५९, १७२, १७४, १८६, २१९, २२०, २२७, २३९, २४३, २४७, २४८, २६६, २६७, २७२, २७५, २७८, २८१, २९३, २९४, २९५, ३०२, ३०३, ३०६, ३१८, ३२७, ३२८, ३३४, ३३७, ३८८.
मुंबईचें वर्णन, २८, ६८.
मुल्ला फिरोझ, २५.
मुलांसाठीं प्रश्नोत्तरावली, ३२९.
मुलांसाठीं बोधाच्या गोष्टी, ३२९.
मृच्छकटिक, १८१, २००, २१२.
मेदी आणि पार्शी लोकांचें वृत्तांतकथन, २९२, ३३६.
मेनवेअरिंग, ४६, ४७, २२९, ३०४.
मेमोरियल पेपर्स ऑफ दि अमेरिकन मराठी मिशन, ३२२.
मोचनगड, १८१.
मोठ्या महाराष्ट्र व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीची पूरणिका (तर्खडकर), ९८, ९९.
मोडक, बाळाजी प्रभाकर, २५०, २५१.
मोडक, रामकृष्ण वि., ३३२, ३३३.
मोल्स्वर्थ जे., ४, ३०, ७८, ११६, १२१-१२८, १२९, १३०, १४६, २०९, २१४, २१७, २१८, २२९, २५३, ३१०, ३२१, ३३०, ३३८, ३६८, ३८३, ३८४, ३८५.
मोहनलाल रणछोडदास, २०३.
मोहोळकर, नारो रघुनाथ, २३१, २३८.
यात्रिकक्रमण, १७१–१७२, २४८, २४९.
यात्रेकऱ्याचा वृत्तांत, ४२, १७०-१७१, १७५.
युक्लिडकृत भूमितीचीं पहिलीं सहा पुस्तकें, २३८.

युरोपाकाकूच्या शाळेंतील मारामारी, १८३.
युरोपियन लोकांचे मराठी भाषेबद्दलचे विचार, २-४.
येशू खिस्तानें जी प्रार्थना आपल्या शिष्यांस सांगितली तिजवर टीका, २१७, ३३०.
यंत्रशास्त्राचीं मूळें, २५२.
रणजित, रामचंद्र विनायक, २९६.
रत्नकोश, १३४.
रसायनशास्त्र, २५०.
रसायनशास्त्रविषयक संवाद, ४५, ४८, ४९, २४६, २४७, २४८, २४९.
राजवाडे, कृष्णशास्त्री, ६२.
राजवाडे, विश्वनाथ काशीनाथ, १, ५, २०७, २०८, २७५, ३९६.
रानडे, महादेव गोविंद, ७०, ८०, ११३, ११४, २९९, ३८०.
रिचर्डसन, १३१.
रीड, एल., १२२, १२३, १३१.
रीव्हज, १३१.
रंगनाथ, १५.
लघु व्याकरण (केळकर), १०९.
लघु व्याकरण (तर्खडकर), ८६, १००, १०२, १०३.
लघु व्याकरण (टिळक), ९९, १००.
लघु शब्दसंग्रह, १३६.
लघु हितोपदेश, ४७, १६१, १७४, १७५.
लहान खगोलविद्या, ३३५,
लहान मुलांसाठीं प्रश्नोत्तरावलि, ३२९.
लहान मुलांकरितां गणित, ३३६.
लहान मुलांकरितां सुबोध व्याकरण, १०६-१०८.
लक्ष्मीज्ञान, २६२.
लिपिधारा, ३०, ३९, १३७.
लिमये, कुशाबा, २७५, २७६, ३३६.
लिमये, वामनाजी गोविंद, १०९.
लिमये, विनायक गोविंद, २३१.
लेंकरांची पहिली पोथी, ३२०, ३२२, ३२३.
लेंकरांची दुसरी पोथी, ३२३, ३२४, ३२५, ३२६.
लेले, गणेश सदाशिव, ६२, २९६.
लेस्टर, १८६.
लोकहितवादी, ६१, ६२, ६३, २२३, २६२.

लोकांचे दुःख जाऊन सुख होण्याविषिं संभाषण, १६२, १६३.
घरावर्दी, २३१, २३८.
वहिवाटवहि, २२३.
वर्तमानवाहक विद्युद्यंत्र, २५५, २५६.
वृत्तदर्पण, २१२.
वाक्यसुधाटीका, ७.
वाक्यावळी, १२७.
वागळे, बाळ मंगेश, ३८०.
वागळे, हरि परशुराम, १०९.
वाचनपाठमाला, ५३, २९५, ३४१.
वाचनपाठावलि, ३३२.
वाटसराची गोष्ट, १६७-१६८, १६९, १७४.
वाय्वावरण आणि त्यांतील चमत्कार, २५६, २५७.
वॉकर, सिमियन बेंजामिन, २००.
वॉर्डन, ५०, २१५.
वॉथेन, डब्ल्यू., ४०, ४१, ४२, ८३, ८५, ११६, १४६, १४९, १६५ १६७, २७९, २८०, ३१०.
विक्रमबत्तिशी, ७७.
विजयकर, मोरोबा कान्होबा, ६५, १०९.
विदुरनीति, ३०, ३१, ५१, ७७, १३७, १३८, १४३-१४४, १७५, ३९४.
विद्यार्थ्यांचा व्याकरणमित्र, १०९.
विद्येचे उद्देश, लाभ, आणि संतोष, ३६, २२८, २३९-२४०, २६७.
विद्योपक्रमाचा ग्रंथ, २५२, २५३, २५४, २५७.
विद्योपदेश, १७४, १७५.
विरामचिन्हांची परिभाषा, ५३, ३९४, ३९५.
विल्किन्सन, ५०.
विल्डर, रे०, ३३७.
विल्सन, रे०, ५७, ५८, ६७, ६९, १२६, १२७, १६७, १८६, २२५, २५९, २७०, २७८, ३१९, ३२१, ३२९, ३५१, ३९५.
विल्सन, मडम, २९२, २९३ २९४, ३३६.
विलोबी, ६७.
विविधज्ञानविस्तार, १८०, २७२, ३४४, ३४५, ३५३, ३५८, ३७४, ३७५, ३७६, ३७७, ३७८, ३७९, ३८०, ३८३, ३८४, ३८५, ३८६.
वेणीसंहार, २१२.

वेताळपंचविशी, ३०, ७७, १५०–१५१, १५९, १७५.
वेन्द्रे, जे., ३९८, ३९९.
वेब्स्टर, १३१, ३८६.
वैजनाथशर्मा, १५, ७५, ११५.
वेलस्ली, लॉर्ड, ११, १२, १३, १४, १५०.
व्यवहारदर्पण, ६२.
व्याकरणसंबंधीं उपयुक्तसंग्रह, १०९.
व्युत्पत्तिप्रदीप, ११४.
शब्दसिद्धिनिबंध, (दिवेकर, महाजन), ४९, ११०–११३.
शब्दसिद्धिनिबंध, (आठल्ये, आगाशे), ११३.
शब्दसिद्धिनिबंध, (गोडबोले, ताम्हनकर), ११४.
शब्दालंकार, ६२.
शाकुंतल, २१२.
शालापद्धति, ३०, १२८, २२९.
शालोपयोगी नीतिग्रंथ, १७२–१७४, २४९.
शारीर, ४५, २५८, २५९.
शालिवाहन चरित्र, २९४, २९५.
शास्त्रांतील कांहीं गोष्टी, ३२८.
शास्त्रीय मराठी व्याकरण, ३५९.
शास्त्रीय ज्ञानदर्शन, ६९, २५४, २५५.
शॉर्टरीड, ले., ३०९, ३१०.
शिंत्रे, भिकाजी शंकर, ८४.
शिंदे, रामा संताजी, ३२९.
शिल्पविद्या या विषयाचे निबंध, ४५, ४८, २४५, २४९.
शिक्षामाला, ४०, ४३, ४८, २२१, २२४, २२८, २३३, २३४, २३७.
शुकवहात्तरी, ७७.
शुक्ल, दाजीशास्त्री, ७८, ११९, ३८८.
शुभवर्त्तमान ३३०.
शेतकी आणि घरगुती व्यवस्था, २५९.
शेवकबोधनी, ९.
श्री मच्छंकराचार्यकृत श्री पांडुरंग स्तोत्राची टीका, २१२.
सदाचरणाच्या गोष्टी, १७५.
सरस्वतीमंडळ, १५९.
सरळ रेघ आणि गोलीय त्रिकोणमिति (आठले), २३७.
सरळ रेघ आणि गोलीय त्रिकोणमिति (टिळक), ३३८.

पुणे नगर वाचन मंदिर
पुणें २.

सरळ रेघ त्रिकोणमिति, २३३, २३४, २३७.
सवर्या आणि अभ्यास, १७७-१८०.
संक्षेप इतिहास, ६२.
संक्षिप्त भूगोलवर्णन, २१२, ३१४
साक्रेटीस ह्याचें चरित्र, ६२, २९५.
साठे, मोरशास्त्री, २२५.
सानप, रघु त्र्यंबकजी, ३२९.
साने, काशीनाथ नारायण, ६०, ३९७.
साने, बाबा, २७३.
सारसंग्रह, ३६, २५२, २५७.
सिद्धपदार्थविज्ञानशास्त्रविषयक संवाद, ४५, ४९, २४१-२४४, २४५, २४६, २४८, २४९.
सिंहासनबत्तीशी, १५, ३०, १४४-१४६, १७५, ३९४.
सीझरचें चरित्र, ६२.
सुहास्यवदन, ३८१.
सृष्टिजन्य ईश्वरज्ञान, ३३७.
सृष्टिज्ञान परिभाषा, ३१५.
स्टीफन्स, थॉमस, ५, १५, ४५, ७४.
स्टीव्हनसन, जेम्स, ६७, ६९, ७८, ७९, ८०, ९६, १००, १२३, १२९, १५५, २०९, २५३, २५४, २६६, ३२१, ३५७, ३६६, ३८६, ३९१, ३९३, ३९५.
स्त्रीकंठभूषण, ३३३.
स्त्रीन्यायचातुर्य, १८२.
हचिन्सन, कॅ., ११६, १२३.
हंसकोश, १३६.
हातवळणे, शंकर रामचंद्र, ६०, ३९७.
हार्कनेस, जॉन, ५७, १८६, २५२, २८७, ३९०, ३९१.
हार्ट, कॅ., ६७, ६९.
हॉग, डॉ., ६४, ६६, १०९.
हॉल, गॉर्डन, ३२०, ३२१. ३२२, ३२९, ३३४, ३३५, ३३८.
हॉवर्ड, ५६, ५७, ६५, ६६, १०४, १२६, १३३, १८६, १८७, १८८, १८९, १९०, १९१, २०७, २३८, २६७, २६९, २७०, २८७, ३४५, ३५१, ३९०.
हितोपदेश, १५, १६१, ३२७.
हितोपदेशपोथी, ३२७.
हिंदु कॉलेज, २१, २२.

हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास, २८४, २९०, ३६९.
हिंदुस्थानचा इतिहास, (Tr. Ex.), २८६, २८७.
हिंदुस्थानचा इतिहास, (काळे), २९६.
हिंदुस्थानाचा इतिहास, (गोखले), २९९.
हिंदुस्थानाचा इतिहास, (जांभेकर), ५३, २२९, २८१, २८२, २८३, २८४.
हिंदुस्थानाचा इतिहास, (मंडलिक), २८७, २८८, २८९, २९०.
हिंदुस्थानकथारस, २९०, २९१, ३५२, ३५३.
हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास, (ओक), २९०.
हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास, (काणे), २९०.
हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास, (फणसळकर), २९८.
हिंदुस्थानाचें वर्णन, ३१२, ३१३.
ह्यूम, रे., ३३७.
हेग, जे. एस., ३३१.
हेनरी आणि त्याचा संभाळणारा गडी संभू ह्याची गोष्ट, ३२८.
हेलिबेरी कॉलेज, १३-१४.
हेस्टिंग्ज, वॉरन, १६, १९.
होप, ५७, १८६, २०२.
क्षेत्रफळ घनफळ, ४३.
ज्ञानप्रसारक, ७१, ७२, ३४६, ३४७, ३४८, ३५०, ३५१, ३५३, ३५४, ३५९, ३६२, ३६३, ३६४, ३६७, ३६८, ३६९, ३७०, ३७१, ३७२, ३७३, ३८१.
ज्ञानबोधक, ७२, ७३.
ज्ञानमार्गाची सूचना, १२८.
ज्ञानोदय, ६२, ६३, ६९, ७०, १२६, १२८, २१७, २१८, ३१२, ३२१, ३३१, ३३२, ३४५, ३९४, ३९५.

शुद्धिपत्र

(पहिला आंकडा पृष्ठाचा दुसरा ओळीचा.)

	अशुद्ध	शुद्ध
२३–२३	मंजुर	मंजूर
२५··· ८	शाखारुपांत	शाखारूपांत
२५–२३	इसापनीति	इसप नीतिकथा
३३–१८	probla- matical	proble- matical
३६–२४	इसापनीति	इसप नीतिकथा
३६–३०	मराठ्यांची बखर	बखर मराठ्यांची
३९–२६	इसापनीति	इसप नीतिकथा
४०–२७	मराठ्यांची बखर	बखर मराठ्यांची
४३– ४	१८२५	१८२३
४५–११	'पदार्थ- विज्ञानशास्त्र- विषयक संवाद'	'सिद्धपदार्थ- विज्ञानशास्त्र विषयक संवाद'
४६–२३	'मराठ्यांची बखर'	'बखर मराठ्यांची'
४६–३१	'नकाशाचें पुस्तक'	'मराठी नकाशाचें पुस्तक'
४७–२०	इसापनीति	इसप नीतिकथा
४७–२१	'मराठ्यांची बखर'	'बखर मराठ्यांची'
४९–१३	इसापनीति	इसप नीतिकथा
४९–१३	'सिद्धपदार्थ विषयक संवाद'	'सिद्धपदार्थ- विज्ञानशास्त्र विषयक संवाद'

	अशुद्ध	शुद्ध
५०– २	माध्यमवादाच	माध्यमवादाचें
५३–२८	'इसापनीति' 'बालमित्र'	'इसप नीति- कथा' 'बाळमित्र'
	'हिंदुस्थानचा इतिहास'	'हिंदुस्थानाचा इतिहास'
६२–२९	हातें	होतें
६३– ८	महत्वाच्या	महत्त्वाच्या
६३–२३	वर्षे	वर्षें
६४–२१	प्रोत्सनहि	प्रोत्साहन
६६–१८	twith	with
६६–२८	यावेळेपासूना	यावेळेपासून
६९– ७	'गुजराथचा इतिहास'	'गुजराथ देशाचा इतिहास'
६९–१०	विद्याथ्याच्या	विद्यार्थ्यांच्या
६९–२५	अंगवार	अंगावर
७३–१३	घेण्यासाठीं	घेण्यासाठीं
७४–२३	घ्यावयाचीहि	घ्यावयाची
७६– १	इभ्राइम	इब्राइम
७६–२०	तत्कलीन, भाषातज्ञ	तत्कालीन, भाषातज्ज्ञ
७८–२५	Orienta	Orien tal
७८–२६	Spectctor	Spectator
८१–१५	सक्रेटरी	सेक्रेटरी
८२–१३	अनुसधानानें	अनुसंधानानें
८२–२५	वणाचें	वर्णाचें
८३–२८	लाघबार्थ	लाघवार्थ
८६– २	असल्यामुळ	असल्यामुळें

	अशुद्ध	शुद्ध
८८— ८	शाळास्पुतक	शाळापुस्तक
८८—१६	रुपय ऐवजीं	रुपयांऐवजीं
९४— ९	thee	these
९५— ५	'जण करून'	'जेणें करून'
९६—२१	लिहिलली	लिहिलेलीं
९७— ९	शिक्षणमक्रांत	शिक्षणक्रमांत
१०५–२४	'मराठी भाषेचें व्याकरण'	'मराठी भाषेचें नवीन व्याकरण'
१०६–३१	,,	,,
१०७– १	भाषेची	भाषेचीं
१०७–१६	भाष-	भाषा-
१०७–२१	विषयक व्यकरण- विषयक	विषयक व्याकरण- विषयक
१०८– ६	मुलांचें	मुलांकरितां
१०८–२९	,,	,,
१०९– १	व्याकरणे	व्याकरणें
१०९–१०	यांचे	यांचें
१०९–१९	सर्वांनी	सर्वांनीं
११०– ४	prepa- rtion	prepa- ration
११२– ४	बाल- शास्त्रयांनीं	बाळ- शास्त्र्यांनीं
११३–२३	दोघानांहि	दोघांनाहि
११४–३७	विनायक वासुदेव	गोविंद शंकर
११६–३३	१३०	१२३
११७– ६	inacu- rate	inaccu- rate

	अशुद्ध	शुद्ध
११८–२२	परकियांना	परकीयांना
१२०–१४	स्वस्वेदशाचे	स्वस्वदेशाचे
१२५–२७	inacu- rate	inaccu- rate
१३१–१०	बक्षिस	बक्षीस
१३२– ७	पडेल	पडले
१३५– १	कोश- वाङ्यम	कोश- वाङ्मय
१३७– ७	वर्णिलेंलें	वर्णिलेलें
१३८–२८	रावसाहेब	रावबहादूर
१४६–२३	प्राविण्य	प्रावीण्य
१५५– ५	छत्रेबद्दल	छत्र्यांबद्दल
१५५–३२	रावसाहेब	रावबहादूर
१५६–१४	छत्रेनां	छत्र्यांना
१५८–२५	पूसूं	पुसूं
१५८–२९	फेरबद्दल	फेरबदल
१५९–२३	येण्यासारखे	येण्यासारखीं
१६२– ७	वाक्यांच	वाक्यांचे
१६२–२४	इग्रज	इंग्रज
१६४–१७	जाण	जाणे
१६४–३०	बोघपर	बोधपर
१६५– ६	कले	केलें
१६६–१८	देशांताल	देशांतील
१६९–३०	अनंत	अमृत
१७३–२३	axcep- tion	excep- tion
१७४–१४	uninle- lligible	uninte- lligible
१७५—१४	वाचलल्या	वाचलेल्या
१७५—२४	कँडीनां	कँडींना

	अशुद्ध	शुद्ध
१७७– ३	खाजगिरीत्या	खाजगीरीत्या
१८०–२७	occurance	occurence
१८१– २	विद्यखात्यानें	विद्याखात्यानें
१८१– ३	कांदबरीबद्दल	कादंबरीबद्दल
१८१–१२	spelting	spelling
१८१–१५	गोडबाले	गोडबोले
१८१–२६	'कादंबरी-सार'	'कादंबरीसार –पूर्वार्ध'
१९१–२५	पराकाष्टा	पराकाष्ठा
१९१–२६	टॅन्स्लेटर	ट्रॅन्स्लेटर
२०३–१२	नात्यान	नात्यानें
२०३–१४	पुस्तकांच्य	पुस्तकांच्या
२०४–१२	कँडीनां	कँडींना
२०७–२९	तात्यानीं	तात्यांनीं
२०९– ६	यानांहि	यांनाहि
२११–१८	'इसाप-नीति'	'इसप-नीतिकथा'
२१७– ३	शालय	शालेय
२१७–२८	'भाव कोणावर ठेवावा'	'भाव कोणावर ठेवावा याचा विचार'
२१९–१२	persuits	pursuits
२१९–१४	instill	instil
२२०–१५	indispen-sible	indispen-sable
२२१–२९	रावसाहेब	रावबहादूर
२२९–१४	reccive, develope-ment	receive, develop-ment
२२९–२६	'इसपनीति'	'इसप नीतिकथा'
२२९–२७	'नकाशाचें पुस्तक'	'मराठी नकाशाचें पुस्तक'
२२९–२९	हिंदुस्थानचा	हिंदुस्थानाचा
२३१–१८	आवत्त्यांनतर	आवृत्त्यांनंतर
२३१–१९	यांना	यांनीं
२३२–११	केल	केलें
२३२–१४	ओलबार	ओलेंबार
२३३–२०	पौर्वात्त्य	पौर्वात्य
२३५– ५	होईल	होईल
२३८–३६	अग्रेसरत्त्व	अग्रेसरत्व
२४०–३३	रावसाहेब	रावबहादूर
२४१–३१	,,	,,
२४४–१९	साम्यता आली	कांहीं साम्य आलें
२४७– ८	नाहीं	नाहीं
२४७–३२	रावसाहेब	रावबहादूर
२५०–३०	युरोपखंडात	युरोपखंडांत
२५४–२८	मंडळी' मार्फत	मंडळी' या संस्थेमार्फत
२५५– ३	शस्त्रांचें	शास्त्रांचें
२५५– ९	Safty	Safety
२५७– ७	ग्रथांत	ग्रंथांत
२५७–२९	वक्तृत्त्व	वक्तृत्व
२५९–१०	दिल	दिलें

	अशुद्ध	शुद्ध
२६०–१८	thanks	thinks
२६१– ७	use	used
२६३– ९	केशवर्जीनी	केशवर्जीनीं
२६५–१२	comman	common
२६५–१३	करतानांच	करतांनाच
२६९– ६	असतानांहि	असतांनाहि
२६९–२८	द्यावयाच	द्यावयाचें
२७२–१९	मध्य जे	मध्यें जें
२७३–३१	१८२९	१८३०
२७४–३०	,,	,,
२७८–२७	हे	हें
२८२–१९	phase	phrase
२८७–२१	शिष्यत्त्वाच्या	शिष्यत्वाच्या
२९५–१५	धोरणाप्रमाणे	धोरणाप्रमाणें
२९५–२८	गोष्टीना	गोष्टींना
२९५–२९	कँडीनीं	कँडींनीं
२९६– ३	सदाशिव गणेशशास्त्री	गणेश सदाशिव
२९७–१०	हे	हें
२९७–२५	कँडीनां	कँडींना
२९९– ९	पांडुरग	पांडुरंग
२९९–१८	पंताकडून	पंतांकडून
३०१–१७	ony	only
३११–१८	भूगोलावरील नवीं पुस्तक	भूगोलावरील नवीं पुस्तकें
३२०–१८	बॅलंटाईननें	बॅलंटाईननें
३२०–१९	'पदार्थविज्ञान'	'पदार्थविद्या'
३२२–१०	जनकत्त्व	जनकत्व
३२२–१८	चत्मकारिक	चमत्कारिक
३२६–१५	आईन	आईनें
३२७–२३	पुढ	पुढें
३३०– ७	(१८३१)	(१८२९)
३३०– ९	(१८२९)	(१८२८)

	अशुद्ध	शुद्ध
३३२–१३	ओकासारख्या	ओकांसारख्या
३३२–२५	हिंदूपैकीं	हिंदूंपैकीं
३३४–२०	अगोर	अगोदर
३३५–२५	हळुहळु	हळूहळू
३३६–२२	आशुरी	आशूरी
३४४–२६	सासुगिरी	सासूगिरी
३४४–२७	भाऊनीं	भाऊंनीं
३४६–११	कँडीना	कँडींना
,, ,,	काशिनाथ	काशीनाथ
३४७–२७	सुचवित	सुचवीत
३५१– ६	नापसंति	नापसंती
,, ७	,,	,,
३५२–१८	शिष्यत्त्व	शिष्यत्व
३६२–१८	कँडीप्राणित	कँडीप्रणीत
३६९–२८	गृहित	गृहीत
३७१–२८	eareless	careless
३७२– ८	श्रवण	श्रवणं
३७४– २	conposi tion	composi- tion
३७५– ९	पट्टाशिष्यत्त्व	पट्टाशिष्यत्व
३७५–११	,,	,,
३७७– ५	सरकारयुक्त	सकारयुक्त
३७७–२१	garticu- lar	particu- lar
३७८– ९	aad	and
३७८–१९	सासुगिरी	सासूगिरी
३७९–३०	सग्दुणाची	सद्गुणाची
३८०–१४	गा.	गो.
३८१–२१	प्रश्न	श्रम
३८२–२७	कँडीप्राणित	कँडीप्रणीत
३८४– ५	भ्रांति	भ्रांति
३८६– ७	जिलखाइस्ट	गिलखाइस्ट
३९२– ४	nuet.	neut.
३९७–१२	द्वित्त्व	द्वित्व

८०५२